# स्वामी विवेकानन्द

यांचे

# समग्र ग्रंथ

नवम खंड

१९२२

Printed and published by M. N. Kulkarni
at his Karnatak Printing Press,
No. 434, Thakurdwar,
Bombay

बहू शास्त्र धुंडाळितां वाड आहे
जया निश्चयो एक तोही न साहे ।
मती भांडती शास्त्रबोधें विरोधें
गती खुंटती ज्ञानबोधें प्रबोधें ॥

—श्रीसमर्थ.

# प्रकाशकाची प्रस्तावना.

स्वामी विवेकानंद यांच्या संपूर्ण ग्रंथावलीचा नववा खंड वाचकांस आज आम्ही सादर करीत आहों. आणखी दोन खंडांत ही ग्रंथावली पूर्ण होईल. हें काम शक्य तितक्या लवकर पुरें करून अशाच प्रकारच्या दुसऱ्याही ग्रंथाचें प्रकाशन हातीं घ्यावें, असा आमचा विचार होता व अद्यापिही तो आहे; पण अशा प्रकारच्या कार्यांतील मुख्य अडचण सर्वश्रुत आहेच. अशा प्रकारच्या ग्रंथांस वाचक आधींच बेताचे, आणि त्यांतील बहुतेक, मध्यम वर्गांतील असावयाचे. यामुळें केवळ धंद्याच्या दृष्टीनें हा व्यवहार आंत बट्ट्याचाच होतो. सर्व प्रकारच्या छपाईच्या सामानाची महागाई कल्पने पलीकडे झाली असतांही आम्हीं प्रस्तुत मालेची किंमत फारशी वाढविली नाहीं. त्यांतून भरींतभर म्हणून पुस्तकें मागवून व्ही. पी. परत करणारे उद्धारधीही भेटतातच. ही माला पुरी होऊन अशाच प्रकारचे आणखीही कांहीं ग्रंथ प्रसिद्ध होणें इष्ट आहे, असें आमच्या वाचकांस वाटत असल्यास त्यांनीं नवे वर्गणीदार मिळवून देऊन आम्हांस साहाय्य करावें. अशी विनंति करतों.

# अनुक्रमणिका.


पृष्ठ.

ज्ञानयोग-व्याख्यान-माला

एक उघडें रहस्य . . . . . . . . . १

कैवल्याचा मार्ग . . . . . . . . . १४

याज्ञवल्क्य आणि मैत्रेयी . . . . . . २७

सांख्यविचार . . . . . . . . . . ३९

सांख्य आणि वेदांत . . . . . . . . ६०

वेदान्त व हक्क . . . . . . . . . ७७

हक्क . . . . . . . . . . . . १०२

अभ्यास . . . . . . . . . . . ११२

भक्ति . . . . . . . . . . . १३६

हिंदु चरित्रक्रमांतील वेदान्ताचें स्वरूप . . . . . १६४

हिंदुस्थानांतील तत्त्ववेत्ते . . . . . . . . . १९६

आपणांपुढील कार्य . . . . . . . . . . . २२५

दानधर्म . . . . . . . . . . . . . २५०

हिंदुधर्मांतील सामान्य सिद्धान्त . . . . . . २५२

हिंदु तत्त्वज्ञानाचा इंग्लंडावर घडलेला परिणाम . . २७९


संन्याशाचें ध्येय आणि त्याचा अभ्यास . . . . २८७

मी काय शिकलों . . . . . . . . . . २९१

DIFFERENT VIEWS OF

# THE HINDU TEMPLE

2963 WEBSTER ST., SAN FRANCISCO, CALIF., U. S. A.




THE FIRST HINDU TEMPLE in the Whole Western World, S. W. cor. Webster and Filbert Streets. Erected August 21, 1905, by The San Francisco Vedanta Society, San Francisco, California, United States of America, under the Auspices of The Ramakrishna Mission, Belur-Math, Calcutta, India. — *Copyright, 1908, by S. F. Vedanta Society.*

**पाश्चात्य देशांतील पहिलें हिंदु देवालय.**

( सॅन्फ्रान्सिस्को येथील देवालयाचे निरनिराळे देखावे. )

# स्वामी विवेकानंद यांचे समग्र ग्रंथ.

## नवम खंड

## ज्ञानयोग-व्याख्यान-माला.

### एक उघडें रहस्य.

विश्वांतील वस्तुजाताचें वास्तविक स्वरूप काय आहे याचा उलगडा करण्याकरितां कितीही प्रकारची खटपट आपण केली तरी अखेरीस एक वेळ अशी येते कीं त्या वेळीं परस्परविरोधी सिद्धांत आपणासमोर उभे राहतात. बाह्यत: तरी त्यांचा विरोध इतका स्पष्ट असतो कीं त्यांची एकवाक्यता आपणास करवत नाहीं. एखादी गोष्ट आपल्या बुद्धिवादाच्या दृष्टीनें ग्राह्य वाटत नाहीं, तथापि वस्तुस्थितींत तिचें अस्तित्व प्रत्यक्ष दिसत असतें. कालस्थलादिकांनीं बद्ध अशा एकाद्या वस्तूचें परीक्षण आपण करीत असतों; नियमबद्ध विश्वाच्या बाहेरची ती नाहीं हें आपणांस ठाऊक असतें; तथापि तिचें परीक्षण जों जों करीत जावें तों तों ती आपणास अधिक अधिक लांब नेत जाते व अखेरीस आपल्या बुद्धीच्या टप्प्याबाहेर ती नाहींशी होऊन जाते. तिच्या कोणत्याही गुणांचा अंत आपणास सांपडेनासा होतो. दृश्य गुणांबरोबर गुप्त गुण तिच्या ठिकाणीं काय असावेत याचा अजमासही आपणास करवत नाहीं. तिच्या ठिकाणचें सामर्थ्य अथवा इतर वस्तूंशीं तिचा सापेक्ष संबंध इत्यादि अनेक रहस्यें अखेरपर्यंत आपणास रहस्यरूपच असतात. त्यांचा उलगडा कधींच होत नाहीं. उदाहरणार्थ एखादें सामान्य फूल

घेऊं. तें आपल्या रोजच्या परिचयांतलें आहे. फूल पाहिलें नाहीं असा मनुष्यप्राणी आपणास आढळावयाचा नाहीं; तथापि कोणत्याही एका फुलाचे झाडून सारे गुणधर्म मला ठाऊक आहेत असें छातीवर हात ठेवून कोण म्हणूं शकेल ? त्या एका फुलाचीसुद्धां सर्वांगीं परिपूर्ण माहिती करून घेणें आपणास शक्य नाहीं. काय चमत्कार पहा ! सृष्टिनियमांनीं पूर्ण जखडलेलें तें फूल पाहतां पाहतां आपल्या बुद्धीच्या पलीकडे जाऊन अदृश्य झालें—अनंतांत त्याचा लय झाला. आरंभीं तें सान्त होतें—बद्ध होतें; पण अखेरीस तें अनंत—मुक्त—झालें. एका वाळूच्या कणाचीही स्थिति हीच आहे. त्या कणाचें पृथक्करण करूं लागा. त्यांतील सारे घटक शोधून काढून त्याची अखेरची वासलात आपण लावूं शकूं असें आरंभीं आपणास वाटत असतें; पण अखेरीस आपल्या भ्रमाचा भोंपळा फुटतो. तो कण अनंत आहे असें आपल्या अनुभवास येतें. पण हा अनुभव येईपर्यंत तें सान्त आहे, आणि त्याचे घटक निश्चित आहेत असेंच आपणास वाटत असतें. अशाच रीतीनें साऱ्या वस्तू सान्त आहेत असें आपणास वाटत असतें.

हा जडसृष्टींतील नियम आपल्या अंतःसृष्टीसही लागू आहे. आपले मानसिक विचार आणि अनुभव हे असेच सान्त आहेत या भरंवशानें आपण वागत असतों. एखाद्या क्षुद्रशा भासणाऱ्या विचाराचा पाठलाग आपण करूं लागलों तर अखेरीस तोसुद्धां आपल्या हातीं लागत नाहीं. अनंतांत तो केव्हां आणि कसा गडप होतो हें आपणास समजतही नाहीं. पाहतां पाहतां आपली दृष्टि तो चुकवितो आणि अनंताच्या अथांग गुहेंत बुडी देतो. आपण आपलें स्वतःचेंच उदाहरण घेऊं. आपल्या अत्यंत परिचयाची अशी वस्तु कोणती असेल तर ती आपण स्वतःच; पण आपल्या स्वतःच्या अस्तित्वाबद्दल तरी अगदीं निश्चित अशी माहिती आपणास काय आहे ? आपलें अस्तित्व आहे अशी पूर्ण जाणीव आपणांस असते. सृष्टिनियमांनीं जखडून टाकलेलें असें आपलें स्वरूप आहे हें आपण जाणत असतों. कांहीं काळ आपण जगतों आणि अखेरीस मरून जातों. आपल्या दृष्टीचें क्षितिज फार कोतें आहे. आपल्याभोंवतीं सर्व दिशांनीं विश्व पसरलें आहे; आणि त्यांत आपण बांधले गेलों आहों. कांहीं विशिष्ट कारणसमुच्चयानें आपला देहबंध निर्माण झाला आहे; पण कोणत्या क्षणीं त्याची विघटना होईल

हें आपणास सांगवत नाहीं. या सर्व गोष्टी आपल्या पक्क्या ओळखीच्या आहेत. आपलें सामर्थ्य किती कोतें आहे पहा! आपल्या इच्छाशक्तीला पदोपदीं आघात होतात. क्षणोक्षणीं तिचें सामर्थ्य कुंठित होतें. हजारों गोष्टी करण्याची हांव आपल्या चित्तांत असते; पण त्यांपैकीं आपल्या हातून कितीशा गोष्टी पार पडतात? आपली इच्छा स्वैरपणें वावरत असते. तिच्या गतीला जणूं कांहींच अडथळा नाहीं. प्रत्येक वस्तु आपणास हवीशी वाटते. आकाशांत चमकणाऱ्या ताऱ्यावर जाऊन राहावें असेंही आपणास वाटतें; पण या साऱ्या इच्छांपैकीं कितीशा तृप्त होतात? आपल्या इच्छातृप्तीच्या आड आपलें शरीर येत असतें. आपल्या साऱ्या इच्छा तृप्त होऊं नयेत अशी सृष्टीचीच इच्छा असते. आपलें दौर्बल्य आपल्या आड येत असतें. रेतीच्या एखाद्या कणाचा अथवा एखाद्या फुलाचा पुरा थांग ज्याप्रमाणें आपणास कधींच लागत नाहीं, अथवा ज्याप्रमाणें हें जड जग अखेरपर्यंत आपणास कोडेंच राहतें, त्याचप्रमाणें आपण स्वतःही आपणास कोडेंच आहों; किंबहुना या बाह्यजगाचा शोधही एक वेळ आपणास लागेल, पण आपलाच शोध लावणें आपणास त्याहून शतपट अधिक दुस्तर आहे. आपण स्वतः सान्त कीं अनंत या प्रश्नाचें निश्चित उत्तर आपणास अद्यापि देतां आलें नाहीं. वास्तविक आपण सान्त आहों आणि अनंतही आहों. समुद्राच्या लाटां-सारखे आपण आहों. समुद्राची लाट म्हणजे समुद्राच्या रूपाची असतांही त्यापासून भिन्न असते. लाट या रूपानें ती भिन्न असते, तथापि तीही समु-द्राचाच एक भाग असते. म्हणजे ती समुद्र आहे हेंही खरें आणि ती समुद्र नाहीं हेंही खरें. हा समुद्र नाहीं असें त्या लाटेच्या कोणत्याही अंशाबद्दल आपणास म्हणतां यावयाचें नाहीं. 'समुद्र' हें नांव त्या लाटेला आणि समुद्राच्या दुसऱ्या कोणत्याही भागाला सारखेंच लागू पडतें, आणि असें असतांही 'लाट' या दृष्टीनें तिचें अस्तित्व समुद्रापासून वेगळें असतें. अशाच रीतीनें अनंत अस्तित्वाच्या महासागरावरील लाटा आपण आहों—त्या सागरावरील क्षुद्रतरंग आपण आहों, या दृष्टीनें आपण सान्त आहों; पण आपला स्वतःचा अंत पाहण्यासाठीं आपण धडपडूं लागलों कीं आपलें अनंतत्व प्रत्ययास येतें आणि आपला अंत आपणास लागेनासा होतो.

आपलें जीवित जणुं काय स्वप्नवत् आहे. स्वप्नांतल्या मनाला स्वप्नही

खरें वाटत असतें. मन स्वतः स्वप्नमय असतें तोंपर्यंत स्वप्नालाही सत्यत्व असतें; पण तें जागृत होऊन पाहूं लागतांच स्वप्न अदृश्य होतें. मग स्वप्न आपल्या हातीं कधींच सांपडत नाहीं. असें कां? स्वप्न खोटें नव्हतें. स्वप्नाचें अस्तित्व त्याच्या चालू काळीं खरेंच होतें. मग तें आपल्या हातीं कां सांपडूं नये? याचें कारण हेंच कीं त्याचें अस्तित्व आपल्या बुद्धीच्या कक्षेबाहेरचें आहे. आपल्या आटोकाट विवेचकबुद्धीची हद्द जेथें संपते तेथेंच स्वप्नाची हद्द लागते. यामुळें आपल्या बुद्धीच्या आटोक्यांत त्याला आणणें आपणास शक्यच नाहीं. आपल्या या जीवितांतील प्रत्येक वस्तु अशाच अफाट स्वरूपाची आहे. वस्तुजाताच्या विस्तारापुढें आपल्या बुद्धीची मातब्बरी कांहींच नाहीं. यामुळें बुद्धीनें सांगितलेल्या कायद्याच्या मर्यादेंत हें वस्तुजात केव्हांच येत नाहीं. बुद्धीचा हुकूम तें धुडकावून लावीत असतें. त्याच्याभोंवतीं आपल्या कायद्याचें जाळें पसरण्यासाठीं बुद्धि धडपडत असते आणि तिच्या या धडपडीकडे पाहून तें वस्तुजात हंसत असतें. हा बाह्य वस्तुजाताचा नियम मानवी आत्म्याच्या ठिकाणीं हजारपटीनें अधिक खरा आहे. ‘मी कोण?’ हें या सर्व चराचर सृष्टींतलें मोठ्यांतलें मोठें कोडें आहे.

हे कोडें किती आश्चर्यजनक आहे पहा! नुसत्या डोळ्याचेंच उदाहरण घ्या. डोळ्याइतकें नाजुक इंद्रिय दुसरें नाहीं. क्षणार्धांत त्याचा नाश लीलेनें करतां येईल; तथापि अत्यंत प्रचंड अशा सूर्याचें अस्तित्व त्याच्या अस्तित्वावर अवलंबून आहे. डोळा आहे म्हणून सूर्य आहे. जग आहे अशी खातरजमा देण्यास तुमचा डोळा आहे म्हणूनच जगाला अस्तित्व आहे. हा चमत्कार काय आहे याचा क्षणभर विचार करा. डोळा तो केवढासा आणि त्याचा प्रभाव किती! एखादी लहानशी टांचणी अथवा प्रकाशाचा किरण त्याचा नाश करूं शकेल. तथापि सूर्यासारख्या प्रचंड वस्तूचें अस्तित्व त्याजवर अवलंबून आहे! जगांतील अत्यंत चमत्कारिक वस्तूंचें अस्तित्व या दोन चिमुकल्या डोळ्यांवर अवलंबून आहे. हे म्हणतात, “हे प्रकृति, तुला दृश्य अस्तित्व आहे.” एवढें यांनीं म्हटलें पुरे कीं प्रकृतीचें अस्तित्व आपण निमूटपणें कबूल करतों. हीच गोष्ट आपल्या साऱ्या इंद्रियांनाही लागू आहे.

हा सारा प्रकार आहे तरी काय? यांत दुर्बल कोण आणि बलवान् तरी कोण? मोठें कोण आणि क्षुद्र कोण? विश्वांतील अवघ्या वस्तू परस्परावलंबी

आहेत; मग यांत उच्च कोण आणि नीच तरी कोण? एखाद्या मोठ्या वस्तूच्या अस्तित्वाकरितां अत्यंत लहान अशा परमाणूच्या अस्तित्वाचीही जरूर आहे. तो क्षुद्र परमाणु नाहींसा झाला तर त्या प्रचंड वस्तूचें अस्तित्वही संपुष्टांत येईल. अशा स्थितींत अमुक लहान आणि अमुक मोठा याचा तरी निश्चय कसा करावा? असा निवाडा निश्चितपणें करणें शक्य नाहीं; कारण लहान आणि मोठा असा भेद मुळांतच नाहीं. प्रत्येक वस्तूंत तोच अनंत महासागर अंतर्बाह्य व्यापून आहे. अत्यंत क्षुद्रशा दिसणाऱ्या वस्तूचें वास्तविक स्वरूप अनंत हेंच आहे. आपल्या डोळयाला बाह्यतः जेवढें दिसत असतें तें स्वरूपही वस्तुतः अनंत आहे. हें समोर दिसणारें झाडही वस्तुतः अनंतरूप आहे, आणि याचप्रमाणें विश्वांतील यच्चयावत् वस्तू अनंत आहेत. आपण जें जें कांहीं पाहतों अथवा स्पर्शद्वारा ज्या ज्या वस्तूचा अनुभव आपणास होतो ती ती वस्तु अनंतरूप आहे. वाळूचा एक कण, प्रत्येक विचार आणि जीवात्मा आणि जिला अस्तित्व म्हणून आहे अशी प्रत्येक वस्तु अनंत आहे. जें अनंत तें अनंत आहेच; पण जें सान्तसें दिसतें तेंही अनंत आहे. आपल्या अस्तित्वाचें स्वरूप या प्रकारचें आहे.

आतां इतकी गोष्ट मात्र खरी कीं या आपल्या अनंतत्वाची चांगलीशी जाणीव आपल्या ठिकाणीं नाहीं. आपल्या सध्याच्या स्थितींत ही जाणीव बहुधा अगदीं पुसट अशी झाली आहे. आपली ही जाणीव समूळ नष्ट झाली आहे असें मात्र समजूं नये; कारण तसें करणें कोणालाच शक्य नाहीं. आपण चिरंजीव आहों असेंच आपणास नित्य वाटत असतें. माणसें मरतात ही गोष्ट प्रत्यहीं आपल्या डोळयांनीं पाहत असतांही आपण अमर आहों असें आपणास वाटत असतें. आपण मरून नाहींसे होणार असा विचार कोणाच्याही मनांत येत नाहीं. अनंत अस्तित्वाशीं जो आपला नित्य संबंध आहे त्याचें कार्य अदृश्यपणें आपल्या ठिकाणीं अविरत चालू आहे. आपण आपलें अनंतत्व अंशतः विसरलों आहों हेंच आपल्या साऱ्या दुःखाचें कारण आहे. आपल्या रोजच्या चालू व्यवहारांत बारीक सारीक गोष्टींपासूनही आपणास उपद्रव होतो. बारीकसारीक जीवजिवडेही आपले धनी होऊन बसत असतात. आपण स्वतः क्षुद्र प्राणी आहों असा जो भ्रम आपणास झाला आहे त्यामुळेंच हीं सारीं दुःखें आपण आपणावर ओढून घेतों. पण आपण अनंत

असतांही तशी भावना करणें किती कठीण झालें आहे पहा ! एखादी क्षुद्र वस्तूही आपला समतोलपणा बिघडविण्यास पुरेशी होते. आपला तोल इतका नाजुक झाला आहे कीं एखाद्या क्षुद्र वस्तूच्या यत्किंचित् आघातानें आपण कोसळून पडतों. अशा वेळीं मी अनंत आहें ही भावना आपण आपल्या ठिकाणीं जागृत ठेविली पाहिजे. वस्तुस्थिति तशीच आहे. आपण अनंत आहोंच, आणि आपली ही सारी धडपड त्या मूल स्वरूपाला पोंहोंचण्याकरितांच आहे. आपणास समजत असलें अथवा नसलें तरी आपल्या प्रत्येक खटपटीचा आदि हेतु तोच आहे. आपण स्वतः बद्ध आहों; पण मुक्त वस्तु काय आहे, याचा शोध करण्यासाठींच आपली ही सारी खटपट आहे.

ज्याला कसल्याही प्रकारचा धर्म ठाऊक नाहीं असें एकही मानवकुल अस्तित्वांत नाहीं, आणि पूर्वीही कधीं अस्तित्वांत नव्हतें. एखादा मानववंश एकाच परमेश्वराचें पूजन करीत असेल, अथवा दुसरा एखादा वंश तेहतीस कोटी देव पूजीत असेल, पण देव-धर्म कांहींच ठाऊक नाहीं असें कुल मात्र एकही नव्हतें. आतां तेहतीस कोटी देवांचें अस्तित्व खरोखरच आहे कीं एकच देव खरा, हा प्रश्न वेगळा; पण पूजनाचा कोणता ना कोणता प्रकार मनुष्याच्या उत्पत्तीपासून चालू आहे हें मात्र खरें. मनुष्याच्या या मानसिक अवस्थेचें पृथक्करण केलें तर काय आढळून येतें ? एक अथवा अनेक देव शोधून काढण्यासाठीं एवढी धडपड कां ? या शोधांत सारें जग जें गुंतलें आहे तें कां ? याचें कारण हेंच कीं मनुष्य आपली मुक्तावस्था विसरला नाहीं. आपण स्वतंत्र आहों ही जाणीव अद्यापिही त्याच्या ठिकाणीं आहे; आणि ही जाणीव त्याला स्वस्थ बसूं देत नाहीं. त्याच्याभोंवतीं प्रकृतीचें जाळें पडलें आहे. त्या जाळ्याच्या धाग्यांनीं त्याचे हातपाय पक्के जखडले आहेत. आपला करडा अंमल सृष्टि त्याजवर गाजवीत आहे. प्रकृतीच्या कायद्यांचीं चक्रें त्याचीं हाडें भरडून काढीत आहेत. या चक्रांत मनुष्यप्राणी इतका पक्का अडकला आहे कीं एक गहूंभरसुद्धां इकडे तिकडे मान हालविण्याची सोय त्याला उरली नाहीं. तो कोठेंही जावो अथवा कांहींही करो; हा कायदा त्याच्या पाठीपोटीं दत्त म्हणून उभा आहेच. या कायद्याचें अस्तित्व नाहीं असें ठिकाण या विश्वांत एकही नाहीं. अशा रीतीनें चौफेर कोंडमारा झाला असतांही हा मनुष्यप्राणी मुक्तीसाठीं धडपडत आहे. स्वतःच्या मुक्तीचा

विसर त्याला केव्हांच पडला नाहीं आणि तीसाठीं चालणारी त्याची धडपडही केव्हांच थांबली नाहीं. मनुष्यमात्राला मुक्तीची स्थिति कशी प्राप्त होईल हें शोधून काढण्यासाठींच साऱ्या धर्मांचा अवतार आहे. कित्येक धर्मांना ही गोष्ट ठाऊक नसेल अथवा दुसऱ्या कित्येकांत ती स्पष्टपणें नमूद केली असेल; तें कसेंही असलें तरी साऱ्या धर्मांचा अवतार यासाठींच आहे एवढी गोष्ट मात्र खरी. प्रत्येक धर्माच्या पोटीं मूळ कल्पना हीच. अगदीं कनिष्ठ प्रतीचा मनुष्य घेतला तरी त्याची धडपड या विश्वशक्तीवर सत्ता चालविणारी वस्तु शोधून काढण्याकरितां सुरू आहे असें आपणास आढळून येईल. मनुष्य कितीही अज्ञ असो; प्रकृतीच्या कायद्यावर प्रभुत्व कोणाचें आहे हें शोधण्यासाठीं खटपट केल्यावांचून तो राहणार नाहीं. या विश्वाच्या कायद्यांना वांकवील असा कोणी तरी वेताळ, समंध, पिशाच्च अथवा देव त्याला हवा असतो. ज्याच्यावर या कायद्याचा अंमल चालत नाहीं आणि या कायद्यापुढें जो आपली मान वांकवीत नाहीं असा कोणी तरी सोम्यागोम्या त्याला हवा असतो. ‘ या भेसूर कायद्याचा चक्काचूर उडवील असा मायेचा पूत कोणीच नाहीं काय ? ’ अशी ओरड मनुष्यजातीनें जगाच्या आरंभापासून चालविली आहे. असा कायदे तुडविणारा प्राणी शोधून काढण्यासाठीं आपल्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणीं आपण धडपडत असतों. आगगाडीचें इंजन आपल्या लोखंडी रस्त्यावरून झपाट्यानें धांव घेत आहे. रुळावर एक लहानसा किडा बसला आहे. इतक्यांत इंजन जवळ येतांच तो किडा सरपटून बाजूला जातो. हा देखावा पाहिल्याबरोबर आपल्या मनांत पहिली गोष्ट ही येते कीं इंजन मोठें शक्तिवान् झालें तरी ती मृत वस्तु; आणि तो किडा क्षुद्र असला तरी तो सजीव प्राणी आहे. विश्वाचा कायदा मोडण्यासाठीं धडपड करावी ही जाणीव त्या इंजनाच्या ठिकाणीं नाहीं आणि ती त्या किड्याच्या ठिकाणीं आहे. हा फरक आपल्या मनांत आल्यावांचून राहत नाहीं. इंजन केवढेंही शक्तिशाली असलें तरी कायदा मोडण्याचें सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं नाहीं. मनुष्याच्या इच्छेस अनुसरून धांवावें इतकाच त्याच्या उत्पत्तीचा हेतु आहे आणि हा हेतु बाजूस ठेवून स्वतःच्या इच्छेप्रमाणें वागावें हें सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं नाहीं. उलट पक्षीं तो किडा कितीही बलहीन आणि क्षुद्र असला तरी सृष्टीच्या कायद्याचें उल्लंघन करून आपणावरील संकट निवार-

ण्याचा यत्न तो करतो. आपण कायद्याच्या बाहेरचे आहों–स्वतंत्र आहों–हें सिद्ध करण्याचा यत्न तो करतो, आणि त्याच्या याच भावनेंत त्याच्या ईश्वरत्वाचें बीज आहे. भविष्यत्कालीं केव्हांना केव्हां तो ईश्वरस्वरूप होणार आहे आणि या त्याच्या भावी दशेचें पूर्वचिन्ह त्याच्या सध्याच्या स्थितींतही अशा स्वरूपानें व्यक्त होतें.

अशा प्रकारचें स्वातंत्र्यनिदर्शन आपणांस सर्वत्र आढळून येतें. सर्व धर्मांतही याच स्वातंत्र्याचें दिग्दर्शन परमेश्वराच्या रूपानें केलेलें असतें. ईश्वर अथवा अनेक देव यांच्या स्वरूपाचें वर्णन प्रत्येक धर्मानें आपापल्यापरी केलेलें आढळतें. या वर्णनाचा निष्कर्ष पाहिला तर सृष्टीच्या कायद्याच्या बाहेरचा प्राणी तो परमेश्वर असें म्हणण्याचाच असतो असें आपणास आढळून येतें. तथापि हें सारें वर्णन विश्वबाह्य ईश्वराचें असतें हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. परमेश्वर हा या सृष्टीच्या बाहेरचा कोणी तरी प्राणी असावा असा ज्यांचा समज आहे त्यांजकरतां हें वर्णन आहे. आपण म्हणजे शुद्ध कःपदार्थ आहों आणि आपण मुक्तावस्थेला कधींही पोंहोंचणार नाहीं असा मानवी बुद्धीचा निश्चय होऊन अशा स्थितींतला प्राणी सृष्टीच्या बाहेर ती शोधूं लागली. अशा प्रकारचे मुक्त्यावस्थेंतले प्राणी अनेक असावे असा तिचा समज झाला. अशा रीतीनें अनेक धर्मांची उत्पत्ति झाली. अखेरीस अनेक देवांची कल्पना नाहींशी होऊन तिच्या जागीं सर्वांच्या देवाधिदेवाची कल्पना रूढ झाली; पण एवढ्या कल्पनेनेंही मानवी बुद्धीचें समाधान होईना. ती आणखी पुढें जाऊन शोध करूं लागली. सत्याच्या अधिक जवळ ती येत चालली; आणि अखेरीस या देवाधिदेवाशीं आपला कांहीं तरी प्रत्यक्ष संबंध असावा असें तिला वाटूं लागलें. आपण बद्ध आणि दुर्बल असलों तरी मुक्त आणि परमसामर्थ्यवान् परमेश्वराशीं कोणत्या ना कोणत्या प्रकारें आपण निगडित झालेले आहों असें मनुष्याला वाटूं लागलें. त्याची दृष्टि अधिकाधिक विस्तृत होत चालली. त्याच्या विचाराचें क्षेत्रही विस्तृत होत चाललें आणि त्याचें ज्ञान वाढूं लागलें, आणि अखेरीस या सर्व देवदेवतांच्या आणि देवाधिदेवाच्या कल्पना म्हणजे स्वतःच्या स्वरूपाच्या कल्पना आहेत असें त्याच्या निदर्शनास आलें. 'परमेश्वरानें स्वतःच्या स्वरूपाबरहुकूम मनुष्यप्राणी घडविला' हें वचन खरें आहे, इतकेंच नव्हे तर

' मनुष्यानें स्वतःच्या प्रतिमेबरहुकूम परमेश्वर घडविला ' हेंही तितकेंच खरें आहे अशी त्याची खात्री झाली, आणि अशा विचारमालिकेच्या अखेरीस जो सिद्धांत त्यानें ठरविला तो हा कीं परमेश्वर हा विश्वबाह्य नसून तो आपल्या हृदयांतच आहे. आपणास अत्यंत संनिध अशी जर कांहीं वस्तु असेल तर ती परमात्मा हीच होय. ज्या परमात्म्याचा शोध आपण बाह्य जगांत करीत होतों तोच परमात्मा आपल्याच हृदयाच्या अंतर्भागांत आपणास सांपडला. तो आपल्या हृदयाचें हृदय आहे. ज्या मुक्तावस्थेचा शोध आपण बाह्यजगांत चालविला आणि जी बाह्यप्रदेशीं आपणास सांपडेल अशी कल्पना आपण केली होती ती मुक्ति आपणापाशींच आपणास सांपडली. तिचा वास बाह्यजगांत व आपल्या अंतरांत आहे. तीच आपल्या आत्म्याचा आत्मा होय. तीच सत्य वस्तु; आणि ती सत्य वस्तु आपण स्वतःच आहों.

अशा रीतीनें आपल्या अस्तित्वाचें द्विधारूप आपणास पटतें. अनंत आणि सान्त अशा दोन भिन्न रूपाचा वास एकाच ठिकाणीं आहे असें आपणास आढळून येतें. अनंत परमात्मा तोच सान्त जीवात्मा. जणूं काय अनंत परमात्मा बुद्धीच्या जाळ्यांत सांपडला आणि त्यामुळें तो सान्त आहे असा भ्रम उत्पन्न झाला; पण यामुळें तो अनंत वस्तुतः सान्त झाला असें मात्र नाहीं. त्याचें सत्यरूप अनंत हेंच आहे.

खरें ज्ञान तें हें. सत्यरूप परमात्मा बाह्य विश्वांत अथवा विश्वबाह्य नसून आपल्या हृदयसंपुटांत तो आहे असा अनुभव येणें याचें नांव ज्ञान. तो परमात्मा अनंत, निरुपाधिक आणि सदामुक्त असा आहे. ज्या भूमिकेवर आपणास निर्धास्त उभें राहतां येतें ती भूमिका ही.

या ज्ञानांत बाकीच्या साऱ्या अवस्थांचा लय होतो. येथें जन्म नाहीं, मृत्यु नाहीं आणि दुःखही नाहीं. सर्व पापपुण्यात्मक कल्पनांचा शेवट येथें होतो; आणि या अनेकविध सृष्टींत हें एक जो पाहतो, क्षणोक्षणीं बदलणाऱ्या या विश्वांत हें चिरस्थायी रूप ज्याच्या प्रत्ययाला येतें आणि सर्व आत्म्यांचा परमात्मा तो आहे अशी अनुभवाची खूणगांठ ज्याला पटते, त्यालाच चिरंतन शांतीचा लाभ होतो. त्याखेरीज अन्य कोणाला हा लाभ होत नाहीं हें त्रिवार सत्य आहे.

आपल्याभोंवतीं अनंत दुःख पसरलें आहे. अवनतावस्थेच्या तळाशीं आपण गेलों आहों; पण अशा प्रसंगींही आपल्याला आशेचा एक किरण प्राप्त झाला आहे. तो किरण हाच कीं आपलें सत्यरूप कधींहि नष्ट होत नाहीं. जें खरोखर आपलें म्हणून कांहीं आहे तें आपणापासून कायमचें हिरावून घेण्याचें सामर्थ्य कोणासही नाहीं. तें आपणापासून कधींही नष्ट व्हावयाचें नाहीं. आपलें अस्तित्व हरवून टाकणें आपणास शक्यच नाहीं. मला अस्तित्व नाहीं असें कोणासही वाटणें शक्य आहे काय? मी बरावाईट कसाही असों, पण माझें अस्तित्व आहे म्हणूनच त्यावर बरा अथवा वाईट हे गुण आरूढ झाले आहेत. माझें अस्तित्व नसतें तर हे गुण कोठें राहिले असते? माझें अस्तित्व प्रथम असतें आणि नंतर त्यावर बरा अथवा वाईट या गुणांचीं पुटें बसून मी बरा अथवा वाईट दिसूं लागतों. अस्तित्वाचें स्वरूप चिरंतन आहे. आदिअंतीं तेंच अस्तित्व आहे! आणि मध्यंतरींही तेंच अस्तित्व आहे, तें कधींही नष्ट होत नाहीं. तें नाहीं असा एक क्षणही नाहीं.

आपणा सर्वांच्या आशेचा तंतु हाच आहे. कोणालाही मृत्यु नाहीं. त्याचप्रमाणें कायमची अवनतावस्थाही कोणाला नाहीं. आपलें चालू जीवित हें एखाद्या मोठ्या खेळखान्यासारखें. तेथें अनेक प्रकारचे खेळ आपण खेळत आहों. यांत चाललेले तमाशे कितीही ग्राम्य असले तरी त्यांचा संबंध आपल्या सत्यरूपाशीं कायमचा नाहीं. येथें कितीही धक्के आणि चपेटे आपणास खावे लागले आणि जीवितौघाच्या लाटांबरोबर वाहात जाण्याचे प्रसंग आपणावर कितीही आले तथापि त्यांचा संपर्क आपल्या आत्म्यास होत नाहीं आणि त्यांजमुळें त्याला कांहीं इजाही होऊं शकत नाहीं. आपण अनंतरूप आहों.

"न मृत्युर्न शंका न मे जातिभेदः। पिता नैव मे नैव माता च जन्म ॥
न बंधुर्न मित्रं गुरुर्नैव शिष्यः। चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥
न मे द्वेषरागौ न मे लोभमोहौ। मदो नैव मे नैव मात्सर्य भावः ॥
न धर्मो न अर्थो न कामो न मोक्षः। चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥"

साऱ्या रोगांवर हा मोठा रामबाण उपाय आहे. मृत्यूला जिंकणारी अमृत मात्रा हीच आहे. आपण या जगांत आलों आहों या गोष्टीचा मोठा विषाद वाटून तींतून सुटण्यासाठीं आपण धडपड करीत आहों. पण ही धडपड करीत असतां 'चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम्' हा मंत्र आपण जपूं या.

" न पुण्यं न पापं न सौख्यं न दुःखम् । न मंत्रो न तीर्थं न वेदा न यज्ञाः ॥
अहं भोजनं नैव भोज्यं न भोक्ता । चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥"

शरीर कोणत्याही अवस्थेंत असो; मन कसेंही शतधा विदीर्ण झालेलें असो; सभोंवतीं कितीही गडद अंधकार पडलेला असो; अथवा परिस्थिति कितीही निराशाजनक असो; हा मंत्र एकदां, दोनदां, तीनदां सहस्रवेळां म्हणत जा, म्हणजे प्रकाशाची प्राप्ति होईल. हे किरण फार हळू हळू प्रवास करीत असतात; पण केव्हां ना केव्हां तरी ते आपल्यापर्यंत येऊन पोंहोंचतील.

अगदीं मृत्युमुखांत जाण्याचे असे किती तरी प्रसंग मजवर आले. अन्न-पाण्यावांचून दीर्घकाल काढण्याचे प्रसंग मीं पाहिले. चालतां चालतां माझ्या पायाच्या चाळणी व्हाव्या, दिवसचे दिवस अन्नाची गांठ पडूं नये, आणि थकवा तर इतका यावा कीं पुढें पाऊलसुद्धां टाकण्याची शक्ति मला उरूं नये. असें झालें म्हणजे एखाद्या झाडाखालीं मी अंग टाकीं. आतां आपल्या आयुष्याची अखेर खास होते असें मला वाटे. बोलण्याची शक्ति माझ्या अंगीं अशा वेळीं कोठून राहणार? अखेरीस माझी विचारशक्तिही थांबे. इतकें झालें तरी शेवटीं मन पुन्हां उलट खाऊन ' न मे मृत्युशंका ' हा जप जपूं लागे. ही सारी सृष्टि माझ्याविरुद्ध एकवटली तरी काय होणार? ती मला चिरडूं शकत नाहीं; कारण ती माझ्या घरची दासी आहे. हे देवाधि-देवा, तूं आपलें सामर्थ्य प्रत्यक्ष प्रत्ययास आण. तुझें नष्ट झालेलें साम्राज्य तूं पुन्हां मिळव. उठ, उभा रहा आणि मुक्कामाला पोंहोंचेपर्यंत वाटेंत कोठेंही थांबूं नको. या विचारांनीं मी ताजातवाना होईं, माझ्या चित्ताला नवा दम येई. अनेक भयंकर प्रसंगांतून मी जगलों आणि आज तुमच्या सेवेस हजर आहें याचें श्रेय याच विचारश्रेणीला आहे. याकरितां ज्या ज्या वेळीं तुम्हांस संकटसमय प्राप्त होईल त्या त्या वेळीं हा मंत्र जपत जा, म्हणजे सारीं संकटें नाहींशीं होतील. असें होणें हें रीतसरच आहे; कारण वस्तुस्थिति अशी आहे कीं जीवित हें स्वप्न आहे. अडचणी पर्वतप्राय भासल्या आणि भोंवतालची परिस्थिति कितीही भयंकर आणि निराशेची दिसली तरी ती शुद्ध माया आहे. तिला तुम्ही भिऊं नका, म्हणजे ती ताबडतोब पळ काढील. तिच्या डोक्यावर पाय द्या म्हणजे तिचा चक्काचूर होईल. तुमच्या

एकाच लाथेबरोबर तिचा प्राण जाईल. तिला भिऊं नका. किती वेळां आपला पराजय झाला याची मोजदाद कशाला करतां ? आपला पराजय कधीं झालाच नाहीं असें म्हणा. या गोष्टी ध्यानांतच घेऊं नका. आज पराभव झाला असला तर उद्यां जय होईल. 'कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ।' तुम्ही एकसारखे पुढें चला. आपल्या गुप्त सामर्थ्याला तुम्ही एकसारखे चेतवीत राहिलां तर आज ना उद्यां तें जागें होईलच होईल. दुसऱ्या कोणाची तरी मदत मिळविण्याकरितां साऱ्या जगभर तुम्ही याचना करीत हिंडलां तरी तुम्हांस मदत कोण करूं शकणार ? मृत्यूचें भय कसें नष्ट करावें याची युक्ति कोणास सांपडली आहे ! आणि ज्या कोणास ती सांपडली असेल तो ती तुम्हांला कशी देणार ? हें काम तुमचें तुम्हींच केलें पाहिजे. हा रस्ता तुम्हींच शोधून काढला पाहिजे. मित्रांनो, या कामीं कोणाचीही मदत तुम्हांस मिळणार नाहीं. 'आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः' हें भगवंताचें वचन तुम्ही नित्य लक्ष्यांत बाळगा. आत्मदर्शन करून घ्या. उठा, उभे रहा; भीति टाकून द्या. कसलींही संकटें आलीं तरी डगमगूं नका; आत्मविश्वास धरा, आणि आत्मदर्शनाची खटपट करा. पहिल्या पहिल्यानें त्याचे मंदकिरण तुम्हांस प्राप्त होतील; तथापि निराश होऊं नका. तुम्ही त्याला तसेच चिकटून राहिलां म्हणजे हळु हळु तुमच्या ठिकाणीं धैर्याचा प्रवेश होईल, आणि अखेरीस 'शिवोऽहं शिवोऽहं' अशी सिंहगर्जना तुम्हीच करूं लागला.

"न मृत्युर्न शंका न मे जातिभेदः । पिता नैव मे नैव माता च जन्म ॥
न बंधुर्न मित्रं गुरुर्नैव शिष्यः । चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥
अहं निर्विकल्पी निराकाररूपी । विभुत्वाच्च सर्वत्र सर्वेंद्रियाणाम् ॥
न चासंगतं नैव मुक्तिर्न मे यः। चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥"

मी क्षुद्र आहें अशी भावना जो कोणी करतो तो मोठी चूक करीत असतो. कारण सर्वत्र एकरूप अस्तित्वच पसरलें आहे. सूर्य आहे असें म्हणणारा मी आहें म्हणूनच सूर्याला अस्तित्व आहे. जग आहे असें मी म्हणतों म्हणून जगाला अस्तित्व आहे. माझ्या अस्तित्वावेगळें त्यांना अस्तित्व असणें शक्यच नाहीं; कारण मी सच्चिदानंद आहें. मी सदा सुखी, सदा पवित्र आणि सदा शोभायमान असा आहें. सूर्य हा आपणा सर्वांच्या दृष्टीचें कारण आहे; तथापि कोणाच्याही डोळ्यांच्या दोषानें तो लिप्त होत

नाहीं. मीही असाच आहें. साऱ्या इंद्रियांच्या द्वारें मी कर्में करतों. जगांतील प्रत्येक वस्तूच्या द्वारें माझें कार्य चालू आहे; तथापि सत्कार्य अथवा अकार्य यांचीं कोणतींही पुण्यपापें मला लिप्त करूं शकत नाहींत. कोणताही कायदा मला बांधूं शकत नाहीं. मी कायद्याच्या पलीकडचा आहें. कर्मही मला बाधा करूं शकत नाहीं; कारण मी कर्माचा मालक असून तें माझें गुलाम आहे. मी पूर्वीं होतों, सध्या आहें आणि पुढेंही असणारच. मी सदा एकरूप आहें.

लौकिक वस्तूंत माझी सुखरूपता केव्हांच गुंतलेली नव्हती. दाराधन-सुतांच्या ठिकाणीं मी केव्हांच बद्ध झालेला नव्हतों. अनंत नीलाकाशा-सारखा मी आहें. नीलाकाशावरून अनेक रंगांचे ढग इतस्ततः परिभ्रमण करीत असतात. ते क्षणभर असतात आणि मग नाहींसे होतात. ते नाहींसे झाले म्हणजे आकाशाची नीलिमा पूर्वींप्रमाणेंच कायम असते. ढगांच्या रंगानें तिचा रंग पालटत नाहीं. सुख आणि दुःख, चांगलें आणि वाईट अशा प्रकारच्या द्वंद्वांचा गराडा क्षणभर मजभोंवतीं पडेल आणि माझ्या आत्म्याचें स्वरूप तीं द्वंद्वें क्षणभर झांकून टाकतील; पण त्यामुळें माझ्या आत्म्याच्या स्वरूपांत रतिभरही अंतर पडणार नाहीं. हीं द्वंद्वें क्षणा-भऱ्यानें नष्ट होतील; कारण तीं मुळांतच अनित्य रूपाचीं आहेत. मी सर्वदा प्रकाशमान आहें; कारण माझें रूप नित्य आहे. मला कांहीं संकट प्राप्त झालें तरी तें अनित्य असल्यामुळें नष्ट होईल हेंही मला माहीत आहे. केवळ मी एकच नित्य आहें आणि मला कशाचाही स्पर्श होऊं शकत नाहीं. मी नित्य आणि सदा मुक्त आहें, अशा प्रकारचें वर्णन एका प्राचीन आर्यकवीनें केलें आहे.

वेदान्तानें हा अमृताचा पेला आपणापुढें केला आहे. यांतील रसाचें प्राशन आपण करूं या, म्हणजे आपण अमर होऊं. भीति प्रथम सोडून द्या. आपण अनित्य आहों, क्षुद्र आहों, वाईट आहों असल्या भावनांना आपल्या चित्तांत थारा देऊं नका. आपणाला मरण केव्हांच नाहीं, मग मृत्यूची भीति कशाला ?

आपले हात कामांत गुंतले असतांही मनानें 'सोऽहं सोऽहम्' असें म्हणा. सदोदित हेंच चिंतन करा. ध्यानीं–मनीं–स्वप्नीं हाच जप चालू द्या. हें

चिंतन तुमच्या रक्तमांसांत खेळूं द्या. मी मर्त्य आहें, मी दुर्बल आहें मी दुःखी आहें, मी पापी आहें अशा प्रकारचा आभास उत्पन्न करणारीं सारीं स्वप्नें पूर्ण विलयास जाईपर्यंत हें चिंतन सोडूं नका. असें झालें म्हणजे सत्य-वस्तु तुम्हांपासून क्षणभरही लपवून ठेवण्याचें सामर्थ्य कोणासही उरणार नाहीं.

## कैवल्याचा मार्ग

श्रुतींतील एक कथा आज तुम्हांस सांगण्याचा माझा विचार आहे. वेद हे हिंदूंचे धर्मग्रंथ असून विस्तृत साहित्य त्यांत सांठविलें आहे. वेद ग्रंथांच्या अंतिम भागांना वेदान्त अशी संज्ञा आहे. वेदान्त म्हणजे वेदांची अखेर. ज्या तत्त्वज्ञानाचा विचार सध्या आपण करीत आहों त्याचीच चर्चा या भागांत विशेषेंकरून केलेली आहे. हा भाग जुन्या संस्कृत भाषेंत लिहिलेला आहे. तो लिहून गेल्याला आज हजारों वर्षांचा काळ लोटून गेलेला आहे हें तुम्ही लक्ष्यांत आणा. एक महायज्ञ करावा अशी इच्छा कोणा एकास झाली. हिंदु धर्मांत यज्ञ हें एक फार मोठ्या महत्वाचें प्रकरण आहे. हिंदु धर्मग्रंथांत अनेक प्रकारचे याग सांगितले आहेत. स्थंडिलावर अग्नि करून त्यांत आहुती देतात, व अनेक प्रकारचे मंत्र ऋत्विज तोंडानें म्हणत असतात. यज्ञसमाप्तीच्या वेळीं गोरगरिबांना व ब्राम्हणांना मोठा दानधर्म करतात. प्रत्येक यागाचें फळ वेगवेगळें असतें. त्याचप्रमाणें प्रत्येक यागाच्या क्रियाही वेगवेगळ्या प्रकारच्या असतात. एका प्रकारच्या यागांत आपल्या सर्वस्वाचें दान करावें लागतें. आतां ज्या यज्ञाची गोष्ट मी सांगणार आहें त्यांतील यजमान मोठा संपत्तिमान् पण अत्यंत कद्रु होता; तथापि अशा प्रकारचा महायज्ञ केल्याची कीर्ति मात्र त्याला हवी होती. यज्ञसमाप्तीच्या वेळीं सर्वस्व दान करण्याची पाळी आली तेव्हां आपणाजवळील वित्ताचें दान न करतां त्यानें आपली एक म्हातारी, आंधळी आणि लंगडी अशी एक गाय मात्र दिली. ही गाय अतिवृद्ध झालेली असल्यामुळें ती दूध देण्यासारखी नव्हती. या गृहस्थाला नाचिकेत या नांवाचा एक मुलगा होता. हा मुलगा वयानें लहान पण फार तरतरीत होता. आपल्या बापानें असलीं भिकार दानें दिल्यामुळें त्याची अपकीर्ति

मात्र खचित होईल असें वाटून नाचिकेतानें स्वतःचें दान करण्याचा निश्चय केला. आपल्या बापाकडे जाऊन तो म्हणाला "बाबा, माझें दान तुम्ही कोणाला करतां ?" मुलाच्या या प्रश्नाला बापानें कांहीं जबाब दिला नाहीं; तेव्हां नाचिकेतानें तोच प्रश्न पुनःपुन्हां आपल्या बापाला विचारला. मुलाच्या या कृतीची चीड येऊन तो गृहस्थ म्हणाला, "तुझें दान मी यमाला देतों. तुला मृत्यूच्या स्वाधीन करतों." बापाची आज्ञा ऐकून नाचिकेत एकदम यमलोकाला गेला. त्या वेळीं यमराजाची स्वारी घरीं नव्हती. तेव्हां त्याची वाट पाहात नाचिकेत तेथेंच बसला. तीन दिवसांनंतर यम परत आला आणि त्याला म्हणाला, "ब्राम्हणपुत्रा, तूं माझा अतिथि असून तीन दिवस येथें उपाशीं बसून राहिला आहेस, याचें मला फार वाईट वाटतें. तुला मी नमन करतों आणि तुला व्यर्थ श्रम दिले त्याचा मोबदला म्हणून तीन वर मी तुला देतों. नाचिकेत म्हणाला, "यमधर्मा, तुझ्या पहिल्या वरानें माझ्या पित्याचा मजवरील क्रोध शांत होवो." दुसरा वर म्हणून कांहीं विशिष्ट यज्ञाच्या क्रिया त्यानें यमाला विचारल्या. तिसरा वर मागतांना नाचिकेत म्हणाला, "मनुष्य मृत्यु पावला म्हणजे तो कोणत्या अवस्थेस जातो ? कोणी असें म्हणतात कीं तो सर्वथा नाश पावतो. दुसरे कित्येक म्हणतात कीं त्याला अस्तित्व असतें. यांत खरें काय आहे ? या प्रश्नाचें उत्तर मला आपण द्यावें अशी याचना तिसऱ्या वरानें मी करतों." नाचिकेताचें हें भाषण ऐकून यमधर्म म्हणाला "या कोड्याचें उत्तर मिळविण्याचा यत्न देवांनींही प्राचीनकाळीं एकदां केला होता, तथापि त्यांनाही त्याचें उत्तर मिळालें नाहीं. हा प्रश्न इतका बिकट आणि नाजुक आहे कीं त्याचें उत्तर मिळणें मोठें दुरापास्त आहे. याकरितां या गोष्टीच्या नादीं न पडतां दुसरा एखादा वर तूं माग. शतवर्षांचें आयुष्यही माग. हवें तेवढें गोधन अथवा राज्यही तूं मागितलेंस तरी तेंसुद्धां मी तुला देईन; पण तुझ्या या प्रश्नाचें उत्तर मात्र मजकडून तूं मागूं नको. मनुष्याला ज्या गोष्टी सुखाच्या म्हणून वाटतात, त्या साऱ्या तूं मागितल्यास तरी तितक्या सर्व मी तुला देईन; पण या प्रश्नाचें उत्तर देण्याचा आग्रह तूं मला करूं नको." यमराजाचें हें भाषण ऐकून नाचिकेत म्हणाला, "यमराज, संपत्ति कितीही मोठी झाली तरी तिनें मनुष्याची तृप्ति होणार नाहीं. आपली मर्जी आहे तर वाटेल तितकी संपत्ति अथवा दीर्घायुष्य हीं मला मिळणें कठीण

नाहीं हें मी जाणतों; पण जगांत राहून त्याची नश्वरता ज्यानें जाणिली आणि ज्याला सत्स्वरूपाची भेट झाली, असा कोणता मनुष्य दीर्घायुष्यांत आनंद मानील? नाचत आणि गात आयुष्य घालविणें यांत खरें रहस्य काय आहे हें ज्यानें जाणलें, त्याला पुष्कळ आयुष्याची मातब्बरी कशी वाटेल? याकरितां या मानवी आयुष्याच्या पलीकडे काय आहे हेंच आपण कृपा करून मला सांगावें. याखेरीज दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची इच्छा मी करीत नाहीं. एवढें रहस्य समजावें इतकीच माझी इच्छा आहे." नाचिकेताचें हें भाषण ऐकून यमराजालाही मोठा संतोष झाला. अशा प्रकारच्या ज्ञानप्राप्तीची इच्छा होणें हें मुमुक्षेचें लक्षण आहे. सत्यवस्तूवांचून दुसऱ्या कशाची अपेक्षा चित्तांत नसणें ही मुमुक्षुत्वाची पहिली पायरी आहे, ही गोष्ट आपण येथें ध्यानांत आणली पाहिजे. यमानें अनेक प्रकारच्या वस्तू देऊं केल्या असतांही या मुलानें त्यांचा त्याग कसा केला हें पहा. राज्यवैभव, मोठी संपत्ति, दीर्घ आयुष्य अशा अनेक गोष्टींवर त्यानें पाणी सोडलें. सत्य वस्तूचें ज्ञान आपणास व्हावें या इच्छेवांचून दुसऱ्या कोणत्याही इच्छेला त्यानें आपल्या मनांत अवसर दिला नाहीं. मनाची स्थिति अशा प्रकारची होईल तेव्हांच सत्य वस्तूचें दर्शन आपणास होईल. नाचिकेताचें भाषण ऐकून संतुष्ट झालेला यमराज म्हणाला "नाचिकेता, मनुष्यापुढें दोन मार्ग मोकळे असतात. एक प्रवृत्तिपर म्हणजे इंद्रियजन्य सुखें प्राप्त करून घेण्याचा आणि दुसरा निवृत्तिपर म्हणजे कैवल्याचा. मनुष्यजाति अनेक पंथांनीं जातांना दिसली तरी त्या साऱ्या पंथांचें पर्यवसान या दोहोंपैकीं कोणत्यातरी एका मार्गांत व्हावयाचें. या दोन मार्गांपैकीं कैवल्याचा मार्ग जो स्वीकारतो तोच खरा पंडित होय—तोच साधु. प्रवृत्तीच्या मार्गानें जो जाऊं लागेल तो अंतीं अधःपाताला पोंहोचल्याशिवाय राहणार नाहीं. नाचिकेता, तुझी धन्य असो. इंद्रियजन्य सुखें देणाऱ्या वस्तूची इच्छा तूं धरली नाहींस. प्रवृत्तिमार्गाला तूं जावेंस एवढ्याकरितां मीं पुष्कळ खटपट करून पाहिली, पण माझ्या खटपटीला तूं यश येऊं दिलें नाहींस. केवळ चैनीच्या वस्तूपेक्षां ज्ञानाची योग्यता किती तरी अधिक मोठी आहे हें तूं जाणलेंस.

"अज्ञानग्रस्त होत्साता जो मनुष्य आपलें सारें आयुष्य नुसत्या चैनींत घालवितो तो पशूहून निराळा नव्हे, ही गोष्ट तुझ्या लक्ष्यांत आली आहे.

पुष्कळ मनुष्यें अत्यंत अज्ञानांत अगदीं बुडून गेलीं असतांही केवळ घमेंडी-मुळें स्वतःस पंडित समजत असतात. अशीं मनुष्यें स्वतः अंध असतांही दुसऱ्यांचें पुढारीपण पत्करतात, आणि मग अशा रीतीनें एक आंधळ्यांची मालिका तयार होते. ही मालिका एखाद्या लहानशा जागेंत चक्राकार फिरत राहते, परंतु कोणालाच दृष्टि नसल्यामुळें आपण पुष्कळ लांब पल्ल्याचा प्रवास केला असा भ्रम मात्र सर्वांस उत्पन्न होतो. केवळ बालबुद्धीच्या मूर्ख लोकांच्या हृदयांत सत्य कधींही प्रकाशत नाहीं. नाचिकेता, केवळ लौकिक वस्तूंच्या मागें जो लागलेला असतो, त्याला मृत्पिंडांपेक्षां अधिक कशाची प्राप्ति होणार ? अशा मनुष्यांना ऐहिक अथवा पारलौकिक यांपैकीं कशाचेंच ज्ञान होत नाहीं. त्यांची ऐहिक यात्रा ज्याप्रमाणें निष्फल होते, त्याचप्रमाणें परलोकाचेंही कांहीं साधन त्यांनीं केलें नसल्यामुळें तिकडेही ते पारखे होतात आणि वारंवार माझ्या सपाट्यांत सांपडतात. सत्य वस्तु काय आहे याबद्दल एक शब्दसुद्धां पुष्कळांच्या कानीं पडत नाहीं. त्या बिचाऱ्यांना तशी संधि केव्हांच सांपडत नाहीं; आणि कांहींच्या कानीं तिची वार्ता गेली तरी तिजबद्दल त्यांना उमज पडत नाहीं. कारण हें ज्ञान सांगणारा गुरु आणि तें ऐकणारा शिष्य हे दोघेही अत्यंत कुशल आणि मर्मज्ञ असावे लागतात. वक्ता उच्च प्रतीचा नसेल तर शेंकडों वेळां केलेलें वक्तृत्वही कांहीं कामीं पडत नाहीं. अशा वक्त्याकडून श्रोत्यानें शेंकडों वेळां ही चर्चा ऐकली तरी त्याच्या हृदयांत ज्ञानाचा प्रकाश यत्किंचितही पडत नाहीं. नाचिकेता, वादविवादांत तूं आपलें आयुष्य फुकट घालवूं नको. वादविवाद कितीही केला तरी अंतःकरण शुद्ध झाल्यावांचून सत्य तेथें प्रकाशणार नाहीं. अत्यंत मोठ्या परिश्रमावांचून ज्याचें दर्शन होत नाहीं, जो अत्यंत गुप्त आहे आणि जो अंतःकरणाच्या अत्यंत खोल भागीं जाऊन बसला आहे, अशा त्या प्राचीन एकरूपाचें दर्शन बाह्य जड चक्षूंनीं होणार नाहीं. त्याचें दर्शन एकवार ज्याला झालें तो मनुष्य सुखदुःखातीत होतो. सुख आणि दुःख या दोहोंचीही किंमत त्याला वाटत नाहीं. ज्याला हें रहस्य कळलें तो आपल्या साऱ्या क्षणिक इच्छा सोडून देतो. त्याच्या अंतःकरणांतून साऱ्या दुराशा नष्ट झाल्या म्हणजे या शुभ दर्शनाला तो योग्य होतो, आणि अखेरीस कैवल्यरूप होतो. नाचिकेता, कैवल्यपदाला पोंहोंचण्याचा मार्ग हा आहे. सद्गुण आणि दुर्गुण

या दोहोंच्याही पलीकडे तो जातो. अवश्य कर्तव्य असें त्याला कांहींच उरत नाहीं, अथवा अमुक एक गोष्ट अकर्म असेंही त्याला वाटत नाहीं. तो दृश्य अस्तित्वाच्या पलीकडे गेलेला असतो. तो भविष्य कालाच्याही पलीकडे असतो. अशा प्रकारचें ज्ञान ज्याला झालें तो खरा ज्ञानी. त्यानेंच खरोखर सर्व कांहीं जाणलें. ज्याला जाणण्यासाठीं वेद धडपडत आहेत, आणि ज्याच्या भेटीसाठीं मनुष्यें सर्वसंगपरित्याग करून रानावनांत हिंडतात व दऱ्याखोऱ्यांचा आश्रय करतात त्याचें नांव मी तुला सांगतों. त्याचें नांव ॐ असें आहे. 'ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म।' ॐ हें ब्रह्मरूप आहे. ॐ हेंच चिरंतन आहे, तें अनंत आहे. हें रहस्य ज्याला कळलें त्याच्या सर्व इच्छा तृप्त होतात. नाचिकेता, ज्या मानवी आत्म्याचा शोध तूं करीत आहेस, तो आत्मा कधीं जन्मास येत नाहीं अथवा कधीं मृत्यूही पावत नाहीं. त्याला आरंभ अमुक कालीं झाला असें नाहीं. तो सदासर्वदा आहेच. देहाच्या मृत्यूबरोबर तो मरतही नाहीं. मी मारतों असें म्हणणारा आणि मी मारला जातों असें म्हणणारा हे दोघेही मूर्ख होत; कारण आत्मा मारीत नाहीं आणि स्वतः मरतही नाहीं. त्याचें रूप **'अणोरणीयान् महतोमहीयान्'** असें आहे. अशा स्वरूपाचा तो सर्वाधीश प्रत्येकाच्या हृदयाच्या गुहेंत वास करतो. जो कोणी पूर्ण निष्पाप झाला असेल त्या प्रत्येकाला त्याचें दर्शन होतें, आणि त्याचें सर्व वैभव तो पाहतो. अशा मनुष्यावर परमेश्वर कृपा करतो. परमेश्वराची कृपा झाल्याशिवाय त्याचें दर्शन होऊं शकत नाहीं. अशा प्रकारें आत्मानुभव ज्याला प्राप्त झाला आहे तो मनुष्य एके जागीं बसला असतांही दूरचा प्रवास करतो. तो एके जागीं दिसत असला तरी तो नाहीं असें ठिकाणच नाहीं. ज्या ठिकाणीं परस्परविरोधी अशा सर्व वस्तूंची एकवाक्यता होते त्या परमेश्वराचें दर्शन पवित्र अंतःकरणाच्या आणि सूक्ष्म बुद्धीच्या मनुष्यावांचून दुसऱ्या कोणास होणार? हें दर्शन होण्याची पात्रताच दुसऱ्या कोणाच्या अंगीं असत नाहीं. तो अशरीर असला तरी तो प्रत्येक देहांत आहे. सर्वांचा स्पर्श त्याला होतोसें दिसत असलें तरी त्याला कोणीही दूषित करूं शकत नाहीं. आत्मा सर्वव्यापि, सर्वभूतांतरात्मा आहे हें जाणून बुद्धिमंत सर्व शोक टाकून देतात. वेदाध्ययनानें हा आत्मा प्राप्त होत नाहीं, अथवा बुद्धीचा विस्तार केवढाही वाढला तरी त्याची प्राप्ति होत नाहीं. त्याच-

प्रमाणें शब्दपांडित्यानेंही तो मिळत नाहीं. जो नेहमीं अकर्म करण्यांत गढलेला असतो, ज्याचें मन स्थिर नाहीं, ज्याला एकांतिक ध्यान साध्य होत नाहीं आणि ज्याचें मन सदोदित व्यग्र व अनेक व्यवसायांत निमग्न त्याला आत्मानुभवाची प्राप्ति कधींही व्हावयाची नाहीं. आत्म्याची वस्ती अंतःकरणाच्या अत्यंत निगूढ भागांत आहे. ज्याला आपल्या मतानें तेथपर्यंत बुडी मारतां येत नाहीं त्याला त्याच्या दर्शनाचा लाभ कसा होईल ?

नाचिकेता, हें शरीर रथासारखें असून इंद्रियगोलक हे त्या रथाला जोडलेल्या घोड्यांप्रमाणें आहेत. बुद्धि हा रथकार होय; आणि आत्मा या रथांत बसला आहे. बुद्धीच्या द्वारें मनाशीं व मनाच्या द्वारें इंद्रियांशीं आत्मा संयुक्त होतो, तेव्हां तो भोक्ता असें म्हणवितो. त्या वेळीं तो पाहतो, ऐकतो आणि दुसऱ्याही साऱ्या क्रिया करतो. ज्याचा ताबा आपल्या मनावर नाहीं आणि ज्याला आत्मानात्मविवेक नाहीं, त्याचीं इंद्रियेंही भडकलेलीं असतात. बेफाम झालेले घोडे ज्याप्रमाणें रथकाराच्या ताब्यांत न राहतां वाटेल तिकडे उधळतात, त्याचप्रमाणें स्वैर सुटलेलीं इंद्रियेंही बुद्धीच्या ताब्यांत न राहतां वाटेल तिकडे भटकतात; पण ज्याला आत्मानात्मविवेक आहे आणि मनोनिग्रह ज्याला करतां येतो, त्याचीं इंद्रियें अनावर न होतां त्याच्या ताब्यांत राहतात. ज्याचें चित्त सदोदित पवित्र आणि आत्मानुसंधानांत निमग्न असतें त्यालाच सत्यवस्तूची प्राप्ति होते. सत्यवस्तूची प्राप्ति ज्याला झाली तो जन्ममरणाच्या फेऱ्यांत पुन्हां सांपडत नाहीं.

नाचिकेता, अशी जन्ममरणातीत स्थिति प्राप्त करून घेणें हें फार कठीण काम आहे. हा मार्ग फार दीर्घ आणि अत्यंत परिश्रमाचा आहे. ज्याची दृष्टि अत्यंत सूक्ष्म झाली असेल त्यालाच आत्मदर्शनाचा लाभ होणें शक्य आहे. हा मार्ग अत्यंत खडतर आहे हें खरें; तथापि असें असलें म्हणून भिण्याचें कारण नाहीं. '**उत्तिष्ठत जाग्रत प्राप्यवरान्निबोधत**' हा उपदेश पक्का ध्यानांत धरून चिकाटीनें मार्गाला लाग, आणि अखेर गांठीपर्यंत मध्यें कोठेंही थांबूं नको. '**क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया दुर्गं पथः तत्कवयो वदंति**' असें याचें वर्णन महात्म्यांनीं केलें आहे. जो इंद्रियातीत झाला असेल, जो स्पर्शातीत असेल, जो नामरूपातीत असेल तोच त्या सदा एकरूपाच्या दर्शनाला योग्य होतो. तें रूप अनंत आहे; तें नित्य

आहे. तें बुद्धीच्याही पलीकडचें आहे. तें अविनाशी आहे. त्याचें दर्शन आपणास झालें म्हणजे आपलें मरण मरून जातें. मृत्यूच्या टप्प्याबाहेर आपण जातों."

आपणा सर्वांचें अखेरचें साध्य काय आहे याचें वर्णन यमानें अशा प्रकारें केलें आहे. सत्यवस्तूचा लाभ आपण करून घेतला तर जन्म, मरण आणि जगांतील अनंत दुःखें या सर्वांच्या बाहेर आपण जातों. संसारप्रवाहाबरोबर वाहात असतां आपली आपटधोपट किती वेळां तरी होत असते. एकदां सुखाच्या उच्च शिखरावर आपण आरूढ होतों आणि दुसऱ्याच क्षणीं दुःखाच्या भोंवऱ्याच्या तळाशीं आपण जातों. या हालांपासून आपली सुटका आपणास करून घेणे असेल तर सत्यवस्तूचा लाभ करून घेण्यावांचून दुसरा मार्ग आपणास नाहीं. या सत्यवस्तूचें स्वरूप काय ? नित्यता हेंच तिचें स्वरूप. ती अशाश्वत नाहीं. मनुष्याचा जो अंतरात्मा तीच सत्यवस्तु. या दृश्य विश्वाच्या मागें असलेलें जें अदृश्य अधिष्ठान तीच सत्यवस्तु. या वस्तूला जाणणें अत्यंत कठीण आहे असें यमराज सांगतात. जाणणें याचा अर्थ बुद्धीनें अथवा तर्कानें समजणें असा नव्हे, हें अवश्य लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. जाणणें म्हणजे आत्मानुभव होणें. मुक्ति म्हणजे आत्म्याचा प्रत्यक्ष अनुभव होणें. या आपल्या चर्मचक्षूंनीं त्याला पाहणें आपणास शक्य नाहीं. तो दिसण्यास आपली अंतर्दृष्टि अत्यंत सूक्ष्म व्हावयास पाहिजे. ही समोरची भिंत आपण पाहतों अथवा हीं पुस्तकें आपणास दिसतात. या ठिकाणीं जड दृष्टीनें जड वस्तू आपण पाहत असतों; पण अत्यंत सूक्ष्म वस्तु पाहण्यास आपली दृष्टिही अत्यंत सूक्ष्म केली पाहिजे हें उघड आहे. या साऱ्या ज्ञानाचें रहस्य हेंच होय. त्याचप्रमाणें असें दर्शन करूं इच्छिणारानें अत्यंत पवित्र झालें पाहिजे असेंही यमराजांचें म्हणणें आहे. आपली दृष्टि अत्यंत सूक्ष्म करण्याचें साधन पावित्र्य हेंच होय. पावित्र्य प्रथम सांगून नंतर इतर मार्गांकडे यमराज वळले आहेत, हें अवश्य लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. तें स्वयमेव एक इंद्रियांपासून अत्यंत दूर अंतरावर आहे. इंद्रियें बाह्यदृष्टी आहेत. बाह्य जग पाहणें इतकेंच काम तीं करूं शकतात. आत्मा हा बाहेर कोठें सांपडणारा पदार्थ नसल्यामुळें इंद्रियांस तो कसा सांपडेल ? त्याचें दर्शन होण्यास आपली दृष्टि आंत वळविली पाहिजे. आत्मलाभाची इच्छा प्रथम

झाली पाहिजे आणि नंतर दृष्टि अंतर्मुख करण्याची खटपट केली पाहिजे. या दोन परीक्षांतून उत्तीर्ण झाल्यावांचून आपणास आत्मदर्शन होणें शक्य नाहीं. बाह्य विश्व सुंदर आहे ही गोष्ट कोण नाकबूल करील ? पण त्याच्या सौंदर्याकडे पाहून त्यांतच भटकत राहणें हा ईश्वरदर्शनाचा मार्ग मात्र नव्हे. या बाह्यविश्वाकडे आपल्या दृष्टीची पाठ कशी वळवावी आणि तिला अंतर्वर्ती कसें करावें याचें ज्ञान आपण करून घेतलें पाहिजे. बाह्यसौंदर्यावर लुब्ध होऊन तेंच पाहत बसणें ही गोष्ट आपल्या डोळ्यांस फार प्रिय आहे; पण त्यांची ही संवय आपण मोडून टाकली पाहिजे. या संवयीला आपण आळा घातला पाहिजे. एखाद्या मोठ्या रहदारीच्या रस्त्यानें आपण चालत असलों म्हणजे गाड्याघोड्यांच्या गोंगाटामुळें आपल्याबरोबर चालणाऱ्या आपल्या एखाद्या मित्राचें बोलणेंही आपणास ऐकूं येत नाहीं. आजूबाजूचा गोंगाट इतका मोठा असतो कीं त्याचें बोलणें त्यांत बुडून जातें. बाहेरचा गोंगाट मोठा असल्यामुळें तुमचें मनही त्या गोंगाटाकडेच अगोदर वळतें, आणि यामुळें मित्राच्या भाषणाकडे तें असत नाहीं, आणि त्याचें भाषणही तुम्हांस ऐकूं येत नाहीं. त्याचप्रमाणें आपल्या भोंवतालचें हें बाह्यजग इतका मोठा गोंगाट करीत असतें कीं आपलें चित्त त्याकडे अवश्य ओढलें जातें. अशा स्थितींत अत्यंत निगूढ भागांत वास करणारा आत्मा आपणास कसा दिसेल ? याकरितां मनाचें हें बहिर्वर्तित्व प्रथम बंद करणें अवश्य आहे. दृष्टि अंतर्मुख करणें याचा अर्थ हाच. दृष्टि अंतर्मुख झाली म्हणजेच आंतील परमात्मरूपाचें सारें वैभव आपल्या नजरेसमोर उभें राहील.

या आत्म्याचें स्वरूप तरी काय आहे ? हा आहे तरी कसा ? तो बुद्धीच्याही पलीकडचा आहे हें आपण पाहिलेंच. त्याचप्रमाणें तो अनंत आणि सर्वव्यापी आहे हेंही या श्रुतीवरून आपणास कळून आलेंच आहे. तुम्ही, मी आणि बाकीचे सर्व प्राणी सर्वव्यापी आहों. त्याचप्रमाणें आत्मा नित्य, एकरूप आहे हेंही आपणास समजलें. तो जर सर्वव्यापी आहे तर तो एकच असला पाहिजे हें उघड आहे. दोन पदार्थ सर्वव्यापी असूं शकणारच नाहींत, हें उघड आहे. ही गोष्ट सर्वथा अशक्य आहे. त्याचप्रमाणें दोन पदार्थ अनंतही असूं शकणार नाहीं. याकरितां अनंत आणि सर्वव्यापी परमात्मा एकच असला पाहिजे, आणि तुम्ही, मी व हें सारें विश्व एकरूपच

असलें पाहिजे. तो एकच परमात्मा या अनेक रूपांनीं व्यक्त झाला आहे. ज्याप्रमाणें एकाच अग्नीच्या अनेक ज्वाळा असतात, अथवा एकच तेज अनेक प्रकारच्या रूपांनीं प्रकट होतें, त्याचप्रमाणें आत्मा अनेक आकारांनीं प्रकट होतो.

आतां येथें एक प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे. तो प्रश्न असा:— जर आत्मा हा स्वयमेव परिपूर्ण आणि अत्यंत पवित्र असा आहे, तर अशुद्ध शरिरांत प्रवेश केल्यावर त्याचें काय होतें? एकाच वेळीं एका चांगल्या, एका मध्यम आणि एका पापी देहांत तो प्रवेश करतो काय? आणि अशा रीतीनें दुष्ट देहांत तो गेल्यावर त्याचें पूर्णत्व कसें राहिलें? या प्रश्नाचें उत्तर श्रुतींनीं असें दिलें आहे:–' सूर्य हा प्रत्येक नेत्रांतील दृष्टीचें कारण असतांही डोळ्याच्या दोषानें तो लिप्त होत नाहीं.' एखाद्या मनुष्याला कावीळ झाली असली म्हणजे सर्व पदार्थ त्याला पिंवळे दिसतात. त्याच्या दृष्टीचें कारणही सूर्यच आहे. म्हणून त्याच्या दृष्टीच्या या दोषानें सूर्य लिप्त होतो काय? त्याच प्रमाणें हें एकरूप सर्वव्यापी म्हणजे सर्व वस्तूच्या ठिकाणीं असतांही त्या वस्तूच्या दोषानें लिप्त होत नाहीं. त्या वस्तूंतील चांगले गुण आणि वाईट गुण या दोहोंतूनही तें मुक्त असतें. यांपैकीं कशाचाही संपर्क त्याला होऊं शकत नाहीं. या साऱ्या क्षणभंगुर विश्वांत असलेलें चिरंतन-नित्यरूप जो पाहतो, या जड विश्वांतील चैतन्यरूपाची भेट जो घेतो, या अनेकविध रूपाच्या विश्वांतील एकरूपता ज्याच्या प्रत्ययाला येते आणि स्वतःचा जीवात्माही तोच आहे असा अनुभव ज्याला घडतो, त्यालाच परमानंदाची प्राप्ति होते—दुसऱ्या कोणालाही ती होत नाहीं. त्या ठिकाणीं सूर्याचा प्रकाशही नाहींसा होतो, ताऱ्यांचें तेज लोपतें आणि विद्युत् चमकत नाहीं; मग अग्नीची गोष्टच कशास बोलावी? त्याचा प्रकाश आहे म्हणूनच या सर्वांस प्रकाश आहे. त्याजपासून उसन्या घेतलेल्या प्रकाशाच्या बळावर ही सारीं स्वतःस प्रकाशमान म्हणवितात. त्याच्या प्रकाशामुळेंच सारें विश्व प्रकाशरूप होऊन दृश्यत्वास आलें आहे. अंतःकरणांत खळबळ उडविणाऱ्या साऱ्या इच्छा नाहींशा झाल्या म्हणजे मर्त्य असतो तोच अमर होऊन ब्रह्मरूप होतो. अंतः-करणांतील साऱ्या गांठी आणि खांचीखोंची नाहींशा झाल्या म्हणजेच मर्त्य अमरपद पावतो. अमृतत्वाचा मार्ग अशा प्रकारें सांगितला आहे. हें कथा-

श्रवण आपणा सर्वांस कल्याणप्रद होवो. हें आपणास पुष्टिप्रद होवो. या कथेच्या श्रवणानें आपणास मनोबल प्राप्त व्हावें अशी आपण प्रार्थना करूं या. इष्टमार्गावर आरूढ होण्यास ही कथा आपणास प्रवृत्त करो. असूयादि सारे विकार नष्ट करून सर्वांस ही कथा शांतिप्रद होवो.

वेदान्त तत्त्वज्ञानांतील विचारांची ही सामान्य दिशा आहे. याच धर्तीची विचारपरंपरा तुम्हांस साऱ्या वेदान्त ग्रंथांत आढळून येईल. आतां सांगितलेल्या कथेंत एक अगदीं नवी अशी विचारसरणी आपणास प्रथम आढळून येते. जगांतील कोणत्याही धर्मग्रंथांत या पद्धतीचे विचार तुम्हांस आढळावयाचे नाहींत. परमेश्वराचा वास कोठें तरी बाह्यविश्वांत असावा या समजुतीनें जगांतील धर्मग्रंथ त्याचा शोध बाह्यजगांत करण्यास प्रवृत्त झाले आहेत. हाच प्रकार प्राचीन श्रुतिग्रंथांतही आढळतो. येथेंही परमेश्वराचा शोध बाह्य विश्वांत सुरू असल्याचे दाखले आहेत. 'आरंभीं काय होतें ?' हा प्रश्न अत्यंत प्राचीन ग्रंथांत आढळतो. 'ज्या वेळीं अमुक होतें असेंही नाहीं आणि नव्हतें असेंही नाहीं आणि ज्या वेळीं अंधार अंधारांत गुरफटलेला होता तेव्हां काय होतें ?' या प्रश्नाची चर्चा प्राचीन ग्रंथांत केली आहे. येथपासून तत्त्वज्ञानाच्या विचाराची प्रवृत्ति झाली. यानंतर देवादि प्राणी जन्मास आले; तथापि या प्रश्नाचा निकाल समाधानकारक रीतीनें लागला नाहीं. त्या काळीं ईश्वराचा शोध बाह्य विश्वांत चालला होता, यामुळें त्यांच्या शोधाला तेव्हां यश आलें नाहीं. पुढें लवकरच हा काळ बदलला, आणि परमात्म्याचा शोध अंतःसृष्टींत सुरू झाला. परमेश्वराचा शोध तारकामय आकाशांत केला अथवा बाह्य विश्वांत आणखीही कोठें केला तरी आपल्या शोधाचा शेवट कधींच यावयाचा नाहीं आणि परमेश्वराचा थांग तेथें लागावयाचा नाहीं; हा श्रुतींचा मूळ सिद्धांत या बाह्य शोधाच्या काळानंतर जन्मास आला. जन्ममृत्यूचें रहस्य या बाह्य शोधानें कधींही समजावयाचें नाहीं असा श्रुतींचा निश्चय आहे. याकरितां अंतःसृष्टीचें पृथक्करण करणें त्यांना अगत्याचें वाटलें. हें पृथक्करण झाल्यानंतर विश्वाच्या साऱ्या रहस्याचा उलगडा झाला. हें रहस्य सांगण्याचें कार्य कोणत्याही ताऱ्यानें अथवा सूर्यानें केलें नाहीं. बाह्य सृष्टींत भटकण्याचें सोडून मनुष्यानें स्वतःच्या अंतःसृष्टींत बुडी मारली पाहिजे. या सृष्टींतील साऱ्या घटकांचा अभ्यास

त्यानें केला पाहिजे. जडशरीराचा नव्हे, तर जीवात्म्याचा अभ्यास त्यानें केला पाहिजे. श्रुतींनीं असा अभ्यास केला तेव्हां या मोठ्या प्रश्नाचें उत्तर त्यांस सांपडलें. या जडदेहाच्या आणि मनाच्याही मागें स्वयमेव आत्म्याचा वांस आहे हेंच तें उत्तर. हा आत्मा स्वयंभू आहे. तो कधीं जन्मास येत नाहीं आणि मरतही नाहीं. तो स्वयमेव आत्मा सर्वव्यापी आहे. त्याला कोणताही विशिष्ट आकार नाहीं यामुळें हें सारें दृश्य त्यानें व्यापलें आहे. ज्याला कोणताही विशिष्ट आकार नाहीं आणि दिक्कालादिकांनीं जें बद्ध नाहीं तें अमुक एका विशिष्ट स्थळीं असेल असें म्हणतां येणें शक्यच नाहीं. तें सर्वत्र आहे. तुम्हां आम्हांमध्येंच नव्हे तर यच्चयावत् सृष्टींत तें अंतर्बाह्य व्यापून राहिलें आहे.

जीवात्म्याचें स्वरूप काय आहे ? ईश्वर या नांवाचा एक निराळा प्राणी असून असंख्य जीवात्मे त्यापासून भिन्न आहेत व ते अखेरपर्यंत भिन्नच राहावयाचे असें म्हणणारा पक्ष प्राचीनकाळापासून आपणास आढळतो. या पक्षाच्या मतें परमेश्वर स्वभावतःच जीवात्म्यापासून भिन्न आहे. या दोहोंचे घटकच मुळांत भिन्न असून त्यांचे आकारही भिन्न आहेत असें या पक्षाचें मत आहे. या पक्षाला द्वैतमत असें नांव आहे. द्वैतमत हें फार प्राचीन मत आहे. यानंतर आणखी एक पक्ष जन्मास आला. या पक्षाच्या मतें जीवात्मा हा अनंत अस्तित्वाचाच एक भाग आहे. ज्याप्रमाणें देह हा लहानसें जग असून त्यामागें मन अथवा विचारशक्ति आणि या दोहोंच्यामागें जीवात्म्याचा वास आहे, त्याचप्रमाणें हें सारें विश्व देहासारखें असून त्यामागें विश्वव्यापी मन आणि त्याच्याही मागें विश्वव्यापी आत्मा आहे. या विश्वव्यापी देहाचा अंश हा लहान देह, मनाचा अंश हें लहानसें मन आणि विश्वव्यापी आत्म्याचा अंश हा लहानसा जीवात्मा आहे असें या दुसऱ्या पक्षाचें मत आहे. ज्याप्रमाणें हा देह विश्वदेहाचा अंश आहे, त्याचप्रमाणें मानवी मन विश्वव्यापी मनाचा अंश आहे आणि जीवात्मा हा विश्वव्यापी परमात्म्याचा अंश आहे. या मताला विशिष्टाद्वैत असें नांव आहे. विश्वव्यापी परमात्मा अनंत आणि सर्वव्यापी आहे हें आपणास ठाऊक आहेच. मग जें अनंत आहे त्याचे वेगवेगळे भाग पाडणें शक्य आहे काय ? त्याला कोणीं आणि कसें तोडावें आणि त्याचे भाग तरी कशानें पाडावे ? 'मी परमात्म्याचा अंश

आहें, मी अनंत तेजांतील एक स्फुल्लिंग आहें ' असें म्हणणें मोठें काव्यमय असेल आणि त्यायोगें तुमच्या चित्ताला संतोषही होत असेल; पण विवेचक बुद्धीला हें म्हणणें पटावयाचें नाहीं. अनंतत्वाचे भाग पाडणें या म्हणण्याला कांहीं अर्थच नाहीं. जडवस्तूचेच भाग पाडतां येतील. अनंतत्व हें जड आहे काय ? याकरितां अनंताचे भाग पाडणें शक्य नाहीं; आणि अनंताचे जर भाग पाडतां आले तर मग त्याचें अनंतत्व कोठें राहिलें ?

या एकंदर विवेचनावरून निष्कर्ष काय निघतो याचा विचार आतां केला पाहिजे. निष्कर्ष हाच कीं तुम्ही विश्वव्यापी परामात्म्याचे अंश नसून परमात्मरूपच आहां; तुम्ही लहानसे भाग नसून पूर्ण विश्वात्माच आहां; परमेश्वराचे अंश तुम्ही नसून सर्व परमेश्वर तुम्ही आहां.

आतां यावर कोणी असा प्रश्न करील कीं आम्ही जर सर्व एकरूप आहों, तर सृष्टींत इतकी विविधता आली कोठून ? कोट्यानकोटी जीवात्मे आज अस्तित्वांत आहेत हें तर आम्ही आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहत आहों. मग हे इतके वेगवेगळे जीवात्मे कोठून आले ? यांचें स्वरूप काय ? पाण्याच्या एक कोटी बिंदूंवर जर सूर्याचें प्रतिबिंब पडलें तर त्यांपकीं प्रत्येक बिंदूंत एक एक संपूर्ण सूर्य दिसतो. सूर्याचें संपूर्ण प्रतिबिंब त्यांपैकीं प्रत्येकांत असतें; पण ते सारे खरे सूर्य आहेत असें कोणी म्हणेल काय ? तीं नुसतीं प्रतिबिंबेंच होत आणि खरा सूर्य एकच असतो. त्याचप्रमाणें हा दृश्य जीवात्मा परमात्म्याचें प्रतिबिंब मात्र आहे. यापलीकडे त्याला दुसरें अधिक रूप नाहीं. आपणांमध्यें असलेल्या या दृश्य जीवात्म्यामागें जो खरा परमात्मा आहे तो एकच आहे. या दृष्टीनें विचार करतां आपण सारे एकरूपच आहों असें म्हणावयास नको काय ? साऱ्या विश्वाच्या मागें परमात्मा एक असून त्याचीं प्रतिबिंबें मात्र अनेक आहेत. तो ज्याप्रमाणें तुमच्यामध्यें आहे त्याचप्रमाणें माझ्यामध्येंही आहे आणि असें असतांही तो एकच आहे, व अनेक शरिरांत प्रतिबिंबरूपानें अनेक जीवात्म्यांचीं रूपें तो धारण करतांना दिसतो. आपल्या अज्ञानामुळें या गोष्टीचा उमज आपणास पडत नाहीं; आपण परस्परांपासून भिन्न आहों असें आपणांस वाटतें, आणि यामुळेंच तो परमात्माही आपणांपासून वेगळा आहे असा भ्रम आपणांस पडतो. हा भ्रम आपणापाशीं शिल्लक आहे तोंपर्यंत जगांत हीं सारीं दुःखें शिल्लक राहा-

वयाचीं. आपण परस्परांपासून भिन्न आहों असें वाटणें हा भ्रम आहे. यालाच माया म्हणतात. यापासूनच पुढें भीतीची उत्पत्ति होते, आणि ती भीतीही अनेक दुःखांस कारण होत असते. एक मनुष्य दुसऱ्यावर उपकार करतो तो कां ? आपल्या सुखाच्या आड तो दुसरा येतो असें त्याला वाटतें म्हणून. त्यानें जेवढें सुख भोगलें तेवढें आपलें कमी झालें असें त्याला वाटत असतें. एखाद्या श्रीमंताकडे पाहून दुसऱ्या एखाद्याच्या मनांत अशी कल्पना उभी राहते कीं यानें सारा पैसा अशा रीतीनें एकत्र कोंडून ठेवला नसता तर त्यांतला अंश आपणाकडे आला असता. हा श्रीमंत झाला हेंच आपल्या दारिद्र्याचें कारण आहे, असें त्याला वाटूं लागतें. या कल्पनेनें त्याच्या चित्तांत बिऱ्हाड केलें कीं भीति आणि द्वेष असले विकार तेथें आपोआप उद्भवतात व त्याजकडून भयंकर कृत्यें करवितात. श्रीमंतांना लुटणें न्याय्य आहे असें त्याला वाटूं लागतें. तो चोऱ्यामाऱ्या बिनदिक्कत करूं लागतो. आपण सारे एकरूप आहों ही खूणगांठ ज्याला पटली, त्याच्या ठिकाणीं भीति तरी कोठून राहील ? हें सारें विश्व मीच आहें असा अनुभव मला आला म्हणजे यांतील प्रत्येक वस्तु मीच होणार. माझ्या मस्तकावर वज्रप्रहार झाला तरी वज्र मीच, कारण सारें अस्तित्वच जर मी, तर वज्र तरी माझ्याबाहेर कोठें राहील ? मला भयंकर तापानें पछाडलें तरी तो ताप मीच. माझ्यासमोर एखादा वाघ उभा राहिला तरी मला भीति कशाची ? कारण तो वाघही मीच. प्रत्यक्ष मृत्यूचीही भीति मला शिवावयाची नाहीं; कारण मृत्यूही मीच. मीच जीवित आणि मीच मृत्यु. विश्वांत एक नसून दोन आहेत या कल्पनेच्या जन्माबरोबरच भीतीचाही जन्म होतो हें आपण ध्यानांत आणा. 'सर्वांनीं परस्परांवर प्रीति करावी' हा उपदेश आपल्या कानावर नेहमीं आदळतो; पण अशी प्रीति आपण कां करावी, या प्रश्नाचें जें उत्तर आम्ही देतों तें हेंच कीं तूं आणि तो एकच आहांत. म्हणून सर्व विश्व अशा रीतीनें एकरूप आहे. या दृश्य विविधतेच्या पोटीं ऐक्य आहे. माझ्या भावावर मीं प्रेम कां करावें ? मी आणि माझा भाऊ एकच आहों म्हणून. सर्व विश्व एकरूप आहे. आपल्या पायांखालून सरपटत असणाऱ्या अत्यंत क्षुद्र अशा कीटकापासून तों थेट देवापर्यंत सर्वांचीं शरीरें वेगवेगळया स्वरूपाचीं दिसत असलीं तरी वस्तुतः त्यांच्यांत परम ऐक्य आहे. परमात्मरूपानें हे सारे प्राणी एकच आहेत.

सर्व तोंडांच्या द्वारें भक्षणाची क्रिया तुम्हीच करतां. सर्व हातांच्या द्वारें अनेक क्रिया तुम्ही संपादन करतां, आणि सर्व नेत्रांच्या द्वारें पाहणारेही तुम्हीच. कोट्यवधी शरिरांच्या द्वारें चैन भोगणारे तुम्हीच आणि कोट्यवधी दुसऱ्या शरिरांच्या द्वारें अनेक भयंकर रोगांचीं दुःखें भोगणारेहि तुम्हीच. या सिद्धांताचा उदय आपल्या अंतःकरणांत होऊन त्याचा अनुभव आपणास आला व आपल्या सर्व जीवनांत तो खेळूं लागला म्हणजे आपलीं सारीं दुःखें लयास जातील, आणि त्या दुःखांबरोबर आपली भीतीही नष्ट होईल. मला मरण कोठचें ? कारण माझ्यापलीकडचें असें अस्तित्वच नाहीं; मग मरून मी जाणार तरी कोठें ? सर्व प्रकारच्या भयाचा लय झाला म्हणजेच पूर्णानंदाची प्राप्ति होते. त्याचप्रमाणें पूर्ण प्रेमाची प्रवृत्ति भयाच्या निवृत्ती-नंतर उत्पन्न होते. विश्वव्यापी सहानुकंपा, विश्वव्यापी प्रेम आणि विश्वव्यापी आनंद यांच्यायोगानें मनुष्य सर्व अवस्थांतराच्या पलीकडे जातो. कोण-तीही परिस्थिति त्याला बाधा करूं शकत नाहीं. '**यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम**'। असें धाम तें हेंच. अशा स्थितींत क्रिया प्रतिक्रिया नाहींत, आणि तद्द्वारा प्राप्त होणारें दुःखही तेथें नाहीं. लौकिक स्थितींतील सर्व क्रियांस प्रतिक्रिया अवश्यपणें घडतात. कसलीही क्रिया म्हटली कीं तेथें प्रतिक्रिया आलीच. किंबहुना, क्रिया आणि प्रतिक्रिया म्हणजेच जीवित; आणि या क्रियाप्रतिक्रियांचें आदिकारण द्वैतबुद्धि हेंच आहे. या विश्वापासून मी भिन्न आहें आणि परमात्म्यापासूनही मी भिन्न आहें असें वाटणें याचें नांव द्वैत. पण ' सोऽहं । विश्वात्मा मीच आहें ' या निश्चयापर्यंत मी पोहों-चलों म्हणजे सच्चिदानंदपदीं मी आरूढ होतों; मी कैवल्यधामाला पोहों-चतों आणि मी कायमचा मुक्त होतों. असें झालें म्हणजे पूर्ण प्रेमाची प्राप्ति मला होते आणि सर्व भीति आणि दुःखें हीं बरोबरच विलयास जातात.

## ३

# याज्ञवल्क्य आणि मैत्रेयी.

आकाशांत ढग पुष्कळ येऊन सूर्यप्रकाश अंधुक झाला म्हणजे त्या दिव-साला दुर्दिन असें म्हणण्याची चाल आहे; पण ज्या दिवशीं हरिनाम कानीं पडणार नाहीं तोच दिवस खरोखर दुर्दिन होय. अभ्रमय दिवस हा कांहीं

खरा दुर्दिन नव्हे. याज्ञवल्क्य या नांवाचे एक महर्षि होते. वृद्धापकाळ प्राप्त झाला म्हणजे संसाराचा त्याग करावा अशी हिंदुशास्त्रांची आज्ञा आहे हें तुम्हांस ठाऊक असेलच. शास्त्रकारांच्या या आज्ञेस अनुसरून महर्षि याज्ञवल्क्य आपल्या पत्नीला म्हणाले, "हें सर्व धन आणि बाकीची सारी मालमत्ता यांचा त्याग करून अरण्यवास करावयास मी जातों." यावर त्यांची पत्नी मैत्रेयी म्हणाली, "महाराज, हें सारें वित्त आपण मला दिलें हें खरें; पण या जगांतली सारी संपत्ति एकत्र केली तरी ती मला अमृतत्व देऊं शकेल काय ?" याज्ञवल्क्यांनीं उत्तर दिलें, "छे! छे! अशी गोष्ट कालत्रयींही घडावयाची नाहीं. तूं संपत्तिमान होशील आणि धनधान्यांची समृद्धि तुझ्या घरीं होईल. हें सारें कांहीं होईल; पण संपत्ति तुला अमृतत्व देऊं शकेल ही गोष्ट कधींच घडावयाची नाहीं." पतीचें हें भाषण ऐकून मैत्रेयी म्हणाली, "तर मग ज्याच्यायोगानें अमृतत्वाची प्राप्ति मला होईल अशी वस्तु प्राप्त करून घेण्यास मीं काय करावें ? महाराज, असा कांहीं मार्ग आपणास अवगत असेल तर कृपा करून तो मला सांगावा." याज्ञवल्क्य म्हणाले, "मैत्रेयी, तूं मला नेहमींच प्रिय होतीस; पण आतां तर तूं मला अधिकच आवडूं लागली आहेस. तुझ्या या प्रश्नामुळें तुजवर माझें प्रेम अधिकच जडलें आहे. इकडे येऊन बैस, म्हणजे सर्व कांहीं मी तुला सांगतों. तें सारें तूं प्रथम लक्ष्यपूर्वक ऐकून घे, नंतर त्यावर पूर्ण विचार कर, आणि त्याचाच ध्यास चित्तांत धर."

"मैत्रेयी, पतीवर पत्नी प्रेम करते, तें त्याच्या देहासाठीं नव्हे, तर ती आत्म्यावर प्रीति करिते. म्हणजे ती स्वतःवरच प्रीति करीत असते. त्याचप्रमाणें कोणीही पुरुष आपल्या पत्नीवर प्रेम करतो तें त्या पत्नीसाठीं नसून त्याचें प्रेम स्वतःवरच असतें. कोणी आपल्या मुलांवर प्रेम करतात तें त्या मुलांसाठीं नसून ते स्वतःवरच प्रेम करीत असतात. केवळ संपत्तीसाठीं संपत्तीवर प्रेम कोणीही करीत नाहीं; पण प्रत्येकाचें प्रेम स्वतःवर असतें म्हणून तो संपत्तीवर प्रेम करतो. कोणाची भक्ति ब्राह्मणांच्या ठिकाणीं असते. ती भक्तिही वस्तुतः त्या ब्राह्मणांकरितां नसून स्वतःवर त्यांची भक्ति असते आणि त्या ब्राह्मणांच्या रूपानें स्वतःचीच भक्ति ते करीत असतात. या जगावर कोणी प्रेम करतात, पण तें प्रेम जगासाठीं नसून स्वतःसाठींच

असतें. त्याप्रमाणें देवदेवतांतरांच्या ठिकाणीं असलेली भक्तिही वस्तुतः त्या देवांकरितां नसून स्वतःकरितां असते. केवळ त्या वस्तूकरितांच त्या वस्तूवर कोणीही प्रेम करीत नाहीं; पण त्याची प्रीति स्वतःवर असते, म्हणूनच त्या वस्तूवर तो प्रीति करीत असतो. याकरितां या आत्मरूपाविषयीं प्रथम ऐकून घ्यावें, त्यावर विचार करावा, विवेकबुद्धीनें त्या साऱ्या विचारमालिकेची तपासणी करावी आणि नंतर त्याचें ध्यान करावें. आत्मरूपाविषयीं श्रवण झालें, त्याचा साक्षात्कार झाला आणि त्याचें प्रत्यक्ष दर्शन झालें म्हणजे या विश्वांत जाणण्याजोगें जें कांहीं असेल तें सारें जाणलें असें समजावें. ''

महर्षि याज्ञवल्क्यांच्या या वचनावरून आपणास काय बोध होतो? याज्ञवल्क्यांनीं एक मोठी चमत्कारिक विचारसरणी आपणापुढें मांडली आहे. प्रेम कितीही मोठें असलें तरी त्यांत अत्यंत कमी प्रतीचा स्वार्थ भरलेला असतो असें याज्ञवल्क्य म्हणतात. सारें प्रेम स्वतःवर असतें व परक्यासाठीं परक्यावर प्रेम कोणीही करीत नाहीं असा याज्ञवल्क्यांच्या म्हणण्याचा आशय आहे. मनुष्यप्राणी इतका स्वार्थी असूं शकेल काय? दुसऱ्या कोणत्याही वस्तूवर निःस्वार्थी प्रेम तो करणारच नाहीं असें इतक्या निश्चयानें म्हणतां येईल काय? याज्ञवल्क्यांचें हें म्हणणें आम्हांस खरेंसुद्धां वाटत नाहीं. मनुष्याला कोणत्याही कर्माला प्रवृत्त करणारी जर एखादी शक्ति या जगांत असेल तर ती स्वार्थ हीच होय, असें म्हणणारे कांहीं तत्त्ववेत्ते अगदीं अलीकडच्या काळींही होऊन गेले आहेत. स्वार्थावांचून कोणीही मनुष्य कोणत्याही कामांत पुढें पाऊल घालणार नाहीं असें या अर्वाचीन तत्ववेत्त्यांचें मत आहे. हें मत खरें आहे आणि खोटेंही आहे. जीवात्मा हें परमात्म्याचें प्रतिबिंब आहे. हें प्रतिबिंब क्षुद्र असल्यामुळेंच तें वाईट आणि विरूप दिसतें. आत्म्याच्या ठिकाणीं प्रत्येकाचें अपार प्रेम आहे, आणि आत्मा हाच विश्व आहे. विश्वरूपानें तो प्रत्यक्षत्वास आला आहे. हेंच अमर्याद प्रेम एखाद्या वस्तूच्या उपाधीमुळें क्षुद्र रूपास आलें म्हणजे त्याचें अनंतत्व नाहींसें होतें, आणि क्षुद्रपणामुळें तें हिडीस आणि दुष्ट दिसूं लागतें. विश्वाच्या अत्यल्प अंशांत त्याचें प्रतिबिंबही अत्यल्प प्रमाणावर उमटतें आणि यामुळें तें दुष्टसें भासूं लागतें. एखादी पत्नी आपल्या पतीवर प्रेम करीत असली तर तें प्रेम त्याच्या देहावर नसून त्यामागील त्याच्या आत्म्यावर

असतें ही गोष्ट तिच्या लक्ष्यांत आली अथवा न आली तरी वस्तुस्थिति अशीच आहे. केवळ लौकिकाच्या दृष्टीनें पाहतां तिचें प्रेम शुद्ध स्वार्थी आहेसें दिसतें. तथापि हा दृश्यस्वार्थ त्या परमस्वार्थाचाच अत्यल्प असा अंश आहे. कोणाचें प्रेम कोठेंही जडलेलें असो, आत्म्याच्या द्वारा आणि आत्म्यावरच प्रेम केल्यावांचून त्याला गत्यंतर नाहीं. या आत्म्याचें स्वरूप जाणून घेणें हें आपलें कर्तव्य आहे. स्वार्थी प्रेम आणि निःस्वार्थी प्रेम यांत फरक काय? आत्म्याचें वास्तविक रूप न जाणतां त्यावर जे प्रेम करितात त्यांचें प्रेम स्वार्थी होय; कारण त्या प्रेमाचें स्वरूप अत्यंत आकुंचित असतें. आत्म्याचें रूप जाणून जे त्यावर प्रेम करतात, त्यांचें प्रेम विश्वव्यापी म्हणजे निःस्वार्थी होय. हेच लोक खरे पंडित होत. त्यांचें प्रेम एखाद्या लहानशा अवकाशांत बांधलेलें नसून तें अगदीं मुक्तावस्थेंत असतें. "आपलें ब्राह्मणत्व आत्म्याच्या ठिकाणीं न पाहतां जो तें दुसरीकडे कोठें तरी शोधतो तो आत्मत्यागी होय. आपलें क्षत्रियत्व आत्म्याच्या ठिकाणीं न पाहतां तें दुसरीकडे कोठें जो शोधतो तो आत्मलाभाला मुकतो. या जगाचा वास आत्म्याच्या ठिकाणीं आहे हें ज्याला समजत नाहीं. त्याचा त्याग जग करतें. सर्व देवदेवतांतरें हीं आत्म्याचींच रूपें आहेत हें ज्याला जाणतां येत नाहीं व देवदेवतांना आत्मरूपाशिवाय दुसरीकडे जो शोधतो त्याचा त्याग देव करतात. हे ब्राम्हण, हे क्षत्रिय, हें जग, हीं देवदेवतांतरें आणि याशिवाय विश्वांत जें जें कांहीं आहे तें सारें आत्मरूपच आहे."

प्रेमाच्या खऱ्या रूपाचें वर्णन याज्ञवल्क्यांनीं या प्रकारें केलें आहे. प्रेम हें सर्वव्यापी आहे. एखाद्या पदार्थाला आपण विशिष्टत्व देतों तेव्हां त्याचें स्वरूप आपण आकुंचित करीत असतों. त्याचें सामान्य विश्वव्यापी रूप नाहींसें करून त्याला कांहीं विशिष्ट मर्यादेंत आपण आणून ठेवतों. आत्मरूपाहून तो वेगळा आहे असें आपण मानीत असतों. त्याला आत्मरूपापासून आपण विभक्त करतों. एखाद्या स्त्रीवर मी प्रेम करतों. त्या प्रेमाचा विषय विशिष्टरूपाचा झाला कीं तो मर्यादित झाला. तिच्या देहाच्या हद्दींतच माझें हें प्रेम आकुंचित होऊन राहतें. असें झाल्याबरोबर आत्म्याचें रूपही माझ्या दृष्टीनें आकुंचित होऊन तेवढ्या क्षुद्र देहांत येऊन बसतें. अशा स्थितींत माझें तिजवरील प्रेम अमर्याद होऊं शकणार नाहीं. तिच्या क्षुद्र

देहाची जी मर्यादा तीच माझ्या प्रेमाचीही मर्यादा. प्रेम मर्यादित झालें कीं त्याजपासून केव्हांना केव्हां दुःखप्राप्ति व्हावयाचीच. तिच्या देहाचा अंत झाला कीं माझ्या प्रेमाचाही अंत होऊन अखेरीस दुःख तेवढें शिल्लक राहावयाचें; पण स्त्रीही आत्मरूपच आहे, विश्वव्यापी आहे, असें मी जाणतों तेव्हां माझें प्रेम विशिष्ट देहांत मर्यादित राहात नसून तें विश्वव्यापी होतें. तें विश्वव्यापी झालें म्हणजे पूर्णत्व पावून अनंत होतें. मग त्यापासून दुःखप्राप्ति कशी होणार ? हाच नियम सर्वत्र लागू आहे. आत्मरूपाहून वेगळा या दृष्टीनें एखाद्या पदार्थावर आपण प्रेम करूं लागलों कीं तो आत्मरूपापासून ताबडतोब वेगळा होतो. तो आत्मरूपापासून वेगळा झाला कीं विश्वापासूनही वेगळा होतो. अशा स्थितींत विश्वाच्या कार्यांच्या तडाक्यांत तो सांपडतो. क्रिया आणि प्रतिक्रिया तेथें सुरू होतात, व अशा क्रियाप्रतिक्रियांपासून आनंद आणि दुःख अशी जोडी उत्पन्न होते. आणि या दोहोंचाही स्वीकार करणें मला भाग पडतें. आत्मरूपाहून भिन्न या दृष्टीनें ज्या ज्या पदार्थावर आपलें प्रेम जडतें त्या त्या पदार्थापासून दुःखाची प्राप्ति आपणास हटकून होते; पण प्रत्येक वस्तु परमात्मरूपच आहे हें जाणून तिजवर आपण प्रेम करतों तेव्हां त्या प्रेमापासून दुःखाची उत्पत्ति होणें शक्य नाहीं; कारण तेथें क्रिया आणि प्रतिक्रिया यांचा अभाव असतो. पूर्णानंदाची अवस्था ती हीच. ही अवस्था कशी प्राप्त करून घ्यावयाची ?

ही स्थिति आपण कशी प्राप्त करून घ्यावी याचा मार्गही महर्षि याज्ञवल्क्यांनीं सांगितला आहे. विश्व अनंत आहे, अमर्याद आहे. प्रथम आत्म्याला जाणल्याशिवाय या अमर्याद विश्वांतील प्रत्येक वस्तु आत्मरूप आहे हें आपणास कसें समजेल ? " एखाद्या मृदंगाचा आवाज आपणास दुरून ऐकूं आला तर तो आवाज आपणास पकडतां येत नाहीं अथवा तो बंदही करतां येत नाहीं. जेथून तो आवाज येतो त्या जाग्यापासून आपणापर्यंत अंतर मोठें असल्यामुळें तो आपणास बंद करतां येत नाहीं; पण आपण मृदंगाजवळ जाऊन त्यावर हात ठेवला कीं आवाज ताबडतोब बंद झालाच. आपणापासून दूर अंतरावर शंखनाद होत आहे तोंपर्यंत तो बंद करण्याचें साधन आपणांस प्राप्त होत नाहीं; पण आपण त्याच्याजवळ जाऊन पोंहोंचलों कीं तो नाद आपणास ताबडतोब बंद करतां येतो. त्याचप्रमाणें एखाद्या

विण्यांतून निघणारा सूर वीणा आपल्या हातीं आल्यानंतर आपणास बंद करतां येतो. ओलसर जळण जळत असलें म्हणजे त्यांतून पुष्कळ धूर निघतो व ठिणग्याही पुष्कळ उडत असतात. अशाच रीतीनें या ॐकार रूपांतून ज्ञानस्फुलिंग बाहेर पडत असतात. सर्व कांहीं याच ॐकारांतून निर्माण झालें आहे. ॐकाराच्या श्वासांतूनच जणूं काय सर्व ज्ञान बाहेर पडलें आहे. ज्याप्रमाणें सर्व जलाचा अखेरचा मुक्काम समुद्र हा आहे, अथवा स्पर्शाची जागा त्वचा ही आहे, अथवा सर्व गंधाचा मध्यबिंदु नाक हें आहे, अथवा सर्व रसांचें ठिकाण जीभ हेंच आहे, अथवा सर्व रूपांचा मूळ हेतु ज्याप्रमाणें डोळे हेच आहेत, अथवा ज्याप्रमाणें सर्व शब्द कानांच्या ठिकाणीं एकरूपता पावतात, अथवा सर्व विचारांचें मूलस्थान जसें मन हेंच आहे, अथवा सर्व ज्ञानाची परिसमाप्ति ज्याप्रमाणें अंतःकरणांत होते, अथवा सर्व कर्मांचें अधिष्ठान हात हेंच आहे, अथवा मीठ ज्याप्रमाणें पाण्यांत पूर्णपणें एकरूपता पावतें, त्याचप्रमाणें, हे मैत्रेयी, या विश्वरूपाच्या ठिकाणीं सर्व विराम पावतें. हा विश्वरूप आत्मा अनंत आहे. तो कालस्थलाबाधित आहे. सर्व ज्ञान त्याच्याच ठिकाणीं आहे. हें सर्व विश्व त्यापासूनच उदय पावतें आणि त्याचा लयही अखेरीस तेथेंच होतो. या विश्वात्म्याचा अनुभव आपणास झाला म्हणजे ज्ञान म्हणून निराळें कांहीं शिल्लक उरत नाहीं व जन्म आणि मरण यांचाही अंत होतो. " आपण सारे मूळ रूपाचेच स्फुलिंग आहों हा सिद्धांत याज्ञवल्क्यांनीं येथें ग्रथित केला आहे, हें आपल्या लक्षांत आलें असेलच. ज्या मूळरूपांतून आपण सारे निघालों आहों त्या रूपाला परत जाण्याचा मार्ग म्हटला म्हणजे त्याला जाणणें हाच होय, हा मुद्दाही याज्ञवल्क्यांनीं येथें सांगितला आहे. सध्या एका लहानशा देहांत आपण आपणांस कोंडून घेतलें आहे. हा देह म्हणजेच आपण अशी आपली भावना आहे; पण या आपल्या मूळरूपास जाणून त्यांतच आपण प्रवेश केला म्हणजे आपण विश्वरूप होतों. आपलें भ्रमात्मक लहानसें रूप नष्ट होऊन आपण अनंतरूप होतों."

पतीचें हें भाषण ऐकून मैत्रेयी घाबरली; आणि हेंही बरोबरच आहे. अशा प्रकारचें ज्ञान पचविण्यास मनही तसेंच खंबीर लागतें. अद्वैतसिद्धांत ऐकल्याबरोबर पळत सुटणारे धीर पुरुष आतांही कांहीं थोडे नाहींत. याज्ञवल्क्यांचें हें भाषण ऐकून मैत्रेयी म्हणाली, " महाराज, आपलें भाषण

ऐकून माझें मन भ्रमतें. देवदेवतांतरांचें अस्तित्व नाहींसें होईल असें आपण म्हणालां, हें ऐकून माझ्या काळजानें ठाव सोडला आहे. महाराज, अनंताशीं एकरूप झाल्यावर माझें 'मीपण' कोठें राहिलें ? तें राहिलें नाहीं म्हणजे मी हरवलें असेंच झालें नाहीं काय ? हा अमुक, तो तमुक असें तरी मग कसें ओळखावें ? अशा स्थितींत मी प्रेम कोणावर करावें आणि द्वेष तरी कोणाचा करावा ? अशा स्थितींत आपलें व माझें काय होणार हें मला कांहींच कळत नाहीं." यावर याज्ञवल्क्य म्हणाले, "मैत्रेयी, तुझ्या चित्तांत भ्रम उत्पन्न करावा असा माझा हेतु मुळींच नाहीं, अथवा अशाच भ्रममय स्थितींत तुला ठेवावें अशीही माझी इच्छा नाहीं. माझ्या भाषणानें तुझ्या चित्ताला कंप सुटला यांत मला नवल वाटत नाहीं. ज्या ठिकाणीं द्वैत आहे, ज्या ठिकाणीं एक दुसऱ्याला पाहतो, ज्या ठिकाणीं एक दुसऱ्याचें ऐकतो, ज्या ठिकाणीं एक दुसऱ्याचें स्वागत करतो, ज्या ठिकाणीं एक दुसऱ्याबद्दल विचार करतो आणि ज्या ठिकाणीं एक दुसऱ्याला जाणतो त्या ठिकाणीं भीति आलीच. पण जेथें सर्वच आत्मरूप होतें तेथें कोणीं कोणाला पाहावें, कोणीं कोणाचें ऐकावें, कोणी कोणाचें स्वागत करावें आणि कोणी कोणाला जाणावें ? अशा स्थितींत भीति ही नाहींच."

या एकाच सिद्धांताचें ग्रहण करून सुप्रसिद्ध तत्ववेत्ता शॉपेनहॉर यानें आपल्या ग्रंथांत त्याचा अनुवाद केला आहे. या विश्वाकडे आपण पाहतों आणि याला आपण जाणतों; पण हें ज्ञान आपणास कशाच्याद्वारें घडतें ? येथें जाणणारा अथवा ज्ञाता कोण ? आणि या ज्ञात्याला कसें ओळखावयाचें ? याला उपाय काय ? कारण त्या ज्ञात्याच्याचद्वारें आणि त्याचें अस्तित्व आहे म्हणूनच हा सारा वस्तुसंघात आपण जाणतों. त्याला जाणण्याला कांहीं साधन आहे काय ? नाहीं; त्याला जाणण्याला एकही साधन आपणास उपलब्ध नाहीं. कारण तें साधनच तो स्वतः आहे. मग साधनानें साधनालाच कसें जाणावें ? हें साधन जाणून घेणें अगत्याचें आहे.

विविधरूपानें प्रत्ययास येणारें हें सारें विश्व मूलतः एकरूप आहे हा सिद्धांत याज्ञवल्क्यांनीं अशा प्रकारें सांगितला आहे. अविभाज्य म्हणजे ज्याचे भाग पाडतां येत नाहींत तेंच आपलें खरें रूप होय. आपलें खरें विशिष्टत्व तेंच. या खेरीज बाकीच्या साऱ्या कल्पना क्षुद्र होत. त्या नुसत्या क्षुद्र आहेत

इतकेंच नव्हे, तर त्या भ्रमोत्पादकही आहेत. तथापि अत्यंत क्षुद्र अशा स्फुलिंगांतूनही तेंच अनंत प्रकाशत आहे. प्रत्येक वस्तु ही परमात्मरूपाची व्यक्त दशा होय. ज्ञानाच्या या अत्युच्च शिखरापर्यंत कसें पोंहोंचावें ? " प्रथम या आत्मरूपाबद्दल ऐकून घ्या. " असें याज्ञवल्क्यांनीं सांगितलें आहे. प्रथम ऐकावयाचें, नंतर विचार करावयाचा आणि अखेरीस त्याचेंच ध्यान करावयाचें अशी साधनमालिका याज्ञवल्क्यांनीं सांगितली आहे. यानंतर पिंड आणि ब्रह्मांड यांचा विचार त्यांनीं केला आहे. पिंड आणि ब्रह्मांड हीं परस्परांपासून भिन्न असून आपआपल्या विशिष्ट कक्षांत फिरत असतात असें त्यांनीं दाखविलें आहे. ते म्हणतात " ही पृथ्वी किती सुंदर आणि प्रत्येक प्राण्यास मदत करणारी आहे पहा ! तसेंच हे सारे प्राणीही जगाचे मदतगार आहेत; पण स्वयंप्रकाश आत्म्याला मात्र कोणाचीही मदत होऊं शकत नाहीं. " जें जें कांहीं कल्याणप्रद-आनंदप्रद म्हणून आहे तें कितीही क्षुद्र असलें तरी तें त्या स्वयंप्रकाशाचेंच प्रतिबिंब आहे. चांगलें म्हणून जें कांहीं आहे तें त्याचेंच प्रतिबिंब. हेंच प्रतिबिंब छायामय असलें म्हणजे त्याला वाईट असें नांव प्राप्त होतें. विश्वांत दोन स्वयंप्रकाश वस्तू नाहींत. दोन परमेश्वरांस अस्तित्व नाहीं. ज्या वेळीं एकरूप स्वयंप्रकाशाचें प्रतिबिंब अल्पप्रमाणावर पडतें त्या वेळीं त्या स्थितीला तमोमय, अंधारमय, दुष्ट, वाईट इत्यादि संज्ञा आपण लावतों. आणि ज्या वेळीं हें प्रतिबिंब अधिक स्पष्ट असतें, त्या वेळीं त्याला आपण तेजोमय, चांगलें, कल्याणप्रद अशीं नांवें देतों. चांगलें आणि वाईट यांतील वास्तविक फरक इतकाच. चांगलें आणि वाईट यांतील फरक गुणांचा नसून कमी अधिक प्रमाणाचा मात्र आहे. या परस्परांत गुणांची अथवा धर्मांची भिन्नता नाहीं. हीं दोन्ही एकस्वभावच आहेत. फरक आहे तो प्रतिबिंबाच्या कमी अधिक स्पष्टपणाचा मात्र आहे. याचें प्रत्यंतर पाहण्यास फार लांब जावयास नको. आपल्या चालू जीवनक्रमाचेंच उदाहरण आपण घेऊं. आपल्या लहानपणीं हजारों वस्तू आपल्या नजरेस पडत असतात आणि हजारों वस्तूंना आपण चांगलें म्हणत असतों. पुढें या वस्तू वाईट आहेत असा अनुभव येतो. त्याच प्रमाणें खरोखर चांगल्या वस्तूंना आपण वाईट समजत असतों. आपल्या कल्पनांत अशा प्रकारें केवढें मोठें स्थित्यंतर घडत असतें ! पूर्वीं चांगली म्हणून वाटणारी गोष्ट पुढें

तितकी चांगली वाटेनाशी होते. यावरून चांगलें आणि वाईट या मनाच्या समजुती मात्र आहेत एवढेंच सिद्ध होतें. अमुक एक गोष्ट वस्तुतः चांगली नाहीं अथवा वाईटही नाहीं. तिला आपण चांगलें म्हटलें म्हणजे ती चांगली, आणि ती वाईट अशी आपल्या मनाची समजूत झाली कीं तीच वस्तु आपणास वाईट दिसूं लागते. याकरितां चांगलें आणि वाईट या दोन्ही गुणांना वास्तविक अस्तित्व नाहीं. यांतील फरक आहे तो फरक परिमाणाचा मात्र आहे. जें जें कांहीं आपणास दिसत आहे तें सारें परमात्म्याचेंच स्पष्टीकरण आहे. प्रत्येक वस्तूच्या द्वारा तोच स्पष्टदशेस येत आहे. ज्या वेळीं हें स्पष्टीकरण अत्यंत जड असतें तेव्हां त्याला आपण वाईट म्हणतों आणि ज्या वेळीं तें प्रकाशमय असतें तेव्हां त्याला आपण चांगलें म्हणतों. आत्मरूपावरील सर्व पडदा निखालस गळून पडला म्हणजे त्याचें सर्वांत उत्तम रूप प्रकट होतें. याकरितां विश्वांत जें जें कांहीं आपणास दिसतें, तें सारें आत्मरूपच आहे. या दृष्टीनें त्याकडे पाहण्याची संवय आपण लावून घेतली पाहिजे. याच दृष्टीनें वस्तुमात्राचें ध्यान आपण सदोदित केलें पाहिजे. विश्वांतील वाईट म्हणून जें कांहीं आपणास वाटतें तें सारें नाहींसें होऊन त्या जागीं चांगलें मात्र शिल्लक राहावेंसें करण्याचा मार्ग हाच आहे. आपली दृष्टि पुरी निवळून सर्व आत्मरूपच आहे असें आपणांस दिसूं लागलें म्हणजे वाईट असें कांहीं दिसणें शक्यच नाहीं. कारण आत्मरूप हेंच सर्वांत उत्तमोत्तमरूप होय. अशी दृष्टि आपणांस नाहीं, म्हणून चांगलें आणि वाईट अशीं द्विधा रूपें आपल्या प्रत्ययास येतात. असें द्वैत शिल्लक आहे तोंपर्यंत चांगलें आणि वाईट हीं शिल्लक असावयाचीं. या दोन रूपांचा मध्यबिंदु म्हणजे जेथून हीं दोन रूपें प्रकट होतात, तें सत्यरूप. तें रूप बरें नाहीं आणि वाईटही नाहीं. तर या दोहोंपलीकडे सर्वोत्कृष्ट असें तें रूप आहे. सर्वोत्तम असें रूप एकच असणें शक्य आहे. बरें पुष्कळ असूं शकेल आणि वाईटही पुष्कळ असूं शकेल; पण उत्तमोत्तम अनेक असूं शकणार नाहीं. चांगलें आणि वाईट यांत निरनिराळ्या परिमाणांचा फरक असूं शकेल; पण उत्तमोत्तम म्हटलें म्हणजे कशाशींही त्याची तुलना करतां येणें शक्य नाहीं. याकरितां त्याच्या उत्तमत्वाला कांहीं परिमाणही लावतां येणार नाहीं. याकरितां तें एकच असलें पाहिजे. हेंच उत्तमोत्तम रूप पातळ पड-

यांतून आपणास दिसलें म्हणजे त्या पडद्याच्या पातळपणाच्या परिमाणानुरूप त्याला आपण बरें, मध्यम, चांगलें अशीं नांवें देतों; आणि त्याच रूपासमोर जाड पडदा असला म्हणजे त्याचें रूप अत्यंत अंधुकपणें आपल्या प्रत्ययास येतें आणि त्यालाच आपण वाईट म्हणतों. चांगलें आणि वाईट या दोन प्रकारच्या दोन समजुती अथवा भावना आहेत. या समजुती द्वैत बुद्धीमुळें उत्पन्न झालेल्या आहेत. द्वैत दिसणें हेंच पहिलें खूळ आहे. या खुळानें आपल्या मनाला एकवार पछाडलें कीं तेथें दुसरीं लहान मोठीं अनेक खुळें निर्माण होतात. या खुळांपासून अनेक प्रकारची शब्दसृष्टि निर्माण होते. ही सृष्टि मनुष्याच्या हृदयांत वास करते. आणि अखेरीस त्याच घराचें स्वामित्व पटकावून वाटेल तसा धिंगाणा ती तेथें घालूं लागते. मग ती कोणाला क्रूर पशु बनविते, कोणाच्या हृदयांत द्वेषाचीं रोपें लावते, आणि कोणाच्या मनांत मत्सराचें बीज पेरते. बरें आणि वाईट या दोन कल्पना आपल्या बाल्यावस्थेपासूनच आपणास पछाडीत असतात; आणि मूर्खत्वाच्या कल्पनांतून पुढें मत्सरादि विकार निर्माण होऊन आपल्या जन्माचें मातेरें करून टाकतात. मनुष्यजातीबद्दलच्या आपल्या साऱ्या कल्पना विकृत होतात, आणि या स्वर्गरूपी जगाला नरकाचें रूप आपण प्राप्त करून देतों. चांगलें आणि वाईट या द्वैताचा नाश ज्या क्षणीं आपल्या चित्तांतून होईल, त्याच क्षणीं या पृथ्वीचें रूपांतर स्वर्गांत होईल.

" ही सारी सृष्टि अत्यंत मधुर आहे. ती सर्व प्राण्यांना मधुर आहे व सर्व प्राणी तिला मधुर आहेत. हीं सारीं परस्परांचीं पोषक आहेत. या सर्वांत जें माधुर्य आहे तें आत्म्याचें आहे. तें माधुर्य तोच आहे. तो स्वयंप्रकाश असून अनंत आहे. या जगाच्या पोटीं त्याची वस्ती आहे. हें माधुर्य कोणाचें ? त्या अनंत रूपावांचून माधुर्य कोठचें ? तें एकच माधुर्य अनेक रूपांनीं विलसत आहे. जेथें जेथें थोडें बहुत माधुर्य–प्रेम आढळेल तेथें तेथें तें त्याचेंच स्वरूप आहे. तें प्रेम, तें माधुर्य तोच आहे. मग तें प्रेम साधुसंतांच्या ठिकाणीं असो, पापी मनुष्याच्या ठिकाणीं असो, देवदूतांच्या ठिकाणीं असो, अथवा तें एखाद्या खुनी मनुष्याच्या ठिकाणीं असो; तें माधुर्य तोच आहे. तें माधुर्य देहांत असो, मनांत असो अथवा इंद्रियांत असो; तें माधुर्य तोच आहे. देहद्वारा अनुभवास येणाऱ्या आनंदांत त्याचाच वास

आहे. मनोद्वारा प्राप्त होणारें सुख तोच आणि शुद्ध चैतन्यात्मक परमानंदरूपही तेंच. त्याच्या वांचून कसलेंही अस्तित्व शक्य कसें असेल ? हजारों देवदेवतांनीं व भुताखेतांनीं ' आम्हींच देव ' म्हणून परस्परांशीं युद्ध करीत राहावें हें शक्य आहे ? हीं सारीं बालबुद्धीचीं लेंकरें आहेत. बालिशबुद्धीला पडलेलीं हीं स्वप्नें आहेत ! या देवदेवतांना अणि समंधवेताळांना स्वप्नसृष्टीवांचून अस्तित्व नाहीं. अत्यंत क्षुद्र प्रतीचें शारीरिक सुखही तोच आहे आणि शुद्ध चैतन्यात्मक आनंदही तोच. त्यावांचून दुसऱ्या कोठेंही माधुर्य नाहीं, प्रेम नाहीं आणि आनंदही नाहीं." हें महर्षि याज्ञवल्क्यांचें वचन आहे. अशा प्रकारची स्थिति जेव्हां तुह्मांस प्राप्त होईल व सर्वत्र एकच रूप पाहण्याची समदृष्टि मिळेल त्याच वेळीं आनंद म्हणजे काय हें तुह्मांस सत्यत्वानें कळेल. दारुबाजाला दारूच्या घुटक्यांत जें सुख मिळतें तेंही हें एकरूपच आहे असें तुह्मांस दिसूं लागेल—तेव्हांच शांति या शब्दाचा खरा अर्थ तुम्हांस कळेल. त्याच वेळीं सत्यवस्तूशीं तुमची भेट होईल. प्रेम ह्मणजे काय हें तुम्हांला अशा स्थितींतच कळेल; आणि जोंपर्यंत या खोट्या भेदांना आणि मूर्खपणाच्या कल्पनांना तुह्मी मिठी मारून बसाल तोंपर्यंत सर्व प्रकारचीं दुःखें तुम्हांस शोधीत येतील. तो एकच अनंत, तो एकच स्वयंप्रकाश या दृश्याच्या पोटांत आहे. या पृथ्वीच्या पोटांत त्याचीच वस्ती आहे. जगांत जेथें जेथें कांहीं प्रेम म्हणून आढळून येतें तेथें तेथें तें स्वरूप त्याचेंच आहे. देहाच्या ठिकाणीं दिसून येणारें प्रेमही तोच. पृथ्वी ही जणूं काय त्याचा देह आहे. या देहाच्या आंत सर्व प्रकारच्या शक्तींचा वास आहे. या देहांत अनेक प्रकारचीं सुखसाधनें भरलीं आहेत. या साऱ्या शक्ती आणि सुखसाधनेंही तोच आहे. डोळे पाहण्याची क्रिया करतात, त्वचा स्पर्श जाणूं शकते. या साऱ्या साधनांचा अर्थ काय ? हीं साधनेंही तोच आहे. देहाच्या आंतील स्वयंप्रकाश आत्मा आणि त्याचीं हीं साधनें यांत भिन्नता नाहीं. प्राण्यांना सर्व प्रकारें आश्रय देणारी ही पृथ्वी आणि तिच्यावर प्रेम करणारे हे प्राणी हीं सर्व तोच आहे. तो अनंतच जगांतील आनंद आहे. आपणांमध्येंही प्रत्ययास येणारा आनंद तोच आहे. तोच ब्रह्म. " हा वायु सर्व प्राण्यांना प्रिय आहे आणि त्याचेंही प्रेम सर्व प्राण्यांवर आहे. हा वायु ब्रह्मरूप आहे. या वायूच्या ठिकाणीं जें स्वयंप्रकाश ब्रह्म आहे तेंच आमच्या

या देहांतही आहे. सर्व प्राण्यांची जीवनकला या रूपानें तोच आविर्भूत होत आहे. तोच व्यक्तदशेला येत आहे. हा सूर्य सर्व प्राण्यांना अत्यंत प्रिय आहे, आणि त्याचें प्रेमही सर्व प्राण्यांवर तसेंच आहे. या सूर्याच्या अंतरंगांत जें स्वयंप्रकाश ब्रह्म आहे तेंच अंशतः आमच्यांतही परावर्तन करीत आहे. आम्ही सारे लहान लहान आरसे असून त्यांत तोच स्वयंप्रकाश बिंबला आहे! त्याचें प्रतिबिंब ज्यांत नाहीं असें कोणतें जीवित आहे? जींत तो प्रकाशत नाहीं अशी कोणती वस्तु आहे? आमच्या देहांत तेंच स्वयंप्रकाश ब्रह्म आहे आणि त्याच्याचमुळें आमच्या डोळयांस प्रकाश पाहण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें आहे. हा चंद्र सर्व प्राण्यांना प्रिय आहे आणि तोही सर्व प्राण्यांवर प्रेम करतो; पण या चंद्राचा अंतरात्मा जें स्वयंप्रकाश ब्रह्म, जें अनंत आणि अमर आहे तेंच आमच्या देहांत मन या रूपानें आविष्कृत होत आहे. ही विद्युत् किती प्रकाशशाली आणि सुंदर आहे पहा! सर्व प्राण्यांवर तिचें प्रेम आहे आणि सर्व प्राणी तिजवर प्रेम करतात; पण या विद्युत् शक्तीचा अंतरात्मा कोण म्हणाल तर तो तेंच स्वयंप्रकाश ब्रह्म. तेंच स्वयंप्रकाश ब्रह्म आमच्यांतही आहे. कारण ' सर्वं खल्विदं ब्रह्म ' मनुष्याचें प्रेम सर्व प्राण्यांवर आहे आणि सर्व प्राणीही मनुष्यावर प्रेम करतात. मनुष्याचा अंतरात्मा म्हणजे तेंच स्वयंप्रकाश ब्रह्म. ' सर्वं खल्विदं ब्रह्म ' सर्व प्राण्यांचें अधिष्ठान हेंच ब्रह्म आहे. ''

हे सारे विचारतरंग किती उदात्त, काव्यमय आणि उपयुक्त आहेत पहा! हे सारे विचार ध्यान करण्यासाठीं आहेत. चित्तांत सदोदित चिंतन करावें अशा योग्यतेचे ते आहेत. फार कशाला, या पृथ्वीचेंच चिंतन तुम्ही करा, आणि त्याच वेळीं हेंही लक्ष्यांत बाळगा कीं या पृथ्वीच्या अंतरात्म्यांत ज्या स्वरूपाचा वास आहे तेंच आमच्यांत वसत आहे. ही पृथ्वी आणि आम्ही हीं दोन्ही वस्तुतः एकच आहेत. पृथ्वी ही देह आणि जीवात्मा हाच परमात्मा. पृथ्वीच्या विशाल देहामागें जसा विशाल परमात्मा त्याचप्रमाणें या लहानशा जड देहामागें जीवात्मा आहे. या वायूच्या ठिकाणीं जें ब्रह्मरूप आहे तेंच मजमध्येंही आहे. हीं सारीं एकाच अनंताचीं अनेक रूपें आहेत. एकच अनंत ब्रह्म अनेक रूपांनीं व्यक्त झालें आहे.

४

# सांख्यविचार.

प्रकृतीला अव्यक्त असें नांव सांख्य तत्त्वज्ञांनीं दिलें आहे. अव्यक्त म्हणजे सर्व घटकांची साम्यावस्था. अव्यक्तांत जे वेगवेगळे घटक असतात, त्यांपैकीं कोणाचें आधिक्य नसतां सर्व समप्रमाण असण्याची जी अवस्था ती प्रकृति अथवा अव्यक्त. सर्व गुणांची पूर्ण साम्यावस्था असेल, अशा वेळीं असल्याहि प्रकारची गति असणें शक्य नाहीं हें उघडच आहे. ज्यावेळीं कोणत्याही प्रकारचें व्यक्त रूप प्रकृतीला नसतें, अशा अगदीं प्रथमावस्थेंत कोणत्याही प्रकारची गति नसते आणि अशा वेळीं ती अविनाशीही असते; कारण विघटना अथवा मृत्यु यांची उत्पत्ति असमता आणि अदलाबदल यांमुळें होत असते. परमाणुवाद्यांच्या मताप्रमाणें सर्व सृष्टीचें आदिकरण परमाणु हें आहे; पण हें मत सांख्यांना मान्य आहे. परमाणु ही प्रथमावस्था नव्हे असें सांख्यमत आहे. हें विश्व परमाणूंतून उत्पन्न होत नाहीं. परमाणु ही फार तर द्वितीय अथवा तृतीय अवस्था असें सांख्यांचें म्हणणें आहे. आदिबीजापासून परमाणु उत्पन्न होणें शक्य आहे इतकेंच सांख्यवादी कबूल करतात. आदिबीजापासून परमाणु उत्पन्न होऊन परमाणूच्या कमी अधिक संघटनेनें लहानमोठे पदार्थ निर्माण होतात. अर्वाचीन भौतिकशास्त्रांच्या दृष्टीनें विचार करतां तींही सांख्यमतालाच अखेरीस पुष्टि देतील असा स्पष्ट संभव दिसतो. त्यांच्या वाढीचा आजचा झोंक सांख्यमताकडेच आहे. ईथर ( Ether ) अथवा आकाश हा मूळ पदार्थ आहे असें अर्वाचीन शास्त्र म्हणतें. ईथर हा अनेक परमाणु मिळून झाला आहे असें म्हणतां येत नाहीं; कारण तसें असेल तर त्यांत दुसरा कोणताही पदार्थ पूर्णपणें मिसळला जाणार नाहीं. हवा ही अनेक परमाणू मिळून झाली आहे. ईथरचें अस्तित्व सर्वत्र आहे हें आपणांस ठाऊक आहेच. सर्व पदार्थांस ईथर अंतर्बाह्य व्यापून आहे, आणि हवेचे परमाणूही त्यांत तरंगत आहेत. आतां स्वतः ईथरही अनेक परमाणूंचा बनला आहे, असें म्हणावें तर त्यांतील दोन परमाणूंत मोकळी जागा राहणारच. मग ही मोकळी जागा कशानें भरली असेल. ही जागा अधिक सूक्ष्म स्वरूपाच्या

दुसऱ्या ईथरनें भरली असेल असें मानलें, तर या दुसऱ्या सूक्ष्म ईथरच्या दोन परमाणूंत पहिल्याप्रमाणेंच मोकळी जागा अथवा शुद्ध पोकळी राहणार. ही पोकळी कोणत्या पदार्थानें भरली असेल अशी कल्पना करावी ? तिच्या-साठीं तिसरा ईथर मानावा तर तीच अडचण पुन्हा येणार आणि मारुतीच्या शेंपटाप्रमाणें वाढणाऱ्या या ईथरपरंपरेला शेवट असा कधीं येणारच नाहीं, आणि ही परंपरा वाढवितां वाढवितां अखेरीस हातीं शून्यलब्धि मात्र राहील. याकरितां सर्व वस्तूंचें आदिरूप परमाणु हें आहे असें म्हणतां येत नाहीं. सांख्यमताप्रमाणें प्रकृति अथवा अव्यक्त हें अखिल दृश्य विश्वाचें आदिरूप आहे. या अव्यक्तरूपांत विश्वांतील यच्चयावत् पदार्थ कारणरूपानें अथवा बीजरूपानें असतात. कारण म्हणजे काय ? कारण म्हणजे व्यक्तरूपाचें अत्यंत सूक्ष्म स्वरूप. व्यक्तदशेला आलेल्या मोठ्या पदार्थाचें अत्यंत आकुं-चित अथवा सूक्ष्मरूप तें कारणरूप. जें एका कालीं स्पष्ट आणि विशाल होतें तेंच अधिकाधिक आकुंचित होत जाणें याचें नांव कारणरूपास जाणें. नाश म्हणजे काय ? नाश म्हणजे कारणरूपास परत जाणें हा होय. एखाद्या मड-क्यावर धोंडा घालून त्याचा चुरा तुम्हीं केला तर त्याचा आपण नाश केला असें तुम्ही म्हणतां. आतां येथें नाश झाला म्हणजे काय झालें ? हेंच कीं त्या मडक्याचें कारणरूप जी माती तिच्यांत तें परत जाऊन मृत्ति-कारूप झालें. याचा अर्थ हाच कीं ज्या कारणांतून वस्तू उत्पन्न होतात त्याच कारणांत म्हणजे प्रकृतींत त्या लीन होतात. नाश म्हणजे आत्यंतिक नाश नव्हे. असा आत्यंतिक नाश शक्यच नाहीं. शास्त्रीय दृष्ट्या कोणत्याही वस्तूचा आत्यंतिक नाश होणें शक्य नाहीं. याकरितां अमुक वस्तु समूळ नष्ट झाली असें म्हणणें अशास्त्रीय, तर्कशून्य आणि वेडेपणाचें आहे. अर्वाचीन शास्त्रपद्धतीनें हा सिद्धांत प्रत्यक्ष सिद्ध करून दाखवितां येतो. नाश म्हणजे घटनेची विघटना, हा सिद्धांत भगवान् कपिलांनीं कित्येक युगांपूर्वीं बोलून दाखविला असून आतां अर्वाचीन शास्त्रें त्याचा अनुवाद करीत आहेत आणि तो सप्रयोग प्रत्यक्ष सिद्ध करीत आहेत. नाश याचा अर्थ मूळ सूक्ष्म-रूपास परत जाणें, इतकाच आहे. नाश म्हणजे पूर्ण अभाव नव्हे. कोण-त्याही वस्तूचा पूर्ण अभाव करतां येत नाहीं ही गोष्ट रसायनशास्त्री आपल्या प्रयोगशाळेंत दाखवितात हें तुम्हांस ठाऊक असेलच. या बाबतींत आपलें

ज्ञान आतां अशा स्थितीला पोंहोंचलें आहे कीं सध्याच्या काळीं वस्तूचा आत्यंतिक नाश—अभाव करतां येणें शक्य आहे असें कोणीं म्हटलें तर त्याची गणना निखालस वेड्यांत होईल. असला समज आतां केवळ अक्षर-शत्रु अशा शुद्ध गांवढळ लोकांच्या डोक्यांत असला तर असेल. आमच्या प्राचीन तत्त्ववेत्त्यांनीं जी गोष्ट हजारों वर्षांपूर्वीं सांगितली तिचाच अनुवाद अर्वाचीन शास्त्रांनीं करावा हें नवल नव्हे काय ? पण यांत नवल तरी कशाचें ? जें सत्य आहे तें कोणत्याही काळीं अविकृत सत्यच असणार. कोणत्याही सिद्धांताच्या खरेपणाचें हें लक्षणच आहे. तो कालस्थलाबाधित असला पाहिजे. अमक्या काळीं अगर अमक्या ठिकाणीं मात्र खरा आणि दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं तो खोटा असें होणें शक्य नाहीं. असें झालें तर त्याला सिद्धांत हें नांव कसें देतां येईल ?

सत्यवस्तूच्या शोधासाठीं निघालेल्या सांख्यशास्त्रानें बाह्यसृष्टीचा विचार सोडून दिला आणि त्यानें अंतःसृष्टींत बुडी मारली. त्यानें मनाचा अभ्यास केला. मनःसृष्टीचें पृथक्करण त्यानें केलें. या पृथक्करणांत जीं तत्त्वरत्नें त्यांच्या हातीं लागलीं, तींच तत्त्वें अर्वाचीन शास्त्रांनीं केवळ जड सृष्टीचा अभ्यास करून पुन्हां शोधून काढलीं. या शोधाच्या दिशा आरंभीं भिन्न दिसल्या तरी अशा रीतीनें अंतीं त्यांची एकवाक्यता झाली. ज्या एका मध्यबिंदू-पासून ही सूक्ष्म आणि स्थूल सृष्टि निघाली, त्याच बिंदूकडे परत जाण्यास हीं दोन्ही शास्त्रें निघालीं असल्यामुळें त्यांची गांठ अखेरच्या मुक्कामावर पडावी हें रीतसरच आहे.

प्रकृति व्यक्तदशेस येण्यास सुरवात झाली तेव्हां तिचें पहिलें रूप व्यक्त झालें. त्याला महत् असें नांव सांख्यांनीं दिलें आहे. सामान्य भाषेंत याला आपण बुद्धि या नांवानें ओळखण्यास हरकत नाहीं. प्रकृति अमूर्त रूपांतून मूर्तरूपांत यावयास निघाली तेव्हां महत् हें पहिलें तत्त्व ती प्रसवली. महत् म्हणजे विश्वव्यापी बुद्धि. महत् याचा अर्थ स्वतःची जाणीव असा करतां येणार नाहीं. असा अर्थ करणें चुकीचें होईल. कारण जाणीव ही या महत् तत्त्वाचा एक अंश मात्र आहे. महत् हें विश्वव्यापी तत्त्व आहे. जाणीव ही व्यक्तिव्यापी आहे. महत् ब्रह्मांडव्यापी आहे, आणि जाणीव पिंडव्यापी आहे. महत् हें समष्टिरूप असून जाणीव ही व्यष्टिरूप आहे. महत् सर्वव्यापी

असल्यामुळें तिच्या पोटांत जाणीवाक्षमता, जाणीव आणि जाणीवातीतता या तिन्ही अवस्थांचा अंतर्भाव होऊं शकतो. जाणीवाक्षमता (subconsciousness) म्हणजे जेथें जाणीव उत्पन्न होण्याची पात्रता नाहीं अशी स्थिति. दगडाची अवस्था अथवा बेशुद्धीची अवस्था ही या प्रकारची म्हणतां येईल. जाणीव (consciousness) म्हणजे सामान्य ज्ञानाची स्थिति; आणि जाणीवातीतता (superconsciousness) म्हणजे समाधीची स्थिति. याकरितां या अवस्थात्रयापैकीं कोणत्याही एका शब्दानें महत् या शब्दांतील सारा अभिप्रेत अर्थ व्यक्त होऊं शकणार नाहीं. उदाहरणार्थ, सृष्टींत अनेक प्रकारच्या घडामोडी प्रत्यहीं चालू असतात. यांतील कांहीं तुमच्या डोळ्यांनीं तुम्हांस पाहतां येतात आणि त्यांची घडामोड तुमच्या जाणिवेच्या कक्षेंत येऊं शकते. पण दुसऱ्या कांही घडामोडी इतक्या सूक्ष्म असतात कीं तुमच्या पंचेंद्रियांपैकीं कोणत्याही इंद्रियांच्या साहाय्यानें त्यांचें अस्तित्व तुम्हांस जाणतां येत नाहीं. या दोन्ही प्रकारच्या घडामोडींचें मूळ एकाच ठिकाणीं आहे. या दोन्ही घडामोडींचें कारण महत् हेंच आहे. महत् तत्त्वांतून विश्वव्यापी अहंकार निर्माण होतो. महत् आणि अहंकार हेही जड पदार्थच होत. मन आणि स्थूल स्वरूपाची वस्तु यांत गुणधर्ममूलक फरक कांहींच नाहीं. ज्या मूल वस्तूपासून मनासारखा सूक्ष्म पदार्थ निर्माण होतो, त्याच पदार्थापासून जडवस्तूही निर्माण होतात. त्यांत फरक दिसतो तो कमी अधिक परिमाणाचा मात्र असतो. मूळ पदार्थ तोच असून तो कमी अधिक स्पष्टपणामुळें स्थूल अथवा सूक्ष्म बनतो. सूक्ष्मांतून स्थूल निर्माण होतें. या बाबींतही अर्वाचीन इंद्रियविज्ञानशास्त्र जुन्या मतासच पाठिंबा देत आहे हें मोठें आश्चर्य आहे. सूक्ष्मरूपाचें मन आणि स्थूलरूपाचा मेंदू यांत तत्त्वतः फरक नाहीं; एवढा मुद्दा तुम्हांला पटला तर तुमची पुष्कळशी खटपट आणि डोकेंफोड वांचेल. या गोष्टी आज तुम्हांस प्रत्यक्ष सिद्ध करून दाखवितां आल्या नाहींत तरी त्यांवर तुम्ही खुशाल विश्वास ठेवा. त्यांत तुमचेंच हित आहे.

मूळ अहंकारापासून आणखी दोन प्रकारच्या वस्तू उत्पन्न होतात. अथवा शास्त्रीय भाषेनें बोलावयाचें म्हणजे अहंकार दोन प्रकारचीं रूपें धारण करतो असेंही म्हणतां येईल. एका प्रकारांत इंद्रियें निर्माण होतात. इंद्रियांत दोन

प्रकार आहेत. ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें. इंद्रियें ह्मणजे जड देहावर डोळे, कान वगैरे दिसणारीं इंद्रियें नव्हत. तर या जड इंद्रियांच्या पाठीमागें त्यांचे जे गोलक मेंदूंत असतात त्यांस इंद्रियें अशी संज्ञा आहे. अहंकाराचें रूपांतर होऊन त्यांतून हे गोलक निर्माण होतात. याच अहंकारांतून दुसऱ्याही एक प्रकारचा पदार्थ निर्माण होतो. तो पदार्थ तन्मात्रा या संज्ञेनें ओळखला जातो. तन्मात्रा म्हणजे स्थूल वस्तूंचे सूक्ष्म परमाणू. या तन्मात्रा आपल्या नेत्रादि इंद्रियांवर आदळून तेथें जाणीव उत्पन्न करतात. या तन्मात्रांचें अस्तित्व जड इंद्रियांनीं जाणतां येत नाहीं; तथापि तें जाणिवेंत येतें. या तन्मात्रांतून जडवस्तू निर्माण होतात. जमीन, पाणी इत्यादि ज्या ज्या वस्तू आपण प्रत्यक्ष पाहूं शकतों अथवा ज्यांचा स्पर्श प्रत्यक्ष आपणास घडतो त्या साऱ्या वस्तू या तन्मात्रांतूनच निर्माण झाल्या आहेत. या सर्व गोष्टी आपण विशेषेंकरून लक्ष्यांत ठेवाव्या. ही सारी परंपरा लवकर समजण्याजोगी नाहीं, ही गोष्ट खरी, तथापि खटपटीनें ती समजावून घेणें इष्ट आहे. विशेषतः पाश्चात्त्य लोकांना तर ही अडचण अधिकच प्रखर भासेल; कारण मन आणि स्थूल पदार्थ यांजबद्दल पाश्चात्त्यांत फारच विचित्र कल्पना पसरल्या आहेत. या पूर्वकल्पना समूळ टाकून देऊन त्या जागीं या नव्यांची स्थापना करणें हें मोठें कठीण काम आहे. पाश्चात्त्य लेखकांचे संस्कार माझ्या लहानपणीं माझ्या चित्तावर झाल्यामुळें या वेडगळ कल्पना माझ्याही डोक्यांत शिरल्या होत्या व त्यांचें उच्चाटन करणें मला फारच जड गेलें.

हीं तत्त्वें आणि या साऱ्या घडामोडी विश्वमय आहेत हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. हें सारें विश्व दृश्य स्वरूपांत नसून अव्यक्तरूपांत आहे अशी कल्पना करा. अशा स्थितींत यांतील कोणत्याही पदार्थाला स्थूल रूप प्राप्त झालेलें नसून तो आपल्या मूळच्या म्हणजे अव्यक्त अथवा सूक्ष्मरूपांत असतो. अशा स्थितींत कोणतीही घडामोड अथवा अदलाबदल होत असतां सर्व वस्तूंचा समूह एकाच केंद्रांत ग्रथित झालेला असतो. या सर्व वस्तू या वेळीं एकरूप असतात. साऱ्या वस्तूंचें मूळरूप हेंच. पुढें याच रूपांत घडामोड सुरू होते, आणि या एकरूपांतून अनेक पदार्थ निर्माण होतात. दुधांतून ज्याप्रमाणें दहीं, ताक, लोणी, तूप इत्यादि पदार्थ निर्माण होतात तसेंच हें आहे. या विश्वरूपांत पहिली घडामोड होऊन जो पहिला पदार्थ उत्पन्न

होतो तो महत् हा होय. पुढें या महत् तत्त्वाचें रूपांतर होऊन त्यांतून समष्टिरूप अहंकार निघतो. यापुढें तिसरा पदार्थ समष्टिरूप ज्ञानेंद्रियें आणि समष्टिरूप महाभूतें. डोळे, कान, नाक, त्वचा इत्यादिकांच्या द्वारें यांचें ज्ञान आपणास होतें. याच महाभूतांपासून पुढें सारे सृष्ट स्थूल पदार्थ निर्माण होतात. विश्वरचनेचा प्रकार सांख्यशास्त्रानें या प्रकारें वर्णिला आहे. आणि ज्या प्रकारच्या घडामोडींनीं ब्रह्मांडरचना होते, त्याच प्रकारच्या घडमोडी पिंडरचनेंतही दिसून येतात. विश्वरचनेचा जो क्रम तोच पिंडरचनेचा अथवा व्यक्तिरचनेचा. उदाहरणार्थ एक मनुष्यप्राणीच घ्या. मनुष्यरचनेंतही प्रथम अव्यक्त विश्वाचा अव्यक्त अंश असतो. ही त्याची प्रकृति होय. या प्रकृतींतून प्रथम महत् हें तत्त्व निर्माण होतें. ब्रह्मांडांतील महत् आणि एका मानवी प्राण्यांतील महत् यांत गुणधर्मांचा फरक मुळींच नाहीं. त्यांतील फरक एवढाच कीं ब्रह्मांडांतील महत् विशाल असून पिंडांतील महत् अल्प असतें. ब्रह्मांडाप्रमाणेंच या एका पिंडांतही महत् तत्त्वापासून अहंकार निर्माण होतो. या अहंकारांतून पुढें इंद्रियें बनतात, आणि अखेरीस त्यांचें जड शरीर बनतें. ही सारी परपंरा पूर्णपणें लक्ष्यांत येणें अत्यंत आवश्यक असल्यामुळें तिचें पुनःपुन्हां चर्वितचर्वण करणें भाग आहे. कारण साऱ्या सांख्यशास्त्राचा मूळ पाया हा आहे. पाया कच्चा राहिला तर पुढील इमारतीस धोका येईल. याकरितां हा पाया पक्का करण्यास कितीही मेहनत पडली तरी ते श्रम अनाठायीं गेले नाहींत हें लक्ष्यांत ठेवा. या परंपरेचा उपयोग तुम्हांस सांख्य शास्त्रापुरताच आहे असेंही नाहीं. साऱ्या जगांत जितक्या म्हणून तत्त्वज्ञानाच्या सरण्या आज उपलब्ध आहेत त्या सर्वांच्या पायाशीं हीच परंपरा आहे. श्रीकपिलांच्या तत्त्वविचारांचा उपयोग जींत झाला नाहीं अशी एकही तत्त्वज्ञानपद्धति आज अस्तित्वांत नाहीं. याकरितां कोणत्याही तत्त्वपद्धतीचा अभ्यास तुम्हांस कर्तव्य असला, तरी प्रथम सांख्यशास्त्र ध्यानांत घेणें फार आवश्यक आहे. जगांतील प्रत्येक तत्त्वपद्धतीनें आपल्या विचारसरणींत कांहींना कांहीं भाग भगवान् कपिलांपासून उसना घेतला आहे. या दृष्टीनें जगांतील सारे पंडित कपिलांचे ऋणी आहेत. हिंदुस्थानांत येऊन पायथागोरास यानें सांख्यशास्त्राचा अभ्यास केला. ग्रीक तत्त्वज्ञानाचा आरंभ अशा रीतीनें झाला आहे. यानंतर अलेक्झांड्रियन्

तत्वज्ञानाचा पाया सांख्यानेंच रचिला. पुढें जो ईश्वरवादी पंथ निघाला त्यानेंही सांख्यशास्त्राचा आश्रय केला. सांख्यशास्त्राच्या उत्पत्तीनंतर त्याच्या दोन शाखा झाल्या. यांपैकीं एक यूरोपांत गेली व दुसरी हिंदुस्थानांत राहिली. हिंदुस्थानांत राहिलेली शाखा श्रीव्यासांनीं वाढीस लाविली. शुद्ध बुद्धीला प्रमाण करून तत्त्वज्ञानाचा विचार करणारें पहिलें दर्शन सांख्य हेंच होय. यापूर्वीं तत्त्वज्ञानाचा विचार सोपपत्तिक व विवेचक बुद्धिपूर्वक कोणींही केला नाहीं. सांख्य हें जगांतील पहिलें दर्शन आहे. याकरितां प्रत्येक इंद्रियातीत विज्ञानजिज्ञासूनें श्रीकपिलांच्या चरणीं प्रथम नमन केलें पाहिजे. तत्त्वज्ञानाचे आद्यजनक या नात्यानें कपिलांची योग्यता फार मोठी असल्यानें त्यांचें ह्मणणें अत्यादरपूर्वक ऐकून घेणें आपलें कर्तव्य आहे, हें आपल्या चित्तावर तुम्हीं बिंबवून ठेवावें. पद्धतशीर तत्त्वज्ञानाच्या या आद्यजनकाचा उल्लेख श्रुतींनीं केला आहे व भगवान् श्रीकृष्णांनीं '**सिद्धानां कपिलो मुनिः**' असें म्हणून त्यास अवतारी विभूतींत गोंविलें आहे. कपिल महामुनि अंतर्ज्ञानी होते हें समजण्यास याहून दुसऱ्या वेगळ्या पुराव्याची जरूर काय आहे ? योग्यांना अतींद्रिय ज्ञान प्राप्त होतें, व तें प्राप्त करून घेण्याच्या कामीं कोणत्याही देहाबाहेरील कोणत्याही प्रकारच्या उपकरणांची जरूर लागत नाहीं, अशी प्रसिद्धि आहे. ही गोष्ट खरी असली पाहिजे हें अशा प्रकारच्या उदाहरणांवरून निःसंशय सिद्ध होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. भगवान् कपिलांपाशीं दुर्बिणी नव्हत्या आणि सूक्ष्मदर्शक कांचाही नव्हत्या. तथापि सूक्ष्मातिसूक्ष्म पदार्थ करतलामलकवत् त्यांना दिसले. विश्वाचें त्यांनीं केलेलें पृथक्करण किती पूर्ण, निर्व्यंग आणि चकित करून सोडणारें आहे पहा !

सुप्रसिद्ध जर्मन दर्शनकार शॉपेनहॉर यांची पद्धति आणि भारतीय तत्त्वविचारसरणी यांत काय फरक आहे याचें दिग्दर्शन केल्यास तें वावगें होणार नाहीं. इच्छा हें जगाचें आदिकारण आहे असें शॉपेनहॉर यांचें म्हणणें आहे. 'जगावें' ही जी इच्छा वस्तुमात्राच्या ठिकाणीं निदर्शनास येते तीच या जगाचें कारण आहे. या इच्छेमुळेंच जग आकाराला आलें असें ते म्हणतात; पण ही त्यांची उपपत्ति आम्हांस मान्य नाहीं. इच्छा ही संज्ञावाहक ज्ञानतंतूच्या अधीन आहे. कोणत्याही पदार्थावर माझी दृष्टि

प्रथम जाते त्या वेळीं माझ्या चित्तांत कोणतीही इच्छा नसते. त्या पदार्थांच्या आघातानें माझ्या इंद्रियांवर कांहीं विकार संज्ञावाहक ज्ञानतंतूंच्या प्रेरणेनें उत्पन्न होतात. या विकारांना प्रत्युत्तर म्हणून 'अमुक कर' अथवा 'अमुक करूं नको,' असा विकार माझ्या मेंदूवर येऊन थडकतो. माझ्या अहंकाराचें जें हें परावर्तित रूप ती माझी इच्छा होय. अहंकाराचें जें परावर्तन मेंदूवर पडलें त्या परावर्तनाला इच्छा ही संज्ञा प्राप्त झाली. परावर्तित नव्हे अशा स्वयंरूपाचा एकादा अत्यल्प असा अंशही इच्छा या संज्ञेस पात्र होत नाहीं. यावरून इच्छा उत्पन्न होण्यापूर्वीं दुसऱ्या किती तरी पदार्थांचें अस्तित्व असलें पाहिजे हें कोणाच्याही लक्ष्यांत सहज येण्यासारखें आहे. किमानपक्ष अहंकार तरी तिच्या अगोदर अस्तित्वांत असलाच पाहिजे. कारण, तसें नसेल तर इच्छा कोणाला होणार ? तिचें अधिष्ठान कोण ? तिचें उत्पत्तिस्थान कोणतें ? या प्रश्नांना उत्तर संभवत नाहीं. 'मी आहें' ही अस्मिता अथवा सात्विक अहंकाराची भावना अगोदर असेल तेव्हांच 'मीं अमुक करावें' अथवा 'मीं अमुक करूं नये' अशी इच्छा उत्पन्न होऊं शकेल. 'मी आहें' हीच भावना नष्ट झाली तर इच्छा कोठून आणि कां उद्भवावी ? यावरून इच्छेच्या उत्पत्तीपूर्वीं अहंकाराची उत्पत्ति झाली असली पाहिजे हें उघड आहे. अहंकारापासून इच्छा इत्पन्न झाली असून अहंकार त्याहून उच्च अशा महत्पासून निर्माण झाला, आणि महत् म्हणजे बुद्धि हें अव्यक्त प्रकृतीचें एक रूप आहे. आपण जें जें कांहीं पाहतों तें सारें आपल्या इच्छेचेंच रूप आहे असें बौद्धांचेंहि मत आहे. सूक्ष्मेंद्रियशास्त्रदृष्ट्या हें मत सर्वथा चुकीचें आहे; कारण इच्छेची उत्पत्ति आणि आपल्या देहांतील संज्ञावाहक ज्ञानतंतु यांचा अत्यंत निकट संबंध आहे; इतका कीं त्यांचें अस्तित्व नसेल तर इच्छाही उत्पन्न होणार नाहीं. एखाद्या मनुष्याच्या देहांतून सारे ज्ञानतंतू तुम्हीं काढून टाकले तर त्यांच्या नाशाबरोबर त्याच्या इच्छेचाही नाश होईल. चतुष्पादांवर अनेक प्रकारचे प्रयोग करून पाहिल्यानंतर ही गोष्ट आतां निश्चित झाली आहे.

आतां महत् या वस्तूचें स्वरूप काय आहे याचा विचार करूं. मनुष्याच्या ठिकाणीं या वस्तूचें जें रूप प्रकट झालें आहे त्याचा सविस्तर विचार करणें फार अगत्याचें आहे. कारण महत् अथवा बुद्धि हें तत्त्व फार मह-

त्वाचें आहे. बुद्धि रूपांतर पावून अहंकाराचें रूप धारण करते हें आतां तुम्हांस ठाऊक आहेच. आपल्या शरिरांत शक्तीचें जें जें रूप आपल्या प्रत्ययास येतें तें तें बुद्धीपासूनच निर्माण झालें आहे. हिच्या पोटांत विचाराक्षमता, विचारप्रवणता आणि विचारातीतता या तिन्ही प्रकारांचा अंतर्भाव होतो. जाणिवेचे हे तीन प्रकार आहेत. आतां या तिन्ही प्रकारांचें वर्णन थोडक्यांत करणें अवश्य आहे. एका जाणिवेच्या या तीन अवस्था आहेत. यांपैकीं पहिला प्रकार विचाराक्षमता (subconsciousness) हा तिर्यक् योनींतील प्राण्यांत आढळून येतो. खालच्या प्रतीच्या प्राण्यांत आणि जनावरांत विचार करण्याची पात्रता नसते. बुद्धीच्या या अवस्थेला ‘ उपजत बुद्धि ’ या संज्ञेनें आपण ओळखतों. खालच्या प्रतीच्या प्राण्याचे सारे व्यवहार उपजत बुद्धीच्या आधारानें चालत असतात. उपजत बुद्धि बहुधा कधीं चुका करीत नाहीं. पण तिचें व्यापारक्षेत्र अत्यंत आकुंचित आहे. जनावरांच्या अयुष्यक्रमांत या बुद्धीच्या चुकीमुळें अनर्थ घडले असें फारच क्वचित् आढळून येतें. जनावरें रानावनांत भटकतात आणि नानाप्रकारच्या वनस्पती तीं पाहातात; पण वाटेल त्या झाडावर तीं तोंड टाकावयाचीं नाहींत. इतक्या प्रकारच्या झाडोऱ्यांतून आपल्या आहाराला योग्य अशी वनस्पति कोणती आणि विषारी अथवा न खाण्याजोगी कोणती हें आपल्या उपजत बुद्धीच्या जोरावर तीं बरोबर ओळखतात. या दृष्टीनें या उपजत बुद्धीचें कार्य मोठें वाखाणण्याजोगें असतें ही गोष्ट खरी, तथापि तिचें क्षेत्र फारच लहान आहे हेंही लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. पूर्वीं कधीं न पाहिलेला असा पदार्थ त्यांनीं पाहिला, अगर पूर्वीं अननुभूत अशा अगदीं नव्या परिस्थितींत तीं सांपडलीं कीं त्यांची अवस्था आंधळ्यासारखी होते. तेथें त्यांच्या उपजत बुद्धीचें शहाणपण चालेनासें होतें. यावरून उपजत बुद्धि ही जवळ जवळ एखाद्या यंत्रासारखी आहे असेंही म्हणावयास हरकत नाहीं. आपलें नियत कार्य एखादें यंत्र अगदीं बिनचूक पार पाडतें; पण त्या ठरींव मर्यादेच्या बाहेर एक टांचणीही त्याला इकडची तिकडे करवत नाहीं. त्याचप्रमाणें आपल्या निश्चित क्षेत्रांत उपजत बुद्धि ही बिनधोक वावरते; पण त्यापलीकडे एखादा हातसुद्धां तिला जावबत नाहीं. यापुढची बुद्धीची पायरी विचारवती बुद्धि ही होय. विचारवती बुद्धि उपजत बुद्धी

इतकी अचूक नाहीं. ती स्खलनशील आहे. ती वारंवार चुका करते, पण तिचें क्षेत्र विस्तृत आहे. उपजत बुद्धीच्या कार्याप्रमाणें तिचें कार्य अचूक आणि तडफेचें नाहीं. कोणत्याही परिस्थितीचा विचार उपजत बुद्धि जितक्या लवकर करते तितक्या जलदीनें हें कार्य विचारवती बुद्धि करीत नाहीं. तिची गति मंद आहे. हिलाच विवेचक बुद्धि ( reason ) असेंही नांव आपण देतों. विवेचक बुद्धि स्खलनशील आणि मंदगामी तथापि विस्तृत क्षेत्रावर वावरणारी असून उपजत बुद्धि अचूक आणि तडफेची तथापि ठरींव आणि आकुंचित क्षेत्रावर फिरणारी आहे. उपजत बुद्धीपेक्षां विवेचक बुद्धीच्या हातून अधिक चुका होण्याचा संभव आहे. आतां या दोहोंहून वरचढ अशा स्वरूपाची जी बुद्धीची स्थिति ती विचारातीत बुद्धि होय. ही स्थिति फक्त योग्यांसच प्राप्त होणारी आहे. बुद्धीची विशेष प्रकारची आराधना ज्यांनीं केली असेल त्यांनाच ती प्राप्त होईल. विवेचक बुद्धीप्रमाणें ती स्खलनशील नाहीं, इतकेंच नव्हे तर तिचें कार्यक्षेत्र विवेचक बुद्धीच्या कार्यक्षेत्राहून फारच विस्तृत आहे. बुद्धीची सर्वांत जी अत्युच्च दशा ती हीच होय.

या एकंदर विवेचनाचा मुख्य मथितार्थ लक्ष्यांत ठेवावयाचा तो हाच कीं आपणांसमोर जें जें कांहीं दिसतें, त्या साऱ्याची उत्पत्ती महत् या तत्त्वापासून झाली आहे. विचाराक्षमता (sub-consciousness), विचारप्रवणता ( consciousness ) आणि विचारातीतता ( super-conciousness ) या जाणिवेच्या तीन अवस्थांचा अंतर्भाव महत् या एकाच तत्त्वांत होतो, आणि एकच तत्त्व अनेक रूपांनीं प्रकट होतें.

आतां यापुढें एका फारच नाजुक प्रश्नाचा विचार आपणास करावयाचा आहे. हा प्रश्न अनेकांकडून आणि वारंवार उपस्थित होत असतो. हा प्रश्न असाः—स्वतः सर्वस्वी परिपूर्ण अशा परमेश्वरानें जर हें जग उत्पन्न केलें तर त्यांत सर्वत्र अपरिपूर्णता कोठून उत्पन्न झाली. यांत अनेक प्रकारच्या उणिवा आहेत ही गोष्ट कोणासही नाकबूल करतां यावयाची नाहीं. कारण ती गोष्ट प्रत्येकाच्या प्रत्यक्ष अनुभवाची आहे.

ज्याला आपण विश्व या संज्ञेनें ओळखतों त्याचें स्वरूप काय ? आपल्या जाणिवेंत जें कांहीं येतें आणि तिला ज्याचा अनुभव होतो त्याला आपण विश्व असें म्हणतों. आपल्या विचारप्रवण स्थितीच्या पलीकडे काय आहे याचें ज्ञान

आपणास नाहीं. तिच्या पलीकडच्या स्थितींत अस्तित्व म्हणून कांहीं पदार्थ आहे कीं नाहीं हेंही आपणांस सांगतां येत नाहीं. इतका मुद्दा तुमच्या लक्ष्यांत आला म्हणजे नुकताच सांगितलेला तुमचा प्रश्न अशक्य कोटींतला आहे, ही गोष्टही तुमच्या लक्ष्यांत येईल. एखाद्या मोठ्या जिनसाचा एक अगदीं लहानसा तुकडा मीं हातीं घेतला तर तो क्षुद्र, ओबडधोबड आणि प्रमाणविहीन आहे असेंच मला दिसेल. त्यांतील घटकांत मला विस्कळितपणा आढळेल; आणि असें व्हावें यांत कांहीं नवलही नाहीं. हीच गोष्ट विश्वासही लागू आहे. हें विश्व अपूर्ण आहे असें आपणांस दिसतें तें कां ? आपण तें अपूर्ण स्थितींतच पाहतों म्हणून. अपूर्ण स्थितींत तें अपूर्ण दिसतें हें स्वाभाविक नाहीं काय ? आपणच तें अपूर्ण स्थितींत पाहातों, हें कसें ? विवेचक बुद्धि आणि ज्ञान यांच्या स्वरूपाचें जें विवेचन नुकतेंच झालें तें लक्ष्यांत आणा. ज्ञान म्हणजे वस्तुसंघांतील घटकांचा परस्परसंबंध निश्चित करणें. तुम्ही रस्त्यांत जातां आणि इतक्यांत एखादा मनुष्य तुमच्या नजरेस पडतो. त्याकडे पाहून " हा मनुष्याप्राणी आहे हें मी जाणतों " असें तुम्ही म्हणतां. या तुमच्या ज्ञानाचें अथवा जाणण्याचें स्वरूप हेंच कीं तुमच्या चित्तांत मनुष्याची आकृति पूर्वीं हजर असते. तिच्याशीं ही नवी प्रतिमा तुम्ही ताडून पाहातां आणि त्याचें साम्य ओळखून या नव्या प्रतिमेला ' मनुष्य ' असें नांव तुम्ही देतां. अनेक माणसें तुम्हीं पाहिलेलीं असतात आणि त्या साऱ्यांच्या प्रतिमा तुमच्या चित्तावर कोरलेल्या असतात; आणि हा नवा मनुष्य पाहतां क्षणींच त्याच्याशीं सदृश अशा प्रतिमांशीं ही प्रतिमा तुम्ही ताडून पाहातां आणि त्यांचें साम्य लक्ष्यांत येतांच तुमच्या चित्ताचें समाधान होऊन " हा मनुष्य प्राणी आहे हें मीं जाणलें " असें तुम्ही म्हणतां. साम्य ताडून पाहण्याच्या या क्रियेला ज्ञान असें नांव आपण दिलें आहे. तुमच्या चितांत, जणूं काय अनेक खण असून त्यांत अनेक चिजा भरल्या आहेत. बाहेरून येणाऱ्या नव्या प्रतिमा या पूर्वींच्या चिजांशीं तुम्ही ताडून पाहतां आणि या नव्या प्रतिमेची योजना कोणत्या खणांत करावी याचा विचार तुम्ही करतां. ज्ञान होणें या क्रियेचें शास्त्रीय स्वरूप अशा प्रकारचें आहे. यावरून आणखीही एक गोष्ट सिद्ध होते, ती ही कीं, तुमच्याजवळ अनेक प्रतिमांचा मोठा सांठा अगोदरच तयार अ-

सल्याशिवाय बाह्य पदार्थांचें ज्ञान तुम्हांस होणें शक्य नाहीं. मनुष्यप्राणी जन्मास येतो तेव्हां अशा प्रकारचा मोठा सांठा बरोबर घेऊनच तो या जगांत अवतरतो. जन्माच्या वेळीं मनुष्याचें मन अगदीं कोऱ्या कागदासारखें अलिखित असतें, हें कांहीं युरोपीय पंडितांचें मत सर्वथा चुकीचें आहे, हें तुमच्या लक्ष्यांत आलें असेलच. कारण ज्ञान याचा अर्थच असा कीं नवी बाह्य प्रतिमा आंतील प्रतिमेशीं ताडून पाहणें. पूर्वप्रतिमांचा असा जंगी खजिना आपल्याजवळ अगोदरच तयार असला पाहिजे. तसें नसेल तर साम्य पाहण्याची ही क्रिया करणें आपणांस अशक्य होईल आणि अशा क्रियेच्या अभावीं नव्या बाह्य वस्तूचें ज्ञानही आपणास होणार नाहीं. अशा प्रकारचा कोणताही सांठा बरोबर न आणतां एखादें मूल अगदीं कोऱ्या मनानें जन्मास आलें आहे अशी कल्पना करा. अशा स्थितींत कोणत्याही पदार्थांचें ज्ञान त्याला होणें शक्य नाहीं. याकरितां चालू जन्म प्राप्त होण्यापूर्वींच तें मूल अशा प्रकारच्या स्थितींत असलें पाहिजे कीं तेथें त्याला प्रतिमांचा सांठा तयार करतां यावा. अशा रीतीनें त्याच्या ज्ञानाची वाढ एकसारखी होत असली पाहिजे. आमची ही विचारसरणी बाजूस ठेवून दुसरा एखादा नवा रस्ता कोणास दाखवितां येत असेल तर तो त्यानें दाखवावा. एक आणि दोन मिळून तीन होतात हें जितकें खरें, तितकेंच प्रतिमासादृश्य हेंच ज्ञानाचें बीज आहे हेंही खरें आहे. पूर्व प्रतिमांचा सांठा अगोदर तयार असल्याशिवाय नव्या बाह्य वस्तूचें ज्ञान होणें शक्य नाहीं ही गोष्ट आतां कित्येक पाश्चात्य पंडितांसही पटूं लागली आहे. मूल जन्मास येतें तेव्हां पूर्वज्ञानाचा सांठा त्याच्याबरोबर असतो असें तेही म्हणूं लागले आहेत; तथापि त्यांच्या उपपत्तीची परंपरा मात्र वेगळी आहे, हा फरक लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. या नव्या मुलानें पूर्वज्ञानाचा सांठा बरोबर आणला हें खरें; पण हें ज्ञान त्याच्या स्वतःच्या पूर्वपरिश्रमाचें फळ नसून तें त्याला त्याच्या बापदाद्यांकडून प्राप्त झालेलें असतें. त्याच्या पूर्वजांनीं आपल्या हयातींत जो अनुभवांचा सांठा जमविलेला असतो तो सारा या नव्या गृहस्थाच्या स्वाधीन ते करतात, आणि अशा रीतीनें देहदानाबरोबर अनुभवदानही ते त्याला करीत असतात, अशी या पंडितांची विचारसरणी आहे. त्या मुलाबरोबर आलेलें ज्ञान हा वंशपरंपरागत प्राप्त झालेला ठेवा

आहे असें त्यांचें म्हणणें आहे. असो. या बाबतींतही त्यांचे डोळे लवकरच उघडतील व ही आपली उपपत्ति सर्वथा चुकीची आहे असें ते म्हणूं लागतील. या वंशपरंपरागत ठेव्याच्या उपपत्तीवर शास्त्रीय घणाचे घाव आजच पडूं लागले आहेत. ही उपपत्ति चुकीची आहे असें कांहीं जर्मन पंडित म्हणूं लागले आहेत. ही वंशपरंपरेची उपपत्ति अंशतः मात्र खरी आहे. ती पूर्ण नाहीं. ती फक्त देहाच्या रचनेपुरती मात्र खरी आहे. मनोभूमिकेच्या रचनेशीं वंशपरंपरेचा संबंध नाहीं. तो देहाच्या आकारापुरताच आहे. प्रत्येक मनुष्याची परिस्थिति दुसऱ्याच्या परिस्थितीहून भिन्न असते असें आपण पाहतों. बापाच्याहून मुलाची परिस्थिति वेगळी, आणि त्याच्याहून त्याच्या मुलाची आणखी निराळी. या तिघांच्या मनोभूमिका जर त्यांस वंशपरंपरेनें प्राप्त झाल्या होत्या तर त्यांच्या परिस्थितींत म्हणजे त्या मनोभूमिकांच्या व्यक्तदर्शेत इतका फरक कोठून आला? जें एकच कार्य या स्वरूपानें आपणासमोर आपणास दिसत असतें, त्या पाठीमागें अनेक कारणांची परंपरा हजर असते. आपल्या वर्तणुकींतही आपल्या परिस्थितीनें बदल होत असतो; आणि ही परिस्थिति आपणच निर्माण केलेली असते. आपण स्वतःच बनविली त्याप्रमाणें आपली परिस्थिति बनली आहे. दुसऱ्या कोणींही ती बनविली नाहीं आणि तिचा वेढा आपल्याभोंवतीं दिला नाहीं. पूर्वजन्मीं जीं जीं कर्में आपण केलीं त्यांस अनुरूप अशी परिस्थिति आपणास चालू जन्मीं प्राप्त झाली आहे. दारूबाज मनुष्य हळू हळू गलिच्छ आणि हलकट लोकांच्या वस्तीकडे आपोआप ओढला जात असतो यांत नवल काय?

ज्ञान होणें या क्रियेचा अर्थ आतां आपल्या लक्ष्यांत चांगला आला असेल. जुन्या प्रतिमांशीं नव्या प्रतिमा ताडून पाहून योग्य खणांत त्यांची योजना करणें याचें नांव ज्ञान प्राप्त करून घेणें. नव्या प्रतिमेचें साम्य जुनीशीं निश्चित करणें याचें नांव ज्ञान. नवी प्रतिमा अमुक म्हणून ओळखणें याचें नांव ज्ञान. 'ओळखणें' या शब्दांतच जुन्याशीं नवें ताडून पाहणें इतका अर्थ अंतर्भूत होतो. ज्ञान या शब्दाला याहून अन्य अर्थ कांहीं नाहीं. ज्ञान म्हणजे पूर्वसंगति शोधून काढणें इतका अर्थ ग्राह्य ठरला म्हणजे एका वस्तूचें ज्ञान करून घेण्यास तिच्या जातीच्या अनेक वस्तूंच्या परंपरा पाहिल्या पाहिजेत हें म्हणणेंही तुम्हांस अग्राह्य वाटणार नाहीं. उदाहरणार्थ, एक गारगोटी

घ्या. हा खडा गारगोटीचा आहे हें निश्चित करण्यास तसल्याच जातीचे दुसरे अनेक खडे पाहून त्यांच्याशीं त्या खड्याची तुलना करणें तुम्हांस भाग आहे. आतां हाच सिद्धांत आपल्या विश्वनिरीक्षणास लावून पाहूं. विश्व म्हणजे काय असा प्रश्न आपल्या चित्तांत उपस्थित झाला असतां त्याच्या जातीचीं दुसरीं अनेक विश्वें पाहूनच त्याचा निश्चय आपणास करतां येईल; पण ही गोष्ट करणें आपणास शक्यच नाहीं; कारण आपल्या मनाच्या कपाटांत विश्व या नांवाची एकच वस्तु आहे, आणि तिच्याशीं तुलना करण्यास तिच्या जातीची दुसरी वस्तूच आपणापाशीं नाहीं. यामुळें अशा प्रकारची तुलना करणें आपणास अशक्य होतें. आपल्या मनाच्या खणाच्या लहानशा अवकाशांत विश्वाचा एक अत्यल्प अंश मात्र राहूं शकतो, आणि तुलना करण्यास त्याच्याशीं सदृश असें कांहींच आपणास आढळत नाहीं. यामुळें विश्व म्हणजे काय याचा उलगडा अद्यापि आपणास झाला नाहीं आणि असा उलगडा न झाल्यामुळें हें कोडें सोडविण्यासाठीं आपलें मन एकसारखें धडपड करीत राहिलें आहे. आपल्या बुद्धीला अद्यापि या बाबतींत समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळें चिडून जाऊन " हें जग मोठें दुष्ट आहे, भयंकर आहे, वाईट आहे अशा गोष्टी ती आपणास सांगत असते; पण कधीं काळीं तिची तशी लहर फिरली तर जग चांगलें आहे असेंही ती म्हणेल. तथापि एकंदरीनें पाहतां जग अपूर्णावस्थेंत आहे हा तिचा समज मात्र पक्का आहे. जगाचें खरें स्वरूप आपणास जाणावयाचें असेल तर त्याच्याशीं सदृश असल्या दुसऱ्या जगपरंपरा आपण अवलोकनांत आणल्या पाहिजेत. असें झालें तरच जग म्हणजे काय याचें यथातथ्य ज्ञान आपणास होणार आहे; आणि दुसऱ्या जगपरंपरा आपणास पाहावयाच्या असतील तर या जगांत राहून तें घडणें शक्य नाहीं. त्याकरितां या जगापलीकडे, या विश्वापलीकडे, या जाणिवेपलीकडे आपणास गेलें पाहिजे. त्या मुक्कामावर आपण पोहोंचलों म्हणजे सारें विश्व एकसमयावच्छेदें आपल्या डोळ्यांसमोर उभें राहील. या मुक्कामावर पोहोंचण्याच्या अगोदर आपण कितीही धडपड केली आणि या विश्वाच्या कडक भिंतीवर आपलीं डोकीं आपण कितीही आपटलीं तर रतिभरही उपयोग होणार नाहीं. कारण ज्ञान म्हणजे एकाच जातीच्या अनेक वस्तू ताडून पाहणें; आणि जग या जातीची एकच वस्तु

आपणास उपलब्ध असल्यामुळें ही ताडून पाहण्यास व गुणधर्मांचें साम्य पाहण्यास आपणास अवसरच नाहीं. आपली ईश्वरविषयक कल्पनाही अशाच प्रकारची आहे. परमेश्वराचें संपूर्ण स्वरूप आपल्या बुद्धीच्या अवलोकनांत कधींच येत नाहीं. त्याचा अल्पसा अंश मात्र आपण पाहूं शकतों. ज्याप्रमाणें या साऱ्या विश्वाचें रूप साकल्यानें आपणास पाहतां येत नाहीं, त्याचप्रमाणें परमेश्वराचेंही सारें रूप आपल्या अवलोकनांत येत नाहीं. या अल्पशा अंशापलीकडे उरलेला मोठा भाग मानवीबुद्धीच्या क्षेत्राबाहेरचा आहे. त्या क्षेत्राच्या आंत तो येऊं शकत नाहीं. परमेश्वर सर्वव्यापी आहे. त्याचें स्वरूप इतकें विस्तृत आहे कीं हें सारें विश्वही त्याचा केवळ लहानसा अंश आहे. त्याच्या स्वरूपाचा विस्तार इतका मोठा असल्यामुळेंच आपल्या अवलोकनांत तो येत नाहीं, आणि अल्पसा अंश आपल्या दृष्टीस पडत असल्यामुळेंच परमेश्वर अपूर्णसा आपणास भासतो. यामुळेंच परमात्मरूपाची खरी कल्पना आपणास होत नाहीं आणि त्याच्या स्वरूपाबद्दल अनेक प्रकारचा गैरसमज आपल्या डोक्यांत असतो. विश्वाचें कोडें आपणास उलगडावयाचें असेल आणि परमेश्वराचें खरें स्वरूप पाहावयाचें असेल तर विवेचकबुद्धीच्या आणि जाणिवेच्याही पलीकडे आपणास गेलें पाहिजे. " श्रोतव्य आणि श्रुत या दोहोंच्यापलीकडे तूं जा. विवेचकबुद्धि आणि विचार या दोहोंसही तूं मागें टाक, म्हणजे तूं सत्यवस्तूला पोंहोंचशील. तूं श्रुतींच्याही पलीकडे जा; कारण श्रुती त्रिगुणांचें ज्ञान मात्र सांगतात. त्रिगुणापलीकडे श्रुती मौन पावल्या आहेत; याकरितां तूं त्यांच्यापलीकडे जाऊन त्रिगुणातीत हो, " असा भगवान् श्रीकृष्णांचा उपदेश आहे. त्रिगुणांच्या मर्यादेच्या आंत राहून विश्वाच्या कोड्याचा अथवा परमात्मरूपाचा अंत लागावयाचा नाहीं. हा अंत लावावयाचा असेल तर ही मर्यादा उल्लंघूनच गेलें पाहिजे. आपण त्रिगुणांच्या मर्यादेच्या आंत आहों तोंपर्यंत विश्वाच्या सामरस्याचा आणि एकतानतेचा अनुभव आपणास यावयाचा नाहीं. तोंपर्यंत विश्व ही कांहीं तरी बेताल आणि फापट पसाऱ्याची वस्तु आहे असेंच आपणास वाटणार.

पिंड आणि ब्रह्मांड यांची रचना एकाच पद्धतीनें झाली आहे. या दोहोंच्या पोटीं तींच तत्त्वें आहेत आणि त्यांची रचनापद्धतही तीच आहे. पिंडरचनेंत जाणिवेच्या तिन्ही अंगांचा अनुभव आपणास नसतो. त्या तिहीं-

तील फक्त एकच अंग आपल्या अनुभवास येत असतें. विचाराक्षमता ( sub-consciousness ) आणि विचारातीतता ( super-consciousness ) हीं दोन्ही अंगें आपल्या सामान्य अनुभवाबाहेरचीं आहेत. आपला अनुभव सामान्य विचारापुरताच असतो. सामान्य विचारावस्था मात्र आपल्या ओळखीची आहे. "मी पापी आहें" असें एखादा मनुष्य म्हणेल तर तें त्याचें म्हणणें सपशेल खोटें आहे; कारण त्याला स्वतःची पुरती ओळखच नाहीं. स्वतःचें ज्ञान सामग्र्यानें त्याला झालेलेंच नाहीं. मग स्वतःबद्दलचें त्याचें कोणतेंही मत सर्वथैव खरें कसें असूं शकेल ? तो अज्ञानांत बुडालेला आहे. स्वतःचा फक्त एकच भाग त्याला ठाऊक आहे. कारण त्याच्या ज्ञानानें कितीहि मोठी उडी मारली तरी जाणिवेच्या मधल्या म्हणजे विचारावस्थेपलीकडे तो जाऊंच शकत नाहीं. ज्या भूमीवर तो उभा आहे, तिचा एकच भाग त्याच्या अवलोकनांत येतो. मग अशा स्थितींत साऱ्या जमिनीबद्दल त्यानें दिलेलें मत खरें कसें असूं शकेल ? हीच गोष्ट साऱ्या विश्वरचनेसही लागू आहे. विश्वांतील जेवढा भाग आपल्या विचारावस्थेंत येऊं शकतो तेवढयाचेंच ज्ञान आपणास होऊं शकतें. सर्व विश्वाचें ज्ञान एकसमयावच्छेदें आपणास कधींच होत नाहीं. एका पिंडांत ज्याप्रमाणें बुद्धि ही विचाराक्षमता, विचारप्रवणता आणि विचारातीतता या तीन अवस्थांत प्रकट झालेली असते, त्याचप्रमाणें महत् तत्त्व तशाच प्रकारच्या तिन्ही अवस्थांत विश्वरूपांत प्रकट झालें आहे. विश्वांत ज्याप्रमाणें महत् तत्त्वापासून दुसरीं अनेक तत्त्वें निघालीं, त्याचप्रमाणें पिंडांत बुद्धितत्त्वापासून तींच तत्त्वें निघालीं. ज्या अनुक्रमानें महत्‌तत्त्वाचें रूपांतर होत होत ब्रह्मांड प्रकट झालें त्याच अनुक्रमानें बुद्धितत्त्वांचें रूपांतर होत होत पिंड प्रकट झाला.

मूळ प्रकृतींत हीं रूपांतरें कशानें झालीं ? तीं कोणीं घडवून आणलीं ? अथपासून इतीपर्यंत सारी प्रकृति केवळ जड आहे हें आपण पाहतोंच. अनेक वस्तूंच्या संघातानें ती उत्पन्न झालेली असून ती चैतन्यात्मक नाहीं. नियम म्हणून जेथें दिसतो, तेथें त्या नियमानें बांधली जाणारी वस्तु अचेतन असलीच पाहिजे हें उघड आहे. नियमाला अथवा कायद्याला बाध आणण्याचें सामर्थ्य नसणें हा गुण फक्त जड म्हणजे चैतन्यविहीन वस्तूंच्या अंगीं मात्र असतो. मन, बुद्धि, इच्छा आणि बाकीच्या साऱ्या वस्तू ह्याच चैत-

न्यविहीन कोटींतील आहेत. तथापि आरसा स्वतः प्रकाशरूप नसतांही सूर्याला ज्याप्रमाणें प्रतिबिंबित करूं शकतो, त्याचप्रमाणें या वस्तू स्वतः जड असतांही चैतन्य प्रतिबिंबित करूं शकतात. ज्याचें चित् म्हणजे चैतन्य या वस्तू प्रतिबिंबित करतात, त्याला पुरुष असें नांव सांख्यशास्त्रानें दिलें आहे. हा पुरुष या साऱ्या वस्तूंच्या पलीकडचा आहे. ज्या अनेक घडामोडी होऊन विश्व दिसूं लागलें त्यांचें अधिष्ठान पुरुष आहे. त्याच्या अस्तित्वावांचून या घडामोडी होणें शक्य नाहीं. या दृष्टीनें या घडामोडींचें कारण पुरुष आहे असें म्हणतां येईल. तथापि या घडामोडी पुरुष आपण होऊन करतो असें मात्र नव्हे. त्या फक्त त्याच्या साक्षित्वानें घडतात. पिंडाच्या ठिकाणीं जो पुरुष म्हणवितो तोच ब्रह्मांडांतील परमेश्वर होय. व्यष्टिरूपांतील पुरुष तोच समष्टिरूपांत परमेश्वर. परमेश्वरानें आपल्या इच्छेनें हें विश्व निर्माण केलें असें म्हणतात; आणि केवळ सामान्य मनुष्यांच्या दृष्टीनें सामान्य मनुष्यांकरितां बोलावयाचें म्हटलें तर यांत वावगें असेंही कांहीं नाहीं; पण ही ग्राम्य दृष्टि सोडून आपण शास्त्रीय दृष्टीनें पाहूं लागलों म्हणजे हें म्हणणें सर्वथा चुकीचें आहे असें आपणास आढळून येईल. इच्छेच्या अंगीं निर्माण करण्याचें सामर्थ्य कसें असेल? इच्छा हें तिसऱ्या अथवा चवथ्या अवस्थेचें तत्त्व आहे; याचा विचार आपण पूर्वीं केलाच आहे. इच्छा जन्मास येण्यापूर्वीं प्रकृतीचीं आणखीही रूपांतरें अगोदरच झालेलीं असतात. मग या रूपांतरांना कोणीं जन्म दिला? इच्छेंतून हीं उद्भवलीं असें म्हणणें म्हणजे मुलानें बापाला जन्म दिला असें म्हणण्यासारखेंच आहे. इच्छा ही स्वयंभू नाहीं. ती एकरूप नाहीं. अनेक घटकांच्या संघातानें ती निर्माण झाली आहे; आणि अशा रीतीनें जो पदार्थ संघटित असतो तो प्रकृतींतून निर्माण झालेला असतो. असा पदार्थ आणि प्रकृति यांच्यांत जन्यजनकभाव असतो. प्रकृति हा जनक आणि पदार्थ हा जन्य होय. याकरितां पदार्थानें प्रकृतीला जन्म दिला हें म्हणणें खरें असण्याचा संभवच नाहीं. याकरितां परमेश्वरानें आपल्या इच्छेंतून हें विश्व निर्माण केलें हें म्हणणें अशास्त्रीय आणि चुकीचें आहे. हे शब्द केवळ अर्थशून्य बडबडच होय. आपल्या जाणिवेचा लहानसा भाग मात्र इच्छेंत अंतर्भूत होऊं शकतो. जाणिवेचा सबंध विस्तार इच्छेच्या कक्षेंत येऊं शकत नाहीं. जाणिवेचा अंश

मात्र घेऊन आपल्या मेंदूची हालचाल इच्छा करीत असते. तुमच्या शरिराच्या ज्या हालचाली होतात त्या तुमची इच्छा करीत नाहीं, त्याचप्रमाणें विश्वाची घडामोडही इच्छा करीत नाहीं. ज्या मूलतत्त्वाच्या अनुरोधानें शरिराच्या हालचाली होतात, त्या तत्त्वाचा इच्छा हा एक लहानसा अंश मात्र आहे. त्या तत्त्वाचा एक भाग इच्छा या रूपानें प्रकट झाला आहे. हा पिंडांतील सिद्धांत ब्रह्मांडांतही खरा आहे. विश्वांतील समष्टिरूप इच्छा ही विश्वाचा एक भाग आहे. समष्टिरूप इच्छेच्या पोटीं विश्व नांदत नसून विश्वाच्या पोटीं इच्छा नांदते. विश्वाची घडामोड इच्छेच्या अनुरोधानें चालत नाहीं. विश्व आणि इच्छा यांची परस्पर तुलना करावयाची म्हटलें तर विश्व हें समष्टिरूप आणि इच्छा व्यष्टिरूप म्हणतां येईल. याकरितां इच्छेनें विश्व निर्माण झालें अथवा इच्छेनें तें चालतें हें म्हणणें सर्वथा चुकीचें होईल. इच्छेची ही उपपत्ति ग्राह्य केली तर साऱ्या विश्वाच्या कोड्याचा निर्वाह तींत होत नाहीं. माझा हा देह माझ्या इच्छेप्रमाणें चालतो, हालतो असें मीं मानलें तर एखादी वेळ अशी येते कीं तेव्हां माझ्या इच्छेला न जुमानतां माझा देह वावरूं लागतो; आणि असें झालें म्हणजे मीही संतापून केंस तोडूं लागतों; पण यांत वास्तविक अपराध कोणाचा ? अपराध माझाच; कारण इच्छेनें अमुक घडतें असें गृहीत करावयास मला काय कारण होतें ? त्याचप्रमाणें विश्व परमेश्वराच्या इच्छेनें चालतें हें म्हणणें मीं गृहीत केलें आणि अनुभव उलटा येऊं लागला तर तो अपराधही माझाच होय. या विश्वाचें आदिकारण जो पुरुष तो इच्छा नव्हे; आणि त्याचप्रमाणें तो बुद्धिही नव्हे. कारण बुद्धि ही वस्तुसुद्धां संघटित आहे. ती स्वयंभू नव्हे. जड मेंदूच्या साहाय्यावांचून बुद्धीला अस्तित्व असूं शकत नाहीं. जड मेंदू आणि बुद्धि यांचा चिरसंयोग आहे. जेथें जेथें म्हणून बुद्धीचा प्रत्यय येईल तेथें तेथें मेंदूच्या जातीचा कांहीं पदार्थ असलाच पाहिजे. याच पदार्थाची घटना विशिष्ट आकारानें होते आणि मेंदूचें उद्दिष्ट कार्य ती करूं लागते. जेथें जेथें बुद्धि म्हणून आहे तेथें तेथें मेंदूचे घटक कोणत्याना कोणत्या रूपानें असावयाचेच. बुद्धि ही स्वतःच संघटित वस्तु आहे, तर मग पुरुषाचें स्वरूप तरी काय ? या प्रश्नाचें उत्तर हेंच कीं तो इच्छारूप नव्हे अथवा बुद्धिरूपही नव्हे; तर या साऱ्या रूपांचें तो कारण आहे. तो कार्यरूप नसून कारणरूप

आहे. तो साक्षीभूत आहे आणि त्याच्या अस्तित्वाच्या आधारावरच या घडामोडी होऊन हीं अनेक रूपें निर्माण होतात. तो प्रकृतींत मिसळून जाऊन नष्ट होत नाहीं. प्रकृतींत तो मिसळतच नाहीं. तो बुद्धि नव्हे अथवा महत्‌ही नव्हे. तो कोणापासून उत्पन्न झालेला नसून तो स्वयमेव आहे. तो संघटित रूपाचा नसून शुद्ध एकरूपाचा आहे. "मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।" पुरुषाच्या अधिष्ठानाच्या आधारानें प्रकृति चराचर विश्व निर्माण करते.

प्रकृति जड आहे हें खरें, तथापि तिच्यांत चैतन्य दिसतें तें कशाचें? बुद्धीचें स्वरूप चैतन्यात्मक आहे. चैतन्य हा पुरुषाचा भाव आहे. चैतन्य पुरुषाच्या ठिकाणीं वास करतें असें म्हणण्यापेक्षां पुरुष हा चैतन्यात्मक अथवा चित्स्वभाव आहे असें म्हणणें अधिक युक्त होईल. ज्यापासून सर्व ज्ञानाची उत्पत्ति होते, परंतु ज्ञान ज्याला जाणूं शकत नाहीं तें चित् अथवा चैतन्य. जाणीव हा पुरुषाचा स्वभाव नव्हे; कारण जाणीव हें तत्त्वही संघटनात्मक आहे. तें स्वयंभू अथवा एकरूप तत्त्व नाहीं. तथापि जाणिवेंत जो प्रकाश आणि जी सद्रूपता आहे ती पुरुषाची आहे. चित् पुरुषाच्या ठिकाणीं आहे; पण पुरुष ज्ञानयुक्त आहे अथवा तो जाणतो असें म्हणतां येत नाहीं. पुरुषांतील चिदंश प्रकृतीशीं मिळून आपणाभोंवतीं दिसणारें हें सारें चराचर विश्व निर्माण झालें आहे. विश्वांत जें कांहीं आनंदमय, सुखमय आणि प्रकाशमय आहे, त्याला ते गुण पुरुषापासून प्राप्त झाले आहेत. जें कांहीं सुखमय आहे आणि जें कांहीं कल्याणमय आहे त्यांत त्या अनंताचा अंश आहे. या अनंतरूपालाच आपण परमेश्वर असेंही म्हणतों. "यद् यद् विभूतिमत् सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसंभवम् ॥" हें सारें विश्व याच परमेश्वराकडे अथवा पुरुषाकडे धांव घेत आहे. सारें विश्व त्याकडे ओढलें जात आहे. विश्वाचा लेप जरी पुरुषाला लागूं शकत नाहीं अथवा विश्वाशीं त्याचा कांहीं प्रत्यक्ष संबंध नाहीं तरी तो साऱ्या विश्वाला आपणाकडे ओढीत आहे. एखाद्या मनुष्याचें चित्त सोन्याकडे सारखें ओढ घेतें असें आपण पाहतों. त्याच्या या क्रियेंतही त्याचें लक्ष्य पुरुषाकडेच वस्तुतः वेधलेलें असतें. त्या सोन्याच्या ठिकाणीं पुरुषाचें जें तेज त्याला दिसतें, त्याकडे त्याचें लक्ष्य लागलेलें असतें. हें तेज सोन्याच्या

जाड्यामुळें बहुतांशीं मलिन झालेलें असतें; तथापि एखाद्याचें चित्त आकर्षण करण्याइतकें सामर्थ्य त्याच्या अंगीं असतें. एखाद्याचें प्रेम आपल्या मुलांच्या ठिकाणीं अतिशय जडलेलें असतें; अथवा दुसरा कोणी आपल्या स्त्रीवर अत्यंत प्रेम करीत असतो. तथापि त्यांच्यांत प्रेमास योग्य अशी वस्तु कोणती ? ही वस्तु पुरुष हीच आहे. मुलें अथवा स्त्री या बाह्य जड आकारांच्या मागें जें पुरुषाचें तेज आहे तेंच चित्त वेधण्यास समर्थ असतें. जड वस्तूशीं तें मिसळलें गेलें असलें तरी चित्त वेधण्याची क्रिया करणारें तेंच. पुरुषाशिवाय दुसऱ्या कोणत्याही वस्तूच्या अंगीं असें सामर्थ्य नाहीं. या जड विश्वांत पुरुष हा एकटाच चिदानंदरूप आहे. त्यावांचून दुसरें कांहींही चिद्रूप नाहीं. सांख्यदर्शनकारांनीं वर्णिलेला पुरुष या प्रकारचा आहे. जेथें जेथें प्रकाश आहे तेथें तेथें तो पुरुषाचाच आहे. यावरून पुरुष हा सर्वव्यापी असला पाहिजे हें अगदीं उघड दिसतें. जें सर्वव्यापी नाहीं तें अंतवंत असलेंच पाहिजे. तें मर्यादित असलें पाहिजे. तें सर्वव्यापी नाहीं असें म्हणणें म्हणजे तें मर्यादित आहे असें म्हणण्यासारखेंच आहे; आणि जें मर्यादित आहे तें कारणापासून उत्पन्न झालेलें कार्य असलें पाहिजे. कार्य म्हटलें कीं त्याला केव्हांतरी आरंभ झाला असला पाहिजे. आणि आरंभ म्हटला कीं त्याचा सख्खा भाऊ शेवट तेथें आलाच. जन्म आणि मृत्यु, आरंभ आणि शेवट अशा प्रकारच्या जोड्या नेहमींच अभेद्य असतात. यांपैकीं एक जेथें जाईल तेथें दुसरा जावयाचाच. अशाच प्रकारच्या मर्यादित पदार्थांपैकीं पुरुष असेल तर तोही कोणत्यातरी कारणाचें कार्य असला पाहिजे; आणि तो कार्यरूप असेल तर त्यालाही आरंभ आणि शेवट हें द्वैत सुटणार नाहीं. त्याला केव्हांतरी आरंभ झाला असेल तर आज ना उद्यां त्याला मृत्यु गांठल्यावांचून राहणार नाहीं. तो मर्यादित असेल तर तो मुक्तावस्थेंत असूं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें तो सर्वांचा अंतिम हेतु अथवा आदिकारणही होऊं शकणार नाहीं. तो मर्यादित असेल तर तोही कशापासून तरी उत्पन्न झाला असला पाहिजे. यांपैकीं एकही प्रकार पुरुषाच्या ठिकाणीं घडून येत नाहीं; याकरितां तो सर्वव्यापी, अनादि आणि अनंत असाच असला पाहिजे. अशा प्रकारचे पुरुष अनेक आहेत असें श्रीकपिलांचें म्हणणें आहे. असा पुरुष एकच नसून ते असंख्य आहेत असें ते म्हणतात. तुम्हां आम्हांत

प्रत्येकीं एक पुरुष आहे. अशाच रीतीनें तो वस्तुमात्रांत आहे. अनंत वर्तुळें एकमेकांशीं संलग्न अशा स्थितींत असावीं त्याप्रमाणें अनेक पुरुष या साऱ्या विश्वांत भरून राहिले आहेत, असें सांख्यांचें मत आहे. पुरुष हा मन नाहीं अथवा जड पदार्थही नाहीं. आपल्या जाणिवेच्या मर्यादेंत जें कांहीं येऊं शकतें तें त्याचें परावर्तितरूप मात्र होय. तो सर्वव्यापी असल्यामुळें त्याला जन्ममृत्यु असणें शक्य नाहीं. प्रकृतीची छाया त्याजवर पडते आणि जन्म व मृत्यु हीं या छायेचींच रूपांतरें होत; पण त्यांचा लेप पुरुषास लागूं शकत नाहीं. तो स्वभावतःच अलेप्य आहे. सांख्यशास्त्राच्या मतांचें जें विवरण येथवर केलें त्यावरून त्याची विचारसरणी किती शुद्ध, गंभीर आणि विवेकपूर्ण आहे हें पाहून मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें.

आतां सांख्यशास्त्राच्या या मतांत विरोधी असा भाग कोणता आहे याचाही थोडक्यांत विचार करूं. आतांपर्यंत जें विवेचन केलें त्यांत या शास्त्राच्या विचारसरणींत नांव ठेवण्याजोगें स्थळ आढळत नाहीं. विवेचकबुद्धीस असंमत असें त्यानें कांहींच सांगितलें नाहीं. सूक्ष्मेंद्रियांचा त्यानें केलेला विचार परिपूर्ण आणि अभेद्य आहे. सूक्ष्मेंद्रियशास्त्राचे त्याचे सिद्धांत आपणास उलथून पाडतां येत नाहींत. गोलक आणि बाह्यसाधनें असे इंद्रियांचे दोन भाग सांख्यशास्त्रानें सांगितले आहेत, यावरूनच इंद्रियें स्वयंभू स्वरूपाचीं नसून तीं संघटित रूपाचीं आहेत असें सिद्ध होतें. त्याचप्रमाणें अहंकारांतही जाणीव आणि जड वस्तु असे दोन भाग आहेत. यामुळें तोही स्वयंभू नसून दोन वस्तूंचा संघात आहे हें आपल्या लक्ष्यांत येईलच. तसेंच महत् हें तत्त्वही आदिरूप नाहीं. महत् हें जड वस्तूचें सूक्ष्मरूप आहे. या सर्वांच्या पाठीमागें गेल्यानंतर पुरुषाचें दर्शन आपणास होतें. येथवर सांख्यशास्त्राविरुद्ध एकही आक्षेप आपणास घेतां येणें शक्य दिसत नाहीं; पण "प्रकृति कोणीं निर्माण केली" असा प्रश्न जर आपण सांख्यशास्त्राला विचारला तर पुरुष आणि प्रकृति हीं दोन्ही अनादि असून सर्वव्यापी आहेत असें उत्तर तें देईल. त्याचप्रमाणें पुरुष एकच नसून असंख्य आहेत असेंही तें म्हणेल. या उत्तरानें मात्र आमचें समाधान न होतां त्यावर आक्षेप घेतल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. अनंत अनेक असणें शक्य आहे काय, असा प्रश्न आमच्या मनांत उभा राहतो आणि अशी गोष्ट आमच्या विवे-

चकबुद्धीस शक्य दिसत नसल्यामुळें या एका बाबींत मात्र सांख्यमताशीं आमचा विरोध आहे. या प्रश्नांना अधिक चांगलें आणि समाधानकारक उत्तर आपण शोधूं लागलों म्हणजे आपण अद्वैतापर्यंत येऊन पोहोंचतों. प्रकृति आणि पुरुष हीं दोन अनंतरूपें कशीं असूं शकतील? या बाबींत सांख्यशास्त्र अपूर्ण राहिलें आहे असें म्हणणें आम्हांस भाग आहे. त्यांच्या या उत्तरानें आमचें पूर्ण समाधान होत नाहीं. येथपासून पुढें वेदान्तानें आपला मार्ग चांचपडत पुढें कसा काढला आणि सांख्यशास्त्रांत राहिलेलें न्यून त्यानें पूर्ण कसें केलें याचा विचार आपण पुढें मागें लवकरच करूं; पण वेदान्तानें हें शास्त्र पूर्णतेस नेलें असलें तरी पहिल्या मानाची जागा सांख्यशास्त्रालाच देणें भाग आहे. या मार्गांत सांख्यशास्त्रानें जी बिनमोल कामगिरी बजावली आहे, तिचें महत्त्व कमी होत नाहीं हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. इमारत एकदां पूर्ण झाली म्हणजे तीवर अखेरचा एखादा हात फिरवून ती अधिक शोभायमान करणें हें काम फारसें अवघड नाहीं.

---

## ५

# सांख्य आणि वेदान्त.

सांख्यशास्त्राच्या विचारसरणींत उणीव कोठें आहे आणि तिची पूर्तता वेदान्तानें कशी केली आहे याचा विचार आज आपण करणार आहों; पण या आजच्या विषयास आरंभ करण्यापूर्वी सांख्यशास्त्राच्या मुख्य मुद्यांचें पर्यालोचन थोडक्यांत करणें वावगें होणार नाहीं. प्रकृति ही या साऱ्या दृश्य विश्वाचें कारण आहे असें सांख्यशास्त्राचें मत असल्याचें तुमच्या लक्ष्यांत असेलच. विचार, बुद्धि, विवेचकबुद्धि, प्रेम, द्वेष, इत्यादि भावना आणि तसेंच स्पर्श, रूप, रस आणि जड वस्तु हीं प्रकृतींतून निर्माण झालेलीं आहेत असें सांख्य मत आहे. सृष्टींतील यच्चयावत् वस्तु प्रकृतींतून निर्माण झालेली आहे. ही प्रकृति त्रितत्त्वात्मक असून त्यांचीं नांवें सत्व, रज आणि तम अशीं आहेत. सत्व, रज आणि तम हीं तीन मूलतत्त्वें आहेत. हे तीन गुण

अथवा धर्म आहेत असें नाहीं. या तीन तत्त्वांतून सर्व विश्व निर्माण झालें आहे. कल्पारंभीं हीं तीन तत्त्वें साम्यावस्थेंत होतीं. त्यानंतर सृष्टि स्पष्टत्वास येण्यास आरंभ झाला तेव्हां या साम्यावस्थेंत बिघाड होऊन या तत्त्वांची सरमिसळ एकमेकांत होऊं लागली, आणि अशा रीतीनें हें सारें विश्व प्रतीत झालें. या स्पष्टावस्थेंत जें तत्त्व प्रथम निर्माण झालें त्याला महत् असें नांव सांख्यशास्त्रानें दिलें आहे. महत् म्हणजे बुद्धि. महत् या तत्त्वांतून जाणीव निर्माण झाली. जाणिवेंतून मनाची उत्पत्ति झाली, व तींतूनच इंद्रियेंही उद्भवलीं. पुढें तन्मात्रें झालीं. तन्मात्रें म्हणजे शब्दस्पर्शादिकांचे अणू. सर्व अणू जाणिवेंतूनच स्पष्टत्वास आले आहेत; आणि या अणूंच्या संघातानें सारें जड विश्व निर्माण झालें आहे. तन्मात्रांचें स्वरूप नेत्रांनीं दिसण्यासारखें नाहीं, अथवा आपणास त्यांना स्पर्शही करतां येत नाहीं; पण त्यांचें रूपांतर होऊन त्यांतून अणू बनले म्हणजे इंद्रियद्वारा त्यांचा अनुभव आपणास होऊं शकतो.

मन, बुद्धि आणि अहंकार अशा तीन प्रकारच्या स्वरूपांनीं युक्त असलेल्या चित्तापासून प्राणशक्तीची उत्पत्ति होते. प्राण म्हणजे श्वासोच्छ्वास या कल्पनेला आपल्या डोक्यांतून तुम्ही प्रथम हद्दपार करा. श्वासोच्छ्वास हा प्राणशक्तीचें एक दृश्य अथवा स्पष्ट स्वरूप मात्र आहे. ज्या चैतन्याच्या जोरावर सर्व शरिराची हालचाल होते आणि ज्याच्यायोगें सर्व अवयव एकसूत्रबद्ध होऊन आपापलीं कर्में योग्यपणें करतात, त्या चैतन्याची जी कार्यकारी शक्ति तिचें नांव प्राण. आदिशक्ति कार्यकारी होऊन शरिराची हालचाल करूं लागली म्हणजे तिला प्राण अशी संज्ञा प्राप्त होते. हीच शक्ति विचार या रूपानेंही प्रकट होते. सर्वांत अत्यंत स्पष्ट आणि महत्त्वाचें असें प्राणाचें रूप म्हटलें म्हणजे श्वासोच्छ्वास हें आहे. प्राणाचे संस्कार वायूवर घडून ही क्रिया सुरू होते. प्राणावर वायूची क्रिया होत नाहीं हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. श्वासोच्छ्वासांचें नियमन करणें ह्यास प्राणायाम असें म्हणतात. प्राणशक्तीच्या क्रिया ताब्यांत आणण्याकरितां प्राणायामाचा अभ्यास योगी करतात. केवळ श्वासोच्छ्वास ताब्यांत आणण्याकरितां अथवा फुप्फुसें बळकट करण्याकरितांच प्राणायाम करावयाचा नसून त्यांत अधिक उच्च हेतूकडे लक्ष्य ठेवलें पाहिजे. सर्व शरिराची क्रिया या प्राणांच्या आ-

धारानेंच चालते, आणि मन अथवा अंतरिंद्रियें प्राणांवर क्रिया करीत असतात. येथवर सांख्यशास्त्रानें केलेलें वर्णन सर्वस्वी सयुक्तिक आहे. येथवर सूक्ष्मेंद्रियांच्या ज्या क्रिया सांख्यशास्त्रानें वर्णन केल्या आहेत, त्या अगदीं विवेचकबुद्धीस अनुसरून असून तर्कशास्त्रासही संमत अशा आहेत. या बाबींत सांख्यशास्त्रानें कसल्याही प्रकारचा बोबडेपणा ठेवला नसून सर्व विवेचन अगदीं मुद्देसूद आणि रेंखींव असें केलें आहे. सांख्यशास्त्र हें जगांतलें प्राचीनतम सूक्ष्मेंद्रियशास्त्र आहे ही गोष्ट मनांत आली म्हणजे साहजिकपणें आपण आश्चर्यानें थक्क होऊन जातों. तत्त्वज्ञानाचा अथवा बुद्धिवादाचा उगम जगांत जेथें जेथें झाला आहे, तेथें तेथें श्रीकपिलांचें शास्त्र अंशतः तरी दृष्टीस पडल्यावांचून राहावयाचें नाहीं. जगांतील प्रत्येक पंडित या दृष्टीनें कपिलांचा ऋणी आहे. पायथागोरासनें या ज्ञानाचा अभ्यास हिंदुस्थानांत केला आणि त्याचा फैलाव त्यानें ग्रीस देशांत केला. यानंतर याच ज्ञानाचा अंश प्लेटोला प्राप्त झाला. पुढें ईश्वरवाद्यांनीं हें ज्ञान आलेक्झांड्रियांत नेलें; आणि अलेक्झांड्रियांतून त्याचा प्रसार युरोपांत झाला. अशा रीतीनें तत्त्वविचार जेथें जेथें प्रचलित झाला आहे, तेथें तेथें या आदिदर्शनकाराचें ऋण आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

कपिलकृत दर्शनाचा जो विचार आपण येथवर केला, त्यावरून त्यांचें शास्त्र सुसंगत आहे असें म्हणावयास हरकत नाहीं; पण आतां यापुढें मात्र त्यांच्याशीं आपला मतभेद होणार आहे. याच विचारसरणीच्या मार्गानें आपण पुढें पाऊल टाकूं लागलों म्हणजे आपल्या मतभेदास सुरवात होणार आहे. श्रीकपिलांच्या दर्शनाचा मुख्य पाया म्हटला म्हणजे उत्क्रांति हा आहे. एका पदार्थाचें उत्क्रमण होऊन त्यांतून दुसरा पदार्थ निर्माण होतो, या मूलभूत सिद्धांताच्या पायावर आपल्या शास्त्राची उभारणी कपिलांनीं केली आहे. 'कारण' या शब्दाची जी व्याख्या त्यांनीं केली आहे, तीवरून सुद्धां माझ्या या म्हणण्याचें प्रत्यंतर आपणांस दिसेल. ते म्हणतात "कारण म्हणजे जें रूपांतरानें आकार बदलून कार्यरूप घेतें तें." विश्वरचनेचें जें वर्णन त्यांनीं केलें आहे त्यावरूनही याच म्हणण्याला पुष्टि मिळते. एकाच वस्तूचीं रूपांतरें होत होत सारें विश्व स्पष्टत्वास कसें आलें, याचा विचार आपण पूर्वीं केलाच आहे तो ध्यानांत आणा. आपल्यासमोर आपणास माती दिसत असते.

याच मातीला निराळा आकार आला म्हणजे तिलाच आपण मडकें म्हणूं लागतों. या उदाहरणांत माती हें कारण आणि मडकें हें त्या कारणाचें कार्य झालें. येथें कारणच रूपांतरानें कार्य झालें ही गोष्ट आपल्या लक्ष्यांत आली असेलच. कारण आणि कार्य यांच्या व्याख्या याहून वेगळया रीतीनें करणें आपणास शक्यच नाहीं. अशाच रीतीनें मूळ प्रकृतीचीं रूपांतरें होत होत तींतून सारें विश्व निर्माण झालें आहे. आतां ज्या अर्थी कारण आणि कार्य हीं मूलतः एकरूप असतात, त्या अर्थीं विश्व आणि प्रकृति यांच्यांतही वास्तविक कोणताच भेद असण्याचें कारण नाहीं. अव्यक्त प्रकृतीपासून तों विचार अथवा मन येथपर्यंत जीं अनेक रूपें आहेत, त्यांत खरा भोक्ता अथवा प्रकाशक या स्वरूपाचें एकही रूप नाहीं. ज्याप्रमाणें मातीचा गोळा शुद्ध जडरूप आहे त्याचप्रमाणें मनही जडरूपच आहे. केवळ या स्वरूपाचा विचार करतां त्यांत प्रकाश आढळत नाहीं. तें सूक्ष्म असलें तरी जड आहे. तें स्वयंप्रकाश अथवा प्रकाशक नाहीं. असें आहे तथापि तें विचार करतें आणि प्रत्येक वस्तूचा तारतम्य भाव तें शोधीत असतें असाही अनुभव आपणास आहेच. जर तें केवळ जडरूप असेल तर तें विचार करूं शकणार नाहीं. याकरितां महत् आणि अस्मिता अथवा जाणीव इत्यादिकांच्या द्वारें त्याच्यांतून जिचा प्रकाश प्रकाशतो अशी कांहीं वस्तु असली पाहिजे हें उघड आहे. आणि याच वस्तूला कपिलांनीं पुरुष अशी संज्ञा दिली आहे. यालाच वेदान्त 'आत्मा' या नांवानें ओळखतो. पुरुष ही स्वयमेव वस्तु आहे. कोणत्याही दोन अथवा अधिक पदार्थांच्या मिश्रणानें ती निर्माण झाली नाहीं असें कपिल सांगतात. पुरुष जडरूप नाहीं. अजड वस्तु कांहीं असेल तर ती पुरुषच होय. त्याच्याशिवाय बाकीचें वस्तुजात जड आहे. माझ्यासमोर हा काळा फळा आहे. हा फळा मी पाहतों. ही पाहण्याची क्रिया कशी घडते ? प्रथम माझे बाह्यडोळे कांहीं आकाराची जाणीव अंतरिंद्रियांकडे आणतात. अंतरिंद्रियांतून तिची रवानगी मनाकडे होते. या मनावर त्या आकाराचा ठसा उमटतो. हा ठसा मन बुद्धीकडे पाठवितें. बुद्धि झाली तरी तिला स्वयंस्फूर्ति नाहीं. तिला स्फूर्ति देण्याचें कार्य तिच्यामागें असलेला पुरुष करतो. या साऱ्या वस्तू जणूं काय पुरुषाचे नोकर आहेत. बाहेरून आलेलें गांठोडें मालकाकडे नेऊन पोहोंचवावें इतकेंच या चाकरांचें काम आहे. अशा रीतीनें

एखादें गांठोडें येऊन पडलें म्हणजे त्याची वासलात लावण्याचें काम मालक करतो. त्यासंबंधीं कांहीं फर्मानें सोडावयाचीं असलीं, अथवा त्या गांठोड्यांतील कांहीं वस्तूंचा उपभोग घ्यावयाचा असला तर हीं कामें मालक करतो. गांठोडें येण्याच्या या बाह्यक्रियेला प्रतिक्रिया करण्याचें काम मालकाचें आहे. याकरितांच याला द्रष्टा, भर्ता, भोक्ता इत्यादि नांवें श्रीकपिलांनीं दिलीं आहेत. हा द्रष्टा सत्यपदीं आरूढ झालेला राजाच होय. याचें स्वरूप मात्र अजड आहे. जाड्याचा अंशही त्याच्या ठिकाणीं नाहीं. सद्रूप वस्तु म्हटली तर एवढीच. तो सद्रूप आणि अजड आहे म्हणूनच तो अनंत आणि सर्वव्यापी असला पाहिजे. ज्या अर्थीं तो स्वयंभू आहे, त्या अर्थीं दुसऱ्या कोणत्याही पदार्थानें तो मर्यादित होणें शक्य नाहीं. कपिलांच्या मताप्रमाणें प्रत्येक पुरुष अशा रीतीनें अमर्याद आहे. प्रत्येक पुरुष सर्वव्यापी आहे. आपणांपैकीं प्रत्येक सर्वव्यापी आहे; पण आपल्या क्रिया घडावयाच्या त्या मात्र लिंगदेहानें मर्यादित आहेत. लिंगदेहावांचून आपल्या क्रिया घडावयाच्या नाहींत. मन, बुद्धि, अहंकार आणि अंतरिंद्रियें इतकीं मिळून लिंगदेह बनतो. याच शरिराला मोक्ष मिळावयाचा असतो, अथवा याच देहाला यमयातनांची प्राप्ति व्हावयाची असते. याच देहाला स्वर्गवास मिळून देवाचा जन्म येतो अथवा हाच देह अधःपतनानें पशुयोनीस जातो. मनुष्ययोनींत पुनःपुन्हा जन्म घेणारा देह हाच. पुरुषाला जन्म नाहीं आणि मृत्युही नाहीं, याचा विचार आपण केलाच आहे. पुरुष कोठें जात नाहीं आणि कोठून येतही नाहीं. हालचाल अथवा गति म्हणजे एका स्थलाहून दुसऱ्या स्थलीं जाणें. पुरुष अशा रीतीनें एका जाग्यांतून दुसऱ्या जागीं जात येत असेल तर तो सर्वव्यापी होऊं शकणार नाहीं; तसेंच तो अमर्यादही असूं शकणार नाहीं; आणि पुरुष सर्वव्यापी व अमर्याद आहे हें आपण पूर्वीं पाहिलेंच आहे. याकरितां त्याला गमनागमन आणि जन्ममरण असणें शक्य नाहीं.

पुरुष सर्वव्यापी आहे, तो अमर्याद आहे, अनंत आहे आणि तोच एक स्वयंभू वस्तु आहे असें येथवर झालेल्या विवेचनावरून कपिलांचें मत असल्याचें तुमच्या लक्ष्यांत आलें असेलच. पुरुष ही एकच वस्तु प्रकृतीच्या मर्यादेबाहेरची आहे, पण बाह्यतः ती प्रकृतिबद्ध असल्यासारखें दिसतें हेंही कपि-

लांचें म्हणणें समजलें असेल. पुरुषाच्या आजूबाजूला प्रकृति आहे आणि प्रकृतीचें पांघरूण स्वतःवर घेऊन पुरुष प्रकृतिरूप झाला आहे. आपण स्वतंत्र नसून प्रकृतिबद्ध आहों असें तो मानतो आणि "मी लिंग शरीर आहें, मी जड देह आहें" असें म्हणूं लागतो; आणि याच भ्रामकदृष्टीनें तो सुखदुःखांचा उपभोक्ता होतो. वस्तुतः सुखदुःखांचा लेप त्याला लागूं शकत नाहीं. सुखदुःखें या फक्त लिंग देहाच्या उपाधी आहेत. त्यांचा संबंध पुरुषाशीं यत्किंचितही येत नाहीं.

समाधि ही अत्युच्च स्थिति आहे असें योग्यांचें म्हणणें आहे. समाधि म्हणजे पूर्ण समतोलपणाची स्थिति. हींत क्रिया प्रतिक्रिया नाहीं; अथवा हींत अक्रियताही नाहीं. अक्रियता म्हणजे "मी क्रिया करीत नाहीं" अशी जाणीव. अशा स्थितींत पुरुषाच्या अत्यंत संनिध आपण असतों. पुरुष सुखदुःखातीत आहे. सुख अथवा दुःख इत्यादि सर्व विकारांचा तो द्रष्टा अथवा साक्षी आहे. सर्व कर्मांचा तो निरंतर साक्षी आहे. त्याच्यासमोर घडत नाहीं असें एकही कर्म नाहीं. तथापि असें असतांही कर्मफलापासून तो अलिप्त आहे. कोणत्याही कर्माचें सुखरूप अथवा दुःखरूप फल तो घेत नाहीं. प्रत्येकाच्या डोळ्यांतील प्रकाशदाता सूर्य आहे; तथापि डोळ्यांतील कोणत्याही दोषांपासून तो अलिप्त असतो. एखाद्या स्फटिक मण्याच्या मागें तांबड्या अथवा निळ्या रंगाचें फूल ठेवलें तर तो स्फटिक तांबड्या अथवा निळ्या रंगाचा आहे असा भास होतो; तथापि त्या रंगाचा लेप वस्तुतः त्याला लागलेला नसतो. याच रीतीनें आत्मा अथवा पुरुष कर्माकर्मरहित असतो. तो कर्ता आहे असें म्हणतां येत नाहीं; अथवा तो अकर्ता आहे असेंही म्हणतां येत नाहीं. तो कर्माकर्मातीत आहे. या दोहोंच्याही पलीकडचा तो आहे. तो समाधिरूप आहे असें म्हटल्यास तें त्याचें वर्णन बऱ्याच अंशीं युक्त होईल. सांख्यशास्त्राचें थोडक्यांत स्वरूप या प्रकारचें आहे.

प्रकृतीनें जीं हीं इतकीं अनंतरूपें धारण करण्याची खटपट केली ती कां, असा एक प्रश्न येथें उपस्थित होण्याचा संभव आहे. इतकीं रूपें धारण करण्यांत प्रकृतीचा हेतु काय? या प्रश्नाला 'पुरुषासाठीं' असें उत्तर सांख्यशास्त्रानें दिलें आहे. ज्या अनेक घडामोडी विश्वांत चालू आहेत त्या स्वतःसाठीं प्रकृति करीत नसून तिसऱ्याचसाठीं त्या चालू आहेत. क्रिया आणि

प्रतिक्रिया यांच्यायोगें पदार्थांच्या परमाणूंत अदलाबदल एकसारखी सुरू आहे. या अदलाबदलीमुळेंच सृष्टि आकाराला आली आहे. ही अविरत घडामोड पुरुषाच्या भोगासाठीं चालू आहे. सृष्टीचे भोग त्यानें भोगावे, तिजपासून काय शिकावयाचें असेल तें त्यानें शिकावें आणि मुक्त व्हावें. याकरितांच प्रकृतीनें एवढा खेळ मांडला आहे. अगदीं क्षुद्रसृष्टीपासून तों थेट देवादि योनीपर्यंत इतकीं सोंगें नटविण्याचें काम प्रकृति करीत आहे यांतील मुख्य हेतु हाच कीं, या साऱ्या वस्तूंचा अनुभव पुरुषाला व्हावा. असा अनुभव त्यानें घेतला म्हणजे आपण प्रकृतीच्या मर्यादेंत केव्हांच नव्हतों ही खूणगांठ त्याला पटते. प्रकृतीपासून आपण सदोदित निराळे होतों आणि तिचा व आपला कोणताच संबंध नव्हता असें त्याला आढळून येतें. त्याचप्रमाणें आपणांत कसलीच घडामोड होत नसून आपण स्वतः अविनाशी आहों हेंही त्याला कळूं लागतें. आपण स्वतः कोठून येत नाहीं अथवा कोठें जात नाहीं असा अनुभव त्याला येतो. मरून स्वर्गाला जावें आणि क्षीणपुण्य होऊन पुन्हां मृत्युलोकांत जन्म घ्यावा या घडामोडी प्रकृतीच्या असून आपल्या नव्हत्या असें तो पाहतो. अशा रीतीनें पुरुष मुक्त होतो. प्रकृतीनें एवढें मोठें नाटक कां रचलें, या प्रश्नाचें थोडक्यांत उत्तर "पुरुषविमोक्षहेतोः" असें सांख्यशास्त्रानें दिलें आहे. सृष्टींतील अनंत घडामोडी या एकाच हेतूला धरून चालू आहेत. आपलें अखेरचें साध्य सिद्ध व्हावें याकरितांच हे सारे अनुभव पुरुष घेत असतो, आणि हें अखेरचें साध्य म्हणजे मुक्ति हेंच होय. सांख्यतत्त्वज्ञांच्या मताप्रमाणें पुरुष अनंत आहेत. विश्वाचा उत्पन्नकर्ता अशा स्वरूपाचा कोणी परमेश्वर म्हणून अस्तित्वांत नाहीं असाही श्रीकपिलांचा सिद्धांत आहे. विश्वांत ज्या अनेक घडामोडी प्रत्यहीं अनुभवास येतात त्या साऱ्या घडवून आणण्यास प्रकृति एकटीच समर्थ आहे, यामुळें आणखी एखादा परमेश्वर म्हणून कोणी आहे व तो सृष्टि उत्पन्न करतो असें मानण्याचें कारण नाहीं असेंही कपिलांचें म्हणणें आहे. तुमच्या साऱ्या प्रश्नांची योग्य वासलात लावण्यास प्रकृति समर्थ आहे असें सिद्ध झाल्यावर निराळ्या परमेश्वराची आवश्यकता कोठें राहिली ?

येथवर सांख्यशास्त्राचें मत ग्रहण करून वेदान्तानें आपला पुढील मार्ग आक्रमण्यास सुरवात केली आहे. पुरुष अथवा आत्मा हा सत्, चित् आणि

आनंद आहे असें वेदान्ताचें मत आहे. तथापि सत्, चित् आणि आनंद हे तीन गुण आहेत असें मात्र नव्हे. आत्मा वेगळा आणि हें गुणत्रय वेगळें असें समजूं नये. तर या गुणत्रयाचा जो एकरूप समुच्चय तोच आत्मा. हे गुण त्यापासून वेगळे काढतां येत नाहींत, आणि हे गुणही स्वतः अविभाज्य आहेत—तेही परस्परांपासून भिन्न करतां येत नाहींत. बुद्धि ही प्रकृतींतून उत्पन्न झालेली वस्तु आहे हें सांख्यांचें म्हणणें वेदान्ताला मान्य आहे. यामुळें तिचा संबंध पुरुषाशीं नसून प्रकृतीशीं आहे हें सांख्यमतही त्याला मान्य आहे हें वेगळें सांगावयास नकोच. त्याचप्रमाणें बुद्धि हा स्वयंभू पदार्थ नसून तो मिश्रणानें झाला आहे हेंही मत वेदांताला मान्य आहे. उदाहरणार्थ आपणास संवेदनांची जाणीव कशी होते हें पहा. माझ्यासमोर एखादा फळा मी पाहतों. हें ज्ञान मला कोणत्या रीतीनें होतें? या फळ्याचें स्वयंभू स्वरूप काय आहे, हें मला माहीत नाहीं. त्याचें ज्ञान मला होत नाहीं. किंबहुना, असें ज्ञान कधीं काळीं मला होणें ही गोष्टच शक्य नाहीं. रस्त्यांत एखादी शिंपली पडलेली असते आणि मी तो रुप्याचा तुकडा पडला आहे असें म्हणतों. माझ्या डोळ्यांनीं मला तें रुपें दिसत असतें. म्हणजे वास्तविक वस्तु आहे ती न पाहतां मी निराळेंच स्वरूप पाहत असतों आणि हा भ्रम शिल्लक असेपर्यंत तें रुपेंच आहे अशी माझी बालंबाल खात्री असते. अशाच रीतीनें मला जो फळा म्हणून दिसत असतो ती वस्तु वास्तविकपणें काय आहे हें मला ठाऊक नाहीं. ती अज्ञात वस्तु 'क्ष' आहे असें आपण समजूं. बाह्यतः फळा म्हणून मला दिसणाऱ्या या वस्तूचें जें खरें पण मला अज्ञात रूप आहे त्याला आपण 'क्ष' असें नांव देऊं. या 'क्ष' रूपाचे किरण माझ्या मनावर येऊन आदळतात, आणि मनाकडून या क्रियेला प्रतिक्रियेच्या रूपानें उत्तर मिळतें. मन हें तळ्यासारखें आहे. एखाद्या तळ्यांत आपण दगड टाकला तर या आपल्या क्रियेला तळ्याकडून लाटांच्या रूपानें प्रतिक्रिया होते. या लाटांचें स्वरूप दगडासारखें नसतें. दगड आणि लाट यांत कोणत्याही प्रकारचें स्वरूपसाम्य नसतें. दगड तो दगड आणि लाट ती लाट. या उदाहरणांत आपण घेतलेला दगड म्हणजे तो फळा असें समजा. हा फळारूपी दगड मनोरूपी तळ्यांत आदळतो आणि मनाकडून लाटेच्या रूपानें प्रतिक्रिया घडते. ही प्रतिक्रिया आपण पाहतों आणि तिला फळा असें

नांव देतों. वस्तुतः मूळ क्रियेचें खरें स्वरूप काय तें आपणास केव्हांच समजत नाहीं. तें समजणें आपणास शक्यच नाहीं. फक्त प्रतिक्रिया आपल्या जाणिवेंत येते आणि आपण तिला विशिष्ट नांव देऊन त्याचा आरोप मूळ क्रिया करणाऱ्या पदार्थावर करीत असतों. मी तुम्हांला पाहतों. तुमचें वास्तविक स्वरूप काय हें मला ठाऊक नाहीं, आणि तें कळणें शक्यही नाहीं. तुमचें निश्चित स्वरूप काय ? या प्रश्नाला शास्त्रीय उत्तर म्हटलें म्हणजे 'क्ष' हेंच. हा अज्ञात आणि अज्ञेय 'क्ष' माझ्या मनावर आदळतो आणि आपल्या बाजूनें मनही प्रतिक्रियेची लाट मूळ क्रिया करणाऱ्या पदार्थाकडे पाठवितें. प्रतिक्रियेची ही लाट मूळ पदार्थापर्यंत जाऊन थडकली म्हणजे ती माझ्या दृष्टिपथांत येते आणि तिला हे अमुक राजश्री, या अमूक बाईसाहेब अशीं नांवें मी देतों. 'मी पाहतों' या एका क्रियेंत वस्तुतः दोन क्रियांचा अंतर्भाव झालेला असतो. एक बाहेरून घडलेली क्रिया आणि दुसरी आंतून म्हणजे मनाकडून घडलेली प्रतिक्रिया. बाहेरील पदार्थ 'क्ष+मन' मिळून आपलें बाह्यविश्व निर्माण झालें आहे. आपणास प्रत्येक पदार्थाचें ज्ञान अशाच रीतीनें झालेलें आहे. प्रत्येक प्रकारच्या ज्ञानांत प्रतिक्रिया ही आहेच. किंबहुना, मनाकडून झालेली प्रतिक्रिया हेंच ज्ञान. प्रतिक्रियेच्या अभावीं ज्ञान होणेंही शक्य नाहीं. देवमाशाच्या शेंपटावर जोराचा तडाखा दिला म्हणजे ही बाह्य संवेदना मनापर्यंत पोंहोंचून तेथून दुःखाच्या रूपानें प्रतिक्रिया होते. येथें मूळ क्रिया आणि मनाची प्रतिक्रिया यांत वेळाचें अंतर किती पडतें हेंही शोधकांनीं निश्चित करून ठेवलें आहे. क्रिया आणि प्रतिक्रिया यांचा हा नियम केवळ बाह्यसृष्टीपुरता मात्र लागू आहे असें नाहीं; तर अंतःसृष्टीलाही हा नियम लागू आहे. माझें अंतःस्वरूप वास्तविक काय आहे हें मला अज्ञात आहे आणि अज्ञेयही आहे. या अंतःस्वरूपाला आपण 'य' म्हणूं. 'मी अमुक' असा निश्चय मी करीत असतों त्या वेळीं त्या ज्ञानाचें स्वरूप शास्त्रीय दृष्ट्या 'य+मन' असें असतें. हा 'य' माझ्या मनावर आदळतो आणि जी प्रतिक्रिया मनाकडून होते तिच्या स्वरूपाचा आरोप या 'य' वर करून 'मी अमुक' असा निश्चय मी करीत असतों. अशा रीतीनें सारी बाह्यसृष्टि ही 'क्ष+मन' असून सारी अंतःसृष्टि 'य+मन' अशी आहे. यांतील 'क्ष' आणि 'य' या वस्तू स्वयंभू स्वरूपाच्या असून 'क्ष' ही वस्तु बाह्यसृष्टीच्या मागें व 'य' ही अंतःसृष्टीच्या मागें आहे.

माझ्या ठिकाणीं जाणीव म्हणून जें कांहीं आहे तें तीन प्रकारच्या स्वरूपाचें आहे असें वेदान्ताचें मत आहे. हीं तीन रूपें सत्, चित् आणि आनंद हीं होत. मला कशाचीही गरज नाहीं, मी शांत आहें, स्वस्थ आहें, माझ्या शांतीचा भंग कोणीही करूं शकत नाहीं अशा प्रकारचे कल्पनातरंग आपल्या चित्तांत कधीं-मधीं वावरतांना आढळतात. अशा प्रकारची 'मी गरजेच्या पलीकडचा आहें' ही भावनाच आपल्या जीवनाचा पाया आहे. आपल्या साऱ्या जीवनाचा मध्यवर्ती बिंदु हाच असून याभोंवतीं आपल्या एकंदर जीवनक्रमाचें रहाटगाडगें चालू आहे. ही भावना मर्यादित झाली म्हणजे इतर वस्तूंशीं ती मिश्र होते आणि अमूर्तांतून मूर्तरूपाला येते. सत्, चित् आणि आनंद ही त्रिविध भावना मूळ अरूप असते आणि तीच पुढें प्रत्यक्षत्वास येते. हीच भावना अस्तित्वरूप, ज्ञानरूप आणि प्रेमरूप धारण करते. प्रत्येकाला अस्तित्व आहे. सत् या अव्यक्त स्वरूपाचें हें व्यक्तरूप आहे. प्रत्येकाला ज्ञान आहे. चित् या अव्यक्त रूपाचें ज्ञान व्यक्तरूप आहे. त्याचप्रमाणें प्रत्येकाच्या ठिकाणीं प्रेम आहे. हें आनंदरूपाचें व्यक्तरूप होय. ज्याच्या अंतःकरणांत प्रेमाचा लेश नाहीं असा प्राणी तुम्हांस आढळावयाचा नाहीं. तें व्यक्तरूपानें दिसण्याचे मार्ग आणि परिस्थिति हीं भिन्न असतील; तथापि प्रेमशून्य असा प्राणी एकही नाहीं. कोठें तरी तें व्यक्त करण्यावांचून त्याला गत्यंतरच नाहीं. अत्यंत क्षुद्र कीटकापासून तों थेट देवाधिदेवापर्यंत प्रेमाची व्याप्ति सर्वत्र आहे. अंतःसृष्टीच्या ज्या स्वयंभू रूपाला 'य' ही संज्ञा आपण दिली होती त्यालाच सच्चिदानंद अशी संज्ञा वेदान्तानें दिली आहे; आणि याच मूळरूपाशीं मनाचें मिश्रण झालें म्हणजे तें अस्तित्व ज्ञान आणि प्रेम या रूपानें दिसूं लागतें. मूळचें सच्चिदानंद रूप अमर्याद आणि स्वयंभू आहे. कोणत्याही दोन पदार्थांच्या मिश्रणानें तें बनलेलें नाहीं. त्याचप्रमाणें त्या रूपांत कधीं बदलही होत नाहीं. तें स्वयमेव असल्यामुळें दुसऱ्या पदार्थाची क्रिया त्याजवर घडूं शकत नाहीं. आत्मरूप तें हेंच. हेंच आत्मरूप मनाशीं मिश्र झालें कीं तें मर्यादित होऊन त्यालाच आपण व्यक्ति असें म्हणतों. हेंच रूप सृष्टींत अनेक रूपांनीं व्यक्तदशेला आलेलें असतें. कोठें झाडझुडुप या रूपानें तर दुसऱ्या कोठें कीटकाच्या रूपानें आणि तिसऱ्या ठिकाणीं मनुष्याच्या रूपानें हेंच आत्मरूप व्यक्तपणास येतें. ज्याप्रमाणें हें महदाकाश कोठें घटाच्या तर

कोठें मठाच्या उपाधीमुळें मर्यादित होऊन घटाकाश, मठाकाश, इत्यादि अनेक आकाशांस जन्म देतें, त्याचप्रमाणें आत्मरूप निरनिराळया देहांच्या उपाधीनें अनेकविध भासूं लागून स्वतःस कोठें झाड तर कोठें कीटक आणि कोठें मनुष्य म्हणवूं लागतें. ज्ञानाचें जें रूप व्यवहारांत आपणांस दिसतें तें त्याचें खरें अथवा मूलरूप नव्हे. अंतर्ज्ञान हें ज्ञानाचें मूलरूप नव्हे. त्याचप्रमाणें उपजतबुद्धि अथवा विवेचकबुद्धि हेंही ज्ञानाचें मूलरूप नव्हे. हें मूलरूप स्वपदभ्रष्ट होऊन दुसऱ्या कोणत्या तरी पदार्थांशीं मिश्र झालें म्हणजे त्याला अंतर्ज्ञान असें आपण म्हणूं लागतों. हीच त्याची भ्रष्टता अधिक वाढली म्हणजे तेंच विवेचकबुद्धि हें नांव घेतें आणि येथूनही तें अधिक खालीं गेलें म्हणजे तेंच उपजतबुद्धि या संज्ञेस पात्र होतें. त्या मूलस्वरूपाच्या ज्ञानाला 'विज्ञान' अशी संज्ञा वेदान्तानें दिली आहे. विज्ञान म्हणजे उपजतबुद्धि नव्हे आणि अंतर्ज्ञानही नव्हे. विज्ञान या शब्दाचा अधिक खुलासा करावयाचाच असला तर सर्वज्ञता या शब्दानें बरेंचसें काम होईल. विज्ञानाला मर्यादा नाहीं. त्याची गति अमुक ठिकाणापर्यंतच आहे आणि त्यापलीकडे ती नाहीं असें नाहीं. त्याचप्रमाणें त्यांत कशाचें मिश्रणही नाहीं. तें स्वयंभू आहे. आनंद हें रूपही अशाच प्रकारचें आहे. मूळचें आनंदरूप मिश्र आणि मर्यादित झालें म्हणजे आपण त्याला प्रेम असें म्हणतों. अव्यक्त आणि अमर्याद आनंद एकाच देहाशीं, एकाच मनाशीं अथवा विशिष्ट कल्पनांशीं संयोग पावला म्हणजे त्या त्या उपाधींनीं तो मर्यादित व मिश्ररूप होऊन व्यक्त दशेला येतो आणि त्याच्या या स्वरूपांत आपण त्याला प्रेम या नांवानें ओळखतों. मूळ आनंदरूपाचें हें भ्रष्ट रूप मात्र आहे. सत्, चित् आणि आनंद हे आत्म्याचे गुण नव्हत हें अगोदर सांगितलेंच आहे. आत्मा आणि सच्चिदानंद हीं दोन एकरूपच आहेत. हे दोन पदार्थ अविभाज्य आहेत. या दोहोंत कोणत्याही प्रकारचा स्वरूपभेद नाहीं. सत्, चित् आणि आनंद मिळून आत्मा होतो असें म्हणा अथवा आत्म्यांतून सत्, चित् आणि आनंद निघतात असें म्हणा. मुद्दा इतकाच कीं या दोहोंत गुणधर्ममूलक अथवा परिमाणमूलक असा कोणत्याही प्रकारचा भेद नाहीं. मूळ वस्तु एकच असून आपण त्रिविध प्रकारांनीं ती एकच वस्तु पाहत असतों. सच्चिदानंद हें रूप अपरोक्ष आहे. तें सापेक्ष ज्ञानापलीकडचें रूप आहे. तेंच अनंत अपरोक्ष

ज्ञान मनुष्याच्या मेंदूच्या उपाधींत सांपडलें म्हणजे अंतर्ज्ञान, विवेचकबुद्धि, उपजतबुद्धि इत्यादि रूपानें प्रकट होतें. उपाधिभेदानें त्याच्यांत कमी अधिकपणाचा प्रत्यय येतो. उपाधि ज्या मानानें जड, अथवा सूक्ष्म असेल त्या मानानें तेंही जड अथवा सूक्ष्म भासूं लागतें. आत्मा या मूलरूपानें पाहतां त्यांत कोणताही कमी अधिकपणा नाहीं अथवा त्यांत कसला भेदही नाहीं. आत्मा या रूपानें अत्यंत हीन स्वरूपाचा पशु आणि अत्यंत श्रेष्ठ मनुष्य यांत कसलाच भेद नाहीं. आपणांस फरक म्हणून जो भासतो त्यांतील मुद्दा इतकाच कीं पशूच्या मेंदूची वाढ चांगली झाली नसल्यामुळें त्याच्यांतून हा प्रकाश हीन रूपानें प्रकट होतो; आणि याच हीन रूपाला आपण उपजतबुद्धि असें नांव देतों. मूळ प्रकाश अत्यंत उज्ज्वल असतांही ज्या भिंगाच्या द्वारें तो प्रकट होतो तें भिंग अत्यंत मलिन असल्यामुळें प्रकाशाच्या प्रकटीकरणास पुरेसा वाव मिळत नाहीं. यामुळें तो हीन भासतो. मनुष्याचा मेंदू याहून फार श्रेष्ठ प्रतीचा आहे. यामुळें त्यांतून हाच प्रकाश अधिक उज्ज्वल स्वरूपानें बाहेर पडतो. सामान्यप्रतीच्या मनुष्यांत हाच प्रकाश सामान्य उज्ज्वल दिसतो आणि अत्युच्च प्रतीच्या मनुष्यांत तोच संपूर्ण तेजानें प्रकाशत असतो. दोहोंतील मूळ प्रकाश एकच असून उपाधिभेदानें त्यांत कमी अधिकपणा दिसतो.

सत् म्हणजे अस्तित्व; यालाही हाच नियम लागू आहे. सत् हा आत्म्याचा मूलस्वभाव आहे. त्याला मर्यादा नाहीं. आपल्याला अस्तित्व म्हणून जें दिसतें तें आकुंचित अथवा मर्यादित असून याच अमर्याद सद्रूपाचें तें प्रतिबिंब आहे. अशा रीतीनें सत्, चित् आणि आनंद हीं तीन रूपें व्यक्तदशेला येतांना मर्यादित होतात. व्यक्तदशा आणि मर्यादा या दोन वस्तू परस्परांशीं पक्कया बांधलेल्या आहेत. व्यक्तदशा आणि मर्यादा यांना सुरवात एकाच वेळीं होते. कोणतेंही अव्यक्त रूप व्यक्तदशेला येऊं लागलें कीं त्याभोंवतीं मर्यादेची भिंत उभारली जाते; पण व्यक्तदशेंत अनुभवास येणारी मर्यादा मूल रूपाला लागू नसते. मूल रूप स्वयंभू, अमिश्र आणि अमर्याद असतें. आनंदरूप अमर्याद आहे; परंतु प्रेमाला मर्यादा आहे. एके दिवशीं तुम्हांवर मी प्रेम करतों आणि दुसऱ्याच दिवशीं तुमचा द्वेषही मी करूं लागतों. ज्या प्रेमांत अशा रीतीनें खंड पडूं शकतो तें प्रेम अनंत आहे काय? एखादे

दिवशीं माझ्या प्रेमाला भरती येते तर दुसऱ्या दिवशीं ओहोटीस सुरवात होते. या भरतीओहोटीचें कारण हेंच कीं प्रेम स्वयंभू नाहीं. तें मर्यादित, मिश्र आणि उपाधिबद्ध रूप आहे. यामुळें उपाधींत कमीअधिकपणा झाला कीं त्यालाही ओहोटी लागते अथवा भरती येते हें रास्तच आहे.

श्रीकपिलांच्या विचारसरणींत आमच्या दृष्टीनें आक्षेपार्ह असा जो पहिला मुद्दा आहे तो त्यांची ईश्वरविषयक कल्पना हा होय. कपिलांस ईश्वराचें अस्तित्व मान्य नाहीं. आतां येथें काय घोंटाळा उपस्थित होतो पहा ! व्यष्टिरूप व्यक्तींत प्रकृतीचीं बुद्ध्यादि रूपें असून अखेरीस जडदेह असतो आणि या सर्वांच्या मागें पुरुष असतो. हा पुरुष या सर्वांचें अधिष्ठान असून त्यांचा शास्ताही तोच असतो. त्याचप्रमाणें समष्टिरूप विश्वांतही समष्टिरूप बुद्धि अथवा महत् हें तत्त्व असून त्याच्या रूपांतराच्या द्वारें समष्टिरूप अहंकार, समष्टिरूप मन व सर्व समष्टिरूप सूक्ष्म आणि स्थूल विश्व निर्माण होतें. असें आहे तर व्यष्टीच्या मागें ज्याप्रमाणें पुरुषाचें अस्तित्व असतें त्याचप्रमाणें या समष्टीच्या मागेंही पुरुषाचें अस्तित्व मानावयास नको काय ? व्यष्टीच्या मागें पुरुषाचें अधिष्ठान असतें, त्याप्रमाणें समष्टीच्या मागें कांहींच अधिष्ठान नसेल, तर ही सारी समष्टि कसल्या आधारावर दृश्यतेस येते ? याकरितां व्यष्टीप्रमाणेंच समष्टीलाही अधिष्ठान आणि शास्ता हा पाहिजेच. असें नसेल तर प्रकृतीनें उभारलेली ही सारी परंपरा अधांतरीं लोंबते असें होईल. समष्टीच्या मागें पुरुष नाहीं असें तुम्ही म्हणाल तर व्यष्टीच्याही मागें त्याचें अस्तित्व नाहीं असें आम्ही म्हणूं. व्यष्टीच्या अनेक रूपांच्या शृंखलेमागें पुरुष हें रूप असून तें त्या साऱ्या शृंखलेहून वेगळें व मुक्त आहे असें ज्या आधारानें तुम्ही सिद्ध करूं पाहतां त्याच आधारानें समष्टीच्या मागेंही तेंच रूप असलें पाहिजे असें आम्हीं म्हटल्यास त्यांत वावगें काय आहे ? मिश्र आणि मर्यादित व्यष्टीच्या मागें अमिश्र, अमर्याद आणि स्वयंभू पुरुष असला पाहिजे हें ज्या बुद्धिवादानें तुम्ही सिद्ध करतां त्याच बुद्धिवादानें समष्टीच्या मागेंही असेंच अमिश्र, अमर्याद आणि स्वयंभू रूप असलें पाहिजे असें आम्ही म्हणतों. प्रकृतीच्या समष्टिरूप विश्वाच्या मागें जें अमिश्र, अमर्याद आणि स्वयंभू रूप आहे त्यालाच ईश्वर असें नांव आम्ही देतों आणि तोच त्या साऱ्या समष्टींचा शास्ता आहे असें म्हणतों.

आतां यापुढें सांख्यशास्त्रावर आमचा जो आणखी एक आक्षेप आहे तो याहूनही अधिक महत्त्वाचा आहे. अमर्याद, स्वयंभू आणि अमिश्र अशा स्वरूपाचे पुरुष अनेक आहेत असें कपिलांचें म्हणणें आहे. यावर आमचा प्रश्न असा आहे कीं ही गोष्ट शक्य आहे काय? पुरुष सर्वव्यापी आणि अनंत आहे असें तुम्हीच म्हणतां; आणि तुमचें हें म्हणणें आम्हांस मान्यही आहे. अनंत आणि सर्वव्यापी स्वरूपें दोन असणें शक्य आहे कीं काय इतकाच प्रश्न आहे. अशा प्रकारचीं स्वरूपें एकाहून अधिक असणें शक्य नाहीं. 'क' आणि 'ख' अशीं दोन स्वरूपें अनंत आणि सर्वव्यापी आहेत अशी कल्पना केली तर 'क' स्वरूप 'ख' ला मर्यादित करील. कारण 'ख' स्वरूप म्हणजे 'क' स्वरूप नव्हे आणि उलटपक्षीं 'क' स्वरूप 'ख' नव्हे. हीं दोन्ही परस्परांपासून भिन्न असल्यानें तीं परस्परांस मर्यादित करतील हें उघड आहे. दोहोंत स्वरूपभिन्नता असणें म्हणजेच तीं परस्परांपासून विभक्त असणें होय; आणि विभक्तपणा हेंच मर्यादितपणाचें लक्षण आहे. एक मनुष्य दुसऱ्याहून वेगळा असें आपण जाणतों तें त्या परस्परांतील लक्षणभिन्नतेमुळें जाणतों हें उघड आहे. दोन माणसें सर्वतोपरी सारखीं असलीं तर त्यांचें वेगळेपण आपल्या समजुतींत येणार नाहीं. तीं आपापल्या विशिष्ट गुणांनीं बद्ध आणि मर्यादित असल्यामुळेंच त्यांचें वेगळेपण आपल्या प्रत्ययास येतें. त्याचप्रमाणें दोन पुरुषांचें स्वरूप मर्यादित आणि बद्ध असल्यावांचून त्यांच्यांतील विभक्तता आपल्या प्रत्ययास येणें शक्य नाहीं. यामुळें 'क' आणि 'ख' हे परस्परांस मर्यादित करतात असें म्हटलें कीं त्यांचें अनंतत्व आपोआप नाहींसें झालेंच. यावरून अनंतरूप एकच असलें पाहिजे असा आमच्या बुद्धीचा निश्चय होतो. म्हणून पुरुष एकच असला पाहिजे.

आतां पूर्वीच्या आपल्या अज्ञात वस्तू 'क्ष' आणि 'य' यांचा विचार पुन्हां एकवार करून या दोहोंचें स्वरूप एकच आहे कीं काय हें पाहूं. आपण गृहीत केलेली अज्ञात वस्तु 'क्ष'+आपलें मन मिळून बाह्य जग होतें हें आपण मागें सिद्ध केल्याचें तुमच्या लक्ष्यांत असेलच. त्याचप्रमाणें अज्ञात वस्तु 'य'+मन मिळून अंतर्गत सृष्टि निर्माण होते हेंही तुम्हांस आठवत असेल. यांपैकीं 'क्ष' आणि 'य' या दोन्ही वस्तू अज्ञात आणि अज्ञेय आहेत. काल, देश आणि कारण यांजमुळेंच भेद उत्पन्न होतो. हे तीन

घटक मिळून आपलें मन झालें आहे. या तिहींस अस्तित्व नसेल तर मन-पण म्हणून जो भाव आहे तो कधींही अस्तित्वांत आला नसता. या तिहींचें जें समवायीरूप तेंच मन. कालकल्पना अगोदर असल्याशिवाय कोणत्याही वस्तूबद्दल विचार करणें तुम्हांस शक्य नाहीं. त्याचप्रमाणें देशकल्पनेशिवाय कोणत्याही वस्तूची कल्पना तुम्हास करतां यावयाची नाहीं. कोणतीही वस्तु तुम्ही चित्तांत आणून पहा, म्हणजे तिचें निवासस्थान अगोदर तुमच्यापुढें उभें राहतें. त्याचप्रमाणें कारणावांचून कार्य असल्याचें आपल्या मनांत कधींच येत नाहीं. अमुक एक वस्तु कार्यरूप आहे असें मनांत आल्याबरोबर तिचें कांहीं तरी कारण असलेंच पाहिजे असें आपोआपच आपल्या मनांत येतें. कारणावांचून कार्य नाहीं हा सिद्धांत आपल्या मनानें पक्का ठरविला आहे. अशा प्रकारें आपलें मन त्रिविधरूप आहे. आपल्या एकाच मनाचीं हीं तीन रूपें आहेत असें म्हणा; अगर हीं तीन रूपें मिळून आपलें मन होतें असें म्हणा. हे तीन घटक ज्या क्षणीं अस्तित्वांतून जातील त्याच क्षणीं आपलें मनही नाहींसें होईल. यामुळें काल, देश आणि कारण या त्रिविध घटकांचे मनाच्या योगानें सर्व प्रकारचे भेद उत्पन्न झाले आहेत. याच मनानें ‘ क्ष ’ आणि ‘ य ’ या वस्तूंचा दृश्याभास उत्पन्न केला असून त्यानेंच ही बाह्य-सृष्टि आणि अंतःसृष्टीही निर्माण केली आहे. ‘ क्ष ’ ही बाह्यसृष्टि आहे ही मनाची कल्पना आणि ‘ य ’ ही अंतःसृष्टि आहे हीसुद्धां मनाचीच कल्पना आहे, असें वेदान्तशास्त्राचें म्हणणें आहे; पण वस्तुतः ‘ क्ष ’ आणि ‘ य ’ या दोन्ही वस्तू मनाच्या हद्दीच्या पलीकडच्या असल्यामुळें त्यांच्यांत खरो-खर भेदच नाहीं; आणि असा भेद नसल्यामुळें त्या अभेद म्हणजे एकरूप आहेत. मनाची हद्द सुरू झाल्यावांचून भेदाला अस्तित्व नाहीं पण मनाच्या हद्दीपलीकडे त्याला अस्तित्व असणें शक्य आहे. ‘ क्ष ’ आणि ‘ य ’ वस्तूंना अमुक गुण आहेत असेंही आपणास म्हणतां येत नाहीं. कारण गुणकल्पना हासुद्धां मनाचाच धर्म आहे. ज्या दोन वस्तूंत कोणताच गुण नाहीं त्या एकरूप असल्याच पाहिजेत. कारण त्यांच्यांतील भेद गुणधर्मांच्या भिन्नते-मुळेंच उत्पन्न झालेला असतो. यामुळें जेथें कोणता गुणच नाहीं तेथें अभेद असलाच पाहिजे. ‘ क्ष ’ या वस्तूला स्वतःचा असा कोणताच गुण नाहीं. अमुक एक गुण तिला आहे असा आरोप मनानें तिजवर केलेला असतो.

तिनें आपला गुण मनापासून उसना घेतलेला असतो. हाच न्याय 'य' या वस्तूलाही लागू आहे. याकरितां या दोन्ही वस्तू निर्गुण असल्यामुळें एकरूप आहेत. अशा रीतीनें अंतर्बाह्य सारें विश्व एकरूपच आहे. विश्वांत आत्मरूप म्हणून जें आहे तें एकच आहे. विश्वांत सारें अस्तित्व एकरूप आहे. तें एकच आहे, आणि देश, काल व कारण या उपाधीच्या द्वारें तें स्पष्टत्वास येतें तेव्हां त्या एकासच अनेक नांवें प्राप्त होतात. बुद्धि, सूक्ष्म तत्त्वें, जड तत्त्वें, मन इत्यादि अनेक नांवें या एकाच अस्तित्वाला अशा प्रकारें प्राप्त झालीं आहेत. विश्वांत जें कांहीं आहे तें सारें एकच आहे, आणि तें एकच अनेक प्रकारच्या रूपांनीं दिसतें. त्या अनंत अस्तित्वाचा अल्पसा अंश काल, देश आणि कारण या उपाधीच्या जाळ्यांत सांपडतो आणि अनेक प्रकारच्या आकारांनीं तो दिसूं लागतो. त्याजभोंवतीं हें जाळें पसरलें म्हणजे जें एक शिल्लक उरतें तेंच ब्रह्म अथवा आत्मरूप. हें आत्मरूप विश्वदेहाच्या अधिष्ठानीं राहून त्याचें शासन करतें तेव्हां त्याला परमेश्वर असें नांव प्राप्त होतें; आणि हेंच आत्मरूप या लहानशा विश्वाच्या म्हणजे एका देहाच्या अधिष्ठानीं असतें तेव्हां तेंच जीवात्मा म्हणवितें. मनुष्यांतील जीवात्मा हेंच त्याचें परमात्मरूप होय. अशा रीतीनें साऱ्या विश्वांत एकच पुरुष आहे, आणि वेदान्तानें त्याला ब्रह्म अशी संज्ञा लावली आहे. जीवात्मा आणि परमेश्वर यांजवर भासमान होणारीं आवरणें काढून टाकलीं म्हणजे त्यांच्यांत भासमान होणारा फरक नाहींसा होऊन ते एकरूप होतील. ब्रह्माच्या ठिकाणीं हा जीवात्मा आणि परमात्मा असा भेद नाहीं. देहाच्या उपाधीमुळें तुम्ही अल्पसे भासतां पण परमार्थदृष्ट्यां तुम्ही विश्वरूप आहां. तुम्ही जेथें नाहीं असें एकही ठिकाण विश्वांत नाहीं. साऱ्या हस्तांनीं तुम्हीच कर्मे करीत आहां. सर्व मुखांच्या द्वारें भक्षणाची क्रिया तुम्हीच करीत आहां. सर्व नासापुटांच्या द्वारें श्वासोच्छ्वासाची क्रिया तुम्हीच करीत आहां, आणि सर्व मनांच्या द्वारें विचार करण्याची क्रियाही तुम्हीच करीत आहां. सारें विश्व तुम्हीच आहां. सारें दृश्यजात हा तुमचा देह आहे. दृश्य आणि अदृश्य अशा दोन्ही प्रकारचें विश्व तुम्हीच आहां. या विश्वदेहाचा आत्मा तुम्ही आहां, आणि देहही तुम्हीच आहां. परमेश्वर तुम्ही आणि देवादिकही तुम्हीच. मनुष्य तुम्ही आणि पशूही तुम्हीच. साऱ्या

विश्वांतील झाडेंझुडपें आणि खनिज पदार्थसुद्धां तुम्हीच आहां. प्रत्येक वस्तूचें व्यक्तरूप तें तुम्हीच. ज्याला ज्याला अस्तित्व हा शब्द लावतां येतो तें सारें तुम्हीच आहां. तुम्ही अनंतरूप आहां. अनंताचे भाग पाडतां येणें शक्य नाहीं. त्याला भाग असणें अशक्य आहे; कारण त्याचा भाग केला तरी तो भागही अनंतच होईल. तो अनंत झाला तर मूलवस्तु आणि तिचा भाग हीं सारखींच होतील. सबंध वस्तु आणि तिचा भागही एकच आहेत हें म्हणणें बुद्धिग्राह्य नाहीं. याकरितां तुम्ही या अनंतवस्तूचे भाग आहां असें म्हणणें अथवा तुम्ही 'अमुक राजश्री' इतक्याच अल्परूपाचे आहां असें म्हणणें वेडेपणाचें आहे. हें म्हणणें वस्तुस्थितीस सोडून आहे. असें कोणी बोलला तर तें तो स्वप्नांत बोलत आहे असें तुम्ही समजा. हें सर्व जाणून घ्या, याचा अनुभव घ्या आणि मुक्त व्हा. साऱ्या अद्वैत वेदान्ताचा हा अखेरचा सिद्धांत आहे. '**मनोबुद्ध्यहंकारचित्तानि नाहम्। न च श्रोत्रजिह्वे न च घ्राणनेत्रे। न च व्योम भूमिर्न तजो न वायुः। चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम्॥**' हेंच खरें ज्ञान. याखेरीज बाकी जें राहिलें तें सारें अज्ञान. ज्ञान आणि मी अशा दोन भिन्न वस्तूंना अस्तित्व नाहीं; कारण मी ज्ञानरूप आहें. मला जीवितही नाहीं; कारण मी जीवितच आहें. मी सर्वत्र आहें—मी अस्तित्व आहें, मी एकरूप आहें. माझ्याशिवाय वेगळें अस्तित्व कोणालाही असणें शक्य नाहीं. सर्व भूतजात मजमध्येंच आहे. सर्व भूतजात मीच आहें. सर्व भूतांच्याद्वारें मी स्पष्टत्वास येतों; तथापि त्यांच्या पाशांत मात्र मी नाहीं. मी मुक्त आहें. मला मुक्तीचीही जरूर नाहीं. मुक्तीची वाट कोण शोधतो? बद्ध असेल तो. जो बद्ध नाहीं त्याला मुक्तिही नको. 'मी बद्ध आहें' अशी भावना तुम्हीं केली कीं त्याच क्षणीं तुम्ही बद्ध होतां आणि मग तसेच बद्ध राहतां. तुम्हाला बांधणारें जाळें तुम्हीच आपल्या हातानें विणतां. '**शिवोहम्**' हा अनुभव एकवार तुम्हाला आला कीं त्याच क्षणीं तुम्ही मुक्त होतां. ज्ञान म्हणतात तें यालाच. ही पराविद्या. ही मुक्तिदात्री विद्या आहे. "**हें बोलाचें नव्हे शास्त्र। पैं संसारजिणतें शस्त्र। आत्मा अवतरवितें मंत्र। अक्षरें इयें॥**" मुक्त होणें हेंच साऱ्या सृष्टीचें अखेरचें साध्य आहे.

---

# ६

# वेदान्त व हक्क.

अद्वैत वेदान्तापैकीं सूक्ष्मेंद्रियशास्त्राचा विचार आपण बहुधा पूर्णपणें केला आहे. आतां एकाच मुद्याचें विवेचन करावयाचें आहे, आणि हाच मुद्दा लक्ष्यांत येण्यास फार कठीण असा आहे. 'एकमेवाद्वितीयम्' असें जें कांहीं आहे त्यापासून उत्क्रांतिद्वारा आपणाभोंवतालचें सारें विश्व निर्माण झालें आहे हा वेदान्तशास्त्राचा सिद्धांत आपणास आठवत असेलच. किंबहुना, हें सारें विश्व एकमेवाद्वितीयापासून निर्माण झालें असें म्हणण्यापेक्षां तें एकमेवाद्वितीयच उत्क्रांत होत होत विश्वरूपाला आलें असें वेदान्ताचें म्हणणें आहे. या एकमेवाद्वितीयाला ब्रह्म अशी संज्ञा वेदान्तशास्त्रानें दिली आहे. तें केवलरूप आहे. कोणत्याही पदार्थांच्या मिश्रणानें झालेलें नाहीं. हेंच केवलरूप सृष्टि या रूपानें प्रत्ययास येत आहे. हें घडलें कसें ? केवलरूपांत ही एवढी घडामोड कोणीं घडवून आणली ? वेदान्ताच्या साऱ्या विचारसरणींत अत्यंत अवघड अशी जागा ती हीच. केवलरूपांत घडामोड व्हावी हें आधीं शक्य तरी आहे काय ? बोलून चालून तें केवलरूप. तें अमिश्र आहे, अनंत आहे, अमर्याद आहे अशा प्रकारच्या त्याच्या व्याख्या तुम्हीच सांगतां; मग त्यांत बदल कशानें, कसा आणि कां व्हावा ? हें रूप बदलण्यास पात्र नाहीं, त्याअर्थीं त्यांत बदल घडणें शक्य नाहीं. याकरितां त्यांत बदल झाला असें तुम्हीं म्हटलें कीं तुमच्या स्वतःच्या बोलण्यांतच हा उघड विरोध उत्पन्न झाला. पृच्छकानें उभी केलेली ही अडचण मोठी विलक्षण आहे खरी. आतां व्यक्तिविशिष्ट परमेश्वराचें अस्तित्व जे मानतात त्यांच्याही मार्गांत हीच अडचण आहे. त्यांना आम्हीही असा प्रश्न करूं कीं ही सारी सृष्टि कशी निर्माण झाली ? तिला मूलद्रव्य म्हणून कांहीं तरी असलें पाहिजे हें उघड आहे. केवळ शून्यांतून ती निर्माण होणें शक्य नाहीं. तिच्या मुळाशीं शुद्ध अभाव असेल असें मानणें तर्काला सोडून आहे. ती शून्यांतून निर्माण झाली असें मानलें तर त्यांतही पूर्वींचाच विरोध आहे असें दिसून

येईल. शून्यांतून सृष्टि निर्माण झाली असें म्हणणें म्हणजे अभावांतून भाव निघाला अथवा नास्तित्वांतून अस्तित्व निर्माण झालें असें म्हणण्यासारखेंच आहे, आणि हें म्हणणें तर उघड उघड विरोधात्मक आहे. जगांत कोणतेंही कार्य घडलें कीं त्याला कारण अवश्यमेव असतें हा आपला रोजचा अनुभव आहे; आणि कारणच कार्यरूप होतें हें आपण पूर्वी अनेकवार सिद्ध केलें आहे. कारणाचें बदललेलें रूप तेंच कार्य. अव्यक्त कारणाची व्यक्तदशा तेंच कार्य. अत्यंत सूक्ष्म बीजांतून महावृक्ष निर्माण होतो. वृक्ष म्हणजे काय? बीज, हवा आणि पाणी यांचें संयुक्त रूप. त्या वृक्षाचा देह घडला जात असतां त्यानें हवा आणि पाणी हीं आपल्या पोटांत किती सांठविलीं याचें गणित समजावयास कांहीं मार्ग आपणास उपलब्ध असता, तर ह्या साऱ्यांच्या बेरजेचें वजन आणि वृक्षाचें वजन हीं तंतोतंत सारखीं आहेत असें आपणास कळून आलें असतें. कारणरूप बीज, हवा आणि पाणी हीं कार्यरूप वृक्षाबरोबर आहेत असें निर्विवाद सिद्ध झालें असतें. ही गोष्ट अर्वाचीन भौतिकशास्त्रांनीं निर्विवाद सिद्ध केली आहे. कार्य म्हणजे कारणाचेंच रूपांतर हा सिद्धांत अर्वाचीन शास्त्रांसही पटला आहे. कारणरूपांतील घटकांच्या जुळणींत फेरबदल आणि घडामोड होऊन कार्य बनतें. याकरितां विश्व या कार्याचेंही कांहीं तरी कारण असलेंच पाहिजे. परमेश्वरानें केवळ शून्यांतून तें निर्माण केलें हें म्हणणें अशास्त्र आहे. तेव्हां या अडचणींतून पार पडण्याकरितां परमेश्वरच सृष्टिरूप झाला असें कबूल करण्यावांचून दुसरें गत्यंतर आपणास नाहीं. असो.

आतां येथें मजा अशी झाली कीं आड चुकविण्याकरितां आपण उडी मारली आणि विहिरींत पडलों. एक अडचण ज्या युक्तीनें आपण दूर केली त्याच युक्तीमुळें दुसरी अडचण उत्पन्न झाली. परमेश्वर म्हणजे काय या प्रश्नाचें उत्तर सांपडण्यासाठीं आपण अनेक धर्मग्रंथ चाळले आणि अनेक पंथांचा व मतांचा तपास केला तर सर्वांस सामान्यपणें कबूल असा एक सिद्धांत आपणास आढळून येतो. ईश्वर म्हणजे बदलण्यास पात्र नाहीं असें स्वरूप, हा सिद्धांत सर्वांनीं मान्य केला आहे. सर्व सृष्टींत बदलाबदल आणि घडामोड हीं अखंड चालू असतांही ज्यांत कांहीं बदल होणें शक्य नाहीं तो परमेश्वर. अत्यंत पुरातन कालापासून या कल्पनेचा इतिहास आपण चाळून

पाहिला तर ईश्वर म्हणजे पूर्ण स्वतंत्र वस्तु ही कल्पना अगदीं आरंभापासून अस्तित्वांत असल्याचें आपणास आढळून येतें. जी वस्तु पूर्ण स्वतंत्र म्हणजे स्वयमेव असेल तीच घडामोडीच्या पलीकडे असणार हें उघड आहे. याकरितां स्वतंत्रता आणि नित्य एकरूपता हे शब्द पूर्ण समानार्थवाचक आहेत असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. जें स्वतंत्र आहे तेंच नित्य एकरूप राहणार आणि जें नित्य एकरूप आहे तेंच स्वतंत्र असणार. कोणत्याही वस्तूंत घडामोड निर्माण होते तिचीं कारणें दोन प्रकारचीं असूं शकतात. एक असें कीं त्या वस्तूवर दुसऱ्या बाह्य वस्तूची क्रिया घडून मूल वस्तूचें रूपांतर होतें. अथवा दुसरें कारण हें कीं ज्या घटकांची ती वस्तु बनली असेल त्यांतील कांहीं अधिक बलिष्ठ होऊन त्या वस्तूंत विघटना उत्पन्न करतात. ज्या कोणत्याही वस्तूच्या स्वरूपांत बदल घडून येणें शक्य असेल ती वस्तु स्वतंत्र असूं शकणारच नाहीं. ती वस्तु आजूबाजूच्या एक अथवा अनेक कारणांनीं बद्ध असली पाहिजे.

आतां ईश्वरच सृष्टिरूप झाला अशी कल्पना घटकाभर केली तर ईश्वराचें अस्तित्व येथें कायम राहूनही त्याच्या स्वरूपांत बदल झाला असें कबूल करावें लागेल. अनंतरूपांत बदल होऊन हें समर्याद विश्व उत्पन्न झालें असें म्हटलें म्हणजे या विश्वाइतक्या आकाराचा अमर्याद स्वरूपाचा तुकडा मूलरूपांतून उणा झाला असें म्हणावें लागेल. याचा इत्यर्थ इतकाच कीं परमेश्वर म्हणजे अमर्यादरूपांत विश्वरूप वजा घालतां शिल्लक राहिलेला भाग. अशा रीतीनें जो बदलूं शकतो अथवा ज्याच्या स्वरूपांत खंड पडतो तो पदार्थ परमेश्वर कसा म्हणावा ? ही अडचण दूर करण्याकरितां वेदान्तानें एक मोठ्या धीटपणाची उपपत्ति पुढें आणली आहे. ती उपपत्ति अशीः हें विश्व ज्या रीतीनें आपणास प्रतीत होतें असें वाटतें त्या रीतीनें तें खरोखर अस्तित्वांत नाहीं. जें बदलूं शकत नाहीं, त्यांत बदलही झालेला नाहीं. हें सारें विश्व ही नुसती देखत भूल आहे. यांत सत्य असें कांहीं नाहीं. विश्वांत अनेक घटक आहेत असें आपणास वाटतें; आणि त्याचप्रमाणें प्रत्येक पदार्थ इतरांपासून भिन्नसा आपणास वाटतो; पण वस्तुस्थिति अशी नाहीं. विश्वांत अनंत प्राणी प्रत्येकीं वेगवेगळे आहेत असें आपणास वाटतें; पण हें आपलें वाटणेंही चुकीचें आहे. अशा प्रकारची ही उपपत्ति आहे. परमात्मरूपांत

यत्किंचित्‌ही बदल झालेला नाहीं. त्याचप्रमाणें वस्तुतः तो विश्वरूपही झालेला नाहीं. परमात्मा विश्वरूप झाला असें आपणास वाटतें याचें कारण हेंच कीं देश, काल आणि कारण या उपाधित्रयांतून आपण परमात्मरूपाकडे पाहत असतों. यामुळें परमात्मरूप जसें आहे तसें आपणास न दिसतां या उपाधीमुळें भलताच देखावा आपण पाहत असतों. जेथें वस्तुतः भेद नाहीं, तेथें अनेक भेद आणि अनेक रूपें बाह्यतः दिसूं लागतात; पण खरोखर तेथें भेद नाहींत आणि अनेक रूपेंही नाहींत. ही उपपत्ति विलक्षण धीटपणाची आहे यांत शंका नाहीं. आतां सारांशरूपानें सांगितलेल्या या उपपत्तीचें विवेचन अधिक विस्तारानें करणें अवश्य आहे.

ही उपपत्ति म्हणजे निवळ कल्पनेचें साम्राज्य आहे अशांतला भाग नाहीं. कल्पनातरंग म्हटला म्हणजे त्यांत सत्याचा अंशही नसावयाचा असें आपण आगाऊच गृहीत धरीत असतों; पण ही कल्पनासुद्धां त्याच किंमतीची आहे असें समजूं नका. या विश्वाला मुळीं अस्तित्वच नाहीं असें अद्वैतमताचें प्रतिपादन नाहीं हें अगोदर पक्कें ध्यानांत धरा. विश्वाला अस्तित्व अवश्य आहे, पण ज्या रीतीनें तें आपणास दिसतें तसें मात्र तें नाहीं इतकेंच. आपणाला जें त्याचें स्वरूप म्हणून प्रतीत होतें तें स्वरूप सत्य नाहीं इतकेंच वेदान्ताचें म्हणणें आहे. या मताचें स्पष्टीकरण करतांना जीं उदाहरणें अद्वैतग्रंथांनीं सांगितलीं आहेत तीं सर्वांस ठाऊकच आहेत. रात्रीच्या अंधाराच्या वेळीं एखाद्या वठलेल्या झाडाच्या बुंधक्याकडे पाहून भुताखेतांच्या अस्तित्वावर विश्वास ठेवणारा भोळसर मनुष्य हें भूतच आहे असें समजतो; तेंच बुंधकें एखाद्या चोराला पोलीसच्या शिपायासारखें दिसतें, तिसऱ्या एखाद्याला तो आपला मित्रच उभा आहे असें वाटतें. या उदाहरणांत बुंधकें एकच असतां त्याचीं किती रूपें निर्माण झालीं पहा! बुंधक्याचें रूप जें आरंभीं होतें तेंच अखेरपर्यंत कायम होतें. कोणत्याही प्रसंगीं यत्किंचितही बदल त्यांत झाला होता असें नाहीं; आणि अशा प्रकारें त्याच्या स्वरूपांत वास्तविक कोणताही बदल झाला नसतां तिघांना तीन प्रकारचीं रूपें तेथें प्रतीतीस आलीं हेंही खोटें नाहीं. म्हणजे बुंधक्याच्या रूपांत वस्तुतः बदल झाला नसतां बाह्यतः अनेकवार त्यांत बदल झाल्यासारखें दिसतें. मग बदल झाल्याचा हा देखावा निर्माण झाला कसा? प्रेक्षकांच्या चित्तांत जीं रूपें अगोदरच अस्तित्वांत

होतीं त्यांचा आरोप त्यांनींच त्या बुंधक्यावर केला. प्रत्येक प्रेक्षकानें स्वतःच्या मनांतील रूप पाहिलें आणि तो बुंधका तें रूप आहे असें म्हटलें.

बाह्य जगांतील वस्तुजाताचें वास्तविक स्वरूप काय आहे हें आपणास ठाऊक नाहीं आणि तें ठाऊक होणें शक्यही नाहीं. अंतःसृष्टि आणि बाह्यसृष्टि यांच्या स्वरूपाचें विवेचन आपण मागें केलें तेव्हां 'य' आणि 'क्ष' अशीं गृहीतरूपें धरून या दोन्ही सृष्टी आपणच उत्पन्न केलेल्या आहेत हें सिद्ध केलें असल्याचें तुमच्या लक्ष्यांत असेलच. सर्व अंतर्बाह्य सृष्टि दोन वस्तूंच्या समीकरणांतून निर्माण झाली आहे. या दोन वस्तूंपैकीं एक आपलें मन ही असून दुसरी वस्तु बाह्यगत पदार्थ ही आहे. या विवेचनांत 'क्ष' आणि 'य' या गृहीत वस्तूही खरोखर वेगवेगळ्या नसून त्या एकच आहेत असें वेदान्ताचें मत आहे.

हाच सिद्धांत कांहीं पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांनींही सिद्ध केला आहे. अशा तत्त्ववेत्त्यांच्या मालिकेंत हर्बर्ट स्पेन्सर यांची गणना प्रामुख्यानें होते. फल-पुष्पाच्या रूपानें जी मूलशक्ति सृष्टींत आपल्या प्रत्ययास येते तीच शक्ति माझ्या मनाच्याद्वारें कार्यकारी होते हा पाश्चात्य तत्त्वज्ञांचा सिद्धांत आणि पौर्वात्य वेदान्तवाद्यांचा सिद्धांत यांत खरोखर कांहींच फरक नाहीं. बाह्य-सृष्टीचें वस्तुरूप आणि माझ्या अंतःसृष्टीचें वस्तुरूप यांत कांहींच भेद नसून हीं दोन्ही रूपें वस्तुतः एकरूप आहेत असें वेदान्त्यांचें म्हणणें आहे. पाश्चात्य पंडित आणि पौर्वात्य वेदान्ती हे येथें एकमेकांच्या जवळ किती आले आहेत—किंबहुना एकरूपच झाले आहेत—हें पाहण्यासारखें आहे. फार काय, पण ही अंतर्गत सृष्टि आणि ही बहिर्गत सृष्टि हा भेदसुद्धां केवळ उपा-धीमुळें उत्पन्न झालेला आहे. उदाहरणार्थ, आपण अशी कल्पना करूं कीं जर आपल्या पांच इंद्रियांत आणखी एका सहाव्या इंद्रियाची भर पडली, तर अशा स्थितींत हें सारें विश्व सांप्रतच्या रूपाहून कांहीं वेगळ्याच रूपाचें आपणांस दिसूं लागेल हें उघड आहे. बाह्य विश्वाचें स्वरूप अमुक म्हणून जो कांहीं निश्चय आपण केलेला असतो, तो आपल्या पांच इंद्रियांच्या साक्षीवर विश्वा-सून केलेला असतो. आतां यांतच आणखी एखाद्या इंद्रियाची भर पडली तर तें या विश्वाची कहाणी कांहीं निराळ्याच रीतीनें सांगेल आणि त्यामुळें आपली विश्वाची कल्पना पार बदलून जाईल. यावरून मी बदललों कीं जग

बदलतें असा सिद्धांत काढण्यास काय प्रत्यवाय आहे ? यावरून तुम्ही, मी व जगांतील प्रत्येक वस्तु हीं सारीं पूर्ण ब्रह्मरूप आहेत हा वेदान्तशास्त्राचा सिद्धांत आहे हें आपल्या लक्ष्यांत आलें असेलच. आपण सारे ब्रह्माचे भाग अथवा लहान लहान तुकडे नसून संपूर्ण ब्रह्म आहों असें वेदान्तशास्त्राचें ह्मणणें आहे. जगांतील प्रत्येक वस्तु केवलरूप, स्वयमेव आणि पूर्ण आहे; कारण ब्रह्माच्या ठिकाणीं भाग संभवत नाहींत. आपणास जे भाग ह्मणून दिसतात, तो निवळ देखावा आहे. हे भाग मूळ वस्तूंत निर्माण झाले नसतांही तसा देखावा मात्र दिसत असतो. मी पूर्ण ब्रह्म असून सदामुक्त आहें. बद्ध असा मी कधींच नव्हतों. मी बद्ध आहें असा आपला समज तुह्मीं करून घेतला कीं मग मात्र तुमच्या पायांत शृंखला पडतात; पण मी मुक्त आहें असा अनुभव तुह्मास एकवार आला, कीं तुम्ही पुन्हां केव्हांही बद्ध होत नाहीं असें छाती ठोकून वेदान्त तुह्मांस सांगत आहे. वेदान्तशास्त्राच्या साऱ्या अट्टहासाचा हेतु हाच कीं तुह्मी मुक्त आहां, हें तुमच्या ध्यानीं आणून द्यावें. तुम्ही पूर्वीं केव्हांच बद्ध नव्हतां, सांप्रत नाहीं आणि भविष्यत् कालींही तुम्ही बद्ध होणार नाहीं, अशी तुमची पक्की खात्री पटवून द्यावी, या एकाच हेतूनें वेदान्तशास्त्रानें एवढें अफाट साहित्य निर्माण केलें आहे. आपणांत केव्हांही बदल होत नाहीं; आपण केव्हांही मरत नाहीं आणि आपण केव्हां जन्मही घेत नाहीं. आतां या वेदान्त मतावर कोणी अशी शंका काढील कीं मग जन्म, बाल्य, तारुण्य, वार्धक्य आणि मृत्यु या वस्तूंचें स्वरूप तरी काय ? या साऱ्या स्थिती प्रत्यहीं आह्मांस दिसतात. जगाचें अस्तित्वही हरघडी आमच्या प्रत्ययास येत असतें. मग या साऱ्या देखाव्याचें होणार तरी काय ? यावर वेदान्तशास्त्राचें उत्तर असें आहे कीं जगाला बाह्यतः जें अस्तित्व आहे तें काल, दिशा आणि कारण यांच्या उपाधीनें उत्पन्न झालेलें आहे. प्रकृतीच्या उत्क्रांतीमुळें केवलरूप अनेक प्रकारें स्पष्टत्वास आल्यासारखें दिसतें; तथापि हा निवळ भ्रममूलक देखावा आहे. वास्तविक केवलरूपाचे भाग पडत नाहींत आणि तें अनेक रूपें धारणही करीत नाहीं. याला संस्कृतांत विवर्तवाद असें नांव आहे. केवल रूपांत कांहीं बदल होत नाहीं अथवा त्यांत कसली उत्क्रांतिही होत नाहीं. अत्यंत क्षुद्र जंतूंत तें ब्रह्म पूर्णरूपानेंच आहे. उपाधीमुळें तें अपूर्ण रूप दिसतें इतकेंच.

त्याच्या भोंवतीं जें जंतुदेहाचें जाळें आहे तें त्या पूर्ण रूपाला जंतु या संज्ञेस पात्र करतें. या अत्यंत सूक्ष्म रूपापासून तों थेट अत्युच्च अशा मानवी रूपापर्यंत आकारांच्या ज्या अनेक घडामोडी होतात, त्या मूलरूपांत होत नसून त्या केवळ बाह्य आकारांत मात्र होत असतात. मूळ जसें आहे तसेंच असतें; परंतु त्यावरचीं आवरणें मात्र बदलत असतात.

अशी कल्पना करा कीं, आपणा समोर एक पडदा सोडलेला असून त्याच्या बाहेरच्या बाजूस एक सुंदर देखावा आहे. या पडद्याला एक लहानसें छिद्र असून त्या छिद्राच्या द्वारें बाह्य देखावा आपणांस अंशतः मात्र दिसत आहे. आतां हें छिद्र हळुहळु मोठें होत जात आहे अशी कल्पना करा. तें जों जों अधिक मोठें होईल तों तों त्या देखाव्याचा अधिकाधिक मोठा भाग आपल्या दृष्टिपथांत येत जाईल हें उघड आहे. अशा रीतीनें तो पडदा अखेरीस सर्वच नाहींसा झाला तर तो सारा बाह्य देखावा एकसमयावच्छेदें आपणांस दिसेल. या दृष्टांतांत सांगितलेला बाह्य देखावा म्हणजे आत्मरूप, आणि आम्ही व हें रूप या दोहोंच्यामध्यें काल, देश आणि कारण या उपाधीचा म्हणजे मायेचा पडदा आहे. या उपाधिरूप पडद्याला कोठें तरी एखादें छिद्र असतें आणि त्याच्या द्वारें आत्मरूपाचा एखादा किरण मला दिसत असतो. हें छिद्र अधिक मोठें झालें म्हणजे या आत्मरूपाचा अधिकाधिक मोठा भाग मला दिसूं लागतो; आणि अखेरीस हा मायेचा पडदा समूळ नष्ट झाला म्हणजे तें आत्मरूप मीच आहें अशी माझी खात्री होते. या विश्वांत अनेक प्रकारच्या घडामोडी प्रत्यहीं—प्रतिक्षणीं—चालू आहेत. पण या घडामोडींचा संबंध आत्मरूपाशीं-केवल रूपाशीं—मात्र नाहीं. कोणत्याही प्रकारच्या घडामोडीचा उपसर्ग त्याला लागूं शकतच नाहीं. या घडामोडी बाह्य सृष्टींतल्या आहेत. प्रकृतीची उत्क्रांति प्रत्येक क्षणीं होत असते आणि अखेरीस तें केवलरूप स्पष्टत्वास आल्यासारखें दिसूं लागतें. या केवलरूपाचें अस्तित्व प्रत्येकाच्या ठिकाणीं आहे. कोणाच्या ठिकाणीं या अस्तित्वाचा प्रत्यय कमी प्रमाणानें दिसत असतो तर दुसऱ्या एखाद्याच्या ठिकाणीं तो अधिक प्रमाणावर असतो; आणि अशा प्रकारच्या कमीअधिकपणामुळें व्यक्तीव्यक्तींत लहानथोरपणा दिसूं लागतो. वास्तविक पाहतां लहान आणि थोर असा भेद विश्वांत नसून तें एकरूपच आहे. केवळ आत्मरूपाच्या दृष्टीनें

पाहतां अमक्याचा आत्मा अधिक दर्जाचा आणि दुसऱ्या एखाद्याचा आत्मा क्षुद्र, असें म्हणणें म्हणजे अर्थशून्य बडबड करणेंच होय. केवळ आत्म दृष्टीनें पाहतां पशूहून अथवा वृक्षादिकांहून मनुष्य प्राणी अधिक श्रेष्ठ आहे, हें म्हणणें अशास्त्र, अयथार्थ, आणि अर्थहीन आहे. वस्तुतः सर्व विश्व एकरूपच आहे. आत्मस्वरूपाच्या स्पष्टीभवनाच्या मार्गांत झाड ही एक मोठी धोंड आड पडली आहे. चतुष्पाद जनावर ही अडचण त्याहून कमी आहे आणि मनुष्य-प्राणी ही अडचण या दोहोंपेक्षांही कमी आहे. सुसंस्कृत आणि सुविद्य मनुष्यांत तर ही अडचण फारच थोडी असते आणि पूर्णत्व पावलेल्या मनुष्यांत ही अडचण मुळींच नसते. आपल्या इंद्रियांच्या द्वारें जीं जीं कर्मे आपण करीत असतों, त्या साऱ्यांच्या पोटीं एकच हेतु असतो. तो हेतु हाच कीं आत्मरूपावरील हा पडदा दूर व्हावा. ज्या लहानशा छिद्राच्या द्वारें आत्मरूपाचा अंशतः प्रत्यय आपणांस येतो तें छिद्र मोठें करण्याकरितांच ही सारी धडपड आहे. बाह्य आकार आणि त्या मागील सत्यवस्तू यांजमध्यें असलेल्या पडद्याचे पदर एकामागून एक नाहींसे व्हावे या हेतूनेंच आपण आपलीं सारीं कर्मे करीत असतों; आणि अशा रीतीनें कर्मे करीत असतां कांहीं वेळां परमावधीचें दुःख आपणास भोगावें लागतें, तर कित्येक वेळां सुख-सागरांत आपण पोहत असतों. आज हंसावें आणि उद्यां रडावें, परवां विचारमग्न स्थितींत मूकवृत्ति धारण करून बसावें, तर तेरवां एकसारखी बडबडच करीत सुटावें हा आपला चालू आयुष्यक्रम आहे. या साऱ्या कृतींचें अंतिम पर्यवसान हा पडदा फाटण्याकडे व्हावें इतकाच आपला वास्तविक हेतु आहे. आत्म्याला मुक्त करावें हा आपल्या कर्मांचा हेतु नाहीं; कारण तो मुक्तच आहे. आपल्या कर्मांचा हेतु त्यावरील पडदा दूर करणें हा आहे. तो पडदा दूर झाला म्हणजे आत्मा स्वयमेव मुक्त आहे असा अनुभव होतो. ज्या जाळ्यांत तो सांपडला आहे तें तोडण्याचा आपला हेतु आहे. सूर्याच्या समोर आलेले ढग नाहींसे करावे हें वायूचें काम आहे. सूर्याला प्रकाशमय करण्याचें काम त्याचें नाहीं. कारण सूर्य स्वयंप्रकाश आहे त्याजवर आलेला ढगांचा पडदा वाऱ्यानें उडवून दिला कीं प्रकाश आपो-आपच फांकतो. सूर्यावरील ढगांचा पडदा जों जों अधिक पातळ होत जातो, तों तों त्याच्या प्रकाशाचा प्रत्यय अधिकाधिक स्पष्ट होत जातो.

आत्मा अनंत, केवलरूप, अमर्याद आणि सच्चिदानंदरूप असल्यामुळें त्यांत केव्हांही बदल होणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें तो जन्माला येणें शक्य नाहीं, अथवा तो मरणेंही शक्य नाहीं. जन्म, मृत्यु, स्वर्गवास इत्यादि अवस्था आत्म्याच्या ठिकाणीं संभवत नाहींत. हे सारे निरनिराळे देखावे मात्र आहेत. मृगजलांत अनेक आकारांचे तरंग निर्माण व्हावे अथवा त्यांत अनेक प्रकारच्या वृक्षांचीं प्रतिबिंबें डोलतांना आढळावीं, त्यांतलाच हा सारा प्रकार आहे. स्वप्नांत आपण अनेक देखावे पाहत असतों. क्षणांत स्वर्ग आणि क्षणांत मृत्युलोक यांचीं दर्शनें आपणास घडत असतात. पण त्यांत सत्याचा अंश कितीसा आहे बरें ? तोच प्रकार आपल्या जन्ममृत्यूंचाही आहे. एखाद्या माणसाला स्वप्न पडूं लागलें म्हणजे त्यांतील देखाव्यानें अनेक प्रकारची विचारमालिका त्याच्या मनांत सुरू होते. अनेक सुष्टदुष्ट विचार त्याच्या चित्तांत उद्भवतात. त्याच्या हातून अनेक दुष्कृत्येंही घडत असतात. कांहीं काळानें याच विचारांतून आणि कृत्यांतून दुसरीं नवीं स्वप्नें जन्म घेतात. आपल्या दुष्कृतीनें आपणास एखाद्या भयंकर जागीं लोटून दिलें असून तेथें आपणास परमावधीच्या यातना भोगाव्या लागत आहेत असेंही स्वप्न तो पाहूं लागतो. सुविचारांचीं स्वप्नें ज्याला पडत असतील आणि आपण सत्कर्माचें आचरण करीत आहों असें जो पाहत असेल, त्याचें तें स्वप्न संपल्यानंतर आपण सुखमय स्वर्गांत आहों असें दुसरें स्वप्न पडूं लागेल. अशाच रीतीनें स्वप्नामागें स्वप्न आपण पाहत असतों. एक स्वप्न संपतें न संपतें तोंच दुसऱ्याला सुरवात होते. पण या साऱ्या स्वप्नांची कायमची इतिश्री होण्याची वेळ केव्हां तरी येईल. अशी वेळ आपणांपैकीं प्रत्येकास येणार आहे. हें सारें विश्व खरोखर स्वप्नाहून अधिक योग्यतेचें नव्हतें असें त्या वेळीं आपणास निःसंशय कळून येईल; आणि त्याच वेळीं सभोंवतालच्या आवरणाहून आत्मा अगदीं भिन्नरूप आहे अशीही आपली खात्री पटेल. सभोंवतालच्या आवरणाहून आत्मा किती तरी अधिक श्रेष्ठ आणि शक्तिमान् आहे असें आपल्या प्रत्ययास येईल. आत्म्याभोंवतालचें आवरण विलक्षण शक्तिमान् आहे असें आज आपणास वाटत आहे, पण आत्म्याच्या सामर्थ्याच्या मानानें या आवरणाचें सामर्थ्य शून्यप्राय आहे असें त्या वेळीं आपणास कळेल. हें सारें घडून येईल कीं नाहीं याबद्दल यत्किंचि-

तरी शंका घेण्याचें कारण नाहीं. तें अवश्यमेव घडेल. हा फक्त कालावधीचा प्रश्न आहे; पण आत्म्याच्या अनंत तत्त्वांत काल किती लोटला या प्रश्नाला कितपत महत्त्व आहे ? एखाद्या मोठ्या सागरांत एखाद्या बिंदूला जितकें महत्त्व तितकेंच आत्मरूपांत कालकल्पनेला आहे. याकरितां हा अनुभवाचा काल कितीही दीर्घ असला तरी तोंपर्यंत स्वस्थ मनानें वाट पाहण्यास आपणास हरकत नाहीं.

या अफाट विश्वांतील यच्चयावत् वस्तू याच साध्याकडे धांव घेत आहेत. कोठें त्याची जाणीव आहे आणि कोठें ती नाहीं इतकाच फरक. दुसऱ्या ग्रहाच्या आकर्षणशृंखलेंत सांपडून गरगर फिरणारा चंद्रसुद्धां त्या शृंखलेंतून बाहेर पडण्यासाठीं धडपड करीत आहे, आणि एके दिवशीं त्याच्या या धडपडीला अवश्य यश येऊन या चक्राकार परिभ्रमणांतून तो मुक्त होईल. आपण कोणत्या साध्याला पोंहोंचण्याची खटपट करीत आहों याचें भान त्या चंद्राला नसल्यामुळें तें सिद्ध होण्यास दीर्घ कालावधि लोटेल; पण ही जाणीव ओळखून आणि ती पक्की मनांत धरून यशःसिद्धीकरितां जो कोणी खटपट करील त्याचा कालावधिही अलीकडे येईल.

केवळ व्यावहारिक दृष्टीनें पाहतां अद्वैत मताच्या या उपपत्तीचा एक फार मोठा उपयोग आहे. तो हाच कीं ही उपपत्ति ज्यांना पटेल त्यांना खऱ्या विश्वव्यापी प्रेमाचें रहस्य समजेल. ‘ तूं आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर,’ ‘जगांत सर्वत्र बंधुप्रेमाची वाढ झाली पाहिजे ’ असल्या वाक्यांचा उच्चार आपणास नेहमीं ऐकूं येत असतो; पण असें कां असावें असा प्रश्न कोणीं केल्यास त्याचें समाधानकारक उत्तर मात्र मिळत नाहीं. मी माझ्या शेजाऱ्यावर प्रेमच कां करावें आणि त्याचा द्वेष कां करूं नये असें कोणीं ह्मटल्यास, त्यास वेदान्ताशिवाय समाधानकारक उत्तर देणारा दुसरा कोणीही भेटणार नाहीं. आपण सारे एकाच मुक्कामाला जाण्यास निघालेले प्रवासी आहों. हीं सर्व झाडें आणि हे चतुष्पाद हेसुद्धां आपले सोबती—प्रवासीच आहेत. केवळ मनुष्यच माझा प्रवासी बंधु आहे असें नाहीं, तर पशुपक्षी आणि झाडेंझुडपें हींसुद्धां माझ्या बांधवांपैकींच आहेत. त्याचप्रमाणें केवळ सज्जन तेवढेच माझे बंधु असें नसून चोर, जार हेसुद्धां माझे भाऊच आहेत. ईश्वरभक्त तेवढेच माझे लाडके नसून दुष्ट माणसेंसुद्धां माझीं

आवडतींच आहेत. हीं सारीं त्या एका मुक्कामाला जाण्याकरितांच निघालीं आहेत. आपण सारे एकाच प्रवाहांत सांपडलों असून अमर्याद स्वातंत्र्याला पोहोंचण्याकरितां आपापल्यापरी आपण सारेच धडपडत आहों. हा प्रवाह परत फिरविण्याचें सामर्थ्य आपणांपैकीं कोणासही नाहीं. त्याचप्रमाणें त्याच्या उलट जाण्याचेंही सामर्थ्य कोणास नाहीं. कोणी कितीही धडपड करो, त्याला उलट जातां यावयाचेंच नाहीं. उलट जाण्याचा यत्न तो करूं लागला तरी प्रवाहाचा जोर त्याला पुढें ढकलील आणि अखेरीस स्वतंत्रतेच्या अफाट सागरांत तो त्याला पोहोंचतें करील. हें सारें विश्व जन्मास आलें तेव्हां त्याच्याबरोबरच हा हेतुही जन्म पावला आहे. ज्या मुक्तिसागरांतून विश्व बाहेर पडलें, त्याच सागराला परत जाण्याकरितां धडपडूं लागल्याबरोबर तें स्पष्टत्वास आलें. स्पष्टत्वास आलें याचाच अर्थ तें जन्म पावलें. आपण या जगांत आलों या क्रियेचाच अर्थ हा कीं आपण त्या मध्यबिंदूकडे जाण्याची धडपड करूं लागलों. त्या मध्यबिंदूकडे आपलें आकर्षण सुरू झालें. या आकर्षणाची जी स्पष्टदशा तीच प्रेम या नांवानें आपण ओळखतों. अव्यक्तदशेंत असतां जी स्थिति आनंद ह्मणविते तीच स्पष्टदशेंत प्रेम या नांवास पात्र होते.

हें सारें विश्व आलें कोठून, तें राहतें कोठें आणि अखेरीस तें जाणार कोठें ही प्रश्नावली वारंवार ऐकूं येत असते. याकरितां तिचेंही उत्तर येथें देणें इष्ट आहे. याचें उत्तर हेंच कीं विश्वाचा उद्भव प्रेमांतून झाला असून त्याचें वास्तव्य प्रेमांत आहे आणि त्याचें पर्यवसानही प्रेमांतच होणार आहे. अशा रीतीनें या विश्वाच्या अंतर्बाह्य प्रेमसागर पसरला असल्यामुळें कोणाची इच्छा असली तरी त्याच्या बाहेर पडणें त्याला शक्यच नाहीं. त्या आनंदसागरापासून लांब जावें असें कोणाला कितीही वाटलें तरी तसें करतां येणें त्याला शक्य नाहीं. कोणाची इच्छा असो अथवा नसो, या मध्यबिंदूकडे त्याला गेलेंच पाहिजे. आपल्या गतीचा हा अपरिहार्यपणा जाणून तेथें लवकर पोहोंचावें असा हेतु मनांत धरून अनुकूल मार्गानें आपण खटपट करूं लागलों तर आपला मार्ग सुगम होतो. त्यांतले खड्डे आणि त्यांतलीं कुंपणें नाहींशीं होतात आणि कालावधीही कमी लागतो.

येथवर केलेल्या विवेचनावरून आणखीही एक सिद्धांत आपल्या ध्यानीं सहज येण्यासारखा आहे. सर्वज्ञत्व आणि सर्वशक्तिमत्व हीं बाहेरून कोठून

येत नसून हीं दोन्ही अंतर्गत आहेत असा तो सिद्धांत होय. ज्याला आपण सृष्टि असें नांव देतों, तें केवळ आरशासारखें आहे. सृष्टीचा खरा उपयोग म्हटला तर याहून अधिक नाहीं. ज्याला आपण ज्ञान असें म्हणतों तेंही केवळ प्रतिबिंब आहे. अंतर्गत ज्ञानस्वरूपाचें जें प्रतिबिंब या सृष्टिरूप आरशांत आपणांस दिसतें त्याला आपण ज्ञान असें नांव देतों. त्याचप्रमाणें सृष्टशक्ती या नांवानें जीं कार्यकारी रूपें आपण विश्वांत पाहातों तीं सारीं स्वरूपेंही या मूल अंतर्गत चिच्छक्तीच्या छाया होत. हीं सारीं स्वरूपें सृष्टींत गूढ रूपानें वास करतात असें आपणास वाटतें; पण बाह्य सृष्टीशीं मूलशक्तीचा संबंध नाहीं. ती अंतर्गत असून तिचें प्रतिबिंब मात्र अनेक रूपांनीं आपण सृष्टींत पाहत असतों. बाह्य सृष्टींत अनेक घडामोडी होत असतात आणि त्यांच्या द्वारें मूलशक्ति प्रतिबिंबरूपानें दिसत असते. ज्ञानाचा वास सृष्टींत नाहीं. ज्ञानाचा झरा मानवी आत्म्यांत आहे, आणि त्याचे तुषार प्रतिबिंब रूपानें सृष्टीच्या घडामोडींत दिसतात. अमूर्त ज्ञानाला मूर्तरूप देण्याचें काम मनुष्य करतो. बाह्य सृष्टींतून मी ज्ञान मिळवितों असें मनुष्य म्हणतो त्या वेळीं स्वतःच्या अंतर्यामीं असलेल्या अव्यक्त ज्ञानाला व्यक्त रूप देऊन त्याकडे तो पाहतो आणि इतकें ज्ञान मीं मिळविलें असें तो म्हणूं लागतो. तें ज्ञान सृष्टींतून त्याला प्राप्त झालेलें नसतें; पण सृष्टीच्या द्वारा तें त्याच्या प्रत्ययाला मात्र आलेलें असतें. वस्तुतः ज्ञान त्याजपाशींच असतें. ज्ञानाचा अखंड वास त्याजपाशीं अनंत कालापासून आहे. त्याच्याजवळून तें कोणीं हिरावून नेलें नव्हतें आणि आतां तें त्याला सृष्टीनें परत दिलें असेंही नाहीं. सच्चिदानंद हें प्रत्येकाचें स्वभावजन्य रूप आहे.

यावरून मूलतः सर्व मनुष्यें एकाच स्वरूपाचीं आहेत हें उघड होत नाहीं काय ? त्यांच्यांत आढळून येणारा फरक कमी अधिक व्यक्तदशेमुळें मात्र उत्पन्न झालेला असतो. मनुष्यांत मूलस्वरूपाचा उच्चनीच भाव नाहीं. याकरितां आपणास कांहीं विशिष्ट स्वरूपाचे हक्क जन्मजात आहेत असें म्हणणें तत्त्वदृष्ट्या अशास्त्रीय आणि व्यवहारदृष्ट्या अनर्थमूलक आहे. अमुक क्षुद्र, मी थोर, अमुक गुलाम, मी धनी अशा प्रकारच्या भावनांनींच आजपर्यंत अनेक उत्पात जगांत घडवून आणले आहेत. जगांतील अनेक अनर्थांचें, युद्धांचें आणि आपत्तींचें मूल या दुष्ट भावनेंत आहे.

मानवकुलाचा आजपर्यंतचा सामान्य इतिहास पाहिला तर त्यांत दोन प्रकारच्या शक्तींचें कार्य आढळून येतें. एका प्रकारानें समाजांत जातिविशिष्टत्व निर्माण होत असतें आणि दुसऱ्यानें त्याचा भंग होत असतो. एक प्रकार विशिष्ट हक्क निर्माण करीत असतो आणि दुसरा प्रकार त्या हक्कांचा नाश करीत असतो. एका प्रकारानें मनुष्यामनुष्यांत कुंपणें निर्माण होत असतात आणि दुसऱ्यानें त्यांचा विध्वंस होत असतो. अशा रीतीनें या विशिष्ट हक्कांचें निर्मूलन जेव्हां जेव्हां होतें तेव्हां तेव्हां त्या मानववंशांत ज्ञानाचा प्रकाश अधिक जोरानें फांकत असतो, असा इतिहासाचा अनुभव आहे. शक्तीच्या या दोन स्वरूपांचा तंटा आपणाभोंवतीं नेहमीं चालू आहे हें आपण पाहतोंच. आपणांस कांहीं विशिष्ट हक्क आहेत असें मानणारीं माणसें जगांतील प्रत्येक समाजांत असतात. विशिष्ट हक्कांचें हें खूळ समाजाच्या जन्माबरोबरच जन्म पावलेलें असतें. ‘ बळी तो कान पिळी ’ ही म्हण या स्थितीचीच द्योतक आहे. बलिष्ठांनीं निबलांवर साम्राज्य गाजविण्यास सुरवात केली कीं हक्काचें खूळ माजत जातें. गरिबांनीं आपली सेवा करावी यासाठींच त्यांचा जन्म आहे असें श्रीमंतांस वाटत असतें. केवळ पैशाच्या जोरावर ते विशिष्ट हक्क निर्माण करूं लागतात. ज्या मानानें पैसा अधिक त्या मानानें हक्कही वाढत जातात. शरीरबळ आणि पैसा यांहूनही अधिक सूक्ष्म पण अधिक जोरदार अशी आणखी एक हक्काची बाब आहे. बुद्धिमंत लोक निर्बुद्धांवर जो हक्क गाजवितात तो मागील दोन प्रकारांहून अधिक तीव्र आहे. केवळ अधिक ज्ञान आहे येवढयाच जोरावर हीं शहाणीं म्हणविणारीं माणसें आजूबाजूच्या समाजावर आपले हक्क गाजवीत असतात. हक्काचा आणखीही एक प्रकार आहे, तो तर या सर्वांहून अत्यंत निंद्य आहे. या हक्काचें वर्णन करावयाचें तर तें सुलतानी किंवा सैतानी हक्क अशा शब्दांनीं करतां येईल. हा हक्क गाजविणाराला कांहीं कार्यकारणभाव पाहण्याचें सुद्धां प्रयोजन नाहीं. धर्मगुरु आपल्या शिष्यमंडळावर जो हक्क गाजवितात तो हा होय. स्वतःस साधु अथवा सद्गुरु ह्मणविलें कीं शिष्याकडून वाटेल त्या गोष्टी करविण्याचा ताम्रपट, जणूं काय, या लोकांस प्राप्त होत असतो आणि एखाद्या जुलमी सुलतानाप्रमाणें त्याची अंमलबजावणी ते करीत असतात. ईश्वरविषयक ज्ञान मला इतरांपेक्षां अधिक आहे अशी एखाद्याची समजूत

एकदां झाली कीं भेटेल त्या प्रत्येक व्यक्तीवर तो आपला हक्क गाजवूं लागतो. ‘अहो मानवाच्या क्षुद्र पोरांनों, आमची पूजा करा; आह्मी परमेश्वराचे दूत तुमच्या कल्याणासाठीं अवतरलों आहों. आमची पूजा अर्चा करावी हेंच तुमचें कर्तव्य आहे.’ असल्या प्रकारची भाषा ते खुशाल वापरूं लागतात. अशा प्रकारचे विशिष्ट हक्क कोणासही असणें इष्ट नाहीं. असे हक्क असावे असें म्हणणारा कोणीही मनुष्य खरा वेदान्ती होऊं शकणार नाहीं. शारीरिक बळाच्या आधिक्यामुळें, बुद्धीच्या अधिक प्रखरतेमुळें अथवा ईश्वरविषयक ज्ञानाच्या प्राप्तीमुळें असो, असे हक्क प्राप्त होणें अनिष्ट आहे. कोणत्याही कारणामुळें कोणासही कोणावर सुलतानी हक्क असूं नये. सर्व मनुष्यांत एकाच शक्तीचा वास आहे. फरक इतकाच कीं कोणामध्यें तिचें स्वरूप अधिक स्पष्ट असतें तर कोठें तें कमी स्पष्ट असतें. या मूलशक्तीचें स्पष्टीकरण पूर्णत्वानें करण्याची सोय सर्वांस आहे. मग विशिष्ट हक्कांना कारण कोठें राहिलें ? अज्ञानानें कोणी कितीही व्याप्त असला तरी त्याचा आत्मा संपूर्ण ज्ञानवान् आहे. आतां त्याचें ज्ञान प्रकट दिसत नाहीं हें खरें, पण असें होण्याचें कारण त्याला तशी संधि सांपडली नसेल असेंही असूं शकेल. ज्ञानाच्या प्रकटीभवनास अनुकूल अशी परिस्थिति कदाचित् त्याला प्राप्त झाली नसेल. तशी संधि मिळाली म्हणजे आपलें ज्ञानस्वरूप तोही प्रकट करील. केवळ विशिष्ट कुलांत जन्म होण्याचा योग आला येवढयावरून कोणालाही विशिष्ट हक्क प्राप्त होतात या म्हणण्याला वेदान्ताचा आधार कधींही मिळावयाचा नाहीं. वेदान्ताच्या परिभाषेंत या शब्दांना कांहीं अर्थच नाहीं. त्याचप्रमाणें एक राष्ट्र जन्मतः कमी दर्जाचें आणि दुसरें जन्मतःच श्रेष्ठ हे शब्दही वेदान्तशास्त्र दृष्टीनें अर्थशून्य होत. दोघांनाही सारख्याच परिस्थितींत ठेवा म्हणजे दोन्हीही मूलशक्तीचें प्रकटीकरण सारखेंच करतात कीं नाहीं हें तुम्हांस दिसेल. अशा रीतीनें कसोटी लागण्याच्या अगोदर अमुक राष्ट्र क्षुद्र आणि तमुक मोठें असें तुम्हास कधींही म्हणतां यावयाचें नाहीं. धर्मज्ञानालासुद्धां हाच सिद्धांत लागू आहे. त्यांतसुद्धां विशिष्ट हक्कांचें स्तोम माजतां उपयोगी नाहीं. आपला खरा हक्क म्हटला म्हणजे मनुष्यजातीची सेवा करणें हा होय; कारण ती सेवा म्हणजे परमेश्वराचीच सेवा आहे. इतक्या या नानाविध रूपांनीं परमात्माच प्रकट झाला आहे. मनुष्याचा जीवात्माही तोच. परमेश्वर स्वतः

हक्कानें तुम्हांस प्राप्त झाला आहे; मग आणखी वेगळे हक्क ते कशाचे मागतां? आपला खास दूत असा ताम्रपट देऊन परमेश्वरानें या भूलोकावर कोणासही पाठविलें नव्हतें, सध्या पाठविलें नाहीं, आणि पुढेंही तो कोणास पाठविणार नाहीं. तसेंच तो कोणाला पाठवील ही गोष्ट शक्यच नाहीं. लहानथोर सारे प्राणी त्याच परमात्म्याचे अवतार आहेत. त्यांत कमी अधिक स्पष्टीकरणाचा मात्र फेर आहे. अनंत कालापासून एकच संदेश परमेश्वराकडून मनुष्यजातीला मिळत आला आहे. हा संदेश हळुहळू सर्वांस प्राप्त होत आहे. प्रत्येक प्राण्याच्या हृदयांत हा संदेश परमेश्वरानें स्वहस्तें लिहून ठेवला आहे, आणि तोच स्पष्ट दशेला आणण्याची धडपड प्रत्येक प्राणी करीत आहे. कोणाला बरीशी संधी मिळाली म्हणजे हा संदेश अधिक स्पष्टपणें तो जाहीर करतो आणि दुसरा एखादा तशा संधीच्या अभावीं स्वस्थ बसलेला असतो. तथापि परमेश्वराचा दूतपणा सर्वांनाच मिळाला आहे. परमेश्वराचा दूत नाहीं असा कोणीच नाहीं. मग मी श्रेष्ठ, तो कनिष्ठ, हा क्षुद्र, तो थोर हा भेद कोठें राहिला? याकरितां अशा प्रकारचे सारे विशेष हक्क समूळ नष्ट करून टाकणें हें अद्वैताचें कार्य आहे. सर्व कार्यांत अत्यंत दुर्घट असें एखादें कार्य असेल तर तें हेंच आहे. आणि सर्वांत मोठी चमत्काराची गोष्ट ही कीं ज्या भूमींत अद्वैत मतानें जन्म घेतला तेथें या कार्याची हेळसांड जितकी होत आहे तितकी ती दुसऱ्या कोठेंही होत नसेल. फार काय, पण हक्कांचें खूळ अतिरिक्तपणें जर कोठें वावरत असेल तर तें अद्वैताच्या माहेरघरींच होय. असल्या प्रकारचे सुलतानी हक्क तेथील धर्मगुरूंना आणि उच्चवर्णीयांस आहेत. हिंदुस्थानांत पैशाचें प्राबल्य मोठें नाहीं. नुसत्या पैशाच्या बळावर असे हक्क तेथें कोणास प्राप्त होत नाहींत, हें तरी त्यांतल्या त्यांत बरें आहे असें मला वाटतें. पण अमुक विशिष्ट कुलांत जन्म झाला म्हणून, अथवा अमुक पंथाचा गुरु अथवा मठाचा प्रमुख म्हणून असे हक्क मात्र सर्वत्र प्राप्त होत असतात.

वेदान्त तत्त्वाच्या पायावर उभारलेल्या नीतीचा प्रसार करण्याचा प्रचंड यत्न एका काळीं हिंदुस्थानांत झाला होता, आणि बराच काळपर्यंत तो मोठा यशस्वीही झाला होता आणि हिंदुस्थानच्या इतिहासांत हा काळ अत्यंत भरभराटीचा व उज्ज्वल होता हेंही आपणांस ठाऊक आहेच. भगवान् बुद्ध

यांनीं हें सारें घडवून आणलें होतें हें आपल्या लक्ष्यांत आलें असेलच. "जातिभेद मोडणारा, विशिष्ट हक्कांचा विध्वंसक, सर्वत्र समता या तत्त्वाचा उपदेशक" अशा अर्थाचीं विशेषणें बुद्ध देवाला लावलीं असल्याचें माझ्या वाचण्यांत आलें आहे. मूलतः सर्व मनुष्यें सारख्याच योग्यतेचीं आहेत असा उपदेश बुद्धांनीं केला आहे. भगवान् बुद्धदेवानंतर जे त्याचे श्रमण अनुयायी होऊन गेले त्यांना हें तत्त्व चांगलेंसें समजलें होतें असें दिसत नाहीं. नवा पंथ निर्माण करून त्यांत कमी अधिक दर्जाचे धर्मगुरु असावे अशा प्रकारचा यत्न त्यांनीं केला होता. कोणताही पंथ म्हटला तरी त्याची भरभराट बहुतांशीं त्यांतील घटकांच्या भोळेपणावर अवलंबून असते. पंथांतील अनुयायी अज्ञ आणि भोळे असले म्हणजे आपल्या पंथाच्या धर्मगुरूंच्या मागें मेंढरासारखे जावयाचे. हा भोळेपणा कायम राखावयाचा असेल तर तेथें सर्वत्र समता हें तत्त्व उपयोगी पडावयाचें नाहीं. सर्वच जर सारखे तर पायां पडणारा कोणी नाहीं आणि पडून घेणाराही कोणी नाहीं. केवळ लौकिक दृष्टया अशा पंथाची बोलबाला फारशी व्हावयाची नाहीं हें उघड आहे. हिंदुस्थानांतील धर्मविचाराच्या पायांत शृंखला केव्हांच पडली नाहीं. अगदीं रानटी धर्मापासून 'सर्वं खल्विदं ब्रह्म' येथपर्यंत ही वाढ एकसारखी अविरतपणें होत गेली. धर्मयुद्धें अथवा धर्मासाठीं छळ असा प्रकार तेथें केव्हांच घडला नाहीं. या बाबतींत समाजांतील प्रत्येक व्यक्तीला तेथें पूर्ण स्वातंत्र्य होतें. धर्मवेडामुळें रक्तपात झाला असें एकही उदाहरण हिंदुस्थानच्या धर्माच्या इतिहासांत आढळावयाचें नाहीं आणि याचें सारें श्रेय मुख्यतः अद्वैत मतालाच दिलें पाहिजे. देशांतील साऱ्या वस्तीला स्वेच्छेनुसार कोणत्याही धर्मास अनुसरण्याची पूर्ण मुभा असावी आणि धार्मिक बाबतींत कोणाचाही छळ होऊं नये अशी स्थिति हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून आहे ही गोष्ट त्या देशाला फार भूषणावह आहे असें म्हटलें पाहिजे.

नीति हें वेदान्ताचें एक व्यावहारिक रूप आहे. कोणत्याही काळीं झालें तरी समाजाला नीति ही पाहिजेच. तिची आवश्यकता प्राचीन काळीं होती आणि आतां ती नाहीं असें नाहीं. किंबहुना आजमितीला तर या नीतिबंधनांची आवश्यकता अधिकच प्रखर भासूं लागली आहे. हल्लींच्या काळीं वाढत्या ज्ञानाबरोबर हक्क बजावण्याचें खूळ किती तरी पटीनें वाढलें आहे.

ईश्वर आणि सैतान अथवा अहुरमझ्द आणि अहरिमन या पुष्कळ अंशानें कविकल्पना आहेत. ईश्वर आणि सैतान यांच्यांतील वास्तविक फरक म्हटला म्हणजे एक परार्थ आणि दुसरा स्वार्थ इतकाच होय. सैतानालाही परमेश्वराप्रमाणेंच ज्ञान आहे आणि त्याच्या इतकें सामर्थ्यही सैतानाला आहे. फरक इतकाच कीं परमेश्वराचें पावित्र्य त्याच्या ठिकाणीं नाहीं, आणि एवढयामुळेंच तो सैतान झाला. आतां हेंच माप सांप्रतच्या जगाला लावून पहा. ज्ञान आणि सामर्थ्य यांची अतिरिक्त वाढ आणि त्याबरोबरच पवित्रतेचा अभाव अशीं साधनें मनुष्याच्या ठिकाणीं एकत्र झालीं म्हणजे त्याचा सैतान बनण्यास काय उशीर ? यांत्रिक कल्पनेची विलक्षण वाढ सांप्रत काळीं झाली आहे. यामुळें मनुष्याच्या सामर्थ्यांतही कल्पनातीत वाढ झाली आहे, पण या वाढीबरोबर पवित्रतेची कांहीं वाढ झाली आहे काय ? ती झाली नसल्यामुळें सध्यां मनुष्यप्राणी अरेराव बनून नाना प्रकारचे हक्क गाजवूं लागला आहे. प्राचीन काळीं स्वतःच्या सामर्थ्याचा हक्क मनुष्यानें इतक्या क्रूरतेनें कधींही गाजविला नसेल. यामुळेंच हें हक्कांचें खूळ मोडण्याची आवश्यकता वेदान्ताला आज जितकी वाटत आहे, तितकी ती पूर्वीं कधींही वाटली नाहीं. मनुष्यांच्या देहाचेंच नव्हे तर, जणूं काय, आत्म्याचेंही मरण ओढवलें आहे असें सध्या वाटूं लागतें.

तुम्हांपैकीं गीतेचा अभ्यास ज्यांनीं केला असेल त्यांना हीं वचनें या प्रसंगीं अवश्य आठवतीलः—

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।
शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ॥
इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ॥

(भ. गी. ५.)

वेदान्तमतानें प्रतिपादिलेल्या साऱ्या नीतिशास्त्राचें सार या दोनच श्लोकांत सांठविलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सर्वत्र साम्यावस्था पाहावयाची यांतच साऱ्या नीतीचा अंतर्भाव होतो. कर्त्याच्या क्रियेस अनुसरून जड जगांतील घडामोडी होत असतात हें आपणांस ठाऊक आहेच. कर्ता हाच शास्ता असून जड जग हें शासित आहे. कर्त्यांत बदल झाला कीं जड

जगांत आपोआप बदल होतो. तुम्ही स्वतःस पवित्र करा, म्हणजे बाकीचें सारें जग आपोआप पवित्र होईल. आज कसल्या तरी धड्याची जरूर जगाला असेल तर ती ह्याच धड्याची होय. पूर्वकाळीं केव्हांही नव्हती इतकी जरूर आज उत्पन्न झाली आहे. लोककल्याणाच्या इच्छेनें आज जो तो अहमहमिकेनें पुढें सरसावण्यास धडपडत असतो. माझ्या शेजाऱ्याचें कल्याण कसें होईल ही चिंता आज आपणास इतकी पछाडीत आहे कीं तीपुढें स्वतःच्या कल्याणाचा विचारसुद्धां आपल्या मनांत येत नाहीं. आपण कसे वागत आहों याचा क्षणभरही विचार न करतां अहोरात्र शेजाऱ्याच्या कल्याणासाठीं आपण धडपडत असतों. पण अशानें काय होईल ? अशा वागणुकीनें जगाचें कल्याण व्हावयाचें नाहीं. लोकांना सुधारण्याची धडपड करण्यापूर्वीं तुम्ही प्रथम स्वतःची सुधारणा करा. तुम्ही सुधारलां म्हणजे जग आपोआप सुधारेल. आपण पवित्र झालों म्हणजे जग पवित्र होण्यासाठीं कांहीं निराळी योजना करावयास नको. मला जग वाईट कां दिसतें हाच आधीं मोठा महत्वाचा प्रश्न आहे. माझ्याच अंतरंगांत कांहीं वाईटपणा नसेल तर जगांत तरी तो मला कोठून दिसेल ? मी पवित्र असेन तर जगांत मला पाप दिसणें ही गोष्ट त्रिकालांतही शक्य नाहीं. मी स्वतः दुःखीकष्टी कां याचा विचार माझ्या मनांत अगोदर आला पाहिजे. माझें दुःख दौर्बल्यानें उत्पन्न झालेलें आहे ही खूणगांठ स्वतःच्या चित्ताला मीं प्रथम पटविली पाहिजे. मी बाल्यदशेंत होतों त्या वेळीं कित्येक गोष्टी माझ्या मनांत विषाद उत्पन्न करून मला दुःखी करीत; पण आतां तें सामर्थ्य त्या गोष्टींच्या अंगीं राहिलें नाहीं. त्याच गोष्टींनीं माझ्या आजच्या स्थितींत दुःख उत्पन्न होत नाहीं याचें कारण काय ? याचें कारण हेंच कीं यांचा कर्ता जो मी त्या माझ्या मनांत बदल झाला आहे. ज्या दृष्टीनें त्या वस्तूंकडे मी पूर्वीं पाहत होतों ती दृष्टि आतां मजपाशीं राहिली नाहीं. यामुळें त्या वस्तूंचें जें कांहीं स्वरूप पूर्वीं मला दिसत असे तें आतां दिसत नाहीं आणि पूर्वींप्रमाणें त्यांजपासून दुःखाचीही उत्पत्ति होत नाहीं असें उत्तर वेदान्तशास्त्र देतें. द्रष्टा बदलला कीं दृश्यही अवश्यमेव बदलतें असा वेदान्ताचा सिद्धान्त आहे. याकरितां स्वतःच्या चित्ताला साम्यावस्था प्राप्त करून घेणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे. आपल्या चित्ताला अशी साम्यावस्था प्राप्त झाली म्हणजे ज्या

गोष्टी आज आपणास दुःखप्रद वाटत आहेत त्यांचें कांहींच महत्व आपणांस वाटावयाचें नाहीं. या गोष्टींनीं आपणास पूर्वीं तरी दुःख कां झालें असें मनांत येऊन तुमचें तुम्हांलाच हंसूं येईल. याच साम्यावस्थेला मुक्ति असें नांव वेदान्तानें दिलें आहे. या साम्यावस्थेच्या अधिकाधिक जवळ जाणें हीच मुक्तीची वाट चालत असण्याची खूण होय.

"सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ" अशी वागणूक ज्याच्या ठिकाणीं प्रत्यहीं दिसत असेल त्याचें मन साम्यावस्थेच्या जवळ जवळ जात आहे असें समजावें. मन जिंकणें हें कर्म सोपें आहे असें कोणींही समजूं नये. प्रत्येक बारीक सारीक गोष्ट पाहून समुद्राच्या लाटेप्रमाणें ज्याचें मन उचंबळतें, यत्किंचित् विरोध होतांच ज्याचें मन क्रोधानें भडकतें अथवा एखाद्या काल्पनिक भीतीनेंही ज्याच्या मनाची गाळण उडते त्याच्या मानसिक अवस्थेला नांव तरी कोणतें द्यावें ! वायूच्या लहानशा लहरीबरोबर वादळांत सांपडल्यासारखें ज्याचें मन भयंकर हेलकावे खाऊं लागतें, त्या बिचाऱ्याची स्थिति खरोखर मोठी अनुकंपनीय आहे ! अशा दुबळ्यानें मोठेपणाच्या गोष्टीसुद्धां बोलूं नये. असा मनुष्य धर्मसाधन कोणत्या मार्गानें करणार ? ज्याला चैतन्यसागरांत स्नान करावयाचें असेल त्यानें असली दुबळी मनःस्थिति टाकून देण्यासाठीं धडपड केली पाहिजे. आपल्या मनाची सारी दिशाच त्यानें बदलली पाहिजे. बाह्य जगाचे आघात सोसण्याची तयारी आपल्यापाशीं कितपत आहे याचा विचार ज्याचा त्यानें करावा. आपल्या मनःस्थितीचा आढावा प्रत्यहीं आपल्यापाशींच काढावा. आपलें सामर्थ्य प्रत्यहीं अजमावीत जावें. स्वसुखासाठीं बाह्य जगाच्या तोंडाकडे पाहावें न लागतां आपलें मन आपल्याशींच कितपत रममाण होऊं शकतें याची चालना प्रत्यहीं आपल्या चित्तांत करावी. लहान मुलाला स्वतःच्या पायांनीं चालतां येत नसलें म्हणजे त्याला पांगुळगाडा देत असतात. आपली स्थितिही याच प्रकारची आहे. आपलें मन इतकें पंगु आहे कीं बाह्य उपाधिरूप पांगुळगाड्याच्या आधारावांचून एक पाऊल टाकणेंसुद्धां त्याच्या जिवावर येतें. आतां त्याला त्याच्याच पायावर उभें राहण्यास शिकविलें पाहिजे. त्याच्या पायांत कितपत जोम येत आहे हें नेहमीं पाहत जा. बाह्य जगानें ढकलून दिलें तरी कोलमडून न पडतां आपल्याच पायावर त्याला स्थिरा-

वतां येतें कीं नाहीं याचें परीक्षण सूक्ष्म दृष्टीनें करीत जा. साऱ्या विश्वाच्या शक्ती एकवटून आपणावर तुटून पडल्या तरी यत्किंचित्‌ही कंप पावणार नाहीं अशी आपल्या चित्ताची तयारी ज्या दिवशीं होईल, त्या दिवशीं आपण साम्यावस्थेला पोहोंचलों असें होईल. " **आतां वसुधा तळहीं बुडो । वरी हें गगन कोसळुनी पडो ॥**" आपल्या चित्तास भंग म्हणून नाहीं असें जेव्हां होईल तेव्हांच आपणास मुक्तिसुखाचा लाभ होईल. अशा प्रकारची साम्यावस्था म्हणजेच मुक्ति. मुक्ति म्हणून कांहीं निराळा पदार्थ आहे असें नाहीं. मुक्ति या जगांत-येथेंच—आहे. ती बाहेरून कोठून आणावयाची आहे असें नाहीं. याच मूळ कल्पनेपासून बाकीच्या साऱ्या विचारपरंपरांचा उदय जगांत झाला आहे. हा मूलसिद्धांत म्हणजे एक झराच असून त्यापासून अनेक सुंदर सरितांचा उगम झाला आहे, आणि त्यामुळें जग पावन झालें आहे. या अनेक सरिता परस्परांशीं विरोधी असाव्या असाही भास केव्हां केव्हां होतो; तथापि तो विरोध नसून विरोधाभास मात्र असतो. त्याचप्रमाणें या मूलसिद्धांताबद्दल व त्यापासून निघणाऱ्या उपसिद्धांतांबद्दल पुष्कळ वेळां गैरसमज झाल्याचेंही पाहण्यांत येतें. पुष्कळांना या सिद्धांताचा अर्थच समजत नाहीं; तथापि हा सिद्धांत खरा आहे असें त्यांचें अंतर्याम त्यांना सांगत असतें. केवळ ध्यानमग्न व्हावें या हेतूनें बाह्यजगाशीं असलेला सारा संबंध तोडून टाकून पर्वतगुहांचा अथवा अरण्यांचा आश्रय करणारे धीर पुरुष प्रत्येक राष्ट्रांत आढळतात. अशा रीतीनें एकांतवास पतकरून ते ध्यान कशाचें करतात ? याच एका सिद्धांताचें. उलटपक्षीं अत्यंत उत्साही, तेजस्वी आणि खटपटी माणसें आपण होऊन सामान्य जनतेंत संचार करीत असतात आणि गरीबदुबळे व आजारी आणि दुःखीकष्टी माणसांच्या यातना कमी करून त्यांस धीर देण्यासाठीं धडपडत असतात. असें करण्यांत या माणसांचा मूलहेतु काय असतो ? या मूलसिद्धांताचा शोध लावावा हाच. हे दोन मार्ग परस्परांपासून अगदीं भिन्न आहेत. किंबहुना ते परस्परांस विरोधी असावे असाही निश्चय सकृद्दर्शनीं होत असतो. सर्वसंगपरित्याग करून अरण्याचा अथवा गुहेचा आश्रय करणारा मनुष्य या दुसऱ्या प्रकारच्या लोकांस तुच्छ समजत असतो. दुसऱ्यांचीं दुःखें हलकीं करण्यासाठीं त्यांच्यांत मिसळून जाणारीं परोपकारीं माणसें संसारपंकांत बुडालेलीं आहेत

असें तो समजत असतो. तो म्हणतो, "हीं माणसें कशीं मूर्ख आहेत पहा ! या जगांत कार्य तें काय करावयाचें ? बोलून चालून हें जग म्हणजे मायेचा खेळ, आणि तुम्हीं कांहींही केलें तरी अखेरपर्यंत तें मायाच. त्याच्यांत बदल होणें त्रिकालांतही शक्य नाहीं. मग ही सारी धडपड तरी कशाला ?" "वेदान्त-मतावर तुझा विश्वास आहे काय ?" असा प्रश्न हिंदुस्थानांतल्या एखाद्या धर्मगुरूला केला तर "होय" असें निश्चयात्मक उत्तर तो ताबडतोब देईल. तो म्हणेल, "हा तर माझा धर्मच आहे. मग त्यावर माझा विश्वास आहे कीं नाहीं हा प्रश्नसुद्धां उद्भवण्याचें कारण नाहीं. वेदान्त हा माझा धर्म, आणि धर्म म्हणजे माझा जीव." यावर त्याला कोणीं म्हटलें कीं "सर्वत्र समता आहे हें तत्त्व तुला मान्य आहे काय ?" तर त्यावर तो 'होय' असेंच उत्तर देईल. पण इतक्यांत एखादा महार अथवा मांग त्याच्याजवळ येऊं द्या कीं ताबडतोब दहा हात उडी तो मारील. महाराचा स्पर्शसुद्धां त्याला सहन होणार नाहीं. "तूं उडी कां मारलीस" असा प्रश्न त्याला कोणीं केला तर तो म्हणेल, "त्याच्या स्पर्शानें मला विटाळ झाला असता." "अरे, पण तूं आतांच समदर्शित्वाच्या गोष्टी सांगत नव्हतास काय ? मग इतक्यांतच तें कोठें गेलें ?" तो म्हणेल, "अहो, ही नुसती उपपत्ति आहे. गृहस्थाश्रमी माणसाला तिचा उपयोग करून चालावयाचें नाहीं. मी अरण्यांत गेलों म्हणजे सर्वत्र समदृष्टीनें पाहीन." तुमच्या या इंग्लंडांत झालें तरी हाच प्रकार आढळतो. ख्रिस्ताचे अनुयायी या दृष्टीनें मनुष्यांतील परस्पर बंधुत्वाचें नातें आणि समता हीं तुम्हांसही मान्य आहेत. सर्व माणसें एकाच ईश्वराचीं लेंकरें हें तत्त्व तुमच्यांतील एखादा श्रीमंत सरदार सहज कबूल करील; पण पुरीं पांचही मिनिटें गेलीं न गेलीं तोंच खालच्या वर्गाबद्दल अत्यंत धिक्काराचे उद्गार काढण्यास तो मागेंपुढें पाहणार नाहीं. हाच अनुभव जगांतील सर्व देशांत येतो. अशा रीतीनें सर्वत्र समतेचें हें तत्त्व आज हजारों वर्षें ग्रंथांतरीं मात्र अस्तित्वांत राहिलें आहे. पण त्याच्या प्रत्यक्ष आचाराबद्दल म्हणाल तर तो मात्र कोठेंही आढळून येत नाहीं. तें सर्वांच्या बुद्धीला पटतें. तें ऐकून सर्वजण माना डोलवितात. हें नितांत सत्य आहे असेंही सर्व म्हणतात; पण त्याप्रमाणें प्रत्यक्ष वागून दाखवा असें तुम्हीं म्हटलें कीं तें व्यवहारांत रूढ होण्यास लक्षावधि वर्षें पाहिजेत हें उत्तर ठेवलेलेंच.

एका राजाच्या पदरीं शेंकडों सरदार आणि दरकदार होते. महाराजांच्या ठिकाणीं आपली अत्यंत भक्ति आहे असें प्रत्येकजण म्हणे. राजासाठीं आपण प्राणही देण्यास तयार आहों असें प्रत्येकजण भासवीत असे. आपल्या इतका अनन्यसेवक महाराजांस दुसरा कोणीही मिळावयाचा नाहीं असें प्रत्येकजण राजाला सांगे. कालांतरानें एके दिवशीं एक संन्यासी राजदरबारीं आला. त्याच्याशीं कांहीं संभाषण चालू असतां राजा संन्याशाला म्हणाला, " जिवाला जीव देणारे इतके सरदार दुसऱ्या कोणाही राजाच्या पदरीं नसतील. " संन्यासी हंसून म्हणाला, " राजा तुझ्या भाषणांत सत्य किती आहे हें कोणीं सांगावें ? " राजानें उत्तर दिलें, " आपली मर्जी असेल तर आपण यांची प्रत्यक्ष परीक्षाच पहा. " राजाचें म्हणणें कबूल करून त्या संन्याशानें एक मोठा यज्ञ आरंभिला. या यज्ञाची सांगता झाली म्हणजे राजाचें राज्य सर्व पृथ्वीवर पसरेल असें त्या यज्ञाचें फळ त्यानें सांगितलें, आणि सांगतेकरितां एक मोठा हौद बांधवून राजाच्या पदरच्या सर्व सरदारांनीं त्यांत रात्रीच्या वेळीं दुधाच्या घागरी ओताव्या असें फर्मान राजाकडून काढविलें. राजा हंसून म्हणाला, " महाराज, हीच का तुमची परीक्षा ? यांत नापसंत कोणीच ठरणार नाहीं. " सर्व सरदारांनींही ताबडतोब माना डोलवून मोठा आनंद व्यक्त केला. रात्र पडून अगदीं काळोख झाला तेव्हां साऱ्या सरदारांनीं आपापल्या घागरी आणून त्या हौदांत ओतल्या. सकाळीं पाहतात तों तो हौद नुसत्या पाण्यानें मात्र भरला आहे असें आढळून आलें. राजाच्या सर्व सरदारांपैकीं प्रत्येकानें आपल्या मनाशीं विचार केला कीं, इतक्या दुधांत माझी एक घागर पाण्याची असली तरी ती कशी ओळखूं येणार ? या विचारानें प्रत्येकानें पाण्याची घागर त्या हौदांत ओतली होती. आपणांपैकीं प्रत्येकाची स्थिति आज याच प्रकारची आहे. तत्त्व चांगलें असलें तरी त्याचा आचार सुरू करण्याची जबाबदारी आपण लोकांवर टाकीत असतों. मी एकट्यानेंच त्याच्याविरुद्ध वर्तणूक केल्यानें समाजाचें नुकसान कितपतसें होणार, असा विचार प्रत्येकाच्या मनांत येतो. यामुळें आपल्या वांट्यास जीं कांहीं सामाजिक कामें येत असतात त्यांची वाट आपण या सरदारांप्रमाणेंच लावीत असतों.

सर्व मनुष्यें एकाच ईश्वराचीं लेंकरें असल्यामुळें परस्परांत बंधुत्वाचें नातें आहे ही गोष्ट अगदीं उघड असल्यामुळें ती साऱ्यांच्या प्रत्ययाचीच आहे

आणि याकरितां माझ्यासारख्या एखाद्या मनुष्यानें आपला विशिष्ट हक्क गाजविला तर ती गोष्ट कोणाच्या लक्ष्यांतही यावयाची नाहीं असें धर्मगुरूंना वाटत असतें. याचप्रमाणें श्रीमंत लोक आणि प्रत्येक देशांतील सत्ताधारी माणसें आपल्या कल्पनांत चूर असतात. अशा रीतीनें या तत्त्वाला सारे लोक माना डोलवीत असतां समाजाचा एखादा लहानसा भाग बाकीच्या मोठ्या भागावर स्वेच्छेप्रमाणें सत्ता गाजवीत असतो. पण यांत खरें नुकसान सत्ताधीशांचेंच आहे. लोकांवर सत्ता गाजवावी या हौसेनें ते इतके वेडे झालेले असतात कीं कसल्याही प्रसंगीं ही त्यांची इच्छा त्यांचा पिच्छा सोडीत नाहीं आणि आशा सुटेना व देव भेटेना अशा स्थितींत ते पडतात. उलट पक्षीं यांच्या पायांखालीं दडपलेल्यांची स्थिति याहून वेगळी असते. त्यांना आधीं आशापाशाच थोडे आणि जे असतात तेही कमकुवत. यामुळें मुक्तीचा मार्ग त्यांना जितका सुलभ आहे, तितकाच सत्ताधीशांना तो दुर्लभ आहे. सिंह कितीही दुष्ट झाला तरी तो पशूंचा राजा. त्याचें दुष्टत्व कोल्ह्याच्या दुष्टत्वासारखें नीचपणाचें असावयाचें नाहीं. एक चपेटा मारून सिंह कांहीं वेळ तरी खुशाल झोपीं जाईल, पण कोल्हा असा जबर तडाखा मारावयाचा नाहीं आणि आपल्या भक्ष्याची पाठही सोडावयाचा नाहीं. तो एकसारखा त्याच्या मागें मागें राहील आणि प्रत्येक संधीस कांहीं वेगळाच दुष्टपणाचा प्रकार करील. एकही संधि तो वांया जाऊं द्यावयाचा नाहीं. अशीच स्थिति जन्मजात धर्मगुरूची आहे. ते स्वभावानेंच दुष्ट आणि सहृदयताशून्य असतात. याचमुळें धर्मगुरूंचा सुळसुळाट आणि धर्माची पिछेहाट हीं बरोबरीनें चालत असतात. हक्कांची कल्पनाच पार झुगारून दिली पाहिजे असें वेदान्ताचें सांगणें आहे. ही कल्पना नाहींशी झाली ह्मणजे धर्माचा अभ्युदय होईल. हक्कांचा सुळसुळाट समाजांत आहे तोंपर्यंत धर्माचें अस्तित्व त्यांत असावयाचें नाहीं.

"तुझ्यापाशीं जें कांहीं असेल तें विकून टाक आणि तो पैसा गरीबगुरीबांना वांटून टाक" असें एक ख्रिस्ताचें वचन आहे. या वचनावर तुमचा विश्वास आहे काय? समतेच्या तत्त्वाचें व्यावहारिक स्वरूप काय हें ख्रिस्तानें यांत दाखविलें आहे. अमुक एका दृष्टीनें मी मोठा अथवा सामान्य जनांपासून मी वेगळा ही भावना उत्पन्न होऊं न देण्यास काय केलें पाहिजे हें

ख्रिस्तानें या वचनाच्या द्वारें सांगितलें आहे. ख्रिस्ताच्या वचनाचा सरळ अर्थ हाच आहे. स्वतःच्या स्वार्थबुद्धीला पटेल असा अर्थ निर्माण करण्याकरितांच मूळ संहितेची ओढाताण करणें युक्त नाहीं. सत्य जसें असेल तसेंच घेतलें पाहिजे. त्याला विकृत करण्याचें कर्म केव्हांही करूं नका. यहुदी लोकांकरितां हें वचन असून आपल्या यहुदी श्रोत्यांपुढेंच हें वचन ख्रिस्त बोलला असा या वचनाचा अर्थ कोणी कोणी करीत असल्याचें मला माहीत आहे. संहितांचे अर्थ आपण अशा रीतीनें करूं लागलों तर वाटेल त्या वचनांतून वाटेल तो अर्थ निर्माण करणें अशक्य नाहीं. पण अशा रीतीनें संहिता विकृत करणें अयोग्य आहे. सत्य जसें असेल तसेंच त्याचें ग्रहण करण्या इतकें धैर्य आपल्या चित्ताला पाहिजे. आज त्याप्रमाणें तंतोतंत वागण्यास लागणारें धैर्य आपणापाशीं नसेल; पण तसें असलें तरी निदान सत्याचें ग्रहण शुद्ध बुद्धीनें करण्याइतका प्रांजलपणा तरी अवश्य पाहिजे. आज त्याप्रमाणें वागण्याची छाती आम्हांस नाहीं अशी स्पष्ट कबुली देणें हें शतपट चांगलें. कारण त्यामुळें मूलतत्त्वाचा उच्छेद तरी होत नाहीं. आपल्या ध्येयाला अनुरूप अशी वर्तणूक करण्याचें धैर्य नाहीं म्हणून ध्येयाचें स्वरूप विकृत करून त्याला पदभ्रष्ट करावयाचें आणि अशा रीतीनें आपल्या वर्तणुकीशीं त्याला सुसंगत करावयाचें हा दांभिकपणाचा कळस आहे. अशी संवय ज्याच्या चित्ताला लागली त्याला भविष्यत् काळाची आशाही उरलेली नाहीं. तर अशा फसगतींत न पडतां आपल्या ध्येयाकडे पोंहोंचण्याची खटपट आपण करीत राहिलों तर आज ना उद्यां तेथें पोंहोंचण्याची आशा तरी आहे. आपलें सर्वस्व गरिबांना अर्पण कर हें सांगण्यांत समतेच्या तत्त्वाचेंच प्रतिपादन ख्रिस्तानें केलें आहे. संपत्तीच्या आधिक्यामुळें वेगळेपणा येतो आणि त्यांतून पुढें हक्क सांगण्याची बुद्धि निर्माण होते. ही बुद्धि ज्या ज्या कारणांनीं निर्माण होण्याचा संभव असतो, त्या त्या कारणांच्या मुळाशींच कुऱ्हाड घालण्याचा यत्न ख्रिस्तानें केला आहे. याकरितां त्याचा खरा भावार्थ लक्ष्यांत आणून त्याचें अनुसंधान वर्तणुकींत राखण्याचा यत्न आपण केला पाहिजे. समतेचें तत्त्व चित्तांत बाणेल आणि चालू व्यवहारांत उतरेल अशा रीतीनें वागणें हेंच आपलें कर्तव्य आहे. हें साध्य होण्याकरितां जें जें कांहीं करावें लागेल तें तें अवश्य केलें पाहिजे. ज्या ज्ञानाच्या योगानें ही साम्यावस्था प्राप्त होते तें ज्ञान संपादन

करण्याकरितां खटपट केली पाहिजे. सामान्य लोकांपेक्षां चार अक्षरें आपणास अधिक येतात आणि त्यांच्याहून अधिक सुंदर भाषा आपणास बोलतां येते इतक्यानेंच तुम्ही स्वतःस त्यांच्याहून श्रेष्ठ समजत असतां; पण अशा भलत्याच भ्रमांत जोंवर तुम्हीं स्वतःस बांधून घेतलें असेल तोंवर मुक्तिमार्गाकडे एक पाऊलभरही तुम्हीं पुढें टाकलेलें नाहीं हें पक्कें लक्ष्यांत ठेवा. हा मार्ग मुक्तीचा नाहीं, इतकेंच नव्हे तर यामुळें तुमच्या पायांतील शृंखलेला एक एक नवा दुवा तुम्ही रोज जोडीत असतां; आणि अशांतच 'मी साधु, मी ब्रह्मनिष्ठ' या भ्रमानें जर तुमच्या चित्तास पछाडलें, तर मग ईश्वरच तुमचें रक्षण करो. मग त्या दुर्गतीपंकांतून तुम्हांस बाहेर ओढण्याचें सामर्थ्य या भुवनत्रयांत कोणाच्याही अंगीं नाहीं. 'मी साधु' या पाशापुढें नागपाश आणि कालपाश हे कःपदार्थ होत. पैशाचा मोठेपणा अथवा दुसऱ्या कसल्या गोष्टीनें आलेला मोठेपणा हा जीवात्म्यास इतक्या पक्क्या रीतीनें बांधीत नाहीं; पण 'मी साधु' या पाशाचा प्रभाव अतर्क्य–अलक्ष्य आहे. मनुष्याच्या मनांत घर करण्याकरितां टपून बसलेल्या पिशाचसंघांत हा ब्रह्मसमंध आहे. याचें बिऱ्हाड एकदां आलें कीं त्याला गाडणारा पंचाक्षरी तुम्हांस कोठेंही भेटावयाचा नाहीं. तुम्ही स्वतःस ज्या गुणानें अधिक पवित्र समजत असतां तो गुण कोणचा? तुमच्या ठिकाणीं असलेल्या ईश्वरत्वाचा. हें ईश्वरत्व इतर ठिकाणींही आहे; आणि स्वतःच्या ठिकाणचें ईश्वरत्वच सर्वत्र भरलें आहे हें तुम्हांस कळलें नसेल, तर ज्ञानाचा ओनामाही तुम्हांस ठाऊक नाहीं. अशा स्थितींत स्वतःस तुम्ही ज्ञानी समजत असाल, तर तुम्ही अज्ञाहून अज्ञ इतकें मात्र खरें. "सर्वं खल्विदं ब्रह्म' मग यांत उच्चनीचता आली कोठून? "रामसभामें हरिजन बैठे को बडा को छोटा है" परमात्म्याच्या देवळाच्या सभामंडपांतच सर्व विश्व बसलें आहे. हें ज्ञान तुम्हांस झालें असेल तर ठीकच आहे, आणि तसें नसेल तर ईश्वराची भेट होण्यास अद्यापि बरेंच कल्प तुम्हांस वाट पाहावी लागणार हें उघड आहे.

---

७

## हक्क.

या साऱ्या सृष्टीच्या घडामोडीचें अवलोकन केलें तर त्यांत दोन प्रकारच्या शक्तींचीं कार्यें सुरू आहेत असें आढळून येतें. यांतील एक शक्ति सदोदित विघटनेचें कार्य करीत असते. संयुक्त पदार्थांतील घटक एकमेकांपासून विभक्त करावयाचे हें तिचें कार्य आहे; आणि दुसरी शक्ति एकीकरणाची क्रिया करीत असते. सृष्टींतील वेगवेगळे पदार्थ एकत्र आणून त्यांचा संयोग करावयाचा हें या दुसऱ्या प्रकारच्या शक्तीचें कार्य आहे. पहिल्या प्रकारच्या शक्तीमुळें व्यक्ती निर्माण होत असतात; आणि दुसरी शक्ति, जणूं काय, या साऱ्या व्यक्तींची अथवा व्यष्टींची गांठ बांधून त्यांना समष्टिरूप करावें व त्यांच्यांत एकतानता आणावी यासाठीं धडपडत असते. अशा रीतीनें विभक्ततेचा प्रत्यय सर्वत्र येत असतांही तिच्याच पोटीं एकतानतेची धडपडही चालू आहे. या दोन्ही शक्तींचें कार्य सृष्टीच्या सर्व भागांत आणि मनुष्याच्या जीवनांतही चालू असल्याचा प्रत्यय येतो. केवळ जड अथवा पदार्थसृष्टीकडे पाहिलें तरी तींत या दोन्ही शक्तींचें कार्य अगदीं स्पष्ट स्वरूपानें दिसतें. एका पक्षीं पहिल्या शक्तीच्या कार्यामुळें व्यक्ति व्यक्तीपासून भिन्न होत असते. दोन व्यक्तींत प्रत्येकीं विशिष्ट गुणदोषांची वाढ होऊन त्या व्यक्ती परस्परांपासून अधिकाधिक दूर होत असतात; आणि दुसऱ्या पक्षीं दुसऱ्या प्रकारच्या शक्तीच्या कार्यामुळें अनेक व्यक्तींत गुणदोषांचें साधर्म्य उत्पन्न होऊन त्यांची एक जाति बनत असते. एका जातींत समसमान गुणांच्या अनेक व्यक्ती एकत्र बांधल्या जातात आणि यामुळें त्यांच्यांत एकतानता उत्पन्न होत असते. एका जातींत बाह्य आकारानें व अंतर्गत गुणांनीं एकमेकांशीं जुळणाऱ्या अनेक व्यक्तींचा समावेश होतो. हाच नियम मनुष्यप्राण्याच्या सामाजिक जीवनालाही लागू आहे. मनुष्य समाजरूपानें राहूं लागला तेव्हांपासून त्या समाजांत घटना आणि विघटना या दोन शक्तींचें कार्य सतत सुरू राहिलें आहे. या दोन क्रियांचीं रूपें देश, काल आणि परिस्थिति यांस अनुसरून वेगवेगळ्या प्रकारचीं होतात आणि तदनुरूप भिन्न

भिन्न संज्ञा त्यांस प्राप्त होतात. अशा रीतीनें या क्रियांचीं रूपें देशकालानुरूप वेगवेगळीं असलीं तरी त्यांच्या पोटीं रहस्य एकच असतें. एक शक्ति विघटना करीत असते आणि दुसरी संघटनात्मक असते. एकीच्या क्रियेनें जाती निर्माण होत असतात आणि दुसरीमुळें त्या मोडल्या जात असतात. एकीमुळें वर्गीकरण होऊन उच्च व नीच जाती आणि विशिष्ट प्रकारचे हक्क हीं निर्माण होत असतात आणि दुसरीमुळें त्यांचा नाश होत असतो.

या साऱ्या विश्वाकडे पाहतां तें या दोन शक्तींच्या भांडणाचें रणक्षेत्र आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. किंबहुना, या परस्परविरोधी शक्ती अस्तित्वांत नसत्या तर हें विश्वही अस्तित्वांत आलें नसतें. संघटनात्मक शक्तीच्या क्रियेविषयीं एक आक्षेप वारंवार ऐकूं येत असतो. ही शक्ति संघटनात्मक कार्य करीत असते; आणि संघटनात्मक क्रिया म्हणजे सर्वांचें समीकरण. असें समीकरण म्हणजे सर्वत्र शून्याकार अथवा मृत्यूचें साम्राज्य होय हें उघड आहे. याकरितां या शक्तीच्या क्रियेविरुद्ध बनेल ती खटपट आपण केली पाहिजे असें सांगणारे तत्त्ववेत्ते आढळतात. या शक्तीची क्रिया प्रतिरोधावांचून चालूं दिली तर विश्वाचा अंत होईल असें त्यांचें म्हणणें आहे. आपणापुढें जे अनेक देखावे दिसतात ते विघटनात्मक शक्तीच्या कार्यामुळें उत्पन्न झाले आहेत. ही शक्ति नष्ट झाली आणि ही सारी विश्वरचना दुसऱ्या शक्तीच्या हातीं सांपडली तर ही सारी विविधता नाहींशी होईल आणि ती नष्ट झाली म्हणजे विश्वही केवळ एकरूपाचा एक गोळा होऊन बसेल. विश्वाची अवस्था अशी होऊं नये अशी मनुष्यजातीची इच्छा असणें स्वाभाविक आहे. हाच नियम आपल्या आजूबाजूच्या साऱ्या परिस्थितीला कोणी कोणी लागू करीत असतात. विविधता आहे म्हणून आपण देहधारी आहों. देहांतील ही विविधता नाहींशी होऊन तेथें शुद्ध एकतानता उत्पन्न होणें हाच देहाचा मृत्यु होय. त्याचप्रमाणें समाजांत ही विविधता असणें हें समाजदेहाच्या अस्तित्वास आवश्यक आहे. अशी विविधता समाजांत नसेल तर समाजही मृत्युवश होईल अशी या पक्षाची उपपत्ति आहे. विचाराची विविधता नष्ट होऊन समाजांतील सर्व घटक एकाच प्रकारचे विचार चित्तांत धरून बसूं लागले तर मानसिक शक्ति मृतप्राय होईल आणि सारा समाज अखेरीस अधोगतीच्या मार्गास लागेल अशी भीति या पक्षाला वाटते. याक-

रितां अशी एकतानता वंद्य नसून निंद्य आणि त्याज्य आहे. ही विचारपरंपरा सांगणारा पक्ष सर्व देशांत आणि सर्व कालीं अस्तित्वांत होता आणि आजही तो सर्वत्र अस्तित्वांत आहे. निरनिराळया देशांत अस्तित्वांत असलेल्या या पक्षांत कोठें भेद असेल तर तो भाषेचा मात्र आहे. देशकालानुरूप हेंच तत्त्व अनेक भाषांनीं प्रकट होत असतें. हा पक्ष या तत्त्वाचा उच्चार पुनःपुन्हां मोठ्या जोरानें करीत असतो आणि असें करण्यांत जातीची उच्चनीचता समाजांत कायम राहीसें करावें हाच उद्देश त्याला साधावयाचा असतो. ज्या वेळीं एखाद्या जातीचें वर्चस्व कायम राखावयाचें असेल त्या वेळीं या तत्त्वाचा उच्चार हा पक्ष फार जोरानें करीत असतो. आमच्या हिंदुस्थानांतील ब्राह्मण हीच उपपत्ति आपल्या सामाजिक हक्कांच्या रक्षणासाठीं पुढें आणीत असतात. जातिभेद नष्ट झाला तर समाजही नष्ट होईल असें ते म्हणतात. हिंदुसमाजाइतका प्राचीन समाज आज कोठेंही अस्तित्वांत नाहीं, ही गोष्ट इतिहाससिद्ध आहे; आणि हिंदुसमाज इतक्या स्थित्यंतरांतून वांचला याचें कारण जातिभेद आहे असें त्यांचें म्हणणें आहे. अशा रीतीनें ऐतिहासिक पुराव्याचा उपयोग करावयास सांपडल्यामुळें त्यांच्या या मताला सकृद्दर्शनीं तरी मोठें महत्त्व प्राप्त होतें. दीर्घ आयुष्य जीमुळें प्राप्त होतें अशी वस्तु व्यक्तीला अथवा समाजाला अत्यंत इष्ट अशीच गणली पाहिजे असें अधिकारयुक्त वाणीनें ते सांगत असतात, आणि हें त्यांचें म्हणणें खोडून काढणें मुष्किलीचें आहे असें सकृद्दर्शनीं तरी मनांत आल्यावांचून राहत नाहीं.

जगाचें अस्तित्व ऐक्यावर नसून भेदावर अवलंबून आहे असें म्हणणारा पक्ष ज्याप्रमाणें आरंभापासून अस्तित्वांत आहे, त्याचप्रमाणें ' सर्वं खल्विदं ब्रह्म ' असें म्हणणारा पक्षही त्याच काळापासून अस्तित्वांत आहे. उपनिषद्ग्रंथ, बुद्ध, ख्रिस्त इत्यादिकांच्या कालापासून तों थेट चालू क्षणापर्यंत या पक्षाच्या अस्तित्वाचा प्रत्यय येतो. देशकालपरिस्थित्यनुरूप या पक्षाच्या भाषेंत फरक पडत असला तरी मूलतत्व तेंच आहे हें लक्ष्यांत आणलें पाहिजे. गरिबांचा कैवारी सोशालिस्ट पक्ष, ज्यांना समाजांत कसलाच हक्क नाहीं अशा खालच्या वर्गाचें पुढारीपण स्वीकारणारा पक्ष, वगैरे साऱ्या मतांचे प्रचारक हे तत्त्वतः या ऐक्यपक्षाचेच लोक होत. अमुक मनुष्य कमी कां अथवा अमुका दुसरा अधिक कां, असा प्रश्न हे लोक विचारतात तेव्हां या

प्रश्नाच्या पोटीं सर्व साम्याच्या तत्त्वाचाच अंतर्भाव झालेला असतो; तथापि मनुष्यस्वभावच असा आहे कीं गोड ऊंस मुळासकट खावा. कोणत्याही कारणानें त्याला विशिष्ट हक्कांची प्राप्ति झाली कीं त्यांच्या रक्षणासाठीं त्याची धडपड एकसारखी सुरू असते. आपल्या हक्कांच्या रक्षणासाठीं सारें बुद्धिबल तो एकत्र करीत असतो. बुद्धिवादांत प्रतिपक्षाला नामोहरम करण्याकरितां अगदीं एकदेशीय विचारही पुढें आणावयास तो कचरावयाचा नाहीं. या प्रश्नाला दोन बाजू आहेत ही गोष्ट विसरणें त्याला अधिक सोयीचें वाटतें. यामुळें प्रतिपक्षाच्या विचारसरणीकडे ढुंकूनही न पाहतां आपलेंच म्हणणें तो पुनःपुन्हां मोठ्या आवेशानें प्रतिपादित असतो. ही तऱ्हा दोन्ही पक्षांत सारखीच आढळून येते.

अतींद्रिय शास्त्राच्या दृष्टीनें विचार करतां हाच प्रश्न आणखीही एका स्वरूपानें आपणासमोर उभा राहतो. विश्वांत आकारांची विविधता आहे. या विविधतेच्या पोटीं कोठें एकतानता आहे कीं नाहीं हा प्रश्नच विचारार्ह नाहीं असें बौद्धांचें म्हणणें आहे. जग आहे असेंच घेऊन चालण्यांत आपलें नडतें कोठें असा उलट प्रश्न ते विचारतात; आणि ज्या अर्थीं आपलें नडत नाहीं त्या अर्थीं तें आहे तसेंच ठीक म्हणून चालणें त्यांना इष्ट वाटतें. ते ह्मणतात विविधता हेंच जीविताचें सारसर्वस्व आहे. बाह्यतः ती कितीही दुःखप्रद आणि दुबळी वाटत असली तरी जीविताचें सारें स्वारस्य तींतच आहे. याकरितां ती टाकूं पाहणें म्हणजे जीवित निःसार करणें होय.'' यावर वेदान्त उत्तर देतो, " मूलस्थानापासून भ्रष्ट झालेल्या आणि त्यामुळें विविधता पावलेल्या या रूपाकडे पाहूं नका. जेथून ही विविधता उत्पन्न होते त्या मूल एकरूपाकडे पहा.'' यावर बौद्ध म्हणतात, " एकरूपता ही काल्पनिक वस्तु आहे. प्रत्यक्ष अनुभवाच्या विविधतेला सोडून काल्पनिक ऐक्याच्या मागें कां लागतां ?'' प्राचीन काळीं असलेला हा मतविरोध आपल्या आजच्या काळापर्यंत असाच चालत आला आहे. प्राचीन काळापेक्षां सध्याच्या काळीं आपल्या ज्ञानांत कितीतरी मोठी भर पडली असतां धर्मविचारांत आणि अतींद्रिय शास्त्राच्या सिद्धांतांत एवढा विरोध कां असावा असा प्रश्न कदाचित् उभा राहील; पण त्याला उत्तर हेंच कीं प्राचीन काळापेक्षां सध्याच्या काळीं ज्ञानाच्या समवायी रूपांत फारशी भर पडलेली नाहीं. पूर्वींच्या लोकांहून

आपण अधिक ज्ञानी असें आपणास वाटतें, पण हा आपला भ्रम आहे. अतींद्रियशास्त्र पांच हजार वर्षांपूर्वीच अगदीं कळसास पोहोंचून गेलें होतें. त्याचप्रमाणें अति प्राचीन काळींच धर्मविचारही पूर्णता पावले होते. या बाबींत आपली सांप्रतची करामत म्हटली तर निराळ्या भाषेंत तेच सिद्धांत पुन्हां उगाळणें इतकीच आहे. फार झालें तर त्या सिद्धांतांची सत्यता सिद्ध करण्यास कांहीं नवीं उदाहरणें आपण पुढें करतों. यामुळें या परस्परविरोधी मतांचें युद्ध आजतागाईत असेंच चालू आहे. एक पक्ष आह्मांला विविधतेशीं जखडून ठेवण्याचा यत्न करीत आहे आणि दुसरा त्याविरुद्ध भांडत आहे. सकृद्दर्शनीं अनुल्लंघ्य अशीं प्रमाणें उभीं करून पहिला पक्ष विविधता चिरस्थायी आहे व ती तशीच राहणार असें अट्टाहासानें सांगत आहे. ज्याला आपण जीवित असें म्हणतों तो विविधतेचा परिणाम आहे असें तो म्हणत आहे. उलटपक्षीं दुसरी बाजू ऐक्याकडे आपणास तितक्याच अट्टाहासानें ओढूं पाहत आहे.

नीतिशास्त्राच्या दृष्टीनें या प्रश्नाचा विचार करतां या विरोधी मतांच्या लढाईंत हें शास्त्र पडलेलें नाहीं असें आढळून येतें. या रणांगणाच्या आसपासही राहूं नये अशा विचारानें तें तेथून पुष्कळच लांबवर गेलें आहे. या लढाईचा संपर्कही स्वतःस लागूं न देतां आपला मार्ग अगदीं स्वतंत्रपणें काढणारें असें एखादें शास्त्र असेल तर तें नीतिशास्त्रच होय. अशा प्रकारची एखादी लढाई चालू आहे हा विचारसुद्धां न करतां ऐक्याच्या दिशेनें आपला मार्ग तें आक्रमीत आहे. नीतिशास्त्राचा मूळ पायाच ऐक्य हा आहे. प्रेम हें नीतिशास्त्राचें जीवन. विविधतेकडे नीतिशास्त्र ढुंकूनही पाहावयाचें नाहीं. सर्वत्र ऐक्य उत्पन्न करावयाचें, या एकाच इराद्यानें आपलें कार्य तें करीत आहे. मानवजातीनें शोधून काढलेले नीतिशास्त्राचे अत्युच्च नियम चाळून पाहतां, त्यांत विविधतेला थाराही मिळावयाचा नाहीं असें आपणास आढळून येईल. विविधता ही कोणत्या जातीची उपपत्ति आहे याची चौकशी करण्यापुरताही वेळ, जणूं काय, त्याला नाहीं. त्याचा उद्देश एकच. सर्वत्र ऐक्य घडवून आणावें एवढीच गोष्ट तें जाणतें. आमच्या हिंदुशास्त्रकारांची मनःप्रवृत्ति स्वभावतःच पृथक्करणप्रिय आहे. विचाराकरितां एखादा पदार्थ त्यांनीं हातीं घेतला कीं त्याचे सगळे घटक वेगळे करून त्यांचा पुरा शोध

लावल्यावांचून ही प्रवृत्ति स्वस्थ बसत नाहीं. जगाच्या या संसाराचें पृथक्करण अशाच रीतीनें करतां करतां सर्व विविधतेच्या अंतर्यामीं ऐक्य आहे असा निश्चय हिंदु शास्त्रांनीं केला. विश्वाचा मूळ पाया ऐक्य आहे असा निश्चय एकवार झाल्यावर पुढील साऱ्या इमारतीची रचना याच पायावर त्यांनीं केली. तथापि त्याच हिंदुस्थान देशांत बौद्धादि विविधतावादी पंथ निर्माण झाले हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. या पंथांना ऐक्य म्हणून कोठें आढळलेंच नाहीं. विविधता हेंच त्यांच्या दृष्टीनें सत्य रूप होतें. विविधता आणि ऐक्य यांच्यांत कांहीं परस्परसंबंध असेल असें त्यांच्या स्वप्नींही आलें नाहीं.

जुन्या ग्रीस देशांतील एक दंतकथा प्रो. मॅक्समुल्लर यांनीं कोठल्याशा पुस्तकांत सांगितली आहे तिचें स्मरण या ठिकाणीं मला होतें. एके वेळीं एक ब्राह्मण साक्रेटिस यास भेटण्यासाठीं अथेन्स शहरीं गेला होता. ब्राह्मण साक्रेटिसाला म्हणाला, “ अत्युच्च ज्ञान कोणतें ?” साक्रेटिसानें उत्तर दिलें, “मनुष्याचें स्वरूप जाणणें हाच सर्व ज्ञानाचा अत्युच्च परिपाक आहे. ज्ञानाचें अखेरचें साध्य हेंच.” ब्राह्मण ह्मणाला, “ पण परमेश्वराला जाणल्यावांचून मनुष्याचें स्वरूप कसें जाणतां येईल?”

अर्वाचीन युरोपीय ज्ञानाचा मूळ पाया ग्रीक तत्त्वज्ञान हाच आहे. यामुळें अर्वाचीन युरोपीय तत्त्वज्ञानाचा सारा रोंख मनुष्याचें स्वरूप जाणण्याकडे आहे. मनुष्याचें स्वरूप जाणण्यांतच साऱ्या ज्ञानाची परिसमाप्ति होते असें युरोपीय मत आहे. हिंदु तत्त्वज्ञान याहून निराळ्या दिशेनें गेलें आहे. परमेश्वराच्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान प्रथम झालें पाहिजे असें हिंदु तत्त्वज्ञानाचें म्हणणें असून जगांतले बहुतेक जुने धर्म याच मताचा अनुवाद करतात. परमेश्वराचा वास सृष्टींत आहे असें एक पक्ष पाहतो आणि सृष्टीचा वास परमेश्वराच्या ठिकाणीं आहे असें दुसऱ्याच्या दृष्टीला दिसतें. या दोन्ही पक्षांना मध्यस्थ अशा स्वरूपानें आपण सांप्रत उभे आहों. या दोहोंपैकीं कोणत्याही एकाच ग्रहानें आपणास पछाडलेलें नाहीं. यामुळें दोहोंत मध्यस्थ राहून निर्विकार चित्तानें यांचें परीक्षण करणें आपणांस शक्य आहे. दोहोंचेंही बलाबल पाहून योग्य निर्णय करण्यास जी पूर्वग्रहशून्यता पाहिजे ती सांप्रतकाळीं आपणाजवळ आहे असें मला वाटतें. सृष्टींत विविधता आहे ही

गोष्ट इतकी उघड आणि प्रत्येकाच्या प्रत्यक्ष अनुभवांतली आहे कीं ती सिद्ध करण्यास कसलाही बाहेरचा पुरावा आणण्याचें कारण नाहीं; आणि विविधता असल्याशिवाय जीवित शक्य नाहीं हेंही खरें आहे. त्याच प्रमाणें या विविधतेच्या मागें ऐक्य कोठें आहे हें आपणास पहावयाचें असेल तर तें कार्यही विविधतेच्या द्वारेंच आपणांस केलें पाहिजे हेंही खरें आहे. तसेंच सृष्टीच्या द्वारें परमात्मरूपाचा प्रत्यय येतो, हें जितकें खरें आहे तितकेंच परमात्मरूपावर सृष्टीचा आविर्भाव आहे हेंही खरें आहे. मनुष्य हा सृष्ट प्राणी असल्यामुळें त्याचें ज्ञान झाल्यास परमात्मरूपाचें ज्ञान होईल हें खरें आहे, आणि परमात्मरूपाचें ज्ञान हें अत्युच्च कोटीचें ज्ञान आहे हेंही खरें आहे. परमात्मरूपाचें ज्ञान झाल्याशिवाय मनुष्यरूपाचें ज्ञानही साकल्यें करून होणार नाहीं. अशा रीतीनें या साऱ्या वस्तुसंघांत परस्परविरोध असल्याचा प्रत्यय येत असला तरी मानवी मनाची रचना या विरोधाभासावरच अवलंबून आहे. विश्वाचा हा सारा देखावा म्हणजे एकानेंच अनेक सोंगें घेऊन अनेक रूपें दाखवावीं तसें आहे. एकताнतेवर अनेक रूपाच्या तरंगांचा हा खेळ आहे. ऐक्य आणि विविधता यांच्यांत जो खेळ सुरू आहे त्याचेंच नांव विश्व. सान्त आणि अनंत यांच्यांतील जो झगडा त्याचेंच नांव विश्व. यांपैकीं कोणा एकाचें अस्तित्व मानावयाचें असेल तर त्याबरोबर दुसऱ्याचें अस्तित्व मानणेंही अवश्य आहे. तथापि एकाच वस्तूला अस्तित्व आणि नास्तित्व अशीं दोन रूपें असून दोन्हीही खरीं आहेत असें मात्र नव्हे; पण असें असतांही या विश्वाचें चक्र अशाच विरोधी स्वरूपांत आणि झगड्यांत चालावयाचें आहे, हा अखेरचा महत्त्वाचा मुद्दा सदोदित लक्ष्यांत बाळगला पाहिजे.

आजच्या प्रसंगीं आपणास नीतिशास्त्राचा विचार कर्तव्य नसून धर्मविचार हें आपलें प्रथम कर्तव्य असल्यामुळें या प्रश्नाचा विचार आपणास त्या दिशेनें केला पाहिजे. ज्या स्थितींत कसलेंही वैचित्र्य नाहीं आणि जेथें सर्वत्र एकतानता आहे अशी स्थिति म्हटली म्हणजे मृत्यूचीच होय. अशा स्थितींत जीवित शक्य नाहीं. जेथें विचारवैचित्र्य नाहीं तेथें विचाराला स्फूर्ति तरी कोठून असणार ? आणि स्फूर्तीच्या अभावीं विचार जिवंत तरी कसे राहणार ? याकरितां जीवित आहे तोंपर्यंत विविधता म्हणजे वैचित्र्य हें असणारच. हें वैचित्र्य नाहींसें होणें इष्ट नाहीं. तथापि या वैचित्र्यामागें ऐक्य आहे हें

नाकबूल करून चालावयाचें नाहीं. कारण ती वस्तुस्थितीच आहे. जी गोष्ट खरीच आहे ती डोळ्यांआड करण्यापासून फायदा काय ? येथें विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट हीच आहे कीं या वैचित्र्यांतून ऐक्य नवें निर्माण करावयाचें नसून तसें ऐक्य अगोदरच अस्तित्वांत आहे. असें ऐक्य मुळांत नसतें तर तुम्हांस हें वैचित्र्य—ही विविधता—दृष्टीसच पडती ना. या विविधतेची ही सारी इमारत ऐक्याच्या पायावर उभी आहे. ऐक्य हेंच परमेश्वराचें स्वरूप. परमेश्वराला नवीन निर्माण करावयाचें नसून त्याचें अस्तित्व आधींच आहे हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. सर्व धर्मांनीं हीच गोष्ट मुख्यत्वें-करून सांगितली आहे. सान्त वस्तु ज्याला साकल्येंकरून समजली त्याला अनंतही जवळच आहे, असा प्रत्यय येईल. कित्येक धर्मांनीं सान्त वस्तूच्या म्हणजे बाह्य आकाराच्या बाजूवर अधिक जोर दिला आहे, आणि सारे बाह्य आकार सान्त आहेत असें त्यांचें प्रतिपादन आहे. दुसऱ्या कित्येकांनीं फक्त अनंतरूपाचाच विचार करून सर्वत्र अनंतच भरला आहे आणि सान्त वस्तूला कोठें अवकाशच नाहीं असें सांगितलें आहे. शुद्ध तर्कशास्त्रदृष्ट्या यांतील कोणतेंही एकच प्रतिपादन सर्वांशीं खरें नाहीं. हीं दोन्ही स्वरूपें जोडीनें राहत असून एकाच्या साहाय्यावांचून दुसऱ्याचा अनुभव होणें शक्य नाहीं अशी वस्तुस्थिति आहे. सर्व विविधतेच्या मुळाशीं ऐक्य आहे असा अखेरचा धर्मसिद्धांत आहे. याला आपण ऐक्य म्हणा, अनंत म्हणा अथवा पूर्णरूप म्हणा. तें नवें निर्माण करावयाचें नसून त्याचें अस्तित्व आधींच आहे. अशा स्थितींत ही वस्तुस्थिति ओळखणें आणि तिचा प्रत्यक्ष अनुभव घेणें इतकेंच आपलें कर्तव्य बाकी उरतें. ऐक्य आहे ही गोष्ट आपणास कदाचित् समजत नसेल, अथवा थोडी फार समजत असल्यास स्पष्ट भाषेनें ती सांगावयास येत नसेल, अथवा इंद्रियांना ती प्रत्यक्ष गोचर नसेल, तथापि तें त्रिवार सत्य आहे. मुळांत असलेल्या या ऐक्याचा अनुभव घेणें, एवढेंच कार्य आपणास करावयाचें उरलें आहे. हें ऐक्य नवीन उत्पन्न करावयाचें नाहीं. शुद्ध विवेक बुद्धीच्या दृष्टीनें सुद्धां मुळांतील हें ऐक्य कबूल केल्यावांचून आपणास गत्यंतर नाहीं. कारण मुळांत चिरस्थायी ऐक्य नसेल तर विविधताही पाहणें आपणास शक्य नाहीं. आपणाभोंवतीं पसरलेल्या या विविध वस्तूंच्या देखाव्यांत भिन्नता दिसते; तुम्ही आणि मी असे आपण वेगवेगळे प्राणी आहों असें वाटत असतें;

तथापि त्याच वेळीं आपण भिन्न नाहीं असा सूक्ष्म ध्वनि आपल्या अंतरंगांत असतो. अशा प्रकारचें ऐक्य अस्तित्वांत नसेल तर ज्ञानाचीही उत्पत्ति होणार नाहीं. मुळांत साम्य असल्याशिवाय विविधतेचा प्रत्यय अथवा ज्ञान यांपैकीं कशाचीच उत्पत्ति व्हावयाची नाहीं. याकरितां विविधता आणि ऐक्य यांचा वास एकत्र आहे हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. चालू जीवितांत सर्वत्र समता प्रस्थापित करावी असा नीतिशास्त्राचा हेतु असेल तर तसें घडणें सर्वथा अशक्य दिसतें. सर्व मनुष्यांनीं सर्व दृष्टींनीं एकसारखेंच होणें ही गोष्ट शक्य नाहीं. असें व्हावें याकरितां केवढाही अट्टहास आपण केला, तरी तसें कधींही घडावयाचें नाहीं. व्यक्ती तितक्या प्रकृती अथवा " पिंडे पिंडे मतिर्भिन्ना " या म्हणी आपल्या लक्ष्यांत असतीलच. सर्व प्रकारें सारखीं अशीं दोन मनुष्येंसुद्धां आपणास आढळत नाहींत. कारण मनुष्यामनुष्यांतील फरक जन्मसिद्ध असतो. जन्मतःच त्यांच्यांत प्रकृतिवैचित्र्य असतें. कित्येक दुसऱ्यांपेक्षां अधिक सामर्थ्यवान् असतात. कित्येकांना कांहीं गुण जन्मतःच प्राप्त झालेले असतात आणि तसे गुण दुसऱ्या कित्येकांत मुळींच नसतात. कित्येक शरीरानें धडधाकड असतात, तर दुसरे कित्येक जन्मापासून पाप्यांचीं पितरें असतात. जन्मादारभ्य असलेले हे भेद आपण कशानें नाहींसे करणार ? जगांतील जीवितसंग्राम चालविण्यासाठीं ज्या शस्त्रास्त्रांनीं सिद्ध होऊन या जगांत आपण अवतरतों त्यांत आरंभींच जो फरक असतो तो कशानेंही नाहींसा व्हावयाचा नाहीं. वाढत्या वयानें हा फरक उलट अधिक व्यक्तदशेला मात्र येतो; पण असें आहे तरी या सर्वांच्या मागें ऐक्य आहे हेंही खोटें नाहीं. नीतिशास्त्राचा सिद्धांत हीच गोष्ट आपल्या कानींकपाळीं ओरडून नित्य सांगत आहे. आजपर्यंत होऊन गेलेल्या अनेक साधुसंतांनींही आपणास वारंवार हेंच सांगितलें आहे. " **इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः। निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः॥** " हाच या सर्वांचा अखेरचा सिद्धांत आहे. त्यांचा हा सिद्धांत सर्वथा खरा आहे ही गोष्ट आपणास नाकबूल करतां यावयाची नाहीं. तथापि त्याबरोबरच आणखीही एक गोष्ट लक्ष्यांत ठेवली पाहिजे. बाह्य आकारांत आणि सूक्ष्माच्या जड रूपांत जो फरक दिसतो तो कशानेंही नाहींसा व्हावयाचा नाहीं. दृश्यस्थितींतील फरक दृश्यावस्थेच्या अंतापर्यंत कायम राहावयाचा आहे हें विसरतां उपयोगी नाहीं.

साम्य उत्पन्न होण्याकरितां आपण केलेल्या अनेक खटपटींचें अत्युच्च फळ म्हटलें म्हणजे विशेष हक्क नाहींसे करणें हें होय; आणि इतकें मात्र आपणांस करतां येण्यासारखें आहे. आपणापुढें जें कांहीं कार्य आज आहे तें हेंच. हें सिद्ध होण्याकरितां एखाद्या व्यक्तीनें अथवा एखाद्या राष्ट्रानेंच नव्हे, तर साऱ्या जगानें खटपट केली पाहिजे. जगांतील साऱ्या समाजांत हें युद्ध चालू आहे. या लढाईपासून मुक्त असा एकही समाज अथवा एकही मानववंश पूर्वी अस्तित्वांत नव्हता आणि सांप्रतही नाहीं. समाजांतील एखादा व्यक्तिसमूह बाकीच्या व्यक्तींहून बुद्धिमत्तेनें श्रेष्ठ असेल; पण एवढ्याकरितां बाकीच्या समाजांतील साऱ्या घटकांचें शारीरस्वास्थ्यसुद्धां त्यानें हिरावून घ्यावें हा कोठला न्याय? एक दुसऱ्याहून अधिक बुद्धिमान् आहे हेंच या अनर्थाचें मूळ नव्हे; तर आपल्या बुद्धीच्या जोरावर दुसऱ्यांच्या शारीरसुखाच्याही आड तो येऊं लागतो हीच मोठी अडचणीची गोष्ट आहे. ज्याला बुद्धि नाहीं त्याला बौद्धिक आनंदाची प्राप्ति अर्थातच नाहीं; आणि शारीरिक आनंद त्याला मिळावा हें योग्य असतां त्यालाही तो मुकतो. केवळ उच्चेतर बुद्धीमुळें उत्पन्न होणाऱ्या हक्कांचा नाश करण्यासाठीं या उभयपक्षांत रणें माजूं लागतात. त्याच प्रमाणें जे कित्येक शरिरानें वरिष्ठ असतात ते दुबळ्यांच्या सुखाच्या आड येतात; आणि असें कां ह्मणून विचारलें तर 'बळी तो कान पिळी' हा न्यायच आहे असें ह्मणूं लागतात. मग या दोन पक्षांत युद्धास सुरवात होते. केवळ शारीरिक बळ अधिक म्हणून दुसऱ्याच्या सुखाच्या आड येणें ही गोष्ट नीतिनिर्बंधांस सोडून आहे, आणि यामुळेंच दोन पक्षांत युद्धास सुरवात होते. दुसरे कित्येक लोक जन्मतःच द्रव्यदृष्टि असतात. पैशाचे दोन पैसे कसे करावे ही अक्कल इतरांहून त्यांस अधिक असते. एखाद्याच्या अंगीं असा गुण असणें स्वाभाविक आहे; पण जवळ चार पैसे अधिक होण्याबरोबर इतर गोरगरिबांस खुशाल तुडविण्याचा हक्क त्यास प्राप्त होतो काय? हें कर्म नीतीला सोडून असल्यामुळेंच श्रीमंत आणि गरीब यांच्यांतील तेढ सांप्रत विकोपास जाऊं पाहत आहे. आपल्या अंगांतील विशेष गुणांचा उपयोग दुसऱ्याला नाडण्याकडे करणें हेंच विशिष्ट हक्काचें रूप होय; आणि मानव जातीचा इतिहास युगांतरापासून पाहिला तरी प्रत्येक समाजांत असले राक्षसी हक्क नष्ट करण्याकडेच जनसमूहाची प्रवृत्ति आहे असें दिसून येईल. नीति-

शास्त्राचा रोखही याच दिशेनें आहे. याच मार्गानें आपणही कार्य करूं लागलों तर विविधतेचा लय न होतांही ऐक्यप्रवृत्ति वाढेल.

सांप्रत दिसणारी सारी विविधता अशीच राहूं द्या. त्याला आमची ना नाहीं; कारण विविधता हें जीविताचें रहस्य आहे. जीवित तीवरच अवलंबून आहे. तुम्ही कदाचित् श्रीमान् व्हाल आणि मी भिकारी राहीन. तुम्ही धष्टपुष्ट असाल आणि मी सुदामदेव असेन. तुम्ही मोठे पंडित असाल आणि मी अक्षरशत्रु असेन. तुम्ही धर्मवेत्ते असाल आणि मी धर्महीन असेन; पण असें असलें तरी काय झालें ? आपण एकमेकांच्या आड न येतां आपापल्या विशिष्ट जागीं सुखानें राहूं या. तुमच्यापाशीं एखादा गुण माझ्याहून अधिक असला म्हणून तेवढयानें तुम्ही माझ्याहून थोर होतां काय ? तुमच्या आणि माझ्या बाह्य स्थितींत जमीन अस्मानाचें अंतर दिसत असलें तरी वस्तुतः तुमची व माझी विश्वांतील जागा एकच आहे. तेथें लहानमोठा हा भेद नाहीं.

यापुढें नीतिशास्त्राला जें कार्य करावयाचें आहे तें विविधतेचा नाश हें नसून विविधतेच्या पोटीं ऐक्य आहे हें ओळखण्याचें आहे. सर्वत्र साम्यावस्था उत्पन्न करावयाची हें काम नीतिशास्त्राचें नव्हे. कारण एक तर हें अशक्य कोटींतलें आहे; आणि दुसरें असें कीं ज्या दिवशीं तें सिद्धीस जाईल त्या दिवशीं जगाचाही अंत होईल, आणि असें होणें इष्ट नाहीं. या विविधतेच्या मागें जें ऐक्य आहे तें परमात्मरूप आहे. तें ओळखणें हें त्या शास्त्राचें काम आहे. आज कोणी कितीही दुबळा असला तरी सामर्थ्याच्या साऱ्या निधीचा तो हक्कदार वारस आहे हें ओळखणें हें नीतिशास्त्राचें काम आहे. बाह्यतः कोणी कितीही पापी दिसत असला तरी तो अनंत आणि पुण्यमयरूपाचा अधिकारी आहे हें जाणणें हें नीतिशास्त्राचें काम आहे. अशा रीतीनें या प्रश्नाचा विचार दोन्ही बाजूंनीं आपण केला पाहिजे. एकच पक्ष स्वीकारण्यानें भावी युद्धाचें बीजारोपण आपण करीत असतों. वस्तुस्थिति आहे तशी साकल्यानें पाहणें हेंच युक्त आहे. तिची एखादी बाजू पाहून तो एकच पक्ष स्वीकारणें अनर्थास कारण होतें. दोन्ही बाजूंचा सारासार विचार करून त्यांतील तत्त्वांशाचें ग्रहण करणें आणि तीं तत्त्वें प्रत्यक्ष आचरणांत आणणें हेंच आपलें कर्तव्य आहे. अशा मार्गानें आपण चाललों तर व्यक्तिदृष्ट्या आपलें हित होईलच; पण समाजाचे एक घटक या नात्यानें समाजहितही साधेल.

८

# अभ्यास.

प्राणायामाच्या आणि तशाच प्रकारच्या दुसऱ्या कांहीं अभ्यासासंबंधीं आज आपणास कांहीं माहिती देण्याचा माझा विचार आहे. नुसत्या उपपत्तीसंबंधीं आज इतका दीर्घ काळ अनेक प्रकारची माहिती मीं सांगितली आहे कीं आतां प्रत्यक्ष अभ्यासासंबंधीं कांहीं माहिती सांगणें अवश्य झालें आहे. या विषयावर हिंदुस्थान देशांत फार मोठी ग्रंथसंपत्ति निर्माण झालेली आहे. ज्याप्रमाणें ऐहिक विषयांच्या बाबतींत तुम्ही पाश्चात्य लोक व्यवहारज्ञ आहां त्याचप्रमाणें अशा प्रकारच्या बाबतींत आमचा देश मोठा व्यवहारकुशल आहे. संसाराच्या बाबतींत जसा चोख व्यवहार करण्याकडे तुमचें सारें ध्यान असतें, त्याचप्रमाणें परमार्थाच्या बाबतींत आमची सारी अक्कल खर्च होत असते. तुमच्या देशांत पांचच माणसें एकत्र जमलीं तर ताबडतोब एखादी ' लिमिटेड कंपनी ' काढण्याच्या गोष्टी त्यांच्यांत सुरू होतात, आणि अवघ्या पांच तासांच्या आंत तशी एखादी व्यापारी मंडळी प्रत्यक्ष अस्तित्वांतही येते. आमच्या हिंदुस्थानांत दहा पांच माणसांनीं आपलीं डोकीं पन्नास वर्षें घांसलीं तरी असलें काम त्यांच्या हातून धडपणीं निभावयाचें नाहीं. असल्या प्रकारच्या गोष्टींचा व्यवहारच त्यांना ठाऊक नाहीं; पण एखाद्यानें एखादा नवा तत्त्वमार्ग काढला तर त्याला कांहीं ना कांहीं शिष्यमंडळी मिळावयाचीच. त्याच्या मार्गांत खरोखर कांहीं तथ्य आहे कीं नाहीं हा विचारसुद्धां कोणाच्या मनांत यावयाचा नाहीं. त्याच्या उपपत्तींत अरण्यपांडित्य भरलें असलें तरीही शेंकडों शिष्य त्याच्यामागें धांवतील. अहोरात्र बारा वर्षेंपर्यंत एका पायावर उभें राहिल्यास मुक्ति खात्रीनें मिळेल असें सांगणारा जरी कोणी उभा राहिला तरी तसल्या वेड्या पिराच्या मागें शेंकडों शिष्य लागतील आणि खरोखरच तसला अभ्याससुद्धां ते करूं लागतील. हा अभ्यास चालू असतां शारीरिक क्लेश कितीही भोगावे लागले तरी त्यांजकडे ही मंडळी लक्ष्य देणार नाहीं. असले हाल मोठ्या आनंदानें ते सोसतील. कित्येक पंथांतील लोक वर्षानुवर्षे आपला हात उभाच्या उभा

धरतात, आणि अखेरीस तो हात जागच्याजागीं वाळून झाडाच्या एखाद्या खांदीसारखा होतो. अशा प्रकारचे शेंकडों लोक मीं पाहिले आहेत. हे लोक निवळ टोणपे असतात असें समजण्याचें मात्र कारण नाहीं. यांतील कित्येकांचें ज्ञान इतकें खोल आणि बुद्धि इतकी विस्तृत असते कीं त्यांचें थोडेंसें भाषण ऐकून तुम्ही तोंडांत बोटच घालाल. ऐहिक शहाणपणाचा हक्क जसा तुमचा आहे तसाच पारलौकिक बाबींवर आमचा आहे. संसारांत जसे तुम्ही व्यवहारी, तसेच परमार्थांत आम्ही व्यवहारी आहों. परमार्थ हाच आमचा संसार. व्यवहार हा शब्द सापेक्ष आहे. केवळ संसारी मनुष्यच व्यवहारी असतो असें नाहीं. अंगीकृत कार्य सिद्धीस नेण्यासाठीं एकसारखी धडपड जो करतो त्या बाबींतला तो व्यवहारनिपुण होय. मग ती बाब संसाराची असो अगर परमार्थाची असो.

परक्या मनुष्याच्या वागणुकीचा विचार करतांना ही चूक आपण नेहमीं करीत असतों. स्वतःच्या मनाबरहुकूम दुसऱ्यांच्या कृतींचें परीक्षण आपण करीत असतों. आपल्या मनानें उत्पन्न केलेल्या लहानशा उंबरफळाला सारें विश्व मानून त्यावरून साऱ्या विश्वाचें परीक्षण आपण करीत असतों. आपण निर्माण केलेल्या विश्वाबाहेर जणूं काय दुसरें अस्तित्वच नाहीं असें आपणास वाटत असतें. आम्ही ह्मणूं ती नीति, आम्ही म्हणूं तें सत्कार्य, आम्ही म्हणूं तें कर्तव्य, आम्ही म्हणूं ती वस्तु उपयोगी अथवा निरुपयोगी असें आपणास नित्य वाटत असतें. युरोपच्या प्रवासांत असतां एके दिवशीं मार्सेल येथें माझा मुक्काम पडला. गांवांत त्या दिवशीं बैलांच्या टकरी व्हावयाच्या होत्या, ही बातमी ऐकून माझ्या बोटींतला प्रत्येक इंग्रज फ्रेंचांवर कडक टीका करीत सुटला. बैलांच्या टकरी लावणें हें त्यांना शुद्ध रानटीपणाचें लक्षण वाटलें; आणि हेच इंग्रज लोक गुद्दागुद्दीचा खेळ स्वतः खेळून एकमेकांचे डोळे सुजवीत असतात. असले कांहीं इंग्रज पहिलवान पॅरिस येथें गेले असतां फ्रेंचांनीं त्यांना शेणमार केला. बक्षिसाच्या लालुचीनें एकमेकांचे डोळे सुजवावयाचे हा खेळ फ्रेंचांना रानटीपणाचा वाटतो. निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या चाली अस्तित्वांत असतात, आणि त्यांवरून परस्पर परस्परांस नांवें ठेवीत असतात. कोणावरही टीका करूं नये अशा अर्थाचें जें ख्रिस्ताचें वचन आहे त्याची आठवण या प्रसंगीं मला होते. आपलें ज्ञान जों जों वाढत जातें तों

तों आपल्या ठिकाणीं अज्ञान किती भरलें आहे, हें आपणास कळूं लागतें. मनुष्याचें मन हा एक मोठा अजबखाना आहे. त्यांत अनंत विचारांचें भांडार सांठविलेलें आहे. माझ्या लहानपणीं असल्या हठयोग्यांच्या अभ्यासाच्या गोष्टी मी ऐकें तेव्हां मला हसूं येऊन असल्या लोकांवर मनमुराद टीका मी करीत असें. आमच्यांतील पुष्कळ साधुसंतांनीं सुद्धां असल्या प्रकारावर पुष्कळ कडक टीका केली आहे. कालेंकरून माझें वय वाढत जात आहे तों तों अशी टीका करण्याचा अधिकार आपणास नाहीं हेंच मला अधिकाधिक पटत आहे. ते ज्या क्रिया करतात आणि त्या करीत असतां ज्या भयंकर विपत्ती ते भोगीत असतात, त्याच्या शतांश विपत्ती भोगण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं असतें तर किती तरी बरें झालें असतें, असेंही केव्हां केव्हां माझ्या मनांत आल्यावांचून राहत नाहीं. सूक्ष्म विचारांतीं या माझ्या भावनेचें खरें स्वरूप माझ्या लक्ष्यांत आलें. स्वशरीराला पीडा करणाऱ्या या लोकांकडे पाहून मला राग येतो, त्यांना शिव्या देण्याची इच्छा मला होते; पण ही भावना पीडेची अनावड माझ्या चित्तांत आहे म्हणून उत्पन्न झाली असें मात्र नव्हे. माझ्या अंतःकरणाच्या कोमलपणाचा तो परिणाम नसून माझ्या भेकडवृत्तींतून ही असूया निपजली आहे. त्यांच्याप्रमाणें वागण्याची छाती मला नाहीं; तितकें धैर्य मजपाशीं नाहीं. जें मला करवत नाहीं तें दुसऱ्यांनीं केलेलें मला पाहवत नाहीं.

धैर्य, सामर्थ्य, मनोबल या मोठ्या विचित्र वस्तू आहेत. एखाद्याबद्दल बोलतांना, अमुक मनुष्य मोठा धैर्यवान् आहे, शूर आहे, मोठ्या छातीचा आहे अशी भाषा आपण वापरीत असतों. पण त्याच्या दानतींतील ज्या एखाद्या भागाकडे पाहून हा निकाल आपण देत असतों तेवढ्यावरून त्याच्या एकंदर दानतीची परीक्षा होते असें मात्र नव्हे. एखादा शिपाई प्रसंगीं तोफेच्या तोंडावरही धांवून जाईल; पण शस्त्रवैद्याचा लहानसा चाकू पाहून भीतीनें कदाचित् त्याची गाळण उडून जाईल. उलटपक्षीं दुसऱ्या एखाद्याच्या अंगीं शत्रूच्या तोफेवर धावण्याचें धैर्य नसेल, पण जरूर पडल्यास शस्त्रवैद्याकडून एखादा मोठा अवयव तोडला जात असतांही सारें दुःख तो मुकाट्यानें गिळून बसेल. याकरितां कोणाही मनुष्याचें परीक्षण करून त्याला भलाबुरा ठरवीत असतांना भलेबुरेपणाची आपली व्याख्या काय आहे

याचाही विचार प्रथम अवश्य केला पाहिजे. एखादा मनुष्य चांगला नाहीं असें मी म्हणत असतों तेव्हां तो चांगुलपणाच्या माझ्या व्याख्येच्या कसोटीस उतरत नाहीं इतकाच अर्थ ध्यानांत घेतला पाहिजे. ज्या गोष्टी मला करतां येत नाहींत त्या त्याला किती तरी चांगल्या रीतीनें करतां येत असतील; आणि या दृष्टीनें तो मजहून किती तरी अधिक चांगला असेल.

आतां आणखीही एखादें उदाहरण घेऊं. स्त्री आणि पुरुष यांच्यांतील गुणावगुणांबद्दल कोठेंही वाद निघाला तरी त्यांतील पूर्वोत्तरपक्ष एकच चूक नेहमीं करीत असतात. पुरुष युद्धें करूं शकतात आणि भयंकर शारीरिक श्रमांचीं कामेंही ते करतात हें दाखवून, या गोष्टी स्त्रिया करूं शकत नाहींत म्हणून त्या कमी प्रतीच्या आहेत असें एक पक्ष प्रतिपादन करीत असतो. पण असें करणें सर्वथा अन्याय्य आहे. पुरुषापेक्षां स्त्रीच्या ठिकाणीं धैर्य कमी असतें असें नाहीं; पण त्याच्या स्पष्टत्वाची दिशा वेगळी असते. या जगांत जो तो आपापल्यापरी चांगलाच आहे. लहान मुलाची जोपासना करतांना जी शांति, जी सहनशक्ति आणि जें प्रेम स्त्री दाखविते तें किती पुरुषांच्या ठिकाणीं तुम्हांस आढळेल ? पुरुषांच्या ठिकाणीं कार्य करण्यास लागणाऱ्या धैर्याची वाढ झाली आहे, तर स्त्रीच्या ठिकाणीं सहनशीलतेस लागणारें धैर्य आहे. स्त्रीच्या ठिकाणीं कर्तृत्वशीलतेस लागणारा जोम नाहीं, तर पुरुषाच्या ठिकाणीं दीर्घ सहनशीलतेस लागणारें धैर्य नाहीं. विश्वाच्या रचनेंत सर्वत्र कांटेतोलपणा आढळतो. या कांटेतोलपणानें हें सारें विश्व इतकें व्यापलें आहे कीं आपलें माणुसपण कायम राखण्याच्या कार्यांत एखाद्या क्षुद्र किड्याचाही उपयोग होतो असें उद्यां कोणी म्हणूं लागला तर तें खोटें असें आपणास छातीवर हात ठेवून सांगतां येणार नाहीं. मी कदाचित् एक मोठा सत्पुरुष असेन, आणि दुसरा एखादा दुर्जन असेल; पण त्या अत्यंत दुर्गुणी मनुष्याच्याही अंगीं एखादा सद्गुण असा असेल कीं जो माझ्या ठिकाणीं स्वप्नांतसुद्धां आढळावयाचा नाहीं. या गोष्टीचा प्रत्यय रोजच्यारोज मला येत असतो. एखाद्या रानवट मनुष्याकडे पहा. त्याच्या शरिराची ती गोटी पाहिली कीं माझ्या या क्षुद्र देहाची लाज मला वाटूं लागते. त्याच्यासारखें पिळदार शरीर मला असतें तर किती बरें झालें असतें असें माझ्या मनांत आल्यावांचून राहत नाहीं. त्याच्या मर्जीस येईल तें आणि वाटेल तितकें तो

खातपीत असतो. रोगाचें स्वप्नसुद्धां त्याला पडत नाहीं; आणि एखाद्या रोगानें त्रास दिला नाहीं असा एक क्षणसुद्धां माझ्या आयुष्यांत जात नाहीं. आतां माझ्या डोक्यांत मेंदू कदाचित् अधिक असेल; पण रोगाच्या यातना सुरू झाल्या कीं 'जळो तो मेंदु, तो त्या रानटी मनुष्याला देऊन त्याचें शरीर मी मोठ्या आनंदानें घेईन' असे विचार मनांत येऊं लागतात. लाटा आणि खाडे यांनींच विश्व निर्माण झालें आहे. एखाद्या ठिकाणीं मोठी लाट दिसत असली तर तितक्याच प्रमाणाचा खाडा कोठें तरी असला पाहिजे हें निश्चित होय. कोठें तरी खाडा पडल्यावांचून लाट उठणें शक्य नाहीं. अशा रीतीनें या विश्वांत समतोलपणा सर्वत्र आहे. महत्वाची अशी एखादी वस्तु तुमच्यापाशीं असेल, तर तुमच्या शेजाऱ्याजवळ दुसरी एखादी वस्तु तितक्याच महत्वाची असते. याकरितां स्त्रीपुरुषांचें परीक्षण कर्तव्य असतां दोघांच्या मोठेपणाचीं मापें वेगवेगळीं घेतलीं पाहिजेत हें उघड आहे. दोघांचेंही परीक्षण त्यांच्या त्यांच्या कार्यकक्षेंत केलें पाहिजे. कोणालाही आपला प्रांत सोडून दुसऱ्याचें कार्य करतां यावयाचें नाहीं. 'जेनुं काम तेने थाय' ही म्हण येथें लक्ष्यांत ठेवली पाहिजे. आपल्या मार्गानें दुसरा चालत नाहीं, म्हणून तो वाईट असें म्हणण्याचा अधिकार कोणासही नाहीं. जुन्या लोकांच्या चालीरीतींत यत्किंचित् बदल कोणीं केला कीं 'जग बुडालें रे बुडालें' असें ते म्हणूं लागतात. अशा लोकांना आपण वेडे म्हणत असतों; पण आपल्या स्वतःच्या मताप्रमाणें दुसऱ्या कोणासही दुष्ट समजणारा प्रत्येक मनुष्य याच प्रकारचा वेडा होय. जग बुडालें ही ओरड आज कित्येक शतकें आपण ऐकत आहों; पण अद्यापि जग पूर्वींसारखेंच चालू आहे. निग्रो गुलामांना मुक्त करावें अशी चळवळ तुमच्या या अमेरिकेंत प्रथम सुरू झाली तेव्हां अमेरिका आतां खास बुडणार असा कोलाहल पुष्कळांनीं केला होता; पण अमेरिकेची भरभराट पूर्वींसारखीच आहे हें तुम्ही आम्ही पाहत आहोंच. शूद्र वर्गाला शिक्षण दिलें कीं जग खास बुडेल असें भाकित पुष्कळांनीं केलें होतें! पण हें भविष्य कितपत खरें झालें? खालचा वर्ग सुशिक्षित झाला तर जग बुडत नाहींच, पण उलट त्याचें थोडेंबहुत हितच होतें असा अनुभव मात्र येतो. थोड्या वर्षांमागें इंग्लंडांत एक ग्रंथकार होऊन गेला. इंग्रज मजुरांच्या रोजमुऱ्याचे दर वाढत असून त्यामुळें व्यापार कमी होत आहे आणि इंग्लंड देश लव-

करच रसातळास जाणार अशा अर्थाचें प्रतिपादन या ग्रंथकारानें केलें होतें. इंग्रज मजुरापेक्षां जर्मन मजूर कमी पैशानें मिळतो असें या ग्रंथकाराचें म्हणणें होतें. या लेखानें बरीच गडबड उडविली होती. सरकारनें पंच नेमून या प्रकरणाची चौकशी केली तेव्हां जर्मन मजूर एकंदरीनें अधिक कमाई करतो असें निदर्शनास आलें. याचें कारण हेंच कीं जर्मन मजूर अधिक शिकलेला असतो. शूद्रांना शिक्षण दिलें कीं जग बुडेल असें ठांसून सांगणारे बुद्रे ज्योतिषी आमच्या हिंदुस्थानांत जागोजाग आहेत. खालच्या वर्गाला अज्ञानांधकारांत ठेवण्याचा विडाच जणूं काय या लोकांनीं उचललेला आहे; आणि हेच लोक स्वतःस ज्ञानवृक्षाचा मोहोर म्हणवीत असतात ! ज्ञानरूपी विषाचा गुण असा कांहीं विलक्षण आहे कीं वरिष्ठ वर्गाला तें मुळींच इजा करीत नाहीं, आणि खालच्या वर्गाला मात्र त्याची बाधा होते असेंच जणूं काय त्यांचें मत आहे ! असो; पण हें विषयांतर बाजूस ठेवून आपल्या प्रस्तुत विषयाकडे आपण वळूं.

सूक्ष्मेंद्रिय शास्त्रांतील प्रमेयें प्रत्यक्ष व्यवहार्य आहेत कीं नाहींत हें आपणास पाहावयाचें आहे. हा विषय आमच्या हिंदुस्थानाला कांहीं नवा नाहीं. सूक्ष्मेंद्रिय शास्त्राचा अभ्यास फार प्राचीनकाळींही तेथें चालू होता. ख्रिस्त जन्माला येण्याच्या आधीं सुमारें १४०० वर्षें भगवान् पतंजलि या नांवाचे एक तत्त्वदर्शी मुनि तेथें होऊन गेले. सूक्ष्मेंद्रियशास्त्रानें व प्राचीनकाळच्या प्रत्यक्ष अनुभवानें लागलेले सारे शोध त्यांनीं एकत्र केले. जग जन्माला येऊन दोन तीन हजार वर्षें झालीं हा बायबलांतील उत्पत्तिप्रकरणांतील शोध अक्षरशः चुकीचा आहे हें प्रथम ध्यानांत ठेवा. जग अत्यंत जुनाट आहे. नवा करार जन्मास आला तेव्हां, म्हणजे सुमारें १८०० वर्षांपूर्वी समाजघटनेस सुरवात झाली असें मत पाश्चात्य देशांत प्रचलित आहे. नव्या करारापूर्वी जगांत सारीं मनुष्यें रानटी होतीं असें पाश्चात्य लोकांस वाटतें. पाश्चात्य देशांपुरतें मात्र हें म्हणणें खरें असेल; पण साऱ्या जगाला अनुलक्षून असलें विधान करणें वेडेपणाचें आहे. एके वेळीं लंडनमध्यें माझीं व्याख्यानें सुरू असतां एक बुद्धिमान तरुण गृहस्थ माझ्याशीं वादविवाद करीत असे. एके दिवशीं असाच वाद करतां करतां बुद्धिवादाची आपली सारी पुंजी संपली असें पाहून तो मला म्हणाला, "पण कांहो, तुमचे ते ऋषी आमच्या इंग्लंडांत कां

आले नाहींत. येथें येऊन त्यांनीं आम्हांस ज्ञानदान कां केलें नाहीं ?" मीं उत्तर दिलें, "कारण त्यावेळीं देश अथवा राष्ट्र या रूपानें इंग्लंडाला अस्तित्वच नव्हतें. येथें येऊन त्यांनीं काय झाडांस उपदेश द्यावयाचा होता ?"

सुप्रसिद्ध अमेरिकन तत्त्ववेत्ते इंगरसोल मला एकदां म्हणाले, "पन्नास वर्षांपूर्वी तुम्ही येथें आलां असतां व धर्मावर व्याख्यानें तुम्हीं दिलीं असतीं तर तुम्हांला लोकांनीं झाडाला लटकावून फांशीं दिलें असतें, तुम्हांला दगडमार केला असता, किंवा त्यांनीं तुम्हांला जिवंत जाळून टाकलें असतें."

ख्रिस्ती शकापूर्वी १४०० वर्षांवर जगांत संस्कृतीच नव्हती हें म्हणणें निःसंशय खोटें आहे. जुन्या काळीं संस्कृतीला अस्तित्व नव्हतें असें म्हणण्यास योग्य कारण कांहींच दाखवितां येत नाहीं. फार काय पण रानटी अवस्था आधीं कीं सुधारणा आधीं होती या प्रश्नाचाही पूर्ण निकाल अद्यापि लागलेला नाहीं. मनुष्याच्या प्रथमावस्थेंत तो रानटी स्थितींत असून मग तो हळुहळु सुधारत गेला कीं प्रथम सुसंस्कृतावस्थेंत असतां अवनत दशा पावून रानटी स्थितीला तो पोंहोंचला याचें निश्चित उत्तर अद्यापि कोणीं दिलेलें नाहीं. रानटी अवस्थेंतून मनुष्याची सुधारणा झाली हें सिद्ध करण्यासाठीं जीं प्रमाणें तुम्ही उभीं करतां, त्याच प्रमाणांनीं आम्ही त्याच्या उलट सिद्धांत सिद्ध करून दाखवितों. रानटी मनुष्य म्हणजे संस्कृत मनुष्याची अवनत आवृत्ति. केवळ रानटी अवस्थेंतून मनुष्यप्राणी सध्याच्या सुधारलेल्या स्थितीला पोंहोंचला आहे हें म्हणणें चिनी लोकांना तरी कधींच पटावयाचें नाहीं; कारण, याच्याविरुद्ध स्थिति त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवांतली आहे. जेव्हां केवळ अमेरिकन संस्कृतीसंबंधीं तुम्ही बोलत असतां जेव्हां तेथील मूळच्या रहिवाशांस तुम्ही विसरतां. तुमच्या मनांत केवळ स्वतःच्या गौरकाय कुलाचा विचार मात्र असतो. स्वतःचें कुल येथें चिरस्थायी कसें होईल आणि वाढीस कसें लागेल इतकेंच तुम्हांस पाहावयाचें असतें.

हिंदुलोकांची अवनति गेलीं सातशें वर्षें सुरू आहे; तेच लोक प्राचीनकाळीं अत्यंत संस्कृतावस्थेंत होते असें मानण्यास तुमची बुद्धि इतकी कां कचरते ? ही गोष्ट अगदीं साहजीकपणें पटावी इतकी ती सोपी आहे; आणि याचें मुख्य कारण हेंच कीं याच्या उलट स्थिति होती असें निश्चयानें सिद्ध करणें कोणास शक्य नाहीं. रात्रींच्या रात्रींत संस्कृतावस्था जमिनींतून उग-

वली असें घडल्याचें एकही उदाहरण अस्तित्वांत नाहीं. बाहेरून दुसऱ्या एखाद्या संस्कृत मानवकुलाच्या आगमनावांचून जिची संस्कृति सिद्ध झाली अशी एकही शाखा कोठें अस्तित्वांत नाहीं. यावरून एखाद्या दुसऱ्या मानव-कुलाकडेच सुधारणेचा मक्ता होता असें मानणें ओघास येतें. या संस्कृत कुलाच्या शाखोपशाखांचा विस्तार जगभर झाला आणि अशा रीतीनें या सुधारणेच्या वृक्षाची वाढ झाली असली पाहिजे असें मानण्यावांचून गत्यंतर नाहीं.

या विषयाचा विचार व्यवहाराच्या दृष्टीनें करण्याकरितां अर्वाचीन शास्त्रांची भाषा आपण आतां बोलूं. पण येथेंही एक सूचना तुम्हांस देणें इष्ट आहे. धार्मिक बाबतींत ज्याप्रमाणें आपली बुद्धि पूर्वग्रहांनीं दूषित झाली असल्याचें पुष्कळ वेळां आढळून येतें, त्याचप्रमाणें अर्वाचीन भौतिक शास्त्रांच्या अचूकपणाबद्दल आपल्या मनांत फाजील विश्वास भरला आहे. जुने धार्मिक लोक ज्याप्रमाणें आपल्या धर्मग्रंथांतील वचनाचें ग्रहण आंधळे-पणानें करतात, त्याचप्रमाणें अर्वाचीन सुशिक्षित भौतिकशास्त्रांच्या वचनां-पुढें निमूटपणें मान वांकवितात. ज्याप्रमाणें धर्मोपाध्याय आपलें काम आपल्या खास हक्काचें असें समजून करीत असतात, त्याचप्रमाणें पुष्कळ अर्वाचीन विद्वानही आधिभौतिक शास्त्रांचे उपाध्ये बनले आहेत; आणि या उपाध्यांनीं आपणांस कांहींही सांगितलें तरी आपण डोळे झांकून त्यांचें म्हणणें कबूल करीत असतों. डार्विन, हक्स्ले इत्यादिकांचें नुसतें नांव कानीं पडतांच आपल्या बुद्धीचे डोळे मिटत असतात. असें करणें हीच सध्याची 'फ्याशन' आहे. ज्याला आपण सशास्त्र ज्ञान अशी संज्ञा लावीत असतों, त्या ज्ञानाच्या एकंदर पुंजीपैकीं नव्याणव हिसे गोष्टी नुसत्या उपपत्ती आहेत. त्यांत सत्याचा अंश कितपत आहे या गोष्टीचा निर्णय अद्यापिही झालेला नाहीं. यांतील कित्येक उपपत्ती तर जुन्या भुताटकीच्या गोष्टींहून अधिक योग्य-तेच्या नाहींत. जुन्या काळीं ज्याप्रमाणें भुतांना पुष्कळ डोकीं आणि हात होते, त्याचप्रमाणें या उपपत्तींना पुष्कळ शिंगें फुटलेलीं असतात. याकरितां उगीच मोठ्या नांवाखालीं फसून जाण्याचें कारण आपणास नाहीं. खरा शास्त्रीय मार्ग म्हटला म्हणजे आपली बुद्धि शाबूत आणि डोळस ठेवणें हाच होय. 'अखंड सावधान असावें' हेंच आपणास हितप्रद आहे. ज्याप्रमाणें

धर्मोपाध्यांचीं शास्त्रें तावून सुलाखून घेतलीं पाहिजेत, त्याचप्रमाणें अर्वाचीन शास्त्रोपाध्यांचीं वचनेंही तोलून घेण्यास आपण शिकलें पाहिजे. एखादा अर्वाचीन पंडित केवढाही मोठा असला तरी तो सांगेल तें एकदम खरें मानूं नये. आरंभीं आपली वृत्ति साशंक ठेवणें आपल्या हिताचें आहे. त्याचें म्हणणें ऐकून घ्यावें, त्यांतील साऱ्या मुद्यांचें पृथक्करण करावें; अनुभव पाहावा आणि अशा रीतीनें तावून सुलाखून नंतर त्याचें ग्रहण करावें. अर्वाचीन शास्त्रांनीं सांगितलेले कांहीं सिद्धांत सर्वत्र प्रचलित झाले आहेत, परंतु त्यांची निःसंशय सिद्धि अद्यापि झालेली नाहीं. गणितशास्त्र हें मोठें निश्चित शास्त्र; तथापि त्याच्या कित्येक उपपत्ती नुसत्या गृहीत धराव्या लागतात. कारण त्या गृहीत धरल्या नाहींत तर पुढें पाऊलच पडावयाचें नाहीं. ज्ञानाची वाढ होईल तशा या उपपत्ती आपोआपच मागें पडत जातील.

ख्रिस्ती शकाच्या पूर्वीं सुमारें १४०० वर्षांवर एक महान् तत्त्वदर्शी होऊन गेला. सूक्ष्मेंद्रियांच्या ज्या क्रिया अनुभवास येतात त्यांचें निरीक्षण व पृथक्करण करून त्यांना सूत्रबद्ध करण्याची खटपट त्यानें केली. त्यानंतर त्याच्या कित्येक अनुयायांनीं या शास्त्राच्या वेगवेगळ्या भागांचा विशेष अभ्यास करून या शास्त्राची वाढ केली. या शास्त्राचा अभ्यास अत्यंत मनःपूर्वक जर कोणीं केला असेल तर तो हिंदूंनींच होय. दुसऱ्या कोणत्याही मानवकुलानें त्याकडे विशेष लक्ष्य दिलें नाहीं. आज या विषयाची चर्चा आपणांसमोर मी करीत आहें, पण हें सारें विवेचन ऐकून घेऊन त्याप्रमाणें प्रत्यक्ष अभ्यास तुम्हांपैकीं किती लोक करतील हें मला सांगतां येत नाहीं; आणि कांहीं जणांनीं तसा आरंभ केला तरी त्या मार्गांत किती दिवस ते टिकून राहतील हाही एक प्रश्नच आहे. या बाबतींत तुम्ही पाश्चात्य लोक अद्यापि अनभ्यस्त आहां; या बाबींत हिंदु लोक फार पक्के. पिढ्यांमागें पिढ्या या रीतीनें युगानुयुगें त्यांचा अभ्यास चालू आहे. विशिष्ट देवळांत ठरींव वेळीं जावें आणि ठरींव कवाईत करून ठरींव स्तोत्रें म्हणावीं अशी पद्धत हिंदु लोकांत नाहीं हें तुम्हांस ठाऊक असेलच. तथापि प्राणायाम करून मनाची एकाग्रता करण्याचा अभ्यास ते अद्यापि रोज करीत असतात, हें ऐकून तुम्हांस नवलच वाटेल. परमेश्वराच्या प्रार्थनेचा त्यांचा मुख्य कार्यक्रम हाच. हें शिक्षण त्यांना जन्मादारभ्य मिळालेलें असतें आणि तें त्यांचें एक प्रमुख कर्तव्यच होऊन बसलेलें असतें. हिंदुस्थान

देशाचा धर्मच अशा प्रकारचा आहे. फार झालें तरी व्यक्तीला अनुरूप असा फरक या क्रियांच्या आचारांत दिसेल; परंतु तत्त्व एकच. एखादा मनुष्य कांहीं विशिष्ट प्रकारानें प्राणायाम करीत असेल आणि मन एकाग्र करण्याचा एखाद्याचा मार्ग कांहीं विशिष्ट प्रकारचा असेल; तथापि दोघांचें अंतिम साध्य एकच. जो तो आपापल्या रीतीनें आपला अभ्यास निमूटपणें करीत असतो. आपल्या अभ्यासाच्या पद्धतीची चर्चा चार चौघांसमक्ष तो कधींच करीत नाहीं. फार काय, पण ती पद्धत त्याच्या खुद्द बायकोला सुद्धां समजावयाची नाहीं. मुलाचा मार्ग कोणता हें बापाला ठाऊक नसतें. तथापि प्रत्येकानें अभ्यास केलाच पाहिजे हें मात्र खरें. असें आहे तथापि यांत कांहीं गुप्त अथवा अगम्य आहे, असेंही कोणी समजत नाहीं. 'गुप्त, अगम्य' या शब्दांचा संबंध अर्थाअर्थी अभ्यासाशीं नाहीं. तुम्ही गंगातीरीं गेलां तर डोळे मिटून चित्तैकाग्र्य साधणारे हजारों लोक तुम्हांस आढळून येतील. या अभ्यासांतील सान्याच क्रिया सर्वांस साध्य होतील असें नाहीं; आणि असें होण्याचीं कारणें दोन आहेत. एक असें कीं योगमार्गावर आरूढ होण्याची योग्यता सामान्य मनुष्यांस असत नाहीं असें योगी म्हणतात आणि यामुळें हा मार्ग सर्वांस दाखविण्यास ते तयार नसतात. योग्यांच्या या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे ही गोष्ट खोटी नाहीं, तथापि त्यांत त्यांच्या स्वतःच्या आढ्यतेचाही अंश असतो हेंही खोटें नाहीं. दुसरें असें कीं सामान्य जनांचा मार्ग सोडून एखाद्या वेगळ्या मार्गाचा स्वीकार करण्यास मनुष्याचें मन साहजिकच कचरतें. लोकांच्या उपहासाची भीति त्याला वाटत असते. तुमच्या या देशांत प्राणायाम करण्याची भीति पुष्कळांस वाटेल. चार चौघांसमक्ष हा अभ्यास करण्यास त्याचें मन कचरेल. कारण येथले लोक त्याला विक्षिप्त समजल्याशिवाय राहणार नाहींत. येथें 'फ्याशन' हेंच दैवत आहे आणि 'फ्याशन' सोडून कोणी वागला तर तो लोकांच्या उपहासास अवश्य पात्र होतो. "हे देवा, माझी रोजची भाकरी मला दे" असली प्रार्थना करणें ही तुमची रूढी असल्यामुळें तसें करणें येथें श्रेयस्कर समजलें जातें; पण हिंदुस्थानांत अशी प्रार्थना कोणीं केली तर लोक त्याची थट्टा उडवितील. त्रैलोक्याधिपतीकडे जाऊन चतकोर भाकरी मागण्याची कल्पना त्यांच्या चित्तास पटावयाची नाहीं. "हे परमेश्वरा, आकाशांतील

बापा," अशी हांक मारणें तुम्हांस सयुक्तिक वाटतें; पण देव आपल्या अंतर्यामींच आहे अशी आम्हा हिंदु लोकांची खात्री असल्यामुळें परमेश्वराला आकाशांत शोध करणाऱ्या माणसाची कींव आह्मांस येईल. एकंदरीनें मुद्दा इतकाच कीं देशपरत्वें चालू असणाऱ्या रूढींत ढवळाढवळ करण्यास कोणीही मनुष्य सहसा तयार होत नाहीं.

आपल्या देहांत ज्ञानतंतूंच्या मध्यवर्ती नाड्या तीन आहेत असें योग्यांचें म्हणणें आहे. यांपैकीं एकीचें नांव इडा असें असून दुसरीचें पिंगला असें आहे; आणि या दोहोंच्या मध्यें सुषुम्ना या नांवाची नाडी आहे. या तिन्ही नाड्या पृष्ठवंशांतर्गत आहेत. आपल्या पाठीच्या कण्याचीं जीं हाडें आहेत त्यांच्या पोकळींत या तीन नाड्या आहेत. इडा ही उजवीकडे आणि पिंगला डावीकडे आहे. इडा आणि पिंगला हे ज्ञानतंतूंचे रज्जू आहेत. काथ्याच्या बारीक तंतूंचा मोठा जाड दोर वळावा त्याप्रमाणें इडा आणि पिंगला या नाड्या बारीक बारीक ज्ञानतंतूंच्या एकीकरणानें बनल्या आहेत. या दोहोंच्या मधील सुषुम्ना नाडी ही नुसती पोकळी आहे. तिच्यांत ज्ञानतंतूंचे दोर नाहींत. या सुषुम्नेचें द्वार बंद आहे आणि सामान्य मनुष्याला या पोकळ नाडीचा कांहीं उपयोग होत नाहीं. त्याची सारी देहपरिचर्या इडा आणि पिंगला या दोन नाड्यांच्या द्वारेंच चालू असते. या दोन नाड्यांमधून वायूचें अभिसरण वरून खालीं आणि खालून वर होत असतें, आणि याच नाड्यांशीं शरिरांतील दुसरे ज्ञानतंतू जोडलेले असून त्यांच्या द्वारा हुकुमांची नेआण होत असते. शरिरांतील सारीं इंद्रियें अशा रीतीनें या दोन नाड्यांशीं जोडलेलीं असतात.

या दोन नाड्यांच्या कार्यांत समतोलपणा आणणें हा प्राणायामाचा मुख्य हेतु आहे. नुसता प्राणायाम ही विशेष महत्वाची क्रिया आहे असें नाहीं; तर त्या क्रियेनें जो हेतु साध्य करावयाचा आहे तो अत्यंत महत्वाचा आहे. प्राणायामानें पुष्कळशी हवा फुप्फुसांत भरली जाते व तीमुळें रक्त शुद्ध होतें इतकेंच. यापेक्षां त्याचा अधिक उपयोग नाहीं. आपण आपल्या नाकानें हवा आंत घेतों यांत गुप्त अथवा रहस्यमय असें काय आहे? हवा आंत घेणें आणि अशा रीतीनें रक्त शुद्ध करणें ही क्रिया आपल्या ठिकाणीं प्रत्येक क्षणीं चालू आहे. हा केवळ गतीचा एक प्रकार आहे. ज्यापासून ही गति अनेक

प्रकारांनीं प्रकट होते, त्या शक्तीच्या मूलरूपास प्राण अशी संज्ञा आहे. जगांत जितक्या प्रकारच्या गती आपल्या अवलोकनांत येतात, तितक्या साऱ्यांचा उगम प्राणापासूनच झाला आहे. प्राणशक्तीनेंच इतकीं अनेकविध रूपें घेतलीं आहेत. प्राणाचें स्वरूप विद्युत् आणि चुंबकाकर्षण यांजसारखें आहे. हीच प्राणशक्ति विचाररूपानें मेंदूतून बाहेर पडते. विश्वांत प्राणाचें वास्तव्य सर्वत्र आहे किंबहुना सर्व प्राणमयच आहे. सूर्य, चंद्र आणि तारे यांस गति देण्याचें कार्य प्राणशक्ति करीत आहे.

या साऱ्या विश्वांत जितकें दृश्यजात आहे तितकें सारें प्राणशक्तीच्या स्पंदांमुळें व्यक्तदशेस आलें आहे असें योग्यांचें म्हणणें आहे. प्राणस्पंदांचें वरिष्ठ कार्य विचार हें आहे. याहून अधिक महत्वाचें असें एखादें कार्य असेल तर त्याचा शोध मनुष्यास अद्यापि लागलेला नाहीं. याहून वरचढ अशा एखाद्या कार्याची कल्पनासुद्धां आम्हांस करतां येत नाहीं. इडा आणि पिंगला या नाड्यांचें कार्य प्राणाच्या द्वारें चालतें. शरिराच्या प्रत्येक भागाची हाल-चाल प्राणामुळें होते; आणि ही हालचाल करतांना ही एकच प्राणशक्ति अनेक रूपें धारण करीत असते. परमेश्वर या साऱ्या क्रिया करवीत असतो ही जुनी कल्पना तुम्ही आतां सोडून द्या. तो विश्वाच्या बाहेर कोठें बसत नाहीं, आणि तेथून न्याय देण्याचें कामही करीत नाहीं. प्राणायामामुळें श्वासोच्छ्वासाची क्रिया सुरळीत चालते. श्वासोच्छ्वास हें प्राणशक्तीचें एक दृश्य रूप आहे. प्राणशक्तीचें प्रकटीकरण समतोलपणें होत आहे कीं नाहीं हें जाणण्याचें एक साधन श्वासोच्छ्वास हें आहे. प्राणशक्तीचें प्रकटीकरण सम-तोलपणें होत असलें ह्मणजे शरिरांतील यच्चयावत् क्रिया सुरळीत चालतात. प्राणायामानें सारें शरीर योग्यांच्या ताब्यांत आलें ह्मणजे शरिरांतील कोण-त्याही भागांत कांहीं रोग झाला ह्मणजे प्राणशक्तीचें आविष्करण त्या ठिकाणीं योग्य प्रकारें होत नाहीं असें ते जाणतात आणि प्राणाचा संयम त्या विशिष्ट जागीं करून ते रोगमुक्त होतात.

आपल्या देहांतील प्राणशक्तीवर ज्याप्रमाणें तुम्हांस ताबा चालवितां येतो, त्याप्रमाणें तेवढें सामर्थ्य तुम्हांस प्राप्त झालें तर येथून हिंदुस्थानां-तल्या एखाद्या माणसाच्या प्राणशक्तीवरही तुम्हांस ताबा चालवितां येईल. प्राणशक्ति कोठेंही झाली तरी एकाच स्वरूपाची आहे. प्राणशक्तीचा वास

विश्वांत अखंड आहे. देशांच्या आणि समुद्रांच्या मर्यादेनें तिच्या वर्तुळांत खंड पडत नाहीं. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हा सिद्धांत आहे. यांत कोणत्याही उपाधीनें खंड पडत नाहीं अथवा त्यांत मर्यादाही उत्पन्न होत नाहीं. शरीर-दृष्ट्या, सूक्ष्मेंद्रियदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या, इंद्रियातीतदृष्ट्या अथवा शुद्ध चैतन्य या दृष्टीनेंही वस्तुतः कोठें खंड नाहीं. जीवित या शब्दाचा शास्त्रीय अर्थ काय ? जीवित या क्रियेचें स्वरूप काय ? जीवित म्हणजे प्राणशक्तीचे स्पंद. सर्वव्यापी आकाशतत्त्व समुद्रावर ज्यामुळें स्पंद उत्पन्न होतात त्याच-मुळें तुमच्या जीविताचे स्पंदही चालू असतात. दोघांची चालकशक्ति एकच. ज्याप्रमाणें एखाद्या तळ्यांत कमी अधिक प्रमाणाच्या जाडीचें बर्फ ठिकठि-काणीं बनतें, त्याचप्रमाणें आकाशतत्त्वाचें घनीभवन कमी अधिक प्रमाणानें होऊन हें विश्व बनलें आहे. ज्याप्रमाणें वातावरणांतील वाफ कोठें अदृश्य असण्याइतकी सूक्ष्म, तर कोठें अत्यंत घनीभवनानें काळया ढगाचें रूप धारण करते, त्याचप्रमाणें आकाशतत्त्व कोठें विरल, तर कोठें घनीभूत वेग-वेगळया आकारांनीं प्रकट होतें. हें सारें विश्व म्हणजे जड वस्तूंचा एक महा-सागर आहे. या आकाशतत्त्वसागरांत वेगवेगळया परिमाणाच्या घनीभवनानें सूर्य, चंद्र, तारे आणि आपण स्वतः निर्माण झालों आहों. आपण एकमेकां-पासून बाह्यतः भिन्न भिन्न दिसत असलों तरी वस्तुतः एकरूपच आहों. आपल्या दृश्य भिन्नत्वामुळें मुळांतील समरसतेचा आणि ऐक्याचा भंग होत नाहीं—तें सर्वदा एकरूपच राहतें.

अतींद्रिय शास्त्राचा अभ्यास आपण केला म्हणजे सर्व विश्व एकरूप आहे आणि त्यांत जड, सूक्ष्म, चैतन्यात्मक, मानसिक असे भेद नाहींत ही गोष्ट आपल्या लक्ष्यांत येते. आपणांस जो भेद दिसतो तो मुळांत वस्तुतः नसून आपल्या वेगवेगळया दृष्टिकोणामुळें दिसतअसतो, अथवा भासत असतो. आ-पल्या मनाची घटनाच अशी आहे कीं एका वेळीं एकाच वस्तूचा विचार तें करीत असतें. 'मी देह' अशी भावना आपल्या मनांत असते तेव्हां 'मन' म्हणून कांहीं वस्तु आपणाजवळ आहे हें आपण विसरलेले असतों. त्याचप्रमाणें 'मी मनोरूप आहें' अशी दृढ भावना आपणास करतां आली तर जड देहाचा विसर आपणास पडेल. आपलें खरें अस्तित्व म्हटलें म्हणजे 'मी आहें' या भाव-नेंत जी अस्मिता आहे तितक्यापुरतेंच आहे. मग या खऱ्या स्वरूपावर वाट-

तील ते आरोप करून तुम्हांस स्थूल देहमय अथवा मनोमय बनतां येतें. जन्म, जीवित आणि मृत्यु हीं जुनीं खुळें आम्हांस चिकटून बसलीं आहेत. वास्तविक कोणी जन्मास आला नव्हता आणि कोणी मरणारही नाहीं. आपण आपली दृष्टि मात्र बदलीत असतों, आणि एका परिस्थितीला जन्म व दुसरीला मृत्यु म्हणत असतों. तुम्हां पाश्चात्यांना मृत्यूची एवढी भीति वाटते हें पाहून मला खरोखरच फार वाईट वाटतें. मरण म्हटल्याबरोबर तुम्ही अगदीं गांगरून जातां. जीविताचा एखादा क्षण तरी अधिक लाभावा यासाठीं भगीरथ प्रयत्न तुम्ही करीत असतां. परमेश्वराजवळ तरी तुम्ही काय मागत असतां ? "मृत्यूनंतर आम्हांस चिरंतन जीवित दे" हेंच. मेल्या-नंतरही नवें जीवित तुम्हांस मिळेल असें कोणीं सांगितलें तर तुम्ही केवढे आनंदून जातां ! छे, छे; मृत्यूची इतकी खंत करूं नका. वास्तविक तुम्ही जन्मासच आलां नाहीं; मग तुम्हांस मरण कोठचें ? मरण येईल अशी शंका तरी मला कां यावी ? मी मेलेला आहें अशी कल्पनाही मला होत नाहीं. मी मरून पडलों आहें अशी कल्पना करण्याचा यत्न करा; म्हणजे स्वतःचें मृत शरीर पाहण्यास आपण हजर आहों असें तुम्हांस आढळून येईल. तुमचें चैतन्य इतकें सत्यरूप आहे कीं त्याचा विसर एक क्षणसुद्धां तुम्हांस पडत नाहीं. स्वतःला अस्तित्व आहे कीं नाहीं अशी शंका त तुमच्या मनांत कधीं येते काय ? "मला अस्तित्व आहे" ही तर तुमची पहिली जाणीव आहे. सर्व सत्यांत हें अत्यंत उघड असें सत्य आहे. त्याचा अनुभव दर क्षणीं येत आहे. याचा विसर पडला असें कधींच घडावयाचें नाहीं. यावरून अमृतत्वाची कल्पना मनुष्याच्या मनांत स्वाभाविक आणि जन्मजात आहे असें निःसंशय सिद्ध होतें. "मी मरेन" असें चुकूनसुद्धां कोणाच्या मनांत येत नाहीं. "मी सर्वथा नष्ट होणार आहें" अशी कल्पनाही कोणास करवत नाहीं. मग ज्या विषयाची कल्पनासुद्धां आपणास होत नाहीं त्याजबद्दल वाद-विवाद कसला आणि त्याचा ऊहापोह तरी कशाला ? जो विषय इतका उघड आहे त्यांत पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष संभवतच नाहीं.

जड, सूक्ष्म अथवा चैतन्यात्मक यांपैकीं कोणत्याही दृष्टीनें तुम्हीं पाहिलें तरी विश्व एकरूप हेंच अखेरीस आढळून येतें. आपल्या सध्यांच्या अवस्थेंत या विश्वाचा प्रत्यय आपणास दोन प्रकारचा येत आहे. एक शक्ति आणि

दुसरी जड अथवा स्थूल अवस्था; पण या प्रत्ययांतही एक गंमत लक्ष्यांत घेण्यासारखी आहे. आकाश आणि प्राण अथवा शक्ति आणि जड पदार्थ यांचे वेगवेगळे प्रत्यय आपणास कधींच येत नाहींत. आपल्या साऱ्या सिद्धांतांचें मूळ असेंच असतें. कसल्याही सिद्धांताच्या सांखळीच्या अखेरच्या दुव्याला आपण पोंहोंचलों म्हणजे तेथें परस्परविरोधी पदार्थ सांपडतात. शक्ति म्हणजे काय ? तर जड पदार्थाला जी चालन देते ती; आणि जड पदार्थ म्हणजे काय ? तर शक्तीच्या क्रियेनें ज्याची हालचाल होते तो. अखेरीस अशा चक्राकार परिभ्रमणांत आपण सांपडतों. अनेक शास्त्रें निर्माण झालीं, ज्ञानाची वाढ कोणीकडच्या कोणीकडे झाली, अशी घमेंड आपणांस वाटत असते; तथापि बुद्धिवादाच्या अखेरीस पुष्कळ वेळां मोठ्या विचित्र वस्तू आढळून येत असतात. मस्तकालाच ठावठिकाण नसतां मस्तक दुखतें असें आपण त्रिवार बजावून सांगत सुटतों. यालाच आम्ही माया म्हणतों. जेथें अस्तित्व आहे असें सांगवत नाहीं अथवा नाहीं असेंही निश्चयानें म्हणवत नाहीं, ती माया. जी अनिर्वचनीय स्वरूप ती माया. अशा अस्तित्वाला अस्तित्व ही संज्ञा लावतां येत नाहीं; कारण काल आणि देश यांच्यापलीकडे उपाधिरहित असलेलें अस्तित्व मात्र सत्यरूप आहे. तथापि असें असतांही या जगांतील आपल्या अस्तित्वाचा अनुभव आपणास येतो. मग अशा स्थितींत तें नाहीं असें तरी कसें म्हणावें ? यावरून, आपलें चालू अस्तित्व सत्य-रूप नसून तें भासमान होणारें अस्तित्व मात्र आहे असें सिद्ध होतें.

पण चालू अस्तित्व मायारूप असलें तरी प्रत्येक वस्तूला चिरंतन अस्तित्व आहे, हेंही खोटें नाहीं. हेंच चिरंतन आणि सत्यरूप अस्तित्व, देश, काल आणि कारण यांच्या जाळ्यांत सांपडून केवळ भासमान आणि असत्य झालें आहे. खरें अस्तित्व अनंत, अनादि आणि सदैव आनंदरूप असें आहे. तें उपाधिरहित आणि सदामुक्त असें आहे. मनुष्याचें हें अपार रूप देश, काल आणि कारण या उपाधित्रयानें बद्ध होऊन सांप्रतचें मानवी जीवित बनलें आहे. हीच गोष्ट जगांतील प्रत्येक वस्तूस लागू आहे. प्रत्येक वस्तूच्या पोटीं तेंच अपार रूप आहे. या साऱ्या शिळोप्याच्या गप्पा आहेत असें समजूं नका. हें नुसतें कल्पनामय साम्राज्य नाहीं. या जगाला अस्तित्वच नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं; पण त्याचें अस्तित्व सापेक्ष असून ज्या हेतूस्तव

व्यक्तदशेला आलें आहे तो परिपूर्ण करण्याला लागणारीं साधनें त्यांत आहेत. त्याचें अस्तित्व हेतुपूर्तीपुरतें मात्र आहे. त्याला स्वतंत्र अस्तित्व नाहीं. त्याचें अस्तित्व देशकालकारणादि उपाधिरहित जें अस्तित्व आहे त्यावर अवलंबून आहे.

असो. मूळ रस्ता सोडून आपण बरेच बाजूला आलों. आतां हें विषयांतर येथेंच सोडून आपल्या उद्दिष्ट विषयाकडे आपण वळूं.

आपल्या हस्तपादादि अवयवांनीं ज्या क्रिया आपण जाणून बुजून करतों त्या अथवा हृदयाच्या उडण्यासारख्या ज्या आपल्या जाणिवेंत येत नाहींत त्या क्रिया प्राणशक्ति ज्ञानतंतूंच्या द्वारें करीत असते. आपल्या शरिरांत कित्येक क्रिया अशा प्रकारच्या घडत असतात कीं त्यांवर आपणास ताबा चालवितां येत नाहीं. उदाहरणार्थ, हृदयाची क्रिया. हृदयाचें उडणें आपणास वाटेल तेव्हां बंद करतां येत नाहीं. आपली नाडी आणि आपल्या दुसऱ्या धमन्या उडण्याचें आपणास बंद करतां येत नाहीं. आपल्या देहांत या क्रिया घडतात कशा हें आपल्या जाणिवेंतही येत नाहीं. आपल्या समजुतींत न येतां त्या चालत असतात. अशा क्रिया आपणास आपल्या ताब्यांत आणतां आल्या तर खरोखर मोठी गंमत होईल.

परमेश्वर ह्मणजे काय आणि मनुष्यप्राणी ह्मणजे काय याच्या व्याख्या दुसऱ्या एका प्रसंगीं मी आपणांस सांगितल्या होत्या. मनुष्य ह्मणजे व्यासरहित अखंड चक्रासारखा असून त्याचा मध्यबिंदु एकाच ठिकाणीं आहे; आणि परमेश्वर ह्मणजे व्यासरहित चक्र असून त्याला मध्यबिंदु नाहीं असें ठिकाणच नाहीं. एकाचा मध्यबिंदु एकाच स्थानीं असून दुसऱ्याचा सर्व व्यापी आहे. मनुष्याच्या क्रिया दोनच हातांनीं चालतात. परमेश्वर अनंतहस्तांनीं कार्य करीत असतो. मनुष्याला दोनच डोळे असतात. परमेश्वर अनंत डोळ्यांनीं पाहतो. मनुष्य दोनच पायांनीं चालतो. परमेश्वर अनंत पायांनीं चालत असतो. मनुष्य एकाच देहांत आपली जीवितयात्रा क्रमीत असतो. परमेश्वराची वस्ती अनंत देहांत आहे. मनुष्य आणि परमेश्वर यांत असा फरक दिसत आहे; तथापि मनुष्यालाही सर्वव्यापी होण्याचें सामर्थ्य आहे. '**नर करनी करे तो नरका नारायण होत.**' मनुष्याला परमेश्वर होतां येतें आणि सर्व विश्वावर ताबा चालवितां येतो. त्याच्या जाणिवेचा मध्यबिंदु सध्या एकाच

ठिकाणीं आहे. त्याचे अनंत बिंदू करून सारें विश्व त्यानें आपल्या जाणिवेंत आणलें म्हणजे तो परमेश्वर झालाच. त्याची जाणीव सध्या अत्यंत संकुचित आहे, तीच त्यानें विश्वव्यापी केली पाहिजे. आपल्या जाणिवेच्या कक्षेचा विस्तार मनुष्यानें अनंतपटीनें वाढविला तर तोच परमेश्वर होतो. याकरितां जाणीव म्हणजे काय याचा विचार प्रथम करणें अगत्याचें आहे. किंबहुना, ही एकच वस्तु आपणास पूर्णपणें समजली कीं आपलें काम झालें.

आपण असें समजूं कीं चोहोंकडे पूर्ण अंधकार भरला असून त्यांतून एक अनंतरेषा गेली आहे. अंधारामुळें ही रेषा आपणास दिसत नाहीं. पण या रेषेवर एकच तेजोबिंदु असून त्या रेषेवरून तो पुढें जात आहे. आपला मार्ग हा बिंदु आक्रमीत असतां त्या रेषेचे वेगवेगळे भाग तो प्रकाशित करितो. परंतु प्रकाशित भागाच्या आगेंमागें मात्र पूर्ण अंधार तसाच आहे. आपली जाणीव या तेजोबिंदूसारखी आहे. या जाणिवेचे पूर्वानुभव नाहींसे होऊन नवे अनुभव त्यांच्या जागीं आले आहेत. कांहीं पूर्वानुभव अगदींच नष्ट झाले नसले तरी ते विस्मृतीच्या कक्षेंत पडले आहेत. त्यांचा विसर आपणास इतका पडला आहे, कीं जणूं काय त्यांना अस्तित्वच नाहीं. त्यांचें अस्तित्व आपल्या ठिकाणीं आहे ही जाणीवच आपणास नाहीं. पण असें आहे तरी त्यांचें कार्य अगदीं थांबलें आहे असें मात्र नाहीं. आपल्या समजुतींत न येतांही त्यांचें कार्य आपल्या शरिरावर अविरतपणें चालू आहे. हें कार्य केवळ शरिरापुरतें आहे असेंही नाहीं; तर तें मनावरही चालू आहे.

जगांत अनेक नीतिग्रंथ निर्माण झाले आहेत. प्रत्येकानें आपापली वेगवेगळी उपपत्ति सांगून नीतीचा व्यवहार सांगितला आहे; पण या सर्‍यांनीं एक घोडचूक केली आहे. अकार्यापासून परावृत्त कसें व्हावें हें कोणींही सांगितलेलें नाहीं. सत्कार्य करावें हें चांगलें; पण अकार्य करूं नये हेंही तितकेंच चांगलें नाहीं काय ? "अरे मुला, चोरी करूं नको" असें प्रत्येक शास्त्र सांगतें. उपदेश फार उत्तम आहे; पण मनुष्य चोरी कां करतो, याचा विचार कोणीं केला आहे काय ? चोरी, दरोडेगिरी आणि आपलीं बाकीचीं सारीं दुष्कृत्यें अनिवार्य अशा स्वरूपाचीं आहेत. इच्छा नसतांही मनुष्य चोरी करतो, खोटें बोलतो आणि दुसऱ्याचें घर फोडतो. त्याच्या इंद्रियांवर त्याचा ताबा चालत नाहीं. त्याचें एक मन नको नको म्हणत असतांही त्याचीं इंद्रियें

त्याला ओढून नेऊन बलात्कारानें त्याजकडून चोरी करवीत असतात ! माझी ही उपपत्ति ऐकून तुमचा जीव कदाचित् दडपून गेला असेल; पण काय करावें ? वस्तुस्थिति तशीच आहे. मानसशास्त्रांतील हें खरोखर एक मोठें कोडें आहे. मनुष्याच्या भलेबुरेपणाची कसोटी लावतांना आपलें चित्त आपण उदार ठेवलें पाहिजे. सर्व प्रकारें चांगलें होणें हें आपणांस वाटतें तितकें सोपें नाहीं. कांहीं झालें तरी तुम्ही परिस्थितीचे गुलाम आहां. भोंवतालच्या परिस्थितीची जाणीव कायम असतां आम्ही स्वतंत्र आहों असें म्हणणें हें अशास्त्र आणि मूर्खपणाचें आहे. पूर्ण मुक्तावस्था प्राप्त होईपर्यंत आपली स्वतंत्रबुद्धीची बडबड व्यर्थ आहे. "सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि।" हा सिद्धांत आपण नेहमीं ध्यानांत ठेवला पाहिजे. तुमचें चांगुलपणसुद्धां तुमच्या प्रकृतीचें अंकित आहे. तुम्ही चांगले आहां याचें कारणही हेंच कीं तसें असल्यावांचून तुम्हांस गत्यंतरच नाहीं. त्याचप्रमाणें जो वाईट आहे तोही असल्या प्रकृतीमुळेंच आहे. त्याचें वाईटपण त्याला सहसा टाकतां येत नाहीं. त्याच्या परिस्थितींत तुम्ही असतां तर तुम्हीं काय केलें असतें हें कोणीं सांगावें ? रस्त्यांत भटकणारी भिकारीण आणि तुरुंगांत पडलेला चोर यांचे बळी तुमच्या कल्याणाकरितां पडले आहेत. चांगले असें नांव तुम्हांला प्राप्त व्हावें म्हणून ती स्त्री भिकारीण झाली आणि तो मनुष्य तुरुंगांत गेला. विश्वाच्या समतोलपणाचा कायदा अशा प्रकारचा आहे. जगांतील सारे चोर, खुनी, अन्यायी, दुबळे, दुष्ट आणि सैतानी लोक हे माझे उद्धारकर्ते गुरू आहेत. या साऱ्यांचें पूजन करावें हेंच मला उचित आहे. ज्याप्रमाणें दैवी संपत्तिवानाला मी नमन करणें योग्य, त्याचप्रमाणें आसुरी संपत्तिवानालाही मला नमन केलें पाहिजे ! मित्र हो, माझीं हीं मतें ऐकून तुम्हांला मोठें नवल वाटेल, पण मी तरी काय करूं ? माझ्या डोक्यांत असेच विचार येतात आणि ते बंद करणें अथवा त्यांची दिशा बदलणें मला शक्य नाहीं. ज्याप्रमाणें सद्गुणी भगवद्भक्तांना मी नमन करतों, त्याचप्रमाणें अत्यंत दुर्गुणी सैतानालाही मी नमन करतों. ते सारेच माझे गुरू आहेत. ते सारेच मला ज्ञानदात्या वडिलांसमान पूज्य आहेत. ते सारेच माझे तारक आहेत. इतर स्त्रिया शुद्ध आणि पवित्र कां ? रस्त्यानें डोळे मोडीत फिरणारी नगरभवानी अस्तित्वांत आहे म्हणून. लोक तिला हंसतात म्हणून मीही तिला हंसलें पाहिजे ! एखाद्याला

मी शिव्या देत असेन आणि कदाचित् त्याच्या दुर्गुणांचा मला उपयोगही होत असेल! त्याचप्रमाणें एखाद्याला मी पूज्य मानीत असेन आणि त्याच्या चांगुलपणाचा फायदा मी घेत असेन. केवळ कल्पनावारूवर आरूढ होऊन हें मी कांहीं तरी बोलत आहें असें आपण समजूं नका. जी वस्तुस्थिति आहे तीच मी सांगत आहें. मी तुम्हांसमोर उभा आहें हें जितकें खरें आहे, तितकाच आतां सांगितलेला सिद्धांतही खरा आहे. रस्तोरस्तीं फिरणाऱ्या नगरभवानीची हेटाळणी केवळ लोकांच्या इच्छेस्तव मला करावी लागते, पण पातिव्रत्यरक्षणाच्या कामीं किती स्त्रियांना तिनें मदत केली आहे हा विचार माझ्या मनांत आला म्हणजे तिची योग्यता माझ्या मुक्तिदात्या गुरूइतकी आहे असें माझ्या मनांत आल्यावांचून राहत नाहीं. आपण सर्वांनींच या गोष्टीचा विचार करणें अवश्य आहे. प्रिय मित्र हो, आपण मनांतल्या मनांत या गोष्टीचा खोल विचार करा. जें सत्य आहे तें जसेंच्या तसेंच तुम्हांपुढें मीं मांडलें आहें. जों जों जगाचें अवलोकन मी अधिक करतों आणि अधिकाधिक स्त्रीपुरुषें माझ्या निरीक्षणांत येतात, तों तों या सिद्धांताबद्दल माझी खात्री अधिक पटत जाते. अशा स्थितींत मीं नांवें तरी कोणाला ठेवावीं, आणि स्तुति कोणाची करावी? एकाच नाण्याच्या या दोन बाजू आहेत. नाणें पाहावयाचें म्हणजे त्याच्या दोन्ही बाजू अवलोकनांत आणल्या पाहिजेत.

आपणापुढें असलेलें कार्य लहानसान नाहीं. त्याचा विस्तार फार मोठा आहे. तें साधण्यासाठीं आपणास जें अत्यंत महत्वाचें कर्तव्य करावयाचें आहे तें हें कीं सुप्तावस्थेंत असलेला जो प्रचंड विचारसमूह आपणापाशीं आहे त्यावर ताबा मिळवावयाचा. आपले हे विचार सध्या आपल्या ताब्यांत नाहींत, यामुळें त्यांचें कार्यही आपल्या जाणिवेंत न येतां चालू असतें.

एखाद्यानें कांहीं असत्कर्म केलें तर तें अगदीं आपोआप घडलेलें नसून त्याच्या जाणिवेनें घडलेलें असतें हें खरें; पण ज्या कारणामुळें तें असत्कृतीचें कार्य घडलें तें कारण जाणिवेच्या प्रांतापासून इतकें लांबवर आणि खोल असतें कीं कर्त्याच्या दृष्टिपथांत तें केव्हांच येत नाहीं; आणि यामुळें त्याचा प्रतिकार करणेंही त्याला अशक्य होतें. त्या कारणाला केव्हांच प्रतिकार ठाऊक नसल्यामुळें तें फार बलिष्ठ होऊन बसलें आहे आणि कर्त्याला गुलाम बनवून आपला अंमल तें त्याजवर चालवीत असतें.

हें कारण ताब्यांत आणावयाचें हेंच अभ्यासयोगाचें पहिलें अवतारकार्य आहे. तें ताब्यांत आणणें अशक्य नाहीं असें आपणास आढळून येईल. आपल्या ठिकाणीं जो विचारसमूह आज जाणिवेच्या प्रांतापलीकडचा होऊन बसला आहे त्याचा जन्म प्रथम जाणिवेच्या प्रांतांतच झाला आहे. त्याची उत्पत्ति प्रथम जाणिवेपासून झाली आणि नंतर खोल बुडी मारून तो जाणिवेच्या हद्दीबाहेर गेला. यामुळें त्याच्या जन्मभूमीला त्याला परत आणणें अशक्य नाहीं. पूर्वी ज्या क्रिया जाणिवेनें आपण केल्या, त्या कालांतरानें आपण विसरून गेलों. यामुळें त्यांना केवळ जडरूप येऊन त्या जाणिवेच्या बाहेर गेल्या. आपल्या सध्याच्या वाईट कर्मांना जशा या पूर्वक्रिया कारण होतात, त्याचप्रमाणें आपल्या सत्कार्यांचें कारणही या पूर्वक्रियाच होत हें लक्ष्यांत ठेवणें अवश्य आहे. आपली अंतःप्रकृति सत्कार्याकडे वळो अगर असत्कार्याकडे वळो; दोहींचें कारण एकच आहे. आपल्या सूक्ष्म देहाच्या पोतड्यांत असंख्य चिजा आपण भरून ठेवल्या आहेत. दीर्घकाळपर्यंत या खजिन्याची पाहणी आपण न केल्यामुळें त्यांत काय काय चिजा आहेत याचा विसर आपणास पडला आहे. त्या तेथें आहेत इतकेंही स्मरण सांप्रत आपणास राहिलेलें नाहीं. यामुळें त्यांजसंबंधीं कांहीं विचारही आपल्या मनांत येत नाहीं. त्यांतील कित्येकांस आतां अगदीं कीड लागून जाऊन त्या नुकसानकारक झाल्या आहेत. आपणास त्या केव्हां अपाय करतील याचा नेम नाहीं. यांतल्याच कित्येकांचा उद्रेक होतो आणि मनुष्यहानी करतो. या गुप्त विचारांचें सामर्थ्य असें भयंकर आहे कीं त्यामुळें देशचे देश बेचिराख होतात. या विचारांना परत ताब्यांत घेऊन त्यांना जाणिवेच्या प्रांतांत पुन्हां नेऊन घालावें यासाठींच अभ्यासयोगशास्त्र अवतीर्ण झालें आहे. अनेक सुप्तासुप्त विचार एकत्र होऊन त्यांच्या संघटनेनें मानवी जीवित बनलें आहे. यांतील कांहीं विचारमात्र आज प्रत्यक्ष क्रिया करीत असून बाकीचे विचार तसेच निजून राहिले आहेत. या साऱ्या विचारांना जागें करून ते सारे आपल्या अंमलाखालीं वागवावयाचे हेंच प्रचंड कार्य आज आपणापुढें आहे. असें झालें तरच आपली आजची गुलामगिरी जाऊन आपलें गेलेलें धनीपण आपणास पुन्हा प्राप्त होईल. काळीज, हृदय वगैरे अंतर्गत इंद्रियांच्या ज्या क्रिया आज आपणास नकळत चालू आहेत त्यांजवरही आपला अंमल चालू होईल आणि आपण म्हणूं त्याप्रमाणें हा सारा इंद्रियगण वागूं लागेल.

जाणिवेच्या हद्दीबाहेरील विचारांचें आक्रमण करणें हें अभ्यासयोगाच्या कार्यक्रमांतील पहिलें कलम आहे. यानंतर विचारातीत होण्यास आपण योग्य होतों. ज्याप्रमाणें आपोआप घडणाऱ्या क्रिया आपल्या विचाराक्षम स्थितींत घडून येतात, त्याचप्रमाणें दुसरीं कित्येक कार्यें विचारातीत स्थितींतील आहेत. या विचारातीत स्थितीपर्यंत आपण पोंहोंचलों म्हणजे आपण मुक्तावस्थेला पोंहोंचतों—नराचे आपण नारायण बनतों. मृत्यूचें रूपांतर चिरजीवितांत होतें; दुबळेपणाच्या जागीं सर्वशक्तिमत्त्व येतें आणि शृंखला गळून जाऊन आपले पाय मोकळे होतात. विचारातीत स्थितीचें ध्येय हें आहे. या स्थितीच्या साम्राज्याचा विस्तार अनंत आहे.

आपल्यापुढें असलेलें कार्य दोन प्रकारचें आहे हें आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून आपल्या ध्यानांत आलें असेलच. इडा आणि पिंगला यांच्या समतोल कार्यानें आपल्या निद्रित विचारभांडारावर जय मिळविणें हें आपलें पहिलें कार्य आहे. इडा आणि पिंगला यांच्या कार्यक्षमतेवरच आपला रोजचा व्यवहार चालू आहे. यांचें कार्य आपल्या ओळखीचें आहे. या ओळखीच्या मार्गानें अनोळखीचा रस्ता शोधून काढणें हें आपलें पहिल्या प्रकारचें कार्य आहे; आणि विचारातीत प्रांतांत प्रवेश करणें हें आपलें दुसरें कार्य आहे.

दीर्घकाळ अभ्यास करून ज्याला या सत्याची ओळख पटली असेल तोच खरा योगी होय असें योगशास्त्राचें म्हणणें आहे. आपणासारख्या सामान्य मनुष्यांस सुषुम्नेचा उपयोग कांहींच होत नाहीं. सामान्य मनुष्यांत तिचें द्वार बंद असतें. योग्याच्या सुषुम्नेचें द्वार खुलें होतें आणि कुंडलिनीचा प्रवेश त्यांत होतो, आणि हळुहळु वर चढतां चढतां सहस्रदल कमलापर्यंत पोंहोंचते. ती मेंदूंत पोंहोंचली म्हणजे आपलें सत्यरूप काय आहे हें योग्याला समजतें. आपण प्रत्यक्ष परमेश्वर आहों असा अनुभव त्याला येतो.

योगसोपानाची ही अखेरची पायरी आहे. आपणांपैकीं प्रत्येकास या पायरीवर आरूढ होणें शक्य आहे. ज्याला अशी योग्यता नाहीं असा एकही मनुष्य नाहीं. तथापि हें कार्य अत्यंत दुष्कर आहे अशी सूचना देणें मात्र अवश्य आहे. नुसतीं व्याख्यानें ऐकून आणि पांच चार मिनिटें प्राणायाम करून हें कार्य सिद्ध होईल असा भलताच भ्रम कोणींही बाळगूं नये. अखेरची सिद्धि प्राप्त होण्यासाठीं करावी लागणारी आगाऊ तयारीच अत्यंत

बिकट अशी आहे. दिवा लावण्यास पुरता एक क्षणही लागत नाहीं. काडी ओढली कीं ताबडतोब मेणबत्ती पेटून जिकडे तिकडे प्रकाशच प्रकाश होतो; पण मूळ मेणबत्ती तयार करण्यास केवढा काळ लागतो याचा विचार करा. जेवण जेवण्यास फार तर अर्धा तास लागेल; पण तें तयार करण्यास किती वेळ लागतो ! मेणबत्ती पेटून क्षणार्धांत प्रकाश व्हावा अशी आपली इच्छा आहे; पण मेणबत्ती तयार झाल्याशिवाय ती पेटणार कशी हा विचार मात्र आपण कधींच करीत नाहीं. ती तयार करणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे.

या अखेरच्या पायरीवर जाऊन बसणें हें काम अत्यंत दुर्घट आहे हें खरें; तथापि या कार्यासाठीं अल्पही परिश्रम आपण केले तरी ते फुकट जात नाहींत. आपले परिश्रम पुष्कळ झाले तर महत्कार्य साधेल आणि ते थोडे झाले तर कार्यही थोडें होईल; पण तें अगदींच वायां गेलें असें मात्र कधींच घडणार नाहीं. कशाचाही पूर्ण नाश होत नाहीं हें अर्वाचीन शास्त्रांचें एक तत्त्व आपणास ठाऊक आहेच. भगवान् श्रीकृष्ण यांस अर्जुन प्रश्न करतोः " **अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः । अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥ कच्चिन्नोभयविभ्रष्टः छिन्नाभ्रमिव नश्यति** " या प्रश्नाचें उत्तर भगवान् देतातः ' **पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते । नहि कल्याणकृत् कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥** ' या जन्मीं योगसिद्धीची प्राप्ति तुम्हांस न झाली तर पुढील जन्मीं तोच अभ्यास पुढें चालवून ती सिद्धि तुम्ही मिळवाल. असें होत नसेल तर येशु, बुद्ध, श्रीशंकराचार्य यांच्या लोकातीत बाल्यावस्थेची संगति तुम्ही कशी लावतां ? बालवयांत जीं कार्यें कोणाच्या स्वप्नींही यावयाचीं नाहींत, तीं त्यांनीं प्रत्यक्ष करून दाखविलीं हें कसें घडलें ?

प्राणायाम, आसन इत्यादि क्रियांची मदत योगाभ्यासांत फार होते यांत संशय नाहीं; तथापि त्या केवळ जड देहाच्या बाह्य क्रिया होत हेंही लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. खरा अभ्यास मानसिक आहे. तयारी करावयाची ती जड देहाची नसून मनाची करावयाची. याकरितां आपल्या आजूबाजूची परिस्थिति आपणास अनुकूल अशी असली पाहिजे. आपल्या चित्ताला शांति असावी. अनेक प्रकारच्या व्यवसायांनीं तें व्यग्र असूं नये. चित्ताला हांव फार असली म्हणजे तें रजोगुणी होऊन इतस्ततः भटकूं लागतें आणि तें केव्हांच शांत राहत नाहीं; अशी मानसिक अवस्था योगाला प्रतिकूल आहे.

तुम्हांस योगी व्हावयाचें असेल, तर तुमची वृत्ति अत्यंत मोकळी असली पाहिजे. आशेच्या शृंखलेंत तुमचे पाय गुंतलेले असूं नयेत. स्वातंत्र्याची आणि चित्ताला काळजी उत्पन्न न करणारी अशी आपली दिनचर्या असावी. आपल्यामागें कसल्याही उपाधी लावून घेऊं नये. योगाभ्यासाला ही पहिली आवश्यक गोष्ट आहे. आपल्या साऱ्या चैनी व्यवस्थितपणें चालल्या पाहिजेत आणि त्याबरोबरच आत्मानुभवही झाला पाहिजे अशी इच्छा करणारा मनुष्य अत्यंत मूर्ख होय. नदीपलीकडे जावें या इच्छेनें कोणा एका मनुष्यानें सुसरीच्या पाठीवर स्वारी केली अशी एक गोष्ट आहे. या मनुष्याचें शाहाणपण आणि संसारांतील चैनी भोगतां भोगतां आत्मानुभवाची वाट चोखाळूं पाहणाराचें शाहाणपण हीं एकाच किंमतीचीं आहेत. "प्रथम परमेश्वराच्या राज्याचा शोध करा; म्हणजे बाकीच्या सर्व वस्तू तुम्हांस मिळतील," अशी येशू ख्रिस्ताचीही आज्ञा आहे. आपलें आदि कर्तव्य हेंच आहे. त्याग याचा अर्थ हाच. जगावयाचें तें केवळ आपल्या ध्येयाच्या सिद्धीसाठीं. दुसऱ्या कोणत्याही भावना चित्तांत उरूं द्यावयाच्या नाहींत अशा पद्धतीची वागणूक आपण ठेवली पाहिजे. आपल्या ध्येयाशिवाय दुसऱ्या कोणत्याही विचारास आपल्या चित्तांत स्थळ मिळूं नये. आपलें आध्यात्मिक साम्राज्य मिळवावें यासाठींच आपण सारी धडपड करावी. ऐहिक वस्तु आणि सुखें हीं सारीं नाशवंत आहेत हें आपण प्रत्यहीं पाहत आहों. यासाठीं चिरंतन स्वरूपाचें जें कांहीं असेल आणि जें एकवार प्राप्त झाल्यानंतर आपणापासून निघून जाणार नाहीं तें मिळविण्याची खटपट करणें हेंच आपलें पहिलें कर्तव्य आहे. आत्मानुभव व्हावा अशी खरी तळमळ आपल्या चित्तास लागली असेल, तर त्यासाठीं एकसारखी धडपड केल्यावांचून आपणास गत्यंतर नाहीं; आणि अशा प्रकारची धडपड हीच आपल्या वाढीस कारण होईल. इच्छा नसेल तर धडपडही नाहीं आणि धडपडीच्या अभावीं वाढही नाहीं. अशी धडपड करीत असतां अनेक प्रकारच्या चुका आपण कदाचित् करूं; पण त्या चुकाच आपल्या कल्याणास कारण होणार नाहींत असं तरी कोणीं म्हणावें ?

आत्मानुभवाच्या मार्गांत आपला पहिला मोठा मदतगार ध्यान हा होय. ध्यानावस्थेंत आपल्या भोंवतालचें जड विश्व आपण विसरून गेलेले असतों.

आपण वस्तुतः आणि स्वभावतः चैतन्यरूप आहों ही भावना त्याच अवस्थेंत जागृत होत असते. त्या स्थितींत बाह्य जगाच्या मदतीची अपेक्षा आपल्या चित्तांत नसते. अगदीं अंधारमय अशा एखाद्या गुहेंत आपण बसलों असलों तरी आपला जीवात्मा आपल्याभोंवतीं प्रकाशाचा पूर उत्पन्न करीत असतो. नीचतम वस्तूही तेथें उज्ज्वल दिसतात. दुर्गंध सुगंधमय होतो. सैतानही तेथें परमात्मरूप होतो. त्या ठिकाणीं क्रोधादि विकारांना जागा नाहीं. तेथें शत्रूंचे मित्र होतात. 'मी आणि माझें' या शब्दांचे अर्थ आपण विसरून जातों. ध्यानाच्या वेळीं शरिराच्या अस्तित्वाचा विचार होईल तितका कमी करीत जावा. मला देहच नाहीं ही भावना पक्की करण्याचा प्रयत्न होईल तितका करावा; कारण आपल्या साऱ्या अधःपतनाचें मूळ कारण देहच होय. देह म्हणजेच मी ही पहिली भावना आपल्या नाशाचें मूळ कारण होय. देहाच्या ठिकाणीं ममत्व उत्पन्न झालें कीं आपलें सारें सुख तेवढ्या साडे-तीन हातांत गोळा होऊन बसतें. त्याच्या इच्छांची तृप्ति करणें हेंच आपलें कर्तव्य आहे असें वाटूं लागतें, आणि मग आपली सारी धडपड केवळ त्याच हेतूनें सुरू असते. त्यांत तृप्ति सांपडली नाहीं कीं आपली जीवितयात्रा कष्ट-मय होते. याकरितां 'मी देह' असें वाटणें हीच आपली पहिली चूक होय. आपल्या साऱ्या दुःखाचें रहस्य हेंच. 'मी देह' ही भावना टाकून 'मी चैतन्य' ही भावना उत्पन्न करणें हें आणि सुखदुःखमिश्रित विश्व केवळ पडद्यावरील चित्रांसारखें आहे हें जाणणें हीच आत्मानुभवाची गुरुकिल्ली आहे. 'सारें विश्व पडद्यावर रंगविलें असून मी त्याचा साक्षी आहें' असा अनुभव येणें हेंच आपलें अखेरचें साध्य.

---

९

## भक्ति.

कांहीं थोडे धर्म वगळले असतां बाकीच्या धर्मांत व्यक्तिविशिष्ट परमेश्व-राची कल्पना आढळून येते. बौद्ध आणि जैन या धर्मांशिवाय जगांतील बाकीच्या साऱ्या धर्मांत ही कल्पना आहे, आणि तीबरोबरच भक्ति आणि पूजन या कल्पनांचाही उगम आहे. बौद्ध आणि जैन या धर्मांत परमेश्वराची

कल्पना नाहीं आणि तेथें त्याचें पूजनही अर्थातच नाहीं; तथापि आपापल्या धर्मसंस्थापकांचें पूजन तेही करीत असतात; आणि त्यांच्या पूजनाचा प्रकारही इतरांसारखाच आहे. मनुष्यमात्रावर प्रेम करणाऱ्या कोणातरी उच्च प्रतीच्या प्राण्याच्या भक्तीची कल्पना सर्व जगभर रूढ आहे. बौद्ध आणि जैन हे परमेश्वराचें अस्तित्व मानीत नसले, तरी आपल्या धर्मसंस्थापकांच्या ठिकाणीं तितकीच पूज्यबुद्धि ठेवतात आणि इतर धर्मानुयायी जशी परमेश्वराची भक्ति करतात, त्याचप्रमाणें ते आपापल्या धर्मसंस्थापकांची करीत असतात. नांवांत फरक असला, तरी मूळ भावनांचें स्वरूप तेंच आहे. जगांतील भिन्न भिन्न धर्मांच्या उपासकांच्या पायरीप्रमाणें व परिस्थितीप्रमाणें भक्तीचे प्रकार वेगवेगळे आढळून येतात. पूजनाचे होम हवनादि जड प्रकार हे भक्तीच्या कनिष्ठ रूपाचे द्योतक आहेत. ज्यांना परोक्ष तत्त्वांचें आकलन करण्याची पात्रता नसते त्यांच्यांत हे प्रकार विशेषेंकरून रूढ असतात. बुद्धीला प्रगल्भता नसल्यामुळें सूक्ष्म तत्त्वांना जडरूप दिल्याशिवाय त्यांच्या आकलनांत तीं येणें शक्यच नसतें. सूक्ष्म तत्त्वांच्या उच्च वातावरणांत तरंगण्याची विद्या त्यांस पारखी असल्यामुळें त्या तत्त्वांना खालीं ओढून स्वतःच्या पदवीस ते आणून बसवीत असतात. अशा स्थितींत बाह्यविधींचें स्तोम माजतें हें रास्तच आहे. या बाह्यविधींतच नानाप्रकारच्या चिन्हांचा अंतर्भाव होतो. जगाच्या प्राचीन काळच्या इतिहासांतही हा प्रकार आरंभापासून आढळून येतो. सूक्ष्म आणि परोक्ष तत्त्वांचें आकलन जड संज्ञांच्या द्वारें करण्याची धडपड मनुष्यप्राणी फार प्राचीन काळापासून करीत आला आहे. बाह्यविधी आणि चिन्हें यांची उत्पत्ति अशा प्रकारें झाली आहे. घंटानाद, संगीत, होमहवन, ग्रंथप्रतिमा वगैरे साऱ्या वस्तू याच प्रकारांत येतात. बाह्येंद्रियांना ज्यांचें आकलन करतां येईल आणि ज्यांच्या द्वारें अमूर्त तत्त्वांचें आकलन करतां येईल अशा कोणत्याही पदार्थांचें पूजन मनुष्यप्राणी करीत असतो.

अशा प्रकारें जड पदार्थांचें पूजन करणें अयोग्य आहे असें म्हणणारा सुधारकवर्गही प्रत्येक धर्मांत फार प्राचीन काळापासून निर्माण होत आला आहे. होमहवनादि क्रिया आणि प्रतिमापूजन या गोष्टी या वर्गाच्या मतें सर्वथैव त्याज्य दिसतात. तथापि अशा सुधारकांच्या प्रयत्नाला कधीं काळीं

तरी यश येईल असा संभव दिसत नाहीं. हे प्रयत्न यापूर्वी जसे विफल झाले तसेच ते यापुढेंही होतील असें भाकित करण्यास हरकत नाहीं. मनुष्याचा स्वभाव आहे तसाच चालू राहील तोंपर्यंत कोणत्या तरी जड वस्तूची मदत त्याला लागणारच. प्रत्यक्ष दिसणाऱ्या अशा एखाद्या वस्तूला तो अवश्य मिठी मारणार. स्वतःच्या चित्तांतील कल्पनातरंग केवळ कल्पनामय आणि अधांतरीं राहणें त्याला पसंत पडत नाहीं. चित्तांतील हे कल्पनातरंग प्रत्यक्ष सृष्टींत स्वतःच्या डोळ्यांनीं पाहण्याची लालसा त्याला असते, आणि ती पूर्ण करण्याकरितां त्यांची संगती कोणत्या तरी जड पदार्थाशीं तो घालतो. अशा रीतीनें अमूर्त कल्पनासमूहाला मूर्तरूप देण्याची त्याची वहिवाट फार प्राचीन काळापासून आहे. अशा प्रकारच्या जड क्रिया नष्ट कराव्या असा उपक्रम महंमदी सुधारकांनीं केला; पण त्यांत एक जड पदार्थ जाऊन त्याच्या जागीं दुसरा येण्यापलीकडे अधिक कांहींच झालें नाहीं. अशाच प्रकारचा यत्न ख्रिस्ती धर्मांतील प्रॉटेस्टंट पंथानेंही केला आणि त्याची वाटही तशीच लागली. यावरून बाह्य उपचार समूळ नाहींसे करणें शक्य नाहीं असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. एका प्रकारचा विधी तुम्हीं बंद केला तर त्या जागीं आणखी एखादा नवा प्रकार येतो. कोणत्याही प्रकारचे बाह्य-विधी, प्रतिमा, अथवा चिन्हें हीं पापमूलक आहेत असें मुसलमान समजतात; पण स्वतःची काबा येथील मशीद मात्र त्यांना खपते, इतकेंच नव्हे तर ती परमपवित्र वाटते. प्रार्थना करतांना आपण त्या मशिदींत आहों अशी भावना प्रत्येक मुसलमानानें प्रार्थनेच्या वेळीं करणें अवश्य आहे. इतर धर्मांचीं बाह्य चिन्हें त्याला पापमय दिसतात आणि तसलींच स्वतःचीं चिन्हें तो पुण्यमय समजत असतो ! मशिदीच्या भिंतींत बसविलेल्या एका काळ्या धोंड्याचें चुंबन प्रत्येक मुसलमान यात्रेकरूनें करणें अवश्य आहे. अखेरच्या दिवशीं परमेश्वर पापपुण्याचा निवाडा करील तेव्हां हा धोंडा प्रत्येकाबद्दल साक्ष देण्यास हजर राहणार आहे ! त्याचप्रमाणें झिमझिम येथील विहिरींतील चुळकाभर तीर्थ जो कोणी प्राशन करील त्याला न्यायाच्या दिवशीं दिव्य देह मिळणार असून त्यानंतर चिरजीवनही त्याला प्राप्त होईल !

इतर धर्मांत विशिष्ट आकाराच्या इमारती या चिन्हांच्या जागीं येतात. चर्च हें स्थळ इतर कोणत्याही जागेहून अधिक पवित्र आहे असें प्रॉटेस्टंट पंथी

समजतात. या ठिकाणीं तें चर्च हें पवित्रतेचें जड चिन्ह आहे हें कोणाच्याही लक्ष्यांत येईल. त्याचप्रमाणें नव्या कराराचें पुस्तकही अत्यंत पूज्य समजलें जातें. एकंदरीनें तात्पर्यार्थ इतकाच कीं जड चिन्हें समूळ नाहींशीं करणें आपणांस शक्य नाहीं. यासंबंधानें कितीही ओरड आपण केली तरी ती अरण्यरुदनवत् होणार यांत संशय नाहीं; आणि वास्तविक पाहतां अशी ओरड तरी आपण कां करावी? अशा प्रकारच्या चिन्हांचा उपयोग करण्यास हरकत कोणती? त्यांविरुद्ध एवढा गिल्ला करण्याचें कारण मला तरी कांहीं दिसत नाहीं. नुसत्या चिन्हांना कांहीं महत्व नाहीं हें खरें, पण ज्या सत्य वस्तूचीं तीं दर्शक आहेत, त्या महत्वाच्या नाहींत असें कोण म्हणेल? फार काय, पण हें सारें विश्व हेंही एक चिन्हच आहे, आणि त्याच्या पाठीमागें जी सत्य वस्तु आहे तिचें आकलन करण्याचा यत्न त्याचयाद्वारें आपण करीत आहों. जड वस्तु अथवा चिन्ह हें कांहीं आपलें साध्य नव्हे; तथापि तें साधन आहे आणि त्या साधनाच्याद्वारें चैतन्याला पोंहोंचण्याचा यत्न आपण करीत असतों. आकृती, मूर्ती, घंटा, धूपदीप, ग्रंथ, देवळें, चर्चें आणि इतर सारीं चिन्हें हीं पावित्र्याचीं द्योतक असल्यामुळें तीं त्याज्य नव्हत. चैतन्याचें जें बीज आपण पेरलें आहे त्याला जोमदार अंकूर फुटून त्याचा वृक्ष बनण्यास या साऱ्या गोष्टींची मदत आपणास होत असते; तथापि हीं केवळ मदतीचीं साधनें आहेत हेंही विसरतां उपयोगी नाहीं. नाहीं तर साधनेंच साध्यरूप होऊन बसतात आणि आपल्या अखेरच्या फळाला आपण अंतरतों. अशा साधनांचा उपयोग लक्षावधि लोक करित असतात; आणि यांपैकीं बहुतेकांची वाढ फारशी होत नाहीं हेंही आपण पाहातों. अशा अनेक साधनांच्या समृद्धींत आपला अध्यात्मिक जन्म होतो हें वावगें नाहीं; पण त्या साधनांत असतांच मृत्यु यावा हें मात्र रास्त नाहीं. साधनांच्या मर्यादित भूमींत आपल्या कार्याला आरंभ व्हावा हें युक्त आहे, पण मरेपर्यंत जर हीं साधनें टाकतां आलीं नाहींत जर आपली वाढ झाली नाहीं हेंच सिद्ध होत नाहीं काय? मुलानें चालण्यास शिकावें म्हणून त्याला पांगुळगाडा देतात, पण जन्मभर त्याचा पांगुळगाडा जर सुटला नाहीं, तर त्याची बाल्यदशा संपली नाहीं असेंच म्हणावें लागेल. गुराचें तोंड लागूं नये आणि वाऱ्यावावटळीपासून इजा होऊं नये म्हणून रोपाच्या भोंवतीं कुंपण

घालणें इष्ट आहे; पण पुढें तें काढून टाकण्याची वेळ जर कधींच आली नाहीं, तर त्या झाडाची वाढ खुंटलेली आहे हें सिद्ध होत नाहीं काय? त्याचप्रमाणें धूपदीपादि साधनांचा त्याग आपणास मरेपर्यंत करतां आला नाहीं तर आपली आध्यात्मिक बाल्यदशा संपली नाहीं असेंच म्हणावें लागेल.

याकरितां हीं साधनें निरंतर चालू राहिलीं पाहिजेत असें कोणी म्हणेल तर तें त्याच्या कच्च्या बुद्धीचें द्योतक समजावें. अखेरच्या साध्याकडे नेणारीं हीं साधनें आहेत हें म्हणणें मात्र सर्वांशीं खरें आहे. परोक्ष सिद्धांताची नुसती कल्पनाही पंगु मनाला होऊं शकत नाहीं; याकरितां त्याला अशा प्रकारचे टेंकू लावणें अयुक्त नाहीं.

आतां येथें आणखीही एक भयाचें स्थल आहे. आध्यात्मिक वाढ म्हणजे बुद्धीची वाढ नव्हे, हें पक्कें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. एखादा मनुष्य अगदीं बृहस्पतीसारखा विद्वान असेल; पण त्याची आध्यात्मिक योग्यता लहान मुलाइतकीच असण्याचा संभव आहे. त्याचें प्रत्यंतर पाहण्यास फार लांब जावयास नको. ईश्वर सर्वव्यापी आहे हें तत्त्व तुम्हा सर्वांस पक्कें ठाऊक आहे; पण सर्वव्यापी म्हणजे काय याची यत्किंचित् तरी कल्पना तुम्हांस करतां येते काय? या गोष्टीचा विचार आपल्या मनाशींच करून पहा. सर्वव्यापित्व या गुणाची कल्पना आपणांपकीं किती जणांस आहे? सर्वव्यापित्वाची कल्पना मनाला व्हावी म्हणून आटोकाट धडपड तुम्हीं केली तर, फार झाल्यास विशाल आकाशाची, अफाट महासागराची, विस्तीर्ण पृथ्वीची अथवा साहाऱ्यासारख्या वालुकामय प्रदेशाची कल्पना तुम्हांस करतां येईल; पण या साऱ्या जड प्रतिमाच आहेत. यांत सूक्ष्मरूपाची वस्तु एकही नाहीं; आणि परोक्षवस्तूचें आकलन परोक्ष या स्वरूपांत करण्याची शक्ति जोंपर्यंत तुमच्या चित्तास आली नाहीं, तोंपर्यंत अशाच प्रकारच्या जड वस्तूंचा आश्रय करणें तुम्हांस भाग आहे. साध्याची कल्पना साध्य या रूपांत जोंपर्यंत करतां येत नाहीं, तोंपर्यंत साधनांच्या जड रूपाला तुमचें चित्त अवश्य चिकटून राहणार. हीं साधनें अथवा या प्रतिमा मनाच्या बाहेर असल्या अथवा आंत असल्या तरी त्यांची किंमत एकच. जड वस्तूची प्रतिमा जड डोळ्यांनीं पाहणें अथवा तीच प्रतिमा चित्तानें आठवणें यांत वस्तुतः कांहीं फरक नाहीं. मनुष्यप्राणी जन्मतःच जडबुद्धि आहे. आपण सारे जन्मतःच मूर्तिपूजक

आहों; आणि मानवी स्वभाव आहे असाच राहील तोंपर्यंत मूर्तिपूजा चांगलीच आहे असें म्हणणें प्राप्त आहे; कारण ती मानवी स्वभावाशीं सुसंगत आहे. मानवी भावनेला ती सोडून नाहीं. आपल्या जन्मस्वभावाचें उल्लंघन करून पलीकडच्या प्रदेशांत जाण्याची शक्ति कोणाच्या अंगीं आहे? अशी शक्ति फक्त अवतारी पुरुषांच्या अंगीं मात्र असते. जीं माणसें पूर्णत्वाला पोंहोंचलेलीं असतात तींच हें अतर्क्य काम करूं जाणतात. बाकीचीं सारीं मूर्तिपूजक आहेत. आम्ही निराकाराचे उपासक आहों अशा बढाया तोंडानें त्यांनीं कितीही मारल्या तरी तीं मूर्तिपूजकच असतात. हें विश्व नाना प्रकारच्या आकारांनीं भरलें आहे, असें जोंपर्यंत आपल्या डोळ्यांस दिसेल तोंपर्यंत आपली पायरी मूर्तिपूजकाची आहे हें निश्चित होय. आपणासभोंवतीं दिसणारें हें विश्व हीच ईश्वराची एक प्रचंड प्रतिमा आहे आणि हिचें पूजन आपण प्रत्यहीं करीत आहों. 'मी देह' ही भावना ज्याच्या ज्याच्या चित्तांत शिल्लक असेल तो प्रत्येक मनुष्य साभावतःच मूर्तिपूजक आहे. वस्तुतः आपण चैतन्य आहों. ज्याला रूप नाहीं आणि आकारही नाहीं तें चैतन्य आपण आहों. जें जडरूप नाहीं आणि जें अमर्याद आहे तें चैतन्य आपण आहों. पण या वस्तुस्थितीचें आकलन करण्याचें सामर्थ्य ज्याला नाहीं आणि देहादि जडपदार्थांच्या द्वारेंच स्वतःच्या अस्तित्वाचा प्रत्यय ज्याला पटतो असा प्रत्येक मनुष्य मूर्तिपूजक आहे. अशी वस्तुस्थिति असतां एखाद्यानें स्वतःस निराकारभक्त म्हणवून इतरांस मूर्तिपूजक म्हणून हिणवावें ही केवढ्या आश्चर्याची गोष्ट आहे! थोडक्यांत सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं प्रत्येकजण मूर्तिपूजक असून स्वतःची मूर्ति त्याला पूज्य वाटते आणि इतरांच्या मूर्ती त्याज्य वाटतात. आपण निर्माण केलेल्या मूर्तींचें पूजन कल्याणप्रद असून दुसऱ्यांनीं आपापल्या मूर्तींची पूजा करणें म्हणजे ईशपूजन नव्हे असें तो म्हणत असतो.

आतां अशीं पोरकटपणाचीं खुळें आपण टाकून दिलीं पाहिजेत. पुष्कळसे मंत्र तोंडानें बडबडणें, तालसुरावर स्तोत्रें गाणें, अथवा अमुक विशिष्ट मतें आपलीं असें मानणें, बुद्धीच्या जोरावर घटपटांची शुष्क खटपट करणें, दुसऱ्या कोणीं कांहीं मतें सांगितलीं म्हणजे नंदीसारखी मान डोलविणें, अशा प्रकारच्या गोष्टींतच सारा धर्म भरून राहिला आहे असें वाटणें हें मूर्खपणाचें

द्योतक आहे. या गोष्टी आतां मागें टाकून आपण पुढें सरलें पाहिजे. आपल्या बापदाद्यांचा धर्म म्हणून हव्या त्या खुळाला मिठी मारून बसणें आपणांस योग्य नव्हे. केवळ आपल्या राष्ट्राचा धर्म, अथवा कुळाचा धर्म म्हणून विचारशून्य बनून कसल्याही कल्पना आणि विधिविधानें यांस चिकटणें आपणांस शोभत नाहीं. या साऱ्यांना लांब झुगारून देऊन त्यांच्या हद्दीपलीकडे आपण गेलें पाहिजे. अखिल मानवकुल हें एकरूप अस्तित्व असून तें हळूहळू प्रकाशाकडे येत आहे. मानवकुलरूपी हें रोप हळूहळू वाढत असून त्याला नव्या नव्या ढिऱ्या फुटत आहेत. परमेश्वर या नांवानें ओळखलें जाणारें जें सत्यरूप त्याच्या संनिध मानवकुल हळू हळू जात आहे. या प्रवासांतला अगदीं पहिला मुक्काम विधिविधानें हाच होय. जडरूपांतूनच चैतन्याचा मार्ग जात असतो.

ईशपूजनाचे अनेक प्रकार, होमहवनादि गोष्टी अथवा इतर बाह्योपचार यांचें अवलोकन सूक्ष्म दृष्टया आपण केलें तर त्यांच्या पोटीं एक तत्त्व आपणास आढळून येईल. त्यांच्या पोटीं जें नाम आहे, त्यासाठीं हे सारे प्रकार असतात. जुन्या काळचा ख्रिस्ती धर्म पहा, अथवा जगांतील दुसरे कोणतेही जुने धर्म पहा, त्यांत नाममाहात्म्यच मुख्यतः आढळून येईल. एखाद्या नामाच्या मध्यबिंदूभोंवतीं बाह्योपचारादि सारी मंडळी गोळा झालेली असते. सर्व धर्मांनीं नाम हें अत्यंत पवित्र मानलेलें आहे. परमेश्वराचें नाम हें सर्व पवित्र वस्तूंहून अधिक पवित्र आणि अनुपम्य आहे असें बायबलांतही म्हटलें असल्याचें तुम्हांस ठाऊक असेलच. फार काय, पण परमेश्वर हा नुसता शब्दसुद्धां अत्यंत पवित्र समजला आहे. येथें सूक्ष्म भावना आणि जड शब्द हीं पावित्र्याच्या दृष्टीनें एकरूप झालीं आहेत. शब्द हाच परमेश्वर, असें नव्या करारांतील एक वचन आहे; आणि असें असणें हें अगदीं योग्य आहे. विश्व हें तरी नाम आणि आकारच नव्हे काय? शब्दाचा अभाव झाला, तर आपल्या विचारशक्तीचीही इतिश्री होईल. शब्दावांचून विचार करणें आपणांस शक्य आहे काय, याचा अनुभव तुम्ही स्वतःशींच घेऊन पहा. विचार आणि शब्द हीं अभेद्य आहेत. त्यांना वेगळें करणें शक्य आहे असें तुम्हांपैकीं कोणास वाटत असेल, तर तसें करण्याचा यत्न करून पहा. जेव्हां जेव्हां कसलाही विचार तुमच्या चित्तांत

उद्भवतो तेव्हां तेव्हां नाम अथवा शब्द आणि रूप अथवा आकार यांच्याच द्वारें त्यांचें जनन झालेलें असतें. यांपैकीं एक जेथें असेल तेथें दुसरेंही असावयाचेंच. जेथें एक जाईल तेथें तें दुसऱ्याला बरोबर घेऊनच जाईल. विचार शब्दाला आणतो आणि शब्द विचाराला प्रसवतो. अशा रीतीनें सारें विश्व ही परमेश्वराची एक प्रतिमाच आहे, आणि त्या प्रतिमेच्या मागें त्याचें नाम उभें आहे. प्रत्येक विशिष्ट देह हें एक रूप अथवा आकार असून त्यामागें त्याचें विशिष्ट नाम असतें. 'माझा मित्र राजश्री अमुक' असा विचार तुमच्या मनांत येण्याबरोबर तेथें त्याच्या देहाची प्रतिमा ताबडतोब उभी राहते, आणि उलटपक्षीं तुमच्या मित्राची देहयष्टि तुम्हांस आठवते तेव्हां त्याच्या नामाचें स्मरणही तुम्हांस होतें. मनुष्यस्वभावांतच या गोष्टी आहेत. त्या टाकावयाच्या म्हटलें तर आपला सारा स्वभावच टाकून दिला पाहिजे. ज्या घटकांचा एखादा पदार्थ बनलेला असतो त्यांतील एखादा घटक काढून टाकावयाचा म्हटलें तर तो पदार्थही त्याबरोबर नाहींसा होऊन दुसरा एखादा पदार्थ त्या जागीं येईल. त्याचप्रमाणें ज्या घटकांचा मनुष्यस्वभाव बनला आहे त्यांतील एखादाही काढून टाकणें आपणास शक्य नाहीं. सूक्ष्मेंद्रिय शास्त्राचें म्हणणेंही हेंच आहे. नामावांचून रूपाची कल्पना करणें अथवा रूपावांचून नुसत्या नामाची कल्पना करणें मानवी मनास शक्य नाहीं असें सूक्ष्मेंद्रियशास्त्रही सांगतें. नाम आणि रूप हीं एकमेकांशीं इतकीं जखडलीं आहेत कीं कोणत्याही उपायांनीं आपणांस तीं एकमेकांपासून विभक्त करतां येणें शक्य नाहीं. लाटेच्या आंतील आणि बाहेरील असे दोन भाग मिळून ज्याप्रमाणें एक लाट बनते, त्याचप्रमाणें नाम आणि रूप हीं एकाच वस्तूचीं दोन अंगें होत. यामुळेंच नामाला एवढें महत्व साऱ्या जगभर प्राप्त झालें आहे. अजाणपणें अथवा जाणून बुजून नामाचें हें महत्व मनुष्याच्या लक्ष्यांत आलें आहे.

याच बाबींत आणखीही एक मुद्दा लक्ष्यांत घेण्यासारखा आहे. जगांतील अनेक वेगवेगळ्या धर्मांत माहात्म्यांची पूजा करण्याची चाल आहे. कोठें कृष्णाची, तर कोठें बुद्धाची आणि कोठें ख्रिस्ताची, याप्रमाणें साऱ्या जगभर ह्या पूजनाचा हा प्रकार आढळून येतो. याशिवाय साधु पुरुषांची पूजा होते ती वेगळीच. असे शेंकडों सत्पुरुष आज जगभर आहेत आणि त्यांचें पूजनही होत आहे.

आणि असें कां होऊं नये ? प्रकाशस्पंद सर्वत्र भरून राहिले आहेत. जेथें प्रकाश नाहीं अशी जागा पृथ्वीवर एकही नाहीं. अगदीं काळा कुळकुळीत काळोख असला, तरी तेथेंही घुबडाला दिसतें. यावरून तेथें प्रकाशकिरणांचें अस्तित्व आहे हें सिद्ध होतें. मनुष्याच्या डोळ्यांना तेथें प्रकाशाचें अस्तित्व दिसत नसलें, तरी तेथें प्रकाश नसेल तर घुबडालाही कांहीं दिसणार नाहीं. मनुष्याच्या डोळ्यांना हा प्रकाश दिवा, सूर्य, चंद्र, तारे, इत्यादिकांच्या ठिकाणीं मात्र दिसतो; आणि घुबडाला तोच प्रकाश काळ्याकुट्ट अंधारांतही दिसतो. परमेश्वर सर्वव्यापी आहे. तो नाहीं असें ठिकाण कोठेंच नाहीं. प्राणिमात्रांत त्याचें वास्तव्य प्रकट झालें आहे; तथापि मनुष्याला त्याचा प्रत्यय मनुष्याच्याच द्वारें येतो; आणि यामुळें मनुष्याच्या द्वारें मनुष्य परमेशपूजन नेहमींच करीत आला आहे. हा प्रकार कांहीं आजकालचा आहे असें नाहीं; कालाच्या आरंभापासून तो सुरू आहे. परमेश्वराचा प्रकाश, त्याचें अस्तित्व, त्याचें चैतन्य जेव्हां मनुष्यदेहाच्या द्वारें प्रकाशतें, तेव्हांच मनुष्याच्या जाणिवेंत तें येतें. मनुष्यप्राण्याचा स्वभाव आहे असाच शिल्लक राहील तोंपर्यंत हें असेंच असावयाचें. त्याच्याविरुद्ध कितीही ओरड तुम्हीं केली तरी तिचा कांहीं उपयोग नाहीं. असें होऊं नये म्हणून केवढीही धडपड तुम्हीं केली तरी परमेश्वराचें स्मरण तुम्ही करूं लागलां कीं तुमचा स्वभाव अवश्य उसळून वर येईल, आणि मनुष्याची प्रतिमा तुमच्या मनश्चक्षूंपुढें उभी राहील. यामुळें बहुधा प्रत्येक धर्मांत तीन वस्तूंचा समुदाय आढळून येतो. बाह्योपचार अथवा विधी, नाम आणि सत्पुरुष ह्या त्या तीन वस्तू होत. सर्व धर्मांत हें त्रिकूट आहे, पण असें असतांही या बाबींत सर्व धर्म परस्परांशीं लढाया करीत असतात. एक म्हणतो "माझ्या धर्मांत जें नाम सांगितलें आहे तेवढेंच खरें; माझ्या धर्मांत जें रूपवर्णन आहे तेंच खरें रूप; आणि माझ्या धर्मांत होऊन गेलेले सत्पुरुष तेवढेच खरे साधू; बाकी सब झूठ" आतां अगदीं अलीकडे या मनोवृत्तींत थोडासा फरक झालेला आहे. जुने धर्म हे ख्रिस्ती धर्माचे आगामी दूत होत असें ते म्हणूं लागले आहेत. या धर्मांनीं ख्रिस्ती धर्माच्या आगमनासाठीं पूर्वतयारी करून ठेवली आणि नंतर हा सत्यधर्म प्रकट झाला असें त्यांचें म्हणणें आहे. दगडापेक्षां वीट मऊ या नात्यानें त्यांचें हें मतही

कांहीं वाईट नाहीं. मनुष्यांना धर्माभिमुख करण्याकरितां परमेश्वरानें हे जुने धर्म प्रथम निर्माण करून त्यांच्या चित्ताची तयारी केली आणि नंतर खरा धर्म म्हणजे ख्रिस्ती धर्म प्रकट केला असें त्यांचें म्हणणें आहे. पूर्वींच्या त्यांच्या विरोधी दृष्टीच्या मानानें पाहतां इतकी सहिष्णुताही पुष्कळच आहे असें म्हणणें भाग आहे. पन्नास वर्षांपूर्वी इतकेही शब्द त्यांनीं आपल्या मुखावाटे काढले नसते. त्या वेळीं ख्रिस्ती धर्माशिवाय बाकीचे सारे धर्म एकजात खोटे असेंच ते म्हणत होते. आतां ख्रिस्ती उपदेशकांच्या पदरींच ही सारी चूक होती असें नाहीं. असें म्हणणारे लोक साऱ्या जगभर प्रत्येक धर्मांत आहेत. ‘ माझें खरें आणि बाकीचें तें खोटें, ’ असें म्हणणारे लोक प्रत्येक राष्ट्रांत आणि प्रत्येक धर्मांत असतात. आपण करतों तें उत्तम आणि त्याप्रमाणेंच बाकीच्यांनीं करणें त्यांस कल्याणप्रद आहे असें वाटणें हा मनुष्य-स्वभावच आहे. अशाच वेळीं अनेक धर्मांचा अभ्यास करणें फार उपयुक्त होतें. जे विचार केवळ आपलेच आहेत असें आपणास वाटत असतें तेच जुन्या काळीं अस्तित्वांत होते, एवढेंच नव्हे तर आपल्यापेक्षां अधिक सुसंगत रीतीनें त्यांची मांडणी केलेली होती, असें या अभ्यासानें आपणास आढळून येतें. आपल्या विचारांतील बोबडेपणाही या जुन्या काळच्या विचारांत नव्हता असें आपल्या प्रत्ययास येईल.

धर्माभ्यासाच्या आरंभींच्या कालीं बाह्योपचारांची आवश्यकता असते; पण आपणांस धर्मतत्त्वांचें ज्ञान व्हावें अशी खरी तळमळ ज्याला असते, तो हे बाह्योपचार लवकर टाकून देतो आणि सत्याच्या भेटीसाठीं पुढील मार्ग चालूं लागतो व ज्या ठिकाणीं असल्या विधिविधानांचें महत्त्व कांहीं नाहीं अशा स्थळीं पोंहचतो. बाह्योपचारांची आवड अथवा आवश्यकता हीं मनाच्या बाल्यावस्थेचीं द्योतक आहेत. त्याला प्रगल्भ दशा येऊं लागली म्हणजे असली क्षुद्र आवड तें आपोआप सोडून देतें. देवळें, मशिदी, चर्चें, घंटा, ग्रंथ हीं सारीं प्रथमावस्थेंतील साधनें आहेत. लहान मुलांना चित्रांच्या साहाय्यानें शिक्षण देतात, त्याचप्रमाणें धर्माभ्यासाच्या धूळपाटीवर बसणाऱ्या मुलांस हीं साधनें उपयोगीं पडतात. यांच्या साहाय्यानें अक्षरओळख होऊन मन प्रगल्भ होऊं लागलें म्हणजे हीं साधनें हळुहळु सुटत जातात. धर्माच्या मार्गावर ज्याला आरूढ व्हावयाचें असेल त्याला या साधनांचा आश्रय

आरंभीं केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. परमेश्वराच्या भेटीची त्याची तळमळ वाढत गेली म्हणजे त्याच्या ठिकाणीं खरी भक्ति उत्पन्न होऊं लागते. पण अशी तळमळ खरोखर किती जणांस लागली आहे हाच काय तो प्रश्न आहे. बहुतेकांचा सांप्रतचा धर्म पाहिला तर स्वतःस एखाद्या विशिष्ट पंथाचा म्हणविणें, कांहीं विशिष्ट मतें आपणांस पटलीं असें तोंडानें म्हणणें अथवा फारच झालें तर बुद्धिवाद करून तत्त्वांचा काथ्याकूट करणें इतक्यापुरताच आहे. पण खरा धर्म या वस्तूंत नाहीं. जें आपण तोंडानें बोलतों तें प्रत्यक्ष होऊन जाणें याचें नांव धर्म; आत्मानुभव घेणें हा धर्म. धर्मतत्त्वांसंबंधीं अनेक प्रकारचे वादविवाद आपणांस सध्या सर्वत्र ऐकूं येतात. जीवात्मा आणि परमात्मा यांजबद्दलही शिळोप्याच्या गोष्टी आपल्या कानीं कमी पडतात असें नाहीं. पण या हजारों वावदुकांपैकीं कोणालाही तुम्हीं " परमेश्वराचा अनुभव तुला झाला आहे काय " असा प्रश्न केला तर त्याला "होय" असें ठांसून उत्तर देण्याची त्याची छाती आहे काय ? " ज्या आत्म्याबद्दल इतकी बडबड तूं करतोस त्याची प्रत्यक्ष ओळख तुला आहे काय ? " या प्रश्नाला " नाहीं" हेंच उत्तर तुम्हांस सर्वत्र ऐकूं येईल; आणि असें असतांही अत्यंत नवलाची गोष्ट ही कीं यांपैकीं प्रत्येक जण दुसऱ्याशीं मोठ्या कडाक्याचे वाद या बाबींत घालीत असतो !

एके वेळीं हिंदुस्थानांत असेच अनेक पंथाचे लोक एकत्र बसले असतां त्यांच्यांत वाद सुरू झाला. एक म्हणतो " शिव हाच खरा परमेश्वर. " दुसरा म्हणाला " छे, छे, विष्णु हाच खरा देव!" अशा रीतीनें प्रत्येकजण आपापल्या इष्ट देवतांबद्दल बोलूं लागला. असल्या प्रकारच्या वादविवादाचा शेवट लागणें कधींच शक्य नाहीं. हा वाद अशा प्रकारें चालू आहे इतक्यांत एक सत्पुरुष तेथें आला, तेव्हां या सर्व मंडळींनीं आपापले मुद्दे त्याजपुढें मांडिले. तेव्हां त्यांपैकीं शिवभक्त होता, त्याकडे वळून तो साधुपुरुष म्हणाला, " तुम्हीं शिवाची भेट घेतली आहे काय? तुमची त्याची पुसट ओळख तरी आहे काय ? जर नसेल तर तोच मोठा असें तुम्ही कसें म्हणतां ? " त्यानंतर विष्णुभक्ताला तो म्हणाला, "महाराज, आपण तरी विष्णूची भेट घेतली आहे काय ?" हाच प्रश्न बाकीच्या साऱ्या जणांस त्यानें केला. तेव्हां यांपैकीं अनुभवी असा कोणीही नाहीं असें त्या साधूला आढळून आलें. आत्मानुभव

नसल्यामुळेंच एवढें रणकंदन त्यांच्यांत माजलें होतें. कारण त्यांना अनुभव असता, तर असल्या कोरडया वादाला कांहीं जागाच उरती ना. पाण्यानें घट भरूं लागला म्हणजे बुडबुड असा आवाज तो करतो; पण एकदां तो पूर्ण भरला ह्मणजे हा आवाज निघत नाहीं. त्याचप्रमाणें ज्याचें चित्त परमात्ममय झालें त्याच्या तोंडाला आपोआप कुलूप लागतें. अनेक पंथांत मोठया कडाक्याचे वादविवाद सुरू आहेत याचा अर्थच हा कीं, त्यांपैकीं प्रत्यक्ष अनुभव कोणासही झालेला नाहीं. तसा अनुभव त्यांस झाला असता, तर असल्या वादाच्या भरीस ते कधींच पडते ना. पुष्कळशी बडबड करणें म्हणजेच धर्म असा त्यांचा समज होता. ग्रंथ वाचून कांहीं बडबड केली कीं यांचा धर्माभ्यास संपला. एखादा पंथप्रवर्तक उठतो आणि भराभर वाक्यें लिहून एखादें प्रचंड बाड प्रसिद्ध करतो. या चोपडयांत कांहीं नवीन असतें असें नाहीं. शेंकडों ग्रंथांतील मजकूर त्यांत एकत्र झालेला असतो; पण मजा ही कीं अमूक मजकूर आपण अमूक ग्रंथांतून घेतला आहे असा नुसता पुसट उल्लेखही हा ग्रंथकार कोठें करीत नाहीं. त्याची कृतज्ञता पाहिली तर ती असल्या प्रतीची असते. इतकी तयारी करून हा ग्रंथ तो जगावर लोटून देतो आणि आधींच असलेल्या गोंधळांत आणखी भर घालतो.

वास्तविक पाहतां सामान्य मनुष्यांपैकीं बहुतेक निरीश्वरवादी असतात. ईश्वराचें अस्तित्व तोंडानें ते कबूल करतात; पण त्यांची प्रत्यक्ष वागणूक पाहिली तर तीवरून त्यांची गणना नास्तिकांच्या कोटींतच करावी लागेल. या नास्तिक मंडळींतच आणखी एक नवा पोटवर्ग युरोपांत उत्पन्न झाला आहे. हा वर्ग जडवाद्यांचा होय. असा वर्ग एक निराळा पंथ या रूपानें अस्तित्वांत आला ही मोठया आनंदाची गोष्ट आहे. हे लोक उघडपणें नास्तिक मतांचें प्रतिपादन करितात. तोंडानें ईश्वराचें अस्तित्व कबूल करावें आणि हातानें त्याचा उच्छेद करावा, असल्या दांभिकपणापेक्षां 'चाले तैसा बोले' हा मार्ग अधिक श्रेयस्कर आहे हें उघड आहे. तोंडानें ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल कडाक्याचा वाद करून त्याच्या उलट वर्तणूक करणाऱ्या बोके संन्याशांपेक्षां असले चकचकीत नास्तिक शतपट बरे. "मागा म्हणजे मिळेल; शोधा म्हणजे सांपडेल; ठोका म्हणजे उघडेल" हीं ख्रिस्ताचीं वचनें तुम्हांस ठाऊक असतीलच. या वचनांत नितांत सत्य भरलें आहे. यांत कांहीं रूपक नाहीं;

अथवा कोठें शब्दच्छल नाहीं. सारें सत्य अगदीं उघड्या शब्दांनीं सांगितलें आहे. यांत परमात्म्याच्या एका महा अवताराचें हृदय त्याच्या मुखावाटे वाहलें आहे. हे शब्द म्हणजे प्रत्यक्ष अनुभवाचें फळ होय. जसें प्रत्यक्ष अनुभविलें तसेंच ख्रिस्तानें बोलून दाखविलें. परमेश्वराचें अस्तित्व त्याच्या तोंडांत नव्हतें. त्याचा प्रत्यक्ष अनुभव आपल्या हृदयांत त्यानें घेतला होता. परमेश्वराशीं तो बोलत होता आणि परमेश्वराच्या संनिध त्याचा वास होता. घरें, झाडें आणि इतर सृष्ट पदार्थ आपणास जितक्या सत्यत्वानें दिसतात, त्याहून अधिक सत्यत्वानें परमेश्वर ख्रिस्ताला दिसत होता. परमेश्वराच्या भेटीची खरी तळमळ कोणाला लागली आहे, इतकाच काय तो प्रश्न आहे. जगांतल्या या साऱ्या माणसांना त्याच्या भेटीची इच्छा असतांही तो त्यांस प्राप्त होत नाहीं असें तुम्हांस वाटतें काय? असें होणें शक्य नाहीं. जी गोष्ट मिळण्याची शक्यता नाहीं, तिचें अस्तित्व असणेंही शक्य नाहीं. अमुक व्हावें अशी इच्छा आपणास होते याचा अर्थच हा कीं त्या गोष्टीला आपल्या बाहेर अस्तित्व आहे. ज्या वस्तूला अस्तित्वच नाहीं तिची इच्छाही होणें शक्य नाहीं. श्वासोच्छ्वास करण्याची इच्छा मनुष्यास आहे आणि तिच्या तृप्तीकरितां बाहेर हवाही आहे. खाण्याची इच्छा मनुष्याच्या ठिकाणीं आहे आणि बाहेर अन्नही आहे. श्वासोच्छ्वास करावा आणि अन्न खावें अशी इच्छा मनुष्याला कां होते? तिच्या तृप्तीची तजवीज अगोदर तयार आहे म्हणून. प्रकाशाचें अस्तित्व अगोदर असतें आणि नंतर डोळे उत्पन्न होतात. प्रकाशानेंच डोळे उत्पन्न केले असें म्हणावयास हरकत नाहीं. ध्वनि अगोदर आणि कानाची उत्पत्ति मागाहून झाली आहे. अशाच रीतीनें बाह्य वस्तूंनीं मनुष्याच्या मनांतील साऱ्या वासना निर्माण केल्या आहेत. सृष्टिनियमांचें उल्लंघन करावें, प्रकृतीच्या कायद्याबाहेर जावें, हीं सारीं बंधनें तोडून मुक्त व्हावें ही इच्छा तरी मनुष्याच्या हृदयांत कोठून उत्पन्न होते? आपल्या पारतंत्र्याचा प्रत्यय प्रत्येक क्षणीं येत असतां स्वतंत्र व्हावें ही इच्छा आपल्या हृदयांत मगरमिठी मारून बसली आहे तें कां? कांहीं झालें तरी आपली ही इच्छा आपल्या हृदयांत जीव धरून राहते. अशी तीव्र तळमळ ज्याला लागली असेल तो अवश्यमेव मुक्त होईल—आपलें ध्येय तो खचीत गांठील; पण अशी खरी इच्छा कोणाला आहे? बहुधा कोणालाही नाहीं असेंच म्हणणें भागास येतें.

परमेश्वराच्या प्राप्तीच्या इच्छेवांचून बाकीच्या साऱ्या इच्छा आपल्या मनांत जाज्वल्य आहेत. घरादारांची इच्छा आहे, बायकापोरांची इच्छा आहे. परमेश्वराची भेट व्हावी ही मात्र इच्छा आपल्या ठिकाणीं नाहीं. हा धर्म नव्हे. आपल्या भोंवतीं जे मोठे धार्मिक म्हणून आपण पाहतों ते बहुतेक सारे दांभिक लोक आहेत. आमच्या रावसाहेबांच्या दिवाणखान्यांत अनंत प्रकारचें सामान भरलें आहे. अगदीं नव्या फ्याशनला शोभेल अशा जिनसा त्यांनीं द्वीपांतराहून मागविल्या आहेत, इतक्यांत आणखी एखादी फयाशन उत्पन्न होते आणि ती पुरी करण्याकरितां एखादी जिन्नस ते जपानाहून मागवितात. अगदीं ताज्या फ्याशनप्रमाणें वागणें हाच बहुधा सध्या साऱ्यांचा धर्म होऊन बसला आहे. फ्याशनदेवीची आराधना सध्या बहुतेक सारे करीत आहेत. आधीं चैन आणि मग उरल्या वेळांत थोडें बहुत धर्माचें सोंग, ही सध्याची स्थिति आहे; आणि हें धर्माचें सोंग तरी कां? तर तसें न केल्यास लोक नांवें ठेवतील म्हणून. यामुळें केवळ लोकेषणेसाठीं हे लोक धार्मिकपणाचें सोंग आणतात. ही स्थिति अमुक एका विशिष्ट देशांत आहे असें नसून ती साऱ्या जगभर आहे.

एके वेळीं एक शिष्य आपल्या गुरूकडे जाऊन म्हणाला, "महाराज, मला धर्मज्ञान पाहिजे." त्या शिष्याकडे पाहून गुरु नुसते हंसले; पण त्यांनीं भाषण कांहींच केलें नाहीं. तो तरुण प्रत्येक दिवशीं गुरूकडे येई आणि धर्मज्ञान सांगण्याविषयीं त्यांची विनंति करी. एके दिवशीं शिष्य आला असतां गुरूनें त्याला नदीवर नेलें आणि पाण्यांत बुडी मारण्यास सांगितलें. गुरूच्या आज्ञेप्रमाणें शिष्यानें बुडी मारतांच गुरुमहाराजांनींही त्याच्या मागोमाग बुडी मारून त्याला घट्ट आंवळून धरलें. वर येण्यासाठीं शिष्य धडपड करूं लागला. अखेरीस थोड्या वेळानें गुरूनें त्याला सोडलें. गुरूची मिठी सुटतांक्षणींच शिष्य वर आला, आणि त्याच्या पाठोपाठच गुरुमहाराजही वर आले. नंतर गुरु शिष्याला म्हणतात, "मुला, तूं नदीच्या तळीं होतास तेव्हां तुला काय हवेंसें वाटत होतें? तुझ्या हृदयांत आत्यंतिक अपेक्षा कशाची होती?" तरुणानें उत्तर दिलें "महाराज, अल्पशा हवेची आकांक्षा माझ्या मनांत होती. एक श्वासोच्छ्वास टाकण्यापुरती हवा मिळेल तर माझें सर्वस्व मी देईन असें त्यावेळीं मला वाटत होतें." परमेश्वरप्राप्तीची अशी तळमळ तुम्हांस लागली आहे

काय ? जर तसें असेल तर त्याची प्राप्ति तुम्हांस अवश्य होईल. अशी तहान जोंपर्यंत तुम्हांस लागलेली नाहीं, तोंपर्यंत धर्माची पाऊलवाटही तुम्हांस दिसावयाची नाहीं. तुम्ही वाटतील तितके बुद्धिवाद करा, उंटाच्या ओझ्याचे ग्रंथ वाचा, अथवा शेंकडों यज्ञयागादि कर्में करा ' जोंपर्यंत यज्ञपुरुषाच्या भेटीची तळमळ तुम्हांस लागली नाहीं तोंपर्यंत या साऱ्या गोष्टी फुकट आहेत. अशी तहान तुम्हांस लागली नाहीं तोंवर धर्मांच्या बाजारांत नास्तिक आणि तुम्ही यांची किंमत एकच. तुम्हां दोघांत फरक म्हटला तर इतकाच कीं उघड नास्तिक तुमच्याहून अधिक प्रामाणिक असतो.

" एखाद्या खोलींत एखादा चोर शिरून बसला असला आणि शेजारच्या खोलींत द्रव्याचा मोठा हांडा भरला आहे, असें त्यास समजलें, तर त्या चोराच्या मनाची स्थिति काय होईल ? त्याची झोंप उडून जाईल. त्याला तहानभूकही समजेनाशी होईल. त्या ठेव्याशिवाय दुसरा कोणताही विचार त्याच्या मनास शिवणारसुद्धां नाहीं. तो ठेवा प्राप्त करून घ्यावा हें एकच चिंतन त्याचें चित्त करीत राहील. त्याचप्रमाणें अनंतसुखाचा, अनंत कल्याणमय सागर आपणासंनिध आहे, किंबहुना आपल्या हृदयांतच आहे असें या लोकांस मनःपूर्वक वाटतें, तर तो सागर हस्तगत करण्याचा यत्नही न करतां ते संसाराच्या डबक्यांत डुबकत राहिले असते काय, असा प्रश्न एका साधुवरानें केला आहे. परमेश्वराचें अस्तित्व खरोखरच आहे ही गोष्ट ज्याच्या चित्ताला पटली, तो त्याच्या प्राप्तीसाठीं वेडा झाल्याशिवाय राहावयाचा नाहीं. जग कांहींही म्हणो, कोणत्याही मार्गानें तें खुशाल जावो, त्याची पर्वा तो करावयाचा नाहीं. ऐहिक जीविताहून अनंतपटीनें उच्च असें दुसरें जीवित प्राप्त होण्याजोगें आहे, असें ज्याला कळलें तो या क्षणभंगुर जीविताला कां चिकटेल ? इंद्रियातीत स्थिति प्राप्त होण्याजोगी आहे हें ज्याला समजलें, तो इंद्रियांच्या मर्यादित कक्षेंत माशा मारीत कां बसेल ? चिरंतन जीवित मिळण्याजोगें असतां अस्थिराला कोण हवेंसें म्हणेल ? अमृत मिळण्याची खात्री असतां कांजीला लाळ कोण घोटील ? परमेश्वराच्या भेटीसाठीं असा मनुष्य खरोखर वेडा होईल. याच्या वेडेपणाला धर्मबुद्धिजागृति म्हणतात. या वेडेपणाला जेव्हां सुरुवात होते तेव्हांच धर्ममार्गावर मनुष्य आरूढ होतो. असें होण्यास दीर्घकाळ लागत असतो. ही स्थिति प्राप्त करून घेण्याची आगाऊ

तयारी म्हटली म्हणजे वाचन, मनन, पूजा, विधिविधानें, यात्रा इत्यादि होत. त्या गोष्टी चित्तशुद्धीसाठीं आवश्यक आहेत. चित्तशुद्धीनें जीवात्मा शुद्ध होतो, आणि मग पावित्र्याच्या सागराकडे जावें अशी इच्छा त्याला होते. मातीनें अगदीं मढून गेलेला एखादा लोखंडाचा तुकडा शेंकडों वर्षें लोहचुंबकाजवळ पडला असला तरी त्याकडे तो आकर्षिला जात नाहीं; पण त्यावरील धूळ नाहींशी होतांच चुंबक त्याला आपणाकडे ओढतो. त्याचप्रमाणें अनंतजन्मांच्या दुष्टत्वाचीं पुटें जीवात्म्यावर चढलीं असल्यामुळें परमात्म्याकडे तो ओढ घेत नाहीं. पूजाअर्चा, भजन, वाचन, मनन इत्यादि कर्मांनीं हीं पुटें ढांसळून पडलीं म्हणजे जीवात्मा आणि परमात्मा यांजमधील स्वाभाविक प्रेम व्यक्त होऊन ते एकमेकांसन्निध येतात. परोपकार, परसेवा, भूतमात्राच्या ठिकाणीं प्रेम हीं जीवात्मा शुद्ध करण्याचीं साधनें आहेत.

तथापि हीं सारीं नुसतीं साधनें आहेत हेंही अवश्य लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. या साऱ्या क्रिया आरंभींच्या स्थितीला मात्र उपयुक्त आहेत. ही खरी भक्ति नव्हे. भक्तीबद्दल सर्वत्र अनेक प्रकारची चर्चा आपणास ऐकूं येते. देवाची भक्ति करा, हा उपदेश नवीन आहे असें नाहीं. पण खरी भक्ति म्हणजे काय आणि प्रेम कशाला म्हणावें हें कोणासच ठाऊक नाहीं. प्रेमाची खरी व्याख्या मनुष्यांस ठाऊक असती, तर त्याबद्दल इतकी भाराभर बडबड त्यांनीं कधींच केली नसती. आपण मोठे प्रेमळ आहों असें प्रत्येकाला वाटत असतें; पण थोडा काळ लोटतो न लोटतो तोंच स्वतःचें हृदय अगदीं कोरडें ठणठणीत असल्याचा अनुभव त्याला येतो. प्रेम त्याच्या प्रकृतींतच नसतें. शाब्दिक प्रेम साऱ्या जगभर भरून राहिलें आहे; पण खऱ्या प्रेमाचा अंशही कोठें प्रत्ययास येत नाहीं. प्रेम म्हणजे काय ? प्रेमाच्या अस्तित्वाचें चिन्ह काय ? निर्व्याजत्व हें खऱ्या प्रेमाचें पहिलें लक्षण आहे. प्रेमाच्या बदल्यांत आपणास अमुक मिळावें अशी अपेक्षा खऱ्या प्रेमी मनुष्याला असत नाहीं. दुसऱ्याकडून कांहीं प्राप्ति व्हावी या हेतूनें जेव्हां एखादा मनुष्य दुसऱ्यावर प्रेम करतांना दिसतो तेव्हां तें त्याचें प्रेम खरें नव्हे हें उघड आहे. तो वाणसवदा झाला. अशी देवाण घेवाण जेथें आली तेथें प्रेमाचें अस्तित्व मुळींच नाहीं हें निःसंशय खरें आहे. त्याचप्रमाणें मनुष्य जेव्हां "देवा, मला अमुक दे, माझें बरें कर" अशी प्रार्थना करतो तेव्हां ती प्रार्थना प्रेमपूर्वक

केलेली नव्हे हें उघड झालें. ही परमेश्वराची भक्ति नव्हे, हिला भक्ति हें सोज्वल नांव द्यावें तरी कसें ? तुमची प्रार्थना मी करतों आणि मजवर प्रसन्न होऊन एखादी वस्तु तुम्ही मला देतां. तुमची प्रार्थना मीं प्रेमामुळें केली असें या स्थितींत म्हणतां येईल काय ? हा फक्त तुमचा आमचा व्यापार झाला. खरा भक्त म्हणतो, "राजी हैं हम उसीमें जिसमें तेरी रजा है।" परमेश्वरा, तूं ज्या स्थितींत मला ठेवशील तींत मी राजी आहें. दुःखसागरांत तूं मला लोटलेंस तर त्या सागराच्या लाटांबरोबर मी वाहात जाईन. हात देऊन तूं मला वर काढलेंस तर मी वर निघेन. पण दोन्ही वेळां हेंच म्हणेन कीं " राजी हैं हम उसीमें जिसमें तेरी रजा है. "

पूर्वी एका काळीं एक राजा अरण्यांत शिकारीस गेला असतां एक साधु पुरुष त्याला भेटला. त्या सत्पुरुषाशीं थोडा वेळ राजाचें भाषण झालें, तेव्हां राजाला फार संतोष होऊन त्या साधूला कांहीं देणगी द्यावी असा विचार त्याच्या मनांत आला, आणि आपणापासून कांहीं वस्तु दान घेण्याबद्दल त्याची विनंति त्यानें केली. तेव्हां साधु म्हणाला, " राजा, तुजपासून कसलीही वस्तु घेण्याची माझी इच्छा नाहीं. माझी जी सध्याची स्थिति आहे तींत मी फार संतुष्ट आहें. हे आजूबाजूचे वृक्ष मला खाण्यापुरतीं फळें देतात आणि हे शुद्धोदकाचे झरे माझी तहान भागवून मला तृप्त करतात. तूं मोठा चक्रवर्ती राजा असलास तरी तुझ्यापासून कोणत्या वस्तूची अपेक्षा मला असणार ?" राजानें उत्तर दिलें " महाराज, मला संतोष व्हावा म्हणून आणि माझें पापक्षालन व्हावें म्हणून तुम्ही मजपासून कांहीं तरी ग्रहण करावें. आपण मजबरोबर राजधानीस याल तर मजवर मोठा अनुग्रह होईल." राजानें याप्रमाणें फारच आग्रह केला; तेव्हां अखेरीस तो साधु राजाबरोबर त्याच्या शहरीं जावयास सिद्ध झाला. राजाबरोबर तो राजमहालांत गेला. त्या ठिकाणीं सोनें, हिरे, माणकें, मोतीं इत्यादि रत्नांच्या वस्तूंचा मोठा संग्रह होता. राजाचें ऐश्वर्य आणि त्याची सत्ता व सामर्थ्य यांचें प्रदर्शन जागोजाग स्पष्टपणें दृग्गोचर होत होतें. साधूला एका सुंदर आसनावर बसवून राजा म्हणाला, " साधुवर्या, मी थोडा वेळ प्रार्थना करतों तोंपर्यंत कृपा करून आपण या आसनावर बसावें" इतकें बोलून आणि जरा बाजूला होऊन राजा प्रार्थना करूं लागला. "परमेश्वरा, मला अधिक दौलत दे, मला

पुत्रपौत्रादि संतति दे. माझ्या राज्याची आणखी पुष्कळ वाढ होऊन सर्व प्रकारें माझी भरभराट व्हावी अशी मी तुझी प्रार्थना करतों." राजाची प्रार्थना अशा रीतीनें इकडे चालली आहे इतक्यांत तो साधु पुरुष उठला आणि त्या दिवाणखान्याच्या दरवाजाकडे चालला. राजानें तें पाहिलें आणि घाईघाईनें त्याच्या पाठोपाठ जाऊन त्याला म्हटलें, "महाराज, माझें दान घेतल्याशिवाय आपण कोठें चाललां?" राजाकडे वळून साधूनें म्हटलें, "अरे भिकाऱ्या, मी भिकाऱ्यांपासून दान घेत नसतों. तूं स्वतःच भिकारी तो तूं मला देणार काय आणि तुजपासून घ्यावें काय? मला अमुक दे आणि तमुक दे अशी भीक परमेश्वराजवळ तूं आतांच मागत होतास." भक्तिपूर्वक केलेल्या प्रार्थनेची भाषा अशी नसते. आपणाला अमुक द्यावें आणि तमुक द्यावें अशी याचना परमेश्वराजवळ तुम्ही करूं लागलां तर तुमच्या भक्तींत आणि बाजारांतील खरेदीविक्रींत भेद तो काय राहिला? भक्तीची पहिली कसोटी हीच कीं तिला असला वाणसवदा ठाऊक नसतो. ती अत्यंत निरपेक्ष असते. भक्ति ही नेहमीं देणारी असते; घेणारी नसते. तिचें स्थान यजमानाचें आहे; याचकाचें नव्हे. खरा भक्त म्हणतो, "परमेश्वरा, हवें असल्यास माझें सर्वस्व तूं घे. मी तें तुला आनंदानें अर्पण करतों. मला हवी अशी एकही वस्तु या साऱ्या विश्वांत नाहीं. तुजपासून कसल्याही वस्तूची अपेक्षा मी करीत नाहीं. तूंच मला हवासा वाटतोस म्हणून मी तुजवर प्रेम करतों. तुझ्यापासून कशाचीही अपेक्षा मी करीत नाहीं, परमेश्वर सर्वसामर्थ्यवान् असो अगर नसो, मला त्याच्या सामर्थ्याशीं काय करावयाचें आहे? त्याच्या सामर्थ्याचा कांहींच उपयोग मला करून घ्यावयाचा नाहीं. अथवा मला स्वतःही सामर्थ्यवान् होण्याची इच्छा नाहीं. तो प्रेमाचा सागर आहे इतकेंच मी जाणतों; आणि यापलीकडे त्याचे दुसरे कोणते गुण आहेत हें जाणण्याची इच्छा मला नाहीं."

खऱ्या भक्तीची दुसरी कसोटी ही कीं तिला भीति ही भावना ठाऊक नसते. एका हातांत बक्षीस आणि दुसऱ्यांत चाबुक घेऊन परमेश्वर ढगांच्या पलीकडे बसला आहे, अशी परमेश्वरविषयक भावना तुमच्या चित्तांत असेल, तोंपर्यंत खऱ्या भक्तीचा उदय तुमच्या अंतःकरणांत होणें शक्य नाहीं. आपण अमुक रीतीनें वागलों अथवा अमुक रीतीनें न वागलों तर परमेश्वर आपणास

शिक्षा करील अशी भावना बाळगून त्याची प्रार्थना तुम्हीं केली तर तिला भक्ति असें नांव देतां येईल काय ? ज्याच्याबद्दल आपल्या मनांत भीति असते, त्याजबद्दल तेथें प्रेम उद्भवणें कधींतरी शक्य आहे काय ? कोंकराचें प्रेम लांडग्यावर जडलें असें कधीं झालें आहे काय ? उंदरानें मांजराच्या गळयांत प्रेमानें कधीं मिठी मारली आहे काय ? गुलामानें धन्याला कधीं आलिंगन दिलें आहे काय ? गुलामही प्रेमाचें सोंग कधीं कधीं आणतात, पण नाटकांतल्या राजाची जी राजेपणाची किंमत तीच या प्रेमाचीही होय. असल्या प्रेमाला प्रेम हें नांवसुद्धां शोभणार नाहीं. भीति आहे तोंवर प्रेम उद्भवणें शक्य नाहीं. असें घडल्याचें एक तरी उदाहरण तुमच्या पाहण्यांत कधीं आलें आहे काय ? भीति असतां प्रेम दिसणें हें प्रेमाचें नुसतें नाटक आहे. खऱ्या प्रेमाच्या ठिकाणीं भीतीचा लवलेशही असावयाचा नाहीं. अशी कल्पना करा कीं एखादी स्त्री रस्त्यानें जात आहे इतक्यांत एखादा कुत्रा तिच्या आंगावर भोंकूं लागला. अशा स्थितींत ती काय करील ? अगदीं जवळच्या घरांत ती पळून जाईल. आतां असेंही समजा कीं दुसऱ्या दिवशीं आपल्या मुलाला हातीं धरून ती जात आहे, इतक्यांत एखादा सिंह उडी मारून पुढें आला. अशा स्थितींत ती पळून जाणार नाहीं. आपल्या मुलाचा जीव वांचविण्याकरितां ती सिंहाच्या तोंडावर चालून जाईल. मुलाच्या प्रेमानें तिची भीति नाहींशी होईल. प्रेम हें नेहमींच भीतीला जिंकीत असतें. ईश्वरविषयक प्रेमाला म्हणजे खऱ्या भक्तीलाही हाच नियम लागू आहे. परमेश्वरावर ज्याचें खरें प्रेम आहे तो त्याच्या गुणांचा विचार करीत नाहीं. तो बक्षीस देणारा दाता आहे कीं शिक्षा सांगणारा न्यायाधीश आहे याचा विचार खऱ्या भक्ताच्या चित्ताला शिवावयाचाही नाहीं. एखादा न्यायाधीश घरीं आला म्हणजे त्याची प्रेमळ पत्नी त्याच्याशीं कशी वागते पहा ! तो न्यायाधीश आहे, दुष्कर्मांचें शासन तो करतो अथवा सज्जनांस शाबासकी देतो, असल्या प्रकारचे विचार तिच्या चित्ताला कधीं तरी शिवतात काय ? हा आपला पति आहे यावांचून त्याचें दुसरें कोणतेंही स्वरूप ती जाणत नाहीं. त्याचीं मुलें त्याचें कोणतें स्वरूप पाहत असतात ? हा आपला प्रेमळ पिता यावांचून दुसरें कोणतेंही त्याचें स्वरूप त्यांस ठाऊक नसतें. " व्याघ्र सिंह भयानक । देखूनि भयचकित होती लोक । परी तयांचीं पिलीं निःशंक । तयांपुढें खेळती ॥"[१]

ईश्वराच्या लेंकरांसही हाच नियम लागू आहे. परमेश्वर शिक्षा करणारा न्यायाधीश आहे कीं बक्षिसें वांटणारा दाता आहे, याची चौकशी तीं कधींच करीत नाहींत. ज्यांना प्रेमाची गोडी कधींच कळलेली नाहीं असलीं माणसें मात्र परमेश्वराला भितात आणि त्याजपुढें चळचळां कांपतात. जे लोक अगदींच रानटी अवस्थेंत असतील त्यांना परमेश्वराच्या न्यायाधिशत्वाची ही कल्पना उपयोगीं पडत असेल. ज्यांच्या ठिकाणीं कोमल भावना जागृत झालेल्या नाहींत, त्यांनीं अधिक क्रौर्याचीं कृत्यें करूं नयेत म्हणून असला परमेश्वराचा बागुलबोवा त्यांस दाखविणें उचित असेल; पण तुमच्यासारख्या संस्कृत माणसांस ही कल्पना आतां शोभत नाहीं. या कल्पना परमेश्वरास हीनत्व आणणाऱ्या आणि तुम्हांस दुर्बल करणाऱ्या आहेत. त्या तुमच्या उपयोगीं नाहींत. जड कल्पनांचा त्याग तुम्हीं केला आहे. खऱ्या धर्माच्या मार्गांत तुम्हीं आतां पाऊल ठेवलें आहे. तुमचीं सूक्ष्मेंद्रियें जागृत झालीं आहेत. तुमची ज्ञानदृष्टि उघडली आहे. आतां या पोरकट कल्पना तुम्हांस कशा शोभतील ? ज्ञानवंत आहेत ते असल्या कल्पनांना आपल्या चित्तांत कधींही थारा देत नाहींत.

प्रेमाची तिसरी कसोटी याहूनही अधिक उच्च आहे. प्रेम अथवा भक्ति हें अत्युच्च ध्येय आहे. पहिल्या दोन पायऱ्या चढून जो वर गेला असेल त्यालाच भक्तीची खरी किंमत कळेल. वाणसवदा आणि भीति हीं दोन्ही मागें टाकून जो पुढें गेला असेल तो खरा भक्त होय. भक्ति हेंच भक्तिमार्गाचें अंतिम ध्येय आहे, ही गोष्ट अशा भक्तांवांचून दुसऱ्या कोणासही पटावयाची नाहीं. एखाद्या तरुण रूपवतीचें प्रेम एखाद्या कुबड्यावर बसल्याचीं कितीतरी उदाहरणें या जगांत आपल्या पाहण्यांत येतात. मदनाचें प्रेम कुब्जेवर बसल्याचीं उदाहरणेंही थोडीं नाहींत. या प्रेमाचें बीज काय ? परस्परविरुद्ध अशा या दोन टोंकांस कोणता तंतु जोडतो ? त्या स्त्रीचा अथवा पुरुषाचा कुरुपपणा मात्र त्र्ययस्थाच्या डोळ्यांना दिसत असतो. पण त्या प्रेमी मनुष्यांना ही दृष्टीच नसते. त्यांचे प्रेमविषय त्यांना रतिमदनासारखे दिसत असतात. याचें कारण हेंच कीं आपल्या प्रेमाच्या परिसीमेचें जें चित्र स्वतःच्या चित्तपटावर त्यांनीं रंगविलेलें असतें, तेंच त्यांना समोर दिसत असतें आणि त्याजवरच त्यांचें प्रेम जडलेलें असतें. आपला प्रेमविषय कुरूप आहे हें त्यांच्या डोळ्यांस

दिसत नाहीं. वस्तुतः त्यांचें प्रेम बाह्य विषयावर जडलेलेंच नसतें. त्यांच्या अंतःकरणांतील चित्राला जागृति आणण्याचें काम मात्र बाह्य विषय करतो. अंतःकरण जागृत झालें कीं त्यांतील प्रतिमा तेथून जी निघते ती थेट त्या बाह्य विषयावर आदळून त्याचें स्वरूप झांकून टाकते. अशा स्थितींत द्रष्टा असतो तो त्या चित्राकडे पहात असतो आणि त्यावर प्रेम करीत असतो. हीच गोष्ट आपणा सर्वांच्या प्रेमस्थानास लागू आहे. आपलीं भावंडें आपणास फार सुरेख वाटतात. तीं खरोखरच तशीं सुस्वरूप असतात असें नाहीं. त्यांपैकीं कित्येकांची गणना लोक अगदींच सामान्यांत करीत असतात; तथापि असें असतांही हा माझा भाऊ अथवा ही माझी बहीण एवढ्या आपलेपणाच्या विचारापुढें आपणास तीं सुरूप दिसतात.

एकंदर दृश्यजाताची मीमांसा वस्तुतः हीच आहे. आपण आपल्याच ध्येयाचा आरोप सृष्ट पदार्थांवर करून त्यांचें पूजन करीत असतों. बाह्य पदार्थ हीं केवळ अंतःकरणजागृतीचीं साधनें आहेत. अंतःकरणाला चेतविविण्याचें कार्य हीं बाह्य कारणें करीत असतात. आपणांपुढें जो जो पदार्थ आपण पाहत असतों त्याचें जन्मस्थान आपलेंच अंतःकरण होय. त्याला जन्म आपणच देतों आणि त्याकडे पाहून 'अमुक बाह्य पदार्थ मीं पाहिला' असें आपण म्हणतों. वाळूचा एक कण शिंपल्यांत शिरतो आणि तेथें दाह उत्पन्न करतो. असा दाह उत्पन्न झाला म्हणजे त्यामुळें शिंपल्याला पाझर सुटून त्यांत चिकट रस उत्पन्न होतो. हा रस त्या कणाभोंवतीं जमून त्याचें सुंदर मोती बनतें. त्याचप्रमाणें बाह्य उपाधि आपल्या अंतःकरणांत शिरून तेथें जागृति उत्पन्न करतात. ही चळवळ सुरू झाली म्हणजे आपली विचारपरंपरा तिजभोंवतीं जमूं लागते आणि या संयोगांतून अखेरीस आपलें ध्येय निर्माण होतें. दुष्ट मनुष्याला हें जग भयंकर नरकासारखें दिसत असतें आणि सज्जनाला तेंच स्वर्गरूप भासतें. प्रेमी मनुष्याला या जगांत प्रेमाशिवाय कांहीं दिसत नाहीं आणि द्वेष्टयाला तेथेंच द्वेष दिसतो. भांडकुदळाला तें समरभूमिसारखें दिसतें आणि शांतिप्रियाला तेंच शांतीचें निवासस्थान दिसतें. पूर्णत्व पावलेल्या मनुष्याला हेंच जग पूर्णस्वरूप म्हणजे परमात्ममय दिसतें. अशाच रीतीनें आपणांपैकीं प्रत्येकजण आपापलें ध्येय निर्माण करून त्याची पूजा करीत असतो. आपणांपैकीं प्रत्येकापुढें असेंच कोणतेंतरी उच्चतम ध्येय म्हणून मांडलें

असतें आणि केवळ याच ध्येयाशीं आपली पूर्ण तन्मयवृत्ति होते, त्या वेळीं आपल्या सर्व शंका निरस्त होतात. आपल्या उच्चतम ध्येयाशीं आपलें पूर्ण तादात्म्य झालें म्हणजे वादविवादासही जागा उरत नाहीं. परमेश्वराला खरोखरच अस्तित्व आहे कीं नाहीं, त्याचें अस्तित्व प्रत्यक्ष प्रमाणांनीं सिद्ध करतां येईल कीं नाहीं, इत्यादि प्रश्न डोक्यांत उद्भवतच नाहींत; मग त्यांजबद्दल वादविवाद कोण करीत बसणार? माझ्या ध्येयाशीं एकवार जो मीं एकरूप झालों तो कायमचाच झालों. त्यांत आतां कालत्रयांतही बिघड व्हावयाचा नाहीं. त्याच्याशीं मी नित्य एकरूप असणें हाच माझा प्रकृतिस्वभाव; मग त्यांत अंतर कसें पडणार? माझ्या स्वतःच्या अस्तित्वाची शंका माझ्या मनांत येईल, तेव्हांच माझ्या ध्येयाच्या अस्तित्वाबद्दल माझें चित्त साशंक होईल. मी आहें कीं नाहीं असा प्रश्न माझ्या मनांत कधीं चुकून तरी उद्भवतो काय? माझें अस्तित्व माझ्या दृष्टीनें जितकें खरें तितकेंच माझ्या ध्येयाचें अस्तित्वही मला खरें वाटत असतें. अशा स्थितींत परमेश्वर सर्वशक्तिमान् आहे कीं नाहीं, तो दयाळू आहे कीं नाहीं इत्यादि प्रश्नांची चर्चा कोण करीत बसतो? तो कसाही असला तरी त्याची पर्वा मला काय आहे? तो मनुष्यजातीचें पालन करणारा प्रेमळ पिता आहे कीं एखाद्या प्राचीन सुलतानासारखा कडकशास्ता आहे याचाही विचार मी करीत नाहीं. रामराजासारखा तो प्रजेचें पालन प्रेमानें करतो, कीं प्रजेस पिळून आपलीच तुंबडी भरतो हेंही मी पाहत नाहीं. खरा भक्त असतो तो या साऱ्या चवकशा ओलांडून पलीकडे गेलेला असतो. शिक्षा आणि बक्षिस या दोहोंच्या पलीकडे तो असतो. भक्ताच्या निवासस्थानाचा शोध शास्त्रांस लागावयाचा नाहीं आणि त्याचें अस्तित्वही कोणास सिद्ध करतां यावयाचें नाहीं. जेथें भक्ति राहते त्या स्थानापर्यंत कोणतेंही शास्त्र आजपर्यंत पोंहोंचलेलें नाहीं आणि पुढें कधीं पोंहोंचावयाचेंही नाहीं. भक्ति हेंच भक्ताचें ध्येय आणि तेंच त्याचें अखेरचें ठिकाण. त्याचा आरंभ भक्ति, मध्य भक्ति आणि अंतही भक्ति. भक्तीशिवाय दुसरें कांहीं तो जाणत नाहीं, आणि कांहीं जाणावें अशी गरजही त्याच्या बुद्धीला कधीं भासत नाहीं. वास्तविक पाहतां शुद्ध प्रेमरूपाच्या अस्तित्वाच्या सिद्धीची गरज तरी आपणांस कां भासावी? या विश्वाचें सारें अस्तित्व हेंच प्रेमाच्या अस्तित्वाचें चिन्ह आहे. प्रेमाला अस्तित्व नसेल तर हें विश्वही अस्तित्वांत येणार नाहीं. एका

परमाणूचा संयोग दुसऱ्याशीं होतो तो कशामुळें ? परमाणू एकत्र होऊन अणू बनतात, आणि हे अणू पुनः परस्परांशीं संयोग पावतात. ही संयोगाची क्रिया कोण घडवून आणतें ? आकाशांतील ग्रहादि गोलक एकमेकांकडे ओढले जात असतात ते कां ? दोन माणसें एकमेकांकडे कशामुळें ओढलीं जातात ? स्त्री आणि पुरुष या उभयतांस कोणता दुवा जोडीत असतो ? फार काय, पण मुकीं जनावरेंही एकमेकांकडे ओढलीं जातात. अशा रीतीनें या आकर्षणाचा प्रत्यय साऱ्या विश्वभर येतो. सारें विश्व, जणूं काय, एका केंद्राकडे आकर्षिलें जात असावें असें वाटतें. या आकर्षक शक्तीलाच प्रेम असें नांव आहे; आणि अत्यंत सूक्ष्म परमाणूपासून तों थेट अत्युच्च प्राण्यापर्यंत तिचें स्वरूप व्यक्त होत आहे. प्रेम हें सर्वशक्तिमान् आणि सर्वव्यापी आहे. अचेतन अथवा सचेतन सृष्टींत आकर्षणाचा प्रत्यय जेथें जेथें येतो, तेथें परमेश्वराच्या प्रेमाचें अस्तित्वच त्या रूपानें प्रत्ययास येत असतें. हें आकर्षण व्यक्तिगत असो अगर विश्वगत असो; त्याचें मूलरूप एकच. सर्व विश्वाला भ्रमण करण्यास लावणारी शक्ति हीच. याच शक्तीला वश होऊन येशू ख्रिस्तानें मनुष्यजातीसाठीं आपला प्राण अर्पण केला. याच प्रेमामुळें एका यःकश्चित् प्राण्यासाठीं भगवान् बुद्धानें आपला जीव धोक्यांत घातला. याच प्रेमहेतूसाठीं पत्नी पतीसाठीं देहत्याग करते आणि पितरें मुलांसाठीं जीव देतात. आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठीं लक्षावधि शिपायी रणयज्ञांत आपली आहुती देतात तीच याच प्रेमासाठीं होय; आणि अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही कीं याच प्रेमानें वेडा होऊन चोर चोरी करतो आणि खुनी खूनही करतो. हें ऐकून आपलें चित्त बावरें होऊं देऊं नका. येथें प्रेम व्यक्त दशेस येण्याची पद्धति वेगळी आहे इतकेंच; पण मुळांत प्रेरकशक्ती प्रेमच. चोराचें अतिरिक्त प्रेम सोन्यावर असतें. कोठेंही सोनें मिळण्याचा लाग आला कीं तेथें तो निःशंकपणें उडी घालतो. सोन्याच्या ठायीं असलेलें प्रेम हीच त्याची कर्मप्रेरक शक्ति होय. आतां तिच्या कार्याची दिशा चुकीची आहे ही गोष्ट वेगळी, पण मूळ हेतु प्रेम हाच. अशा रीतीनें सर्व सत्कर्मांच्या अथवा दुष्कर्मांच्या मुळाशीं प्रेरक हेतु एकच असतो, हा मुद्दा आपल्या लक्ष्यांत आलाच असेल. एकाच दिव्याच्या उजेडांत बसून एखादा दाता गरिबांच्या मदतीसाठीं हजार रुपयांची हुंडी लिहितो आणि दुसरा मनुष्य बनावट कागदपत्र करून कोणाचा

गळा कापण्याची तयारी करीत असतो. तो दिवा दोघांच्याही कर्मांस सारखाच साक्षीभूत असतो; तथापि साक्षीभूत होऊनहि कोणाच्याच पुण्यपापांचा अधिकारी तो होत नाहीं. पुण्यपापांच्या सुखदुःखाचीं फळें प्रत्येक कर्म करणारा ज्याचा तोच भोगीत असतो. या पुण्यपापांबद्दल त्या दिव्याची स्तुति अथवा निंदा करणें चुकीचें होईल. त्याचप्रमाणें प्रत्येकाच्या ठिकाणीं जें प्रेम वास करीत आहे तें स्वतः अगदीं अलिप्त असतें. तथापि त्याच्याच प्रकाशाच्या साक्षीनें आणि त्याच्याच प्रेरक शक्तीच्या बळावर विश्व चालत आहे. कर्मप्रवणतेची प्रेरक शक्ति साऱ्या विश्वांत हीच एक आहे. ही शक्ति अस्तित्वांतून गेली तर विश्वाचीही ताबडतोब विघटना होऊन तें नष्ट होईल. या शक्तीच्या अभावीं नष्ट होण्यास विश्वास एक क्षणही लागावयाचा नाहीं. आणि याच प्रेमस्वरूपाला ईश्वर हें नांव आहे. अनिर्वचनीय प्रेम हेंच ईश्वराचें स्वरूप असें नारदांनीं म्हटलें आहे.

" पतीवर पतीसाठीं प्रेम कोणीही करीत नाहीं. तें प्रेम आत्म्यासाठींच असतें. पत्नीवरील पतीचें प्रेम पत्नीसाठीं नसून तिच्या ठिकाणीं जें आत्मरूप असतें त्यावर तो प्रेम करतो. कोणाचें कोणत्याही वस्तूवरील प्रेम त्या वस्तूसाठीं नसून तिच्यामधील आत्मस्वरूपासाठीं असतें." ज्या स्वार्थसाधूपणाचा इतका तिरस्कार आपण सारे करीत असतों तो स्वार्थही त्याच प्रेमाचें एक रूप होय. विश्वाच्या रंगभूमीवर हें एक मोठें नाटक चालू असून तुम्ही त्याचे प्रेक्षक आहां. पण तुम्ही खरे प्रेक्षक बना. केवळ बाजूस उभें राहून या नाटकाकडे तुम्हीं पाहिलें म्हणजे त्यांतील खरें रहस्य तुमच्या लक्षांत येईल. यांत स्वतः न मिसळतां तुम्हीं या देखाव्याच्या पंक्तीकडे पाहिलें तर अनेक देखावे एकामागून एक कसे शांतपणें जातात हें तुम्हांस दिसेल. या नाटकांत स्वतः कोणतीही भूमिका न पत्करितां केवळ प्रेक्षक या नात्यानें त्याजकडे तुम्हीं अवलोकन केलें, तर त्यांतील वेगवेगळे प्रवेश आणि अंक परस्परांचें पोषण करून अखेरीस एकतानता कशी उत्पन्न करतात हें तुम्हांस पाहावयास सांपडेल. यांत दिसणाऱ्या अनेक देखाव्यांच्या पोटीं अखेरीस प्रेम हें एकच तत्व आहे ही गोष्ट त्या वेळीं तुमच्या लक्षांत पक्की येईल. अत्यंत स्वार्थांतही त्याचाच वास असतो आणि कालेंकरून तेंच अधिक विस्तृत होत जातें. पुरुषाचें लग्न झालेलें नसतें तेव्हां केवळ स्वतःपुरताच

विचार तो करीत असतो. त्याचा स्वार्थ त्या वेळीं अत्यंत आकुंचित रूपाचा असतो. त्यानें लग्न केलें म्हणजे त्याचें आत्मरूप दुप्पट होतें, आणि मुलें झालीं म्हणजे हेंच मूळ रूप आणखी किती तरी पटींनीं विस्तार पावतें. हा विस्तार असाच वाढत गेला म्हणजे हाच पुरुष अनंतपटीनें विस्तृत होऊन 'हें विश्वचि माझें घर' असें म्हणूं लागतो आणि अखेरीस आपणच चराचर रूप होऊन जातो. सार्‍या विश्वांतील प्रेम त्याच्या ठायीं एकवटतें, तो प्रेमनिधान बनतो; आणि प्रेमनिधान, हेंच परमेश्वराचें रूप होय.

पराभक्तीला पोहोंचण्याचा मार्ग हा आहे. भक्तीच्या या कोटींत सर्व चिन्हें, विधी आणि बाह्योपचार हीं गळून जातात. या भक्तीच्या स्थितीपर्यंत जो कोणी पावता झाला असेल तो अमुक एका विशिष्ट पंथाचा अथवा धर्माचा असें म्हणवत नाहीं; कारण सर्व धर्म आणि पंथ त्याच्या ठिकाणीं एकवटलेले असतात. मग यांपैकीं कोणता एक अमुक पंथ त्याचा असा कसा म्हणावा? पूर्णपणें स्वतःच्या ठिकाणीं त्याला सांठवूं शकेल असा पंथ तरी कोणता? अशा प्रकारें मुख्यतः पराभक्तीच्याच पायावर ज्या धर्मांची उभारणी झाली आहे, त्या धर्मांत ती भक्ति स्पष्टत्वास आणण्याची धडपड एकसारखी सुरू असते असें आपणास आढळून येईल. या पराभक्तीची अंधुकशी तरी कल्पना आपणास असते. त्याचप्रमाणें या जगांत प्रत्ययास येणारें प्रेम आणि आकर्षण हींसुद्धां त्याच भक्तीचीं स्वरूपें आहेत हेंही आपणास कळत असतें; तथापि जगांतल्या सर्व धर्मांतील संत आणि सत्पुरुष हीच भक्ति अनेक प्रकारांनीं व्यक्त करण्याची धडपड करीत असतात असें आपणांस आढळून येईल. फार काय, पण विषयसुखाचें रूपांतरही पराभक्तींत करण्याची त्यांची धडपड सुरू असते. भाषेंत जें कांहीं सामर्थ्य असेल त्या सार्‍याचा उपयोग पराभक्तीची व्याख्या करण्याकडे ते करीत असतात. अत्यंत जड विषयांचें रूपांतर चैतन्यरूपांत करण्यासाठीं त्यांची धडपड अव्याहत सुरू आहे.

"प्रिय परमेश्वरा, तुझ्या ओष्ठांचें चुंबन ज्याला एकवार लाधलें त्याची प्रेमपिपासा एकसारखी वाढतच जाते; मग तुझ्याशिवाय अन्य कोणताही विषय त्याला गोड लागत नाहीं. त्या चुंबनसुखांत सारीं लौकिक दुःखें बुडून नाहींशीं होतात, सार्‍या भूतकालाचें विस्मरण होतें, वर्तमान आठवत नाहींसा होतो आणि भविष्याच्या अस्तित्वाची जाणीवच नाहींशी होते. काल म्हणजे

काय हेंच समजेनासें होतें. तुझ्या अस्तित्वावांचून कालाचें अथवा दुसऱ्या कशाचेंही अस्तित्व स्फुरेनासें होतें." असे शब्द जगांतील सर्व भाषांत आणि सर्व धर्मांत तुम्हांस आढळतील. या भक्तीचें वेड असें आहे. सर्व आशा, इच्छा आणि कल्पना मरून गेल्या म्हणजे ही एकटीच शिल्लक उरते. मग भक्त म्हणतो, "मला मुक्तीची काय जरूर आहे? मुक्तीची फिकीर कोण करीत बसतो? फार काय, पण पूर्णत्व पावण्याचीही इच्छा मला नाहीं, आणि स्वतंत्र होण्याचीही गरज नाहीं." खऱ्या भक्ताची भाषा या प्रकारची असते.

"मला संपत्ति नको आणि शक्तिही नको. माझें शरीर सुस्थितींत आहे कीं नाहीं, याचीही पर्वा मी करीत नाहीं. मला सौंदर्य नको, आणि बुद्धिही नको. या जगांत अनेक प्रकारचीं दुःखें भरलीं असलीं तरी त्यांत पुनः पुनः जन्म घेऊन तुझी भक्ति करावी असें मला वाटतें. तुझी भक्ति मला प्राप्त होत असेल तर दुःखमय जगांत हजारों जन्म आले तरी मला त्यांची खंती वाटणार नाहीं." अशा प्रकारच्या काव्यमय उद्गारांत भक्तीचा सारा उन्माद तुम्हांस आढळून येईल. प्रेमाचीं जितकीं स्वरूपें या जगांत स्पष्टत्वास येतात, त्या सर्वांत स्त्रीपुरुषांच्या प्रेमांत त्याचें उत्तान आणि अत्यंत उत्कट रूप व्यक्त झालेलें असतें. यामुळें परमेश्वरविषयक प्रेम अथवा भक्ति व्यक्त करतांनाही तसल्याच प्रकारच्या भाषेचा उपयोग सर्वत्र होत असल्याचें आपणास आढळून येतें. संतांच्या आणि भक्तांच्या हृदयांत ज्या प्रेमाचा वास असतो, त्याचा एक अंधुकसा किरण तुम्हांस स्त्रीपुरुषांच्या प्रेमांत आढळून येईल. परमेश्वराच्या प्रेमानें खरा भक्त वेडापिसा होऊन जातो, किंबहुना त्या प्रेमानें वेडें व्हावें अशी त्याची इच्छाच असते. भक्तीनें त्याचें चित्त बेफाम आणि बेभान होऊन जातें. भक्तीचा उन्मादवायु त्याला पछाडतो, आणि भक्तिरसाचें आकंठ पान केल्यामुळें तो धुंद झालेला असतो. सांपडेल तेथें भक्तिरस प्यावा अशी इच्छा भक्तीमागें लागलेल्या मनुष्यांस असते. तेथें जातगोताचा विचार त्यास शिवतसुद्धां नाहीं. जगांतल्या कोणत्याही धर्मांतील आणि कोणत्याही जातीच्या संतानें भक्तिरसाचा सांठा करून ठेवल्याची बातमी त्यास लागली कीं त्यांतला आस्वाद आपणास कसा मिळेल एवढेंच चिंतन त्याचें चित्त करूं लागतें. अशा भक्ताला कसल्याही प्रकारच्या प्रतिफलाची अपेक्षा नसते. भक्तीच्या बदल्यांत अमुक एका वस्तूची प्राप्ति व्हावी

असें त्यांस कधींच वाटत नसतें. त्यांची भक्ति म्हणजे वाण्याचें बाजारी प्रेम नव्हे. त्यांची भक्ति म्हणजे बाजारांत मिळणारा सवदा नव्हे. भक्तीचा मार्ग भक्ति, भक्तीचें साध्य भक्ति आणि भक्तीचें फळही भक्तीच. पण या फळाचा गुण काय आहे पहा! भवरोगाचें पूर्ण निर्मूलन करण्याची दिव्य औषधि हीच. सर्व दुःखांचा पूर्ण परिहार करण्याचें सामर्थ्य एकव्या भक्तीला मात्र आहे. मनुष्यमात्राला जो संसाररोग जडला आहे आणि जो त्याच्या हाडीं-मासीं खिळून बसला आहे, तो नाहींसा करावयाचा असेल तर या रसाचा एक प्याला घ्या आणि अनुभव पहा! या रसाचें आकंठ पान तुम्हीं केलें तर परमेश्वरी उन्मादवायु तुम्हांस होईल, आणि आपण मनुष्य आहों ही वस्तुस्थितिसुद्धां तुम्ही विसरून जाल.

परमात्मप्राप्तीचे मार्ग वेगवेगळे असून ते परस्परांपासून अगदीं भिन्न आहेत, असा आभास आरंभीं होत असला तरी हे सारे मार्ग अखेरीस एकत्र होतात असें आपणांस आढळून येईल. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हाच सर्व मार्गांचा अखेरचा मुक्काम आहे. वेगवेगळ्या बिंदूंपासून निघालेले वेगवेगळे रस्ते या ठिकाणीं एकवटून एकरूप होतात. साऱ्या रस्त्यांचें अंतिम पर्यवसान एकच. आरंभीं आपण सारे द्वैतीच असतों. 'मी परमात्मरूप आहें' असें आपणास कधीं चुकूनसुद्धां वाटत नाहीं. केवळ बुद्धिवाद करतांना अशा प्रकारची भाषा आपण क्वचित् प्रसंगीं वापरली तरी त्या वेळीं सुद्धां आपल्या भाषणास आपलें मन ग्वाही देत नसतें. आपण बोलतों तें आपल्या अनुभवाबाहेरचें बोलतों, असें तेव्हांसुद्धां आपणांस वाटत असतें. परमात्मरूपापासून आपण भिन्न आहों, हीच आपली आरंभींची भावना असते. मी वेगळा आणि परमेश्वर माझ्याहून वेगळा असें आपणांस वाटत असतें. यानंतर भक्तीचा उदय होऊं लागला म्हणजे मनुष्य परमेश्वरासंनिध जाऊं लागतो आणि आपल्या बाजूनें परमेश्वरही मनुष्याजवळ येऊं लागतो. 'तूं माता, तूं पिता, तूं बंधु' इत्यादि अनेक रूपांनीं मनुष्याची भक्ति स्पष्टदशेस येऊं लागते, आणि अखेरीस भक्त व ईश्वर हे एकरूप होऊन जातात. 'तूं आणि मी एकच आहों व तुझें पूजन करण्यांत मी स्वतःचीच पूजा करतों' असें भक्त म्हणूं लागतो. भक्तीच्या आरंभींच्या स्वरूपाचें अंतिम पर्यवसान अशा प्रकारचें आहे. भक्तीचें आरंभींचें स्वरूप अत्यंत आकुंचित असतें, आणि अखेरीस तें इतकें विशाल

होतें कीं आपल्या विस्तारानें सारें विश्व तें व्यापून टाकतें. आरंभीं काजव्या-सारखी लुकलुकणारी अल्पशी ज्योत अखेरीस इतकी प्रखर आणि तेजोमय होते कीं, आपल्या दिव्य प्रकाशानें सारें विश्व ती उजाळते. आरंभींचें अल्प आणि आकुंचित रूप अनंत होतें. परमेश्वर कोठें तरी आकाशाच्या कोंपऱ्यांत दडी मारून बसला आहे, ही आरंभींची भावना नष्ट होते, आणि त्याचा वास सर्वत्र आहे, किंबहुना तोच सर्व आहे असा अनुभव अखेरीस येतो. अशा रीतीनें मनुष्याचें रूपांतर परमेश्वरांत होतें. आरंभीं नररूपानें नारायणाकडे जाऊं पाहणारा मनुष्य अखेरीस स्वतःच नारायण होऊन बसतो. वस्तुतः तो आरंभींच नारायण होता, पण तसा अनुभव त्याला नव्हता. मी नर आहें असा भ्रम त्याला झाला होता. त्याच्या चित्तांत ज्या अनेक तृष्णा होत्या त्यांनीं हा भ्रम उत्पन्न केला होता. या तृष्णा एकामागून एक नाहींशा होत चालल्या आणि त्यांजबरोबर आकुंचित स्वार्थबुद्धिही लोपूं लागली; आणि अखेरच्या मुक्कामास नर आणि नारायण एकच आहेत असा अनुभव त्याला आला.

# हिंदु चरित्रक्रमांतील वेदान्ताचें स्वरूप.

आमचा धर्म आणि आमचें कुल यांचा निदर्शक असा एक शब्द सर्वांच्या सामान्य परिचयाचा झाला आहे. हा शब्द ' हिंदु ' असा आहे. वेदान्त धर्म आणि हिंदु यांचा परस्परसंबंध काय आहे याचें स्पष्टीकरण येथें करणें अवश्य आहे. आमच्या देशांत सिंधु या नांवाची एक नदी आहे. याच नदीला प्राचीन पारसीक लोकांनीं हिंदु असें नांव दिलें होतें. संस्कृत भाषेंत जेथें 'स' हा वर्ण येतो तेथें त्याचें रूपांतर 'ह' या वर्णांत पारसीक लोक करीत असत. याच रीतीनें सिंधु या शब्दाचें रूपांतर हिंदु असें झालें. 'ह' या वर्णाचा उच्चार करणें ग्रीक लोकांस फार जड जाई; यामुळें त्यांनीं तो 'ह' कारही गाळला आणि हिंदु याचें आणखी एक रूपांतर होऊन इंडियन हा शब्द बनला. सिंधु नदाच्या परतीरीं राहणाऱ्या लोकांस प्राचीन पारसिकांनीं हिंदु हें नांव दिलें. त्या काळीं या शब्दाचा प्रचार कोणत्याही अर्थानें होत असला तरी सांप्रत तो अर्थ नष्ट झाला आहे. कारण सिंधुनदाच्या दक्षिणेस राहणारे सांप्रतचे लोक एकाच धर्माचे नसून त्यांत आतां अनेक धर्मानुयायांची वस्ती आहे. त्यांत हिंदु आहेत, मुसलमान आहेत, पारसी आहेत, ख्रिस्ती आहेत, बौद्ध आहेत आणि जैनही आहेत. ' हिंदु ' या नांवाचा केवळ शब्दार्थ घेतला तर या साऱ्यांसच हिंदु हें नांव द्यावें लागेल; पण एका विशिष्ट धर्माचा वाचक या अर्थानें त्याचा उपयोग करावयाचा असेल तर या सर्वांस हिंदु हें नांव देतां येणार नाहीं हें उघड आहे. वास्तविक पाहतां हिंदु धर्मांत अनेक धर्मांतील तत्त्वांचा अंतर्भाव झालेला आहे. तो धर्म कोणत्याही प्रकारें एकदेशीय स्वरूपाचा नाहीं. अशा प्रकारच्या सर्वगामी धर्माच्या स्वरूपाचें बोधक असें एकच नांव देणें बहुतांशीं दुरापास्त आहे. या धर्मांत अनेक स्वरूपांचीं तत्त्वें आहेत, अनेक प्रकारच्या कल्पना आहेत. यांत नानाविध आचार तुम्हांस आढळतील. हे सारे प्रकार कांहीं सुसंघटित रूपाचे आहेत असेंही नाहीं. कांहीं विशिष्ट आचार ठरलेले आहे त असेंही नाहीं. अमुक पंथाचे अमुक निश्चित आचार आहेत असें तुम्हांस सांगतां येणार नाहीं. या साऱ्या विविधतेंत एकवाक्यता

शोधावयाची म्हटलें, तर ती एकाच मुद्यावर होते असें आपणास आढळून येईल. हिंदुधर्मांत अनेक शाखा आणि पंथ यांचें वास्तव्य असलें, तरी त्या सर्वांस वेद ग्रंथ प्रमाण आहेत. श्रुतींची पूज्यता सर्वांस सारखीच मान्य आहे. यामुळें श्रुतिग्रंथ हा सर्वांचा सामान्य पाया आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. फार काय, पण जो श्रुतींचें प्रामाण्य मानीत नाहीं, त्याला स्वतःस हिंदु म्हणविण्याचा अधिकार नाहीं असेंही म्हणतां येईल. या श्रुतींचे मुख्य भाग दोन आहेत, हें आपणांस बहुधा अवगत असेलच. या दोन भागांस कर्मकांड आणि ज्ञानकांड अशीं नांवें आहेत. यज्ञयागादि क्रियाकलाप, हव्यकव्य इत्यादिकांचें विवरण कर्मकांडांत आहेत. सांप्रतकाळीं कर्मकांड बहुतांशीं प्रचारांतून गेलें आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. उपनिषद्ग्रंथ आणि वेदान्त यांचा अंतर्भाव ज्ञानकांडांत होत असून त्यांत आमच्या धर्मतत्त्वांचें विवरण केलें आहे. हा भाग सर्व प्रकारच्या मतवाद्यांस मान्य आहे. द्वैती, विशिष्टाद्वैती आणि अद्वैती या सर्वांस आणि सर्व पंथांच्या तत्त्वज्ञांस हा भाग सारखाच मानार्ह वाटत असून स्वमताच्या पुष्टीकरणास याच ज्ञानकांडाचा आधार ते वारंवार घेत असतात. निरनिराळ्या मतांचे तंटे तोडण्याचें अखेरचें आणि अत्युच्च दर्जाचें न्यायमंदिर ज्ञानकांड हेंच होय. कोणत्याही मताचें विवरण तुम्हांस करावयाचें असेल, तर त्याला ज्ञानकांडाचा आधार आहे हें तुम्हांस प्रथम दाखवावें लागतें. तें तुम्हांस करतां न आलें तर तुमचें सारें पांडित्य फुकट जाऊन तुमचें मत वेदबाह्य आणि अग्राह्य ठरतें. याकरतां हिंदुधर्मांतील सर्व मतांचा, पंथांचा आणि शाखोपशाखांचा अंतर्भाव एकाच नांवांत तुम्हांस करावयाचा असेल, तर तें कार्य वेदान्ती अथवा वैदिक अशा तऱ्हेच्या एखाद्या नांवानें तुम्हांस करतां येईल. वेदान्तधर्म अथवा वेदान्त या नांवाचा उपयोग जेव्हां जेव्हां मी करतों, तेव्हां याच अर्थानें तो शब्द मी योजीत असतों. केवळ अद्वैत मताचा निदर्शक या अर्थानें वेदान्त या शब्दाचा उपयोग करण्याची चाल सांप्रत पडली आहे; याकरितां माझ्या म्हणण्याचें थोडें अधिक स्पष्टीकरण करणें येथें भाग आहे, उपनिषद्ग्रंथांच्या मूळ पायावर ज्या अनेक मतांची उभारणी झाली आहे, त्यांपैकींच अद्वैत हेंही एक मत आहे हें आपणा सर्वांस विदित आहेच. उपनिषद्वृक्षाला ज्या अनेक शाखा पुढें फुटल्या, त्यांतीलच अद्वैत ही एक शाखा आहे; पण शाखा

म्हणजे समग्र वृक्ष असें मात्र नव्हे. उपनिषदांबद्दल जितका पूज्यभाव अद्वैतवादी बाळगतात, तितकाच विशिष्टाद्वैतवादीही तो बाळगतात. त्याचप्रमाणें स्वमताच्या पुष्टीकरणासाठीं उपनिषदांचा आधार अद्वैती जितका घेतात, तितकाच विशिष्टाद्वैतीही तो घेतात. हीच गोष्ट द्वैतवाद्यांसही लागू आहे; आणि अशाच प्रकारचा संबंध उपनिषदें आणि इतर मतें व पंथ यांतही आहे. अशा प्रकारें वेदान्त ग्रंथांचा आधार सर्वांस सारखाच असतांही वेदान्ती म्हणजे अद्वैती असा अर्थ सामान्य जनांच्या मनांत पक्का रूढ होऊन गेला आहे; आणि असें होण्यास थोडेंसें विशेष कारणही घडलें आहे. अद्वैत मताचे आधारस्तंभ आद्य श्रीशंकराचार्य आणि त्यांच्या नंतर होऊन गेलेले त्याच मताचे आचार्य यांनीं स्वमताच्या पुष्टीकरणासाठीं उपनिषदांवर जितकी भिस्त ठेविली आहे तितकी ती स्मृति वगैरे ग्रंथांवर ठेवलेली नाहीं. स्मृति आणि पुराणें हे ग्रंथ वेदकालानंतरचे असून श्रुतितत्त्वांच्या आचाराचा मार्ग यांत स्पष्ट केला आहे. तत्त्वांचा प्रत्यक्ष आचार कसा असतो हें दाखविण्याकरितांच पुराणें जन्मास आलीं. तथापि श्रुतिग्रंथांना जो मान आहे तो या ग्रंथांना नाहीं हें स्वाभाविकच आहे. श्रुति आणि स्मृति अथवा पुराणें यांत मतभेद झाला तर श्रुतीचें वचन आम्ही प्रमाण मानतों व स्मृतीचें अथवा पुराणांचें वचन तेवढयापुरतें मागें पडतें. कोणत्याही मतनिर्णयाच्या प्रसंगीं श्रुति हीच प्रमाण धरावी असा नियम आहे. यामुळें श्रीशंकरादि आचार्यांनीं श्रुतींचे आधार जितके दाखविले आहेत, तितके स्मृतींचे अथवा पुराणांचे दाखविले नाहींत. जेथें श्रुतीचा आधार मिळण्यासारखाच नव्हता, अशा एखाद्या प्रसंगीं मात्र स्मृतीकडे अथवा पुराणाकडे त्यांनीं बोट दाखविलें आहे. उलट पक्षीं इतर मतवाद्यांनीं स्मृति-पुराणांचा आश्रय अधिक प्रमाणावर केला असून, श्रुतीकडे त्यांचा ओढा कमी कमी होत गेला आहे. द्वैताच्या बाजूला एखादें मत जों जों अधिक झुकत जातें तों तों श्रुतींचा आधार सोडून स्मृति-पुराणांकडे धांव घेण्याची त्यांची प्रवृत्ति अधिकाधिक वाढत जाते असें आपणास आढळून येईल. केवळ तत्त्वमार्गाचा विचार करूं जाणाऱ्या कोणत्याही पंथानें उपनिषदांसारख्या शुद्ध ज्ञानप्रवर्तक ग्रंथांचा आधार घ्यावा अशी आपली स्वाभाविक अपेक्षा असते; पण द्वैत ग्रंथांत ही आपली अपेक्षा पूर्ण होत नाहीं. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें वेदान्ती म्हणजे अद्वैती असा

अर्थ लोकांच्या मनांत रूढ झाला असावा. अद्वैतवादी म्हणजेच खरा वेदान्ती असें लोकांस वाटण्याचें कारण बहुधा हेंच असावें असें मला वाटतें.

रूढी कशीही असली तरी वेदान्त या शब्दांत सर्व मतांचा आणि शाखांचा अंतर्भाव झाला पाहिजे हें निर्विवाद आहे. श्रुतिग्रंथ हें प्राचीनतम वाङ्मय आहे, याबद्दल आमच्या पंडितांत तरी वाद नाहीं. त्याचप्रमाणें अर्वाचीन पाश्चात्य पंडितांच्या मतें श्रुतिग्रंथांतील वेगवेगळे भाग आगेंमागें लिहिले गेले असें ठरत असलें, तरी त्यांचें हें मत ग्राह्य समजण्यास आम्ही तयार नाहीं. सर्व श्रुती एकाच काळीं निर्माण झाल्या, या आमच्या समजुतींत यत्किंचित्‌ही फरक करण्यास आम्ही तयार नाहीं. किंबहुना श्रुती अमुक एका काळीं निर्माण झाल्या असेंही घडलें नाहीं; तर त्यांचें अस्तित्व चिरंतन कालापासून आहे. परमात्म्याच्या चित्तांत श्रुतींना अस्तित्व नव्हतें असें कधींच घडलें नाहीं असेंही आम्ही म्हणतों. वेदान्त या शब्दांचा उपयोग मी करतों त्यावेळीं जो भावार्थ माझ्या मनांत असतो तो इतका विस्तृत आहे. द्वैत, विशिष्टाद्वैत आणि अद्वैत या साऱ्यांचा अंतर्भाव वेदान्त या शब्दांत होतो असें माझें मत आहे. फार काय, पण जैन आणि बौद्ध या धर्मांची तशी मर्जी असेल, तर त्यांसही आमच्या पंक्तींत बसविण्याची आमची तयारी आहे. तसें करण्याइतकें औदार्य आमच्या अंतःकरणांत खास आहे; पण आपला अंतर्भाव वेदान्त धर्मांत होऊं नये असा त्यांचाच हट्ट आहे; मग आम्हांकडून तयारी असून काय उपयोग? बौद्ध धर्माचें सार काढलें तर उपनिषदांतील तत्त्वांहून त्याचा मथितार्थ वेगळा नाहीं असें आपणांस आढळून येईल. बौद्ध धर्मांत अत्युच्च नीतितत्त्वांचा अंतर्भाव झाला आहे, अशी त्याची ख्याती आहे; पण हीं सारीं तत्त्वें एक अथवा अनेक उपनिषद्ग्रंथांतून जशींच्या तशींच घेतलीं आहेत, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें जैन धर्मांतील ग्राह्य मतेंही उपनिषदांत तुम्हांस आढळतील. आतां त्यांतील तर्कबाह्य भाग मात्र उपनिषदांत कोठें आढळावयाचा नाहीं, हें आम्ही प्रांजलपणें कबूल करतों. हिंदुस्थानांत आजपर्यंत जितकीं मतें उद्भवलीं आहेत, त्या साऱ्यांचें बीज उपनिषदांत तुम्हांस सांपडेल. भक्तिमार्गाचा मागमूसहि उपनिषदांत आढळत नाहीं, असें कोणी कोणी म्हणतात; पण हें म्हणणें अगदीं निराधार आहे. उपनिषदांचा अभ्यास ज्यांनीं मनःपूर्वक केला असेल, त्यांस या

मताचा फोलपणा तेव्हांच कळून चुकेल. प्रत्येक उपनिषदांत भक्ति भरपूर आहे. मात्र ती दिसण्यास आपणांस तशी दृष्टि पाहिजे. आतां इतकी गोष्ट मात्र खरी कीं स्मृतिपुराणांतून ज्या कांहीं तत्त्वांचा पूर्ण विकास आढळतो, तीं तत्त्वें केवळ बीजरूपानें मात्र उपनिषदांत आहेत. जणूं काय, उपनिषदांनीं केलेल्या नकाशावरून पुढील इमारत स्मृतिपुराणांनीं बांधली. ज्याचें उगमस्थान उपनिषदांत नाहीं, असें एकही मत अथवा असा एकही पंथ उभ्या हिंदुस्थानांत तुम्हांस आढळावयाचा नाहीं. उपनिषद्ग्रंथांशीं ज्यांचा फारसा परिचयही नाहीं, अशा कांहीं पंडितंमन्यांनीं भक्तीच्या उगमाचा शोध उपनिषदांबाहेर दुसऱ्या कोठें लावण्याचे यत्न केले होते; पण हे सारे यत्न अगदीं निष्फळ झाले आहेत, हें आपणां सर्वांस आतां ठाऊक आहेच. संहिता ग्रंथ उपनिषदांच्या अगोदरच्या कालांतले असतांही भक्तीचा उल्लेख त्यांत आहे; मग उपनिषदांत तो आहे हें वेगळें सांगण्याचें प्रयोजनच नाहीं. परमेश्वरपूजन आणि भक्तीचे अनेक प्रकार या साऱ्यांचीं बीजें उपनिषदांत आहेत. संहितांच्या कालानंतर व उपनिषदांनंतरही भक्तीचें ध्येय आणि स्वरूप हीं दिवसेंदिवस अधिक उच्च होत गेलीं हें मात्र खरें. संहितांत भेणेभावाची भक्ति पुष्कळ वेळां आढळून येते. भक्ताचें चित्त भीतीनें कंपायमान झालें असल्याचें तेथें पुष्कळ वेळां आढळतें. वरुणासमोर अथवा दुसऱ्या एखाद्या देवासमोर त्याचा भक्त चळचळां कांपत उभा आहे, असा देखावाही तेथें आपणांस दिसतो. आपण पापी आहों ही कल्पना चित्तांत येऊन भक्ताचें चित्त कावरेंबावरें झालें आहे असेंही आपणांस दिसतें. पण उपनिषदांत असल्या गोष्टींस थारा मिळण्यास कोठें स्थळच नाहीं. उपनिषदांत भेणेभाव तुम्हांस कोठेंही आढळावयाचा नाहीं. शुद्ध भक्ति आणि शुद्ध ज्ञान एवढया दोनच वस्तू तुम्हांस तेथें सांपडतील.

उपनिषदें हे आमचे धर्मग्रंथ आहेत; आणि त्यांच्या अर्थासंबंधीं अनेक वादविवाद झाले असून अनेकांनीं त्यांचे अर्थ अनेक प्रकारचे लावले आहेत. पुराणें अथवा स्मृतिग्रंथ आणि उपनिषदें यांत मतभेद होईल तेथें पुराणें मागें पडून उपनिषद्वचन प्रमाण मानावें, हा शास्त्रार्थ मागें एकवेळां मीं आपणास सांगितलाच आहे. तथापि असें असतांही आमचा प्रत्यक्ष आचार पाहिला तर वैदिक धर्मानुयायी या नांवापेक्षां पौराणिक धर्मानुयायी हेंच

नांव आम्हांस अधिक साजतें असेंही तुम्हांस आढळून येईल. आमच्या आचारावरून आमच्या धर्मपरायणतेचें प्रमाण काढावयाचें म्हटलें तर नव्वद किंवा अधिक टक्के आम्ही पौराणिक असून बाकीच्या उरलेल्या अंशांनीं आम्ही वैदिक आहों. त्याचप्रमाणें परस्परविरोधी अशाही अनेक चाली आमच्या आचारांत शिरून बसल्या असल्याचें तुम्हांस आढळून येईल. त्याचप्रमाणें ज्यांना श्रुतिग्रंथांत यत्किंचित्‌ही आधार आढळावयाचा नाहीं, असलीं मतें-सुद्धां धर्म म्हणून उघड्या माथ्यानें आमच्या समाजांत धुडगुस घालीत असल्याचें तुम्हांस दिसेल. त्याच प्रमाणें देशाच्या आणि परिस्थितीच्या अनुरोधानें कोठें कोठें अशा विलक्षण चाली आढळतात, कीं त्यांना श्रुतींचाच नव्हे तर स्मृतींचा अथवा पुराणांचाही आधार नसतो हें पाहून आपणास मोठें नवल वाटतें; पण अशा चालींचें माहात्म्य त्या त्या विशिष्ट स्थलापुरतेंच असतें, हेंही ध्यानांत आणलें पाहिजे. या चाली वेदबाह्य असल्या तरी अज्ञ लोकांच्या चित्तावर त्याचा पगडा इतका बसलेला असतो कीं, त्या नाहींशा झाल्या तर धर्म बुडून आपलें हिंदुत्वसुद्धां नष्ट होईल अशी भीति त्यांस वाटते. वेदान्त-धर्म आणि त्याच्या चालीरीती यांची पक्की गांठ त्यानें आपल्या चित्तांत मारलेली असते, आणि ही गांठ सुटण्यासारखी आहे असें त्याला कधीं चुकून-सुद्धां वाटत नाहीं. धर्मग्रंथ तो वाचतो त्या वेळीं आपल्या चाली शास्त्रसंमत नाहींत हेंही त्याला कळत नाहीं. या चाली सोडून दिल्या तर आपली धर्म-हानी कांहीं होणार नाहीं आणि उलटपक्षीं आपलें हित होईल, ही गोष्टही त्याच्या लक्षांत येत नाहीं. सामान्य जनसमूह इतका अज्ञ राहण्याचें आणखीही एक कारण आहे. आमचें धार्मिक वाङ्मय सागराप्रमाणें अफाट आहे. एकट्या सामवेदालाच एक हजार शाखा होत्या, असें भगवान् पतंजलि यांनीं आपल्या महाभाष्यांत म्हटलें आहे. या सर्व शाखांचें काय झालें हें आज कोणासही ठाऊक नाहीं. हीच गोष्ट इतर वेदांसही लागू आहे. त्यांचा पुष्कळसा भाग नष्ट झाला आहे, आणि आतां आमच्या हातीं अल्पसा भाग मात्र राहिला आहे. हे भाग कांहीं विशिष्ट कुलांच्या हातीं होते. कदाचित् हीं कुलें कालां-तरानें नष्ट झालीं असावीं, परकीयांच्या स्वाऱ्यांत मारलीं गेलीं असावीं अथवा दुसऱ्या कांहीं कारणांनीं स्मृतिगत झालीं असावीं; आणि त्यांजबरोबर त्यांच्या हातीं असलेल्या श्रुतिशाखाही नष्ट झाल्या असाव्या. श्रुतिबाह्य अशी एखादी

चाल अथवा असें एखादें मत प्रतिपादन करण्याचा प्रसंग त्याच्या पुरस्कर्त्यास येतो, तेव्हां या नष्ट झालेल्या शाखा त्याच्या उपयोगीं पडत असतात. तुमचें मत वेदबाह्य आहे असें त्याला कोणीं म्हटलें, कीं त्याला आधार या नष्ट श्रुतींत होता असें उत्तर तो बिनदिक्कत देतो. आपल्या अशास्त्र मताचें समर्थन अशा रीतीनें करणें हीसुद्धां एक चालच होऊन बसली आहे. अशा रीतीनें या नष्ट शाखा अनेक चालीरितींचें मोठें आश्रयस्थान होऊन बसलें आहे. श्रुतींच्या अर्थासंबंधींही मोठ्या कडाक्याचे वाद चालू असतात, आणि त्यांतून वेगवेगळा अर्थ काढण्याची धडपड प्रत्येक पक्ष करीत असतो. यामुळें त्याच्या अंतर्गत रहस्याचा धागा ध्यानीं येणें मोठें दुरापास्त होऊन बसतें. श्रुतिग्रंथ पुष्कळ असले तरी ते खरोखर विस्कळित नाहींत. त्यांच्यांत परस्पर संबंध कांहींच नाहीं, असें नाहीं. बाह्यतः विविध म्हणून दिसणाऱ्या ह्या ग्रंथांच्या पोटीं एकतानता असली पाहिजे, ही खूण आपल्या अंतर्यामीं आपणास पटल्याशिवाय राहत नाहीं. या साऱ्यांचा पाया एकच असला पाहिजे. बाह्यतः अगदीं विसंगत दिसणारा हा सारस्वतसमूह कोणत्या तरी एखाद्या मुख्य मुद्यावर एकरूप आणि सुसंगत होत असला पाहिजे. याच मूळ पायाला आम्ही आमचा धर्म असें ह्मणतों. आमचा धर्म दिसतो तितका खरोखरच विसंगत आणि विस्कळित असता तर कालचक्राच्या तडाक्यांत तो कधींच नाहींसा होऊन गेला असता. आज हजारों वर्षें अनेक प्रकारच्या आपत्ति आणि प्रतिकूल परिस्थिति भोगीत असतांही तो जिवंत आणि ताजातवाना आहे, या एकाच गोष्टीवरून त्याचा अंतर्गत जिवटपणा आणि त्याची अभेद्य घटना यांचा अजमास सहज करतां येतो.

आतां आमच्या टीकाकार पंडितांकडे पाहिलें म्हणजे आणखीही एक अडचण दिसूं लागते. एखादा अद्वैतवादी श्रुतिग्रंथांचा अर्थ लावूं लागला म्हणजे आपल्या मताला अनुकूल असें वचन आढळेल तें जसेंच्या तसेंच ठेवतो; पण त्यांत एखादें वचन द्वैताला पुष्टि देणारें आढळलें, कीं त्याची विलक्षण ओढाताण आणि चिरफाड करून त्यांतून विचित्र अर्थ तो निर्माण करतो. तुमच्या स्वप्नींही कधीं आला नसेल असला विलक्षण अर्थ तो तुम्हांपुढें मांडतो. 'अज' म्हणजे जन्मास न आलेला असा सरळ अर्थ संदर्भानुरूप लागत असला, तरी तो स्वमताविरुद्ध जात असल्यास 'येथें अज म्हणजे बकरा

असा अर्थ आहे ' असें तो तुम्हांस चापून सांगेल. कित्येक वेळां तर याहू-नही विलक्षण अर्थ निर्माण करून द्वैत मताच्या टीकाकारांनीं आपल्या टीका सजविल्या आहेत. द्वैतमताला पोषक असें वचन जसेंच्या तसेंच राखावें आणि अद्वैतदर्शक वचनाची ओढाताण करून आपल्या इच्छेस येतील ते अर्थ त्यांतून निर्माण करावे, अशा मार्गाचा अवलंब त्यांनीं केला आहे. संस्कृत भाषा सामान्यतःच फार भानगडीची आहे; आणि त्यांतून श्रुतींची भाषा तर फा-रच जुनी. दुसरें असें कीं संस्कृत भाषेंत एकाच शब्दांतून अनेक अर्थ संभ-वतात आणि एकाच अर्थाचे अनेक शब्द असतात. यामुळें एका शब्दाच्या अर्थाबद्दलही युगानुयुगें वाद घालीत बसणें अशक्य नाहीं. एखाद्यानें कांहींही अक्षरांची बडबड केली तरी तिचा सुसंगत अर्थ एखादा पंडित लावून दाख-वील. त्याच्या मनांत आलें पुरे कीं एकएका अक्षराचा कीस पाडून आणि आपल्या बुद्धीच्या सांच्यांत घालून त्या निरर्थक बडबडीचा अर्थही तो तु-म्हांस करून दाखवील. मग हा अर्थ खरा आहे हें सिद्ध करण्याकरितां अनेक ग्रंथांतून समानार्थक वचनें तो काढील आणि व्याकरणाचे शेंकडों नियमही तो तोंडपाठ म्हणेल. उपनिषदांचें खरें रहस्य हस्तगत करण्यास कोणी नि-घाला म्हणजे त्याच्या मार्गांत या मोठ्या अडचणी उभ्या राहतात. परमेश्व-राच्या कृपेनें ज्या महानुभावाची संगति घडण्याचें महद्भाग्य मला प्राप्त झालें होतें, तो जितका द्वैती तितकाच अद्वैती आणि जितका भक्त तितकाच ज्ञानीही होता. या सत्संगामुळेंच उपनिषदांचें खरें हृद्गत जाणण्याचा मार्ग मला उप-लब्ध झाला. टीकाकारांच्या मागून डोळे मिटून चालण्यानें हें रहस्य कोणा-सही लाभावयाचें नाहीं. तसें होण्यास अगदीं स्वतंत्र आणि याहून अधिक चांगल्या अशा मार्गाचा अवलंब करावयास पाहिजे. मला असा मार्ग सद्गुरु-कृपेनें लाभला. अशा रीतीनें उपनिषदांचा अभ्यास केल्यावरही संहिता परस्परविरोधी नाहीं अशी माझी खात्री झाली. याकरितां उपनिषदांचें रहस्य हस्तगत होण्यास त्यांतील वचनांची ओढाताण करण्याचें प्रयोजन मुळींच नाहीं. मूळ संहिता अत्यंत सुंदर आणि अत्यंत चित्ताकर्षक असून तींत पर-स्परविरोध कोठेंही नाहीं. तींत विरोध नाहीं एवढेंच नव्हे, तर तींत विल-क्षण सामरस्य आहे. कल्पना अनेक, पण त्या परस्परांस विरोध करीत नसून परस्परांस पोषक मात्र होतात. एकीहून एक चढती अशा कल्पनांची श्रेणी

त्यांत असल्यामुळें क्षणभर विरोधाभास उत्पन्न झाला तरी वास्तविक विरोध तेथें नाहीं. सर्व उपनिषदांचा आरंभ द्वैतांत झाला असून त्यांची अखेर अद्वैताच्या अत्युच्च आणि उत्कट कल्पनांत झाली आहे, असें मला आढळून आलें.

याकरितां द्वैतवादी आणि अद्वैती यांनीं परस्परांशीं तंटा करण्याचें कांहींच कारण नाहीं. हीच गोष्ट माझ्या सद्गुरूंच्या प्रत्यक्ष जीवनक्रमावरूनही माझ्या अनुभवास आली. अमुक एक मत तेवढेंच खरें आणि बाकीचीं सारीं खोटीं असा भाग नसून सर्व मतांनीं गुण्यागोविंदानें एकत्र वास करावा अशी स्थिति आहे. मानवकुलाला या साऱ्यांचीच गरज असल्यामुळें तीं सारींच खरीं आहेत असें म्हणण्यास काय हरकत आहे ? मानवकुलाच्या अंतिम कल्याणासाठीं सारींच आवश्यक आहेत. अखेरच्या हेतूच्या सिद्धीसाठीं अद्वैत मत जितकें जरुरीचें, तितकेंच द्वैतही जरुरीचें असल्यामुळें तें नष्ट होऊं शकत नाहीं. फार काय, पण हीं सारीं मतें परस्परावलंबी आहेत असेंही म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. यांतील प्रत्येकाचें जीवित दुसऱ्यांच्या अस्तित्वावर अवलंबून आहे. यांतील प्रत्येक इतरांचें पोषक असून इतरांकडून त्याच्या पोषणास मदत होत असते. अनेक भाग मिळून ज्याप्रमाणें एखादा अखंड पदार्थ बनलेला असतो, त्याप्रमाणें हीं सारीं मतें मिळून मनुष्यमात्राचें धर्मजीवन बनलें आहे. शरिराच्या साऱ्या क्रिया सुरळीत चालण्यास आणि तें जिवंत राहण्यास ज्याप्रमाणें अनेक अवयवांची जरूर आहे, त्याचप्रमाणें मानवकुलाचें धर्मजीवन कायम राहण्यास या साऱ्या मतांच्या अस्तित्वाची जरूर आहे. यांतील प्रत्येक मत जिवंत राहिलें म्हणजे तें दुसऱ्याच्या पोषणाच्या उपयोगीं पडतें. यांतील एखादें पायाच्या जागीं बसतें, दुसरें इमारतीची जागा घेतें आणि तिसरें कळसाच्या जागीं विराजमान होतें. अशा रीतीनें ही सारी इमारत पुरी होत असते. यांतील एक मुळासारखें, दुसरें वृक्षासारखें आणि तिसरें एखादें फळासारखें असतें. ध्यानांत ठेवण्याचा मुख्य मुद्दा इतकाच कीं हीं सारीं मतें परस्परविरोधी नसून परस्परांचीं पोषक आहेत. याकरितां उपनिषदांच्या मूळ संहितेची ओढाताण करण्याचा यत्न मला अत्यंत हास्यास्पद वाटतो. उपनिषदांतील उच्च तत्त्वज्ञान क्षणभर बाजूस ठेवलें तरी त्यांची नुसती भाषासुद्धां इतकी कर्णमनोहर आहे कीं तुमचें चित्त ती तत्क्षणींच मोहून टाकते. त्यांतील ईश्वर-

विषयक ज्ञानाचा विचार आपण केला नाहीं, तरी केवळ भाषागांभीर्यानें त्यांची बरोबरी करणारा एतद्विषयक ग्रंथ जगांत दुसरा नाहीं, अशी तुमची खात्री होईल. मनुष्याला मुक्तीचा मार्ग दाखविणारें जितकें कांहीं वाङ्मय साऱ्या जगांत आज उपलब्ध आहे, त्या साऱ्यांत उपनिषद्ग्रंथ मेरुमण्याच्या जागीं आहेत. अत्यंत उदात्त अशा कल्पनांचें यथातथ्य रूप येथें जसें रंगविलें आहे, तसें दुसऱ्या कोठेंही तें तुम्हांस आढळणार नाहीं. अंतर्ज्ञान हा एकट्या मानवी मनाचाच हक्क आहे. बाह्यजग सोडून अंतःसृष्टींत बुडी मारण्याचें कार्य फक्त मानवी मनच करूं शकतें, आणि हें काम विशेषतः हिंदु मानवकुलानेंच केलें असल्यामुळें त्याच्या अंतःसाक्षित्वाचें पूर्ण रूप येथें तुम्हांस पाहावयास सांपडतें. उदात्त भावनांचीं शब्दचित्रें जगांतील साऱ्या राष्ट्रांत रेखाटलेलीं आढळतात; पण त्यांतील उदात्तपणा केवळ जड सृष्टीच्या हद्दींतलाच आहे. दृश्य विश्व ओलांडून पलीकडे उडी मारण्याचा यत्न त्यांनीं केलेला नाहीं. या नियमाला अपवाद असा बहुधा एकही तुम्हांस आढळावयाचा नाहीं. मिल्टन, होमर, डान्टी अथवा यांजसारखेच दुसरेही जगविख्यात कवी घेतले, तरी त्यांच्या काव्यांतही हाच प्रकार आढळून येतो. त्यांत उदात्त प्रसंग पुष्कळ आहेत आणि त्या त्या कवींनीं ते मोठ्या बहारीचे रंगविले आहेत हेंही खरें; पण तेथेंसुद्धां इंद्रियांस चिकटण्यापलीकडे मजल गेलेली नाहीं. अनंताला वीतभर जागेंत कोंडण्याचा हा यत्न आहे. अशाच प्रकारचा यत्न श्रुतींच्या संहितांत आढळतो. सृष्टीच्या उत्पत्तीचें कथन ज्या ऋचांत केलें आहे त्या किती सुंदर आणि उदात्त आहेत ! तथापि तेथें सृष्टीच्या बाहेर पाऊल पडलेलें नाहीं. अशा रीतीनें अनंताचा माग लागावयाचा नाहीं ही गोष्ट आमच्या मंत्रद्रष्ट्यांच्या लक्ष्यांत लवकरच आली. बाह्यसृष्टींत आपण कितीही भटकलों आणि आपला कल्पनासंचार कितीही स्वैर झाला, तरी त्याच्या आटोक्यांत अनंत सांपडावयाचें नाहीं हें त्यांस कळून आलें, आणि हा मार्ग अशा रीतीनें बंद झाल्यानंतर आपल्या चित्तांतील कल्पनासमूहास बाहेर पडण्यास दुसरा कोठें वाव आहे कीं नाहीं हें ते पाहूं लागले. यानंतर उपनिषदें निर्माण होत गेलीं. येथें पूर्वीची सारी भाषा बदलली, आणि तिला अगदीं नवें वळण लागलें. 'नेति नेति' अशा प्रकारची नकारात्मक अथवा निषेधबोधक भाषा येथें दृग्गोचर होऊं लागली. कित्येक ठिकाणीं कल्पनांचा संचार

इतका स्वैर झाला आहे कीं, त्यांत सुसंबद्धता नसावी असाही भास होतो, आणि कल्पनांचा नुसता गोंधळ झाला आहे असें वाटूं लागतें. इंद्रियांपलीकडे तुम्हांस घेऊन जाण्याची धडपड येथें दिसेल. आपल्या बुद्धीच्या आटोक्याबाहेर असलेल्या एखाद्या तत्त्वाकडे या ऋचा आपणास नेत आहेत असें तुम्हांस ताबडतोब कळून चुकतें. इंद्रियांनीं ज्याचें ज्ञान करून घेतां येत नाहीं, अशा एखाद्या वस्तूकडे आपण ओढले जात आहों, असा अनुभव तुम्हांस येतो. पण अशा स्थितींतही तुमची बुद्धी घाबरून जात नाहीं अथवा ती परतही फिरत नाहीं. कारण, बुद्धीच्या आटोक्याबाहेरचें असलें तरी असें तत्त्व अस्तित्वांत खास आहे अशी जाणीव तुमच्या ठिकाणीं त्यांनीं अगोदरच उत्पन्न केलेली असते आणि हीच जाणीव या संधींत तुमच्या उपयोगीं पडते. 'न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः।' "सूर्य, चंद्र, तारका, विद्युत् यांपैकीं या स्थळाला कोणीही प्रकाशित करूं शकत नाहीं. मग या अग्नीबद्दल काय निराळें सांगावें ?" अशा प्रकारच्या ऋचांशीं तुल्य असें एखादें वाक्य तरी साऱ्या जगाच्या वाङ्मयांतून तुम्हांस काढून दाखवितां येईल काय ?

'द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्न्यो अभिचाकशीति॥
समाने वृक्षे पुरुषो निमग्नोऽनीशया शोचति मुह्यमानः।
जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशमस्य महिमानमिति वीतशोकः॥'

"एकाच वृक्षावर सुंदर पिसाऱ्याचे दोन पक्षी बसले होते. या दोघांत उत्तम स्नेह होता. यांपैकीं एक त्या वृक्षाचीं फळें खात होता आणि दुसरा अगदीं शांत बसला असून तो कांहीं खात नव्हता. वृक्षाच्या खालच्या खांदीवर बसलेला पक्षी कडू आणि गोड अशा दोन्ही प्रकारचीं फळें भक्षण करीत होता, आणि दुःख अथवा आनंद पावत होता. कडू फळ लागलें म्हणजे शोक करावा आणि गोड मिळालें म्हणजे हर्षभरानें नाचूं लागावें असा त्याचा क्रम चालू होता. तिकडे तो दुसरा पक्षी स्वात्मसुखनिमग्न होऊन स्वस्थ बसला होता. कडू किंवा गोड यांपैकीं कोणतेंच फळ तो खात नव्हता. तो सुखाच्या मागें लागला नव्हता अथवा दुःखानें उद्विग्नही होत नव्हता. तो आपल्याच वैभवांत गर्क होऊन बसला होता." जगांतील साऱ्या तत्त्वज्ञा-

नाचें सार, प्राचीन हिंदु तत्ववेत्त्यांच्या साऱ्या विचारसागरांतील अमृत मुक्तीच्या अफाट कल्पनातरंगांचें रहस्य इतक्या सुंदर आणि परिपूर्ण रीतीनें प्रकट झाल्याचें दुसरें उदाहरण तुम्हांस कोठें सांपडेल ? मनुष्याच्या जीवात्म्याचें सुंदर चित्र या अल्प कथेंत रंगविलें आहे. आपल्या जीवित वृक्षाचीं कडू आणि गोड फळें मनुष्यप्राणी साऱ्या जन्मभर खात असतो. संपत्तीमागें तो धावत सुटतो. इंद्रियजन्य सुखांचा पाठलाग तो करतो आणि सृष्टींतील पोकळ व नुसत्या दिखाऊ वस्तूंच्या मागें वेड्यासारखा पळत सुटतो. अशी धांवपळ करून सुख गांठतां येईल अशी आशा त्याला खरोखरच आहे काय ?

जीवात्मा हा रथकार आणि इंद्रियें हीं भडकलेल्या घोड्यांसारखीं आहेत, अशीही कल्पना उपनिषदांत कित्येक ठिकाणीं आढळते. या जगांतील पोकळ सुखांच्यामागें लागणाऱ्या मनुष्यांची गति वास्तविक अशीच आहे. सुखस्वप्नें पडावीं आणि जागें झाल्याबरोबर जशीं तीं नाहींशीं व्हावीं, त्याचप्रमाणें जगांतील सारीं सुखें स्वप्नवत् आहेत असा अनुभव अखेरीस येतो. आपलीं सारीं पूर्वकर्में आठवून म्हातारीं माणसें सुखी अथवा दुःखी होत असतात; पण या प्रचंड कर्मजालांतून कायमचें बाहेर कसें पडावें, याची कोणतीही युक्ति त्यांस सुचत नाहीं. जगाचें स्वरूप अशा प्रकारचें आहे. असें आहे तथापि प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांत खरोखर महत्वाचे असे कांहीं क्षण अवश्य येतात. अत्यंत दुःखाच्या प्रसंगींच नव्हे तर अत्यंत सुखाच्या वेळींही असे क्षण प्राप्त होत असतात. ज्या सूर्याचा प्रकाश ढगाच्या आवरणामुळें दिसत नसतो, त्याचा एखादा किरण अशा प्रसंगीं दृग्गोचर होत असतो. पण मनुष्यप्राणी विलक्षण विसराळू असल्यामुळें ह्या अंधुक प्रकाशदर्शनाचें स्मरण त्यास राहत नाहीं. अशा विस्मृतींत कांहीं काळ लोटल्यानंतर पुनः एखादा असाच प्रसंग येऊन पुन्हां एक वेळ हें शुभ दर्शन त्याला घडतें. आपल्या या इंद्रियांच्या आटोक्यांत कधींही न येणारें अशा प्रकारचें कांहीं अस्तित्व असेंल अशी आपली कल्पनाही नसते. हें अस्तित्व शुद्ध प्रकाशरूप आहे हेंही आपणास कळत नसतें आणि यामुळें या प्रकाशमयाचें दर्शन आपणास घडावें, या इच्छेनें कांहीं खटपटही आपण कधीं केलेली नसते. तथापि असें असतांही क्वचित् प्रसंगीं या इंद्रियबाह्य प्रकाशाचा क्षणिक प्रत्यय आपणास अवश्य येतो. हें प्रकाशमय अस्तित्व आपल्या इंद्रियांच्या बाहेर आहे; एवढेंच नव्हे तर आपल्या साऱ्या

सुखदुःखांच्या, आपल्या स्वर्गीय कल्पनांच्या आणि या साऱ्या सृष्टीच्याही बाहेर तें आहे. ऐहिकसुखाची परमावधि अथवा त्याही पलीकडच्या स्वर्गीय सुखाची कल्पना या अस्तित्वास आकलन करूं शकत नाहीं. हें अस्तित्व संपत्तिविषयक अथवा संततिविषयक अत्यंत तीव्र कल्पनेच्याही पलीकडचें आहे. पक्षीरूप जीवात्मा सांसारिक सुखदुःखरूप फळें भक्षण करीत असतां त्याला या अस्तित्वाचा प्रत्यय जेव्हां येतो तेव्हां तोही क्षणभर अगदीं स्तब्ध होत्साता त्या दुसऱ्या पक्ष्याकडे पाहतो. त्या वेळीं तो दुसरा पक्षी कडू अथवा गोड फळें न खातां आपल्याच ठिकाणीं संतुष्ट होऊन स्तब्ध बसला असल्याचें त्याला आढळून येतें. ‘ यस्त्वात्मरतिरेवस्यादात्मतृप्तश्च मानवः। आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥ ’ असें गीतावचन आहे. ज्याची भक्ति फक्त आत्म्याच्याच ठिकाणीं जडली आहे, ज्याला आत्म्याशिवाय दुसऱ्या कशाचीही गरज उरलेली नाहीं आणि जो आत्मतृप्त झाला आहे त्याला दुसरें कोणतें कर्तव्य उरणार ? क्लेशदायक कर्मांचा अवलंब त्यानें कां करावा ? अशी आत्मतृप्तीची अवस्था ज्या ठिकाणीं प्राप्त होते त्या ठिकाणाचें क्षणमात्र दर्शन मनुष्याला होतें, पण तें तो लवकरच विसरतो आणि पुन्हां कर्मचक्रांत पडून त्याचीं कडू आणि गोड फळें खाऊं लागतो. अशा रीतीनें आयुष्य व्यतीत होत असतां त्याला त्या शुभदर्शनाचा आणखी एखादा योग येतो. अशा रीतीनें वारंवार धक्के खातां खातां त्या वरील पक्ष्यासंनिध हा खालचा पक्षी जात असतो. त्यांतच एखादा विशेष जोराचा धक्का बसण्याइतकें त्याचें भाग्य प्रबळ असलें, तर त्याची गति वाढून तो त्या आपल्या स्नेही पक्ष्याकडे अधिकच लवकर जातो. त्या वेळीं त्या वरील पक्ष्याचा प्रकाश आपणाभोंवतीं पसरला आहे असें त्याला आढळून येतें. तो अधिकाधिक जवळ जाऊं लागला म्हणजे त्याच्या ठिकाणींही स्थित्यंतर घडून येऊं लागतें. त्याचें मूळचें रूप हळू हळू नाहींसें होऊं लागतें आणि अखेरीस त्या रूपाचा पत्ताही कोठें लागेनासा होतो. त्याला वस्तुतः अस्तित्वच नव्हतें, तो केवळ छायारूप होता. वरील पक्ष्याची तो छाया होता. त्या वरील पक्ष्यालाच खरें अस्तित्व असून त्याचाच प्रकाश सर्वत्र भरला होता, तो अगदीं निर्भय होऊन बसला होता, तो अगदीं आत्मतृप्त होता आणि अगदीं शांत होऊन बसला होता. अशा रीतीनें शुद्ध द्वैतांतून थेट अद्वैतापर्यंत उपनिषदें तुम्हांस घेऊन जातात.

अशाच प्रकारचीं आणखीही उदाहरणें असंख्य देतां येतील; पण वेळाच्या अभावीं मला तसें करतां येत नाहीं. उपनिषदांतील विचार किती उच्च, त्यांतील उदात्ततेचें चित्र किती बहारीचें आणि काव्य किती मनोहारी आहे हें यथास्थित रीतीनें दाखवावयाचें म्हटलें तर तें काम अशा शेंकडों व्याख्यानांनींही व्हावयाचें नाहीं. याकरितां ही बाजू इतकीच सोडून आपण आपला पुढील मार्ग पाहूं.

उपनिषदांची भाषा अशा प्रकारची आहे कीं, तिचा प्रवेश थेट तुमच्या अंतःकरणांत एकदम होतो. तिच्यांत आढयावेढयांचा अथवा बोबडेपणाचा दोष तुम्हांस कोठेंही आढळावयाचा नाहीं. विचार आणि भाषा हीं दोन्हीही भाल्याच्या टोंकासारखीं सरळ आणि तीक्ष्ण असल्यामुळें तुमच्या मनाला स्पर्श होण्याबरोबर तीं थेट अंतःकरणांत शिरतात. त्यांत लेचेपेचेपणाचा अंशही तुम्हांस कोठें सांपडावयाचा नाहीं. त्यांत तीन चार भावार्थही निघावयाचे नाहींत. त्यांतून उद्भवणारा प्रत्येक सूर अगदीं निकोप आणि निष्कंप असल्यामुळें त्याचा परिणाम जितका व्हावयाचा तितका पूर्णत्वानें तो होतो. त्यांत कोठें चक्रव्यूह नाहींत अथवा गिरक्याफिरक्या नाहींत. निरर्थक शब्दजाल अथवा साखरेची साल काढून मेंदूला व्यर्थ शिणविणाऱ्या विचारांचा काथ्याकूटही त्यांत नाहीं. कित्येक लेखांची मजा अशी असते कीं ते वाचतां वाचतां भांबाऊन जाऊन अखेरीस वाचक अगदीं वेडा बनतो. आपण काय वाचलें याचेंही पुरतेंसें स्मरण त्यास राहत नाहीं. अशा प्रकारचे लेख हे लेखकाच्या बुद्धीच्या अवनतावस्थेचें चिह्न होय. असा प्रकार उपनिषदांत कोठेंही नाहीं. रूपकांची आणि अलंकारांची फाजील रेलचेल कोठेंही नाहीं. विशेषणामागें विशेषणें असलाही प्रकार कोठें नाहीं. असल्या प्रकारांनीं अपेक्षित अर्थ इतका लोपून जातो कीं तो शोधून काढतां काढतां बिचारा मेंदूही थकून जातो आणि अखेरीस बेशुद्ध झाल्यासारखा जागच्याजागींच थिजून बसतो; व असल्या प्रचंड चक्रव्यूहांतून बाहेर कसें पडावें हें त्यास सुचेनासें होतें. बुद्धीच्या गतवैभवाचीं हीं चिन्हें उपनिषत्कालापर्यंत दृष्टीस पडत नव्हतीं. हे ग्रंथ मनुष्यकृत असतील तर ज्या मानवकुलांत ते जन्म पावले त्याच्या मानसिक जोमाला अद्यापि उतरती कळा लागली नव्हती असें निःशंकपणें म्हणतां येईल.

उपनिषदांनीं जर कांहीं गोष्ट विशेषेंकरून मला शिकविली असेल, तर ती मनोबल ही होय. हीन बलाला मोक्ष नाहीं हें तत्त्व उपनिषदें जणूं काय

प्रत्येक शब्दानें तुमच्या चित्तावर ठसवीत आहेत ! उपनिषदांसंबंधीं सर्वांत मोठा आणि नित्य लक्ष्यांत ठेवण्याचा मुद्दा तो हाच. कांहीं झालें तरी हीन-बल होऊं नका असा उपदेश अखिल मानवजातीला तीं उच्च दोषानें करीत आहेत. माझ्या साऱ्या आयुष्यांत जर कोणता अत्यंत महत्वाचा धडा मी शिकलों असेन तर तो हाच. 'नायमात्मा बलहीनेन लभ्यः ।' हेंच तत्त्व सर्व उपनिषदें आपणांस मुख्यत्वेंकरून सांगत आहेत.

मनुष्यप्राणी म्हटला कीं त्याच्या ठिकाणीं दौर्बल्य हें असावयाचेंच, असा आपला अनुभव आहे; आणि ही गोष्ट उपनिषदांनींही कबूल केली आहे. यासाठींच त्यांचा उपदेश असा आहे कीं दौर्बल्य वाढविणाऱ्या अशा कोण-त्याही गोष्टी करूं नका. अधिक घाण केल्यानें पहिली घाण नाहींशी होते असें नाहीं. पापानें पाप धुतलें जात नाहीं, आणि दौर्बल्यानें दौर्बल्य नाहींसें होत नाहीं. बलवान् होण्यानेंच दौर्बल्य नाहींसें होईल. याकरितां बलवान् होण्याचा यत्न करा. जागे व्हा, बलवान् व्हा, असा उपनिषदांचा उपदेश आहे. 'निर्भय व्हा' असा उपदेश साऱ्या जगांतल्या वाङ्मयांत तुम्हांस फक्त येथेंच आढळतो. हा उपदेश उपनिषदांनीं वारंवार केला आहे. 'निर्भय' हें गुणदर्शक विशेषण परमेश्वरामागें अथवा मनुष्यामागें लावण्याचें उदाहरण जगांतील दुसऱ्या कोणत्याही वाङ्मयांत तुम्हांस आढळावयाचें नाहीं. महा-प्रतापी बादशहा शिकंदर याची आठवण या प्रसंगीं मला होते. सिंधुनदाच्या कांठीं असलेल्या एका अरण्यांत एक दिगंबर संन्यासी एका शिलातलावर बसला असतां त्याजपुढें उभा राहून शिकंदर बादशहा त्याला द्रव्याचा लोभ दाख-वीत आहे असें चित्र या प्रसंगीं माझ्या मनश्चक्षूंपुढें उभें राहतें. त्या अव-धूत संन्याशाचें ज्ञान पाहून बादशहा चकित होऊन क्षणभर अगदीं स्तब्ध झाला. संन्याशानें आपणाबरोबर ग्रीस देशास यावें. अशी बादशहाची फार इच्छा होती. बादशहाच्या सुवर्णाच्या देखाव्यानें संन्यासी मोह पावला नाहीं. त्याच्या मानमरातबांनीं संन्याशाचें चित्त किंचितही कंप पावलें नाहीं. मानपान आणि सुवर्ण हे पदार्थ तुच्छ आहेत असा भाव संन्याशानें दर्शविला. हा आपला मोठा अपमान झाला असें वाटून बादशहा क्रोधायमान झाला. आपण पृथ्वीपति आणि हा कंगाल हा फरक बादशहाच्या चित्ताला या वेळीं विशेष जाणवला. तो म्हणाला, "तूं मजबरोबर न येशील तर तुला ठार

करण्याचें सामर्थ्य मजमध्यें आहे." बादशहाचें हें भाषण ऐकून संन्याशी खदखदां हंसून म्हणाला, "राजा, असें खोटें कां बोलतोस? मला मारण्याचें सामर्थ्य तुलाच काय, पण दुसऱ्याही कोणाला नाहीं. तूं जड जगाचा धनी आहेस. मला चैतन्यरूपाला तूं काय करूं शकणार आहेस? तूं मला मारूं शकशील ही गोष्ट कालत्रयांत घडावयाची नाहीं; कारण, मी अजन्मा आहें. मी चैतन्यरूप आहें, मी अक्षय्य आहें, मी कधीं जन्मत नाहीं आणि मरतही नाहीं. मी अनंत आणि सर्वव्यापी आहें, आणि मी सर्वसाक्षीही आहें. बच्चा, तूं मला मारूं शकशील काय?" विशाल सामर्थ्य म्हणतात तें हेंच. माझ्या मित्रांनो, माझ्या देशबांधवांनो, उपनिषदांचा अभ्यास मी जों जों करतों तों तों त्यांचा हाच उपदेश आहे, असा माझा प्रत्यय वाढतच जातो. उपनिषदांचें जें अत्यंत व्यवहार्य तत्त्व आहे तें हेंच. आम्हांला जर कोणत्या वस्तूची गरज असेल, तर ती याच मनःसामर्थ्याची आहे. अत्यंत दृढ अशा आत्मश्रद्धेचीच जरूर आपणास आहे. माझ्या देशबांधवांनो, उपनिषद्ग्रंथ चाचीत असतां तुमची आठवण होऊन मला रडूं कोसळतें, आणि हें सामर्थ्य कोण देईल याचा ध्यास चित्ताला लागून राहतो. दिवसेंदिवस आपणास अधिकाधिक दुर्बल करणारे लोक मात्र आपल्याभोंवतीं लक्षावधि आहेत. आपणास लाथ मारण्यासाठीं आपला पाय जो कोणी पुढें करील, त्याच्याच पायापाशीं आपण खुशाल लोळण घेतों! मातींत लोळणाऱ्या किड्याच्या कोटींत आज आपण जाऊन बसलों आहों. आतां यापेक्षां आणखी कांहीं निराळी अधोगति म्हणून राहिली आहे काय? दिवसेंदिवस अधिकाधिक दुर्बळ होण्याचाच यत्न जणूं काय आपण गेलीं हजार वर्षें केला. आमचीं सारीं पुराणें पहा. त्यांतही याच दौर्बल्य आणणाऱ्या गोष्टी. या गोष्टींची संख्या इतकी होईल कीं त्यांनीं पाऊण हिस्सा पुस्तकालयें भरून जातील. दुर्बल कसें व्हावें हाच ध्यास जणूं काय आमच्या चित्ताला या अवधींत लागून गेला होता; आणि सांप्रतची आपली अवनतावस्था हा या ध्यासाचाच परिणाम होय. माझ्या मित्रांनो, तुम्हाला जर कशाची आज जरूर असेल तर ती बलवान् चित्ताची आहे हें मी त्रिवार सांगतों. मीही तुमच्यापैकींच एक आहें. माझा जन्म तुमच्यांत झाला आणि या देहाची अखेरही तुमच्यांत असतांच व्हावयाची आहे. जें रक्त तुमच्या धमन्यांत खेळत आहे, तेंच माझ्याही अंगांत

आहे. या सान्या गोष्टींची आठवण करून मी तुम्हांला पुन:पुन्हां हेंच सांगतों कीं बाबांनो, अपार मनौदार्य मिळवा. तुमचीं उपनिषदें हीं सामर्थ्याची खाण आहे. सान्या जगाला पुरून उरण्याइतका सामर्थ्याचा सांठा उपनिषद्ग्रंथांत आहे. त्यांच्याद्वारें सान्या जगाला नवें चैतन्य आणतां येईल. कोणत्याही पंथाचा, धर्माचा अथवा जातीचा कोणीही मनुष्य असो, आमच्या उपनिषदांची रणतुतारी वाजली कीं तो खडबडून जागा होईल. जागे व्हा, उठा आणि मुक्त व्हा असा घोष उपनिषदें करीत आहेत. शारीरस्वातंत्र्य, मनः-स्वातंत्र्य आणि चैतन्यस्वातंत्र्य हेच आमच्या उपनिषदांचे मुख्य बुरूज आहेत.

जगांत अनेक धर्मशास्त्रें निर्माण झालेलीं आहेत; पण त्यांत पूर्ण मुक्तीचा मार्ग कोणींही दाखविला नाहीं. सलोपता, समीपता अथवा सरूपता यांपलीकडे कोणाचीही मजल गेली नाहीं. कैवल्य मुक्तीचा मार्ग उपनिषदांनीं मात्र दाखविला आहे. तरी यांचा आधार घेऊन सृष्टीनें घातलेल्या हद्दीचें उल्लंघन तुम्हीं खुशाल करा. आज अनेक प्रकारचें दौर्बल्य तुमच्या अंगीं आहे, पण उपनिषदांच्या आधारानें तुम्ही चाललां तर हें सारें दौर्बल्य नष्ट होईल, आणि आपण वास्तविक दुबळे कधींच नव्हतों असा अनुभव तुह्मांस येईल. आज तुम्हीं द्वैती अहां हें उघड आहे. तथापि असें असलें तरी त्याला आमचीं उपनिषदें हरकत घेत नाहींत. आत्मा स्वभावतःच परिपूर्ण आहे ही गोष्ट निःसंशय खरी असल्याचें आपण वारंवार सिद्ध केलें आहे. स्वभावतः परिपूर्ण असलेला आत्मा कर्मानुसार आकुंचित होऊन राहिला आहे, या मतांत श्रीरामानुज आणि अर्वाचीन काळांतले उत्क्रांतिवादी यांचें विलक्षण साम्य आहे, ही गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. परिपूर्ण आत्म्याच्या शक्तीचें आकुंचन होऊन त्या बीजरूप होतात, आणि याच बीजाला सत्कृत्यांचें पाणी मिळालें म्हणजे तींच रुजून त्यांचा मोठा वृक्ष होतो. सत्कृत्यें आणि सद्विचार या गोष्टी या बीजाचें पोषण करतात आणि त्याला मोड आणून वाढीस लावतात. अशा रीतीनें हें झाड वाढीस लागून शेवटीं पहिल्या पूर्ण दशेला येतें. अद्वैतवाद्यांचा जो थोडासा मतभेद या ठिकाणीं आहे, तो इतकाच कीं ही उत्क्रांति आत्म्याची नसून सृष्टीची आहे असें ते म्हणतात. उत्क्रमण अथवा अपक्रमण यांपैकीं कोणत्याही अवस्थेचा संपर्क आत्म्याला लागत नाहीं असें अद्वैतवाद्यांचें

म्हणणें आहे. माझ्यासमोर एक पडदा असून त्याला एक लहानसें छिद्र आहे असें समजा. अशा स्थितींत येथील मंडळीपैकीं कांहींचीं तोंडें मात्र मला दिसतील आणि बाकीचीं दिसणार नाहींत हें उघड आहे. आतां हेंच छिद्र हळूहळू मोठें होत गेलें तर अधिकाअधिक चेहरे मला दिसूं लागतील आणि अशा रितीनें सर्व पडदा नाहींसा झाला म्हणजे येथील सारे सभासद माझ्या दृष्टिपथांत येतील. अशा रीतीनें माझ्या दृष्टींत आणि तुमच्यांत मध्यें कांहींच अडथळा राहिलेला नाहीं. पूर्वीं मी तुम्हांस दिसत नव्हतों आणि तुम्हींही मला दिसत नव्हतां; आणि आतां एकमेकांस आपण दिसूं लागलों. यांत तुमच्यांत अथवा माझ्यांत कांहीं बदल झाला काय? तुमच्याआमच्यांत बदल झाल्यामुळें आपण एकमेकांस पाहूं लागलों असें झालें आहे काय? आरंभीं तुमचें रूप जें होतें तेंच आतांही आहे. बदल झाला तो तुमच्यांत झाला नसून मधल्या पडद्यांत झाला. अद्वैतवाद्यांच्या मतांतील मुद्दा अशा प्रकारचा आहे. सृष्टीची उत्क्रांति होते आणि तीबरोबरच आत्मा व्यक्तरूपाला येऊं लागतो. आत्मा आकुंचित असतो आणि मग तो विस्तार पावत जातो हें म्हणणें अद्वैतवाद्यांना मान्य नाहीं. आत्म्याला आकुंचित करूं शकेल असा कांहीं पदार्थच जगांत नाहीं. तो सर्वदा एकरूप आहे. त्याच्यांत कधींही बदल होत नाहीं. तो अनंत आहे. मग त्यांत बदल कसा आणि कशानें होणार? त्याच्यावर सृष्टीचा पडदा आरंभीं पडला होता. तो मायेच्या आवरणाखालीं गुप्त झाला होता. हें मायेचें आवरण जों जों कमी होत जातें, तों तों आत्म्याचें स्वरूप व्यक्त होऊं लागतें. आत्म्याचें मूळचें स्वाभाविक तेज कधीं नष्ट झालें नव्हतें अथवा कमीही झालें नव्हतें. मायेचा पडदा त्याजवर आल्यामुळें तें अदृश्य मात्र झालें होतें; आणि हा पडदा दूर होऊं लागतांच तें पुन्हां दिसूं लागलें. जों जों हा पडदा अधिक विरळ होत जाईल, तों तों तें अधिकाधिक दृश्यमान होऊं लागेल. हेंच मत आमच्या हिंदुस्थानापासून साऱ्या जगानें शिकलें पाहिजे. आज आपल्या सुधारणेच्या केवढयाही मोठ्या गप्पा त्यांनीं मारल्या आणि आज आपल्याच तोऱ्यांत ते कितीही गर्क होऊन राहिले असले, तरी अखेरीस हें मत आपलेंसें केल्यावांचून जगांतील कोणत्याही मानवसमाजाचा निभाव लागावयाचा नाहीं असें कबूल करणें त्यांस भाग पडेल. जगांतील सारेंच चक्र फिरूं लागलें

आहे, हें तुम्हांस आजसुद्धां दिसून येईल. पूर्वींचीं सारीं मतें हळूहळू विराम घावूं लागलीं आहेत. प्रत्येक वस्तु स्वभावतःच दुष्ट आहे असा समज प्राचीनकाळीं होता. शिक्षणपद्धतींत, न्यायपद्धतींत आणि वैद्यकांतसुद्धां हेंच मत पूर्वीं प्रचलित होतें. मनुष्याचें मन स्वभावतःच दुष्ट व अनीतीकडे धावणारें असून त्याला सुवृत्त करण्याकरितां शिक्षण द्यावयाचें असें पूर्वीं मानीत. त्याचप्रमाणें एखाद्या गुन्ह्याचा आरोप एखाद्यावर आला, तर आपला निरपराधीपणा त्याला शाबीत करावा लागे. तो अपराधी आहेच असें गृहीत धरून चालण्याची प्रवृत्ति पूर्वीं होती. शरीर हें मूळचेंच छप्पन रोगांचें माहेरघर असून औषधें देऊन सुदृढ करावयाचें असा वैद्यांचा समज होता. पण आतां हे सारे समज उलटे झाले आहेत हें आपण पाहत नाहीं काय ? आतांचा कायदा म्हणतो कीं शरीर हें स्वभावतःच सुदृढ असून त्याला झालेले रोग त्याचें तेंच बरें करीत असतें. औषधांचें काम फक्त या क्रियेला मदत करण्याचें आहे. हेंच फौजदारी कायद्याचें आदितत्त्व आहे. प्रत्येक आरोपी सुवृत्त असून गुन्हा शाबीत होईपर्यंत त्याला गुन्हेगार मानूं नये असें अर्वाचीन कायदा सांगतो. तुरुंगांतील कैद्यांना वागविण्याच्या पद्धतींतही असाच बदल आतां होऊं पहात आहे. मनुष्य कितीही अधोगतीला गेला असला, तरी त्याच्या ठिकाणींही ईश्वरांश आहे तो ओळखला पाहिजे, हें मत कैद्यांच्या बाबींतसुद्धां प्रचलित होत आहे. जुनीं मतें एकामागें एक कशीं नाहींशीं होत चाललीं आहेत हें यांवरून दिसेल. अत्यंत भयंकर गुन्हेगारांचीही नीतिमत्ता सुधारावी आणि त्यांनीं चांगलें व्हावें याकरितां त्यांना शिक्षण देणारे आश्रमसुद्धां स्थापन होऊं लागले आहेत. हा सारा बदल कशानें झाला ? सर्वांच्या अंतर्यामीं परमेश्वराचा वास आहे, या आमच्या आर्यमताचा हा विजय आहे. पाश्चात्य देश समजून अथवा न समजतां या मताचें ग्रहण करीत आहेत. या बाबींत पाश्चात्यांनीं आमचेंच शिष्यत्व पत्करलें पाहिजे. या साऱ्या वस्तूंच्या कार्यकारणभावाचा उलगडा आमच्या ग्रंथांत त्यांस सांपडेल. मनुष्यांतील परस्परांचे संबंध आजवर जसे चालत आले आहेत तसे यापुढें चालणार नाहींत. या संबंधांत आतां पूर्ण क्रांति व्हावयाची आहे. आतां साऱ्या जुन्या मतांनीं राम म्हणण्याची वेळ आली आहे. चालू (एकोणिसाव्या) शतकाच्या अंताबरोबर या साऱ्या जुन्या खोडांचाही अंत होईल. आज

माझ्या या मताबद्दल पाश्चात्त्य राष्ट्रांतून टीकेचा भडिमार मजवर होत आहे. जगांत पाप नाहीं हें माझें मत सैतानी आहे असेंही म्हणणारे लोक तिकडे पुष्कळ आहेत. ठीक आहे. पण निश्चयानें त्रिवार सांगतों कीं याच टीकाकारांचे वंशज मजवर स्तुतीचा वर्षाव करतील. मनुष्यप्राणी स्वभावतः पुण्यमय आहे हें लोकांस पटविणें हेंच माझें कार्य आहे. जगांत कोणीही पापी नाहीं, हाच संदेश मला जगाला सांगावयाचा आहे. अंधकाराच्या दूतापेक्षां प्रकाशाचा दूत म्हणवून घेण्यांत मला अधिक भूषण वाटतें.

हें विश्व बाह्यतः विस्कळित दिसत असलें तरी त्याच्या अंतर्यामीं पूर्ण एकतानता आहे, आणि एकाच ग्रंथींत तें पक्कें बांधलें गेलें आहे, हा आमचा दुसरा सिद्धांत पाश्चात्त्यांच्या गळीं उतरवावयाचा आहे. परस्परांपासून परस्परांचें भिन्नत्व दाखविणाऱ्या जुन्या रेषा आतां अंधुक होत असून थोड्याच काळांत त्यांचा मागमूसही उरावयाचा नाहीं, अशीं चिन्हें आतां स्पष्ट दिसत आहेत. वीज आणि वाफ हीं साधनें दूरदूरच्या टोकांस आतां एकमेकांजवळ आणीत आहेत आणि यामुळें दूरदूरच्या देशांतील माणसांचें दळणवळण वाढत आहे. आपल्या देशाच्या हद्दीच्या बाहेर भुताखेतांची आणि समंधांची वस्ती नाहीं, हें आपणास आतां अनुभवानें कळूं लागलें आहे. तसेंच युरोपाबाहेर फक्त नरभक्षक लोक राहतात, हा युरोपीयांचा समजही अगदीं खोटा आहे हें त्यांस कळूं लागलें आहे. आपला देश सोडून आपण परदेशांत प्रवेश केला म्हणजे तेथेंही आपल्याचसारख्या आपल्या बांधवांचा वास आहे असें आपणास आढळून येऊं लागतें. आपणास मदत करावयास तेथें शेंकडों हात पुढें सरतात. येथल्याप्रमाणेंच तेथेंही शेंकडों मुखें आपणांस आशीर्वाद देतात. फार काय पण आपल्या देशांत दृष्टीस पडावयाचीं नाहींत, अशीं परोपकारी माणसें तेथें आपणास आढळतात. त्याचप्रमाणें परकी लोक येथें आले म्हणजे येथेंही त्यांच्याच देशांतील बांधव त्यांना आढळतात. मनुष्यस्वभाव येथून तेथवर एकसारखाच आहे. मग कृत्रिम सरहद्दींनीं त्याच्यांत फरक कसा पडणार ?

आपलें अज्ञान हेंच आपल्या साऱ्या दुःखांचें मूळ आहे असें आपलीं उपनिषदें म्हणतात; आणि ही गोष्ट सर्वथा खरी आहे असा अनुभवही आप-

णास येतो. संसारांत काय किंवा परमार्थांत काय, अज्ञान हेंच आपल्या दुःखांचें मूळ आहे. केवळ अज्ञानामुळेंच एकमेकांचा द्वेष आपण करीत असतों. दोघांच्याही अंगीं सारखेंच अज्ञान असल्यामुळें, ते दोघे एकमेकांस जाणूं शकत नाहींत आणि यामुळेंच त्या दोघांत प्रेमभाव वसत नाहीं. परस्परांची बरोबर ओळख झाली कीं तेथें प्रेम उत्पन्न होतें, आणि असें होणें अपरिहार्यच आहे. आपण खरे वस्तुतः एकरूपच आहों. अज्ञानामुळें एकमेकांची ओळख विसरल्यानें प्रेमही नाहींसें झालें. पण ही ओळख पटतांच प्रेमही उद्भवावें हें योग्यच होय. अशा रीतीनें साऱ्या जगभर दळणवळण वाढत जाऊन ही गेलेली ओळख पुन्हां पटूं लागली आहे. एकीकडे राष्ट्राराष्ट्रांत तंटे सुरू असतां दुसरीकडे ही एकीकरणाची चळवळ अव्याहत सुरू आहे. राजकारण आणि सामाजिक बाबी यांचीही गोष्ट आज अशीच झाली आहे. जे प्रश्न पूर्वीं एखाद्याच राष्ट्राच्या हिताहिताच्या दृष्टीनें सोडवावयाचे असत, तेच प्रश्न आतां आंतरराष्ट्रीय होऊन बसले आहेत. एखाद्या राष्ट्रांतील राजकारणाच्या बाबींची वासलात लावतांना इतर राष्ट्रें काय म्हणतील आणि आपल्या कृतीचा परिणाम इतर राष्ट्रांवर काय होईल, याचा विचार त्या राष्ट्राला आतां करावा लागतो. पूर्वींच्या प्रश्नांनीं आपलें एकदेशित्व सोडलें असून ते आतां जगद्व्यापी होऊन बसले आहेत. जगांतील सर्व राष्ट्रांच्या सल्ल्याशिवाय त्यांचा समाधानकारक निकाल लागणें मुष्किलीचें झालें आहे. सर्व राष्ट्रीय कायदे, सर्व राष्ट्रांची जूट, सर्व राष्ट्रांची संघटना या शब्दांचा उच्चार आतां जागोजाग होऊं लागला आहे. मनुष्यजाति वस्तुतः एकरूप आहे, हेंच या साऱ्या चळवळीचें रहस्य आहे. भौतिक शास्त्रेंही या वस्तुजातासंबंधीं अधिक उदार होत चाललीं आहेत. या साऱ्या विविधतेच्या पोटांत कोठेंतरी एकतानता असावी असें त्यांस आतां वाटूं लागलें आहे. हें सारें विश्व म्हणजे एकच जड वस्तु असून तुम्ही, मी, चंद्र, सूर्य, तारे आणि बाकीचे सारे पदार्थ हे त्या एकाच प्रचंड जड वस्तूच्या लहान लहान विभागांप्रमाणें आहों. या अफाट जड समुद्रावर तुम्ही आम्ही लहान लहान तरंगांसारखे चलनवलन करीत आहों. ही जड सृष्टि सोडून मानसिक सृष्टीकडे आपण वळलों तरी तेथें हाच प्रकार आहे. आपले विचार म्हणजे विश्वविचारसागरावरील तरंग होत. त्याचप्रमाणें आपलीं चैतन्यरूपें हींसुद्धां त्या आत्मसमु-

द्रावरील तरंगांसारखीं आहेत. या आत्मसमुद्राचें स्वरूप अखंड आहे. तें कधीं बदलत नाहीं. तें कधीं लहानमोठें होत नाहीं. तें सर्वदा एकरूप असतें.

अहो, मुलांना नैतिक शिक्षण द्या अशी ओरड अलीकडे सर्वत्र ऐकूं येते. पण नीतीचा मूळ झरा आमच्या जुन्या ग्रंथांत आहे, याचा विचार कोणीच करीत नाहीं. या मूळ झऱ्याचें पाणी पिण्यासाठीं सारें जग आज उत्सुक होऊन बसलें आहे. त्याची अतिशय तहान त्याला लागली आहे. ही तहान त्याला भागवावयाची असेल, तर आमच्या उपनिषदांकडेच त्यानें धांव घेतली पाहिजे.

आतां आम्हां हिंदी लोकांस कशाची जरूर आहे, याचाही विचार करणें भाग आहे. आपणालाही याच गोष्टीची वास्तविक जरूर आहे. परकीयांना ही जरूर एकपट असेल, तर आम्हाला त्यांची जरूर शतपट अधिक आहे. उपनिषदें म्हणजे जीवनदायी अमृताचा सागर आहे. आमचे पूर्वज महान् ऋषी होते असा अभिमान आम्ही वाहतों. या साऱ्या गोष्टी अगदीं खऱ्या आहेत. तथापि इतरांच्या मानानें पाहतां सांप्रत आपण दुबळे—फारच दुबळे आहोंत हें तुमच्या तोंडावर स्पष्टपणें तुम्हांस मला सांगितलें पाहिजे. आधीं आमचें शरीरबळ इतरांच्या मानानें कमी. या शरीरदौर्बल्यामुळेंच अनेक दुःखें आपणावर कोसळतात. आपणांस भोगाव्या लागणाऱ्या यातनांपैकीं किमानपक्ष तिसरा हिस्सा तरी याच दुबळेपणामुळें उत्पन्न झालेला आहे. शरिराच्या दुबळेपणानें अंगांत आळस भरतो. काम करण्याची हुरूप राहत नाहीं. मग मन दुबळें होऊं लागतें. चार माणसेंसुद्धां सुखानें एकत्र नांदेनाशीं होतात. मग मोठ्या संघाची आणि संघटनात्मक कार्याची गोष्ट कशाला बोलावी ? कोणाला कोणाबद्दल आदर अथवा प्रेम नाहीं. आपण शुद्ध स्वार्थाचे पुतळे बनलों आहों. एखाद्या कार्यासाठीं तीन माणसें जरी एकत्र जमलीं तरी आरंभापासूनच परस्परांचा द्वेष तीं करीत असतात. त्यांपैकीं प्रत्येकाला सगळा लाडू हवा असतो; इतकेंच नाहीं तर दुसऱ्याला भाकरीचा तुकडाही मिळूं नये अशी त्याची इच्छा असते. मग परस्पर मत्सराला काय तोटा ? आज आम्ही अशा प्रकारच्या स्थितींत पडलों आहों. कसल्याही प्रकारची संघटना नसलेल्या बाजारबुणग्यासारखी आपली स्थिति आहे. फाटाफूट झालेल्या असल्या घोळक्यांत संघशक्ति कधीं काळीं उत्पन्न होईल अशी

आशाही आजच्या स्थितींत दिसत नाहीं. यांच्यांतल्या प्रत्येकांत स्वार्थ भरलेला आहे; मग यांचा संघ बनणार कसा ? आपापल्या स्वार्थासाठीं प्रत्येकानें दुसऱ्याशीं लढावें असा प्रकार आज शतकानुशतकें चालू आहे. गंध आडवें लावावें कीं उभें लावावें असल्या जाड्या विषयांवर कडाक्याचे वाद अजूनही चालतात ! कोणाची नजर पडली असतां अन्न विटाळतें हें सिद्ध करण्यासाठीं बैलाच्या ओझ्याचे ग्रंथ लिहिणारे बहाद्दर आजही आहेत ! गेलीं कित्येक शतकें आमचा धंदा म्हटला तर हाच. असल्या प्रकारचे बडे शोध लावण्यांत आणि त्याच दर्जाचे कूट प्रश्न सोडविण्यांत ज्यांच्या मेंदूची सर्व शक्ति खर्च होते असल्या नरवीरांपासून अधिक कशाची अपेक्षा आम्हीं करावी ? असल्या प्रकारच्या गोष्टी करण्यांत आयुष्याची इति कर्तव्यता आहे असें समजणें लाजिरवाणें नाहीं काय ? होय. असल्या प्रकाराबद्दल आम्हांस कधीं कधीं लाज वाटते खरी. पण ती वाटून उपयोग काय ? या वस्तूंची मगरमिठी आमच्यानें सोडवत नाहीं. आम्हांला पुष्कळ गोष्टी कराव्याशा वाटतात; पण एकही आमच्या हातून होत मात्र नाहीं. कांहीं करण्याचे नुसते मनसुबे करावे आणि हातानें कांहींच करूं नये अशी संवयच आम्हांस लागून गेली आहे. आपण तोंडानें काय बडबडतों याचा अर्थ पोपटाला जसा कळत नाहीं, त्याचप्रमाणें आम्हांलाही जणूं काय आमच्या बडबडीचा अर्थ कळत नाहीं. असल्या परिस्थितीचें कारण काय ? आमचें शरीरदौर्बल्य हेंच. असल्या दुबळ्या मेंदूंत कर्तृत्वाची जाणीव उत्पन्नच होत नाहीं. याकरितां शरीरबळाकडे आपण आधीं लक्ष्य दिलें पाहिजे. आमच्या तरुणांनीं आधीं सुदृढ बनलें पाहिजे. धर्म वगैरे बाकीच्या साऱ्या गोष्टी मग सावकाश पाहतां येतील. माझ्या तरुण मित्रांनो, आधीं तुम्ही सारे भीम बना. तुम्हांला माझा पहिला उपदेश हाच आहे. गीतेच्या अभ्यासापेक्षां फुटबालच्या खेळानें कैवल्यधामाचा रस्ता आम्हांस अधिक सुलभ होईल. माझे हे शब्द फाजील धाष्टर्याचे आहेत; पण मी तरी काय करूं ? तुमच्यावरील माझें प्रेम हे शब्द माझ्या तोंडून वदवितें. गीतेचा खरा अर्थ तुमच्या मनगटाची रुंद कांब तुम्हांस अधिक चांगला समजावून देईल. तुमचे दंड पिळदार होऊन भरपूर रक्त तुमच्या नाड्यांतून सळसळूं लागलें म्हणजे भगवान् श्रीकृष्णाच्या प्रचंड शक्तीची आणि अगाध बुद्धिमत्तेची खरी साक्ष

तुम्हांस पटेल. चालतांना भूमीलाही नमविण्याचें सामर्थ्य तुमच्या तंगड्यांत आलें म्हणजे उपनिषदांचा अर्थ तुम्हांस अधिक चांगला कळूं लागेल. या सर्व गोष्टी होण्यास तुमच्या अंगीं आधीं पौरुष खेळलें पाहिजे. आमच्या गरजा काय आहेत याचा विचार आधीं करून मग पुढील मार्गाची तरतूद आपणास लावावयाची आहे.

मी वेदान्ताचा उपदेश करतों म्हणून कित्येक लोक माझा तिरस्कार करीत असतात. द्वैत, अद्वैत अथवा दुसरें कोणतेंही मत लोकांस सांगण्याची माझी इच्छा नाहीं. एखाद्या विशिष्ट मताचा प्रसार करावा अथवा एखादें मत खोडून काढावें, असा हेतु माझ्या मनांत कधींच नव्हता. आत्मा सच्चिदानंरूप आहे एवढेंच मला सर्वांस सांगावयाचें आहे; आणि वास्तविक पाहतां सध्याच्या काळीं एवढयाच धर्माची जरूर आपणांस आहे. मला एखादें मूल असतें तर 'तत्त्वमसि' हें सूत्र त्याच्या जन्मापासून त्याच्या कानांत मी ओरडत राहिलों असतों. राणी मदालसेची कथा पुराणांत तुम्हीं वाचली असेलच. आपलें तान्हें मूल पाळण्यांत घालून ती हालवीत असतां, 'तूं पवित्र, निष्कलंक, सर्वशक्तिमान् आहेस' अशा अर्थाचें गीत ती म्हणत असे. या कथेंत फार तात्पर्य भरलेलें आहे. 'अहं ब्रह्मास्मि' असें चिंतन मनःपूर्वक तुम्हीं केलें तर तुम्ही खरोखरच ब्रह्मरूप व्हाल. साऱ्या जगभर मी फिरलों आणि अनुभव घेतला तो हाच. मनुष्यप्राणी पापी आहे असें पाश्चात्य लोक तोंडानें म्हणोत; पण तशी त्यांची श्रद्धा मात्र खास नाहीं. आपण पापी आहों असें इंग्रज लोकांस मनापासून वाटलें असतें, तर त्यांची योग्यता मध्य आफ्रिकेंतील शिद्यांहून अधिक असतीना. त्यांचा तसा विश्वास नाहीं ही परमेश्वराची त्यांजवर मोठी कृपाच होय. आपण पापी, आपण क्षुद्र असें इंग्रज लोकांस स्वप्नांतही वाटत नाहीं; एवढेंच नव्हे, तर उलट आपण जगाचे धनी आहों असें त्यांना वाटतें. जगाचें धनीपण जन्मादारभ्यच आपणास प्राप्त झालें आहे, अशी त्यांची भावना आहे. 'कर्तुमकर्तुम्' शक्ति आपल्या अंगीं असून, वाटेल तशी जगाची घडामोड आपण करूं शकूं असें त्यांस वाटतें. उद्यां चंद्रसूर्यांवर जाण्याची इच्छा झाली तरी तेंसुद्धां आपण करूं असा त्यांचा विश्वास आहे. या श्रद्धेमुळेंच इंग्रजांचें राष्ट्र आज मोठें बनलें आहे. मनुष्यप्राणी दुबळा आणि पापी आहे असें ख्रिस्ती धर्मोपदेशक

त्यांना सांगत असतात. उपाध्यायांच्या या वचनावर इंग्रज लोकांनीं खरोखर विश्वास ठेवला असता, तर आजची त्यांची स्थिति त्यांना कधींही प्राप्त झाली नसती. युरोपांतील इतर देशांची स्थितिही अशीच आहे. ख्रिस्ती उपदेशक अनेक प्रकारच्या भोळया गोष्टी त्यांना सांगत असतात. तथापि त्यांचे श्रोते आपल्या मनावर असल्या भाकडकथांचा परिणाम मुळींच होऊं देत नाहींत, आणि आपलें ईश्वरत्वही ते कधीं विसरत नाहींत. हें ईश्वरत्व त्यांच्या ठिकाणीं अद्यापि जिवंत आहे आणि आपल्या जिवंतपणाची साक्षही तें पटवितें. आपली स्थिति याच्या उलट आहे. आपली आत्मश्रद्धा नाहींशी झाली आहे. माझें म्हणणें तुम्हांला कदाचित् खोटें वाटेल, पण मी निश्चयानें सांगतों कीं इंग्रजांपेक्षां आपला आत्मविश्वास फारच हलक्या प्रतीचा आहे. या बाबींत इंग्रज लोक आपणांहून हजार पटीनें अधिक श्रेष्ठ आहेत. माझे हे शब्द तुम्हांस कडू लागत असतील; पण काय करावें, खरें आहे तें मला बोललेंच पाहिजे. इंग्रज लोकांत धैर्य किती आहे, याचा प्रत्यय आपणांस नेहमीं येत नाहीं काय ? आपलीं धर्मतत्त्वें एखाद्या इंग्रजांला पटलीं कीं त्यांचा प्रसार करण्याचें वेडच जणूं काय त्यांना लागतें. आपलें घरदार सोडून ते येथें येतात आणि आमच्याच तत्त्वांचा उपदेश आम्हांस करूं लागतात. या त्यांच्या कृतीबद्दल त्यांच्या देशबांधवांनीं त्यांची टर उडविली तरी तिकडे ते लक्ष्य देत नाहींत. तुमच्यापैकीं किती जणांच्या हातून असें काम होईल ? असली कामगिरी उचलणारा मनुष्य तुमच्यांत सहसा मिळावयाचा नाहीं. असें कां ? काय, तुमचीं धर्मतत्त्वें तुम्हांस अवगत नाहींत ? या बाबींत तुमचें ज्ञान त्यांच्याहून खास अधिक आहे. किंबहुना, तुमचें फाजील शहाणपणच तुम्हांस नडतें. वाजवीहून अधिक शहाणे तुम्ही आहां हेंच तुमचें मोठें दुर्दैव आहे. याचें कारण हेंच कीं तुमचें रक्त पाण्यासारखें पातळ आहे. तुमचा मेंदू शिथिल झाला आहे आणि तुमचा देह अशक्त आहे. यांत आतां तुम्ही बदल केला पाहिजे. दुबळ्या देहामुळेंच सांप्रतचे कष्ट तुम्ही भोगीत आहां. तुमच्या साऱ्या अधोगतीचें कारण तुमचें देहदौर्बल्य हें एकच आहे. सुधारणांच्या गोष्टी तुम्ही तोंडानें सांगतां. आमचें ध्येय अमुक आहे अशी बडबड तुम्ही करतां. गेलीं शंभर वर्षें बडबडीवांचून दुसरें कांहींच तुम्हीं केलें नाहीं. कृतीची वेळ आली तेव्हां तुम्हीं अशी

दडी दिली कीं तुमचा शोधच कोठें लागेना. आपल्या अशा कृतींनीं साऱ्या जगभर तुम्हीं आपली छीःथू करून घेतली आहे. सुधारणा या शब्दाचा अर्थ-सुद्धां तुम्हीं नाहींसा करून टाकला. असें कां व्हावें ? याचें कारण तुमच्या लक्ष्यांत येत नाहीं काय ? या गोष्टी तुम्हांस समजत नाहींत असें नाहीं. यांतील कार्यकारणभाव तुम्हांस चांगला समजतो. आपलें दौर्बल्य आपणांस जेथें तेथें नडतें. तुमचें शरीर अशक्त आणि मनही अशक्त. आत्मश्रद्धा कशी ती तुम्हांस ठाऊकच नाहीं. गेलीं कित्येक शतकें चालीरीतींच्या, जातिभेदाच्या, राजांच्या आणि परकीयांच्या अंमलाखालीं तुम्ही निःसत्व बनून गेलां आहां. माझ्या बंधूंनो, तुमच्याच जातभाईंनीं तुमचें सत्वहरण केलें आहे. तुमच्या पाठीचा कणाच मोडून गेला आहे. पायाखालीं सरपटणाऱ्या किडयांच्या पंक्तीला तुम्ही गेलेले आहां. तुम्हांला सामर्थ्याची देणगी कोण देणार ? मी तुम्हांला पुनःपुन्हां हेंच सांगतों कीं बाबांनो, सुदृढ व्हा. आज आपणाला जर कोणत्या वस्तूची जरूर असेल तर ती शक्तीचीच आहे; आणि हें साधण्याकरितां 'अहं ब्रम्हास्मि' या मंत्राचा जप ही पहिली पायरी आहे. उपनिषदांचा अभ्यास करून हेंच तत्व प्रथम मुखोद्गत करा. "मला शस्त्र कापूं शकत नाहीं, अग्नि जाळूं शकत नाहीं, वायू शोषूं शकत नाहीं; मी सर्वशक्ति आहें." या मंगलमय मंत्राचा जप नित्य नित्य करीत जा. हाच तुमचा तारक मंत्र आहे. "मी दुर्बल, माझ्यानें काय होणार ?" अशीं अक्षरेंसुद्धां तोंडावाटे कधीं काढूं नका. 'कर्तुमकर्तुम् अन्यथा कर्तुं' असें माझें सामर्थ्य आहे असें म्हणत जा. आपणाला करण्यास अशक्य असें या जगांत काय आहे ? वाटेल ती गोष्ट आपण करूं. आत्मा सर्वशक्तिमान् आहे. पण या गोष्टीचा विसर आपणांस पडला आहे. आतां ही गेलेली श्रद्धा पुन्हां परत आणली पाहिजे. नाचिकेताची कथा ध्यानांत आणा. बापानें यज्ञ केला तेव्हां नाचिकेताची श्रद्धा जागृत झाली. याच श्रद्धेची प्राप्ति आपणांपैकीं प्रत्येकास प्राप्त झाली तर काय बहार होईल ! तुमच्यापैकीं प्रत्येक जण उठेल आणि जग हालवून सोडील. तुमचें अनंत परमात्मरूप व्यक्तदशेला येईल. असें व्हावें इतकीच माझी इच्छा आहे. हें सामर्थ्य आणि ही श्रद्धा या वस्तू उपनिषदांपासून तुह्मांस प्राप्त होणाऱ्या आहेत.

पण इतके दिवस ही विद्या केवल संन्याशांच्या हातीं राहिली होती. हें मोठें रहस्य त्यांनीं गुप्त राखिलें. हें रहस्य उराशीं बाळगून ते अरण्यांत दडी देत.

श्रीशंकराचार्यांनीं याहून थोडें अधिक औदार्य दाखविलें. उपनिषदांचा अभ्यास गृहस्थांनींही करावा अशी अनुज्ञा त्यांनीं दिली. या अभ्यासानें त्यांचें नुकसान न होतां थोडाबहुत फायदा होईल असा आचार्यांचा आशय होता. पण अद्यापिही या बाबींत पुष्कळ गैरसमज पसरला आहे. हे ग्रंथ केवळ अरण्यवासी जनांच्या मात्र उपयोगी आहेत असें पुष्कळांस वाटतें. उपनिषद्ग्रंथांचें खरें रहस्य तुम्हांस पाहावयाचें असेल, तर तें एकाच जागीं तुम्हांस सांपडेल. वेद निर्माण होण्यास ज्यापासून स्फूर्ति मिळाली त्याच भगवान् श्रीकृष्णानें गीताग्रंथांत या साऱ्या रहस्याचें उद्घाटन स्वतः केलें आहे. श्रुतींवरील उत्तमोत्तम टीका म्हटली म्हणजे हीच. तुम्ही कोणत्याही धंद्यांत पडलेले असा, अथवा समाजांत तुमची कोणतीही पायरी असो, गीतेच्या द्वारें हें रहस्य तुम्हास हस्तगत करून घेतां येईल. अमुक एका व्यक्तीला येथें अधिकार नाहीं असें नाहीं. वेदान्ताचे हे सिद्धांत आतां व्यवहारांत दिसूं लागले पाहिजेत. आतां आपला अरण्यवास संपवून त्यांनीं संसारांत आलें पाहिजे. गुहा सोडून घरांचा आश्रय त्यांनीं आतां केला पाहिजे. जगांतील एखाद्या विशिष्ट परिस्थितींत गुंतून न राहतां त्यांनीं सर्वत्र पसरलें पाहिजे. विद्यार्थ्यांच्या शालागृहांत, कोळ्यांच्या घरांत, गरिबांच्या झोंपड्यांत, श्रीमंतांच्या राजमहालांत, वकिलांच्या कोठडींत आणि बड्या न्यायाधीश साहेबांच्या अंतर्गृहांत त्यांनीं आतां प्रवेश केला पाहिजे. कथापुराणांतूनही त्यांनीं शिरलें पाहिजे. प्रत्येक पुरुषाला, स्त्रीला आणि मुलालासुद्धां त्यांनीं आपापलें कर्तव्य शिकविलें पाहिजे. कोणी कोणत्याही परिस्थितींत असो, त्याची कर्तव्याची जाणीव त्यांनीं त्याला करून दिली पाहिजे.

वेदान्ताचा अभ्यास सर्रास सुरू झाला, तर समाजाची घडी बिघडेल अशी धास्ती पुष्कळांस वाटते. पण अशी भीति वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. कोणी उपनिषदांचा अभ्यास सुरू केला म्हणून आपल्या कक्षेच्या बाहेर त्याला उडी मारतां येते असें नाहीं. एखाद्या मासेविक्यानें वेदान्त वाचला म्हणून आपला धंदा सोडून तो गिरिकंदरांत जाईल ही भीति अस्थानीं आहे. धर्मानें अनंत मार्ग दाखविले आहेत. हे सारे रस्ते सोडून त्याहून एखादा वांकडा मार्ग कोणी नवाच काढील, अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. मार्ग कोणताही असो, त्याचें मनःपूर्वक आचरण तुम्हीं केलें, तर तोच तुम्हांस

कल्याणप्रद होईल. मनापासून केलेलें अगदीं थोडें धर्माचरणही कितीतरी हितकर होतें. ‘स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।’ या गीतावचनाचें रहस्य हेंच आहे. याकरितां प्रत्येकानें आपल्याकडून होईल तितका या धर्मांचा अंश सांठवावा. आपणाकडून महत्कार्य होत नाहीं ह्मणून हात जोडून स्वस्थ बसूं नये. ‘शिवोऽहम्’ असा जप एखाद्या मासेविक्यानें केला तर तो अधिक चांगला मासेविक्या होईल; आणि हाच जप एखाद्या विद्यार्थ्यानें केला तर तो अधिक चांगला विद्यार्थी होईल. हाच न्याय सर्वत्र लागू पडतो. कोणी कोणत्याही परिस्थितींतील मनुष्य असला तरी यामुळें त्याची स्थिति न बिघडतां ती अधिक चांगली होईल.

आतां अशा रीतीनें सर्वच वेदान्ती झाले तर ज्ञातिबंधनें तुटून सबगोलंकार होईल, अशी धास्ती कोणास वाटत असेल तर ती अस्थानीं आहे. यामुळें जातिभेद नाहींसा न होतां तो अधिक बळकट आणि अधिक व्यवस्थित होईल; कारण लहान लहान समाज करून राहावें हा मनुष्याचा स्वभावच आहे. आतां इतकी गोष्ट मात्र खरी कीं सांप्रत कांहीं जातींना जे विशिष्ट हक्क आहेत ते नष्ट होतील; आणि असे विशिष्ट हक्क नष्ट होण्यानें जनसमाजाचें कांहीं नुकसान होणार नाहीं. जातिभेद स्वभावसिद्ध आहे म्हणूनच ‘चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म विभागशः’ असें भगवान् श्रीकृष्णांनीं म्हटलें आहे. जातिभेद समाजाच्या वाढीला पोषक आहे. तो तिचा विघातक नाहीं. एखादें काम माझ्या हातून चांगलें होईल, तर तुमच्या हातून दुसरें एखादें काम चांगलें होईल. तुमचें काम माझ्यानें चांगलें होणार नाहीं आणि माझें काम तुम्हांस चांगलेंसें साधणार नाहीं. देशाचा राज्यकारभार शिस्तवार करण्याची विद्या तुम्हांस अवगत असेल; आणि जुन्या जोडयांना ठिगळें लावण्याची विद्या मला येत असेल. अशा स्थितींत मला राज्याधिकार दिला आणि तुम्हांस जोडे शिवावयास लावलें तर तें योग्य होईल काय? मी जोडे शिवींत असलों आणि तुम्ही वेद पढण्यांत हुशार असलां तर तेवढयामुळें माझ्या मस्तकावर पाय देण्याचा अधिकार तुम्हांस प्राप्त होतो काय? ब्राह्मणानें खून केला तरी तो त्याला माफ आणि शूद्रानें एखादी चोरी केली तर त्याला सुळाची शिक्षा हा न्याय कोठला? असले विशिष्ट हक्क नाहींसे होणें हेंच आपल्या साऱ्यांच्या हिताचें आहे. जातिभेद नष्ट होणें चांगलें नाहीं; कारण तो स्व-

भावजन्य आणि समाजाच्या वाढीला पोषक आहे. समाजरचनेंतील घोंटाळे नाहींसे करून त्याला व्यवस्थित रूप देण्याचें कार्य जातिभेद करतो. समाजाची घटना सुयंत्रित चालण्याचें अगदीं स्वभावसिद्ध साधन जातिभेद हेंच आहे. याशिवाय इतकें सोपें दुसरें साधन आपणास उपलब्ध नाहीं. कांहीं झालें तरी लहान लहान जमाव करून राहणें ही मनुष्याची उपजत बुद्धि आहे आणि ती नाहींशी करणें तुम्हांस कधींच शक्य नाहीं. पण असें असलें तरी कांहीं जातींस त्यामुळें विशिष्ट हक्क प्राप्त होतात असा अर्थ नाहीं. असे हक्क प्राप्त होणें ही स्वभावसिद्ध घटना नव्हे; ती कृत्रिम रचना आहे. याकरितां असल्या हक्कांचा कपाळमोक्षच केला पाहिजे. कोळ्याला तुम्हीं वेद पढविले तर सर्वांचें मनुष्यत्व एकाच योग्यतेचें आहे ही गोष्ट त्याच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. एक मासेविक्या असला आणि दुसरा मोठा तत्त्ववेत्ता झाला तरी दोघांतील मनुष्यत्वाचा सामान्य धर्म एकच आहे असें तो म्हणूं लागेल. दोघांच्याही ठिकाणीं एकाच परमात्म्याचा वास आहे असें तो सांगेल. असें झालें म्हणजे सांप्रतचे विशिष्ट हक्क आपोआपच संपुष्टांत येतील. असें होणें हें आपणांस इष्टच आहे. कारण त्यामुळें सर्वांस सारखीच संधि मिळेल. सर्वांच्या अंतर्यामीं एकाच परमेश्वराचा वास आहे ही गोष्ट सर्वांस पटली म्हणजे प्रत्येकजण आपापल्यापरी आपल्या उन्नतीचा मार्ग शोधून काढील.

स्वतंत्रतेशिवाय वाढ नाहीं. पूर्ण स्वातंत्र्यावांचून कोणत्याही वस्तूची वाढ होऊं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें प्रत्येक वस्तूची उत्क्रांति अंतरंगांतूनच व्हावयास पाहिजे. कोणी कोणाची वाढ करूं शकत नाहीं. मी अमक्या एकाची वाढ करीन असें कोणासही म्हणतां यावयाचें नाहीं. एकानें दिली आणि दुसऱ्यानें घेतली अशी ही वस्तूच नव्हे. "आत्मैवह्यात्मनो बंधुः" हा सिद्धांत प्रत्येकानें ध्यानांत ठेवला पाहिजे. प्रत्येक स्त्रीची, पुरुषाची आणि मुलाची उन्नति ज्याची त्याजवर अवलंबून आहे. विधवांची स्थिति आणि सामान्यतः स्त्रीवर्गाची उन्नति यांजबद्दल अनेकवार अनेक प्रकारचे प्रश्न लोक मला विचारीत असतात. या बाबतींत माझें मत काय आहे हें जाणून घेण्याची इच्छा पुष्कळांस दिसते. याकरितां याचें उत्तर एकदाचें देऊन टाकावें हें बरें. लोकांच्या या प्रश्नावर उत्तरादाखल मी उलट एक प्रश्न असा विचारतों कीं

मी काय विधवा आहें ? मला विधवा समजून असे मूर्खपणाचे प्रश्न तुम्ही मला विचारतां काय ? कीं मी स्त्री आहें म्हणून त्यांच्या उन्नतीबद्दल मला विचारतां ? हा प्रश्न स्त्रियांचा आहे आणि याचें उत्तर त्याच देतील. आपापल्या अडचणींची वासलात ज्याची त्यानेंच लावली पाहिजे. स्त्रियांच्या बऱ्यावाइटाचा विचार करणारे तुम्ही डुड्ढाचार्य कोण ? जगांतील प्रत्येक विधवेवर आणि स्त्रीवर वाटेल ती सत्ता चालविण्यास तुम्ही काय सर्वसत्ताधीश परमेश्वर आहां ? हा नाद आतां तुम्ही सोडून द्या इतकेंच मी तुम्हांस सांगतों. आपल्या बऱ्यावाइटाचा मार्ग त्याच शोधून काढतील. अरे जुलमी सुलतानांनो, कोणाचेंही बरें वाईट करणें आपल्या हातीं आहे या भ्रमानें तुम्हांस पछाडलें आहे ! आतां हा भ्रम तुम्ही प्रथम झुगारून देऊन दूर व्हा पाहूं. स्त्रियांच्या बऱ्यावाइटाची चिंता तुम्हांस नको. त्यांची चिंता करण्यास त्या स्वतःच समर्थ आहेत, आणि सर्वांची चिंता परमेश्वरास आहे. त्याची कृपादृष्टि सर्वांवर सारखीच असते. सर्वांचा मार्गदर्शक तोच आहे. आपण सर्वज्ञ आहों अशी घमेंड बाळगणारे तुम्ही कोण ? प्रत्येक जीवात्मा परमात्म्याचा अंश आहे हें तुम्हांस ठाऊक नाहीं काय ? ज्या अर्थी परमेश्वराहून आपणांस अधिक सत्ता आहे असें समजण्याचें धाष्टर्य तुमच्या अंगीं आहे, त्या अर्थी ईश्वरद्रोही हाच किताब तुम्हांस दिला पाहिजे. तुम्ही आपल्यापुरता विचार करा. स्वतःच्या बऱ्यावाईट कर्मापलीकडे पाहण्याचें कारण तुम्हांस नाहीं. तुमच्या स्वतःच्या कर्तबगारीला पुरून उरेल इतका प्राचीनकर्माचा सांठा तुमच्यापाशीं आहे, त्याची वासलात अगोदर लावा. लोकांच्या स्तुतीला भुलून या भलत्याच फंदांत यापुढें पडूं नका. लोकांना काय, अमका मोठा समाजसुधारक म्हणून त्याला देव्हाऱ्यांत बसवतील, महर्षि म्हणून स्तुतिस्तोत्रांचा वर्षाव त्याजवर करतील, आणि या स्तुतीच्या निनादानें आकाशसुद्धां भरून सोडतील. शेंकडों मूर्ख तुमची आरती करण्यास सिद्ध होतील; पण ध्यानांत ठेवा कीं तो सर्वसाक्षी क्षणभरही झोंपीं जात नाहीं; आणि आजच्या या स्तुतिस्तोत्रांची सव्याज भरपाई येथें अथवा इतउत्तर केल्यावांचून तो राहणार नाहीं.

'जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत' ही आज्ञा सदैव लक्ष्यांत बाळगा. कोणाचें आपण बरें वाईट करूं शकूं अथवा कोणाला मदत करूं

शकूं ही कल्पनाच खोटी आहे. फार झालें तर आपण कोणाची सेवा करूं शकूं. परमेश्वराच्या लेंकरांची सेवा तुम्ही करा; अथवा तितका हक्क तुम्हांला प्राप्त झाला असेल तर प्रत्यक्ष परमेश्वराचीच सेवा करा. आपल्या एखाद्या लेंकराच्या उपयोगी तुम्हीं पडावें एवढी कृपा त्यानें तुम्हांवर केली असेल, तर तुमचें जीवित सार्थ होय ! तुम्ही धन्य आहां, पुण्यवान् अहां असें म्हटलें पाहिजे. स्वतःच्या बडेजावकीच्या खोट्या कल्पनांनीं व्यर्थ फुगून जाऊं नका. सामान्य माणसांस प्राप्त न होणारा सेवेचा हक्क तुम्हांस मोठ्या भाग्यानें प्राप्त झाला आहे. याकरितां या हक्काचा उपयोग करून परमेश्वराचें पूजनही त्याचद्वारें तुम्ही साधाल. वस्तुमात्राच्या ठिकाणीं परमात्मरूप मीं पाहावें आणि त्याचें पूजन करावें हा मुक्ति मिळविण्याचा सोपा मार्ग होय. जगांतील दरिद्री आणि दुःखी कष्टी लोक आमच्या मुक्तीकरितांच आहेत. भगवंताचें पूजन आम्हांस करतां यावें म्हणून तोच रोगग्रस्तांच्या रूपानें, वेड्यापिशांच्या रूपानें, रक्तपित्यांच्या रूपानें आणि भयंकर पातक्यांच्या रूपानेंही अवतार घेतो ! माझे हे शब्द तुम्हांस धाष्टर्याचे वाटत असतील, पण पुनःपुन्हां मी हेंच म्हणतों कीं, अवघें विश्व परमात्मरूप दिसूं लागणें ही आपल्या जीवनसौख्याची परमावधि होय. विश्वांतील या विविधरूपांनीं परमेश्वर नटला आहे असें दिसलें म्हणजे दृश्यापलीकडे आपण जातों आणि मग पाहावयाचें असें कांहीं उरतच नाहीं. दुसऱ्यांवर सत्ता चालवून आणि त्यांना मोठ्या बंदोबस्तानें आपल्या ताब्यांत ठेवून त्यांचें कल्याण आपण करूं शकूं ही कल्पना तुम्ही प्रथम टाकून द्या. एखाद्या झाडाला वाढीला लावावयाचें असलें तर त्याला खतपाणी घालणें आणि योग्य हवेच्या जागीं त्याची योजना करणें इतकेंच आपल्या हातीं आहे. यांपैकीं त्याला जरूर असतील त्या वस्तू घेऊन आणि त्या पचवून तें स्वभावतःच वाढूं लागतें. त्याची वाढ करणें तुमच्या हातीं नसून फक्त अनुकूल परिस्थिति त्याला निर्माण करून देणें एवढेंच तुम्ही करूं शकतां. हाच न्याय माणसांसही लागू आहे.

जेवढा प्रकाश तुमच्यानें जगांत आणवेल तेवढा आणा. या प्रकाशाची प्राप्ति प्रत्येकास करून द्या. अशी प्राप्ति प्रत्येकाला होईपर्यंत आपलें कर्तव्य संपत नाहीं. या प्रकाशाची जरूर दरिद्याला आहे आणि श्रीमंतालाही आहे. किंबहुना, गरीबापेक्षां श्रीमंतालाच ही गरज अधिक आहे ! अज्ञ मनुष्याला

ही गरज आहेच, पण सुशिक्षितांना ती त्याच्याहून अधिक आहे ! कारण, आमच्या अर्वाचीन शिक्षणपद्धतीनें सुशिक्षितांच्या अंगीं जी ज्ञानाची सूज येते तिचें स्वरूप फारच भयंकर आहे ! आज प्रकाशाची जरूर सर्वत्र भासत आहे. याकरितां ती भागविण्याचा यत्न तुमच्यानें होईल तितका करा आणि मग बाकीचें कार्य भगवंताच्या मर्जीवर सोंपवा. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ' हें त्याच भगवंतानें तुम्हांस सांगितलें आहे. स्वतःसाठीं म्हणून कांहीं कर्म आरंभूं नका. अथवा अमुक कर्म शेवटास नेऊन त्याचें फळ मी भोगीन हेंही म्हणूं नका; तथापि सदोदित कर्मरत मात्र रहा. एक क्षणही रिकामा घालवूं नका.

आमच्या पूर्वजांना अत्यंत प्राचीनकाळीं हा अमूल्य ज्ञानाचा ठेवा ज्यानें दिला तोच भगवान् आपल्या आज्ञांच्या पूर्तीस लागणारें सामर्थ्य तुम्हांस देतो.

# हिंदुस्थानांतील तत्त्ववेत्ते.

हिंदुस्थानांतील तत्त्ववेत्त्यांविषयीं बोलण्याचा विचार मनांत आणतांच ऐतिहासिक काळाच्यामागें कित्येक शतकें माझें मन धाव घेतें. या काळाचा उल्लेख कोणाहि इतिहासकारानें केलेला नाहीं; आणि या काळांतील अंधकारांत दडून राहिलेलें रहस्य बाहेर आणण्याची धडपड दंतकथांनीं केली असतां तीहि निष्फळ झाली आहे. हिंदुस्थानांत तत्त्ववेत्ते किती होऊन गेले याची मोजदाद करणें बहुधा दुरापास्त आहे. कारण, गेलीं हजारों वर्षें तत्त्ववेत्ते निर्माण करण्यावांचून दुसरा कोणता धंदा हिंदु राष्ट्रानें केला आहे ? याकरितां हिंदी तत्त्ववेत्त्यांसंबंधीं चर्चा करितांना त्यांतील कांहीं शेलक्या व्यक्तींचा उल्लेख मात्र मी करणार आहें. तत्त्वमीमांसेच्या बाबतींत जे शब्द कर्त्यांच्या योग्यतेचे झाले, तेवढयांबद्दलच थोडीबहुत माहिती मी तुम्हांला सांगेन. आरंभीं श्रुतींसंबंधीं थोडीशी माहिती करून घेणें आपणांस इष्ट आहे. सत्यवस्तूची चर्चा श्रुतींनीं मुख्यतः दोन प्रकारें केली आहे. यांत त्यांच्यापुढें साध्यें अथवा ध्येयें दोन प्रकारचीं आहेत. एक साध्य कालस्थलातीत असून दुसरें कालस्थलानें बद्ध आहे. विशेष परिस्थिति, काल आणि देश एवढयापुरतेंच हें साध्य सत्यरूप आहे. हें नितांत सत्य नव्हे. कालस्थलातीत अथवा शुद्ध सत्यवस्तूची चर्चा श्रुति अथवा वेदग्रंथ यांनीं केली आहे. यांत जीवात्म्याचें स्वरूप परमात्मरूप, आणि जीवशिवांचा संबंध इत्यादि वस्तूंची चर्चा केली आहे. यानंतर दुय्यम प्रतीचे ग्रंथ म्हणजे स्मृतिग्रंथ होत. मनु याज्ञवल्क्य इत्यादिकांनीं हे स्मृतिग्रंथ लिहिले असून दुसऱ्या कित्येकांनीं लिहिलेले पुराणतंत्रादि ग्रंथ याच दुय्यम कोटींत येतात. या दुय्यम प्रतीच्या ग्रंथांत सांगितलेल्या प्रमेयांचें मुख्य प्रामाण्य श्रुतिग्रंथांवरच अवलंबून आहे. श्रुति आणि स्मृति यांत विरोध आला असतां श्रुतीच प्रमाण मानली जाते. हा निर्बंध सर्वव्यापी आहे. यांत कोणालाही ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाहीं. मुख्य प्रमाणभूत ग्रंथ श्रुति आणि त्यानंतर स्मृति, असा क्रम आज दीर्घ कालापासून चालत आला आहे. मनुष्याचें अंतिम ध्येय काय याचा पूर्ण विचार श्रुतींनीं केला असून त्याचीं मुख्य बीजें त्यांनींच सांगितलीं आहेत. अशा प्रका-

रच्या पूज्य बुद्धीमुळेंच श्रुतींना हिंदुस्थानांत आदिस्थान मिळालें आहे. स्मृति आणि पुराणें यांनीं या बीजांचा विस्तार मात्र केला आहे. विचारपरंपरेचें मूळ श्रुतींत असून त्याच विचारांचा विस्तार स्मृतिपुराणादिकांत असल्यामुळें त्यांचें प्रामाण्य दुय्यम प्रतीचें ठरलें यांत नवल नाहीं. सामान्य मार्गदर्शनाचें कार्य श्रुतींनीं उत्तम प्रकारें केलें आहे. केवळ दिशा जाणावयाची असेल तर श्रुतींपलीकडे पहाण्याची गरज नाहीं. मानवी श्रेष्ठ जीवाचें अंतिम ध्येय काय याचा विचार श्रुतींपलीकडे करितां येणें शक्य नाहीं; आणि त्यांनीं सांगितलेल्या ज्ञानाबाहेर जाणायाचें राहिलें असें ज्ञानही नाहीं. जाणावयाजोगें जितकें कांहीं होतें, त्या साऱ्याचें आकलन श्रुतींनीं केलें आहे; आणि जीवात्म्याला पूर्ण दशा प्राप्त व्हावी ह्मणून आवश्यक असलेले मार्गही श्रुतींनीं आधींच सांगून टाकले आहेत. यांतील बारीकसारीक तपशील मात्र त्यांनीं सांगितला नाहीं; आणि तो सांगण्याचें कार्य स्मृतींनीं केलें. श्रुतींतील एकाच मार्गाचा विस्तार कालस्थलानुरूप स्मृतींनीं वेगवेगळ्या प्रकारें केला आहे; तथापि प्रकारांच्या या वेगळेपणामुळें मूळ सत्य वस्तूंत कांहीं फरक झाला आहे असें मात्र नाहीं. स्मृतिग्रंथांचे कर्ते बहुतेक पुरुष असून कांहींचें कर्तृत्व स्त्रियांकडेही आहे. स्मृतींची दृष्टि प्रमेयाच्या परोक्ष स्वरूपाकडे नसून ती त्याच्या प्रत्यक्ष अथवा व्यावहारिक स्वरूपाकडे अधिक असल्यामुळें ती चर्चा व्यक्तींचीं उदाहरणें देऊन त्यांनीं केली आहे. यांत कित्येक व्यक्ति आपणांस अवतारिक स्वरूपाच्या आढळतात. त्यांजकडे पाहून आपलें मन थक्क होऊन जातें. त्यांच्या अलौकिकपणामुळें आपलें हृदय दडपून जातें. सारें ज़ग हालवून सोडण्याचें सामर्थ्य ज्यांच्या अंगीं आहे, अशा प्रचंड व्यक्ती आपणांसमोर जणूंकाय प्रत्यक्ष उभ्या राहतात. त्यांच्या पराक्रमांच्या वर्णनानें आपलें चित्त इतकें भारून जातें कीं, त्यांचा तत्त्वोपदेशहि क्षणमात्र आपल्या चित्तांतून नष्ट होतो. त्यांचा उपदेश विसरून त्यांचें व्यक्तित्व मात्र आपल्या मनांत शिल्लक रहातें.

हिंदु धर्माचा तत्त्वोपदेश करण्याचा मार्ग विशिष्ट स्वरूपाचा आहे. हें स्वरूपहि आपण विशेषेंकरून ध्यानांत ठेवलें पाहिजे. यांत परोक्ष तत्त्वें आणि व्यक्तिविशिष्ट परमात्मरूप अशा दोन प्रकारांचा अन्तर्भाव होतो. परोक्ष तत्त्वांची चर्चा हिंदु धर्मानें जशी मनमुराद केली आहे, त्याचप्रमाणें परमेश्वराच्या मानवी अवतारांची लीलाही त्यानें मनसोक्तपणें केली आहे. तथापि

या धर्माचा मूळ झरा श्रुतिग्रंथ हेच होत. श्रुतिग्रंथांत केवळ परोक्ष तत्त्वांची चर्चा मात्र केली आहे. त्यांत कोणा अवतारांचें वर्णन नाहीं, अथवा त्यानें केलेल्या अद्भुत कृत्यांचा मागमूसही तेथें आढळावयाचा नाहीं. हा सारा उद्योग त्यांनीं स्मृतींकडे सोंपविला आहे. स्मृति आणि पुराणें यांत परमेश्वराच्या अवताराचें दर्शन आपणांस होतें; आणि त्यांतच दुसरेहि अनेक महापुरुष आपणांस आढळतात. येथें आणखीहि एक विशेष मुद्दा लक्षांत ठेवण्यासारखा आहे. हिंदु धर्म कोणाहि व्यक्तीशीं बद्ध झालेला नाहीं. अशा प्रकारें कोणा व्यक्तीशीं, अवताराशीं अथवा भविष्यवाद्यांशीं संलग्न न झालेला असा धर्म फक्त आमचाच आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. जगांतील बाकीच्या साऱ्या धर्मांचें अस्तित्व त्याच्या मूळ संस्थापकावर अवलंबून राहिलें आहे. ख्रिस्ती धर्माची उभारणी ख्रिस्तचरित्रावर झाली आहे. महंमदी धर्म महंमदाच्या चरित्रावर रचला गेला आहे; आणि अशाच रीतीनें बौद्ध आणि जैन धर्म त्या त्या धर्मांच्या संस्थापकांवर अवलंबून आहेत. यावरून एक गोष्ट उघड दिसून येण्यासारखी आहे, ती ही कीं, या धर्मसंस्थापकांच्या चरित्राच्या सत्यतेबद्दल ऐतिहासिक पुराव्याची जरूर उत्पन्न होते; आणि त्याबद्दल त्यानंतर विलक्षण वादविवाद आणि तंटेही उत्पन्न होतात. या महापुरुषांच्या अस्तित्वाबद्दल ऐतिहासिक दृष्ट्या कधींकाळीं संशय उत्पन्न झाला अथवा त्याबद्दलचा पुरावा कांहीं कारणानें लंगडा झाला, तर त्यांच्या अनुषंगानें उभी राहिलेली धर्माची इमारतही त्याबरोबरच कोसळण्याचा संभव आहे. असल्या प्रकारच्या आपत्तींतून हिंदु धर्म हजारों वर्षें वांचला याचें कारण हेंच कीं, त्याचें अस्तित्व कोणाही व्यक्तीवर अवलंबून नसून तत्त्वाशीं तें जोडलेलें आहे. हिंदु धर्माचे अनुयायी त्याचें सत्यत्व आज कबूल करतात याचें कारण तो अमुक एका व्यक्तीनें सांगितला हें नसून त्यांतील तत्त्वें केवलरूप आणि त्रिकालाबाधित आहेत हेंच होय. कित्येक व्यक्तींस हिंदू लोक अवतारी पुरुष मानितात; त्यांच्या रूपानें प्रत्यक्ष परमेश्वर अवतरला असें ते समजतात.

तथापि हिंदु धर्माचें अस्तित्व या अवतारी पुरुषांवरही अवलंबून नाहीं. भगवान् श्रीकृष्ण ही व्यक्ति कितीही मोठी असली तरी श्रुतिग्रंथांवर टीका करण्याचा अधिकार तिला नाहीं. एवढेंच नव्हे तर स्वतः प्रतिपादन केलेल्या मतांस आधार म्हणून श्रुतिवचनांचा उल्लेख श्रीकृष्णास स्वतः करावा लागतो.

श्रुतींचें खरें रहस्य जगाला सांगणारा एक महापुरुष इतकीच भगवान् श्रीकृष्णाची ख्याति आहे. हीच गोष्ट इतर अवतारी पुरुषांसही लागू आहे; आणि त्याप्रमाणें श्रुतींतील ऋषिवर्गासही हाच नियम लागू आहे. मनुष्याला पूर्णत्व येण्यासाठीं ज्या ज्या वस्तूंची आवश्यकता आहे, त्या साऱ्यांची तरतूद श्रुतिमातेनें आगाऊच करून ठेविली आहे. असें आमचें आदितत्व आहे. वेदांत नाहीं असें नवें तत्त्व एकही आढळावयाचें नाहीं. सर्व ज्ञानाची परिसीमा ऐक्य हीच आहे. ऐक्याची सिद्धि झाली म्हणजे तेथें ज्ञानाचीही परिसमाप्ति होते. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हें सर्व एकरूप आहे, या निश्चयापर्यंत तुम्ही एकवार पोहोंचलां म्हणजे त्यापलीकडे जाण्यास तुम्हास अवकाशच उरत नाहीं; आणि अशा अवकाशाच्या अभावीं ज्ञानाचीही गरज उरत नाहीं, हें उघड आहे. या एकरूपतेपर्यंत श्रुतींनीं आधींच मजल मारिली आहे आणि आतां त्यापलीकडे जाणें शक्य नाहीं. 'तत्त्वमसि' हा मूल सिद्धांत ज्या दिवशीं सिद्ध झाला, त्याच दिवशीं सर्व ज्ञान पूर्णदशेस आलें; आणि हा सिद्धांतही वेदांतर्गत आहे. आतां हें तत्त्व अनुभवास कसें आणावयाचें इतकाच प्रश्न बाकी राहिला. परिस्थित्यनुरूप मार्गदर्शकाची गरज तेवढीच शिल्लक राहिली. बदललेल्या परिस्थितीला अनुरूप अथवा काळाला अनुरूप आणि स्थलाला अनुरूप असा मार्गदर्शक मात्र आपणास हवा. मार्गाची सिद्धि पूर्वींच झाली असून केवळ वाटाड्याचें काम मात्र शिल्लक राहिलें आहे. जुन्या मार्गानें लोकांना नेणें इतकेंच काम करण्याकरितां अवतारी पुरुषांचा, ऋषिजनांचा आणि संतसत्पुरुषांचा जन्म झाला. भगवान् श्रीकृष्णांनीं स्वतःच गीतेंत म्हटलें आहे:—

"यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥" हिंदुधर्माच्या मूल उत्पत्तीचें स्वरूप अशा प्रकारचें आहे. यावरून काय दिसून येतें? हेंच कीं, एका पक्षीं कालस्थलातीत अशा स्वरूपाचीं तत्त्वें कोणाच्याही मदतीशिवाय आपल्या नियत स्थलीं उभीं आहेत. दुसऱ्या कोणत्याही पायाचा अवलंब त्यांना करावा लागत नाहीं; इतकेंच नव्हे तर विवेचक बुद्धीच्या आश्रयाची गरजही त्यांस नाहीं. मग कोणा मोठ्या ऋषिवर्याचा आश्रय त्यांना नको हें सांगण्याची जरूर नाहीं. हे

ऋषिवर्य अत्यंत मोठे होते आणि त्यांच्याचप्रमाणें अवतारी पुरुषही अत्यंत उज्ज्वल होते; पण असल्या पुरुषांचीही गरज हीं तत्त्वें बाळगीत नाहींत. हिंदुस्थानांतील श्रुतिप्रणीत धर्माचें स्वातंत्र्य त्रिकालाबाधित कसें आहे, ही गोष्ट तुमच्या लक्ष्यांत आतां आली असेलच; आणि याकरितांच विश्वव्यापी धर्म होण्याची पात्रता कोणत्याहि धर्मांत असेल तर ती वेदांत धर्मांतच आहे असें आम्ही कां म्हणतों हेंहि तुमच्या ध्यानांत आलें असेलच. किंबहुना आजच, हा धर्म विश्वव्यापी होऊन राहिला आहे. कारण, तो फक्त तत्त्वांचा द्रष्टा आहे. फक्त तत्त्वें तो शिकवितो आणि कोणाही व्यक्तीचें नांव तो पुढें करीत नाहीं. ज्या धर्माची उभारणी कोणाही व्यक्तीच्या चरित्रावर झालेली असते, तो धर्म एकाच वेळीं साऱ्या जगाला पटेल ही गोष्ट त्रिकालांतही शक्य नाहीं. केवळ आमच्या एकाच देशाचें उदाहरण घेतलें तरी त्यांत किती तरी महापुरुष होऊन गेलेले आहेत. एखाद्या शहरांत पाहिलें तर अनेक पुढारी असून त्यांपैकीं प्रत्येकाला कांहीं ना कांहीं भक्त असतातच. स्वतःच्या मनाला पटेल त्याच व्यक्तीला पूज्य मानण्याची प्रवृत्ति अनादिकालापासून चालू आहे. अशा स्थितींत एकच महंमद, एकच बुद्ध अथवा एकच ख्रिस्त सर्व मनुष्यांस सारखाच कसा पटेल? जगांतील सारीं माणसें कोणाही एकाच व्यक्तीला गुरुस्थानीं कसें मानतील. अशा एकाच व्यक्तीनें सांगितलेला तेवढाच धर्म खरा, अशी एकच व्यक्ति म्हणेल तेवढीच नीति खरी, अथवा अशी एकच व्यक्ति सांगेल तेवढाच कायतो खरा शास्त्रार्थ असें मानावयास सारें जग कसें तयार होणार? उलट पक्षीं वेदान्त धर्म कोणाहि व्यक्तीला पुढें करीत नाहीं. अमक्या व्यक्तीनें सांगितली म्हणून अमुक गोष्ट खरी माना, असा आग्रह तो धरीत नाहीं.

मनुष्याचा मूलस्वभाव हाच त्याचा अखेरचा शास्त्रार्थ आहे. मनुष्याच्या ठिकाणीं जी चिर स्वरूपाची चैतन्य शक्ति आहे, तीच वेदान्त धर्माची अखेरची अधिष्ठात्री देवता; तीच त्याची नीति, आणि तिची जागृति तोच त्याचा धर्ममार्ग. मनुष्य स्वभावतःच पूर्ण चैतन्यरूप आहे असें तो म्हणतो. हें पूर्णत्व बाहेरून कोठून प्राप्त करून घ्यावयाचें नसल्यामुळें कोणाचीही मदत त्याला नको असें वेदान्त धर्माचें सांगणें आहे. आतां यांत आणखीही एक मुद्दा आहे. परोक्ष तत्वांचें आकलन पूर्णपणें करण्यास लागणारें बुद्धीचें सामर्थ्य सामान्य

जनापैकीं बहुतेकांच्या अंगीं नाहीं; आणि यासाठीं कोणातरी मार्गदर्शक म्होरक्याची आवश्यकता त्यांना आहे, ही गोष्ट अत्यंत प्राचीन काळींही आमच्या ऋषिवर्गाच्या ध्यानीं आली होती. परमेश्वर म्हणून कोणातरी पूज्य व्यक्तीची आवश्यकता सामान्य बुद्धीच्या लोकांस आहे, हें त्यांस कळलें होतें. खुद्द बुद्धानें परमेश्वराचें अस्तित्व मानलें नाहीं. परमेश्वर म्हणून कांहीं विशिष्ट रूपाचें व्यक्तित्व अस्तित्वांत नाहीं असें त्यानें ठांसून सांगितलें. पण त्याच्या मृत्यूनंतर ५० वर्षांच्या अवधींत त्याच्या शिष्यांनींच एक व्यक्तिविशिष्ट परमेश्वर निर्माण केला. बुद्धालाच ते परमेश्वर म्हणूं लागले. यावरून कांहीं गुणविशिष्ट परमेश्वराचें अस्तित्व आवश्यक आहे हें उघड दिसून येतें. अशा स्थितींत कांहींतरी काल्पनिक गुण एकत्र करून त्यांच्या मुशींतून एकादा काल्पनिक परमेश्वर निर्माण करण्यापेक्षां जगांत जे लोकोत्तर पुरुष झाले, ज्यांनीं सामान्य मनुष्यांत प्रत्यक्ष व्यवहार केला आणि ज्यांचें अस्तित्व सामान्य जनांनीं नजरेनें पाहिलें, अशाच व्यक्तीला परमेश्वराच्या ठिकाणीं मानणें अधिक युक्त नाहीं काय ? काल्पनिक गुणांनीं उत्पन्न केलेलीं परमेश्वराचीं काल्पनिक स्वरूपें बहुधा नव्याण्णव हिश्यांनीं इतक्या गलिच्छ स्वरूपाचीं असतात कीं, त्यांचें पूजन करणें ही गोष्ट आपल्या माणुसकीला लांच्छन आणते. आपल्या कल्पनांनीं उत्पन्न केलेल्या कितीही उत्कृष्ट परमेश्वराच्या स्वरूपापेक्षां हे अवतारी पुरुष आणि महात्मे आपली पूजा घेण्यास अधिक पात्र होतात. तुमच्या आमच्या कल्पना कितीही विशाल झाल्या तरी त्यांतून निर्माण झालेल्या परमेश्वराच्या स्वरूपापेक्षां भगवान् श्रीकृष्ण कितीतरी पटीनें अधिक श्रेष्ठ आहेत. आपल्या मनांत उत्पन्न झालेल्या पवित्रतम मूर्तीपेक्षां भगवान् बुद्धांची मूर्ति निःसंशय अधिक उच्च आहे; आणि यामुळेंच हे पुरुष मानवजातीच्या दृष्टीनें आज दीर्घकाळ पूजार्ह होऊन बसले आहेत. परमेश्वराच्या काल्पनिक मूर्तींसही या जिवंत अवतारांनीं मागें टाकलें आहे. मनुष्याची ही प्रवृत्ति आमच्या ऋषिवर्यांस माहीत असल्यामुळें संतांचें आणि अवतारी पुरुषांचें पूजन करण्याची मुभा सर्व लोकांस त्यांनीं देऊन ठेविली होती. फार काय पण भगवान् श्रीकृष्ण याच्याही पुढें जाऊन म्हणतात, "यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसंभवम् ॥" ज्या ठिकाणीं कांहीं लोकोत्तर गुण स्पष्टत्वास आला असेल, त्या ठिकाणीं परमेश्वर अवतरला

आहे असा भगवंताच्या म्हणण्याचा आशय आहे. येथें जगांतील कोणत्याही देशांत उत्पन्न झालेल्या विभूतीची पूजा करण्याची परवानगी भगवान् श्रीकृष्णांनीं आम्हां हिंदु लोकांस देऊन ठेविली आहे. कोणत्याही देशांत आणि कोणत्याहि काळीं उत्पन्न झालेल्या सत्पुरुषाची पूजा करण्यास आमच्या धर्मानें मुभा ठेविली आहे. ख्रिस्ती लोकांच्या चर्चांत आणि मुसलमानांच्या मशिदींत जाऊन पूजा करणारे हिंदु लोक आजही पुष्कळांच्या पाहाण्यांत आले असतील; आणि असें असावें हें युक्तही आहे. असें कां असूं नये ? आमचा धर्म बोलून चालून जगद्व्यापी आहे, हें मीं पूर्वीं सांगितलेंच आहे. त्याच्या पोटांत सर्वांना वाव आहे. तो कोणालाही बाहेर टाकीत नाहीं. तुमच्या ध्येयाचा दर्जा कोणताही असला तरी हिंदु धर्मांत त्याला स्थळ मिळतें. कोणालाही पोटांत घेण्याइतकें औदार्य त्याच्या ठिकाणीं आहे. धर्मविषयक म्हणून ज्या ज्या कल्पना साऱ्या जगांत आज अस्तित्वांत आहेत, त्या साऱ्यांचा अंतर्भाव हिंदु धर्मांत एका क्षणांत होण्यासारखा आहे; आणि पुढें ज्या कल्पना उदय पावणार आहेत, त्यांचा अंतर्भाव आमच्या धर्मांत होईपर्यंत स्वस्थ बसून वाट पाहण्याइतकी शांतीही आमच्या ठिकाणीं आहे. वेदांत धर्माचे बाहू इतके विशाल आहेत, कीं त्यांच्या परिघांतून जगांतील कोणतीही धर्मविषयक कल्पना बाहेर राहूं शकणार नाहीं.

अवतारी पुरुष आणि ऋषिवर्य यांसंबंधीं आमची कल्पना अशा प्रकारची आहे. ऋषि हा शब्द वेद ग्रंथांत वारंवार आढळण्यांत येतो; आणि सध्याच्या काळीं तर तो अगदीं सामान्य होऊन बसला आहे. ऋषि म्हणजे मोठे अधिकारी पुरुष. धर्माच्या आणि तत्त्वज्ञानाच्या बाबतींत त्यांचें बोलणें मोठ्या अधिकाराचें असतें, हें आपण नीट लक्षांत ठेवलें पाहिजे. ऋषि या शब्दाची व्याख्या मंत्रद्रष्टा अशी केलेली आहे. मंत्रद्रष्टा म्हणजे सूक्ष्म विचारांस पाहणारा. अमुक तत्त्व खरें कीं खोटें हें ठरविण्याची अखेरची कसोटी काय, हा प्रश्न अत्यंत प्राचीन काळींहि वारंवार उद्भवत असे. इंद्रियांची साक्ष नेहमींच खरी असते असें नाहीं. इंद्रियें ही अखेरची कसोटी म्हणतां येणार नाहीं. सत्यवस्तूपर्यंत इंद्रियें पोहोंचूं शकतच नाहींत. असें 'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह' या श्रुतीनें निदर्शित केलें आहे. त्याप्रमाणें 'न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति नो मनः' या श्रुतींतहि याच मुद्याचें स्पष्टीकरण

आहे. हें स्पष्टीकरण फार पुरातन काळचें आहे. हीं वचनें सांगितल्याला आज युगांचीं युगें होऊन गेलीं आहेत. बाह्य सृष्टींत आपण कितीही भटकलों तरी आत्म्याच्या अस्तित्वाबद्दल आपली निःसंशय खात्री होण्याचें साधन तेथें आपणांस सांपडणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें परमात्मरूपाचें अस्तित्व, आत्म्याचें अमरत्व, मानवी जीविताचें अंतिम साध्य इत्यादि अनेक प्रश्नांचा समाधानकारक निकाल बाह्य सृष्टींत फिरून कधींहि लागावयाचा नाहीं. आपलें मन प्रत्येक क्षणीं बदलत आहे. कढत असलेल्या पाण्याप्रमाणें त्यालाहि एकसारखे कढ येत असतात. तें सान्त आहे. त्याला मर्यादा आहे. त्याला एकतानता नाहीं. छिन्नविच्छिन्न झालेल्या वस्तूप्रमाणें तें तुकड्यातुकड्यांचें बनलें आहे. अशा स्थितींत अनंत, अभंग, अच्छेद्य आणि चिरजीवी अशा वस्तूविषयीं तें आपणांस काय सांगूं शकणार? ही गोष्ट त्याला स्वभावतःच अशक्य आहे. या अनेक प्रश्नांचीं उत्तरें जडसृष्टीपासून मिळविण्याचा यत्न मनुष्यानें जेव्हां जेव्हां केला, तेव्हां तेव्हां मोठे अनर्थकारक प्रसंग घडून आल्याची साक्ष इतिहास देत आहे. तर मग श्रुतींत उपलब्ध असलेल्या ज्ञानाची उत्पत्ति कोठून झाली? ती ऋषींपासून झाली आहे. ऋषि होणें हाच हें ज्ञान मिळविण्याचा मार्ग आहे. हें ज्ञान बाह्य इंद्रियांत नाहीं. जें इंद्रियगत नाहीं त्याची साक्ष इंद्रियें कशी देणार? आणि आपण तरी जड इंद्रियांच्या साक्षीवर इतकें अवलंबून कां राहावें? आपल्या अस्तित्वाचें सारांतलें सार इंद्रियांत सांठवलें आहे काय? 'आहे' असें म्हणण्याची छाती कोणासहि होणार नाहीं. आपला प्रत्यक्ष अनुभव तरी आपणास काय सांगतो? इंद्रियजन्य सुखें कितीहि भोगलीं तरी आपल्या जीविताचें अंतिम साध्य तें नाहीं अशी खूणगांठ पटण्याचा एखादा तरी प्रसंग आपणांपैकीं प्रत्येकाच्या आयुष्यांत एकदा तरी आलेला असता. आपणांस अत्यंत प्रिय असें एखादें माणूस मृत्युमुखीं जातें, त्याचें शव आपणांपुढें पडलेलें असतें; अशा प्रसंगीं आपल्या चित्ताला मोठा धक्का बसतो. आपल्या साऱ्या चैनींची अखेर हीच काय, असा प्रश्न या वेळीं आपल्या चित्तांत उभा रहातो आणि त्याला 'नाहीं' हेंच निश्चयात्मक उत्तर आपणांस मिळत असतें. कित्येक वेळां आपलें चित्त विलक्षण शांति धारण करितें; आणि भक्तिभावानें तें भरून गेलेलें असतें. अशा प्रसंगीं इंद्रियजन्य सुखांचा विचारहि आपणांस भयप्रद वाटतो. अशा प्रसंगीं आपल्या

मनाचें खरें स्वरूप अल्पस्वल्प अंशानें आपल्या प्रत्ययास येत असतें; आणि त्यांतून पलीकडचें अनंतरूप अल्पांशानें आपणांस दिसत असतें. या ठिकाणीं शब्द पोंचूं शकत नाहीं; आणि तेथें मनहि जाऊं शकत नाहीं. अशा गोष्टी आपल्या सामान्य जीवनक्रमांत पुष्कळ वेळां घडत असतात. हाच अनुभव वारंवार यावा, तो दीर्घकाल रहावा आणि अखेरीस तो पूर्णत्वास पावावा हाच आपला अभ्यास आणि हेंच आपलें अखेरचें साध्य. जीवात्मा इंद्रियांनीं बद्ध नाहीं, ही गोष्ट फार प्राचीन काळीं मनुष्याच्या लक्षांत आली. फार काय, पण तो जाणिवेनेंहि बद्ध नाहीं असें त्यास कळून आलें. अनंत शृंखलेंत जाणीव हा एक दुवा आहे, ही गोष्ट आपण नीट समजून घेतली पाहिजे. अस्तित्व आणि जाणीव हीं एकरूप नाहींत. जाणिव हा अस्तित्वाचा एक भाग मात्र आहे. जाणिवेपलीकडे उडी मारण्याचें धैर्य ज्यांना असतें तेच अनंतापर्यंत पोहोंचूं शकतात. जाणीव इंद्रियांनीं बद्ध आहे. तिचें वास्तव्य इंद्रियांच्या मर्यादेंत आहे. आपणांस इंद्रियांपलीकडे आणि जाणिवेपलिकडे गेलें पाहिजे. तसें झालें तरच सत्यवस्तूची भेट आपणांस होईल. इंद्रियांपलीकडे गेलेलीं माणसें आजमितीस आहेत. यांनाच सत्यवस्तु ठाऊक असते; आणि याच सत्यद्रष्ट्यांना ऋषि असें म्हणतात.

आपल्या सामान्य दृष्टीला आजूबाजूच्या वस्तू जशा दिसतात, त्याचप्रमाणें श्रुतींना सत्यवस्तु दिसली. सामान्य वस्तूंच्या अस्तित्वाबद्दल आपले डोळे जसे प्रमाण आहेत त्याचप्रमाणें सत्यवस्तूविषयीं वेदप्रामाण्य आहे. याला प्रत्यक्ष प्रमाण असें म्हणतात. जी गोष्ट आपण डोळ्यांनीं पाहतों, तिच्या अस्तित्वाबद्दल दुसऱ्या कसल्याहि प्रमाणाची अपेक्षा आपण करीत नाहीं. त्याचप्रमाणें वेदांनाहि सत्यवस्तु प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध असते. माझ्या समोरील हें मेज मी माझ्या बाह्य इंद्रियांनीं पहातों; त्याचप्रमाणें चैतन्य वस्तूचें अस्तित्व जाणिवेपलीकडे गेल्यानंतर मला प्रत्यक्ष दिसूं लागेल. अशी स्थिति अमुक एकाला प्राप्त करून घेतां येते, अथवा ती अमुक स्थलीं आणि अमुक कालीं प्राप्त होते असें नाहीं. ती प्राप्त करून घेण्याच्या मार्गांत जात अथवा वय हीं आड येत नाहींत. आर्याला, अनार्याला, म्लेंच्छालाहि आणि दुसऱ्या कोणालाहि हीच स्थिति प्राप्त करून घेतां येण्यासारखी आहे, असें वात्स्यायनांनीं ठांसून सांगितलें आहे. वेदांतील ऋषित्व तें हेंच; आणि हिंदु धर्माचें

अखेरचें साध्य हेंच आहे हें आपण नित्य लक्षांत ठेवलें पाहिजे. कोणत्याही धर्माचें साध्य हेंच असलें पाहिजे, ही गोष्ट जगांतील सर्व राष्ट्रांच्या गळीं उतरली, तर जगांतील पुष्कळशीं तंटेभांडणें नाहींशीं होतील. धर्म ही वस्तु कांहीं विशिष्ट ग्रंथांत सांठविलेली आहे असें नाहीं. शुष्क उपपत्तींत ती नाहीं; ती हठवादांत नाहीं, ती पांडित्यांत नाहीं, अथवा मोठ्या बुद्धिवादांतहि तिचें अस्तित्व नाहीं. जी वस्तु तुम्हांस सत्य अशी वाटते ती स्वतः होऊन जाणें यांत धर्म आहे. ऋषित्व अंगीं आणून सत्यवस्तूची भेट जेव्हां तुम्ही प्रत्यक्ष घ्याल, तेव्हांच तुम्ही धर्ममार्गी आहां असें म्हणतां येईल. असें होई-पर्यंत धार्मिक जीवनाचा प्रारंभहि तुम्हीं केला नाहीं असें म्हटलें पाहिजे. जाणिवेपलीकडे जाईपर्यंत तुमच्या धर्मविषयक कथांना वायफळ बडबडीहून अधिक किंमत नाहीं; फार झालें तर तुम्ही आगाऊ तयारी करीत आहां इतकेंच मानतां येईल. ज्या वस्तूविषयीं तुम्ही बोलतां तिचें प्रत्यक्ष ज्ञान तुम्हांस नसून तुमचें तें ज्ञान उष्टें असतें. लोक बोलतात तें ऐकून तुम्हीहि बोलत असतां. एके प्रसंगीं कांहीं ब्राह्मणांशीं भगवान् बुद्धांचा मोठा वाद झाला. ब्रह्माचें स्वरूप काय हा वादाचा विषय होता. तेव्हां भगवान् बुद्धांनीं ब्राह्मणांस प्रश्न केला, 'तुम्हीं ब्रह्म पाहिलें आहे काय?' त्यावर 'नाहीं' असें उत्तर ब्राह्मणांनीं दिलें. तें ऐकून भगवान् बुद्धदेव म्हणाले 'बरें. तुमच्या वडिलांनीं अथवा आजोबांनीं तरी ब्रह्म पाहिलें होतें काय ?' 'नाहीं' असें उत्तर मिळतांच बुद्धदेव पुढें म्हणाले, 'माझ्या मित्रांनो जी वस्तु तुम्हीं अथवा तुमच्या वाडवडिलांनींहि डोळ्यांनीं पाहिली नाहीं, तिजबद्दल वादविवाद कशाचा करितां ? असल्या वादविवादांत खऱ्याखोट्याचा निवाडा तरी कोणीं करावा ?' साऱ्या जग-भर आज हाच धुमाकूळ चालू आहे. 'हा आत्मा पुष्कळ भाषणानें प्राप्त होणार नाहीं, हा उच्चतमबुद्धीनें मिळण्याजोगा नाहीं, अथवा श्रुतीच्या अभ्या-सानेंहि हा मिळावयाचा नाहीं.' हें श्रुतिवाक्य आपण नित्य लक्षांत बाळगिलें पाहिजे. अनुभवाशिवाय आमचे सारे वादविवाद व्यर्थ आहेत. ज्या परमेश्व-राबद्दल तुम्ही इतक्या निकरानें बोलत असतां त्याचें प्रत्यक्ष दर्शन तुम्हीं घेतलें आहे काय ? जगाला ईश्वरविषयक ज्ञान सांगण्याचा हक्क आपणांस प्राप्त झाला आहे असें तुम्हांस वाटतें, पण जोंपर्यंत परमेश्वराची प्रत्यक्ष भेट तुम्हीं घेतली नाहीं, तोंपर्यंत तुमचें सारें ज्ञान फुकट आहे, आणि तुमची बडबड

फोल आहे. आपण काय बोलतों हें तुमचें तुम्हांसच समजत नाहीं. परमेश्वराची भेट तुम्हीं घेतली असेल, तर तुम्हीं कोणाशींहि वादविवाद करणार नाहीं. तुमच्या ठिकाणीं ज्ञानाचें प्रत्यक्ष वास्तव्य आहे ही गोष्ट तुमच्या मुखावरचें तेजच बोलून दाखवील. उपनिषदांत यासंबंधीं एक कथा आहे. एका ब्राह्मणानें आपल्या मुलाला ब्रह्मप्राप्तीसाठीं गुरुगृहीं पाठविलें. तेथून मुलगा परत आला, तेव्हां बापानें त्याला प्रश्न केला, ' मुला, तूं काय शिकलास ? ' उत्तरादाखल मुलानें अनेक शास्त्रांचीं नांवें बापाला सांगितलीं. तीं ऐकून घेऊन ब्राह्मण म्हणाला, ' तर मग अद्यापि तूं कांहींच शिकला नाहींस. याकरितां गुरुगृहीं तूं परत जा. ' त्याप्रमाणें मुलगा परत गेला आणि कांहीं काळ लोटल्यावर तो परत आला; तेव्हां ब्राह्मणानें तोच प्रश्न पुन्हां त्याला केला आणि मुलानेंहि पुन्हां तेंच उत्तर दिलें. ब्राह्मण म्हणाला, ' तुझ्या या साऱ्या विद्या व्यर्थ आहेत, तूं पुन्हां परत जा. ' बापाच्या आज्ञेप्रमाणें मुलगा पुन्हां गुरुगृहीं गेला. कांहीं काळ लोटल्यानंतर तो परत बापाकडे आला. त्याला पाहतांच बाप म्हणाला, ' मुला, आज मात्र तुझें तोंड ब्रह्मज्ञाप्रमाणें तेजोमय दिसत आहे. ' परमेश्वराशीं तुमची प्रत्यक्ष भेट होईल त्या वेळीं तुमचा सारा नूर बदलून जाईल, तुमचा आवाज वेगळा होईल, किंबहुना तुम्ही सारेच बदलून जाल. अशा स्थितींत तुमचें अस्तित्व मानवजातीला आशीर्वादरूप होईल. तुमच्यापुढें सारें जग नम्र होईल. ऋषित्वाला उल्लंघन करण्याचें सामर्थ्य या विश्वांत कोणालाहि नाहीं. या स्थितीला ऋषित्व असें म्हणतात, आणि आमच्या धर्माचें अखेरचें साध्य म्हणजे हें ऋषित्व अथवा ही ब्राह्मी स्थिति प्राप्त करून घेणें हेंच आहे. याखेरीज बाकीच्या साऱ्या गोष्टी केवळ दुय्यम प्रतीच्या असून त्यांचें महत्व पूर्वतयारीहून अधिक नाहीं. तात्त्विक वादविवाद, अनेक दर्शनें, द्वैत, अद्वैत आणि फार काय पण प्रत्यक्ष श्रुतीचा अभ्यासहि याच दुय्यम स्वरूपाचा आहे. ब्राह्मी स्थिति प्राप्त करून घेणें हा मूलहेतु असून बाकीच्या साऱ्या गोष्टी या मुख्य हेतूचीं पोषक उपकरणें मात्र होत. ज्या ज्ञानानें ही ब्राह्मी स्थिति प्राप्त होते, तें ज्ञान प्रमुख असून बाकीचें सारें शास्त्रज्ञान दुय्यम प्रतीचें आहे. असें ज्ञान प्राप्त करून घेऊन जे ब्राह्मीस्थितीला पावले, त्यांनाच श्रुतींत ऋषि अशी संज्ञा प्राप्त झाली; आणि अशा प्रकारची स्थिति प्राप्त करून घेणें, हें आम्हांपैकीं प्रत्येक खऱ्या हिंदूचें अवश्य

कर्तव्य आहे. याच स्थितीला मुक्ति असें नांव आमच्या शास्त्रांनीं दिलें आहे. अमुक ग्रंथावर अथवा वचनावर माझा विश्वास आहे असें म्हटल्यानें ही स्थिति प्राप्त होत नाहीं; त्याचप्रमाणें हजारों यात्रा करून आणि हजारों देवतांचीं दर्शनें करूनहि ही स्थिति प्राप्त होणार नाहीं. जगांतील साऱ्या नद्यांत कितीहि बुचकळ्या तुम्हीं मारल्या, तरी तुम्हांस मुक्तिलाभ व्हावयाचा नाहीं. हा लाभ तुम्हांस करून घ्यावयाचा असेल तर तुम्हीं मंत्रद्रष्टा बनलें पाहिजे.

श्रुतिकाल सोडून आपण जरा अलीकडे आलों म्हणजे अवतारी पुरुषांचें दर्शन आपणांस होतें. सारें जग हालविण्यासारखें सामर्थ्य यांच्या अंगीं होतें. असे अवतारी पुरुष अनेक होऊन गेले असें भागवतांत सांगितलें आहे. तथापि या अनेक पुरुषांपैकीं राम आणि कृष्ण या दोहोंचेंच पूजन हिंदुस्थानांत होतें. सत्य आणि नीति यांचा मूर्तिमंत पुतळा राम हा होता. पुत्र, भर्ता, भ्राता, राजा इत्यादि अनेक नात्यांनीं रामाचें स्वरूप आदर्शवत् आहे. या रामावताराचें चरित्र महाकवि आणि मोठे ऋषिवर्य श्रीवाल्मीकि यांनीं गाइलें आहे. यांच्या वाणीइतकी सुंदर, पवित्र आणि साधी वाणी दुसऱ्या कोठेंहि आढळावयाची नाहीं. यांनीं रामचरित्राबरोबरच सीतेचें चरित्रहि सांगितलें आहे. हें चित्र या महाकवीनें इतक्या बहारीच्या रंगांत रंगविलें आहे कीं, साऱ्या जगाचा काव्येतिहास तुम्हीं पालथा घातला, तरी त्यांत दुसरी सीता तुम्हांस आढळावयाची नाहीं. सीता ही साऱ्या जगांत एकच. सीतेला तुलना सीतेचीच. ज्या काळीं हें चरित्र घडून आलें, त्यानंतर आजपर्यंत दुसरी सीता पुन्हां निर्माण झाली नाहीं. जें चरित्र एकदां रेखाटलें गेलें तें आजपर्यंत अखेरचेंच राहिलें आहे. कदाचित् राम आजपर्यंत पुष्कळ होऊन गेले असतील, पण सीता मात्र एकटीच. सीता ही हिंदु स्त्रियांचा आदर्श आहे. स्त्री कशी असावी, या प्रश्नाचें उत्तर 'सीतेसारखी' या एकाच शब्दांत भरतभूमीनें कायमचें देऊन ठेविलें आहे; आणि आज हजारों वर्षें हा आदर्श आम्हांपुढें अबाधित राहिला असून अखिल आर्यावर्तांतील कोट्यवधि स्त्रीपुरुषांचे आणि मुलांचे प्रणाम तो घेत आहे. प्रत्यक्ष पावित्र्याहून पवित्र असा हा आदर्श काळाच्या अंतापर्यंत असाच कायम रहावयाचा आहे. साऱ्या आयुष्यभर सीतेनें दुःख मात्र भोगिलें, पण त्याविरुद्ध कधीं चकारशब्दहि मुखावाटे काढला नाहीं. अशी ही पावित्र्याची मूर्ति सर्व जनतेची पूज्य देवी होऊन

बसली आहे. मनुष्यांनींच काय, पण देवदेवतांनींही तिचें पूजन करावें, अशी तिची योग्यता आहे. अशी स्त्री साऱ्या आर्यावर्ताचें आधिदैवत होऊन बसली यांत नवल काय? सीतेचें चरित्र हिंदुस्थानांतील आबालवृद्धांच्या मुखीं असतें. सर्व पुराणें उद्यां काळाच्या पोटांत गेलीं, श्रुती लोपल्या, संस्कृत भाषाहि नष्ट झाली, आणि पांच हिंदु शिल्लक राहिले तथापि त्यांच्या मुखांतून सीतेचें चरित्र ऐकावयास मिळेल. सीता साऱ्या आर्यवंशाच्या रोम-रोमांत भिनून राहिली आहे, हे माझे शब्द तुम्हीं पक्के ध्यानांत ठेवा. आमच्या स्त्रियांना सुधारण्याचा आणि त्यांना अर्वाचीन बनविण्याचा यत्न तुम्हीं कितीहि केला, तरी सीतेचा आदर्श सोडून त्यापलीकडे एक पाऊलही त्या सरकावयाच्या नाहींत. तुमचा उद्योग या दृष्टीनें सुरू आहे अशी नुसती शंका त्यांना आली, तरी त्याक्षणींच तुमचे सारे यत्न ढांसळून पडतील. हा अनुभव आजपर्यंत शेंकडों वेळां आम्हांस प्रत्यक्ष आला आहे. सीतेच्या पावलांमागें पावलें टाकूनच आपला मार्ग हिंदु स्त्रीजाती आक्रमील; आणि असें होणें हें योग्यहि आहे.

यानंतर हिंदुस्थानांत आबाल वृद्धांस पूजनीय असा दुसरा अवतार झाला. अनेक रूपांनीं या अवताराचें पूजन स्त्रिया आणि पुरुष करीत असतात. या दोघांनाहि तो सारखाच पूज्य आहे. तो बालकांचा जसा आवडता तसाच वृद्धांनाही तो प्रिय आहे. याच्या संबंधीं बोलतांना या अवतारांत परमेश्वर पूर्णत्वानें अवतरला असे उद्गार भगवान् व्यासांनीं काढिले आहेत. त्यांच्या दृष्टीनें इतर अवतार परमेश्वराचे केवळ अंशरूप असून श्रीकृष्ण मात्र पूर्णावतार होत. भगवान् श्रीकृष्णाच्या चरित्राचा विचार केला म्हणजे या व्यासोक्तीबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. भगवान् श्रीकृष्ण संन्याशांत संन्यासी होते आणि त्याबरोबरच गृहस्थाश्रम्यांत गृहस्थाश्रमी होते. त्यांचा संन्यास जसा पूर्ण, तसाच गृहस्थाश्रमहि पूर्णत्वास पावलेला होता. त्यांच्या अंगीं अतुल शक्ति होती; तथापि ह्या स्थितींतहि ते पूर्ण विरागी होते. गीताशास्त्र उत्तम समजल्याशिवाय भगवान् श्रीकृष्ण यांच्या चारित्र्याचें रहस्य तुमच्या ध्यानीं यावयाचें नाहीं. गीतेंत त्यांनीं स्वतःच जीं तत्त्वें सांगितलीं, त्यांचें मूर्तिमंत रूप त्यांच्याच ठिकाणीं व्यक्तदशेला आलें होतें. सारे अवतारी पुरुष अशाच स्वरूपाचे होते. जें तत्त्व तोंडानें उच्चारावयाचें तेंच

प्रत्यक्ष कृतींतहि ते दाखवीत. भगवान् श्रीकृष्णाचें सारें चरित्र गीताशास्त्राला पूर्णपणें धरून आहे. सर्व कर्म करावयाचें परंतु त्यांत कोठेंहि गुंतावयाचें नाहीं, या त्यांच्या उपदेशाचें जीवंत स्पष्टीकरण त्यांच्या साऱ्या चरित्रभर आढळून येतें. त्यांनीं सिंहासनाचा त्याग केला. आपणांस कधीं काळीं सिंहासन होतें, याची आठवणहि त्यांस पुन्हां झाली नाहीं. ज्यांच्या दृष्टिपातानें संबंध राज्यें उलथींपालथीं झालीं, त्यांनीं स्वतः राजा होण्याची अपेक्षा धरिली नाहीं. लहानपणीं गोपींबरोबर खेळणारा कृष्ण अखेरपर्यंत तसाच साधा भोळा कृष्ण राहिला. गोपींची क्रीडा हा श्रीकृष्णांच्या आयुष्यांतील एक लोकोत्तर भाग आहे. या चरित्राचा हा भाग आपणांसारख्या सामान्य जनांस समजणें शक्य नाहीं; आणि स्वतः पूर्ण पवित्र बनेपर्यंत तो समजण्याची आशाहि कोणीं धरूं नये. अत्यंत पवित्र अशा प्रेमाचें हें स्वरूप येथें अत्यंत विशाल झालें आहे. वृंदावनांतील गोपीक्रीडेचें रहस्य कोणालाहि समजावयाचें नाहीं. भगवान् श्रीकृष्णाच्या भक्तिरसाचें आकंठ पान करून जो झिंगला असेल त्यालाच हें रहस्य समजेल. गोपींच्या शुद्ध आणि निर्व्याज प्रेमाच्या वाहणाऱ्या झऱ्याचें आकलन कोणास करवेल ! ज्या प्रेमांत स्वर्गाची अपेक्षा नाहीं, ज्या प्रेमांत मृत्युलोकाच्या अस्तित्वाचाहि विसर पडला आणि ज्या प्रेमांत मुक्तीचीही अपेक्षा शिल्लक राहिलेली नाहीं त्याचें रहस्य कोणीं जाणावें ? व्यक्त परमेश्वर आणि त्याचेंच अव्यक्त रूप या दोन मतांतील तंट्याचा निकाल येथेंच लागलेला आहे हें अवश्य ध्यानांत ठेवा. मानवी जीविताचें अत्युच्च शिखर म्हणजे व्यक्त परमेश्वर असून अव्यक्त रूप हें फक्त तत्त्वदृष्ट्या जाणावयाचें आहे. अव्यक्त रूप सर्व विश्वभर पसरलें असून हें सारें वस्तुजात त्याचेंच स्पष्ट रूप आहे. केवळ शास्त्रदृष्ट्या हें म्हणणें आपणांस पटलें असलें, तरी आपल्या मनोभूमिकेला कोणत्या ना कोणत्या व्यक्त स्वरूपाची आवश्यकता भासत असते. जें आपल्या डोळ्यांनीं पाहतां येईल, ज्याचें ग्रहण सर्व इंद्रियांनीं करितां येईल आणि ज्याच्या पायांपाशीं आमचें सर्व अंतर्गत आम्हांस खुलें करितां येईल, असें स्वरूप आम्हांस हवें. अशा दृष्टीनेंच एखाद्या विशिष्ट रूपाची योजना आम्ही माणसें करीत असतों. याचा अर्थ हाच कीं, व्यक्त परमेश्वर म्हणजे मानवी मनाची अत्युच्च कोटीची कल्पना तथापि शुद्ध बुद्धीनें येथपर्यंत मजल

मारली म्हणजे तिची तिलाच भीति वाटून ती येथें थबकून उभी रहाते. हा प्रश्न आजकालचा नसून त्याची चर्चा फार प्राचीन काळापासून चालत आल्याचें आपल्या निदर्शनास येतें. ब्रह्मसूत्रांत ही चर्चा आहे. अरण्यवासांत असतां द्रौपदी आणि युधिष्ठिर यांच्यामध्यें हीच चर्चा झाली होती. अत्यंत दयामय आणि सर्वशक्तिमान् असा व्यक्त परमेश्वर खरोखर अस्तित्वांत असेल तर पृथ्वीवर ही नरकाची उत्पत्ति कां होते ? अशी विचित्र सृष्टि त्यानें कां निर्माण केली ? असा परमेश्वर न्यायी नसून पक्षपाती म्हटला पाहिजे. या प्रश्नावलीला चोख उत्तर आपणांस देतां येत नाहीं. त्याला एकच उत्तर गोपींच्या प्रेमानें दिलें आहे. भगवान् श्रीकृष्णाच्या मागें कोणतेंहि विशेषण लावलेलें गोपींना खपलें नाहीं. फार काय, पण हें सारें विश्व त्यानें निर्माण केलें कीं नाहीं, हा प्रश्नसुद्धां त्यांच्या चित्तांत आला नाहीं. तो सर्वशक्तिमान् आहे कीं अगदीं दुबळा आहे, असली चर्चा त्यांनीं कधीं केली नाहीं. तो अनंत प्रेमस्वरूप आहे एवढें मात्र त्यांना ठाऊक होतें. याखेरीज दुसरें कोणतेंहि स्वरूप त्यांना ठाऊक नव्हतें आणि तें माहित व्हावें अशी अपेक्षाहि त्यांनीं केली नाहीं. कृष्ण म्हणजे वृंदावनांतला प्रेममय कृष्ण, ही एकच व्याख्या त्यांना ठाऊक होती. तो दुष्टांचें दमन करणारा आणि राजांचा राजा त्यांच्या दृष्टीनें केवळ गोप होता, आणि अखेरपर्यंत त्यांना तो गोपच राहिला. 'मला धन नको, आप्तसोयरे नकोत, मला विद्येची गरज नाहीं, मला स्वर्गसुख नको, अथवा मुक्तिहि नको. फक्त तुझी भक्ति माझ्या चित्तांत दृढ असावी आणि तीहि अत्यंत निर्व्याज असावी,' इतकेंच त्यांचें मागणें होतें. धर्माच्या इतिहासांत हें एक मोठें ध्वजेचें स्थल आहे. निर्व्याज प्रेम हें या स्थानाचें मुख्य स्वरूप आहे. यांतूनच पुढें निर्व्याज कर्म उत्पन्न झालें; आणि अनासक्त चित्तानें कर्म करावें हा सिद्धांत भगवान् श्रीकृष्णांनींच प्रथम बोलून दाखविला आहे. हिंदुस्थानच्या भूमीवर मानवजातीच्या इतिहासांत हें तत्त्व अशा रीतीनें प्रथम उदयास आलें. भीतीची भक्ति आणि व्यापारी भक्ति यांचा निःपात झाला; नरकाची भीति उडाली आणि स्वर्गसुखाची आकांक्षा नाहींशी झाली; आणि त्याची जागा निर्व्याज प्रेम आणि अनासक्त कर्म या दोन अत्युच्च तत्त्वांनीं बळकाविली.

आणि या प्रेमाचें स्वरूप तरी कसें आहे पहा. गोपींचें प्रेम आपणास समजावयाचें नाहीं, हें मीं नुकतेंच तुम्हांस सांगितलें आहे. या दिव्य प्रेमाचा

अर्थ लक्षांत आला नसतांहि त्याचा विपर्यास करणारे हजारों मूर्ख आजहि आपल्या समाजांत तयार आहेत. 'गोपींचें प्रेम' हा शब्द उच्चारतांच ज्यांना थरकांप भीति वाटते, शुद्ध नरकासन्निध तर आपण आलों नाहींना अशी शंका उत्पन्न होऊन त्यांचें चित्त भयाकुल होतें. याचा वास्तविक अर्थ हाच कीं त्यांचीं चित्तें अपवित्र आहेत. आपल्याच रक्तामासाचे असे अनेक मूर्ख आपणांमध्यें आज वावरत आहेत. त्यांना मीं इतकेंच म्हणतों कीं बाबांनो, आपलीं अंतःकरणें आधीं शुद्ध करा. गोपींचा इतिहास प्रत्यक्ष शुकदेवानें स्वमुखानें गाइला आहे, एवढें तरी लक्षांत ठेवा. ज्यानें हा इतिहास गाइला तो दुसरा तिसरा कोणी नसून बाल ब्रह्मचारी होता. जो सदाचा पवित्र त्या पवित्रतम शुकदेवानें गोपींच्या प्रेमाचा हा उज्वलतम इतिहास सांगितला आहे. आपल्या चित्तांत कसलीहि आकांक्षा यत्किंचित तरी शिल्लक असेल तोंपर्यंत ईश्वरविषयक प्रेमाच्या अत्यल्प किरणाचाहि प्रवेश तेथें व्हावयाचा नाहीं. असें होणें ही गोष्ट सर्वथा अशक्य आहे. कांहींतरी आकांक्षा चित्तांत शिल्लक ठेवून परमेश्वराचें भजन करणें आणि वाण्याचें दुकान घालणें हीं कर्मे सारख्याच योग्यतेचीं आहेत. परमेश्वरा, मी तुझी भक्ति करितों तिच्या बदल्यांत मला अमुक दे असें म्हणणें हें वाणिज्य नव्हे तर काय ? यावर परमेश्वरहि उलट म्हणूं लागतो कीं, ठीक आहे; अमुक कर्म तूं केलें नाहींस, तर तूं मेल्यावर पाहून घेईन. तुला तापलेल्या तव्यावर भाजून काढीन. असल्या प्रकारच्या क्षुद्र कल्पनांना आमच्या चित्तांत अस्तित्व आहे, तोंपर्यंत वेडें करणारें गोपींचें प्रेम आम्हांस कोठून समजणार ? तें समजून घेण्याची इच्छा असेल तर धनतृष्णा आणि कीर्तितृष्णा आपल्या हृदयांतून प्रथम हद्दपार करा आणि या क्षणभंगुर जगाचें अस्तित्वहि विसरून जा. असें झालें तरच गोपींच्या प्रेमाची थोडी तरी कल्पना तुम्हांस येईल. या प्रेमाला जगाचा स्पर्श झाला कीं, तें ताबडतोब विटाळतें. मोठें नांव, मोठी कीर्ति, विपुल संपत्ति इत्यादि ऐहिक तुच्छ पदार्थांचा पूर्ण विसर तुम्हांस प्रथम पडूं द्या. तसें झालें तरच गोपींच्या प्रेमाचें रहस्य तुम्हांस समजेल. या प्रेमाचें स्वरूप इतकें पवित्र आहे कीं, ऐहिक वस्तूंच्या पापाचा संपर्कहि त्याला खपावयाचा नाहीं. जीवात्मा पूर्ण निष्कलंक होईपर्यंत या प्रेमाचा अंशहि त्याला सांपडावयाचा नाहीं. स्त्रीपुरुष भावना, पैशाची हांव आणि कीर्तीची इच्छा यांच्या उकळ्यांवर उकळ्या आमच्या चित्तांत फुटत

असतांना गोपींच्या प्रेमाची मीमांसा करून त्याचें रहस्य जाणण्याची इच्छा करणें हें शुद्ध वेडेपण आहे. असें करण्याची छाती तरी आम्हांस कशी होते, याचेंच मला मोठें नवल वाटतें. कृष्णावताराचें सारें रहस्य या एकाच कथेंत सांठविलेलें आहे. साऱ्या अवतारकार्यांचा अर्क येथें उतरला आहे. फार काय, पण तत्त्वमंदिरावर कळसाच्या जागीं शोभणारी जी गीता तीहि गोपीप्रेमाच्या आवेशापुढें फिकी पडते. मानवी जीविताचें अंतिम साध्य दाखवून त्याकडे हळू हळू प्रवास कसा करावा हें गीतेनें सांगितलें आहे. हा सारा मार्ग लांब पल्ल्याचा आणि कंटाळवाणा आहे. भक्तिरसाचें आकंठ पान करून त्याच्या धुंदींत साऱ्या विश्वाला तुच्छ लेखणारा आवेश गीतेंत नाहीं. ज्या ठिकाणीं गुरु आणि शिष्य, अध्ययन आणि अध्यापन, ग्रंथ आणि तत्त्वविचार, हीं सारीं एकरूप होऊन दुजेपणाचें भानहि जेथें उरत नाहीं, असलें भक्तिरसानें उत्पन्न होणारें शुद्ध वेड गीतेंत कोठें आहे ? ज्या ठिकाणीं परमेश्वराचें अस्तित्वहि लय पावतें, ज्या ठिकाणीं स्वर्ग आणि वैकुंठ असल्या कल्पनांचाहि उदय होत नाहीं, अथवा ज्या ठिकाणीं भीति, हर्षविषादादि ऐहिक भावनांचा पुसटहि वास नसतो, असली धुंदी गीतेंत कोठें आहे ? येथें सर्व दुजेपणाचा पूर्ण लय झाला आहे, आणि जें कांहीं उरलें तें शुद्धप्रेमाचें वेड. या ठिकाणीं कृष्णावांचून दुसऱ्या कशाचेंहि भान त्याच्या भक्ताला होत नाहीं. तो जिकडे पाहील तिकडे एक कृष्णच त्याला दिसत असतो. बाह्य जगांत काय, अथवा अंतःसृष्टीच्या अगदीं अतर्मंदिरांत काय, कृष्णरूपावांचून दुसरा कशाचाहि प्रत्यय त्याला येत नाहीं. अखिल सृष्टीला तो कृष्णरूपानें पहातो, आणि स्वतःचें मुखहि त्याला कृष्णस्वरूप दिसतें. त्याचा जीवात्माहि शुद्ध कृष्णमय होऊन गेलेला असतो. कृष्णचरिताच्या या भागांत सांठविलेलें रहस्य हेंच आहे.

कृष्णचरिताचा अभ्यास ज्याला करावयाचा असेल, त्यानें बारीकसारीक तपशीलाच्या नादीं लागूं नये. केवळ ठोकळ दृष्टीनें या चरित्राचा जेवढा सांगाडा दिसेल तोच हिशेबीं घेऊन त्यांतील खरें रहस्य कोठें आहे एवढाच शोध करावा. केवळ ऐतिहासिक दृष्ट्या यांत पुष्कळ विषम गोष्टी आढळून येतील, कित्येक ठिकाणीं परस्परविरोधहि दिसेल, कित्येक ठिकाणीं एखाद्या अनधिकाऱ्यानें घुसडून दिलेल्या गोष्टींची खिचडी झाली असेल. या साऱ्या

गोष्टी खऱ्या असतील; तथापि या साऱ्यांना कांहीं तरी मूळ पाया असला पाहिजे. इतका एकच मुद्दा तुम्ही ध्यानांत धरा. एवढी मोठी प्रचंड इमारत पायावांचून उभी राहिली नाहीं हें निःसंशय सिद्ध आहे. याकरितां बारीकसारीक गोष्टींचा मेळ घालण्याच्या भानगडींत न पडतां, मुख्य मुद्दा लक्षांत घेऊन त्याचें रहस्य जाणावें हेंच आपणांस उचित आहे.

कोणत्याहि अवतारी पुरुषाचें चरित्र तुह्मीं पाहिलें तर त्याचा अवतार होण्याच्या पूर्वी जो कांहीं कल्पनासमूह अस्तित्वांत होता, त्याचेंच उत्क्रांतरूप त्या अवतारी पुरुषाच्या द्वारें व्यक्त झालें आहे, असें आपल्या निदर्शनास येईल. त्या त्या देशांत त्या त्या काळीं जीं धर्मतत्त्वें इतस्ततः वावरत होतीं, त्यांचें एकीकरण करून तीं सुसंबद्ध रूपानें जनतेस शिकविण्याचें कार्य तो करीत असतो. दीर्घ काळानंतर असा एखादा पुरुष वास्तविक अस्तित्वांत तरी होता कीं नाहीं अशी शंका उत्पन्न होऊं लागणें हल्लीं साहजिक आहे. पण तसें झालें तरी त्यानें सांगितलेलें तत्त्वज्ञान नष्ट झालेलें नसतें. जगांत तें सदोदित जिवंत रूपानें वावरत असतें. निष्काम कर्म, निष्काम प्रेम, आणि कृष्णानें सांगितलेलें दुसरें तत्त्वज्ञान या वस्तू आज मेलेल्या आहेत काय ? त्यांचें सजीव अस्तित्व आपल्या डोळ्यांनीं आज आपणांस दिसत नाहीं काय ? मग हीं तत्त्वें कोणातरी एका व्यक्तीपासून उद्भवलीं असलीं पाहिजेत असें आम्हीं म्हटलें तर त्यांत चूक काय आहे ? हीं तत्त्वें आकाशांतून पडलीं आणि धरणीवर सांवरलीं असें तर झालें नाहीं हें खास. मग तीं जेथून प्रथम निर्माण झालीं असें एक मूलस्थान असलें पाहिजे, असें म्हणणें चुकीचें आहे काय ? या तत्त्वांचा प्रचार भगवान् श्रीकृष्णांनीं प्रथम केला, असें म्हणण्यांत आम्ही कांहीं चूक करीत नाहीं. भगवान् श्रीकृष्णांनीं आरंभिलेलें हें कार्य भगवान् श्रीव्यासांनीं पुढें चालविलें. कृष्णचरित्रांतील सर्वश्रेष्ठ भाग गोपीचरित हाच होय; आणि कृष्णाला लावण्यांत येणाऱ्या अनेक विशेषणांत 'गोपीजनवल्लभ' हें विशेषण सर्वश्रेष्ठ आहे. या भक्तिरसाच्या आवेशानें तुमच्या मेंदूंत प्रवेश केला म्हणजे मंगलमय गोपींचें रहस्य तुम्हांस समजेल आणि त्याच वेळीं खरी भक्ति म्हणजे काय याचाहि उलगडा होईल. या वेळीं सारें जग तुम्हांस अदृश्य होईल, साऱ्या कल्पना, भावना आणि आकांक्षा चित्तांतून पार वितळून जातील. तुमचें चित्त नितांत शुद्ध होईल आणि भक्तीशिवाय दुसरी

कसलीहि आकांक्षा तेथें राहणार नाहीं. फार काय पण सत्य वस्तूच्या शोधांत आपण होतों हेंहि स्मरण तुम्हांस राहणार नाहीं. इतकें झालें म्हणजे गोपींच्या निष्काम प्रेमाचा प्रचंड ओघ तुम्हांला अंतर्बाह्य भरून टाकील. मानवी जीविताचा अंतिम हेतु हाच आहे. हें साधलें म्हणजे सर्व कांहीं साधेल.

आतां कृष्णचरितांतील याहून अलीकडच्या पायरीचा विचार करूं. हा गीताकथन करणारा कृष्ण होय. गीतेसंबंधीं विचार मनांत आला, म्हणजे आमच्या देशांत या बाबींत चालत असलेल्या विलक्षण तंट्याची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. हे तंटे अर्वाचीन काळींच सुरू झाले आहेत. गोपीजनवल्लभ श्रीकृष्ण ही व्यक्ति आमच्यांतील कांहीं पंडितंमन्यांस आवडत नाहींशी दिसते; आणि याचें कारण हेंच कीं, युरोपियन पंडितांस ती आवडत नाहीं. डाक्टर अमुकतमुक यांच्या पसंतीस ती उतरत नाहीं. बस; त्या गोपींनीं आणि त्या श्रीकृष्णानें निजधामास गेलेंच पाहिजे. अहो युरोपीय पंडितांच्या परवानगीशिवाय कृष्ण जगूं तरी शकेल काय? छे, ही गोष्ट कधींच शक्य नाहीं. याकरितां असा गोपीजनवल्लभ कृष्ण कधीं अस्तित्वांतच नव्हता असा पुरावा मिळविला पाहिजे. महाभारतांत एकदोन स्थळांशिवाय गोपींचा उल्लेख कोठेंहि नाहीं; आणि तीं स्थळेंहि महत्वाचीं आहेत असें नाहीं. द्रौपदीनें केलेल्या श्रीकृष्णस्तुतींत वृंदावनांतील कृष्णचरित्राचा उल्लेख आहे; त्याचप्रमाणें शिशुपाळाच्या एका भाषणांतहि वृंदावनाचा उल्लेख आहे. पण तसें असलें म्हणून काय झालें? हीं स्थळें क्षेपक आहेत असें म्हणावें. युरोपियांना जें आवडत नाहीं तें अर्थातच त्याज्य असल्यामुळें फेकून देणें अवश्य आहे. याकरतां जेथें जेथें गोपी आणि श्रीकृष्ण असे उल्लेख आढळतील तीं स्थळें क्षेपकच असलीं पाहिजेत. ठीक आहे. जीं माणसें शुद्ध वाणिज्यांत डोक्याच्या वर बुडून गेलीं आहेत, आणि ज्यांचीं धर्मसाधनें आणि साध्येंहि शुद्ध दुकानदारीच्या प्रकाराचीं झालीं आहेत, त्यांनीं असा प्रकार करावा यांत नवल नाहीं. येथें कांहीं धर्मसाधन करावयाचें तें पुढें स्वर्गसुख मिळावें म्हणून. या वाणगटांना आपलें भांडवल चक्रवाढ व्याजांत गुंतविण्याची इच्छा आहे. येथें एक पैसा दिला म्हणजे स्वर्गांत एक रुपया मिळेल, या हिशेबानें आपलीं सर्व कामें हे करीत असतात. असल्या प्रकारच्या विचारसरणींत गोपींना स्थान मिळूं नये हें सर्वथैव योग्य आहे!

कारण, गोपींना वाणिज्य ठाऊक नव्हतें. कोणत्या प्रकारच्या भक्तीचें फळ कोणत्या प्रतीचें मिळतें ह्या हिशेब त्यांना समजत नव्हता. मग असल्या गैर-हिशेबी गोपी ह्या वणिग्जनांना खपणार कशा ?

आतां गोपींच्या निष्काम भक्तीचें हें अत्युच्च वातावरण सोडून आपण जरा अलीकडे येऊं. श्रुतींचा खरा अर्थ भगवद्गीतेंत जसा स्पष्ट झाला आहे, तसा दुसऱ्या कोठेंहि तो पाहण्यांत येत नाहीं. किंबहुना, याहून अधिक स्पष्ट अशा स्वरूपाचें श्रुतींचें विवरण करणेंहि शक्य नाहीं. श्रुति आणि आरण्यकें यांचें रहस्य जाणणें फार कठिण आहे. यांचा अर्थ जो तो आपापल्या परी लावूं पहात असतां मतांचा आणि मतांतरांचा विलक्षण गलबला झाला आहे असें पाहून परमेश्वरानें स्वतः अवतार धारण केला. ज्याच्या श्वासापासून श्रुती उद्भवल्या, त्यानेंच त्यांचा खरा अर्थ सांगितला पाहिजे हें उघड आहे; आणि तो अर्थ सांगण्याकरितांच भगवान् श्रीकृष्ण अवतरले आणि गीतेच्या रूपानें हें विवरणाचें कार्य त्यांनीं केलें. श्रुतींच्या याहून अधिक चांगल्या अर्थाची गरज हिंदुस्थानाला नाहीं; आणि जगालाही ती नाहीं. श्रुति आणि आरण्यकें यांवर ज्या कांहीं टीका गीतातत्त्वानंतर झाल्या, त्या टीकाकारां-नाहि पुष्कळ प्रसंगीं श्रुतींचें रहस्य समजलें नाहीं. त्या ओघाची दिशा त्यांच्या ध्यानांत आली नाहीं हें मोठें नवल आहे. एखाद्या अद्वैतवाद्यानें एखाद्या उपनिषद् ग्रंथावर टीका सुरू केली म्हणजे त्यांत पुष्कळ विलक्षण प्रकार तो करितो. मूळ संहितेंत द्वैतप्रतिपादक कांहीं मजकूर आला कीं, त्याची विलक्षण ओढा-ताण करून आणि त्याला हवातसा पिळवटून त्यांतून स्वमतप्रतिपादक असा अर्थ तो निर्माण करितो. अशा रीतीनें एकंदर संहितेला आपलें मत बोलून दाखवावयास तो लावीत असतो. असला प्रकार गीतेंत तुम्हांला कोठेंही आढळावयाचा नाहीं; कारण, मनुष्यप्राण्याची उत्क्रान्ती पायरीपायरीनें होत असते, हा सिद्धांत भगवंताला पूर्णपणें अवगत आहे. याकरितां द्वैत आणि अद्वैत या पायऱ्या आपापल्या ठिकाणीं असणें हें उचित आहे, असें तो म्हणतो. जडाक-डून सूक्ष्माकडे, सूक्ष्माकडून सूक्ष्मतराकडे आणि द्वैतापासून शुद्ध अद्वैताकडे मनु-ष्यप्राण्याचा प्रवास हळू हळू होत असतो हें तो जाणून आहे. गीतेंतही हेंच अनुसंधान सर्वत्र बाळगिलें आहे. कर्मकांडाचा विचारहि गीतेनें केला आहे, आणि कर्में प्रत्यक्ष मोक्षादायी नसलें तरी परंपरेनें मोक्षमार्गावर तुम्हांस तें

आरूढ करितें असें तेथें दर्शविलें आहे. पूर्ण कर्मसंन्यास इष्ट असला तरी कर्म त्याज्य नाहीं. मूर्तिपूजा अखेरचें फळ देत नसली तरी मूर्ति त्याज्य नाहीं. यज्ञ-यागादि क्रिया मोक्षदायी नसल्या, तरी मधल्या मुक्कामाच्या पायऱ्या म्हणून त्याही इष्ट आहेत. सारांश इतकाच कीं, चित्ताची शुद्धि होण्याकरितां ह्या एकाच हेतूनें जी जी क्रिया घडेल ती सारी इष्टच आहे. परमात्मपूजन हेंहि इष्ट आहे. कारण, त्या मार्गानेंहि अखेरची सिद्धि प्राप्त होणारी आहे. शुद्ध चित्तानें मूर्तीची पूजा तुम्हीं केली तर तीहि इष्टफलदायी होईल. अखेरच्या मुक्कामाकडे जाणारे हे अनेक मार्ग आहेत–आणि इतके अनेक मार्ग असणें हें अवश्यहि आहे. मनुष्यजातीला त्यांची आवश्यकता नसती तर ते निर्माण तरी कां झाले असते ? अनेक धर्म आणि अनेक पंथ ही शुद्ध भोंदूंची क्रिया आहे असें म्हणण्याचें कारण नाहीं. आपमतलबी लोकांनीं स्वार्थसाधूपणानें हीं जाळीं निर्माण केलीं आहेत असें नाहीं. केवळ स्वतःचे खिसे भरावे म्हणून या गोष्टी कोणींहि केलेल्या नाहींत. आमच्या अर्वाचीन पंडितांचा तसा समज असेल तर ती नाइलाजाची गोष्ट आहे. त्यांचीं मतें शुद्ध बुद्धिवादाला पट-ण्यासारखीं दिसत असलीं तरी त्यांत सत्याचा अंशहि नाहीं. हे धर्म आणि हे पंथ यांची उत्पत्ति कोणींही केवळ स्वार्थासाठीं केलेली नाहीं. जीवात्म्याला असलेल्या आवश्यकतेंतूनच ते निर्माण झाले आहेत. मागणीला अनुरूप अशाच वस्तू नेहमीं निर्माण होत असतात. ‘ पिंडे पिंडे मतिर्भिन्ना ’ या न्यायानें या वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक मतींची तृष्णा शांत करण्याकरितां हे पंथ निर्माण झाले आहेत. याकरितां त्यांजवर एवढे निकराचे हल्ले कर-ण्याचें कांहींच कारण नाहीं. त्यांची जरूरी नाहींशी झाली, कीं तेही आपो-आप नाहींसे होतील; आणि त्यांची जरूरी आहे, तोंपर्यंत त्यांजविरुद्ध कि-तीही कडक टीका तुम्हीं केली अथवा आपलीं मनगटें तुम्हीं कितीहि चावलीं तरी ते जिवंत राहणारच. तरवारीचा मोठा लखलखाट तुम्ही करा अथवा प्रचंड तोफखाने लावा, कांहीं झालें तरी त्यांचें अस्तित्व राहणारच. सर्व एक धर्म करण्याच्या हेतूनें मानवी रक्ताच्या नद्या तुम्हीं वाहविल्या तरी मूर्तीचें अस्तित्व नाहींसें होणार नाहीं. हे अनेक पंथ म्हणजे विश्वव्यापी धर्मांतील अनेक पायऱ्या होत; आणि त्यांचें अस्तित्व कां आहे याचा उलगडा भग-वान् श्रीकृष्णांनीं गीतेंत उत्तम प्रकारें केला आहे.

आतां यापुढें हिंदुस्थानांतील धर्मांच्या इतिहासाचा दुःखद काल सुरू होतो. गीतेच्या कालींहि मतामतांतील द्वंद्वांस सुरवात झाली असावी असें दिसतें. सारे तंटे आणि द्वंद्वें मोडून सर्वत्र सलोखा आणि एकवाक्यता निर्माण करण्याकरितांच परमेश्वर श्रीकृष्णरूपानें अवतरला. भगवान् म्हणतात, **'मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ।'** या द्वंद्वांस प्रारंभ झाला त्याच्या अगोदरच्या काळीं या सर्व मतांत सहिष्णुता नांदत असावी असें मानण्यास जागा आहे. यानंतर वेगवेगळ्या मतांतच युद्धास सुरवात झाली असें नसून जातिभेदहि बळावत गेला; आणि जातीजातींतहि परस्पर तंटयास सुरवात झाली. हिंदुसमाजरचनेंत क्षत्रिय आणि ब्राह्मण हे दोन प्रमुख आणि सामर्थ्यवान् वर्ण आहेत. आणि याच वर्णांत प्रथम युद्धास सुरवात झाली. समाजाच्या थेट अत्युच्च शिखरावरून निघालेला रणनदीचा हा ओघ साऱ्या हिंदुस्थानभर पसरला; आणि सारा आर्यावर्त त्याखालीं बुडून गेला. सुमारें हजार वर्षेंपर्यंत अशी परिस्थिति राहिल्यानंतर दुसरा एक देदीप्यमान तारा हिंदभूमीच्या क्षितिजावर उदयास आला. हा गौतम शाक्यमुनि होय. बुद्धदेवाचीं मतें आणि त्यानें सांगितलेला धर्म यांची सामान्य माहिती बहुधा आपणा साऱ्यांस आहेच. भगवान् बुद्धदेवालाहि आम्ही अवतारी पुरुष मानतों. जगांत अत्युच्च नीतीचा धडा बुद्धदेवानें प्रथम शिकविला. बुद्धदेव महान् कर्मयोगी होता. भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेंत प्रथम परोक्षतत्त्वांचें विवेचन केलें आणि त्यांचा प्रत्यक्ष आचार कसा करावा हें शिकविण्याकरितांच जणूं काय बुद्धदेवाच्या रूपानें ते पुनः अवतरले.

**'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायतो महतो भयात्'** हा गीतेचा ध्वनि भरतभूमींत पुनः वावरूं लागला. **'स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः तेऽपि यांति परां गतिम्'** असें म्हणण्याचा काळ पुनः आला. सर्वांच्या शृंखलांचे पाश तुटून गेले. ज्ञानमंदिराकडे जाण्याचा रस्ता सर्वांना मोकळा झाला. **'इहैव तैर्जितः स्वर्गः येषां साम्ये स्थितं मनः ।'** या तत्त्वरत्नाचा उच्च घोष पुनः सुरू झाला. या गीतेंतील वचनांचा आचार प्रत्यक्ष उदाहरणानें दाखविण्याकरितां भगवान् श्रीकृष्ण शाक्यमुनीच्या रूपानें अवतरले. या अवतारांत राजांचें आणि साम्राज्यांचें कार्य त्यांनीं केलें नाहीं. शाक्य मुनीचा अवतार दीनदुबळ्यांकरितां होता. शाक्यमुनींनीं देवांच्या गीर्वाण वाणीचाहि त्याग करून

सामान्यांच्या वाणींत आपल्या उपदेशाचें कार्य केलें. आपला उपदेश सामान्य जनतेच्या अंतःकरणापर्यंत थेट पोंचावा म्हणून तिच्याच भाषेंत ते बोलूं लागले. दरिद्री, दुःखी आणि क्षुद्र अशा लोकांचा सहवास प्रत्यक्ष घडावा म्हणून राज्यासनादि त्यांनीं दूर झुगारून दिलें. रामाप्रमाणेंच शाक्यमुनींनींहि अंत्यजाला निर्भर आलिंगन दिलें.

भगवान् शाक्यमुनींचें अवतारकार्य आणि त्यांचें जीवनचरित्र सर्वांस ठाऊक आहेच. पण अत्यंत दुःखाची गोष्ट ही की, त्या कार्याचा उपयोग व्हावा तितका झाला नाहीं. हा दोष शाक्यमुनींचा नाहीं हें उघड आहे. त्यांचें चरित्र अत्यंत पवित्र आणि अत्यंत उज्वल होतें याबद्दल कोणास शंकाही येणार नाहीं; पण त्या वेळीं हिंदुस्थानांत ज्या असंस्कृत जाती होत्या, त्यांना इतकीं उच्च तत्त्वें पचण्यासारखीं नव्हतीं. आर्यांबरोबर इतर पुष्कळ रानटी जातीहि त्या काळीं मिसळल्या होत्या. आपले रानटी पूजनप्रकार आणि पुष्कळसें धर्मवेड हीं बरोबर घेऊन आर्यांच्या किल्ल्यांत त्यांनीं प्रवेश केला होता. आर्यांच्या संस्कृतीची छाप त्यांजवर पडली असावी असें आरंभीं वाटलें, पण हा निवळ भ्रम होता. एक शतकहि पुरें लोटलें नाहीं तोंच त्यांनीं आपल्या टोपलींतले सर्प आणि आपली सारी भुतावळ बाहेर काढली. आपल्या साऱ्या प्राचीन पूर्वजांची ही संपत्ति बाहेर काढून ती साऱ्या हिंदुस्थानभर त्यांनीं वांटून दिली; आणि अशा रीतीनें आर्यावर्ताच्या धर्माची अवनती होऊन तो देश धर्मभोळेपणाचें एक साम्राज्य बनून गेला. आरंभींच्या बुद्धानुयायांनीं पशुहनन बंद करण्याकरितां वेदप्रणीत यज्ञयागांवर मोठ्या निकराचा हल्ला केला. प्राचीन काळीं प्रत्येक घरीं यज्ञ होत असे; आणि धर्मसाधनाचा मुख्य मार्ग तोच गणला जात असे. बौद्धांच्या हल्ल्यांनीं या क्रिया बंद पडल्या; आणि त्यांच्या जागीं भपकेबाज देवालयें, भपकेबाज पूजोपचार आणि स्वयंमन्यमान पुजारीवर्ग या वस्तू निर्माण झाल्या. या साऱ्यांचें अस्तित्व हिंदुस्थानांत आज आपणांपुढें प्रत्यक्ष आहेच. ब्राह्मणांच्या मूर्तिपूजेचा विध्वंस बुद्धदेवानें केला, असें कांहीं अर्वाचीन पंडित म्हणतात, तेव्हां मला खरोखरच मोठें हंसूं येतें. गीर्वाण साहित्यांत स्वतःस प्रवीण म्हणविणाऱ्या या पंडितांनीं तरी अधिक विचार करावयास हवा होता. ब्राह्मणी धर्माची उत्पत्ति बुद्धदेवानंतर झाली हें यांस कळावयास हवें होतें.

हिंदुस्थानांत मूर्त्तिपूजेचा प्रचार बौद्ध धर्मानंतर झाला. वर्षा दोन वर्षांपूर्वी एका रशियन गृहस्थानें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत ख्रिस्तचरित्र सांगत असतां येशू ख्रिस्त जगन्नाथाच्या देवालयांत ब्राह्मणी धर्म शिकण्याकरितां गेला असल्याचें सांगितलें आहे. पण ब्राह्मणी धर्मांतील मूर्तिपूजा, आणि स्वतःस श्रेष्ठ समजून इतरांपासून विभक्त राहण्याचा त्यांचा बाणा या गोष्टींनीं ख्रिस्ताचें मन कंटाळून बौद्ध लामाकडे तो निघून गेला, असाहि शोध या रशियन ग्रंथकारानें लाविला आहे. हिंदुस्थानाच्या इतिहासाची यत्किंचितहि माहिती ज्याला आहे, त्याला या दंतकथेचा फोलपणा तेव्हांच पटेल. जगन्नाथाचें देवालय बौद्धांचें आहे, ही गोष्ट सर्वविश्रुत आहे. हें प्राचीन देवस्थान आणि त्याबरोबरच कित्येक दुसरींहि बौद्धांपासून हिरावून घेऊन हिंदु धर्मानुयायांनीं तीं आपलीं देवस्थानें बनविलीं. अशाच गोष्टींची पुनरावृत्ति यापुढें आणखीहि कित्येक वेळां होणार आहे. जगन्नाथाच्या देवालयाची हकीकत अशा प्रकारची आहे. ख्रिस्ताच्या काळीं तेथें एकहि ब्राह्मण नव्हता. इतिहास अशा प्रकारचा असतां ब्राह्मणी धर्म शिकण्याकरितां येशू ख्रिस्त जगन्नाथास गेला, हा शोध या रशियन पंडितानें कोठून लाविला हें समजणें दुरापास्त आहे. 'सर्वां भूतीं दया' हें बुद्धदेवाच्या धर्माचें आदितत्त्व आहे. बौद्ध धर्म हा मुख्यत्वेंकरून अत्युच्च नीतिप्रवर्तक धर्म आहे. तथापि हा धर्म इतका उच्च असतांहि हिंदुस्थानांतून तो क्रमशः नाहींसा होत गेला; आणि त्याच्या नाशानंतर जें धर्मस्वरूप तेथें शिल्लक राहिलें तें अत्यंत किळसवाणें होतें. यांत घाणेरडे प्रकार किती होते, याचें यथातथ्य वर्णन करण्यास आज मला अवकाश नाहीं, आणि तसें करण्याची माझी इच्छाही नाहीं. अत्यंत उद्वेगजनक आचार, अत्यंत भयंकर पूजाप्रकार आणि अत्यंत किळसवाणीं चोपडीं हीं या काळीं निर्माण झालीं. जितक्या घाणेरड्या कल्पना मनुष्याच्या मेंदूंत निर्माण होणें शक्य आहे आणि जितके घाणेरडे शब्द मानवी हस्तानें लिहिले जाण्यासारखे आहेत, तितक्या साऱ्या कल्पना या काळीं प्रसार पावून तितके घाणेरडे शब्द या काळीं लिहिले गेले. क्रूर पशूंना शोभतील असे अत्याचार धर्माच्या वेषानें समाजांत खुशाल वावरूं लागले. बौद्ध धर्माचें विकृत रूप अशा प्रकारचें झालें.

पण भरतभूमीनें अजून जगावें, असा ईश्वरी संकेत होता; आणि याकरितां त्यानें पुनः एकवार अवतार घेतला. 'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भ-

वति' या आपल्या वचनाची पूर्तता पुनः एकवार त्यानें केली. या वेळीं हा अवतार हिंदुस्थानाच्या दक्षिण भागांत झाला. ब्राह्मणकुळांत जन्म घेतलेल्या या अवतारी पुरुषानें आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षी आपलें ग्रंथलेखन पुरें केलें, असा लोकप्रवाद आहे. या अवतारी तरुणाचें नांव शंकराचार्य असें आहे. केवळ सोळा वर्षांच्या वयांत या बाल आचार्यांनीं जी ग्रंथसंपत्ति निर्माण केली आहे, ती पाहून आश्चर्यानें सारें जग थक्क होऊन जातें. पूर्वकालीं भरतभूमीनें जें धर्मकार्य केलें आणि त्या वेळीं ती पावित्र्याचें वसतिस्थान होऊन राहिली होती तेंच पावित्र्य तिला पुन्हां प्राप्त करून द्यावें, असा या आचार्यांचा हेतु होता; पण हिंदुस्थानाची अवनति या वेळीं कोणत्या थराला पोंचली होती, याचा क्षणभर विचार केला म्हणजे हें कार्य किती दुष्कर होतें हें तेव्हांच दिसून येईल. या वेळेच्या परिस्थितीचें अल्पसें वर्णन मीं तुम्हांस आधीं सांगितलेंच आहे. आजमितीसहि जे भयंकर प्रकार हिंदुस्थानांत तुम्हांस आढळून येतात आणि जे नाहींसे करण्यासाठीं तुम्ही इतकी धडपड करितां, त्यांची उत्पत्ति या परिस्थितींतूनच झाली आहे. अवनतीचें साम्राज्य त्या काळीं अकुतोभय चालू होतें. तार्तार, बलुची इत्यादि अनेक पशुतुल्य रानटी जाती हिंदुस्थानांत आल्या होत्या. येथें आल्यानंतर बौद्धधर्माचा स्वीकार त्यांनीं केला. आमच्याशीं त्यांची सरमिसळ होऊन गेली. त्यांच्या चालीरीतीहि आमच्यांत मिसळून गेल्या; आणि अशा रीतीनें हिंदी राष्ट्रांत भयंकर चालीरिती आणि पशुतुल्य आचरण यांचा सुकाळ झाला. स्वतःच्या विनाशकाळीं बौद्धधर्मानें आपली वारसदारी म्हणून जो कांहीं ठेवा मागें ठेविला तो हाच; आणि शंकराचार्यांनाहि या ठेव्याचा स्वीकार करूनच आपला पुढील मार्ग चोखाळणें अवश्य होतें. आचार्यांच्या काळानंतर हिंदुस्थानाला जें स्वरूप प्राप्त झालें, तें वेदान्तानें बौद्ध अवनतीवर मिळविलेल्या विजयामुळेंच होय. आचार्य गेले, तथापि हा झगडा अद्यापिहि पुरा झाला नसून तो तसाच पुढें चालू आहे. श्रीशंकराचार्य महान् तत्त्ववेत्ते होते. बौद्धधर्माचीं अंतिम तत्त्वें आणि वेदांत धर्म यांत फारसा फरक नाहीं हें आचार्यांनीं सिद्ध केलें. बौद्ध भिक्षूंना स्वधर्माच्या आद्यप्रवर्तकाचीं तत्त्वें यथार्थपणें न समजल्यामुळेंच भलत्या मार्गानें जाऊन त्यांची अवनति झाली. बुद्धदेवाच्या शिकवणीचें रहस्य त्यांच्या गळीं न उतरल्यामुळें जीवात्मा

आणि परमात्मा यांचें अस्तित्व विसरून जाऊन ते निरीश्वरवादी झाले, असेंहि आचार्यांनीं सिद्ध केलें आहे. आचार्यांच्या या तत्त्वांचा प्रसार होऊन लोकांना तीं पटतांच या लोकगंगेच्या प्रवाहाची दिशा बदलली. हिंदु लोक आपल्या प्राचीन धर्माकडे पुनः वळूं लागले. पण पूर्वीच्या अनेक चाली त्यांच्या अंगीं इतक्या पक्क्या खिळून गेल्या होत्या कीं, त्यांचा त्याग त्यांना सहसा करवेना.

यानंतर श्रीरामानुजांचा अवतार झाला. श्रीशंकराचार्य विशालबुद्धि होते, यांत शंका नाहीं. तथापि अंतःकरणाची आर्द्रता त्यांजपाशीं नव्हती, असें मला म्हणावेंसें वाटतें. त्यांची बुद्धि जितकी विशाल होती तितकी विशालता अंतःकरणाला नव्हती. रामानुज या बाबींत त्यांच्याहून अधिक श्रेष्ठ होते. समाजाच्या तळीं वावरणाऱ्या कनिष्ठ वर्गाबद्दल रामानुजांचें चित्त कळवळलें होतें. या वर्गाबद्दल त्यांच्या चित्तांत अत्यंत सहानुकंपा होती. या वर्गाला धर्ममार्गाला लावावयाचें तर शुद्ध तत्त्वप्रधान धर्म त्यांना पटावयाचा नाहीं, ही गोष्ट रामानुजांच्या लक्षांत आली. या वर्गाची बुद्धि जड, तत्त्वांचें आकलन करण्याचें सामर्थ्य तिला नाहीं, याकरितां हीं परोक्षतत्त्वें प्रत्यक्ष विधिविधानांच्या रूपानें त्यांजपुढें मांडलीं पाहिजेत, हें लक्षांत आणून रामानुजांनीं जुने पूजाप्रकार शुद्ध करून ते पुनः चालू केले आणि त्यांत कांहीं नव्यांचीहि भर घातली. ज्यांना परोक्ष तत्त्वें पटविण्याचा दुसरा कोणताहि मार्ग उपयोगी नाहीं, त्यांच्याचकरितां ही तयारी रामानुजांनीं केली होती. पण असें करीत असतांहि तत्त्वज्ञानमंदिराचें कवाड त्यांनीं बंद केलें नाहीं. ब्राह्मण आणि त्यांच्याचसारख्या दुसऱ्या उच्च वर्णांकरितां तत्त्वज्ञानाची सोपानपरंपरा निर्माण करून पूजनाचा उच्च प्रकारही त्यांनीं सुरू केला. अशा रीतीनें अगदीं तळांतल्या अंत्यजापासून तों थेट सर्वश्रेष्ठ ब्राह्मणापर्यंत सर्वांनाच धर्माचा मार्ग रामानुजानें मोकळा करून दिला. रामानुजांनीं जें कार्य केलें त्याचें स्वरूप अशा प्रकारचें आहे. रामानुजांच्या या कार्याचा प्रसार उत्तरेकडेहि झाला. तथापि तेथें त्याचें स्वरूप परिणतावस्थेस येण्यास बराच काळ लोटावा लागला. मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊं लागेपर्यंत उत्तरेंतील धर्मग्लानि समूळ नाहींशी झाली नव्हती. यानंतर तेथें थोडेबहुत धर्मवीर निर्माण होऊं लागले आणि समाजसुधारणेचें बरेंच कार्य त्यांनीं केलें. या सर्वांच्या मुकुटस्थानीं योजना करण्यासारखें नांव म्हटलें म्हणजे श्रीचैतन्य यांचेंच

होय. रामानुजांच्या काळापासून धर्मोन्नतीचा मार्ग सर्वांस सरांस मोकळा झाला, ही गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. रामानुजांनंतर जितके धर्मगुरू झाले, तितक्या साऱ्यांनीं हा मुद्दा लक्ष्यांत ठेवला होता. श्रीशंकराचार्यांच्या काळापूर्वीचेही धर्मगुरु या बाबींत मागें नव्हते. खुद्द शंकराचार्यांनींहि खालच्या वर्गासाठीं कांहींच केलें नाहीं. अथवा त्यांच्या धर्मोन्नतीला विरोध केला असा आक्षेप त्यांजवर कां यावा हें मला समजत नाहीं. त्यांच्या साऱ्या ग्रंथभांडारांत अशा अर्थाचा एक शब्दही मला दिसत नाहीं. आतां आचार्यांच्या कालानंतर त्यांची ग्रंथसंपत्ति एखाद्या विशिष्ट वर्गाच्या हातांत राहिली असेल तर तो त्यांचा अपराध नाहीं. भगवान् बुद्धाचीहि अशीच गोष्ट झाली. त्यांच्या तत्त्वांचें मूळरूप त्यांच्या शिष्यपरंपरेच्या हातीं आल्यानंतर ते भ्रष्ट झाले. चैतन्य हे मुख्यतः भक्तिमार्गप्रवर्तक होते. गोपींची शुद्धभक्ति त्यांच्या ठिकाणीं अवतीर्ण झाली होती. भक्तीचें वेड त्यांना लागलें होतें. त्यांचा जन्म अत्युच्च आणि शुद्ध बुद्धिमार्गी ब्राह्मणकुलांत झाला होता. न्यायशास्त्रांत ते स्वतः अत्यंत प्रवीण होते. प्रतिपक्षाबरोबर अनेक शब्दयुद्धें करून त्यांत ते विजयी झाले होते. अशा सभा जिंकणें हीच ब्राह्मण पंडिताच्या जन्माची इतिकर्तव्यता आहे असा समज त्या काळीं होता, आणि चैतन्यांनाहि याच समाजाचें बाळकडू लहानपणापासून मिळालें होतें; पण कोणा गुरूच्या प्रसादानें ही परिस्थिति पालटली. चैतन्यांचें सारें अंतरंग बदलून गेलें. त्यांनीं या शाब्दिक युद्धांचा त्याग केला. आपलें सारें तर्कशास्त्र ते विसरून गेले. त्यांचें मन पूर्ण परावृत्त होऊन तें शुद्ध भक्तिमार्गाकडे वळलें. साऱ्या जगांत श्रीचैतन्यदेवासारखा भक्त आजपर्यंत कोणी झाला नाहीं. त्यांच्या भक्तीचा प्रवाह साऱ्या बंगालभर वाहिला; आणि अनेक जीवांना शांतिसुखाचा लाभ त्यांनीं करून दिला. त्यांच्या भक्तीला मोजमाप नव्हतें. कोणी साधु असो अथवा अत्यंत पातकी असो; हिंदु असो अथवा मुसलमान असो; स्त्री असो अथवा पुरुष असो; मोठा राव असो अथवा रस्त्यांत फिरणारा रंक असो; चैतन्यांच्या हृदयांत सर्वांना एकच स्थान मिळे. आज चैतन्यपंथाची अवनति झाली आहे ही गोष्ट खरी, आणि कालांतरानें सर्वच धर्मांना ग्लानी येत असते हेंही खरें; तथापि आजच्या मितीसही दीनदुबळ्यांचा पाठीराखा कोणता पंथ असेल तर तो चैतन्यपंथच होय. सर्व समा-

जानें ज्याला बहिष्कार घातला त्याला अद्यापिही येथें आश्रय मिळतो. केवळ तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें श्रीशंकराचार्यांच्या मार्गाइतका उदार आणि व्यापक मार्ग दुसरा नाहीं. अनेक पंथांत आणि धर्मांत वस्तुतः भेद नाहीं ही गोष्ट आचार्यांचे सारे अनुयायी कबूल करितात; तथापि हेच अनुयायी वर्णभेद अत्यंत कठोरतेनें पाळतात, हेंही येथें अवश्य सांगितलें पाहिजे. उलटपक्षीं वैष्णवधर्म सर्वांना पोटाशीं धरीत असतो; पण तत्त्वदृष्ट्या आपलाच मार्ग तेवढा खरा असा हटवादीपणाही करीत असतो.

श्रीमच्छंकराचार्य यांची बुद्धि जशी विशाल होती, त्याचप्रमाणें श्रीचैतन्यांचें अंतःकरण विशाल होतें. यानंतर या दोन वस्तूंचा संगम जेथें एकत्र असेल अशी विभूति उत्पन्न होण्याची वेळ आली. ज्याच्या ठिकाणीं बुद्धीचें विशालत्व आणि अंतःकरणाची आर्द्रता यांचा एकत्र वास असेल, अशा अवताराची आतां आवश्यकता उत्पन्न झाली होती. अनंत प्रकारच्या पंथांच्या द्वारें एकच परमेश्वर आपलें कार्य करीत आहे, हें पाहण्याइतकी दिव्य दृष्टि ज्याला आहे, असा नवा अवतार आतां हवा होता. वस्तुमात्राच्या ठिकाणीं ज्याच्या दृष्टीला एकाच परमेश्वराचें स्वरूप दिसतें, दीन दुबळ्यांच्या आणि पतितांच्या दर्शनानें ज्याच्या अंतःकरणाला पाझर फुटतो; हा स्वकीय, हा परकीय, असा भेद ज्याच्या दृष्टीला दिसत नाहीं; आणि नाना पंथांतील रहस्यें ओळखून त्यांचें अंतर्गत ऐक्य जाणण्याइतकी ज्याची बुद्धि विशाल आहे; असा अवतार आतां होणें इष्ट होतें. सर्व मतमतांतरांचें ऐक्य करून सर्वव्यापी असा एकच धर्म निर्माण करण्याचें सामर्थ्य ज्याच्या बुद्धीला आहे, असा अवतार आतां हवा होता; आणि अशी वेळ आल्याबरोबर असा पुरुष उत्पन्न झाला. या श्रेष्ठ विभूतीच्या पायांजवळ कित्येक वर्षें बसण्याचें महद्भाग्य मला प्राप्त झालें होतें. ही वेळच अशी होती कीं, असा पुरुष उत्पन्न व्हावा. पाश्चात्य आचारविचारांनीं अगदीं गजबजून गेलेल्या एका शहरासन्निध या पुण्य पुरुषाचा जन्म झाला; आणि याचें मुख्य अवतारकार्यही याच ठिकाणीं झालें. हें शहर अगदीं बेभान होऊन पाश्चात्य कल्पनांमागें पळत सुटलें होतें. पाश्चात्य वस्तूंचें वेड त्याला लागलें होतें. हिंदुस्थानांत दुसरें कोणतेंहि गांव याच्या इतकें युरोपीय बनलें नव्हतें. अशा प्रकारच्या शहरासंनिध हा अवतार जन्मास आला, आणि या शहरांतच त्याचें कार्य सुरू होतें. पुस्तकी

ज्ञान याला मुळींच नव्हतें; फार काय, पण स्वतःची सही करण्यापुरतीहि अक्षरओळख त्याला नव्हती असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. अशा-प्रकारें हे श्रीरामकृष्ण परमहंस मोठे विचित्र गृहस्थ होते. यांचें समग्र चरित्र कथन करणें म्हणजे तो एक मोठा इतिहासच होईल. आजच्या प्रसंगीं तसें करण्यास मला वेळ नाहीं. सध्या मी इतकेंच म्हणतों कीं, हिंदुस्थानांत जे जे अवतार आजपर्यंत होऊन गेले त्या सर्वांची ऐक्यमूर्ति श्रीरामकृष्ण परमहंस ही होय. पूर्वीचे सारे वेगवेगळे भाग या एका देहांत एकरूपाला आले. चोहों-कडे विखरलेलें धर्मकार्य येथें एकत्र झालें. अपूर्णसें भासणारें कार्य येथें पूर्ण-त्वास आलें. यामुळेंच सध्याच्या अवनतस्थितींत हें अवतारकार्य अत्यंत उपयुक्त झालें. रामकृष्ण परमहंस यांचा जन्म एका दरिद्री भिक्षुकाच्या पोटीं झाला. हा भिक्षुक एका बाजूच्या लहानशा खेड्यांत रहात होता. त्याच्या अस्तित्वाची खबरही कोणास नव्हती; आणि अशा परिस्थितींत जन्मल्यामुळें श्रीरामकृष्णहि अगदीं अप्रसिद्ध होते; पण त्यांच्या पाठीमागें सारी विश्वशक्ति उभी होती. यामुळें आज युरोप, अमेरिका वगैरे साऱ्या जगांतील देशांत कोटयवधि लोक या विभूतीचें पूजन आज करीत आहेत. परमेश्वराची लीला वर्णन करण्याचें सामर्थ्य कोणाला आहे ? त्याची इच्छा काय असेल हें कोणीं सांगावें ? सांप्रतच्या काळीं भगवान् रामकृष्ण यांचा जन्म व्हावा या गोष्टींत असलेला गूढ ईश्वरी संकेत आज आपणास दिसत नसेल तर तो दोष आपल्या डोळ्यांचा आहे. आपण आंधळे म्हणून सूर्यप्रकाशहि आपणास दिसत नाहीं. मित्रहो, तुमच्या भेटीचा आणखी एखादा प्रसंग प्राप्त झाला तर या चरित्राची आणखीहि कांहीं माहिती मी तुम्हांस सांगेन. आज मी इतकेंच म्हणतों कीं, माझ्या या साऱ्या बडबडींत जर एखादा शब्द सत्यपूर्ण असेल तर तो श्रीरामकृष्णांचा आहे. त्यांजवांचून दुसऱ्या कोणाचीहि मा-लकी त्याजवर नाहीं; आणि यांत जें कांहीं फोल असेल, ज्या पुष्कळशा खोट्या गोष्टी मी बोललों असेन आणि मानवजातीला ज्यांचा कांहींच उपयोग नसेल, अशा साऱ्या वस्तू एकट्या माझ्याच असून त्यांची सारी जबाबदारी फक्त माझ्याच शिरावर आहे.

---

# आपणांपुढील कार्य.

जगाच्या व्यवहाराचा गाडा आपला मार्ग जों जों अधिक आक्रमीत जात आहे, तों तों मानवी जीवितापुढील प्रश्न अधिक खोल आणि अधिक विस्तृत होत आहे. मानवी जीविताचा अंतिम हेतु काय, या प्रश्नाची चर्चा फार प्राचीन काळीं होऊन त्याचा निकालही तेव्हां लागला. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हें तत्त्व श्रुतीनें प्रथम शोधून काढलें त्याच वेळीं या प्रश्नाचाही निकाल लागला. सृष्टींतील यच्चयावत् पदार्थ एकमेकांशीं इतके पूर्ण बद्ध झालेले आहेत कीं, आपणाबरोबर दुसऱ्याला ओढल्यावांचून तींतील एक परमाणूहि कांहीं हालचाल करूं शकत नाहीं. सारें जग उन्नतीच्या मार्गाला लागल्याशिवाय एकाचाही प्रवास सुखरूपपणें होऊं शकत नाहीं. आतांपर्यंत जो अनुभव आपणांस आला त्यावरून जगाच्या उन्नतीचा प्रश्न कोणत्याही एकतर्फी मार्गानें सुटण्यासारखा नाहीं हें उघड झालें आहे. जगाला सुधारण्याचा हक्क एखाद्या विशिष्ट मानववंशाकडे अथवा राष्ट्राकडे परमेश्वरानें सोंपविलेला नाहीं. असल्या आकुंचित भावनांच्या पायावर जगाची उन्नति व्हावयाची नाहीं. कोणताही सिद्धांत परोक्षतः कितीहि खरा असला, तरी त्याची सत्यता साऱ्या मानवजातीला पटली पाहिजे. प्रत्येक सद्भावनेचा विस्तार इतका झाला पाहिजे कीं, तिच्यांत सारें मानवकुल बुडून गेलें पाहिजे. साऱ्या जीवितभर ही कल्पना व्यापून राहिली पाहिजे. प्राचीन काळीं आपल्या देशाची जी स्थिति होती, ती गेल्या कांहीं शतकांच्या अवधींत कां राहिली नाहीं याचें कारण या विवेचनावरून स्पष्ट होईल.

प्राचीन काळीं दोन मानवकुलें एकाच मुळापासून उत्पन्न झालीं; पण या दोहोंची परिस्थिति भिन्न असल्यामुळें त्यांची वाढही वेगवेगळया दिशांनीं झाली; आणि मानवी जीविताचे कूट प्रश्न तीं आपापल्यापरी सोडवूं लागलीं. हीं दोन कुलें हिंदु आणि ग्रीक हीं होत. हिंदु आर्यांची वस्ती भरतभूमींत झाली. हिच्या उत्तरेला पर्वतराज हिमालय. या हिमनगराजापासून पुष्कळ मोठमोठ्या नद्यांचा उगम होऊन त्या खालीं मैदानावर वहात येतां येतां त्यांचें स्वरूप समुद्राप्रमाणें विशाल झालें. या सपाट प्रदेशीं जिकडेतिकडे

प्रचंड अरण्यें पसरलीं होतीं. यांचा विस्तार इतका मोठा होता कीं, यांच्या पलीकडे जग म्हणून कांहीं असूंच नये असें एखाद्यास वाटावें. संस्कृतीच्या संपर्काचा नुसता वाराही लागण्याचा संभव येथें नव्हता. येथें राहणारास जगाच्या कोणत्याही उपाधीपासून बाधा होण्याजोगी नव्हती. यामुळें येथील रहिवाशांचा लौकिक संबंध आपोआप तुटून त्यांची वृत्ति स्वाभाविकपणेंच अन्तर्मुख झाली. त्यांची दृष्टि बाह्य जग सोडून अंतःसृष्टीकडे पाहूं लागली. आर्यांना बुद्धीच्या विशालत्वाची जोड स्वाभाविकपणेंच मिळाली होती. त्यांची उपजतबुद्धीच अंतस्थ विचारांकडे वळणारी होती. तशांतून त्यांचा वास ज्या स्थळीं झाला तें नितांत रमणीय. प्रचंड नद्या, उत्तुंग गिरिशिखरें आणि अफाट वनराजी यांच्या साहचर्यांत त्यांची उपजतबुद्धि जागृत होऊन ती अंतःसृष्टीचा विचार करूं लागली यांत नवल नाहीं. मानसिक शक्तीचें पृथक्करण हा एकच विषय हिंदु आर्यांनीं विचाराकरितां आपल्या हातीं घेतला होता. ग्रीक लोकांची स्थिति याहून वेगळया प्रकारची झाली. जगाच्या ज्या भागांत त्यांनीं वास केला, तो भाग सुंदर आणि रमणीय खरा पण त्यांत उदात्तपणा नव्हता. आजूबाजूची सृष्टि अत्यंत मोहक पण तिच्यांत कोणाचें चित्त अंतर्मुख करण्यापेक्षां बहिर्मुख करण्याचा गुण अधिक होता. सृष्टीनें आपल्या साऱ्या सौंदर्याचा वर्षाव येथें सढळ हातानें केला होता. पण तेथील रहिवाशांची चित्तवृत्ति आपल्याच ठिकाणीं गुंतवून ठेवावी असा गुण या सौंदर्यांत होता. यामुळें तेथील ग्रीक कुलाचें मन या बाह्य सृष्टीकडे धाव घेऊं लागलें; ही गोष्ट स्वाभाविकपणेंच घडली. या बाह्यसृष्टीचें पृथक्करण करण्याकडे त्या मनाचा कल झाला. यामुळें हिंदुकुलाच्या द्वारें सारें पृथक्करण शास्त्र अवतीर्ण होऊन सृष्ट पदार्थांचीं शास्त्रें ग्रीक कुलांतून उद्भवलीं. हिंदु मन आपल्या दिशेनें गेलें आणि त्यानें विश्वव्यापी सिद्धांत निर्माण केले. आजच्या काळींहि हिंदवासीयांची तर्कबुद्धि आणि त्यांच्या मेंदूचें विशालत्व हीं साऱ्या जगांत अव्वल प्रतीचीं आहेत. आमच्या येथील तरुण कोठेंही बाह्यदेशीं गेले, तरी बुद्धीच्या बाबतींत दुसऱ्या कोणत्याही देशांतील तरुणांवर अद्यापि मात करितात, हा आपला नित्याचा अनुभव आहे. पण याच वेळीं आणखीहि एक मुद्दा लक्ष्यांत ठेविला पाहिजे. मुसलमानांनीं हिंदुस्थान देश जिंकण्यापूर्वी एकदोन शतकें आमच्या अवनतिकालास सुरवात झाली. त्या वेळीं या बुद्धि-

वैभवाचें स्तोम अतिरेकास गेलें होतें. राष्ट्राची कर्तृत्वशक्ति हळू हळू लयास जात होती. बुद्धीच्या या अतिरिक्त आणि फाजील महत्वामुळें तिचा खरा जोम नाहींसा होऊन तीहि अवनतीच्या मार्गाला जाऊं लागली. ही अवनति कोणत्याही एका विशिष्ट वस्तूपुरतीच नसून तिचा व्याप हिंदुस्थानांतील साऱ्याच गोष्टींत थोडा फार आढळून येतो. साहित्यसंगीतादि कला घ्या, अथवा भौतिक शास्त्रें घ्या, तिचा प्रवेश कोठें नाहीं असें नाहीं. कलांत अवश्य असणारा दृष्टीचा चौफेरपणा कोठेंच दिसेनासा झाला. सौन्दर्याच्या कल्पनांतील उदात्तपणा नाहींसा झाला. नुसत्या बाह्य आकारांतील रेखीवपणाची कल्पनाही नाहींशी झाली, आणि यांच्या जागीं भपकेबाज बेडौल आणि अगडबंब अशी पद्धति प्रचारांत येऊं लागली. नव्या कल्पना उत्पन्न करण्याचा जिवटपणा हिंदूंच्या मेंदूंत राहिला नाहींसें दिसतें. प्राचीन संस्कृत संगीतांत हृदयाला हालवून सोडण्याची जी शक्ति होती, तिचा प्रत्यय या काळांतील संगीतांत कोठेंही येईनासा झाला. प्रत्येक स्वराला जें स्वातंत्र्य म्हणून असावें तें नष्ट झालें. अर्वाचीन कालचें संगीत म्हणजे अनेक स्वरांची नुसती खिचडी होय. तानांच्या गिरक्यांत अनेक स्वर अशा रीतीनें एकत्र गुरफटतात कीं, त्यांतील कोणाही एकाचा स्वतंत्र पत्ता लागत नाहीं. संगीताची ही अवनतावस्था आहे. केवळ कल्पनेच्या साम्राज्याकडे तुम्हीं पाहिलें तरी तेथेंही हाच प्रकार तुम्हांस आढळून येईल. जुन्या पुराण्या आणि उष्ट्या कल्पना डामडौलाच्या आणि भपकेबाज भाषेच्या शृंगारांत मांडलेल्या तुम्हांस आढळतील. येथेंही नुसत्या बाह्य शृंगाराच्या भपक्यावर तुमचे डोळे भारून टाकण्याचा हा यत्न असल्याचें तुमच्या प्रत्ययास येईल. या पोषखाच्या आंत कल्पनेचा नवीनपणा असा कोठेंच आढळावयाचा नाहीं. धर्म विचार ही आपली खास हक्काची बाब आहे असें तुम्ही समजतां, पण या बाबींत झालेल्या अवनतीस कोठें तोडही सांपडावयाची नाहीं; आणि असें होणें हें युक्तच आहे. पाणी पितांना भांडें उजव्या हातांत असावें कीं डाव्या हातांत असावें, असल्या प्रकारच्या प्रश्नांना अत्यंत निकडीचें महत्त्व देऊन त्यांच्या चर्चेत शेंकडों वर्षांच्या काळाचा अपव्यय ज्यांनीं केला, असल्या तत्त्ववेत्त्यांच्या बुद्धींतून अधिक चांगली फलप्राप्ति ती काय होणार ? ज्या देशांतील अत्यंत विशाल बुद्धीचे लोकही स्वयंपाक घरांतल्या गोष्टींची चर्चा करण्यांत शेंकडों वर्षें खर्च करि-

तात, त्यांच्या अवनतीबद्दल अधिक कांहीं सांगण्याचें कारणही नाहीं. कोणी कोणाला स्पर्श करावा आणि कोणाचा स्पर्श झाला असता कसलें प्रायश्चित्त असावें, असल्या शुष्क चर्चेला जेथें तत्त्वज्ञानाचें प्राधान्य मिळालें होतें, तेथें अवनती कळसास पोंचावी यांत नवल नाहीं. असल्या शुष्क विचारांचें रान पुढें इतकें माजलें कीं, ज्यांचा प्रकाश साऱ्या जगाला पुरून उरावा असलीं वेदान्त तत्त्वरत्नेंही अर्धीं मुर्धीं मलिन होऊन गेलीं. या माजलेल्या रानांत त्यांचें थोडें बहुत रक्षण कांहीं संन्याशांनीं केलें, यामुळें आज तीं आपल्या नजरेस तरी पडत आहेत. हे अरण्यवासी संन्यासी आपल्या पूर्वजांचें अमूल्य धन अशा रीतीनें मोठया शर्थीनें रक्षीत असतात. बाकीचा सारा देश स्पर्शास्पर्शविचार, सोंवळें ओंवळें आणि अन्न यांच्या गोष्टी करीत बसला होता. या नंतर मुसलमानांच्या स्वाऱ्यांस लवकरच सुरवात झाली. मुसलमानांपासूनही आम्हांस कित्येक चांगल्या वस्तूंची प्राप्ति झाली आहे. साऱ्या चांगल्या वस्तूंचा संग्रह कोणा एकाच्याच हातीं असावा असा ताम्रपट परमेश्वरानें कोणालाही दिलेला नाहीं. एखाद्या अतिश्रेष्ठ मनुष्याला अत्यंत कनिष्ठापासूनही कांहींच बोध घेतां येण्यासारखा नसतो असें नाहीं. मुसलमानांपासून कांहीं चांगल्या वस्तू आम्हांस मिळाल्या खऱ्या, पण त्यांजपासून हिंदु वंशाला नव्या जोमाची प्राप्ति झाली नाहीं. यानंतर या देशाचा राजदंड ईश्वरसत्तेनें इंग्रजांच्या हातीं गेला. एक देश दुसऱ्याच्या ताब्यांत जाणें ही गोष्ट केव्हांही झालें तरी वाईटच. परकीय सरकार ही देशावरील मोठी आपत्ति आहे, यांत संशय नाहीं; पण वाइटांतूनहि चांगल्याची निपज होते हें विसरतां कामा नये. या नियमाला अनुसरून या परकीय सत्तेपासूनही हिंदुस्थानाला एक मोठा फायदा झाला आहे. इंग्लंडच्याच नव्हे तर साऱ्या युरोपाच्या अर्वाचीन संस्कृतीचें जनकत्व ग्रीक संस्कृतीकडे आहे. युरोपांतील प्रत्येक वस्तूच्या पोटीं ग्रीक संस्कृतीचें बीज आहे. युरोपांतील प्रत्येक इमारत आणि घरांतील सामानसुमानाचा प्रत्येक तुकडा आपलें मूलस्थान जगजाहीर करीत असतो. ग्रीक संस्कृतीचा छाप जीवर पडलेला नाहीं, अशी एकहि वस्तु साऱ्या युरोपांत तुम्हांस आढळावयाची नाहीं. युरोपांतील अर्वाचीन शास्त्रें आणि कला हीं ग्रीक जननीचींच लेंकरें आहेत. अशा स्थितींत इंग्लंड आणि हिंदुस्थान यांचा संगम म्हणजे ग्रीक आणि हिंदुसंस्कृतीचा संगम होय.

अशा रीतीनें प्राचीन हिंदु संस्कृतीला पुनः चालन मिळत आहे. या धक्क्यानें आपली निद्रावस्था ती टाकीत आहे. ग्रीक संस्कृतीचें आगमन म्हणजे नव्या जिवटपणाचा प्रारंभ होय. आज हिंदुस्थानांत नव्या विचारांचा प्रसार दिसत आहे, नवी जागृती उत्पन्न झाली आहे, आणि अमूर्त कल्पनांना मूर्तरूप देण्याची धडपड सुरू झाली आहे, याचें कारण पाश्चात्य संस्कृतीचें येथें झालेलें आगमन हेंच होय. मानवी जीविताबद्दलच्या आकुंचित कल्पना हळूहळू विराम पावत असून त्यांच्या जागीं अधिक विस्तृत आणि अधिक उदार कल्पनांचा उदय होत आहे. ज्यांचा जन्म पूर्वी येथेंच झाला, त्याच आतां येथें वाढीला लागल्या आहेत असें आपणांस आढळून येईल. आमच्या पूर्वजांनीं त्यांना जन्म दिला पण दीर्घ काळपर्यंत त्या अमूर्तावस्थेंत होत्या; आणि त्याच आतां मूर्तरूपास येऊं पहात आहेत. अधिक विस्तार पावणें, वाढीस लागणें, इतरांशीं मिसळत जाणें, आणि अखेरीस विश्वरूप होणें, हें आपलें अखेरचें साध्य आहे. पण हा आद्य हेतु दृष्टिआड करून दिवसेंदिवस आमचा परिघ आम्ही अधिक आकुंचित करूं लागलों. जगांत मिसळण्याऐवजीं त्यापासून आम्ही विभक्त होऊं लागलों आणि या विभक्तपणाबरोबरच श्रुतिमातेनें आम्हांस दिलेल्या ठेव्याच्या वारसदारीलाही आम्हीं सोडचिठ्ठी दिली.

या विस्तार पावण्याच्या मार्गांत अनेक धोक्याचीं स्थळें आहेत; आणि यांपैकीं प्रमुख म्हटलें म्हणजे आपणा स्वतःबद्दल फाजील घमेंड असणें हें होय. आम्ही परमेश्वराचे लाडके लोक आहों असें वाटणें ही या मार्गांतील मोठी धोंड आहे. भारतभूमीवर माझें प्रेम अतिशय आहे, देशाभिमानांत मी कोणाला हार जाणार नाहीं, आणि पूर्वजांबद्दलची पूज्यबुद्धिहि अत्यंत जागृत आहे; पण असें असतांहि बाह्यदेशीयांकडून आपणांस शिकण्यासारखें असें पुष्कळ आहे असें म्हटल्यावांचून मला राहवत नाहीं. आपल्या ठिकाणीं शिष्यभाव सदोदित जागा असावा. शिष्य म्हणून कोणाच्याहि पायांपाशीं बसण्याची आपल्या चित्ताची तयारी असावी. कारण, ज्याच्यापासून आपणांस कोणताही मोठा बोध घेतां येणार नाहीं, इतका मूढ प्राणी जगांत कोणीही नाहीं हें आपण लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. अत्यंत क्षुद्र मनुष्यापासून आणि अंत्यजापासूनही सद्बोध घ्यावा, आणि सेवेच्या मार्गानें स्वर्गाचा पल्ला गांठावा असें मनूनेंही म्हटलें आहे. मनूचे खरे वंशज अशी संज्ञा स्वतःस न्यायानें लावून घेण्याची

आपली इच्छा असेल, तर त्याची आज्ञा आपण पाळली पाहिजे; आणि ज्या कोणापाशीं आपणांस कांहीं देतां येण्यासारखें असेल तें आपण मिळविलें पाहिजे. सृष्टीचा हा विस्तृत ग्रंथ आपणांपुढें उघडलेला आहे. याच्या प्रत्येक पानांतून ज्ञान संपादन करणें हें आपलें कर्तव्य कर्म आहे. तथापि येथें आणखीहि एक मुद्दा अवश्य लक्ष्यांत ठेविला पाहिजे. जगाला शिकवितां येण्यासारखें आपणापाशींहि कांहीं आहे हें विसरतां उपयोगी नाहीं. स्वतः-बद्दल फाजील अभिमान बाळगणें हें जसें अनिष्ट, तसेंच अभिमानशून्यता असणें हेंहि अनिष्टच आहे. बाह्य जगाशीं संबंध तोडून टाकून आपलें चालावयाचें नाहीं. बाह्य जगाशीं आपणांस कांहीं करावयाचें नाहीं, हा आपला जुना अभिमान मूर्खपणाचा होता, आणि ह्या खोट्या अभिमानाला बळी पडल्या-मुळेंच आज हजार वर्षें गुलामगिरीची शिक्षा आपण भोगीत आहों. जगांत काय चाललें आहे इकडे आपण लक्ष्य दिलें नाहीं, आपण कोठें आहों आणि जग काय करीत आहे, याची तुलना आपल्या चित्ताशीं आपण कधींच केली नाहीं. हिंदु मानसिक अवस्थेची जी दुर्दशा आज झालेली दिसत आहे, तिचें हें एक मोठें कारण आहे. असो; झालें तें होऊन गेलें. आतां पुढला विचार तरी आपण नीट करूं या. परदेश गमन हें मोठें पातक आहे, असल्या प्रकारच्या बालिश कल्पना आपण टाकून दिल्या पाहिजेत. असल्या कल्पना पुऱ्या नष्ट करून टाकाव्या. बाह्यदेशीं तुम्ही जों जों अधिक प्रवास कराल, तों तों तुम्हांस आणि तुमच्या देशासहि तो अधिक हितकर होईल. गेलीं शेंकडों वर्षें या मार्गाचा स्वीकार तुम्हीं केला असता तर आजची स्थिति तुम्हांस कधींच प्राप्त झाली नसती, आणि हिंदुस्थान देश आजच्याप्रमाणें कोणाच्याही हातचें खेळणें होऊन राहिला नसता. जेथें जिवटपणा म्हणून आहे तेथें विस्तार पावण्याची पात्रताहि अवश्यमेव असतेच. किंबहुना, विस्तार पावणें आणि वाढत जाणें हेंच जिवंतपणाचें दृश्य चिह्न आहे. याकरितां, तुम्हांस जगावयाचें असेल तर विस्तार पावण्यावांचून दुसरा मार्गच तुम्हांस नाहीं. ज्या क्षणीं ही विस्तार पावण्याची क्रिया बंद पडेल, त्याच क्षणीं मृत्यु तुम्हां-वर झडप घालील. आपल्या डोळ्यांसमोर असलेलें हें भयाचें स्थान नित्य ध्यानांत ठेवूनच आपला पुढचा मार्ग आपण सुधारला पाहिजे. मीं अमेरिकेचा आणि युरोपाचा प्रवास केला, याचाहि अर्थ हाच. भरतभू-

मीच्या राष्ट्रीय पुनरुज्जीवनाचें हें पहिलें चिह्न होतें. जें पुनरुज्जीवन आंतून होऊं लागलें होतें, त्याला आतां बाहेर पडण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. याकरितां, हा प्रवास मला टाळतां येण्यासारखाच नव्हता. जगाच्या ज्ञानांत जी कांहीं भर भरतभूमीनें घालणें अवश्य होतें ती घालण्याचा उपक्रम अशा रीतीनें आतां सुरू झाला आहे. हिंदुस्थानांतील ज्ञानाचा प्रवाह बाह्यदेशीं जाऊन वाहूं लागण्याची ही गोष्ट आजच प्रथम घडत आहे असें नाहीं. हिंदु लोक आपल्या सरहद्दीच्या चार भिंतींच्या आंत सदोदितचे कोंडलेले होते, असें तुम्हांपैकीं कोणास वाटत असेल तर ती त्याची मोठी चूक आहे. विस्तृत ग्रंथभांडार न पाहिल्याचा हा परिणाम होय. कोणाला असें वाटतें याचें कारण हेंच कीं, त्यानें हिंदुकुलाच्या संस्कृतीचा अभ्यासच केलेला नाहीं. तिचें बाल्य आणि तिची वाढ हीं कशीं झालीं हें त्याला ठाऊक नसल्यामुळेंच तो कांहीं तरी बरळत सुटतो. कोणत्याही राष्ट्राला जगावयाचें असेल तर त्यानें देवाण घेवाण केलीच पाहिजे. तुम्हीं कांहीं दिल्यावांचून तुम्हांस कांहीं मिळावयाचें नाहीं, आणि तुम्हांस कोणाकडून कांहीं प्राप्त झालें तर त्याची वांटणी इतरांस तुम्हीं दिलीच पाहिजे. ज्या अर्थीं हिंदुस्थान धडधडीत जिवंत असलेला आपल्या डोळ्यांनीं आपण पहातों, त्याअर्थीं या गोष्टी त्यानें केल्या असल्याच पाहिजेत हें कबूल करावयास नको काय ? हिंदुस्थानांतून बाह्यदेशीं ज्ञाननदीचा प्रवाह सदोदित वहात आहे, या गोष्टीची साक्ष हिंदुस्थानदेश जिवंत आहे हीच.

दुसऱ्यास देतां येण्याजोगी हिंदुस्थानाजवळील वस्तु धर्मज्ञान ही आहे. उच्च तत्त्वज्ञान, पराविद्या आणि धर्मज्ञान या वस्तू इतरांनीं हिंदुस्थानापासून घेतल्या पाहिजेत; आणि यांत विशेष हा कीं, धर्माचा मार्ग साफसूफ करण्यास दुसऱ्या कोणाची मदत त्याला लागत नाहीं. पराविद्या आणि तत्त्वज्ञान यांना रक्ताची नदी पार होऊन जावें लागत नाहीं. माणसांचीं हाडें चुरडीत आपला प्रवास यांना करावा लागत नाहीं. स्वतःबरोबर तोफा बंदुका घेण्याचें कारण यांना पडत नाहीं. दंडनीतीचा आश्रय त्यांना करावा लागत नाहीं. प्रेम आणि शांति या दोन वस्तू बरोबर घेऊन या विद्या साऱ्या जगाचा प्रवास सुखरूपपणें करितात. हिंदुस्थानांतील धर्मविद्या आपलें हें कार्य अशाच प्रकारें आजपर्यंत करीत आली आहे. मी लंडन येथें असतां एका तरुणीनें मला प्रश्न केला " तुम्हीं हिंदूंनीं आजपर्यंत काय केलें आहे ? एकहि देश आजपर्यंत

तुम्हीं जिंकिला नाहीं." ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. पण ती इंग्रजांच्या दृष्टीनें मात्र खरी आहे हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. शूर, धाडसी आणि तरवार परजणाऱ्या क्षत्रियाच्या दृष्टीनें देश जिंकणें हीच नरजन्माची इतिकर्तव्यता होय. त्याच्या दृष्टीनें आम्हीं निर्माल्यवत् दिसलों तर त्यांत नवल नाहीं; पण आमच्या दृष्टीनें हीच परिस्थिति आम्हांस उलटी दिसते. हिंदुस्थानदेश सर्वश्रेष्ठ कां, असा प्रश्न माझ्या चित्तांत उभा राहिला, तर त्यानें कोणास जिंकलें नाहीं म्हणून, हेंच उत्तर मला मिळतें. आमची मोठी प्रतिष्ठा हीच. हिंदुधर्म जेता नाहीं म्हणून तो दुबळा आणि त्याज्य आहे, अशी त्याची नालस्ती प्रत्यहीं तुमच्या कानीं येते; आणि मोठ्या दुःखाची गोष्ट ही कीं, स्वतःस ज्ञानसंपन्न म्हणविणारीं कांहीं चांगलीं माणसेंहि अशा प्रकारची नालस्ती करीत असतात. हिंदुधर्म जेता नाहीं हेंच त्याच्या खरे-पणाचें स्पष्ट लक्षण आहे असें मला वाटतें. हिंदुधर्मानें कधीं तरवार परजिली नाहीं, आणि कधीं रक्तपातही केला नाहीं. याचें कारण हेंच कीं, त्याच्या मुखांतून फक्त आशीर्वादाचे शब्द बाहेर पडतात. 'शांतिः पुष्टिस्तुष्टिश्चास्तु' या एकाच महामंत्राचा जप हिंदुधर्मानें आजवर केला आहे. सर्वांबद्दल सहानुकंपा आणि प्रेम एवढ्याच भावना त्याच्या चित्तांत आहेत. परमतसहिष्णुता प्रथम येथेंच उदयास आली. तिचा वास साऱ्या जगांत दुसऱ्या कोठेंहि नव्हता. प्रत्यक्ष व्यवहारांत तिचें स्वरूप प्रथम येथेंच व्यक्त झालें. बाह्य देशीं तिचें नांवही कोणास ठाऊक नव्हतें. दुसऱ्या देशांत ही फक्त पुस्तकी विद्या आहे. लेख आणि भाषणें यांवाचून दुसऱ्या कोठेंहि तिच्या अस्तित्वाचा प्रत्यय तुम्हांस यावयाचा नाहीं. ख्रिस्ती लोकांकरितां चर्चें आणि मुसलमानांकरितां मशिदी हिंदूंनीं बांधाव्या ही गोष्ट फक्त हिंदुस्थानांतच शक्य आहे. अशा रीतीनें हा धर्मसंदेश हिंदुस्थानांतून अनेक वेळां बाह्यदेशीं गेला आहे आणि त्याचें कार्य इतक्या शांतपणें चाललें आहे कीं, तें कोणाच्या दृष्टिपथांतहि येत नाहीं. हिंदुस्थानाची मनोभूमिकाच अशा प्रकारची आहे. तिला गडबड आणि धडपड हीं खपायचीं नाहींत. हिंदुस्थानांतील धर्माची वाढ शुद्ध शांतीच्या साम्राज्यांत झाली आणि त्याच्यामागें जें सामर्थ्य आहे तें दंडाच्या रूपानें केव्हांही व्यक्तदशेला आलें नाहीं. दुसऱ्यांचीं मनें हरण करून आपली छाप त्यानें त्यांजवर पाडली. एखाद्या विदेशीयानें आमच्या

तात्त्विक वाङ्मयाचा अभ्यास सुरू केला तर आरंभीं त्याला तो कंटाळवाणा झाल्यावांचून राहणार नाहीं. अर्वाचीन वाङ्मयाप्रमाणें त्यांत चित्ताची गडबड उडविणारें विलक्षण उत्साहजनक अथवा विलक्षण क्रांतिकारक असें कांहींच त्याला आढळून यावयाचें नाहीं. वाचनास सुरवात केल्याबरोबर वाचकाचें चित्त एकदम आकर्षून जाऊन त्यांत मोठी खळबळ उडावी असें प्राचीन वाङ्मयांत कांहींच नाहीं. ख्रिस्ती धर्माचा इतिहास पाहिला तर त्याच्या नांवाखालीं केवढे प्रचंड उत्पात युरोपांत घडून आले याचा विचार करा. याशीं तुलना करण्यास आमच्या धर्माच्या इतिहासांत तुम्हांस कांहींच सांपडावयाचें नाहीं. यामुळें त्या वाङ्मयाचें वाचन आरंभापासूनच चित्तांत खळबळ उडवून देतें. पण हा उत्साह अगदीं क्षणिक असतो. पुस्तक मिटलें कीं, त्याबरोबरच वाचकाचें चित्त कोरें होऊन जातें. आपण काय वाचलें याचीहि शुद्धि त्याला रहात नाहीं. हिंदुस्थानांतील धार्मिक वाङ्मय याहून अगदीं वेगळ्या प्रकारचें आहे. तें शुद्ध शांततामय आणि अगदीं थंड्या स्वभावाचें आहे. तुमच्या चित्तावर त्याचा पगडा तुम्हांस नकळत बसत असतो; पण तुमचा हा अभ्यास कांहीं काळ असाच चालू राहिला म्हणजे त्याचा पगडा तुमच्या चित्तावर इतका पक्का बसतो कीं, त्याचा मोह तुम्हांस अनिवार होतो. तुमच्या चित्तास बसलेली मिठी तुह्मांस सोडवत नाहीं. आमच्या वाङ्मयाच्या जाळ्यांत जो एकवार सांपडला त्याचे हातपाय त्यांत पक्के जखडले गेले ह्मणून समजावें.

रात्रीच्या प्रशांत समयीं दंव पडतें, तेव्हां त्याचा आवाज कोणासहि ऐकूं येत नाहीं अथवा तें कोणाच्या दृष्टिपथांतहि येत नाहीं. तथापि त्याच्या सिंचनानें अत्यंत परिमल युक्त अशीं गुलाबाचीं फुलें हलतात हें मात्र खरें. जगाच्या विचारभांडारांत भरतभूमीनें टाकलेली भर अशाच प्रकारची आहे. या विचारांचें आगमन ढोलांच्या आणि नगाऱ्यांच्या दणदणाटानें आगाऊ सुचविलें गेलें नव्हतें. ते जगांत संचार करीत आहेत इतकीहि जाणीव कोणास उत्पन्न झाली नाहीं; पण असें असतांहि त्यांचा परिणाम साऱ्या जगावर चिरस्थायी झाला आहे. जगाच्या विचारांत त्यांनीं क्रांति करून सोडली आहे. पण मौजेची गोष्ट ही कीं, ही क्रांति केव्हां झाली हेंही कोणाच्या लक्ष्यांत आलें नाहीं. एका गृहस्थानें सहज बोलतां बोलतां मला म्हटलें 'एखाद्या विशिष्ट ग्रंथाचा कर्ता कोण याचा शोध हिंदुस्थानांत लागणें हें मोठें बिकट कर्म आहे.'

यावर मीं त्याला उत्तर दिलें, 'हिंदुस्थानाची रीत अशीच आहे.' हिंदुस्थानांतील ग्रंथकारांची सारीच पद्धत अर्वाचीन लेखकांहून अगदीं वेगळी आहे. अर्वाचीन पद्धतीच्या ग्रंथकाराच्या लेखांत शेंकडा नव्वद कल्पना दुसऱ्यांच्या चोरलेल्या असल्याचें तुम्हांस आढळून येईल; आणि ज्या शेंकडा दहा त्यांच्या स्वतःच्या असतात, त्या अस्मादिकांच्या स्वतःच्या आहेत असें प्रस्तावनेंत नमूद करण्यास ते सहसा चुकत नाहींत. आमच्या प्राचीन ग्रंथकारांचा प्रकार याहून अगदीं वेगळा. साऱ्या मानवजातीच्या हृदयांत विचारांची क्रांति ज्यांच्या लेखांनीं झाली ते आपले ग्रंथ लिहून मोकळे झाले. त्यांनीं आपल्या लेखांवर नांवें घालण्याइतकीही खबरदारी घेतली नाहीं. ते जन्मले कोठें आणि मेले केव्हां याचाहि पत्ता कोणास लागला नाहीं. आपल्या वंशजांकरितां आपला अपूर्व ठेवा मागें ठेवून कोणास नकळत त्यांनीं देहविसर्जन केलें. हिंदुस्थानांत तात्त्विक वाङ्मयाचें केवढें तरी भांडार आहे, पण त्या साऱ्यांच्या लेखकांचीं नांवें कोणास माहीत आहेत ? आमचीं पुराणें कोणीं लिहिलीं याचा शोध लागेना तेव्हां सारीं व्यासांच्या गळयांत पडलीं. एखादा तात्त्विक ग्रंथाच्या कर्त्याचा शोध लागला नाहीं ह्मणजे कपिल मुनींकडे खुशाल बोट दाखवावें. हे लेखक म्हणजे भगवान् श्रीकृष्णांचे अस्सल वंशज होत. गीतेचीं तत्त्वें त्यांनींच खरोखर पाळलीं. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या गीतावचनाचा अर्थ खरोखर त्यांनींच सांगितला.

अशा रीतीनें हिंदुस्थानाचें कार्य साऱ्या जगांत चालू आहे; पण तें चालू राहण्यासाठीं एका गोष्टीची आवश्यकता आहे. व्यापारी मालाची नेआण करण्यास ज्याप्रमाणें मनुष्याचें साहाय्य अवश्य आहे, त्याचप्रमाणें धर्मज्ञानाच्या प्रसारालाहि कोणातरी देहधाऱ्याच्या आश्रयाची आवश्यकता असते. आधीं मार्ग तयार असल्यावांचून विचारांचाहि प्रवास होऊं शकत नाहीं. पूर्वींहि असेच प्रकार घडून आले आहेत. एखादें जगज्जेतें राष्ट्र जन्मास आलें म्हणजे आपल्या क्षात्रतेजाच्या बळावर जगांतील दूरदूरचीं राष्ट्रें तें एकत्र करितें. त्या राष्ट्रांचा परस्परांशीं संबंध जडतो. अशा रीतीनें विचारविनियमाचा मार्ग तयार झाला म्हणजे त्याच्या द्वारें हिंदुस्थानांतील विचारपरंपरा साऱ्या जगाचा प्रवास करूं लागते; आणि अशा रीतीनें जगांतील साऱ्या मानवकुलांत तिचा प्रवेश होतो. बौद्ध धर्म जन्मास सुद्धां आला नव्हता तेव्हांहि हिंदु तत्त्वज्ञानाचा

प्रवेश साऱ्या जगांत झाला असल्याचा पुरावा हल्लीं निदर्शनास येत असून त्यांत आणखी नवी भर प्रत्यहीं पडत आहे. बौद्ध धर्माचा प्रवेश चिनांत होण्याच्या अगोदर वेदांत तत्त्वें तेथें शिरलीं होतीं. त्याचप्रमाणें इराण वगैरे देशांतहि त्यांचा प्रवेश झाला होता. पुढें ग्रीक साम्राज्याच्या वेळींहि असाच प्रकार घडून आला. त्यांच्या तरवारीच्या मागोमाग हिंदु तत्त्वज्ञान संचार करीत होतें. ख्रिस्ताच्या तत्त्वज्ञानाचा केवढाहि गौरव तुम्हीं केला, आणि त्यामागोमाग झालेल्या संस्कृतीचीं कितीहि स्तोत्रें तुम्हीं गाइलीं, तरी हिंदु तत्त्वग्रंथांत इतस्ततः विखुरलेल्या अनेक रत्नांपैकीं एका अल्पांशापासूनच ख्रिस्ताची ही सारी सृष्टि निर्माण झाली आहे, हें लक्षांत ठेवणें भाग आहे. हिंदु धर्मांतूनच बौद्ध धर्म निर्माण झाला. बौद्ध धर्म हें हिंदु धर्माचेंच एक बंडखोर बालक आहे; आणि ख्रिस्ती धर्म हें बौद्ध धर्माचें गोधडीवजा अनुकरण आहे. अशा रीतीनें प्रत्येक शकांतराच्या वेळीं हिंदु धर्मज्ञानाची लाट जगावर पसरली आहे; आणि आतांही हा शकांतराचा काळ पुनः प्राप्त झाला आहे. इंग्रजी साम्राज्याखालीं जगांतील दूरदूरचीं स्थळें एकत्र झालीं आहेत; आणि त्यांतहि विशेष हा कीं, रोमन साम्राज्याप्रमाणें इंग्रजी साम्राज्याचे मार्ग केवळ जमिनीवरच आंखलेले नसून महासागरांचा पृष्ठभागहि त्यांनीं व्यापला आहे. एका महासागरांतून दुसऱ्या कोणत्याहि महासागराकडे या रस्त्यानें सुखरूप जातां येतें, आणि सध्यांच्या काळीं पूर्वींच्या दळणवळणाच्या साधनांत विद्युच्छक्तीनेंहि आणखी एक नवीच भर घातली आहे. अशा स्थितींत आपल्या जीवन हेतूच्या पूर्तीस्तव भरतभूमीनेंहि जागें व्हावें हें रास्तच आहे. जगाच्या संस्कृतीला आपल्यापरी तिनेंहि हातभार लावावा हें इष्ट आहे. माझ्यासारख्या मनुष्यानें उठून इंग्लंडचा आणि अमेरिकेचा प्रवास करावा आणि तेथें धर्मप्रचाराचें कार्य करावें ही गोष्ट काकतालीय न्यायानें घडली असून पूर्वपरंपरेप्रमाणें पाहतां ती सृष्टिक्रमाला अनुसरूनच घडली. हिंदुस्थानाच्या कार्याचा प्रसार जगभर होण्याची वेळ आतां आली आहे, ही गोष्ट आपणांपैकीं प्रत्येकानें जाणून घेतली पाहिजे. या कार्याच्या प्रसाराला अत्यंत अनुकूल असा सांप्रतचा काल आहे आणि या वेळीं आपलें जगज्जेत्याचें कार्य हिंदुस्थानानें पुनः केलें पाहिजे. आपणांस केवळ आपल्याच देशाची उन्नति साधावयाची आहे असें नाहीं. आपल्या साऱ्या कार्यक्रमाचा तो लहानसा अंश मात्र आहे. कल्पनेच्या अत्यंत विस्तृ-

ताकाशांत स्वच्छंदपणें भराऱ्या मारणें हा माझा जन्मस्वभाव आहे, आणि त्याला अनुसरून हिंदु कुलाची विजयपताका साऱ्या जगभर फडकत असल्याचें माझ्या कल्पनादृष्टीला दिसतें.

इतर राष्ट्रांस जिंकण्याचा धंदा करणारीं अनेक मानवकुलें आजपर्यंत या पृथ्वीतलावर होऊन गेलीं. हें जेतृत्व आमच्याही अंगीं पुष्कळ आहे. इतरांपेक्षां त्याचा प्रकार वेगळा, इतकेंच. पराविद्या आणि धर्म या बाबींत आम्हीं जे महान् विजय मिळविले, त्यांचें वर्णन सम्राट् अशोक यानें केलें आहे. आतांही या जुन्या इतिहासाची पुनरावृत्ति पुनः होणें इष्ट आहे. आतां आणखीहि एक प्रचंड विजय हिंदुस्थानानें पुनः मिळविला पाहिजे. माझ्या आयुष्यभर हेंच स्वप्न मला पडत आहे; आणि माझ्या आजच्या साऱ्या शब्दांत हेंच स्वप्न यापुढें पडत राहावें अशी माझी इच्छा आहे; आणि हें स्वप्न प्रत्यक्ष सृष्टींत खरें करण्याकरितां तुम्हांपैकीं प्रत्येक जण आपली शिकस्त करून अखेरचा विजय संपादीपर्यंत शस्त्र खालीं ठेवणार नाहीं अशीहि मला आशा आहे. आधीं घर सांभाळा आणि मग कायतें करा, असा उपदेश करणारीं माणसें तुम्हांस दररोज हवीं तितकीं भेटतील हें मला ठाऊक आहे. स्वतःचें घर सांवरल्यावर दुसऱ्याला मदत करावी असें पुष्कळ लोक तुम्हांस सांगतील; पण मी तुम्हांस निक्षून सांगतों कीं, स्वार्थ सोडून परार्थ साधणें हेंच कार्य जेव्हां तुम्ही करूं लागतां, तेव्हांच तुमच्यांतील साऱ्या उच्च क्रियासामर्थ्याचा उदय होतो. जगांतील तुमचें अत्युत्कृष्ट कार्य म्हटलें तर परार्थासाठीं जें केलें असेल तेंच. परक्यांच्या देशीं जाऊन परक्यांच्या भाषेंत परक्यांच्या हितासाठीं धर्मज्ञानाचा उपदेश तुम्हीं केला, तर त्याबरोबरच स्वदेशाचीहि चाकरी तुमच्या हातून किती घडते, याची साक्ष आजची ही सभाच तुम्हांला देईल. माझें तत्त्वोपदेशाचें कार्य याच देशीं राहून मीं केलें असतें, तर आज त्याचा जो प्रसार येथें झाला आहे त्याच्या चवथ्या हिशानेंहि तो येथें झाला नसता. इंग्लंडांत आणि अमेरिकेंत जें दृश्य कार्य माझ्या हातून घडलें तेंच येथेंहि अदृश्यपणें घडलें आहे. हिंदुस्थानानें सारें जग जिंकावें हें आपणा सर्वांचेंच अखेरचें उद्दिष्ट आहे; आणि हें साधण्याकरितां आपणांपैकीं प्रत्येकानें सदोदित सज्ज राहिलें पाहिजे. याहून दुसरें कोणतेंहि कमी प्रतीचें कार्य आपल्या नजरेसमोर आपण राहूं देऊं नये आणि याच्या पूर्तीची तयारी करण्यांत

आपल्या शक्तीचा प्रत्येक अंश खर्च करण्याची तयारी आपण ठेविली पाहिजे. परदेशीयांनीं आपलीं हजारों सैन्यें येथें आणून उतरविलीं तर तें त्यांना खुशाल करूं द्या. त्यांच्या सशस्त्र सैन्यांचा महापूर येथें लोटला तरी त्याकडे तुम्ही मुळींच लक्ष्य देऊं नका. भरतभूमीच्या लेंकरांनों ! जागे व्हा, उठा; आणि जग जिंकण्यासाठीं कंबरा बांधा. प्रेमानें आम्ही द्वेष जिंकूं, या तत्त्वाचा जयघोष याच भूमींत प्रथम ऐकूं आला. द्वेष स्वतःला जिंकूं शकत नाहीं, पण प्रेम त्याला जिंकतें. जडवादाचा भयंकर धिंगाणा आज साऱ्या जगावर चालू आहे. त्याचा पराभव दुसरा जडवाद पुढें करून होणार नाहीं. एक जडवाद दुसऱ्याला जिंकील ही गोष्ट त्रिकाळांत घडणें नाहीं. कारण ते दोघेही तुल्यबळ आहेत. एक सैन्य दुसऱ्या सैन्याला जिंकण्यासाठीं धडपडूं लागतें, तेव्हां माणुसकी मरून मनुष्याच्या अंगीं पशुत्वाचा संचार होऊं लागतो. मनुष्याचा पशु बनविणें हें मानवी बुद्धीच्या कर्तृत्वशक्तीचें विजयचिह्न आहे काय ? जडवादाचा पराजय करण्यास एक अतींद्रिय ज्ञानच समर्थ आहे. या अतींद्रिय ज्ञानानें पश्चिम दिशेला तुम्ही जिंका. राष्ट्र म्हणून आपणांस जगावयाचें असेल, तर या पराविद्येची जोड आपण मिळविली पाहिजे. या तत्त्वाचें सत्यत्व पाश्चात्य लोकांस आतां हळूहळू पटूं लागलें आहे. हें ज्ञान आतां कोठून येतें हें पाहण्यासाठीं ते उत्सुक होऊन बसले आहेत. तें दृष्टीस पडतांच त्याला निर्भरालिंगन देण्यासाठीं आपले बाहु पसरून ते उभे राहिले आहेत. आतां त्यांची ही इच्छा कोण तृप्त करणार ? हिंदुस्थानांतील अवतारी पुरुषांचा संदेश त्यांच्यापर्यंत नेऊन पोंचविण्यास कोण तयार आहे ? जगांतील प्रत्येक कोनाकोपऱ्यांत या संदेशाचा दुंदुभि वाजविण्याकरितां आपल्या सर्वस्वावर पाणी सोडण्यास कोण तयार आहे ? सत्याचा प्रसार करण्याकरितां असलीं अलोट छातीचीं माणसें आतां हवीं आहेत. वेदांतधर्माची विजयपताका जगांतील प्रत्येक कोनाकोंपऱ्यांत रोवण्याकरितां तयार असलेले शूर वीर आज हवे आहेत. जगाला याच गोष्टीची आज जरूर आहे. इतकी कीं, तिच्या अभावीं जगाचा नाश होईल. झोंपीं गेलेल्या ज्वालामुखीच्या शिखरावर आज सारें पाश्चात्य जग बसलें आहे. हा भस्मासुर केव्हां जागा होईल याचा नेम नाहीं. तो जागा झाला कीं, क्षणार्धांत साऱ्या पाश्चात्य जगाची राखरांगोळी करील. वेळ अशी आणीबाणीची आली आहे कीं, आपलें कार्य थांबविण्यास

आतां एका दिवसाचाहि अवधि राहिला नाहीं. युरोपचा नाश उद्यां होणार नाहीं इतकीहि खातरजमा कोणी देणार नाहीं. तृष्णेच्या मागें लागून तिच्या तृप्तीसाठीं साऱ्या जगाचा कोनाकोंपरा पाश्चात्यांनीं धुंडाळून पाहिला. या तृष्णेच्या शांतीसाठीं शोध करण्यांत जगांतील एकहि स्थळ त्यांनीं शिल्लक उरूं दिलें नाहीं. पण शांतीचा मागमूससुद्धां त्यांना कोठें लागला नाहीं. इंद्रियजन्य सुखाचे पेले कांठोकांठ भरून त्यांचें आकंठ पान त्यांनीं केलें, पण पोटांतील आगीचा उपशम त्यामुळें झाला नाहीं; तृप्तीची ढेकर त्यामुळें अद्यापि आली नाहीं. याकरितां पाश्चात्यांत तुमच्या धर्मज्ञानाचा प्रसार करण्याची ही अत्युत्कृष्ट संधि तुमच्या घरीं चालून आली आहे. म्हणून हिंदवासीय तरुणांनो, तुम्हांपुढें आज कोणतें कार्य आहे हें डोळे उघडून पहा. जगज्जेते म्हणून अखंड कीर्ति संपादन करण्याचा योग सुदैवानें तुम्हांस आज प्राप्त झाला आहे. आतां हें कार्य साधा अथवा त्यांत प्राण तरी द्या. तुम्हांला कांहीं जागृति आतां खरोखरच आली असेल आणि आपल्या राष्ट्रीय जीवनांत थोडा तरी नवा जोम भरावा अशी थोडी तरी इच्छा तुमच्या चित्तांत उत्पन्न झाली असेल तर हिंदु तत्त्वज्ञानाचा झेंडा साऱ्या जगभर नाचविल्यावांचून राहूं नका.

आपल्या धर्मज्ञानाचें साम्राज्य साऱ्या जगावर गाजवावयाचें असें मीं म्हटलें, पण याचा भलताच अर्थ कोणी समजूं नये. ज्या विलक्षण भोळसर समजुतींना कित्येक शतकेंपर्यंत आपण उराशीं बाळगलें आहे त्यांचा अंतर्भाव तत्त्वज्ञानांत होत नाहीं हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. असल्या खुळ्या कल्पनांचा प्रसार जगभर करावयाचा हें आपलें कार्य नसून, जगाला नव्या जीवनाची प्राप्ति होईल, असें तत्त्वज्ञान त्याला आपणांस द्यावयाचें आहे. आपल्या भोळ्या कल्पनांचा प्रसार बाह्यदेशीं होऊं द्यावयाचा नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यांचा उच्छेद आपल्या देशांतूनहि करणें आपणांस अवश्य आहे. त्यांना आतां कायमची मूठमाती मिळाली पाहिजे. त्यांच्या अस्तित्वामुळेंच हिंदुकुलाला अवनति प्राप्त झाली, आणि आतां यापुढें तीं जगलीं तर तुमचा मेंदूहि तीं सडवून टाकतील. ज्या मेंदूला उच्च आणि उदार विचार निर्माण करण्याचें सामर्थ्य नाहीं, ज्यांतून अस्सल कल्पनाशक्ति नष्ट झाली आहे, ज्याला कसलाहि जोम उरलेला नाहीं आणि धर्म म्हणून क्षुद्र भोळसट कल्प-

नांना चिकटून बसून आपलें सारें अस्तित्व जो विषदिग्ध करितो, असला मेंदू तुमच्या डोक्यांत उत्पन्न होऊं न देण्याविषयीं तुम्ही खबरदारी घ्या. हिंदुस्थानाच्या उन्नतिमार्गांत दोन मोठीं भयावह स्थलें आज आपल्या नजरेसमोर आहेत. जडवाद अत्यंत मोहकरूपानें आपणांसमोर उभा ठाकला आहे; आणि त्याबरोबरच जुन्यापुराण्या खुळ्या कल्पनाहि आपणांस चिकटून बसल्या आहेत. एका बाजूला आड आणि दुसऱ्या बाजूला विहीर अशी आजची आपली स्थिति आहे. या दोन्ही भयांना चुकवून आपला पुढील रस्ता आपण सुधारला पाहिजे. पाश्चात्य विद्येच्या आकंठपानानें आपलें डोकें धुंद करून घेऊन स्वतःस सर्वज्ञ समजणारा असा प्राणी आज निर्माण होऊं लागला आहे. आपल्या प्राचीन ऋषिवर्यांचें ज्ञान त्याला तुच्छ वाटतें. त्यांची थट्टा उडवून स्वतःची क्षणभर करमणूक करून घेण्यासहि तो मागेंपुढें पहात नाहीं. आपलें सारें जुनें तत्त्वज्ञान म्हणजे निवळ अर्थशून्य भारुड, धर्मज्ञान ही शुद्ध बालिश बडबड आणि हिंदुधर्म म्हणजे गाढवांचा गोंधळ असें त्याला वाटतें. याच्या अगदीं उलट असा दुसराहि एक नमुना आढळून येतो. हा दुसरा गृहस्थ सुशिक्षित पण एकविषयभ्रांत असतो. पहिला जसा एका टोंकाला तसाच हा दुसरा दुसऱ्या टोंकाला जाऊन बसलेला असतो. पालीची कारिका, शिंकेचें फळ, आणि काक शब्दाचें फळ काय आहे, हेंच तो शोधीत असतो. आपल्या प्रत्येक वेडामागें धर्मज्ञान उभें आहे; आणि तत्त्वमीमांसेचें पाठबळ त्याला आहे, असें त्याला वाटत असतें. आपल्या खेड्यांतला म्हसोबा हाच त्याचा देवाधिदेव. आपल्या खेड्यांतील प्रत्येक चालरीत हीच त्याची वेदाज्ञा; आणि यांतील एखाद्यांत थोडीशीहि चूक होऊं न देण्याविषयीं तो दक्ष असतो. आपलीं हीं व्रतें तंतोतंत पाळणें हाच राष्ट्रोद्धाराचा मार्ग आहे असें त्याला वाटतें. ह्या दोन्ही नमुन्यांवर फार सावधगिरीची नजर आपण ठेविली पाहिजे. शुद्ध निरीश्वरवादी बनून चार्वाकाचे कट्टे शिष्य तुम्ही झालां तरीहि एकवार मला पुरवेल, पण बालिश कल्पनांना धर्म म्हणून तुम्ही चिकटून बसलां तर तें मला नको. निरीश्वरवादी कितीहि वाईट झाला तरी तो जिवंत प्राणी असतो. स्वतःच्या कर्तबगारीवर त्याचा कांहीं तरी विश्वास असतो. अशा माणसाचा थोडाबहुत तरी उपयोग तुम्हांस करून घेतां येण्यासारखा आहे. पण धर्म म्हणून शुद्ध मूर्खत्वाला ज्यानें मिठी मारली, त्याचा मेंदू कामां-

तून गेला असें तुम्ही समजा. तो खराखुरा अवनतीच्या मार्गाला लागला असून त्याचा उपयोग कोणासहि होण्यासारखा नाहीं. हीं दोन्ही भयावह स्थलें आपण टाळलीं पाहिजेत. आपणांस आज शूरांची गरज आहे. ताज्या दमानें ज्याचें रक्त सळसळत आहे अशीं माणसें आपणांस हवींत. लोहमय स्नायु आणि पोलादी ज्ञानतंतु असलेलीं माणसें आज आपणांस हवींत. हवें तेथें वांकणाऱ्या विळविळीत प्राण्यांची आपणांस गरज नाहीं. असल्या प्राण्यांचें आधीं उच्चाटन होऊं द्या. धर्म हा मोठा गहन विषय आहे असें म्हणून धर्मज्ञान अंधारांत लपवूं पाहणाऱ्या माणसांचीहि गरज आपणांस नाहीं. धर्ममार्गांत कसलीहि लपवाछपवी नको. वेदांतांत असला लपंडाव तुम्हांस कोठें आढळतो काय ? श्रुति, संहिता, पुराणें यांत त्याचा मागमूस तुम्हांस कोठें लागला आहे काय ? आपल्या प्राचीन ऋषि-वर्यांनीं तत्त्वज्ञानाच्या शोधासाठीं गुप्त मंडळ्या स्थापन केल्या होत्या हें माझ्या तरी ऐकिवांत नाहीं. ते कांहीं हातचलाखी करीत होते, असें कोठें नमूद केल्याचें तुम्हांस ठाऊक आहे काय ? आपलें ज्ञान जगासमोर मांडण्यासाठीं ऐंद्रजाल त्यांना करावें लागलें, असा इतिहास तुम्हीं कोठें वाचला आहे काय ? धर्मज्ञान सात पडद्यांत लपवून ठेवूं पहाणें आणि वेडगळ गोष्टींना चिकटून बसणें हें दुबळेपणाचें चिन्ह आहे. अवनतीच्या आणि मृत्यूच्या या आगामी निशाण्या होत. याकरितां त्यांपासून तुम्ही फार सावध रहा. बलवान् व स्वावलंबी होणें हा आपल्या पुढील मार्गांतील पहिला मुक्काम आहे. स्वावलंबी होणें ही गोष्ट खरोखरच अत्यंत महत्वाची आहे. स्वावलंबित्वाचा उपयोग आपणास किती प्रकारें करून घेतां येतो, याची पुरती कल्पनाही करवणार नाहीं. आपला जो कांहीं स्वभाव सध्या बनला आहे, त्याला अनुसरून या दोन वस्तू आपणांस अप्राप्यसुद्धां वाटतील इतक्या त्या मोठया आहेत; पण वस्तुस्थिति अशी नाहीं. त्यांत कांहीं गौप्य नाहीं. प्रत्येकाला त्या साधून घेतां येण्यासारख्या आहेत. हिमालयाच्या हिमस्नात शिखरावर बसलेल्या गुप्त महा-त्म्यांच्या स्वाधीन हीं तत्त्वें कोणींहि केलीं नाहींत. कोणाहि गुप्तमंडळ्यांनीं त्यांचा कुणगा करून ठेवलेला नाहीं. धर्मतत्त्वें ही गुप्त ठेवण्यासारखी वस्तु आहे, या शब्दांचा उच्चार या भूमींत पूर्वी केव्हांहि झालेला नव्हता. हिमाल-याचा प्रवास मीं स्वतः केलेला आहे. तुम्ही गृहस्थाश्रमी आणि हिमाचल

फार दूर यामुळें तुम्ही तेथें गेलां नसाल; पण मी बोलून चालून संन्यासी. गेलीं चवदा वर्षें मी एकसारखा भटकत आहें. सारा हिमालय पर्वत मीं धुंडाळून पाहिला, पण गुप्त मंडळ्या कोठें असल्याचा सुगावा मला लागला नाहीं. याचें कारण हेंच कीं, अशा मंडळ्या अस्तित्वांतच नाहींत. याकरितां असल्या मृगजळाच्या मागें धावत सुटूं नका. असलीं खुळें डोक्यांत घेण्यापेक्षां तुम्ही नितांत जडवादी बनलां तरी तुमचें आणि साऱ्या हिंदुकुलाचें अधिक कल्याण होईल. तुम्हीं शुद्ध नास्तिक बनलां तर किमान पक्षीं तुम्ही स्वावलंबी आणि आत्मप्रत्ययी तरी व्हाल. प्रत्येक गोष्टींत दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची तुमची दुष्ट खोड तरी नाहींशी होईल; पण असल्या खुळसट कल्पनांमागें वेड्यासारखें धावत सुटणें हें मात्र अवनतीचें आणि विनाशाचें निश्चित चिह्न आहे. या कल्पना उघड उघड इतक्या वेडगळ आहेत कीं, त्यांचा नुसता विचार करण्यांत काळाचा अपव्यय कांहीं चांगले लोकसुद्धां कसा करितात याचें मला मोठें नवल वाटतें. ज्या समाजांत असलीं माणसें निर्माण होतात त्याला धिक्कार असो. चांगल्या माणसांनीं सुद्धां असलीं खुळें निर्माण करण्याच्या नादीं लागावें आणि त्यांचा शास्त्रोक्त अर्थ लावण्याचाहि यत्न करावा हें माणुसकीला मोठें लांछन आहे. साऱ्या जगाच्या वाङ्मयभांडारांत इतका सडका माल दुसऱ्या कोठेंहि नसेल. तुम्हांस आतां कांहीं करावयाचें असेल तर प्रथम धैर्यवंत व्हा. असल्या वेडगळ कल्पनांना शास्त्राधार शोधूं नका. आमच्यांत असल्या खुळसटपणाचा भरणा आधींच कांहीं थोडा नाहीं. मग त्यांत यांची भर कशाला ? ज्या आहेत त्यांचेंच उच्चाटन आधीं झालें पाहिजे. आपल्या शरिरावर आधींच असलेले व्रण प्रथम बरे केले पाहिजेत. ते न करतां त्यांहून अधिक जाज्वल्य आणि प्राणघातक काळपुळ्या निर्माण करणें शहाणपणाचें होईल काय ? कांहीं झालें तरी आमचे पहिले व्रण बिचारे गरीब स्वभावाचे आहेत; ते प्राणघातक नाहीं इतकेंतरी खास. हे व्रण बरे झाले म्हणजे आमच्या धर्मतत्त्वांचा देह तप्तकांचनासारखा उज्ज्वल आणि सुशोभित होईल. या तत्त्वांचें शोधन करा आणि त्यांनाच चिकटून रहा.

आपलाच धर्म सार्वलौकिक होण्याच्या योग्यतेचा आहे, असें प्रत्येक धर्माचे अनुयायी म्हणतांना तुम्ही ऐकतां; पण तुम्ही ही गोष्ट लक्ष्यांत ठेवा कीं, सारें जग कोणत्याहि एकाच धर्माचें अनुयायी बनेल, ही गोष्ट कधींच

घडून येण्यासारखी नाहीं; पण तसें कधीं काळीं होणार असलेंच तर असा सार्वलौकिक धर्म होण्याची योग्यता फक्त आपल्याच धर्माच्या अंगीं आहे. त्यावांचून दुसरा कोणताहि धर्म सर्व जगाचा धर्म होणें शक्य नाहीं; आणि याचें कारणहि अगदीं उघड आहे. आपल्या धर्मावांचून जगांतील दुसरा कोणताहि धर्म कोणा ना कोणा व्यक्तीपासून निर्माण झाला आहे. त्याचें जीवित कोणा ना कोणा व्यक्तीवर अवलंबून आहे. त्याच्या रचनेंत एखादी ऐतिहासिक समजली जाणारी व्यक्ति मध्यवर्ती असून तिच्याच भोंवतीं त्या धर्माच्या साऱ्या इमारतीची उभारणी झाली आहे. असा एकच मध्यबिंदु असणें ही गोष्ट त्या धर्माच्या अस्तित्वाला विशेष बळकटी आणते असें त्यांना वाटतें; पण वास्तविक या गोष्टीनें बळकटी येत नसून तो धर्म परावलंबी आणि दुबळा बनतो. ज्या मध्यवर्ती पुरुषाच्या भोंवतीं हें सारें जाळें विणलेलें असतें त्याचें अस्तित्वच नव्हतें असें कोणीं सिद्ध केलें कीं, या साऱ्या धर्माचीहि इतिश्री झालीच; आणि असा प्रकार आजच घडूंहि लागला आहे. अशा धर्मप्रवर्तकांपैकीं निम्याशिम्यांची वाट आजच लागली असून बाकीचेहि हळूहळू तोच मार्ग आक्रमीत आहेत. यामुळें ज्या धर्मतत्त्वांना केवळ त्यांच्याच शब्दाचा पाठिंबा होता, तीं तत्त्वेंहि हवेंत उडून जाऊं लागलीं आहेत. आमच्या धर्माची गोष्ट अशी नाहीं. आमचीं धर्मतत्त्वें सनातन आहेत. त्यांचें अस्तित्व कोणाहि एका व्यक्तीच्या शब्दावर अवलंबून नाहीं; तीं स्वयंभू आहेत. आमच्यांतहि अवतारी पुरुष शेंकडों होऊन गेले, तथापि त्यांपैकीं कोणीहि आपला स्वतंत्र असा धर्म उभारला नाहीं. त्या साऱ्यांनीं एकाच सनातन धर्माचीं तत्त्वें वेगवेगळ्या रीतींनीं विशद केलीं. कृष्ण हा कृष्ण म्हणून मोठा नव्हे; अथवा तो विशिष्ट धर्माचा प्रवर्तक म्हणूनहि चिरस्मरणीय नव्हे. वेदांतधर्माचें स्पष्टीकरण अत्यंत उज्ज्वल रीतीनें त्यानें केलें म्हणून तो मोठा. हें कार्य कृष्णानें केलें नसतें तर बुद्धाप्रमाणेंच तोहि काळाच्या पोटांत गडप झाला असता. बुद्ध हा कांहीं कमी मोठा होता असें नाहीं. तथापि जें कार्य कृष्णानें केलें तें त्यानें न केल्यामुळें हिंदुस्थानांत आज त्याचें नांवहि उरलें नाहीं. यावरून एकच गोष्ट सिद्ध होते ती ही कीं, कोणी कितीहि मोठा झाला तरी त्याला भुलून त्याच्यामागें आम्ही जात नाहीं. आम्ही व्यक्तींचे उपासक नसून तत्त्वांचे उपासक आहों. ज्याच्या ठिकाणीं

आमचीं हीं तत्त्वें प्रत्यक्षत्वास येतील तो आम्हांस पूज्य; आणि तो मोठा म्हणून पूज्य नव्हे, तर आमचीं तत्त्वें आम्हांस तेथें दिसतात म्हणून तो पूज्य. हीं तत्त्वें तेथें दिसूं लागतांच कोट्यवधि हिंदू लोक तेथें धावत येतात. आमचीं हीं तत्त्वें सुरक्षित आहेत तोंवर एकच काय पण हजारों बुद्ध जन्मास येतील. पण हीं तत्त्वें नष्ट झालीं आणि त्यांची विस्मृति आम्हांस पडली, तर मात्र आमच्या धर्माची काय वाट लागेल हें सांगतां येत नाहीं. तत्त्वांना सोडून ऐतिहासिक व्यक्तींच्या झेंड्याभोंवतीं आम्ही गोळा होऊं लागलों, कीं आमचा धर्महि आम्हांस सोडून जाण्याच्या पंथास लागेल. कोणत्याहि व्यक्तीला इतकें प्राधान्य न देणारा धर्म जगांत एखादा असेल तर तो आमचाच धर्म होय; पण असें असतांहि आम्ही सारे अवतारी पुरुष अगदीं बाद केले आहेत असेंहि नाहीं. अशा शेंकडों पुरुषांना आमच्या धर्मांत अवकाश आहे. आजपर्यंत असे शेंकडों पुरुष होऊन गेले आणि उद्यां दुसरे शेंकडों येणार असले तर त्यांनाहि आम्हांपाशीं स्थळ आहे. मुद्दा इतकाच कीं, त्यांच्या द्वारें आमचीं तत्त्वें आम्हांस दिसलीं पाहिजेत. कोणत्या तरी उच्च तत्त्वांचें स्पष्टीकरण त्यांच्या द्वारें झालें पाहिजे इतकीच आमची अट आहे. आमच्या धर्माचा हा विशेष आपण लक्षांत ठेविला पाहिजे. आजपर्यंत जशीं हीं तत्त्वें सुरक्षित राहिलीं तशींच तीं पुढेंहि ठेवण्याची जबाबदारी आपणांपैकीं प्रत्येकाच्या शिरावर आहे. त्याचप्रमाणें कालांतरानें त्यांजवर वाढणारीं बांडगुळें छाटून टाकून मूळचें उज्ज्वल रूप कायम राखणें, हेंहि आपणा प्रत्येकाचें कर्तव्य आहे. भरतभूमीवर आजपर्यंत अनेक घोरपडी आल्या, हिंदुकुलाची भयंकर अवनति झाली, तथापि तशा स्थितींतहि वेदांत तत्त्वें मलिन झालीं नाहींत हें आश्चर्य नव्हे काय? त्यांना मलिन करण्याची छातीच कोणास झाली नाहीं. श्रुतिग्रंथांइतकें अबाधित राहिलेलें धार्मिक वाङ्मय जगाच्या इतिहासांत एकहि नाहीं. जगांतील बाकीच्या वाङ्मयाशीं तुलना करून पाहतां श्रुतिग्रंथ अगदीं सोवळे राहिले आहेत असें आपणांस दिसून येईल. त्यांत कोणीं क्षेपक भाग घुसडला नाहीं; मूळ संहितेची ओढाताण अथवा छाटाछाट कोणीं केली नाहीं आणि त्यांतील विचारांचें मर्महि आजतागाईत पूर्वींसारखेंच राहिलें आहे. उत्पत्तिकालीं श्रुतिग्रंथांनीं जें मार्गदर्शकाचें कार्य केलें तेंच कार्य ते आजहि करीत आहेत.

या मूळ संहितेवर निरनिराळ्या टीकाकारांनीं आपापल्यापरी अनेक प्रकारच्या टीका केल्या आहेत, हें तुम्हांस ठाऊक आहेच. अवतारी पुरुषांनीं याच तत्त्वांचें प्रत्यक्ष विशदीकरण केलें. या अनेक प्रकारच्या स्पष्टीकरणांस अनुसरून अनेक पंथहि अस्तित्वांत आले. या श्रुतिग्रंथांतील कित्येक सिद्धांतांत आपणांस विरोधहि आढळून येतो. यांतील कांहीं ग्रंथ शुद्ध द्वैतपर असून दुसरे कांहीं शुद्ध अद्वैतपर आहेत. एखादा टीकाकार द्वैतवादी असला म्हणजे अद्वैतपर मतें खोडून काढणें हें आपलें कर्तव्य आहे असें त्याला वाटतें. त्याच्या बुद्धीचा पल्ला द्वैतापलीकडे गेलेला नसतो; यामुळें अद्वैतपर वचनेंहि द्वैतपर लावण्याचा यत्न तो करितो; आणि अशाच रीतीनें अद्वैतवादीहि त्याला प्रत्युत्तर देत असतात. अशा रीतीनें दोन तट पडून त्यांत युद्धें सुरू होतात. पण हा कांहीं वेदग्रंथांचा अपराध नव्हे. सारे श्रुतिग्रंथ शुद्ध द्वैतपर आहेत असें सिद्ध करूं पाहणें जितकें मूर्खपणाचें आहे, तितकेंच ते अद्वैतपर मानणें चुकीचें आहे. ते द्वैतपर आहेत आणि अद्वैतपरही आहेत. अर्वाचीन काळीं नव्या कल्पनांचा उदय होऊन त्यांच्या दृष्टीनें श्रुतिग्रंथांच्या रहस्याचा उलगडा करणें सुकर झालें आहे. मानवी मनाची स्थिति पाहतां या दोन्ही मतांचें अस्तित्व अवश्य आहे असें आपणांस आढळून येईल. या दोहोंच्या अस्तित्वावांचून त्याची उत्क्रांति सुलभपणें घडून येणार नाहीं; आणि याकरितांच वेदग्रंथांनीं या दोहोंचेंहि विवरण केलें आहे. अखेरची मजल सुखरूपतेनें गांठतां यावी म्हणून श्रुतिमातेनें या मार्गाला क्रमशः चढत्या अशा पायऱ्यांची योजना केली आहे, हे तिचे मोठे उपकार होत. परस्परविरोधी वचनें योजून तट उपस्थित करावे आणि अशा रीतीनें भावी युद्धाचें बीजारोपण करावें असा श्रुतींचा हेतु नाहीं. आपल्या मुलांना अशा रीतीनें भुलवून भलत्याच मार्गाला नेण्याचें कार्य श्रुतींनीं केलेलें नाहीं. आपल्या लहानग्या लेंकरांकरितांच नव्हे तर कांहीं तरुणांकरितांहि या पायऱ्यांची योजना श्रुतींनीं केली आहे. लहान मुलांना तर त्यांची आवश्यकता आहेच, पण पुष्कळशा मोठ्या माणसांनाहि त्यांची गरज आहे. आम्हांला देह आहे आणि देह हाच मी अशी आमची भावना आहे तोंपर्यंत व्यक्तिविशिष्ट परमेश्वराचीहि जरूर आम्हांला आहे. आह्मांला पांच इंद्रियें आहेत आणि त्यांच्या द्वारें आम्हांहून वेगळ्या अशा बाह्यजगाचा अनुभव आह्मांस होतो

अशी आमची समजूत आहे, तोंवर व्यक्तिविशिष्ट परमेश्वरावांचून आह्मांस तरणोपाय नाहीं. या साऱ्या कल्पना आमच्या चित्तांत शिल्लक आहेत तोंपर्यंत आत्मा, परमात्मा आणि बाह्य सृष्टि असें तीन स्वरूपांचें अस्तित्व कबूल करण्यावांचून आपणांस गत्यंतर नाहीं, हें श्रीरामानुजांनीं उत्तम प्रकारें सिद्ध केलें आहे. याकरितां बाह्य जग जोंपर्यंत वेगळेपणानें भासत आहे, तोंपर्यंत आत्मा आणि परमात्मा एकरूप आहेत असें म्हणणें ही पोकळ बडबड आहे. यांचें द्वैत प्रत्यक्ष भासत असतां तोंडानें एकरूपतेच्या गोष्टी सांगणें हा शुद्ध वेडेपणा नव्हे काय ? सामान्य मानवी मनाची घटनाच अशा प्रकारची आहे कीं, एकंदर अस्तित्वरूपाचा प्रत्यय त्याला वेगवेगळया स्वरूपांनींच व्हावा. आतां जे महापुरुष मनातीत स्थितीला जातात ते अर्थात् सृष्टिपलीकडेहि उड्डाण करितात. 'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह' अशा शून्यावस्थेपलीकडेहि त्यांची मजल गेलेली असते. या ठिकाणीं जीवात्म्याच्या सर्व बंधनांचा उच्छेद झालेला असतो आणि केवळ याच स्थितींत 'सोहम्,' 'सर्व खल्विदं ब्रह्म' या वचनांचा अनुभव त्याला होतो. हा अनुभव होण्यास ज्ञान, विज्ञान आणि भक्ति या तिन्ही मार्गांचा उपयोग होतो. कृष्ण मध्येंच अदृश्य झाला तेव्हां त्याच्या नांवानें टाहो फोडून गोपी आक्रंदन करूं लागल्या. 'कृष्ण, कृष्ण' यावांचून दुसरा उच्चार त्यांच्या तोंडानें होईना. सर्वत्र कृष्णरूप त्यांना दिसूं लागलें. अखेरीस आपणहि कृष्णच आहों अशी भावना होऊन कृष्णाप्रमाणेंच त्यांनीं वस्त्रें परिधान केलीं आणि कृष्णाप्रमाणेंच त्या क्रीडा करूं लागल्या. त्या कृष्णरूप बनून गेल्या. भागवतांत हें वर्णन केलेलें आहे. यांत शुद्ध भक्तीनें अद्वैतापर्यंत कसें जातां येतें हें उत्तम प्रकारें दाखविलें आहे. अशाच प्रकारची एक हकीकत सुफी मताच्या एका कवीनें फारसी भाषेंत सांगितली आहे.

आपल्या उद्दिष्टाकडे पोंचण्याचे मार्ग अनेक आहेत आणि त्याचप्रमाणें त्यांत पायऱ्याहि अनेक आहेत. याकरितां, त्यांजसंबंधीं युद्धें करण्याचें कांहींच प्रयोजन आम्हांस नाहीं. आतां पुराणकालींच्या निरनिराळया टीकाकारांनीं आपापल्या दृष्टीनें वेगवेगळीं मतें प्रकट केलीं असलीं तरी त्या साऱ्यांसच आपण नमन करूं या. कारण, ज्ञान ही मर्यादित चीज नाहीं. त्याचप्रमाणें तिचा सर्व सांठा कोणा एकापाशींच आहे असेंहि नाहीं. तिच्या

प्रकटीकरणाचे मार्ग अनेक असून स्वरूपेंहि भिन्नभिन्न असूं शकतात. याकरितां अर्वाचीन अथवा प्राचीन पंडितांपैकीं कोणा एकाचीच बाजू धरण्याचें आपणांस कारण नाहीं. प्राचीनकाळीं ज्याप्रमाणें अनेक मंत्रद्रष्टे आणि ऋषि होऊन गेले, त्याचप्रमाणें ते चालू काळीं असून पुढेंही ते निर्माण होणार आहेत याविषयीं शंका बाळगूं नका. फार काय, पण प्राचीनकाळीं ज्याप्रमाणें व्यास, वाल्मीक आणि शंकराचार्य होऊन गेले, त्याचप्रमाणें त्यांची योग्यता स्वतःच्या अंगीं तुम्हांसहि आणतां येईल. तुम्हीं शंकराचार्य होऊं नये असें कोणतेंहि कारण अस्तित्वांत नाहीं.

आमच्या धर्माचा हाहि एक विशेष आहे. आपलें ज्ञान ईश्वरदत्त होतें असें इतर धर्मांचे प्रवर्तक म्हणत, यामुळें त्यांच्या मतांना जो अधिकार प्राप्त झाला तो खुद्द ईश्वरापासून आलेला आहे, असें त्याचे सर्व अनुयायी म्हणत आले आहेत. ईश्वराशीं इतकें साहचर्य फारच थोड्यांच्या नशिबीं असणार हें उघड आहे; आणि फक्त त्यांच्याच मार्फत आपणांसारख्या सामान्य जनांची गांठ ज्ञानाशीं पडणार असें दुसरे धर्मानुयायी म्हणतात. यामुळें आद्य धर्मप्रवर्तकानें जें कांहीं सांगितलें असेल त्याचें ग्रहण डोळे मिटून आपण केलें पाहिजे असा इतर धर्मांचा हट्ट आहे. नॅझारेथच्या येशूला अशाच ज्ञानाची प्राप्ति झाली होती आणि याकरितां आपण सर्वांनीं त्याची आज्ञा शिरसावंद्य मानली पाहिजे असा ख्रिस्तानुयायांचा हट्ट असतो. पण आमच्या धर्माची गोष्ट तशी नाहीं. हें ज्ञान कोणा एखाद्यालाच प्राप्त होण्यासारखें आहे, असें आम्हीं कधींच म्हटलें नाहीं. पूर्वकाळच्या मंत्रद्रष्ट्यांना तें जसें प्राप्त झालें, तसेंच तें भविष्यत्कालच्या मंत्रद्रष्ट्यांनाही प्राप्त होईल. आतां इतकें मात्र खरें कीं, वाक्पंडितांना, पुस्तकी विद्वानांना अथवा प्राचीनभाषाकोविदांना तें प्राप्त होणार नाहीं. त्यासाठीं द्रष्टेपणच अंगीं आलें पाहिजे. सूक्ष्मविचार प्रत्यक्ष पाहण्याचें सामर्थ्य ज्याच्या अंगीं असेल, त्याला तें अवश्य प्राप्त होईल. मोठमोठे वादविवाद दीर्घकाळपर्यंत करीत बसलांत तरी त्यामुळें आत्मानुभव तुम्हांस होणार नाहीं. तुमची बुद्धि कितीहि विशाल झाली तरी आत्म्याचें आकलन ती करूं शकत नाहीं; आणि सारे श्रुतिग्रंथ तुम्हीं मुखोद्गत केले तरी त्यानेंहि या ज्ञानाची प्राप्ति तुम्हांस होणार नाहीं. खुद्द श्रुतींचेंही असेंच वचन आहे. अशा अर्थाचें वचन जगांतील दुसऱ्या कोणत्याही धर्मग्रंथांत

तुम्हांस आढळलें आहे काय? नियमानें 'चर्चांत' जाऊन ईश्वरप्रार्थना केल्यानें ईश्वरप्राप्ति होणार नाहीं. पवित्र नद्यांचीं स्नानें करून आणि गंधभस्माचे पट्टे ओढूनहि ईश्वरप्राप्ति होणार नाहीं. त्याचप्रमाणें काळे, पिवळे अथवा भगवे कपडे घालूनही तो तुम्हांस मिळावयाचा नाहीं. इंद्रधनुष्याच्या साऱ्या रंगांनीं तुम्हीं स्वतःस सुशोभित केलें तरी ईश्वर तुम्हांस दिसावयाचा नाहीं. जोंपर्यंत अंतःकरणाचें कपाट उघडलें नाहीं आणि जोंपर्यंत तें विस्तृत होऊन विश्वाकार झालें नाहीं, तोंपर्यंत हे बाहेरचे सारे देखावे व्यर्थ होत. अन्तःकरण रंगलें पाहिजे; मग बाहेरचा रंग असो वा नसो. अंतःकरण रंगणें हाच खरा धर्म; आणि तोच खरा आत्मप्रत्यय. बाह्यरंगांची थोडीबहुत मदत या मार्गांत तुम्हांस होत असेल, तर ती तुम्ही खुशाल घ्या; पण या रंगांची गुलामगिरी तुम्ही करूं नका. त्यांतच कांहीं विशेष आहे, असें तुमच्या चित्तानें एकवार घेतलें, कीं तुमच्या मार्गांत तुम्हांस मदत करण्याऐवजीं तुमच्या पायांत ते श्रृंखलांसारखे होऊन पडतील. मग हे रंग म्हणजे धर्म असें तुम्हांस वाटूं लागेल. देवळांत एकदां देहाला नेऊन आणलें कीं, धर्मकार्य संपलें असें तुम्हांस वाटूं लागेल. भिक्षुकाला घरीं बोलावून आणि त्याची बडबड ऐकून दक्षिणा दिली कीं, स्वतःस धार्मिक म्हणवून घेण्यास तुम्हांस हरकत दिसेनाशी होईल. याकरितां या बाह्य वस्तूंच्या नांगींत जें विष आहे त्यापासून तुम्हीं सावध राहिलें पाहिजे. ज्याच्या अंतःकरणांत अनुराग उत्पन्न झाला, त्याला बाहेरच्या रंगरागाची जरूर नाहीं. हाच खरा धर्म होय. जो मनुष्य बाह्य उपाधींत धर्म सांठविला आहे असें खरोखर समजत असतो, तो अवनतावस्थेस गेला आहे असें समजावें. बाह्य इंद्रियांच्या द्वारें सृष्टपदार्थांचें ज्ञान करून घेणें हेंहि खरें ज्ञान नव्हे आणि ईश्वराप्रत पोंहचण्याचाहि तो मार्ग नव्हे. आमच्या शास्त्रांनीं हा मुद्दा वारंवार बजावून सांगितला आहे. क्षणोक्षणीं बदलणाऱ्या या विश्वाच्या मागें जें नित्य एकरूप आहे, त्याचा अनुभव ज्यायोगें होईल तो धर्म. सर्वांचा खरा धर्म हा एकच. आभासमय विश्वाच्या मागें असलेलें सत्यरूप ज्यानें ओळखलें, आपल्या स्वतःच्या ठिकाणीं असलेलें आत्मरूप ज्याच्या अनुभवास आलें, जो परमेश्वराला प्रत्यक्ष समोरासमोर भेटला आणि वस्तुमात्रांत ज्याला परमेश्वर दिसूं लागला, तोच एक 'ऋषि' या पदवीला योग्य झाला असें समजावें. हें ऋषित्व प्राप्त होईपर्यंत

तुम्ही धर्मज्ञ झालां असें म्हणतां येत नाहीं. तुम्ही तसे झालां म्हणजेच धर्माच्या खऱ्या मार्गाला तुम्ही लागलां असें होईल. आतां तुम्ही जें कांहीं करीत असतां ती केवळ पूर्वतयारी आहे. ऋषित्व प्राप्त होईपर्यंत ज्या नानाविध गोष्टी तुम्ही करितां त्यांनीं फारतर तुमच्या बुद्धीला तालीम मिळेल; किंवा तुमच्या क्रिया शुद्ध जडदेहापुरत्या असल्या तर त्याला कष्टविण्यापुरताच त्यांचा उपयोग होईल. या क्रिया सोडून ऋषित्वाच्या मार्गाकडे तुम्ही वळलां म्हणजेच धर्ममार्गावर तुम्ही चालू लागलां असें होईल.

याकरितां, येथें जो एक मुद्दा विशेषेंकरून सांगितला आहे, तो आपण सर्वांनींच लक्षांत बाळगण्याजोगा आहे. तो इतकाच कीं, ज्याला मुक्तीची खरी लालसा असेल, त्याला ऋषित्व प्राप्त करून घेण्यावांचून दुसरा मार्गच नाहीं. मंत्रवक्ता नव्हे, तर मंत्रद्रष्टा त्यानें झालें पाहिजे. परमेश्वराची प्रत्यक्ष भेट त्यानें घेतली पाहिजे. आमच्या श्रुतींनीं घालून दिलेला हा नियम सनातनस्वरूपाचा आहे. हा मुख्य मुद्दा ध्यानांत ठेविला म्हणजे श्रुतींचें रहस्य समजून घेणें सोपें होतें. आपल्या मनश्चक्षूवरील पटल नाहींसें होऊन आपल्याच डोळ्यांनीं तेथील अर्थ आपण पाहूं शकतों. आपण कोणत्या अवस्थेंत आहों आणि आपणांस जरूर कशाची आहे हें आपण जाणूं शकतों; आणि हेंच करणें आपणांस अवश्य आहे. पूर्वीं होऊन गेलेल्या टीकाकारांनीं केलेल्या टीकांचा अनादर करण्याचें कारण आपणांस नाहीं. त्यांच्याबद्दल पूर्ण पूज्य बुद्धि आपण बाळगावी. ते सारेच थोर पुरुष होते; पण आतां आपणांस त्यांच्याहूनहि अधिक थोर व्हावयाचें आहे. एक मोठें कार्य त्यांनीं केलें पण आपणांस त्यांच्याहून मोठें कार्य करावयाचें आहे. त्यांना नमन करून या अधिक मोठ्या कार्याला आपण लागूं या. हिंदुस्थानांत पूर्वीं शेंकडों ऋषि होऊन गेले. आतां असे लक्षावधि ऋषि आपण निर्माण करूं या, असा मनाचा कृतनिश्चय करून तुम्हांपैकीं प्रत्येकजण जेव्हां कार्याला लागेल, तेव्हां मातृभूमीच्या उन्नतीचा क्षण अगदीं जवळ होईल. यांत एकट्या हिंदुस्थानाचेंच नव्हे तर साऱ्या जगाचेंहि कल्याण आहे. तुमच्या बुद्धीचा निश्चय मात्र झाला पाहिजे. जो तुमचा निश्चय तसेंच तुमचें स्वरूपहि होईल. आपण धैर्यशाली आहों असा निश्चय तुम्हीं केला, तर तुम्ही धैर्यशाली व्हाल. आपण ऋषि आहों हेंच चिंतन तुम्हीं सदोदित केलें तर तुम्ही उद्यांच ऋषि व्हाल. तुम्हांला कोणीही अडवूं शकणार नाहीं. अनेक

टीकाकारांच्या अनेक प्रकारच्या मतांत कितीहि विरोध आढळत असले तरी एका सिद्धांताबद्दल सर्वांचें एकमत आहे. आत्मा हा स्वभावतःच पूर्ण पवित्र आणि सच्चिदानंद स्वरूप आहे याबद्दल कोणाचाच वाद नाहीं. यांत फरक इतकाच कीं, त्याचें आकुंचन आणि विकसन परिस्थित्यनुरूप होतें असें श्रीरामानुज म्हणतात आणि मायावरणामुळें तसें झाल्याचा भास उत्पन्न होतो असें श्रीशंकराचार्य म्हणतात. या बारीकसारीक मतांतराकडे आपण कानाडोळा करावा. व्यक्त अथवा अव्यक्त स्थितींत आत्म्याचें मूलरूप एक आहे याबद्दल कोणाचा वाद नाहीं. या एका आद्य सिद्धांताला तुह्मी निश्चयानें चिकटून रहा. विश्वांतील सारी शक्ति तुमच्या ठिकाणीं एकवटली आहे, तुह्मांला करण्यास अशक्य असें कांहीं नाहीं. दौर्बल्य येऊं न देतां असा आत्मविश्वास धरा. मी दुबळा आहें, मी अर्धवेडा आहें अथवा मला अमुक गोष्ट समजत नाहीं असें म्हणण्याची खोड आज आपणांस आहे. ही दुष्ट खोड प्रथम टाकून द्या. कोणाच्याहि मदतीवांचून वाटेल ती गोष्ट मी करीन असें ह्मणत चला. विश्वांतील सर्व शक्ति तुमच्या ठिकाणीं गुप्तरूपानें आहे ती व्यक्तदशेला आणणें इतकेंच तुमचें कार्य आहे.

# दानधर्म.

( स्वामीजींचा मुक्काम मद्रास येथें असतांना 'चेन्नापुरी–अन्नदान–समाजम्' नांवाच्या संस्थेच्या वार्षिक सभेच्या प्रसंगीं ते हजर होते. श्रोतृगणास स्वामीजींनीं चार शब्द सांगावे अशी इच्छा प्रदर्शित केल्यावरून त्यांनीं पुढील लहानसें भाषण केलें )

ब्राह्मणाला इतर जातींहून अधिक समजून आणि दानावर त्यांचा विशेष हक्क आहे असें समजून त्यांना इतर जातींहून अधिक दान कोणीं करूं नये, असें एक विधान माझ्या पूर्वींच्या वक्त्यानें केलें आहे. अशा रीतीनें ब्राह्मणज्ञातीला विशेष हक्क देण्यांत जशी एक वाईट बाजू आहे, त्याचप्रमाणें या गोष्टीची एक चांगली बाजू आहे हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. आज हिंदुस्थानांत जी कांहीं संस्कृति दिसत आहे, तिचें मुख्य अधिष्ठान आजहि ब्राह्मणवर्ग हेंच आहे. तत्त्ववेत्तेहि आज याच वर्गांत आहेत. ऐहिकापलीकडे उडी मारून अदृश्य प्रदेशांत तत्त्वरत्नें शोधण्याचें काम प्राचीन काळीं ज्याप्रमाणें मुख्यतः ब्राह्मणांनीं केलें, त्याचप्रमाणें तें काम अंशतः ब्राह्मणवर्गच करीत आहे. इतर ज्ञातींनीं ब्राह्मणांना पोसलें, म्हणूनच बुद्धि वाढीला लावण्यास ब्राह्मणवर्गाला अवकाश मिळाला. त्या वर्गाच्या चरितार्थाचीं साधनें तुम्हीं आज सर्वथा नाहींशीं केलीं, तर साऱ्या राष्ट्राचेंच मोठें नुकसान होणार आहे. त्या विशिष्ट वर्गाचें मोठेंसें नुकसान होईल असें नाहीं. आमच्या देशांत दानधर्माच्या कामीं अविचार फार होतो, असा एक आक्षेप आम्हांवर आहे. परक्या देशांतील कायदेशीर दानधर्म पुष्कळांना मोठा पसंत पडतो. पण या दोन प्रकारांची परस्पर तुलना केली, तर त्याचे परिणाम मात्र अगदीं अनपेक्षित स्वरूपाचे आढळून येतात. दाता स्वतःच्या खुषीनें जें कांहीं देतो, तें घेऊन आमचा हिंदी उडाणटप्पू खूष होतो व निघून जातो. कमी अधिकाबद्दल तो तंटा करावयाचा नाहीं. दिलें तेवढ्यांत संतोष मानून आपली जीवितयात्रा अगदीं शांततेंत तो घालवीत असतो. पण गोऱ्या उडाणटप्पूची गोष्ट याहून वेगळी आहे. कायद्यानें निर्माण केलेल्या कंगालखान्यांत जाण्यास तो खुषी नसतो. कारण, तेथेंहि त्याचे हातपाय कायद्यानें बांधलेले.

बने तोंपर्यंत आपलें स्वातंत्र्य गमावण्याची इच्छा कोणासहि नसते. गोळाभर अन्नासाठीं कायद्याच्या जाळ्यांत आपणांस बांधून घेणें, कोणासहि बरें वाटत नाहीं. कंगालखान्यांत जावयाचें नाहीं आणि बाहेर कोणाकडून कांहीं मिळावयाचें नाहीं, अशा कैचींत सांपडलेल्या या गोऱ्या उडाणटप्पूनें चोऱ्या करूं लागावें हें ओघासच आलें. समाजाची सेवा तो करीत नाहीं, आणि स्वस्थ बसून खाण्याची सोय नाहीं. असें झालें म्हणजे तो समाजाचा शत्रु बनतो. समाजाला असे शत्रू निर्माण झाले म्हणजे सांपडेल तेथें आणि सांपडेल त्या रीतीनें समाजावर ते प्रहार करीत सुटतात. मग त्यांच्या निवारणासाठीं पोलिसांच्या तुकड्या हव्या, न्यायाधिकारी हवेत, कैदखाने पाहिजेत आणि बेड्या खोडेहि अवश्य पाहिजेत. संस्कृति या नांवाचा रोग मनुष्यजातीला जडलेला राहील, तोंपर्यंत दारिद्र्य ही वस्तूहि असावयाचीच; आणि मग तिच्या निवारणासाठीं उपायहि हवेतच. विलायती कायदेशीर निवारण आणि आमचें अनिर्बंध निवारण या दोहोंपैकीं कोणता मार्ग बरा आहे हें तुम्हीच ठरवा. आमच्या इकडे संन्याशी बैराग्यांत तरी आमच्या पद्धतीचा मोठा दुरुपयोग होतो असें मला वाटत नाहीं. यांच्यांतील पुष्कळ लोक वैराग्यशील नसतील हें मला कबूल आहे. तथापि अन्न मिळविण्यासाठीं आणि सोंगाच्या बतावणीपुरतें तरी धर्मज्ञान मिळविणें त्याला भाग पडतें. ताकापुरतें रामायण सांगतां न आलें, तर ताकहि त्याला मिळावयाचें नाहीं. पाश्चात्य देशांतील निवारणाचे कायदेशीर उपाय अमलांत आणण्याकरितां केवढ्या तरी खर्चाचीं खातीं समाजाला पोसावीं लागतात; आणि या कंगालखान्यांतील मिरासदार कंगाल लोक कंगालखान्यांतून तुरुंगांत आणि तुरुंगांतून कंगालखान्यांत, अशा यात्रा करीत आपला जन्म काढतात. अशा स्थितींत या दोन पद्धतींपैकीं बरी कोणती हें ठरविण्याचें काम तुमचें आहे.

# हिंदु धर्मांतील सामान्य सिद्धान्त.

(लाहोर येथील व्याख्यान)

पवित्र आर्यावर्तांतील ही पवित्रतम भूमि आहे. ब्रह्मावर्त या नांवानें भगवान् मनूंनीं जिचा उल्लेख केला आहे ती भूमी हीच. हें सारें दृश्य उल्लंघन करून त्यापलीकडे असलेल्या भूमीचा शोध करण्याची उच्चतम महत्त्वाकांक्षा प्रथम याच भूमीला झाली; आणि याच भूमींतून निघालेल्या ज्ञानगंगेच्या प्रचंड ओघानें सर्व जग पावन झालें. सर्व जगाला शांति देण्याचा मार्ग याच भूमींपासून झाला. या भूमींतील नद्या जशा मोठ्या, त्याचप्रमाणें तींत उत्पन्न होणारे ज्ञानप्रवाहही प्रचंड. या सार्‍या प्रवाहांचा संगम झाल्यानंतर जो स्रोत उत्पन्न झाला, त्यानें हिंदुस्थानाचेंच नव्हे तर सार्‍या जगाचें आक्रमण केलें. त्याच्या भव्य नादानें दशदिशा दुमदुमून गेल्या. आर्यावर्तावर झालेल्या सार्‍या स्वार्‍यांचा पहिला मोठा तडाखा याच भूमीनें सहन केला आहे. आर्यावर्तावर स्वार्‍या करणार्‍या रानटी लोकांना शौर्यानें प्रथम तोंड देणारी भूमी हीच. इतकीं युद्धें आणि दुसरेहि नाना प्रकारचे ताप सहन करून ही भूमी अद्यापिहि क्षत्रियत्वाची खाण राहिली आहे. तिचें वैभव आणि सामर्थ्य हीं अद्यापिहि शिल्लक आहेत. याच भूमींत श्रीनानकाचा जन्म झाला आणि जगाला त्यांनीं प्रेमाचा मार्ग दाखविला. त्यांनीं हिंदूंनाच नव्हे तर मुसलमानांनाहि आपले बाहु पसरून आलिंगन दिलें. आपल्या प्रेममय अंतःकरणांत हिंदु आणि मुसलमान या दोघांसहि एकाच भावनेनें त्यांनीं ठाव दिला. याच क्षेत्रांत नानकाच्या मालिकेंतील धैर्यशाली आणि उज्ज्वलकीर्ति गुरु गोविंदसिंग जन्मास आला. धर्मकार्यासाठीं आपल्या स्वतःचा आणि आपल्या आप्तेष्टांचा बलि त्यानें दिला. ज्यांच्या हितासाठीं त्यानें हें स्वात्मार्पण केलें, ते त्यास सोडून गेले असतांहि त्या गोष्टीची दिक्कत न बाळगतां आपलें कार्य पुरें करून त्यानें देशत्याग केला. घायाळ झालेल्या सिंहाप्रमाणें गुहेच्या एकांतांत त्यानें देह विसर्जन केला. ज्यांनीं ऐन प्रसंगीं त्याजकडे पाठ फिरविली, त्यांजबद्दल मृत्युसमयींहि त्यानें कुरकुर केली नाहीं. कोणाविरुद्ध एक शब्दहि मुखावाटे बाहेर पडूं न देतां शांत चित्तानें त्यानें देहविसर्जन केलें.

अशा प्रकारच्या या प्राचीन भूमींत मी तुम्हांसमोर आज उभा आहें. मोठा तत्त्वदर्शी अथवा गुरु म्हणून मी येथें आलों नाहीं. कारण गुरु होण्याइतकें ज्ञान मजपाशीं नाहीं. पाश्चात्य भागांतील आपल्या बांधवांस भेटून सुखदुःखाचे चार शब्द त्यांजपाशीं बोलावे, इतक्याच हेतूनें मी येथें आलों आहें. आपणां दोघांत भेद कोठें आहे हें पाहण्याकरितां नव्हे, तर कोणत्या मुद्यांवर आपणांत एकवाक्यता आहे, हें पाहण्याकरितां मी आलों आहें. कोणत्या भूमिकेवर आपणांतील एकी कायम टिकेल हें जाणण्यासाठीं मी आलों आहें. प्राचीनतम काळापासून ज्या तत्त्वांचा उच्च घोष आपल्या भूमींत झाला आहे, त्यांच्या पायावर आपली एकी दृढतर कशी होईल, हें जाणण्यासाठीं मी येथें आलों आहें. परस्परांतील भेद वाढवून विनाशाचीं बीजें पेरण्याकरितां नव्हे, तर आपणां दोघांसहि एकजुटीनें कोणतें विधायक कार्य करितां येईल, हें जाणण्यासाठीं मी येथें आलों आहें. परस्परांनीं परस्परांवर टीका करण्याचे दिवस आतां संपले. आतां सर्वांचें एकमत कोठें होतें, एवढेंच पाहून एखादें संघटित कार्य करण्याची वेळ आली आहे. कांहीं प्रसंगीं अत्यंत कडक टीकेचीहि जरूर जगाला असते. पण अशी वेळ दीर्घ काळ टिकणारी नव्हे. विशिष्ट प्रसंगापुरतीच ती असते; आणि प्रसंगाच्या समाप्तीबरोबर ही टीकेचेहि प्रवृत्ति समाप्त झाली पाहिजे. त्यानंतर चिरकाल टिकणाऱ्या सुसंघटित कार्यास सुरवात झाली पाहिजे. आपलें पाऊल पुढें पडण्यास टीकेचा आणि विनाशक कार्यांचा उपयोग होत नसून, परस्परमदतीचा आणि विधायक प्रवृत्तीचाच उपयोग होत असतो. गेलीं शंभर वर्षें आपल्या या भूमींत टीकेचा पूर वहात होता. पाश्चात्य भौतिक शास्त्रांचा उज्ज्वल दीप झगझगीत पेटून त्याचा प्रकाश साऱ्या अंधाऱ्या जाग्यावर पडला. अगदीं कोनेकोपरे आणि बिळेंसुद्धां लपून राहिलीं नाहींत; एवढेंच नव्हे तर प्रकाशाच्या तीव्रतेनें तीं अधिकच स्पष्ट दिसूं लागलीं. इतर चांगल्या वस्तू त्यामुळें मागें पडल्या. अशा स्थितींत मोठे मोठे बुद्धिमान् पुरुष जन्मास आले. सत्य आणि न्याय यांजबद्दल पूर्ण भक्ति त्यांच्या चित्तांत होती. स्वदेशाबद्दल त्यांच्या मनांत अत्यंत प्रेम होतें, आणि विशेष हें कीं, ईश्वर आणि आपला धर्म यांजबद्दल त्यांच्या अंतःकरणांत भक्ति होती. या उत्कट भक्तीमुळेंच आपल्या धर्मांत आणि समाजरचनेंत जीं व्यंगें म्हणून त्यांना वाटलीं, त्यांजवर टीकेचा भडिमार त्यांनीं उडवून दिला. अंत-

राष्ट्यांतील अत्यंत दृढप्रेमामुळेंच या गोष्टीला ते प्रवृत्त झाले. आपल्या देशाची कीर्ति उज्ज्वल व्हावी अशी खरी इच्छा त्यांच्या हृदयांत नसती, तर या भानगडींत ते कधींच पडले नसते. या भक्तिमान् पुरुषांचा यशोदुंदुभि आपण वाजवूं या. कांहीं झालें तरी आपल्या कल्याणाचा मार्ग त्यांनीं आपणांस दाखविला आहे. याकरितां त्यांना नमन करून पुढील कार्यास आपण लागलें पाहिजे. हे टीकेचे दिवस संपले ही गोष्ट चित्तांत आणून, आतां संघटनात्मक कार्याची तयारी आपण केली पाहिजे. आजपर्यंत आपण एकमेकांचे दोष मात्र पाहिले आणि एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्याहि आपण काढल्या. आतां हें विनाशक कार्य बंद करून विधायक कार्यासाठीं आपण एक झालें पाहिजे. टीकास्त्रानें विस्कळित करून टाकलेल्या साऱ्या शक्ति आपण एकवटल्या पाहिजेत. गेलीं कित्येक शतकें आपल्या देशाची प्रगति जागच्या जागींच राहिली आहे. तिचा गाडा आतां आपण पुढें ढकलला पाहिजे. आपल्या मोडकळीस आलेल्या घराची डागडुजी करण्याकरितां कांहीं दिवस तें सोडून देऊन आपण वेगवेगळ्या ठिकाणीं रहावयास गेलों होतों. आतां त्याची साफसुफी होऊन तें रहावयास पुनः योग्य झालें आहे. आर्यांच्या वंशजांनों ! तुमचा मार्ग आतां निष्कंटक झाला आहे. त्यावरून पुढें चालत जावयाचें इतकाच कार्यभाग आतां तुह्मांस करावयाचा आहे.

सद्गृहस्थ हो, या एकाच हेतूनें प्रेरित होऊन मी तुम्हांसमोर आज आलों आहें; कोणत्याहि विशिष्ट पंथाचा, मताचा किंवा पक्षाचा मला अभिमान नाहीं, हें प्रारंभींच तुम्हांला सांगणें इष्ट वाटतें. माझ्या दृष्टीनें सारेच पंथ मला पूज्य आणि उपयुक्त वाटतात. ते सारेच सारखे मोठे आहेत. त्या साऱ्यांवरच माझें प्रेम असल्यामुळें त्यांत सत्यवस्तु कोणत्या रूपानें वास करते आणि त्यांत चांगला भाग कोणता आहे, हें शोधण्यांतच माझें सारें आयुष्य मीं खर्च केलें. याकरितां, आपलें एकमत कोठें आहे, तें शोधून काढून तेवढेच मुद्दे तुह्मांपुढें आज मी मांडणार आहें. अशा रीतीनें कांहीं सामान्य सिद्धांतांबद्दल ईशकृपेनें आपणांत एकवाक्यता झाली तर त्याच्या पायावर पुढील इमारत रचण्याचें कार्य आपण सुरू करूं. जेथें तंटयाचें कारण नाहीं तेवढे सिद्धांत तरी प्रत्यक्ष सृष्टींत आणण्याचा यत्न करूं. आपण सारे हिंदु आहों. हिंदु हा शब्द कोणत्याहि वाईट अर्थानें मीं वापरला नाहीं. यांत वाईट

अर्थाचा कांहीं ध्वनी निघतो असें कोणास वाटतें; पण या म्हणण्यांत मला तथ्य दिसत नाहीं. सिंधुनदापलीकडे राहणारे ते हिंदु इतकाच अर्थ प्राचीन काळीं होता. आपल्या द्वेष्ट्यांनीं यांत आतां कांहीं वाईट अर्थ घुसडला असेल, पण नुसत्या नांवांतच कांहीं विशेष अर्थ आहे असें नाहीं. हिंदु हा शब्द उज्ज्वल कीर्तीचा आणि पराविद्येचा दर्शक होणें अथवा तो गुलामगिरींत तुडविले गेलेल्या लोकांचा दर्शक होणें, हें सर्वस्वी आपणावरच अवलंबून आहे. आपण हल्लींसारखेच नास्तिक, निरुपयोगी आणि परावलंबी राहिलों तर हिंदु हा शब्द या दुर्गुणांचा द्योतक व्हावा, हें रास्तच आहे. सांप्रतकाळीं या शब्दाला कांहीं वाईट अर्थ आला असेल तर त्याकडे तुम्ही लक्ष देऊं नका, आणि त्याबद्दल वादही करीत बसूं नका. कोणत्याहि भाषेचें सारें सामर्थ्य एकवटून उच्चगुणदर्शक शब्द निर्माण करावयाचे, तर तो शब्द हिंदु हा एकच होऊं शकेल असें आपण आपल्या कृतीनें सिद्ध करूं या. जगांतील साऱ्या अत्युच्च भावना या एकाच शब्दांत सांठविण्याचें कार्य आपण करूं या. आपल्या पूर्वजांबद्दल अथवा त्यांच्या कृतीबद्दल स्वतःस केव्हांहि लाज वाटूं द्यावयाची नाहीं, हा माझा एक निश्चय सारा जन्म मीं अबाधित राखिला आहे. जगांत कोणी अत्यंत अभिमानी मनुष्य असेल तर तो मी आहें. पण हा अभिमान माझ्या स्वतःबद्दलचा नसून माझ्या पूर्वजांबद्दल आहे हेंहि तुम्हांस प्रांजलपणें सांगितलें पाहिजे. प्राचीनकाळाचा अभ्यास जों जों मीं करितों, तों तों माझा हा अभिमान वाढतच जातो. माझा हा अभिमान अस्थानीं नाहीं, अशी खात्री अधिकाधिक पटत गेल्यामुळेंच माझी बुद्धि निश्चित स्वरूपाची होते; आणि चव्हाट्यावर उभें राहून हे शब्द जगासमोर उच्चारण्याचें धैर्यहि मला प्राप्त होतें. आपल्या पूर्वजांच्या चरित्राच्या अभ्यासामुळेंच मी रजाचा गज झालों. ह्या आपल्या पूर्वजांनींच मला स्फूर्ति देऊन आपलें उच्च कार्य माझ्या हस्तें सुरू केलें. तुम्ही त्याच आर्यांचीं मुलें आहां; आपल्या पूर्वजांबद्दल तुह्मांसहि असाच अभिमान उत्पन्न व्हावा अशी परमेश्वराची प्रार्थना मी करितों. तुमच्या पूर्वजांच्या ठिकाणीं जी अचल श्रद्धा होती, तीच तुमच्या रक्तांत आणि रोमरंध्रांत पुनः खेळूं लागो. ती तुमच्या जीवात्म्याशीं एकरूप होवो आणि मुक्तिमार्ग साऱ्या जगासाठीं मोकळा करण्याचें पुण्य तुम्हांस लाभो.

आपलें सर्वांचें एकमत कोठें आहे याचा विचार करण्यापूर्वी आणखीहि एक मुद्दा आपण लक्षांत ठेवला पाहिजे. ज्याप्रमाणें प्रत्येक व्यक्तीला कांहीं विशिष्टत्व म्हणून असतें, त्याचप्रमाणें तें प्रत्येक राष्ट्रालाहि असतें. 'देह तितक्या प्रकृति' ही म्हण राष्ट्रालाहि लागू पडण्यासारखी आहे. ज्याप्रमाणें दोन व्यक्ती एकसारख्या असत नाहींत, त्याचप्रमाणें दोन राष्ट्रेंहि एकसारखीं असावयाचीं नाहींत. सृष्टिक्रमांत प्रत्येक मनुष्याला आपापलें नियत कार्य करावयाचें असतें; आणि त्या कार्यपूर्तीला अनुरूप अशी त्याची मनोघटना असते. आपल्या पूर्व-कर्माला अनुसरून पुढील क्रिया तो करीत असतो. चालू जन्माचा आपला कार्य-क्रम त्यानें पूर्वींच ठरवून टाकलेला असतो; आणि त्याला अनुसरून त्याच्या साऱ्या क्रिया घडत असतात. हाच नियम राष्ट्रालाहि लागू आहे. सृष्टीच्या व्यवहारांत प्रत्येक राष्ट्रालाहि कांहीं नियतकार्य करावयाचें असतें. या हेतूच्या पूर्तीसाठींच तें राष्ट्र जगत असतें. हा नियम लक्षांत घेऊन आपल्या राष्ट्राचें कार्य काय आहे, याचा विचार प्रथम केला पाहिजे. हिंदु मानवकुल कोणत्या हेतूनें जन्मास आलें आहे हें प्रथम शोधून नंतर आपला कार्यक्रम आपण निश्चित केला पाहिजे. जगांतील राष्ट्रांच्या मालिकेंत आपलें स्थान कोणतें हें आपण प्रथम पाहिलें पाहिजे. कांहीं सर्पांच्या डोक्यांत मणि असतात आणि ते नाहींसे होईपर्यंत त्या सर्पांना कशानेंहि मरण येत नाहीं, अशा कल्पित गोष्टी आपल्या लहानपणीं आपण पुष्कळ ऐकल्या आहेत. त्याच-प्रमाणें एखाद्या राक्षसाचा अथवा दैत्याचा मृत्यु एखाद्या ढोलींत राहणाऱ्या पोपटाच्या हृदयांत असतो, असल्या कथाहि आपण पुष्कळ ऐकल्या आहेत. अशाच प्रकारें राष्ट्राचाहि जीवनहेतु एखाद्या ध्येयाच्या मध्यबिंदूत एकवट-लेला असतो. त्या राष्ट्राचें राष्ट्रीयत्व त्या ध्येयांत असतें. हें ध्येय नष्ट होई-पर्यंत त्या राष्ट्राला मृत्यूचें भय नाहीं. तें ध्येय शिल्लक आहे तोंपर्यंत तें राष्ट्र अवनतावस्थेला पोंचलेलें असलें अथवा कितीहि मलूल झालेलें दिसत असलें, तरी तें मृत्युवश होणार नाहीं. हा सिद्धांत लक्षांत घेतला म्हणजे इतिहासां-तील एका अपूर्व चमत्काराचा उलगडा आपणांस होतो. आपल्या या प्रिय भूमीवर रानटी लोकांच्या स्वाऱ्यांच्या लाटांवर लाटा येऊन आदळल्या. 'अल्ला हो अकबर' या आरोळ्यांनीं कित्येक शतकें आकाशहि फाटून जात होतें आणि कोणता क्षण आपल्या आयुष्याच्या अखेरचा होईल, हें कोणाहि

हिंदूला सांगवत नव्हतें. जगांत जितके देश इतिहासांत नमूद आहेत, त्यांत परकीयांच्या पायांखालीं इतका एकसारखा तुडविला गेलेला देश एकहि नाहीं. या देशानें जितकीं दुःखें आणि संकटें भोगलीं त्याचा शतांशहि दुसऱ्या कोणाच्या वांट्याला आलेला नाहीं. तथापि प्राचीनकाळीं अस्तित्वांत असलेलें हिंदुकुल आजहि जशाचें तसेंच अस्तित्वांत आहे. संकटांस तोंड देण्याची त्याची जितकी तयारी पूर्वी होती, तितकीच ती आजहि आहे; इतकेंच नव्हे तर तें कुल या संकटांनीं अधिक बलवान् होत आहे अशींहि चिह्नें आज दिसत आहेत. जग जिंकण्याकरितां पुनः बाहेर पडण्याच्या तयारींत आम्ही आहोंत, हीच गोष्ट आमच्या जिवंतपणाची द्योतक आहे.

आज आपले विचार केवळ हिंदुस्थानाच्या चार भिंतींच्या आंतच वावरत नाहींत, हें आज आपणांस उघड दिसत आहे. आपल्या कल्पनांनीं या भिंतींचें उड्डाण केलें आहे हें आपणांस ठाऊक आहे. आपली मातृभूमि सोडून या कल्पना जगांतील साऱ्या देशांत वावरूं लागल्या आहेत आणि त्यांचा प्रवेश त्या वाङ्मयांत होत आहे. आपली इच्छा असो वा नसो, आपल्या कल्पना आपणांस आतां चिकटून बसत नाहींत, हें निश्चित आहे. या कल्पना विदेशीय वाङ्मयांत शिरत आहेत; एवढेंच नव्हे तर तेथें त्यांचें अधिराज्य स्थापन होईल अशींहि चिह्नें दिसत आहेत. असें कां व्हावें ? याचें कारण हेंच कीं, जगाच्या उत्क्रांतीचें जें समीकृत कार्य चालू आहे, त्यांत भरतभूमीनेंच मोठा वांटा उचलला आहे. मनुष्याच्या मनांत उत्पन्न होणाऱ्या विचारतरंगांतील सर्वांत श्रेष्ठ आणि सर्वांत उदात्त तरंगांची उत्पत्ति भरतभूमींत होते. भरतभूमीच्या तत्त्वज्ञानानें जें श्रेष्ठ स्थान पूर्वी मिळविलें, तें त्याजकडे आजहि चालू आहे. मनुष्य जातीची वाढ किती मार्गांनीं करितां येईल, याचा शोध आमच्या पूर्वजांनींहि अनेक प्रकारें केला होता. अर्वाचीन पाश्चात्य राष्ट्रें ज्याप्रमाणें बाह्य सृष्टींत अनेक मार्ग आज धुंडाळीत आहेत, त्याचप्रमाणें आमचे प्राचीन पूर्वजहि बाह्य सृष्टीचा कोनाकोंपरा धुंडाळीत होते. बाह्य सृष्टीचीं रहस्यें त्यांनीं पुष्कळ शोधून काढलीं, आणि त्यांची बुद्धि विशाल असल्यामुळें सांप्रतच्या जगाच्या स्वप्नांतहि न आलेले असे चमत्कार त्यांनीं करून दाखविले; पण त्यांच्या बुद्धीचें वळणच निराळें पडलें. यामुळें बाह्य जग लवकरच सोडून उच्चतर हेतूच्या सिद्धीकडे ती वळली. जें जाणलें असतां जाणावयाचें असें

कांहीं उरत नाहीं, अशा ज्ञानाच्या मागें ती लागली. बाह्य सृष्टि अनंत चमत्कारांनीं भरली आहे ही गोष्ट खोटी नाहीं. हीच सृष्टि महत्त्वाची आहे हेंहि खरें, पण ती अस्थिर आहे, ती क्षणभंगुर आहे. आतां जिवंत असलेली वस्तु क्षणार्धानें मृत्युमुखीं जाते; आतां सुखी म्हणून दिसत असलेला मनुष्य क्षणार्धानंतर दुःखांत चूर होऊन गेलेला आढळतो. अशा स्थितींत बाह्य सृष्टीचें महत्त्वही भासेनासें होतें. तिच्या चमत्कारांतील चमत्कृति नाहींशी होते. ही गोष्ट आमच्या प्राचीन आर्यांच्या लक्षांत लवकरच आल्यामुळें अविकार्य आणि सदानंदरूप जें कांहीं आहे. त्याचें आकलन ज्या शास्त्राच्या अध्ययनानें होईल त्या शास्त्राच्या शोधाकडे त्यांची बुद्धि वळली. ज्या एकाच ठिकाणीं चिर शांतीचा लाभ होतो, ज्या एकाच ठिकाणीं चिरजीवन मिळतें, ज्या एकाच ठिकाणीं पूर्णत्वाचा प्रत्यय येतो आणि ज्या एकाच ठिकाणीं सर्व दुःखांची समाप्ति होते, त्या ठिकाणाचा शोध ज्या शास्त्रानें लागेल तें शास्त्र सर्वांत श्रेष्ठतम होय हें उघड आहे; आणि याच शास्त्राच्या शोधाकडे आमच्या पूर्वजांची बुद्धि वळली. त्यांची इच्छा असती तर भौतिक शास्त्रेंहि त्यांना करतलामलकवत् करतां आलीं नसतीं असें नाहीं. जीं शास्त्रें सिद्ध झालीं असतां पोटाला तुकडा मिळतो, शरिराला आच्छादन प्राप्त होतें आणि फार तर आपल्या इतर बांधवांवर प्रभुत्व गाजवितां येतें, असलीं शास्त्रें त्यांनीं सहज शोधून काढलीं असतीं. ज्या शास्त्रांच्या शोधानें आपल्या इतर बांधवांस जिंकून त्यांना आपले गुलाम करितां येतें आणि ज्या शास्त्रांच्या शोधानें ‘ बळी तोच कानपिळी ’ होतो, तीं शास्त्रें त्यांच्या विशाल बुद्धीला अगम्य नव्हतीं. पण परमेश्वराची मोठी कृपा ती हीच कीं, ही ऐहिक सृष्टि सोडून त्यांची बुद्धि लवकरच उलट बाजूला वळली. बाह्य सृष्टीहून अधिक श्रेष्ठ अशा अंतःसृष्टीचा अभ्यास आमच्या पूर्वजांनीं केला. या सृष्टींत त्यांचें चित्त इतकें रममाण होऊन गेलें कीं, बाह्य जगाकडचें त्यांचें लक्ष अगदींच सुटलें; आणि आनुवंशिक संस्कारांनीं ही निवृत्ति त्यांच्या वंशजांतहि उतरूं लागली. अखेरीस निवृत्ति-मार्गप्रियता ही साऱ्या राष्ट्राची निशाणी होऊन बसली. बुद्धीचें हें वळण थेट आमच्यापर्यंतही आज येऊन पोंचलें आहे. हजारों वर्षें हेच संस्कार पिढयानपिढया हिंदुवंशांत उतरत आलेले आहेत. आणि आज तेच आमच्या जीविताशीं एकरूप होऊन बसले आहेत. आमच्या नाड्यांतील रक्ताच्या प्रत्येक थेंबांत त्यांचा संचार आहे. ते आमच्याशीं

एकजीव होऊन गेल्यामुळें अंतःसृष्टीची आवड ही आह्मांस उपजतबुद्धी-सारखी होऊन बसली आहे. हिंदु ह्मणजे धर्मज्ञानप्रियतेची मूर्ति असा आमच्या कुलाच्या नांवाचा अर्थ रूढ झाला आहे असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. हें वळण साऱ्या राष्ट्रालाच लागलें आहे आणि आतां त्यांतून त्याला परावृत्त करणें शक्य नाहीं. तरवार आणि अग्निशिखा हातीं घेऊन लक्षावधि रानटी लोक येथें आले. स्वतःबरोबर आपला रानटी धर्महि त्यांनीं येथें आणिला; पण आमच्या हृदयाला या वस्तूंचा स्पर्श होऊं शकला नाहीं. आमच्या मस्त-कांतील मणि अबाधित राहिला; आमच्या हृदयांतील रहस्य कोणालाहि बाहेर काढतां आलें नाहीं. हिंदुकुलाचा जीवन हेतु हाच, आणि या हेतूचें जोंपर्यंत उच्चाटन झालें नाहीं, तोंपर्यंत हिंदुकुल नष्ट करण्याचें सामर्थ्य या विश्वांत कोणाच्याहि अंगीं नाहीं हें तुम्ही निश्चित समजा. त्याला नष्ट करील अशी एकहि शक्ति अद्यापि जन्मास आलेली नाहीं. जगांतील सारा छळ आणि सारीं दुःखें यांच्या लाटांमागून लाटा आम्हांवरून गेल्या तरी आमच्या जीविताला यत्किं-चितहि धक्का लागावयाचा नाहीं. प्रचंड ज्वालांतून प्रल्हादाप्रमाणेंच आम्ही सुखरूप बाहेर पडूं. पण हें होण्यास आमचा हेतु मात्र आम्ही कधींहि आमच्या दृष्टिआड होऊं देतां उपयोगी नाहीं. जगांतील साऱ्या अनर्थांतून आम्हांस वांचविण्याचें सामर्थ्य फक्त त्याच्याच अंगीं आहे ही गोष्ट आपण नित्य लक्षांत बाळगिली पाहिजे. धर्मज्ञानाची आवड ज्या हिंदूला नाहीं तो हिंदूच नव्हे असें मी समजतों.

इतर देशांत राजकारण आधीं आणि धर्म मग. प्रत्येकाला राजव्यवहार अगोदर समजला पाहिजे आणि मग धर्माचें थोडें बहुत ज्ञान असल्यास चालेल. आमची गोष्ट ह्याच्या अगदीं उलट आहे. धर्म प्रथम आणि बाकीच्या गोष्टी त्यानंतर; हा आमचा क्रम अनादि काळापासून ठरून गेला आहे. धर्माचें ज्ञान आधीं होऊन मग वेळ उरल्यास इतर गोष्टी करण्याची परवानगी आम्हांस आहे. हा मुख्य मुद्दा आपण एकवार ध्यानांत ठेवला म्हणजे आमच्या हिंदु वंशाची सारी कर्तृत्वशक्ति कोणत्या मुद्यावर एकवटतां येईल, हें आपल्या लक्षांत येईल. प्राचीन काळींहि याच बाबीकरितां हिंदुकुल अनेक वार एक-वटलें होतें आणि आजहि आमच्या राष्ट्रीय कल्याणाचा एकच मार्ग आहे. एकी-भूत हिंदुस्थान म्हणजे तत्त्वज्ञानाचें समीकरण असा अर्थ होतो. धर्मासाठीं

झगडण्यास तयार असलेलीं अंतःकरणें एकत्र होणें हेंच हिंदुस्थानाचें एक राष्ट्रीयत्व आहे.

हिंदुस्थानांत अनेक पंथ अगोदरच अस्तित्वांत आहेत. आमच्या साऱ्यांच्या धार्मिक गरजा भागविण्यास पुरून उरण्याइतके ते आज आहेत आणि भविष्यत्कालींहि आणखी कित्येक निर्माण होतील. येथें अनेक पंथांस अवकाश मिळावा अशाच प्रकारची आमच्या मूलभूत तत्त्वांची रचना आहे. आमचीं परोक्ष तत्त्वें कसलाहि व्यावहारिक निर्बंध उत्पन्न करीत नाहींत. मूलभूत तत्त्वांचें अत्यंत विस्तृत विशदीकरण अनेक प्रसंगीं आणि अनेक प्रकारें आजपर्यंत झालें असतांहि त्यांत आकुंचितपणाचा प्रवेश झाला नाहीं. कोणत्याही लहान मोठ्या वस्तूला आकाश ज्याप्रमाणें आपल्या पोटांत थारा देतें, त्याप्रमाणें आमच्या धर्मतत्त्वांतहि हव्या त्या पंथाला स्थल मिळतें. आमच्या तत्त्वांचा विस्तार खुद्द प्रकृतीच्या विस्ताराप्रमाणें अनंत आणि सर्वव्यापी आहे. अशा स्थितींत अनेक पंथ तेथें सुखानें एकत्र नांदतात यांत नवल नाहीं. भांडण पंथांचें नसून पंथवाल्यांचें असतें आणि हीं युद्धें मात्र बंद करणें अवश्य आहे. पंथ हवे तितके असले तरी चिंता नाहीं, पण हठवादी पंथवाले मात्र नकोत. अशा हठवादी पंथवाल्यांच्या अस्तित्वानें जगाचा कांहीं फायदा होतो असें नाहीं; पण अनेक पंथ अस्तित्वांत नसतील तर मात्र जगाचें गाडें तावडतोब थांबेल. प्रत्येकाला सर्वच गोष्टी करितां येतात असें नाहीं. जगांतील समवायी कार्यशक्ति इतकी प्रचंड आहे कीं, तिचें नियमन मूठभर लोकांना करितां येणें कधींहि शक्य नाहीं. याकरितां श्रमविभाग अवश्य पाहिजेच. अत्यंत आवश्यकतेमुळेंच श्रमविभागाचें तत्त्व जन्मास आलें आहे आणि याच तत्त्वावर अनेक धर्मपंथहि अस्तित्वांत आले आहेत. सूक्ष्म शक्तीचें यथायोग्य नियमन होण्याकरितां अनेक पंथ अस्तित्वांत असणें अवश्य आहे. तथापि असें असतांहि या पंथांत तंटे भांडणें असावीं हें अवश्य नाहीं. या दृश्य विविधतेमागें ऐक्य आहे ही गोष्ट आमचीं शास्त्रें फार प्राचीन काळापासून उच्च घोषानें सांगत आलीं आहेत आणि हाच न्याय या अनेक पंथांसहि लागू आहे. अनेक मण्यांच्या पोटीं ज्याप्रमाणें एकच सूत्र असतें, त्याप्रमाणें या अनेक पंथांच्या पोटीं एकच तत्त्व आहे. ‘ एकं सत् विप्रा बहुधा वदंति ।’ हा सिद्धांत आपण सर्वांनीं नीट ध्यानांत ठेवला पाहिजे. हे अनेक

पंथ म्हणजे एकाच वस्तूचीं अनेक नांवें होत. याकरितां, या पंथवाल्यांनीं आपसांत तंटे करणें, युद्धें करणें, परस्परांचा द्वेष आणि मत्सर करणें अथवा परस्परांस व्यर्थ हिणवूं पहाणें ही खरोखरच मोठ्या शरमेची गोष्ट आहे. ज्या भूमींत साऱ्या धर्मांना आणि धर्मपंथांना सारखाच मान आजपर्यंत मिळत आला आहे, आणि सहिष्णुतेचें बाळकडूं ज्या देशांतील पुण्य पुरुषांनीं आपल्या वंशजांस पाजलें, त्या देशांतील सध्याच्या पिढीनें असहिष्णुतेचा अंगीकार करावा हें अगदीं अयोग्य आहे. सहिष्णुता ज्यांच्या रोमरोमांत खेळत होती, त्यांचे वंशज म्हणविण्यास आम्हांस खरोखर लाज वाटली पाहिजे.

वैष्णव, शैव, शाक्त, गाणपत्य, वेदांती इत्यादि अनेक मतें आपणांत प्रचलित असलीं अथवा हीं सारीं टाकून देऊन कोणी अर्वाचीन पद्धतीचा भक्त बनला असला, तरी आपणां सर्वांना सामान्य अशीं कांहीं तत्त्वें आपल्या धर्मांत आहेत. अर्वाचीन सुधारलेल्या धर्माचा अंगीकार कोणी केला अथवा जुन्या कर्मठ पंथाचा कोणी असला, तरी या दोहींचीहि एकवाक्यता जेथें होते अशीं कांहीं तत्त्वें आहेत. या सामान्य तत्त्वांचें स्पष्टीकरण वेगवेगळ्या पद्धतीनें कोणी केलें असलें, तरी मूल तत्त्वांच्या मान्यतेबद्दल वाद नाहीं. अशा प्रकारचें ध्येय असणारच आणि तें तसें असावें हें इष्टहि आहे. सर्वांनीं एकाच मार्गानें गेलें पाहिजे हा आपला मूल हेतु नाहीं. आपलेंच म्हणणें सर्वांनीं मान्य केलें पाहिजे असा हट्ट धरणें हें पातक आहे. अखेरचा मुक्काम एकच असल्यावर रस्ते वेगवेगळे असणें हें रास्त आणि इष्टही आहे. आपल्या मार्गानें जाण्यास आपणांस जशी मुभा आहे, त्याचप्रमाणें ती इतरांसही असली पाहिजे. श्रुतींस मान्यता हें आपल्या धर्माचें सर्वमान्य तत्त्व आहे. सनातन धर्माचें रहस्य श्रुतींत आहे, या सिद्धांताबद्दल कोणीहि हिंदू वाद घालणार नाहीं, असें मला वाटतें. त्याचप्रमाणें श्रुति अनाद्यनंत आहेत असें सर्व हिंदूंचें मत आहे. प्रकृतीला ज्याप्रमाणें आदि अथवा अंत नाहीं, त्याचप्रमाणें श्रुतींनाहि आदि अंत नाहीं. आपणांत कितीहि मतभेद झाले आणि त्याबद्दल कितीहि रणें माजलीं तरी या साऱ्या तंट्यांचा अखेरचा निकाल लागण्याची जागा श्रुति हीच. श्रुतींत कमी अथवा अधिक महत्त्वाचा भाग कोणता, याबद्दलहि आपणांत मतभेद असूं शकेल. एखादा भाग एखाद्या पंथाला सारसर्वस्वरूप वाटला तर तोच भाग दुसऱ्याला कदाचित् कमी महत्वाचा वाटेल;

तथापि अशा स्थितींतहि श्रुतिप्रामाण्याला आपल्या दृष्टीनें बाध येत नाहीं. श्रुति हे परमपूज्य ग्रंथ आहेत आणि मानवी जीविताच्या रहस्याचें कोडें त्यांनीं उलगडलें आहे, याबद्दल आपणांत मतभेद नाहीं. असें आहे तर प्रत्यक्ष व्यवहारांत दिसून येणारे पंथांचे भेद विसरून जाणें आपणांस अशक्य नाहीं. या तत्त्वाचाच प्रसार होईल तितक्या झपाट्यानें मोठ्या प्रमाणावर आपण केला पाहिजे.

ईश्वराच्या अस्तित्वाबद्दलही आपणांत वाद नाहीं हा दुसरा मुद्दा आहे. आपण सारे आस्तिक्यवादी आहों. परमेश्वर सृष्टीचा उत्पन्नकर्ता आणि पालनकर्ता असून कल्पांताच्या वेळींही सृष्टि त्याच्याच स्वरूपांत समाविष्ट होते, हें मतहि आपणां सर्वांस सारखेंच मान्य आहे. यथाकाळीं हीच सूक्ष्म-रूप सृष्टि पुनः स्थूलरूप धारण करून नानाविध वस्तूंच्या रूपानें प्रकट होते. ईश्वराच्या स्वरूपाबद्दल आपणांत वाद असूं शकेल; कोणाला त्याचें शुद्ध व्यक्त रूपच मान्य असेल तर दुसऱ्या कोणाला तो निराकाररूपानें मान्य असेल आणि या दोघांनाही श्रुतींत आधार सांपडतील. तथापि असें असतांहि परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल आपणांत वाद नाहीं. परमेश्वर म्हणजे अनंत शक्ति आणि त्या शक्तींतूनच हें सारें विश्व प्रकट झालें असून तिच्यांतच तें रहातें व अखेरीस त्याच शक्तीला तें परत जातें, या मूलतत्त्वाबद्दल आपणां हिंदूंत मतभेद नाहीं. किंबहुना हें मूलतत्त्व ज्याला मान्य नाहीं त्याला हिंदूहि ह्मणतां येणार नाहीं. हें तत्त्व आपणां सर्वांस सारखेंच मान्य आहे. त्याचाच प्रसार साऱ्या देशांत आपण करूंया. तुह्मांस साधेल त्या मार्गानें हें तत्त्व सर्व लोकांस पटेल असें करा. आपणां सर्वांचे मार्ग भिन्न झाले तरी त्यांत अमुक खरा व अमुक खोटा अशी निवड करितां येत नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. एखादा मार्ग दुसऱ्याहून कदाचित् अधिक चांगला असेल; तथापि सर्वथैव खोटा असा एकहि मार्ग नाहीं. एक कनिष्ठ, एक मध्यम, एक चांगला अथवा एक सर्वोत्कृष्ट असा भेद असूं शकेल; तथापि खोटा हें विशेषण कोणासहि लावितां येणार नाहीं. धर्ममार्गाच्या बाबतींत खोटा या शब्दाला स्थानच नाहीं. याकरितां ईश्वराचा मार्ग दाख-विण्यास जे कोणी उद्युक्त असतील, त्या साऱ्यांनाच परमेश्वराचा आशीर्वाद आहे. कोणत्याही मार्गानें कां होईना त्याची ओळख सामान्य जनांस अधि-काधिक पटवून देण्याचें कार्य तुम्ही केलें, तर त्यांत साऱ्या हिंदु कुलाचेंच

कल्याण आहे. गरिबाच्या झोंपडीपासून राजवाड्यापर्यंत आणि बालापासून वृद्धापर्यंत सर्वांना धर्ममार्गावर आरूढ करणें, हें तुमचें आद्य कर्तव्य आहे.

हें जग अमुक एक हजार वर्षांपूर्वी परमेश्वरानें निर्माण केलें आणि एखादे दिवशीं तो त्याचा अखेरचा शेवट करून टाकील हें कांहीं इतर धर्मीयांचें मत आपणां हिंदूंस मान्य नाहीं, हा आपला तिसरा विशेष होय. त्याचप्रमाणें परमेश्वरानें चराचर सृष्टि निर्माण केली आणि तिच्या मागोमागच मनुष्यप्राणीहि त्यानें निर्माण केला हेंहि ह्मणणें आपणांस मान्य नाहीं. परमेश्वरानें ही सृष्टि केवळ अभावांतून निर्माण केली हें मतहि आम्ही त्याज्य समजतों. या मुद्यासंबंधीं आपणांतील सर्व मतांची आणि पंथांची एकवाक्यता आहे, असा माझा समज आहे. सृष्टि अनाद्यनंत असून कल्पांताच्या वेळीं तिचें हें जड अथवा दृश्यरूप नष्ट होऊन सूक्ष्म रूपाला ती परत जाते; कांहीं काळ त्या अव्यक्तरूपांत स्थिर रहाते; आणि पुनः योग्य काळीं व्यक्तरूपाला येऊन आपण पहात असलेली सारी सृष्टि दिसूं लागते असें आमचें मत आहे. ही चक्राकार गति कालाच्या आरंभाच्याहि आदीपासून चालू आहे; आणि ती अशीच चालू रहाणार आहे. भविष्यत्कालीं अमुक एका प्रसंगीं या सृष्टीचा अखेरचा अंक होईल हें म्हणणें आह्मांस मान्य नाहीं.

त्याचप्रमाणें मनुष्याचा देह दिसतो अथवा त्याच्या अंतरिंद्रियांचा प्रत्यय येतो तेवढयांतच मनुष्यप्राणी सांठविलेला असतो असें नसून, त्याचें स्वरूप त्याहून अधिक विशाल आहे असेंहि आम्हां हिंदूंचें मत आहे. देह अस्थिर आहे, त्यांत प्रत्येक क्षणीं बदल होत आहे; त्याच प्रमाणें मनोघटनाहि अस्थिर आहे; पण या दोन अस्थिर स्वरूपांपलीकडे चिरस्थायी स्वरूपाचें आत्मरूप आहे. आत्मा या शब्दाला योग्य प्रतिशब्द इंग्रजी भाषेंत नाहीं. त्याला कोणताहि प्रतिशब्द तुम्हीं योजला तरी तो चुकीचा होईल. आत्म्याला आदि नाहीं आणि अंतहि नाहीं. मृत्यु हा शब्द त्याच्या गांवीं नाहीं. हें आमचें मत इतर धर्मीयांस ठाऊक नाहीं. या बाबींत इतरांपासून आम्ही अगदीं विभक्त आहों. हा चिरस्थायी आत्मा वारंवार वेगवेगळया देहांचा आश्रय करित असतो, आणि त्याचा कार्यभाग संपला म्हणजे तो कायमचा मुक्तरूपांत रहातो, हें आमचें मतहि इतरांहून विशेष आहे. आमच्या सर्व शास्त्रांनीं या मताचें प्रतिपादन केलें असून आम्हां साऱ्या हिंदूंस तें सारखेंच

मान्य आहे. कोणतेंहि मत अथवा पंथ याविरुद्ध बोलत नाहीं. आत्मा आणि परमात्मा यांच्यांतील परस्पर संबंधाबद्दल मतवैचित्र्य असलें तरी आत्मा नित्य आहे या मुद्याबद्दल वाद नाहीं. कित्येकांच्या मताप्रमाणें आत्मा आणि परमात्मा हें द्वैत कायमचें आहे, असें एखादा पंथ म्हणतो आणि तें तसें नाहीं असें दुसरा कोणी म्हणतो. आणखी कोणाच्या मतें आत्मा परमात्म्याचाच अंश असतो. अशा प्रकारचें कितीहि मतवैचित्र्य असलें, तथापि आत्मा स्थिर-रूप आहे या मूलभूत सिद्धांताबद्दल आपणांत वाद नाहीं. आत्म्याला कोणीं निर्माण केलें नाहीं, तो अनंत आहे, तो अमर आहे आणि निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या देहांचा आश्रय करून अखेरीस तो स्थिररूप कायमचा रहातो, याबद्दल आपणांत मतभेद नाहीं.

आतां यापुढें आमच्या पूर्वजांनीं धर्मज्ञानाच्या बाबींत जो शोध लावला तो खरोखरच अत्यंत आश्चर्यजनक आणि अत्यंत उज्ज्वल रूपाचा आहे. या शोधानें धर्मज्ञानाची अखेर झाली असेंहि म्हटलें तरी चालेल. पौर्वात्य तत्त्व-ज्ञान आणि पाश्चात्य विचारसरणी यांत जो मोठा भेद आहे, तो तुमच्या लक्षांत आलाच असेल. पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास ज्यांनीं केला असेल त्यांना हा भेद मूलतःच आहे हें स्पष्ट कळून चुकलें असेल. तो भेद असाः— आत्मा हा स्वभावतःच पवित्र, पूर्ण, अनंत आणि सच्चिदानंदरूप आहे असें पौरस्त्य तत्त्वज्ञांचें मत आहे. शाक्त, शैव, सौर, वैष्णव इत्यादि अनेक भेद आमच्यांत असले, तरी या मूल सिद्धांताबद्दल त्यांत मतभेद नाहीं. त्याच-प्रमाणें बौद्ध, जैन वगैरे दुसरे पौरस्त्य धर्महि याच मताचा अनुवाद करितात. द्वैत आणि अद्वैत या मतांतील भेदहि या बाबतींत फार थोडा आहे. पूर्व-दुष्कर्मानुसार पवित्र आत्मा अपवित्र झाला आहे आणि परमेश्वराच्या कृपेनें तो पुनः पवित्र होईल असें द्वैतवादी म्हणतात. उलट पक्षीं आत्मा अपवित्र झाला आहे ही गोष्टही खोटी असून ती आभासरूप आहे असें अद्वैती म्हणतात. मायेचें आवरण आपणांवर असल्यामुळें आत्मा विकृत झाल्याचा भास आप-णांस होतो. वस्तुतः त्याचें सच्चिदानंदरूप बाधित झालें नसतांहि तें तसें झालें आहेसें भासणें हीच माया. दोन मतांतील हा फरक अशा प्रकारचा आहे; तथापि मूल मुद्यासंबंधीं दोहोंची एकवाक्यता आहे. पाश्चात्य विचार-सरणीची गोष्ट याहून भिन्न आहे. त्यांच्या विचारसरणींत आणि आमच्या तत्त्व-

ज्ञानांत येथें मूलतःच भेद आहे. आत्मा स्वभावतः पवित्र आहे हा आमचा सिद्धांत असल्यामुळें आमची दृष्टि अर्थातच अंतर्वर्ती होते. जगांतील पावित्र्याचा शोध आम्ही अंतःसृष्टींत शिरून करूं लागलों. आम्ही पूजेला बसलों म्हणजे आपले डोळे मिटतों. अंतर्मुख होऊन परमेश्वर शोधावा ही आमची नैसर्गिक प्रवृत्ति आहे. बाह्य सृष्टीपासून परावृत्त होऊन अंतर्मुखतेनें ध्यान केल्यास परमेश्वर आंतच कोठेंतरी सांपडेल असें आम्हांस वाटतें. उलटपक्षीं पाश्चात्य भक्त परमेश्वराचा शोध करूं लागला म्हणजे तो आकाशाकडे डोळे करतो. परमेश्वरानें आपलें ज्ञान कोणाला तरी प्रकट होऊन सांगितलें आणि त्यांतून आपलीं धर्मपुस्तकें निर्माण झालीं असा पाश्चात्यांचा समज आहे. उलटपक्षीं आमचे धर्मग्रंथ आमच्या मंत्रदृष्टयांच्या खोल हृदयांतून निर्माण झाले असें आम्हीं समजतों.

आतां सांगितलेला हा मुद्दा आपण विशेषेंकरून ध्यानांत ठेविला पाहिजे; एवढेंच नव्हे, तर तो सर्वांच्या हृदयावर पक्का ठसविण्याचा अट्टाहास केला पाहिजे. मी स्वभावतःच परिपूर्ण निरामय आणि आनंदरूप आहें असें प्रत्येकाला वाटावयास लावणें, हीच आपली भविष्यत्कालाची कामगिरी होय. प्रियबंधूंनो ! मी दुबळा, मी पापी असें ज्याला वाटतें, त्या मनुष्यापासून कवडीचाहि लाभ त्याला अथवा जगाला होणार नाहीं, हें तुम्ही निश्चित समजा. या सिद्धांताबद्दल माझी बालंबाल खात्री झाली आहे आणि म्हणूनच त्याचें पुनःपुन्हां चर्वितचर्वण इतक्या तांतडीनें मी तुम्हांपुढें करितों. हा सिद्धांत तुम्ही पक्का ध्यानांत धरा, त्याला अनुसरून आपली वागणूक ठेवा आणि दुसऱ्याच्या हृदयावरहि तो ठसविण्याची खटपट करा. मी पापी, मी दुःखी, मला कांहींच किंमत नाहीं, असले विचार ज्याच्या चित्तांत रात्रंदिवस घोळतात, त्याचें जीवित अखेरीस खरोखरच अर्थशून्य होऊन बसतें. मी सर्वशक्तिमान् आहें, असें चिंतन तुम्ही अहोरात्र कराल तर तुम्ही निःसंशय तसेच व्हाल; आणि याच्या उलट चिंतन तुम्हीं केलें तर तुम्ही अखेरीस शून्यप्राय व्हाल हेंहि निश्चित आहे. हा महासिद्धांत कधींहि विसरूं नका. तुमचें सारें जीवित या एकाच मुद्यावर अवलंबून आहे. आम्ही सर्वशक्तिमंताचे वारसदार आहों, आमच्या ठिकाणीं अनंत अग्नीचा स्फुल्लिंग आहे आणि आम्ही यथाकालीं स्वतः अनंतरूप होऊं, हेंच ध्यान तुमच्या चित्ताला सदो-

दित असूं द्या. मी कःपदार्थ आहें हा विचार तुमच्या चित्ताला शिवतो तरी कसा ? सर्व तुम्हीच आहां; जगांतील सारी सत्ता आणि सामर्थ्य तुमच्या अंगीं आहे. याकरितां मी वाटेल तें करूं शकेन आणि वाटेल तें करण्याची माझी तयारी आहे असें चिंतन करीत चला. वाटेल तें करण्याची तयारी प्रत्येकानेंच केली पाहिजे, अशी दृढ आत्मश्रद्धा आपल्या पूर्वजांच्या अंगीं होती. या आत्मश्रद्धेनेंच नवीं नवीं कार्यें अंगिकारण्यास त्यांना उद्युक्त केलें. या आत्म-श्रद्धेमुळेंच त्यांचा अधिकाधिक विकास होत गेला. हिंदु राष्ट्र एका काळीं संस्कृतीच्या अत्युच्च शिखरावर जाऊन पोंचलें, याचें कारण आपल्या पूर्व-जांची ही आत्मश्रद्धाच होय; आणि आतां तुह्मांस अवनती झाल्याचें दिसत असेल आणि तुमच्यांत कांहीं उणेपणा आल्याचा प्रत्यय तुम्हांस येत असेल, तर त्याचें कारण हा आत्मविश्वास तुमच्यांतून नष्ट झाला. ज्या दिवशीं आत्म-विश्वास नाहींसा झाला, त्याच दिवशीं तुमच्या अवनतीचा पाया पडला हे माझे शब्द पक्के ध्यानांत धरा. आत्मविश्वासाचा अभाव हाच खरा नास्तिकपणा होय. ज्याचा विश्वास स्वतःच्या कर्तबगारीवर नाहीं आणि ज्याला स्वतः-चाच भरंवसा वाटत नाहीं, त्याला परमेश्वराचा भरंवसा तरी कोठून वाट-णार ? आपल्या हस्तादि इंद्रियांच्या द्वारें अनंत परमेश्वरच कार्यें करीत आहे, असा भरंवसा तुमच्या चित्तांत उत्पन्न झाला आहे काय ? हा अंत-र्यामी, हा सर्वगामी परमात्मा प्रत्येक अणुरेणूंत ओतप्रोत भरून राहिला आहे आणि तोच माझ्या देहांत, मनांत, बुद्धींत आणि जीवात्म्यांत ओतप्रोत भरला आहे, असा विश्वास तुमच्या चित्तांत खरोखरच असेल तर निरा-शेचा पगडा तुमच्या चित्तावर कां बसावा ? मी अगदीं क्षुद्र प्राणी असेन, महासागरावरील एखादा लहानसा तरंग मी असेन आणि तुम्हीं प्रचंड लाट असाल; पण असें असलें म्हणून काय झालें ? जो महासागर तुमच्या पाठीशीं उभा आहे, तोच माझ्या पाठीशींहि नाहीं काय ? जें सर्वशक्तिमत्त्व तुमच्या ठिकाणीं अधिक विस्तृत स्वरूपांत प्रकट झालें आहे, तेंच माझ्या ठिकाणीं बीजरूपानें तरी नाहीं काय ? तुम्ही पर्वतासारखे विशाल असाल, तथापि ज्याच्या बळावर तुम्ही पर्वतप्राय बनलां आहां, त्याच बळाशीं माझाहि योग जन्मापासून झाला आहे. माझ्या ठिकाणीं अस्तित्व आलें हीच त्या योगाची खूण आहे. जें सच्चिदानंद रूप तुमच्या पर्वतप्राय आकाराच्या मागें आहे,

तेंच माझ्या या बिंदुरूपाच्याहि मागें आहे. प्रियबंधूंनो ! या महा मंत्राचें पठन अहोरात्र तुम्ही करा. याच्या जपाशिवाय एक क्षणहि जाऊं देऊं नका; आणि तुमचीं मुलेंबाळें जन्माला आलीं म्हणजे तेव्हांपासूनच या महामंत्राचा उपदेश त्यांना तुम्ही करा. त्यांना अद्वैत–द्वैत अथवा हा पंथ आणि तो पंथ असल्या शुष्क भानगडींत पाडण्याचें तुम्हांस कांहीं कारण नाहीं. तुम्ही कोण-त्याहि पंथाचे असा आणि त्यांनाहि वाटेल त्या पंथाचा अंगीकार करूं द्या; पण हा अत्यंत उदात्त आणि अत्यंत उज्वल असा सर्व सामान्य पंथ मात्र तुम्ही विसरूं नका; आणि तुमच्या मुलांबाळांसहि विसरूं देऊं नका. जीवात्मा स्वभावतः परिपूर्ण आहे हें मत हिंदुस्थानांतील साऱ्या पंथांना सारखेंच मान्य आहे. जें मूलतःच परिपूर्ण नाहीं तें कशानेंहि पूर्णत्व पावणार नाहीं; आणि बाह्य वस्तूंच्या उपाधीनें पूर्णत्व त्याला चिकटविलें, तरी तें केव्हांना केव्हां नष्ट होईल असें श्रीकपिलांनीं म्हटलें आहे. अपवित्रता हा मनुष्याचा स्वभाव असेल तर त्यानें सदोदित अपवित्रच राहिलें पाहिजे. दहापांच पळें पावि-त्र्याची छाया त्याच्यावर पडली तरी पुनः तो पहिल्यासारखाच अपवित्र राहणार. पावित्र्याचें हें कवच आज ना उद्यां गळून जाऊन त्याचा मूळचा स्वभाव पुनः केव्हां तरी प्रकट होणार. वाघ्याचा पाग्या झाला तरी त्याचा मूळस्वभाव केव्हां तरी प्रकट होऊन त्याच्याकडून 'एलकोट' म्हणविल्यावांचून राहणार नाहीं. याकरितां आपलें स्वाभाविक स्वरूप सच्चिदानंद हेंच आहे असें आपले तत्वज्ञ सांगतात. मृत्युसमयीं आपल्या महत्कृत्यांचें आणि उदात्त विचारांचें स्मरण ठेव असा उपदेश एका ऋषीनें आपल्या मनाला केला, तो आपण सर्वांनीं ध्यानांत धरण्यासारखा आहे. आपलें दौर्बल्य आणि दुबळे विचार अथवा आपलें मूर्खत्व यांपैकीं कशाचाहि स्पर्श आपल्या चित्ताला अखेरीस असूं नये अशी खबरदारी घेण्याबद्दल या ऋषिवर्याचा उपदेश आहे. मूर्खपणाचीं कृत्यें सर्वांच्याच हातून घडतात. दुबळेपणाचे विचार केव्हांना केव्हां आपल्या साऱ्यांच्या चित्तांत येत असतात; तथापि त्यांतूनहि आपल्या खऱ्या स्वरूपाचा विसर पडूं न देणें, हाच दौर्बल्यनाशाचा उपाय आहे. आपल्या साऱ्या मूर्खपणाला हेंच उत्तम औषध आहे.

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या धर्मांत आणि पंथांत सर्वांस मान्य असलेल्या कांहीं मुद्यांचा विचार येथवर झाला; आणि याच सामान्य पायावर जुना,

नवा, कर्मठ, उदारमतवादी इत्यादि अनेक पंथांना आपली पुढील इमारत रचतां येण्यासारखी आहे. आतां यापुढें आणखीहि एक मुद्दा आपण विशेष ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. या मुद्याचा विसर आपणांस वारंवार पडत असतो ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. आणि याकरितांच त्याचें चर्वितचर्वणहि इष्ट आहे. धर्म म्हणजे प्रत्यक्ष अनुभव हें तत्त्व आपण केव्हांही विसरूं नये. प्रत्यक्ष अनुभवाशिवाय बाकीच्या साऱ्या गोष्टी फोल आहेत. अमुक गोष्टीवर विश्वास ठेविला म्हणजे सारा धर्म त्यांत आला असें नाहीं. पाश्चात्य धर्मांची ही व्याख्या आम्हांस कधींहि मान्य होण्यासारखी नाहीं. जन्मादारभ्य ही व्याख्या आम्हांस कोणी पढविली नाहीं. ' नर करनी करे तो नरका नारायण होय ' हा सिद्धांत आमच्या बाल्यापासून आमच्या कानांवर आदळत आहे. आमचें जें कांहीं स्वरूप आजमितीस आहे, तें आमच्या प्रत्यक्ष कृतीचें फल आहे. कांहीं सिद्धांतांवर आणि धर्ममतांवर नुसता विश्वास ठेवून तुमचें काम भागणार नाहीं. अशा विश्वासाची फारशी मदत तुम्हांस होणार नाहीं. अत्यंत प्राचीन काळीं अनुभूती हा एकच शब्द आकाशवाणीनें आम्हांस सांगितला आहे. अनुभवाशिवाय धर्म नाहीं हें वचन आमच्या धर्मग्रंथांशिवाय इतरत्र कोठें आढळावयाचें नाहीं. परमेश्वराची प्रत्यक्ष भेट घ्या असा उपदेश आमच्या धर्मग्रंथांशिवाय कोणीहि केलेला नाहीं. हे शब्द तुम्हांस कदाचित् फाजील धाष्टर्याचे वाटतील, पण त्यांत असत्याचा लेशहि नाहीं. ते अक्षरशः खरे आहेत, अशी दृढ श्रद्धा तुम्ही बाळगा. ते प्रत्यक्ष अनुभवाचे शब्द आहेत. त्यांतील प्रत्येक ध्वनि आणि प्रत्येक स्पंदहि खरा आहे. धर्म म्हणजे प्रत्यक्ष अनुभव घेणें. नुसतें श्रवण म्हणजे धर्म नव्हे. कांहीं शब्द पाठ करून पोपटासारखे तोंडानें बडबडणें म्हणजेहि धर्म नव्हे. धर्म म्हणजे बुद्धिवाद नव्हे. या सर्ववस्तूंना खरोखर यत्किंचितहि किंमत नाहीं. धर्मांचा प्रवेश आपल्या अंतःकरणांत होऊन तेथें त्याचें प्रत्यक्ष दर्शनच झालें पाहिजे. आपल्या बुद्धीला पटतें म्हणून परमेश्वराचें अस्तित्व मानावयाचें, हें त्याच्या अस्तित्वाचें निश्चित प्रमाण नव्हे. परमेश्वराचें प्रत्यक्ष दर्शन आपल्या पूर्वजांना झालें आणि असें दर्शन घेतलेले लोक आजच्या काळींहि अस्तित्वांत आहेत, हेंच त्याच्या अस्तित्वाचें खरें प्रमाण. आत्म्याला अस्तित्व आहे असें आपण मानतों; पण मानण्यावरून

त्याचें अस्तित्व सिद्ध होत नसून त्याचें दर्शन पूर्वी प्रत्यक्ष घडलें आहे, आज प्रत्यक्ष घडत आहे, आणि भविष्यत्कालींहि हजारों लोकांस तें घडेल म्हणूनच तें खरें आहे. आत्मानुभव घेतलेले लोक पूर्वीं होऊन गेले आणि पुढेंहि हजारों होतील. असा आत्मानुभव घडल्याशिवाय मुक्ति हा शब्दहि उच्चारणें वायफळ आहे. याकरितां साऱ्या गोष्टींच्या आधीं हा मुख्य महत्वाचा मुद्दा आपण ध्यानांत धरूं या. हा मुद्दा जों जों अधिक विस्तृत प्रमाणानें सामान्य जनांस पटत जाईल, तों तों पंथ आणि पोटपंथ आपोआप कमी होत जातील. ज्यानें परमेश्वराचें दर्शन घेतलें असेल तोच एकटा धर्मज्ञ ही गोष्ट सर्वांस कळेल. त्याचीच हृदयग्रंथि तुटून गेली असून, त्याचेच सर्व संशय छिन्न झाले आहेत हें निःसंशय समजावें. कर्मफलांतून फक्त त्याचीच मुक्ति होते. दूरांतदूर आणि जवळांत जवळ, अणूहून लहान आणि आकाशाहून मोठा अशा परमेश्वराचें दर्शन ज्याला घडलें असेल तोच खरा मुक्त. नुसती बडबड ह्मणजे धर्म असा भ्रम आपल्या बुद्धीला पुष्कळ वेळां होतो. मोठा बुद्धिवाद करून आपला पक्ष स्थापित करणाऱ्या मनुष्याला आपण भ्रमानें धर्मज्ञ समजतों आणि यामुळेंच धर्म ह्मणजे बडबड असें वाटूं लागून अनेकपंथ निर्माण होतात, आणि पुढें भांडणें उपस्थित होतात. आत्मानुभव हेंच काय तें धर्मज्ञान, हें तत्त्व एकवार आपल्या बुद्धीला पटलें म्हणजे आपली प्रगति किती झाली आहे, याचा शोध आपल्याच अंतःकरणांत आपण करूं लागूं, आणि त्याच वेळीं सत्यवस्तूपासून आपण किती लांब आहों हेंहि आपणांस कळेल; मग आपण स्वतःच अंधारांत चांचपडत आहों असें आपल्यास दिसून येईल. स्वतः अशा स्थितींत असतां लोकांस धर्म सांगण्याची इच्छा आपण करतों हें आपलें मूर्खत्व आहे असें आपणांस कळून येईल. अशा स्थितींत पंथ आणि पंथांचीं भांडणें हीं जीव धरूं शकणें शक्य नाहीं. मी अमुक पंथाचा ह्मणून मोठा धर्मज्ञ असें ह्मणणाऱ्या माणसास मी एकच प्रश्न विचारितों कीं, बाबारे, तूं प्रत्यक्ष परमेश्वराची भेट घेतली आहेस काय ? तुला आत्मानुभव झाला आहे काय ? तसें नसेल तर त्याच्या नांवानें बडबड करण्याचा तुला अधिकार काय ? तूं स्वतः अंधारांत चांचपडतोस आणि लोकांना त्याच अंधाराकडे नेऊं पाहातोस हें तुझें कृत्य शहाणपणाचें आहे काय ? आंधळयानें आंधळयाला चालवावें आणि शेवटीं दोघांनींहि खाडयांत पडावें तशांतलेंच हें तुझें कृत्य.

याकरितां दुसऱ्याचे दोष शोधूं जाण्यापूर्वीं आपल्या स्वतःच्या स्थितीचा विचार आपण आधीं करावा. दुसऱ्यांची धडपड झाली तरी ती सत्यवस्तूच्या शोधासाठींच असते. सत्यवस्तूचा अनुभव आपण प्रत्यक्ष घ्यावा यासाठींच यांची सारी खटपट असते. याकरितां त्यांना त्यांच्या मार्गानें जाऊं देणें अधिक बरें; आणि त्यांना सत्यवस्तूची भेट झाली म्हणजे वेगवेगळा प्रत्येक मार्ग वस्तुतः हेंच सांगत होता असा अनुभव त्यांना येईल. पद्धत वेगळी झाली तरी प्रत्येक मंत्रद्रष्टा अखेरीस येथेंच पोहोंचला असें त्याला कळून येईल. अशा स्थितींत प्रेममय वाणीवांचून दुसरा शब्द त्यांच्या तोंडून बाहेर येणार नाहीं. कारण शुद्ध प्रेममयाचा प्रकाश त्यांच्यांत ओतप्रोत भरून गेलेला असतो. फक्त याच स्थितींत रागद्वेषादि विकार पूर्ण विलयास जातात; आणि येथेंच श्रेष्ठत्व कनिष्ठत्वाचा वाद कायमचा विराम पावतो. येथें फार झालें तर फक्त हिंदु इतकीच संज्ञा कायम उरते. हिंदु मात्र आपला बंधु असें आपणांस वाटूं लागतें. अशी स्थिति तुम्हांस प्राप्त झाली तरच हिंदु हें तुमचें नांव यथार्थ होईल. हिंदु या शब्दाच्या नुसत्या उच्चाराबरोबर अनंत शक्तीचें वारें तुमच्या अंगांत अशा स्थितींतच संचरेल. हिंदुस्थानांतील यच्चयावत् रहिवासी आपला सखासोयरा आहे, असें तुम्हांस वाटूं लागेल. भाषाभेद, प्रांतभेद अथवा जातिभेद असल्या क्षुल्लक कृत्रिम वस्तूंना तुमच्या चित्तांत थारा मिळणार नाहीं. कोणाहि हिंदूवर संकट आलें तर तें आपणावरच आलें आहे असें ज्या दिवशीं तुमच्या अंतःकरणाला वाटूं लागेल, त्याच दिवशीं हिंदु या नांवाला तुम्ही खरोखर पात्र व्हाल. हिंदुमात्राच्या सुखासाठीं गुरु गोविंदसिंगाप्रमाणें आपल्या सर्वस्वाची आहुति देण्याची तुमची तयारी ज्या दिवशीं होईल, त्याच दिवशीं तुमचें हिंदु हें नांव यथार्थ होईल. गुरु गोविंदसिंगाला देशत्याग करावा लागला. जुलमाविरुद्ध प्रचंड युद्ध करावें लागलें; स्वतःच्या रक्ताची तिलांजली त्याला द्यावी लागली; स्वतःची संतति रणभूमीवर अखेरची निद्रा घेत असलेली त्याला पहावी लागली; आणि हें सर्व ज्यांच्यासाठीं त्यानें केलें तेहि अखेरीस त्याला सोडून गेले. असले देखावे स्वतःच्या डोळ्यांनीं पाहून हा सिंह रणांगण सोडून एकांताच्या आश्रयाला गेला. आणि देहविसर्जन करीपर्यंत कोणाविरुद्ध एक शब्दहि आपल्या मुखानें त्यानें उच्चारला नाहीं. जे त्याच्याशीं कृतघ्नपणें वागले त्यां-

नाहि त्यानें शाप दिला नाहीं. तुम्हांला खरोखर कांहीं देशसेवा करावयाची असेल तर तुम्हांपैकीं प्रत्येकानें साक्षात् गुरु गोविंदसिंग बनलें पाहिजे. आपल्या देशबांधवांत हजारों दोष तुम्हांस दिसत असतील, पण त्यांपैकीं प्रत्येक हिंदुवंशांतला आहे हें ध्यानांत ठेवा. यांपैकीं प्रत्येक जण तुमचा चालताबोलता ईश्वर आहे. प्रत्येकाची पूजा तुम्हीं केली पाहिजे. त्यांच्यापासून तुम्हांला अनेक प्रकारें उपद्रव होत असला, तरी तो सगळा गिळून त्यांच्या सेवेला तुम्हीं स्वतःस वाहून घेतलें पाहिजे. त्यांपैकीं प्रत्येक जण तुम्हांस शाप देत असला, तरी तुम्हीं प्रत्येकाची भक्तिच केली पाहिजे. तुम्हांस त्यांनीं हांकून दिलें तर एकांतवासांत देहविसर्जन करण्यास जा. गुरु गोविंदसिंगाचें अनुकरण तुम्ही करा. असाच मनुष्य हिंदु या संज्ञेला पात्र आहे. आपणा सर्वांच्या पुढें हें एकच ध्येय पाहिजे. भांडणांचें सारें मूळ विसरून जाऊन केवळ प्रेमाचे प्रवाह आपल्या अंतःकरणांतून बाहेर पडले पाहिजेत.

भरतभूमीच्या पुनरुज्जीवनाच्या गोष्टी अनेक लोक बोलतात. त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांना वाटेल तें बोलूं द्या. पण तुम्ही धर्ममार्गावर आरूढ होईपर्यंत हिंदुस्थानाचें पुनरुज्जीवन होणार नाहीं, हें मी तुम्हांस पुनःपुन्हां बजावून सांगतों. माझा सारा जन्म याच उद्योगांत मी घालविला. निदान तसा उद्योग करण्याचा यत्न तरी मीं केला; आणि या खटपटींत असतां जो अनुभव मला आला; त्याच्याच अनुरोधानें हें माझें मत मी तुम्हांस सांगत आहें. केवळ हिंदुस्थानाचेंच नव्हे तर साऱ्या जगाचें कल्याण तुम्ही धर्मज्ञ होण्यावर अवलंबून आहे. आतां मी तुम्हांस अगदीं उघडपणें सांगतों कीं, पाश्चात्य संस्कृति आतां अगदीं खालच्या पायापासून हादरली आहे. तो पाया केव्हां उखडेल याचा भरंवसा नाहीं. वाळूच्या पायावर केवढीही भव्य इमारत तुम्हीं उठविली तरी तिची गति अकस्मात् काय होईल, हें सांगण्यास कोणी भविष्यवादी पाहिजे काय? पाश्चात्य संस्कृतीची सारी उभारणी शुद्ध जडवादाच्या पायावर झाली आहे; आणि ती कितीहि भव्य आणि बळकट दिसत असली तरी एखादे दिवशीं ती अवश्य धुळीला मिळेल. कोणत्या दिवशीं तिचा पूर्ण निःपात होईल हें सांगतां येत नाहीं. या गोष्टीची साक्ष साऱ्या जगाचा इतिहास देत आहे. राष्ट्रामागून राष्ट्र उदयास आलें पण त्याची सारी भव्यता आणि त्याचें सौन्दर्य शुद्ध जडवादाच्या पायावर अवलंबून होतें. मनुष्यप्राणी म्हणजे

शुद्ध हाडामांसाचा गोळा यापेक्षां अधिक उच्च प्रतीची भावना त्यांच्या ठिकाणीं नव्हती. मनुष्य मेला म्हणजे पाश्चात्य भाषेंत 'त्यानें आपला आत्मा सोडला' असं म्हणतात. उलट पक्षीं 'त्यानें देह सोडला' असें आम्ही म्हणतों. पाश्चात्यांच्या दृष्टीनें देह आधीं आणि मग साऱ्या गोष्टी. मनुष्याला आत्मा आहे कीं नाहीं, याचा विचार ते मागून करतील. याच्याच अगदीं उलट आमचें मत आहे. आत्मा आधीं असून मग तो देह धारण करतो. या पहिल्या मतांतरामुळें पुढच्या साऱ्या इमारतींत जमीनअस्मानाचा फरक उत्पन्न झाला आहे. पाश्चात्यांच्या संस्कृतीची उभारणी या वाळूच्या पायावर झाली असल्यामुळें आणि तींत सारें प्राधान्य देहसौख्याला असल्यामुळें, तीं प्राचीन राष्ट्रें एका मागून एक विलयास गेलीं. उल्कापाताप्रमाणें क्षणभर चमकावें आणि पुढच्याच क्षणीं त्याचा मागमूसहि राहूं नये अशी त्यांची गत झाली. जगांत ती होती कीं नाहीं हीसुद्धां जणूं काय शंकेची गोष्ट होऊन बसली. उलट पक्षीं हिंदुस्थानची संस्कृति अनेक उत्पातांतून आजपर्यंत टिकली आहे. हिंदुस्थानाचीच काय, पण त्याचें पादवंदन करून ज्यांनीं त्याचा उपदेश घेतला तीं चीन आणि जपान हीं राष्ट्रेंही आज जिवंत आहेत, एवढेंच नव्हे तर तीं आज उदयोन्मुखही झालीं आहेत. त्यांच्या पुनरुज्जीवनाचीं चिन्हें आजही स्पष्ट दिसत आहेत. फिनिक्स पक्ष्याप्रमाणें पुनःपुन्हां मृत्युवश झालीं तरी तीं पुनःपुन्हां जिवंत होऊन उठतात; आणि पहिल्यापेक्षांही अधिक तेजानें तळपूं लागतात; पण ज्या राष्ट्राची संस्कृति शुद्ध जडवादाच्या पायावर झाली आहे, त्यांनीं एक वेळ राम म्हटला कीं कायमचींच नाहींशीं होतात. याकरितां आजची अवनता पाहून धीर सोडूं नका. तुम्हांला घाबरें होण्याचें कांहीं कारण नाहीं. सारा भविष्यत्काल आपलाच आहे हें निश्चित समजा; घाबरून जाऊन भलभलते उपाय योजूं नका. उगीच कोणाचें तरी अनुकरण करीत सुटण्यांत फायदा नाहीं. आपणांस जो मुख्य धडा शिकावयाचा तो हाच कीं, अनुकरण म्हणजे संस्कृति नव्हे. एखाद्या बादशहाच्या पोषाखानें उद्यां मीं आपणांस सजविलें म्हणजे मी खरोखरच बादशाह झालों काय ? सिंहाचें कातडें पांघरलेला गाढव सिंह होत नाहीं. केवळ भीतीनें दुसऱ्याचें अनुकरण करून तुमचें पाऊल पुढें पडेल, ही गोष्ट मनांतसुद्धां आणूं नका. दुसऱ्याचें अनुकरण करण्याची बुद्धि हेंच खऱ्या अधःपाताचें लक्षण आहे. हा अधःपात

सर्वांत भयंकर होय. मी कःपदार्थ अशी भावना ज्याच्या चित्तांत उत्पन्न झाली, त्याच्या मस्तकावर तो वज्रपातच झाला आहे, असें समजा. त्यांतून तो पुनः उठेल अशी आशाच नको. 'पैं अमृतही नावडे । ऐसें जिव्हेसि जैं अरोचक पडे । तैं मरण आलें रोकडें । हें सांगावें काई ॥' आपल्या पूर्वजांची लाज ज्याला एक वार वाटूं लागली त्याचें मरण पाठीशीं येऊन ठेपलें आहे असें समजा. मी त्या उज्ज्वल हिंदुवंशांतला एक रजःकण आहें, पण त्या वंशाचा अभिमान मला आहे. माझ्या पूर्वजांबद्दल माझ्या मनांत अत्यंत पूज्यबुद्धि आहे. मी हिंदु आहें असें सांगण्यांत मला धन्यता वाटते. तुम्हां हिंदुवंशजांच्या पायाचा एक क्षुद्रसा चाकर म्हणवून घेण्यांत मला महदानंद होतो. तुमचा मी देशबंधु आहें असें म्हणविण्याहून अधिक कशांतच मला धन्यता वाटत नाहीं. तुम्ही मंत्रद्रष्ट्यांचे वंशज, तुम्ही महर्षींचे कुलदीपक, जगानें पूर्वी कधींहि न पाहिलेली संस्कृति ज्यांनीं आकाराला आणली त्यांच्या कुलांत तुम्हीं जन्म घेतला. त्या तुमचा दासानुदास म्हणवून घेण्यापेक्षां अधिक अभिमानास्पद तें काय असणार ? आपल्या पूर्वजांकडे पहा आणि त्यांच्या कृति ध्यानांत आणून स्वतःच्या कर्तबगारीवर तुमची श्रद्धा असूं द्या. त्यांची कृति तुम्हांस लाजविण्यासारखी आहे कीं अभिमान बाळगण्यासारखी आहे, याचा विचार आपल्या मनाशीं करून पहा. कांहीं झालें तरी दुसऱ्यांचें अनुकरण करूं नका, ही माझी तुम्हांस हात जोडून विनंति आहे. तुम्ही दुसऱ्यांच्या टांचेखालीं गेलां, म्हणजेच खरोखर तुमचें स्वातंत्र्य नष्ट होतें; आणि दुसऱ्यांच्या अनुरोधानें कोणतेंही कार्य—धर्मकार्य सुद्धां—करण्याची दुष्ट खोड तुम्हांला लागली कीं, तुम्हांला स्वतंत्रपणें विचारसुद्धां करतां येत नाहीं. याकरितां तुमचें स्वतःचें म्हणून जें कांहीं आहे तेंच स्वप्रयत्नानें प्रत्यक्ष सृष्टींत आणा. दुसऱ्याचें कांहीं चांगलें तुम्हांस दिसलें तर त्याचाहि संग्रह करा, पण कोणाचें अनुकरण मात्र करूं नका. परक्यांपासून आपणांस कांहींच शिकावयाचें नाहीं असें नाहीं; पण शिकणें वेगळें आणि परावलंबी बुद्धीचें अनुकरण वेगळें. आपण बीं पेरलें, त्याला खत घातलें आणि पाणी दिलें म्हणजे कालेंकरून त्याला अंकुर फुटूं लागतात. कालांतरानें त्या बाल अंकुराचा महावृक्ष होतो. शाखापल्लवांनीं तो मनोहर दिसूं लागतो; आणि अनेकांचें तो विश्रामस्थान होतो. पण त्याची वर्धनाची क्रिया

चालू असतां ज्या मातींतून तो उगवला, तिच्यासारखा तो होत नाहीं; ज्या खतानें त्याला पोसलें त्याच्या सारखा तो होत नाहीं; जें पाणी तो प्याला, त्या पाण्यासारखाहि तो नसतो आणि ज्या हवेंत तो वाढला, त्या हवेसारखेंहि त्याचें स्वरूप नसतें. तो आत्मभाव सोडीत नाहीं, तो स्वस्वभावानुरूप वाढतो. जमिनींतील, खतांतील, पाण्यांतील आणि हवेंतील पोषक द्रव्यें तो घेतो; पण त्यांपैकीं कोणासारखाहि स्वतः न होतां तो आत्मरूप कायम ठेवूनच वाढतो. या वृक्षाचें अनुकरण तुम्ही करा. दुसऱ्यापासून शिकण्यासारखें असेल तें अवश्य शिका. तें आपण शिकलेंच पाहिजे. मी सर्वज्ञ अशी घमेंड ज्याला झाली, तो जिवंत असतांच मेला आहे असें समजा. याकरितां दुसऱ्यापासून शिकण्याची बुद्धि सदोदित कायम ठेवा पण कोणाचें अनुकरण मात्र करूं नका.

'आददीत परां विद्यां प्रयत्नादवरादपि । अंत्यादपि परं धर्मं स्त्रीरत्नं दुष्कुलादपि ।' असें भगवान् मनूंचें वचन आहे. ज्ञान कोणापासूनहि घ्यावें. चांडालाचीहि सेवा करून मुक्तिमार्ग मोकळा करून घेण्यास हरकत नाहीं. या वचनाला अनुसरून जें जें कांहीं चांगलें असेल तें परक्यांपासून आपण अवश्य घ्यावें; पण त्याच्या प्राप्तीसाठीं परक्यांच्या मागें न जातां तें ज्ञान आपण आपल्या घरीं आणावें, आणि आपल्याच पद्धतीनें त्याचें ग्रहण करावें. तें ज्ञान आपण आपल्या ठिकाणीं मुरूं द्यावें. तथापि असें करीत असतां आपल्या मूळ भावांत फरक होऊं देऊं नये. आपण दुसऱ्यासारखें होऊं नये. आपला जुना जीवितक्रम सोडून कोणी फरफटत ओढल्यासारखें दुसऱ्याच्या मागें जाऊं नये. उद्यां साऱ्या हिंदी लोकांनीं परकीयांसारखा पोषाख केला, त्यांचें भक्ष्यपेय उचललें आणि त्यांच्या चालीरीतींचें अनुकरण केलें, तर हिंदुस्थानाचें कोटकल्याण होईल हा भ्रम आधीं सोडून द्या. तुमच्या रक्तांत किती हजार वर्षांचें ज्ञान खेळत आहे हें एका परमेश्वरालाच ठाऊक! एका विशिष्ट प्रणालींतून आज हजारों वर्षें तें तुमच्या धमन्यांतून वहात आहे. या परंपरेला प्रारंभ केव्हां झाला तें देव जाणे! अशा प्रकारचा हा प्राचीन आणि प्रचंडतम प्रवाह आतां महासागराला मिळाला असतां तो परत हिमाचलाच्या शिखराला जाईल अशी अपेक्षा तुम्ही कशी धरितां? ही गोष्ट सर्वथा अशक्य आहे. असें करण्याचा यत्न निष्फळ आहे, एवढेंच नव्हे. तर त्यांत तुमचें

नुकसानहि आहे. तुमच्या असल्या खटपटीनें तो प्रवाह शतधा विदीर्ण मात्र होईल. याकरितां, हा जीवनप्रवाह आपल्या नियुक्तमार्गानें अविरत चालेल, असें करणें इतकेंच तुमचें काम आहे. या प्रचंड ओघाच्या मार्गांत जे मोठे शिलाखंड आडवे पडले आहेत ते दूर करून त्याचें पात्र निष्कंटक करणें इतकेंच तुमचें काम आहे. हा मार्ग स्वच्छ करण्याचें काम तुम्हीं केलें म्हणजे तो प्रवाह अगदीं स्वाभाविकपणें आपल्या मार्गानें जाईल; आणि असें होण्यांतच तुमचें आणि तुमच्या भावी पिढीचें कल्याण आहे. उन्नतीच्या मार्गांत आपलें पाऊल दिवसेंदिवस पुढें पडावें असें तुम्हांस वाटत असेल, तर पूर्वोक्त मार्गानें जाण्यावांचून तुम्हांस गत्यंतर नाहीं.

हिंदुस्थानांत आपणांस जें धर्मकार्य करावयाचें आहे, त्याची ही थोडीशी रूपरेषा तुम्हांस मीं दर्शविली आहे. आपलें कार्य फार प्रचंड आहे. आपणांस जीं महत्कार्यें करावयाचीं आहेत, त्यांची चर्चा वेळाच्या अभावीं आज मला करितां येत नाहीं. उदाहरणार्थ जातिभेद हा एक मोठाच प्रश्न आपणांपुढें आहे. याचा सांगोपांग विचार मी आज सारा जन्मभर करीत आलों आहें. हिंदुस्थानांतील बहुधा प्रत्येक प्रांतांत या प्रश्नांतील अडचणींचें स्वरूप काय आहे हेंहि मीं पाहिलें आहे; आणि इतकें करूनहि यांतील रहस्याचा उलगडा मला अद्यापि झालेला नाहीं. जातिभेदाच्या पोटांत वस्तुतः काय आहे, हें माझ्या बुद्धीला अद्यापि जाणतां आलें नाहीं. याचा विचार मी जों जों अधिक करितों, तों तों माझी बुद्धि अधिकाधिक भांबावून मात्र जाते. आतां इतकें करून मला जो थोडा फायदा झाला तो हाच कीं, या विषयाची अंधुक अंधुक दिशा मात्र माझ्या लक्षांत आली आहे. जातिभेदाप्रमाणेंच अन्नोदकव्यवहाराचा प्रश्नहि आपणांस महत्त्वाचा आहे; आणि तोहि तितकाच अवघड आहे. तेंहि एक मोठें कोडें आहे. यांत मोठा महत्त्वाचा मुद्दा नाहीं असें समजून आपण थट्टेवारी तो उडवून देत असतों, पण आपणांस वाटतें तितका तो निरुपयोगी नाहीं आणि सोपाहि नाहीं. सध्या मला इतकेंच म्हणतां येईल, कीं या बाबींत जी रूढि म्हणून आपण अनुसरतों, ती मात्र खरोखर विक्षिप्तपणाची आहे. ती शास्त्राच्या रहस्याविरुद्ध आहे. अन्नोदकाची शुद्धि वस्तुतः कशी असावी यासंबंधीं जे निर्बंध शास्त्रानें घातले आहेत, ते लक्षांत न आणितां आणि त्यांचें अंतःस्वरूप न पाहतां केवळ त्या

शब्दांच्या मार्गानें मात्र आपण जात असतों. त्यांतील खरा जीवभाव सोडून देऊन बाकी उरलेल्या कलेवराला मात्र आपण मिठी मारली आहे.

हीं व अशाच प्रकारचीं दुसरीं अनेक कोडीं लक्षांत घेण्यासारखीं आहेत. यांतील रहस्य जाणून तें प्रत्यक्ष आचारांत कसें आणावें आणि या कोड्यांचा उलगडा कसा करावा, यासंबंधीं माझे विचार तुम्हांस सांगण्याची माझी मोठी इच्छा होती. पण दुर्दैवानें वेळाच्या अभावीं आज मला तसें करितां येत नाहीं; याकरितां, अशाच प्रकारच्या पुढें दुसऱ्या एखाद्या संधीची वाट पाहून आज हा विषय येथेंच सोडणें मला प्राप्त आहे.

जातां जातां आणखी एकाच विषयासंबंधानें चार शब्द सांगून मी आपली रजा घेतों. आज दीर्घकाळ धर्मज्ञानाला आपल्या या भूमींत संचालन मिळालें नसल्यामुळें तें स्तब्धतेच्या स्थितीला आलेलें आहे. तुमच्या ठिकाणीं कर्मप्रवणता उत्पन्न करण्याचें सामर्थ्य त्याला राहिलेलें नाहीं. तें सामर्थ्य त्याला पुनः प्राप्त करून देणें हें आपलें कर्तव्य आहे. आपणांपैकीं प्रत्येकाच्या रोजच्या व्यवहारांत धर्मज्ञान मूर्तिमंत दिसेल असें करण्याचा यत्न आपण केला पाहिजे. धर्माचा संचार पूर्वीं जसा राजवाड्यापासून झोंपडीपर्यंत होता, त्याचप्रमाणें तीच स्थिति आतांहि आपण प्राप्त करून घेतली पाहिजे. अत्यंत दरिद्री शेतकऱ्यालाहि धर्मज्ञानाची वाण पडूं देतां उपयोगी नाहीं. धर्मज्ञान हा साऱ्या हिंदु कुलाचा वारसदारीचा हक्क आहे. या कुलाचे वंशज या वारशांत सारखेच भागीदार आहेत; आणि त्यांच्या हक्काची ही बाब त्यांच्या घराच्या दारापर्यंत पोंचविविण्याचें कार्य आपण केलें पाहिजे. वस्तुतः हक्कानें मिळणाऱ्या या वस्तूला आज ते पारखे झाले आहेत; पण ही स्थिति आपण बदलली पाहिजे. परमेश्वरनिर्मित हें वातावरण जितक्या मोकळेपणें वावरतें आणि तें जसें सर्वांच्या उपभोगास सारखेंच पात्र होतें, तसें धर्मज्ञानहि आपण सर्वांस उपलब्ध करून दिलें पाहिजे. आज आपणांस येथें कांहीं कार्य म्हणून असेल तर तें हेंच आहे; पण नवे नवे पंथ काढून आणि आपसांत मारामाऱ्या करून मात्र हें कार्य होणार नाहीं. क्षुल्लक मतभेदांचा वारंवार उच्चार केल्यानें आणि त्यांवरच जोर दिल्यानें मतैक्य होत नाहीं. मतभेदाच्या बाबी बाजूला सोडून जेथें मतैक्य आहे, तेवढ्यांचा प्रचार तरी आपण जारीनें करूं या. क्षुल्लक मतभेद बाजूला सोडल्यानें कालांतरानें ते आपोआपच मरून जातील. आज

सर्वत्र अंधार पसरला असला तर भांडणें करून आणि एकमेकांस शिव्या देऊन तो नाहींसा होणार नाहीं. एखाद्या अंधाऱ्या जागेंत जाऊन अंधार अंधार म्हणून नुसता कंठशोष आपण कितीहि केला तरी तेवढयानें तो नाहींसा होणार आहे काय ? अशी आरडाओरड करण्याऐवजीं निमूटपणें तेथें एखादी काडी तुम्हीं ओढली, कीं ती जागा ताबडतोब प्रकाशित होईल. लोकांना सुधारण्याचा खरा मार्ग हाच आहे. लोकांपुढें उच्चतर ध्येयें मांडून त्यांची आकांक्षा जागृत करा. प्रत्येकाला आत्मविश्वास हा प्रथम पाहिजे. स्वतःच्या कर्तबगारीवर त्याचा भरंवसा पाहिजे. मनुष्य हा स्वस्थानभ्रष्ट आणि पतित प्राणी आहे, असें आधींच गृहीत धरून कां चालावें ? एखादा मनुष्य कितीहि वाईट असला तरी त्याच्यांत कांहीं तरी कर्तबगारी असते हा माझा विश्वास केव्हांही ढळला नाहीं; आणि अशा प्रकारची कर्तबगारी प्रत्येकाच्या ठिकाणीं मला आढळूनहि आलेली आहे. आरंभीं कित्येक वेळां एखाद्या मनुष्यांत कर्तृत्वशक्तीचा अभाव आढळून आला, तथापि अखेरीस त्याच्या पौरुषाचा विजय होतो असेंच मला आढळून आलें. कोणी विद्वान् असो अगर अगदीं मूढ असो, त्याच्यांत कांहीं तरी कर्तबगारी आहे हें नित्य ध्यानांत ठेवा— कोणी देवाप्रमाणें सात्विक दिसत असला अथवा दुसरा एखादा राक्षसाप्रमाणें तमोगुणी दिसत असला, तरी त्या दोघांतहि पौरुष आहे हें लक्षांत आणा. अशा प्रकारचा विश्वास आधीं पाहिजे. मग एखाद्याच्या ठिकाणीं कांहीं उणीवा दिसत असल्या, अथवा त्याच्या हातून चुका घडत असल्या, तथापि त्या स्वभावजन्य नाहींत. त्याच्यापुढें अधिक उच्च ध्येय नाहीं म्हणूनच भलभलत्या मतांना आणि हठवादाला चिकटून बसून तो चुका करीत असतो हा मुद्दा केव्हांही विसरूं नये. असत्याकडे मनुष्याचें मन धांव घेतें याचें कारण हेंच कीं, सत्य वस्तूची कल्पना त्याच्या चित्ताला नसते. याकरितां खोट्या मार्गापासून त्याला परावृत्त करण्याचा उपाय खरा मार्ग त्याला दाखविणें हाच होय. हा मार्ग तुम्हीं त्याला दाखवून दिला म्हणजे तुमचें काम संपलें. मग त्या दोन मार्गांचा बरेपणा अथवा वाईटपणा त्याचा तोच पाहील. सत्य मार्ग एकवार त्याला दाखवून देणें इतकेंच तुमचें काम आहे. आपल्या पूर्वीच्या मार्गांत कमीपणा कोठें होता आणि नव्या मार्गांत चांगलेपणा कोठें आहे, हें शोधून काढण्यास त्याला तुम्ही मोकळा सोडून द्या. तुम्हीं दाखविलेला मार्ग

खरोखरच सत्य वस्तूकडे जाणारा असेल, तर त्याचा विजय झालाच पाहिजे. दिवा पेटविल्यानंतर अंधार नाहींसा व्हावा यांत नवल काय? आपल्या देशांतील लोकांना खरें धर्मज्ञान मिळावें अशी तुमची वास्तविक इच्छा असेल, तर ती याच मार्गानें तृप्त होईल. तुम्ही करितां तें वाईट आहे असें त्यांना सांगून त्यांच्यावर वेळीं अवेळीं तोंड टाकून अथवा त्यांच्याशीं भांडणें करून इष्टकार्यसिद्धि केव्हांही होणार नाहीं. सत्याला केव्हांच मरण नाहीं. सत्याचा प्रकाश प्रत्येकाच्या ठिकाणीं जिवंत आहे. सत्यवस्तूला आनंदानें मिठी मारण्याची त्याची नेहमींच तयारी असते. ती वस्तु त्याच्या नजरेसमोर तुम्ही येऊं देत नाहीं हा तुमचा दोष.

त्या सनातन स्वरूपाचा आशीर्वाद तुम्हांवर सदा असो. तो उत्पत्तिस्थितिलयकर्ता तुम्हांवर सदा संतुष्ट असो. ज्यानें हिंदु कुलाचें आजवर रक्षण केलें, ज्याला विष्णु, शिव, शक्ति, गणपति इत्यादि अनेक नांवें आहेत, ज्याची सगुण अथवा निर्गुण उपासना तुम्ही करितां, 'एकं सत् विप्रा बहुधा वदंति' असें ज्याचें वर्णन आपल्या पूर्वजांनीं केलें, त्याचा प्रकाश आपणां सर्वांच्या हृदयांत प्रवेश करो. स्वार्थत्यागपूर्वक आणि अत्यंत प्रेमानें परस्परांस साहाय्य करण्याची बुद्धि आपणांस तो देवो. मोठें नांव, पुष्कळ पैसा अथवा वैयक्तिक थोरवी यांचा वासहि आपल्या चित्तास न लागो. केवळ भरतभूमीच्या पुनरुज्जीवनाकडे आमच्या सर्व कार्यांचा ओघ वळो अणि त्याजवर त्या मंगलमयाचा पूर्ण आशीर्वाद असो.

# हिंदुतत्त्वज्ञानाचा इंग्लंडावर घडलेला परिणाम.

सभ्य स्त्रीपुरुषहो !

आशियाच्या पूर्वभागांतून मी प्रवास करीत असतां एक गोष्ट विशेषेंकरून माझ्या ध्यानांत आली. पूर्व आशियांतील देशांत हिंदुतत्त्वज्ञानाचा प्रसार सर्वत्र झाला असल्याचें मला आढळून आलें. चिनी आणि जपानी देवळांच्या भिंतींवर कांहीं सुप्रसिद्ध संस्कृत मंत्र मीं पाहिले, तेव्हां मला किती नवल वाटलें असेल, याची कल्पना तुम्हीच करा. विशेषतः हे मंत्र जुन्या बंगाली लिपींत लिहिलेले आहेत, हें ऐकून तुम्हांला थोडाबहुत आनंदही होईल. स्वधर्माचा प्रसार करण्याकरितां आमचे पूर्वज केवढया उत्साहानें आणि मनोभावानें यत्न करीत, याची ढळढळीत साक्ष हे लेख आज देत आहेत.

आशियांतील देश वगळले तर पाश्चात्य देशांतहि आमच्या तत्त्वविचारांचा प्रसार इतक्या विस्तृत प्रमाणावर आणि इतक्या स्पष्ट रीतीनें झाला आहे कीं, त्यांची छटा त्या देशांत अद्यापिही मला आढळून येते. मात्र ही गोष्ट लक्षांत येण्यास आपली मजल थोडी अधिक तीव्र करून पाश्चात्य समाजाच्या बुडापर्यंत ती पोंचविली पाहिजे. आमच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार अत्यंत प्राचीन काळीं पूर्व आणि पश्चिम या दोन्ही देशांकडे झाला होता ही गोष्ट आतां इतिहासप्रसिद्ध आहे. हिंदु धर्माचें ऋण एकंदर जगावर किती आहे, हें आतां सर्वांना ठाऊक झालें आहे. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील तत्त्वविचारांचा पगडा प्राचीन आणि अर्वाचीन समाजावर किती पडला होता आणि त्यानें काय कार्य केलें हेंहि सर्वांस ठाऊक आहे. या प्राचीनकाळच्या गोष्टी झाल्या. सांप्रतकाळीं अँग्लोसाक्सन वंशानें समाजरचनेंत आघाडी मारून संस्कृतीच्या मार्गांत मनुष्याचें पाऊल पुढें पडण्यांत फार मोठें कार्य केलें आहे, ही गोष्ट तिकडे प्रवास करीत असतां माझ्या लक्षांत आली. फार काय, पण या वंशानें केलेलें कार्य घडून आलें नसतें, तर आज जशा प्रकारें या गोष्टींची चर्चा आपण करीत आहों, तसें करण्याची सवड आपणांस मिळाली नसती असेंही मी म्हणेन. पाश्चात्य देशांतला प्रवास पुरा करून मी पूर्वेकडे

आलों आणि येथेंही त्याच वंशाची शक्ति अद्यापिही कार्यकारी स्थितींत आहे, असें मला आढळून आलें. या सत्तेंत पुष्कळ दोष आहेत ही गोष्ट खरी, तथापि तिच्यांतले सद्गुण अद्यापि अगदीं लुप्त झाले नाहींत असें माझ्या प्रत्ययास आलें. ब्रिटिश वंशाच्या अंगीं पुढें पाऊल टाकण्याचा जो गुण आहे, त्याचें कार्य हिंदुस्थानांत सुरू असल्यामुळें अनिवार्यपणें आमचेंहि पाऊल उन्नतीच्या मार्गांत पुढें पडत आहे. सांप्रतची पाश्चात्य संस्कृति मूळ ग्रीक संस्कृतींतून निघाली असून, तिचेंच ती प्रत्यक्ष अपत्य आहे ही गोष्ट तुम्हांस ठाऊक असेलच. परोक्ष तत्त्वें प्रत्यक्षत्वास आणणें हा ग्रीक संस्कृतीचा विशेष होता; आणि अर्वाचीन पाश्चात्य संस्कृतींत अद्यापिहि तो शिल्लक राहिला आहे. हिंदु लोकांत विचारशीलता अधिक आहे, पण दुर्दैवानें पुष्कळ वेळां विचार करतां करतां आपण इतके शिथिल होतों कीं, आचाराचें बळ आपल्या ठिकाणीं उरत नाहीं. सारी कर्तृत्वशक्ति विचारांतच खर्च होऊन जाते, आणि आचाराच्या वेळीं आपणांस शैथिल्य येतें. यामुळें आमची विचारपरंपरा केवळ पुस्तकांत राहून तिची स्पष्ट क्रिया जगाच्या निदर्शनास आली नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं, आपले विचार दडवून ठेवण्याची खोड आम्हांस लागली. आरंभीं ही खोड फक्त व्यक्तीपुरतीच होती. हातून क्रिया घडत नाहीं तर बोलावें तरी कसें ? या विचारानें विचार लपविण्याची इच्छा व्यक्तींना होऊं लागली. हळूहळू ही इच्छा स्वभावधर्मांत शिरून ती दृढ झाली; आणि अखेरीस तिचा प्रसार साऱ्या राष्ट्रदेहांत होऊन, ती आमच्या चरित्रक्रमाचा एक भागच होऊन बसली. विचार आणि आचार यांत आमच्या ठिकाणीं सांप्रत इतका विसंगतपणा आहे कीं, आमचा आचार पाहून आमची गणना जग मृतराष्ट्रांत करूं लागलें. विचारांचें कोणतेंहि स्पष्ट स्वरूप आमच्या आचारांत राहिलेलें नाहीं. आमचे विचार सदोदित असेच अस्पष्ट स्थितींत रहात गेले तर आम्ही जगणार तरी कसे ? विचारांचें आचारांत रूपांतर आणि त्यामुळें उत्पन्न होणारी प्रगमनशीलता आणि कर्तृत्वशक्ति हा पाश्चात्य समाजाचा पाया आहे. पाश्चात्यांची सारी संस्कृती या दोन तत्त्वांच्याच आधारानें उभी राहिली आहे; आणि याच दोन तत्त्वांचा जो प्रसार हा अँग्लो सॅक्सन वंश आपल्या देशांत करीत आहे, त्यामुळें आम्हीहि झोंपेंतून जागे होत असून आपल्या विचारांना मूर्त-

स्वरूप देण्याची इच्छा आमच्या ठिकाणीं वाढत आहे. त्याचप्रमाणें या अँग्लो सॅक्सनवंशानें साऱ्या जगाचे दळणवळणाचे मार्ग आम्हांस खुले करून दिल्यामुळें आजपर्यंत लपवून ठेवलेला आमचा विचारनिधि जगापुढें आणण्याची इच्छा आम्हांस होऊं लागली आहे. या अँग्लो सॅक्सनवंशानें हिंदुस्थानाच्या भवितव्यतेचा मार्ग मोकळा केला आहे. पूर्वी कधींहि नव्हता एवढ्या विस्तृत प्रमाणावर आमच्या प्राचीन तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्याची संधि सध्या आपणांस मिळाली आहे. आपल्या प्राचीन पूर्वजांनीं सत्याचा आणि मुक्तीचा मार्ग जगाला उघडा करून दाखविला, तेव्हां हें कार्य त्यांनीं कोणत्या परिस्थितींत केलें? सर्वत्र बंधुभावाचा उपदेश बुद्धानें जगाला केला तेव्हांही परिस्थिति कशा प्रकारची होती ? त्या वेळींहि या मार्गांत पुष्कळ सवड होती. त्या वेळींहि जगाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत आपल्या तत्त्वांचा प्रसार करणें सुलभ होतें. आतां येथें अँग्लो साक्सनवंशाचें राज्य झालें आहे, आणि अशा रीतीनें जेथें आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार पूर्वी झाला नव्हता, तेथें तो आतां होऊं लागला आहे, एवढेंच नव्हे तर त्याचें ग्रहणहि तेथें उत्सुकतेनें होत आहे. आमच्या या तत्त्वप्रसाराच्या कार्यांत खुद्द इंग्लंडांतील अनेक बुद्धिमान् पंडित आम्हांस मदत करीत आहेत. मूल्लरबाईचें नांव आतां पुष्कळांच्या कानीं असेलच. आज त्या स्वतःच येथें हजर आहेत. यांचा जन्म एका चांगल्या आणि सुशिक्षित कुटुंबांत झाला आहे; आणि हिंदुस्थानाच्या प्रेमानें प्रेरित होऊन आपलें उर्वरित आयुष्य या देशाच्या सेवेंत घालवावें, अशा हेतूनें त्या येथें आल्या आहेत. यापुढें आपला मातृदेश म्हणजे हिंदुस्थान आणि हिंदी लोक हेंच आपलें कुटुंब, असें मानून त्या येथें कायमची वस्ती करणार आहेत. मिसेस् बेझंट यांचें नांव ऐकलें नाहीं असा मनुष्य आपणांत बहुधा कोणी नसेल. या इंग्रज स्त्रीनें आपलें सारें आयुष्य उदारपणें हिंदुस्थानाच्या सेवेला वाहिलें आहे. त्याचप्रमाणें आपल्या आजच्या सभेंत आणखी दोन अमेरिकन स्त्रिया हजर आहेत. त्यांचाहि उद्देश या देशाची सेवा करण्याचा आहे. आपल्या या गरीब देशाला थोडी तरी मदत करावी एवढीच त्यांची इच्छा आहे. त्याचप्रमाणें आपल्या एका देशबांधवाचें स्मरण तुम्हांस करून देणें माझें कर्तव्य आहे. या गृहस्थाचें नांव मोहिनीमोहन चतरजी असें आहे. पाश्चात्य देशांत यांनीं पुष्कळ प्रवास केला

असून आतां मातृभूमीच्या सेवेसाठीं ते येथें परत आले आहेत. कसलाहि गाजावाजा न करितां शांतपणें आणि मनःपूर्वक आपलें कार्य करीत रहावें अशी त्यांची रीत आहे. त्यांच्याबद्दल माझ्या चित्तांत मोठा आदर आणि प्रेम वसत आहे. या उदारचरित स्त्रीपुरुषांच्या यादींत आणखीहि एक नांव आज मी गोंवणार आहें. मिस् मार्गारेट नोबल ऊर्फ भगिनी निवेदिता या जातीनें इंग्रज असून त्यांनींहि आपला देह या देशाच्या चरणीं वाहिला आहे. त्यांच्या हातून पुष्कळ कार्य घडेल असा भरंवसा बाळगण्यास हरकत नाहीं.

( यानंतर भगिनी निवेदिता यांचें भाषण झाल्यावर उपसंहार करितांना स्वामीजी म्हणाले, )

मला आतां दोनच शब्द बोलावयाचे आहेत. आपणा हिंदु लोकांनाहि कांहीं तरी करितां येण्यासारखें आहे, इतकी कल्पना आतां आम्हांस आली आहे. तथापि इतकी कल्पनाहि न पटलेले लोक अद्यापि पुष्कळ आहेत. विशेषतः आपल्या बंगाली लोकांना कदाचित् याचें हसूंहि येईल; पण मला मात्र तसें वाटत नाहीं. तुम्हां सर्वांच्या चित्तांत खळबळ करून सोडणें, हाच माझ्या जीविताचा आदिहेतु आहे. तुम्ही द्वैती आहांत किंवा अद्वैती आहांत अथवा दुसऱ्या कोणत्या पंथाचे आहांत, या गोष्टीचा विचार मला कर्तव्य नाहीं. कोणत्याही पंथाचे तुम्ही असलां तरी ती गोष्ट आपल्या कार्याच्या आड येणारी नाहीं. मुद्याची अशी एकच गोष्ट तुम्हांस सांगावयाची आहे. या गोष्टीचा उच्चार वारंवार करावा लागणें हेंहि खरोखर दुर्दैव आहे; पण ती पुनःपुन्हां सांगितल्याशिवाय उपाय नाहीं, अशीच आपली आजची कृती आहे. आत्मविश्वास धरा असा उपदेश पूर्वीं कित्येक वेळां मीं केला आहे आणि आजहि पुनः मी तेंच करीत आहें. परमेश्वराची भक्ति तुमच्या चित्तांत उत्पन्न होण्याला आत्मश्रद्धा प्रथम पाहिजे. ती असेल तरच ईश्वराची ओळख तुम्हांस पटेल. तुमचा विश्वास आचार्यांच्या अद्वैत मतावर असो, मध्वाच्या द्वैतावर असो, अथवा पतंजलीच्या योगाभ्यासावर असो; आत्मविश्वास तुम्हांला नसेल तर हा विश्वास निरुपयोगी आहे. तुम्ही व्यासांचे उपासक असा अथवा विश्वामित्राचे उपासक असा; आत्मविश्वासाशिवाय तुमची कोणतीहि उपासना निरर्थक होईल. या आत्मश्रद्धेच्या तत्त्वासंबंधीं पाश्चात्यांच्या व आमच्या धर्मविचारांत भेद आहे. प्रत्येक जीवात्म्यांत

कोणत्या तरी स्वरूपाचें स्वतंत्र सामर्थ्य आहे, या मुद्याकडे हिंदुस्थानाशिवाय बाकीच्या साऱ्या जगानें कानाडोळा केला आहे. जीवात्मा अशक्त आणि जवळ जवळ क्रियाहीन आहे, असाच बाकीच्या जगाचा समज आहे. उलट पक्षीं तो अनंतरूप आणि सदापूर्ण आहे व तो असाच नेहमीं राहणार असें आमचें तत्त्वज्ञान आम्हांस सांगतें. आमच्या उपनिषदांनीं शिकविलेला हा धडा आपण नेहमीं लक्षांत बाळगिला पाहिजे.

आपल्या जन्माचा हेतु काय आहे याचें नित्य स्मरण करीत जावें. आम्हा हिंदु लोकांच्या डोक्यांत आणि विशेषतः बंगाल्यांच्या डोक्यांत विदेशीय कल्पनांचा सुळसुळाट झाला आहे आणि या कल्पना राष्ट्रधर्म पोखरून टाकीत आहेत. अलीकडे आपण इतके कशानें मागसलों आहोंत ? आमच्यापैकीं शेंकडा नव्याण्णव लोकांच्या डोक्यांत विदेशी कल्पना तुडुंब भरून राहिल्या आहेत. असें कां झालें ? राष्ट्रमालिकेंत आपणांस कांहीं उच्चस्थान प्राप्त करून घ्यावयाचें असेल, तर या परदेशी कल्पनांचा त्याग आपण प्रथम केला पाहिजे. त्याचप्रमाणें पाश्चात्यांपासून आपणांस शिकण्यासारख्या अशा पुष्कळ गोष्टी आहेत, हेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे. पाश्चात्यांचीं आदिभौतिक शास्त्रें आणि त्यांच्या कला, हीं आपण आपलींशीं केलीं पाहिजेत. या गोष्टी शिकण्यासाठीं आपण जसे पाश्चात्यांकडे जातों, त्याचप्रमाणें धर्म आणि तत्त्वज्ञान शिकण्याकरितां ते आपणांकडे आले आहेत. या गोष्टींत आम्ही हिंदु लोक साऱ्या जगाचे गुरु आहों हें कधींहि विसरूं नका. राजकीय हक्क आणि अशाच जातीच्या दुसऱ्या वस्तू मिळविण्याकरितां आपण मोठी ओरड चालविली आहे. ठीक आहे. पण असे हक्क मैत्रींतून उत्पन्न होत असतात; आणि खरा मित्रभाव अगदीं बरोबरीच्या दोन माणसांत मात्र उत्पन्न होऊं शकतो. या दोन माणसांपैकीं एक भिकारी असेल तर त्याची व त्याच्या दात्याची मैत्री कधीं काळीं तरी जमेल काय ? हें सारें बोलणें सोपें आहे, पण त्याप्रमाणें कृति घडणें मात्र फार कठीण आहे. परस्परसाहाय्यावांचून आपणांस जरूर असलेली शक्ति कधींहि उत्पन्न व्हावयाची नाहीं. याकरितां इंग्लंडांत अथवा अमेरिकेंत जातांना भिक्षेकरी या नात्यानें नव्हे, तर धर्मगुरु या नात्यानें तुम्हीं जावें अशी माझी इच्छा आहे. देवाण घेवाण हा साऱ्या जगाचा कायदा आहे. दिल्यावांचून कांहीं मिळत नाहीं आणि मिळालें असेल त्याची परत

फेड केल्यावांचूनहि चालत नाहीं. आपल्या शक्तीप्रमाणें या नियमाची अम्मलबजावणी आपण नेहमीं करीत राहिलें पाहिजे. या लोकांत रहात असतां येथें सुखी कसें व्हावें, ही कला पाश्चात्यांपासून आपणांस शिकावयाची असेल तर चिरंतन सुखाची प्राप्ति ज्या मार्गानें होते, तो मार्ग पाश्चात्यांस आपण अवश्य दाखवावा. कोणतेंहि कार्य करितांना केवळ आपल्यापुरताच विचार करूं नये. साऱ्या मानवजातीच्या सुखाकरितां झटणें हेंच आपलें कर्तव्य आहे. केवळ आपल्यापुरतेंच पाहाण्याचे आपले जुने आकुंचित मार्ग आपण आतां टाकून दिले पाहिजेत. आपणा प्रत्येकाच्या मागें मृत्यु सदोदित उभा आहे, हें जाणून असल्या क्षुद्रपणाचा त्याग आपण करावा. अध्यात्मज्ञानासाठीं साऱ्या जगानें भरतभूमीच्या पायाशींच धाव घेतली पाहिजे, हें ऐतिहासिक सत्य कधींहि विसरूं नका. परमेश्वराच्या सृष्टिरचनेंत भरतभूमीचें स्थान अशा प्रकारचें असल्यामुळें तिला कधींहि मरण प्राप्त होणार नाहीं. चिरंतन सत्य जेथें सांठविलें आहे, तेथें मरण कोठचें ? चीन देश मरणार नाहीं अथवा जपानहि मरणार नाहीं. आपल्या जीविताचा आधार काय, या गोष्टीचें स्मरण आपण नित्य बाळगिलें पाहिजे.

याकरितां धर्मज्ञान हाच आपला मुख्य जीवनहेतु आहे, ही गोष्ट आपण ध्यानांत ठेविली पाहिजे आणि हें साधण्याकरितां आपणाला कोणी तरी मार्गदर्शक पाहिजे. आपला धर्म म्हणजे शुद्ध अध्यात्म ज्ञान नव्हे, असें ज्या हिंदूला वाटतें तो खरोखर हिंदूच नव्हे. असें न वाटणारें एखादें लहान पोरहि आपणांस असेल असें मला वाटत नाहीं. काश्मिरांत असतां एके वेळीं एका मुसलमान स्त्रीला मी म्हटलें, बाई, तुमचा धर्म कोणता ? तेव्हां तिनें आपल्या भाषेंत मला उत्तर दिलें, ईश्वराच्या दयेबद्दल त्याचे मोठे उपकार मी मानतें, मी खऱ्या मुसलमानी धर्माची आहें ही त्याचीच कृपा. पुढें एका हिंदु मुलाला असाच प्रश्न मीं केला, तेव्हां मी हिंदु आहें इतकाच साधा जबाब त्यानें मला दिला. कठोपनिषदांत असलेला अत्यंत महत्त्वाचा असा एकच शब्द मला नेहमीं स्मरतो. हा शब्द श्रद्धा असा आहे. नाचिकेताची गोष्ट तुम्हीं वाचली तर श्रद्धा या शब्दाचा खरा अर्थ काय आहे, हें तुम्हांस कळेल. आत्मश्रद्ध व्हा, एवढा एकच उपदेश करणें, हें माझें जीवितकार्य आहे. सर्व धर्मांत हाच एक मुख्य मुद्दा सर्वांनीं लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

मानवी मनोरचनेंत या एका गुणाला अढळस्थान असलें पाहिजे हें आपण कधींहि विसरूं नका. हा शब्द अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळेंच त्याचा उच्चार मला पुनःपुन्हां करावा लागतो. प्रत्येकाला आत्मश्रद्धा प्रथम पाहिजे. महासागरांतील एखादा तरंग क्षुद्र बुडबुडा असला आणि दुसरा प्रचंड डोंगरा एवढा असला, तरी त्या दोहोंच्या सामान्य अधिष्ठानाच्या जागीं तोच महासागर असतो. त्या दोहोंचें अधिष्ठान सारखेंच अनंतरूप असतें. याकरितां आपण क्षुद्र म्हणून निराश होण्याचें कोणासहि कारण नाहीं. मुक्तीचा मार्ग सर्वांस सारखाच मोकळा आहे. आपणांपैकीं प्रत्येक जण हें मायावरण आज ना उद्यां अवश्य फेंकून देईल. याकरितां ही आत्मश्रद्धा नेहमीं जवळ असूं द्या. केव्हांही निराश होऊं नका. आशा दीर्घ असली म्हणजे दीर्घ प्रयत्नांस ती उत्तेजन देते. आशा जिवंत आहे तोंपर्यंत कोणत्याहि गोष्टीच्या सिद्धीसाठीं तुम्ही भगीरथ प्रयत्न केल्यावांचून राहणार नाहीं. मी वाटेल तें करूं शकेन अशी आत्मश्रद्धा आपणांपैकीं प्रत्येकाच्या हृदयांत उत्पन्न झाली, तर व्यास आणि अर्जुन यांचा काळ आजहि आपणांस पुनः दिसेल. ज्या काळीं साऱ्या मनुष्यजातीला उपयुक्त अशीं तत्त्वरत्नें बाहेर पडलीं, तो काळ आज पुनः प्राप्त होईल. अध्यात्म विचारांच्या बाबतींत आज आपण फार मागसलेले आहों. अध्यात्म विचारांना वास्तविक हिंदुस्थानांत तोटा नाहीं. जगांतील साऱ्या मानवकुलांत हिंदु कुल श्रेष्ठ पदवीला चढलें, तें याच ज्ञानाच्या जोरावर चढलें; आणि तेच पूर्वीचे दिवस आजहि आपणांस पुनः प्राप्त करून घेतां येण्यासारखे आहेत. आपली पूर्वपरंपरा आणि पूर्वेतिहास यांचें अवलोकन केलें, तर अशी आशा बाळगणें अन्याय्य आहे असें कोणीहि म्हणणार नाहीं. पण असे दिवस येणें अथवा न येणें ही गोष्ट तुमच्या कर्तृत्वावर अवलंबून आहे. बंगाली तरुणांनो, या मार्गांत आपणांस कांहीं मदत मिळेल या आशेनें श्रीमंतांच्या आणि थोरामोठ्यांच्या तोंडाकडे केव्हांही पाहूं नका. त्यांच्या हातून अशा प्रकारचीं कार्यें केव्हांही घडलेलीं नाहींत. जगांतील सारीं महत्कार्यें आजपर्यंत गरीब दुबळ्यांनींच केलीं आहेत. बंगाल्यांतील अकिंचन तरुणांनो, तुम्हांला अशक्य असें कांहीं नाहीं. प्रत्येक गोष्ट तुमच्यानें होण्यासारखी आहे आणि ती तुम्हीं केलीच पाहिजे. तुम्हीं एकवार पुढें पाऊल टाकलें कीं शेंकडों अनुयायी तुमच्या मागें धांवत सुटतील. तुम्ही गरीब आहां, दुबळे आहां, असा

विचार कोणीहि करणार नाहीं. मात्र तुमची आत्मश्रद्धा दृढ पाहिजे. तुमचें वर्तन पवित्र असलें पाहिजे; आणि प्रत्येक कार्यांत तुमचें अंतःकरण पूर्णपणें गुंतलें पाहिजे. हें कार्य साधण्याकरितांच आपला जन्म आहे, अशी श्रद्धा बाळगा. बंगाली तरुणांनो, हिंदुस्थानाचा उद्धार तुमच्याच हातून होणार आहे. तुम्हांला हें खरें वाटो अगर न वाटो; पण हें मी निश्चयानें सांगतों कीं, हें उद्धाराचें कार्य तुमच्याच हातून होणार आहे. मला देह आहे आणि आत्मा आहे, हें जितकें खरें, तितकेंच तुम्ही भावी उन्नतीचे कारागीर आम्हां, हेंहि खरें आहे. याकरितांच तुम्हां बंगाली तरुणांकडे माझें अंतःकरण नेहमीं ओढ घेतें. तुम्ही निर्द्रव्य आहां, हीच माझ्या आशेची जागा आहे. तुम्ही दरिद्री आहां म्हणूनच कार्यकर्ते होऊं शकाल. तुम्ही अकिंचन आहां म्हणूनच या कार्याला आपलें सारें अंतःकरण वाहाल. तुम्ही भिकारी आहां, म्हणून सर्वसंगपरित्यागी होऊं शकाल. तुम्ही भिकारी आहां म्हणूनच हा उपदेश वारंवार मी तुम्हांला करितों. हा जसा माझा जीवनहेतु तसाच तो तुमचाहि आहे. तुम्ही द्वैती कीं अद्वैती कीं दुसऱ्याच कांहीं पंथाचे आहां, हा विचार मी करीत नाहीं. हिंदुस्थानांत शेंकडों मतें प्रचलित असलीं, तरी त्या सर्वांच्या पोटीं एकच सामान्य सूत्र आहे; आणि याच सूत्रानें आपण सारे बद्ध झालेले आहों, हा मुद्दा साऱ्या हिंदी राष्ट्राला पटेल असें करणें हें तुमचें कार्य आहे.

# संन्याशाचें ध्येय आणि त्याचा अभ्यास.

( बेलूर मठांतील तरुण संन्याशांनीं दिलेल्या मानपत्रास उत्तर. )

लांबलचक भाषण करण्याचा हा प्रसंग नव्हे. संन्यासधर्म योग्य रीतीनें पाळण्याकरितां तुमचा प्रत्यक्ष आचार कसा असावा याचें वर्णन मी थोडक्यांत करणार आहें. संन्यासमार्गाचें ध्येय काय आहे हें प्रथम समजणें अवश्य आहे. हें साध्य समजल्यानंतर त्याची सिद्धि कोणत्या मार्गानें होईल हेंहि जाणलें पाहिजे. तुमच्यापैकीं जे संन्यासी असतील त्यांनीं परहिताविषयीं नेहमीं दक्ष राहिलें पाहिजे. कारण, खरा संन्यासधर्म तोच. संन्यास अथवा त्याग म्हणजे काय याचें लांबलचक विवरण करण्यास आज मला वेळ नाहीं, तेव्हां हा अर्थ अगदीं थोडक्यांत सांगावयाचा म्हटलें तर तो 'मृत्यूविषयीं प्रेम' या शब्दांनीं सांगतां येईल. संसारी माणसें जगण्याची हांव धरितात, लांबलचक आयुष्य आपणांस कसें प्राप्त होईल या गोष्टीचा विचार तीं नित्य करीत असतात. संन्यासधर्म याच्या उलट आहे. संन्याशानें मृत्यूवर प्रेम केलें पाहिजे. तर मग आम्हीं आत्महत्या करावी कीं काय असा प्रश्न तुम्ही कराल त्याला नकारात्मकच उत्तर मला दिलें पाहिजे. आत्महत्या ही मृत्यूच्या प्रेमाची निदर्शक नाहीं. मृत्यूला कडकडून भेटावें म्हणून कोणी आत्महत्या करीत नाहीं. एखाद्यानें आत्महत्या करण्याचा यत्न केला आणि तो फसला तर या फंदांत तो पुनः पडत नाहीं, असा अनुभव शेंकडों वेळां आला आहे. तर मग मृत्यूविषयीं प्रेम म्हणजे काय ? सत्कार्यासाठीं देहदानाचीहि तयारी असणें हेंच मृत्यूविषयीं खरें प्रेम होय. आपल्या प्रत्येक कृतींत त्याग असणें हा स्वतःस मृत्यूकडे नेण्याचा मार्ग आहे. जी बुद्धि आज देहाला चिकटून बसली आहे ती पूर्ण नष्ट करणें हेंच खरें मरण. आपल्या खाण्यापिण्यांत आणि इतर बारीकसारीक कर्मांतसुद्धां त्यागाची भावना आपण सदोदित जागी ठेविली पाहिजे. शरीर पुष्ट व्हावें म्हणून तुम्ही अन्न भक्षण करितां पण परहितासाठीं त्याचा होम करण्याची तुमच्या चित्ताची तयारी नसेल तर तें शरीर पुष्ट केल्याचा उपयोग काय ? अनेक ग्रंथ वाचून आपलें मन तुम्ही पुष्ट करितां, पण जगाच्या हितासाठीं त्याचा

होम न होईल तर त्या मन:पुष्टीचा काय उपयोग ? तुमचा देह आणि तुमचें मन यांचा व्यय जगत्कार्यासाठीं न होईल तर त्यांचें लालनपालन फुकट केलें असें होईल. या एका क्षुद्र देहाला महत्त्व आणण्यासाठीं धडपड करण्यापेक्षां लक्षावधि बांधवांच्या कल्याणासाठीं त्याचें बलिदान करणें तुम्हांस श्रेयस्कर आहे. संन्यासधर्माचें हें ध्येय आहे, आणि हें साधण्याकरितां आपल्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणीं तुम्हीं मरत राहिलें पाहिजे. अशा प्रकारच्या मृत्यूंतच मुक्ति आहे. सर्व कल्याण त्यांत सांठविलें आहे. आणि याविरुद्ध असलेला मार्ग म्हणजे अधोगतीचा मार्ग होय. संन्यासधर्माचें साध्य काय याचा विचार येथवर झाला. आतां तें कोणत्या मार्गानें सिद्ध होईल याचाहि विचार केला पाहिजे. साध्य असाध्य कोटींतलें असूं नये हें प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे. राष्ट्रापुढें अत्युच्च साध्य ठेवलें तर तें सिद्ध न होतां राष्ट्र उलट दुबाळें होऊन अधोगतीच्या मार्गाला लागतें. बौद्ध आणि जैन धर्मांचा प्रसार हिंदुस्थानांत झाल्यानंतर येथें असाच प्रकार घडून आला. याकरितां आपलें साध्य अत्युच्च कोटींतलें असूं नये. पण यावरोबरच आणखीहि एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं आपली दृष्टि निबळ व्यवहारीहि असूं नये. कल्पनेची थोडीशीहि भरारी तुमच्याजवळ नसेल आणि विशेषेंकरून अवश्य असें एखादें साध्य तुमच्या मार्गदर्शकाच्या जागीं नसेल तर तुमची किंमत पशुहून अधिक नाहीं असें होईल. केवळ देहपरिचर्या चालविण्याचें काम पशुहि करितो. याकरितां आपल्या नजरेपुढें कांहीं उच्च साध्य सदोदित असलें पाहिजे आणि त्याबरोबरच व्यवहारहि पाहिजे. महत्त्वाचा मुद्दा इतकाच कीं, कोणत्याहि बाबीचा अतिरेक होऊं देऊं नये. आमच्या जुन्या दृष्टीनें पाहतां आमचें साध्य म्हटलें म्हणजे पर्वताच्या गुहेंत ध्यानस्थ होऊन बसावें आणि एके दिवशीं मरून जावें हेंच होतें. पण हा मार्ग चुकीचा आहे. सर्वांना मागें टाकून आपण एकटेंच पुढें जाऊं पहाणें चुकीचें आहे. फार काय, पण अशा रीतीनें चालण्यांत अखेरीस यशहि येत नाहीं असा अनुभव प्रत्येकाला पुढें येतो. दुसऱ्याच्या मुक्तीसाठीं धडपड करण्यांतच आपणांसहि मुक्ति लाभ होतो हें तत्त्व केव्हांना केव्हां तरी प्रत्येकाच्या अनुभवास आल्यावांचून राहणार नाहीं. याकरितां व्यवहार सोडूं नका. व्यवहाराचा सारा खटाटोप करीत

असतांहि आपल्या नजरेसमोर उच्च साध्य असावें. उच्च साध्य आणि संसार या दोहोंचा एकत्र परिपाक करण्याचा यत्न तुम्हीं करावा. एखाद्या क्षणीं अचल ध्यानस्थ होण्याची जशी तुमच्या चित्ताची तयारी असावी त्याचप्रमाणें दुसऱ्या क्षणीं शेतांत जाऊन नांगर धरण्याचीहि तुमच्या चित्ताची तयारी असली पाहिजे. एका क्षणीं विद्वत्ताप्रचुर शास्त्रार्थ चर्चा करीत असतां, दुसऱ्या क्षणीं भाजीची टोपली डोक्यावर घेऊन बाजारांत घासाघीस घालण्याची तुमच्या चित्ताची तयारी असली पाहिजे. एके क्षणीं अत्युच्च विचारांत मन दंग होऊन एखाद्या पृथ्वीपतीसारखे जग तुच्छ करून तुम्ही बसलेले असतां दुसऱ्याच क्षणीं केराची टोपली उचलण्याची तुमच्या चित्ताची तयारी असली पाहिजे. मठांतल्या केराची टोपलीच नव्हे, तर कोणाच्याही घरची टोपली उचलण्यांत तुम्हांला कमीपणा वाटूं नये.

तुमच्या या मठाचा उद्देश पुरुषार्थी माणसें निर्माण करण्याचा आहे, हें विसरूं नका. पूर्वकालीन ऋषींनीं लिहिलेल्या ग्रंथाचें अध्ययन करणें, एवढयानें तुमचा खरा कार्यभाग संपला असें नाहीं. ते ऋषि कालाच्या उदरांत नाहींसे झाले आणि त्यांजबरोबरच त्यांचीं मतेंहि अस्तंगत झालीं. आतां ती जुनीं मतें नुसतीं पठण करण्यांत अर्थ नाहीं. त्या ऋषींनीं काय ह्मटलें, हें पहात न बसतांना, तुम्ही स्वतःच ऋषि व्हा. पूर्वकालीन ऋषि महापुरुष होते हें खरें; पण तेहि मनुष्यच होते हेंहि खरें आहे. आणि तुम्हीहि मनुष्येंच आहां, मग त्यांचें ऋषिपण तुमचे अंगीं कां येऊं नये ? नुसत्या पुस्तकी विद्येनें कोणता कार्यभाग होणार ? फार काय, पण नुसत्या ध्यानानेंहि कांहीं कार्यभाग होणार नाहीं. मंत्रतंत्राचें नुसतें पठणहि तसेंच निरुपयोगी आहे. या पुस्तकी विद्येच्या मागें न लागतां तुम्ही स्वतंत्र विचारवान् व्हा. बुद्धिमार्गांतहि परावलंबी न होतां स्वावलंबी व्हा, पुरुषार्थी कसें व्हावें हें तुम्ही शिका. विश्वचालक शक्तीइतकें ज्याचें अंतःकरण शक्तिवान् असतें, आणि त्याबरोबरच तेथें एखाद्या स्त्रीच्या अंतःकरणाची कोमलता असते, तोच खरा पुरुष होय. आपणाभोंवतीं पसरलेल्या कोट्यवधी जीवांपैकीं प्रत्येक जीव तुह्मांस आत्मवत् वाटला पाहिजे; पण त्याबरोबरच एक रतिभरहि कंपायमान होणार नाहीं, असें तुमचें अंतःकरण असावें. या गोष्टी तुम्हांस परस्परविरोधी वाटतील, पण हा विरोधाभास तुमच्या ठिकाणीं असल्याशिवाय तुम्ही पुरुषार्थी होऊं शकणार नाहीं. साऱ्या विश्वावर हुकमत

चालविण्यास समर्थ असें मन आणि त्याबरोबरच अत्यंत नम्रता, विनय आणि आज्ञाधारकता हींहि अवश्य असलीं पाहिजेत. तुमच्या मठपतीनें नदींत उडी टाकण्याची आणि सुसर धरून आणण्याची आज्ञा तुम्हांस दिली, तर तिची अंमलबजावणी प्रथम करून तिच्या युक्तायुक्ततेची चर्चा तुह्मी पाठीमागून करा. आज्ञा अयुक्त असली, तरी तिचें पालन प्रथम आणि बुद्धिवादाचा विरोध नंतर, असा क्रम तुह्मीं स्वीकारला पाहिजे. आमच्या देशांत आणि विशेषतः बंगाल्यांत प्रत्येक मतवाला आपला निराळाच पंथ स्थापूं पहातो. आपलीं मतें आणखी कोणाशीं मिळत आहेत कीं नाहीं, हें पाहाण्यासाठीं तो क्षणभरहि थांबावयाचा नाहीं. यामुळें व्यक्ति तितके पंथ असा प्रकार होऊन पुरुषार्थी माणसांची निपज होणें अशक्य झालें आहे. याकरितां आपल्या संघाचा अभिमान तुह्मांला असला पाहिजे. संघाची आज्ञा ह्मणजे परमेश्वराचा हुकूम, अशी तुमच्या चित्ताची मान्यता असावी. कसलाहि हुकूम तुह्मीं केव्हांहि सोडूं नये. असल्या उद्दाम वृत्तीचें बीज जागच्या जागींच करपवून टाकलें पाहिजे. असा एखादा मनुष्य तुमच्यांत आढळल्यास त्याला ताबडतोब हद्दपार करा. आपल्या छावणींत असले हेर केव्हांहि राहूं देऊं नका. ही हवा जितकी स्वतंत्र तितकीच तुमची वृत्ति स्वतंत्र असतां या झाडासारखी अथवा त्या कुत्र्यासारखी ती आज्ञाधारकहि असावी.

# मी काय शिकलों.

पूर्व बंगाल्यांत येण्याची जी संधि मला मिळाली, तीबद्दल मला होत असलेला आनंद प्रथम व्यक्त केला पाहिजे. पाश्चात्य देशांतील अनेक ठिकाणीं मी भटकलों आणि तेथील संस्कृतीहि मी पाहिली; पण घरा शेजारील या भागांत येण्याची संधि पूर्वीं मला मिळाली नाहीं. आतां येथें प्रत्यक्ष फिरून कांहीं नवा ज्ञानलाभ मला करून घेतां येईल, याबद्दल मला आनंद वाटतो. पूर्व बंगाल्यांतील विशाल नद्या, विस्तीर्ण आणि सुपीक प्रदेश आणि चित्रासारखीं लहान लहान खेडीं, हीं पाहून माझे नेत्र तृप्त होतील. वास्तविक पाहिलें तर बंगाल ही माझी जन्मभूमि; पण असें असतांहि या प्रदेशांतील सृष्टिसौंदर्य उपभोगण्याचें सुदैव यापूर्वीं मला प्राप्त झालें नाहीं. माझ्या या मातृभूमींत इतकें सौंदर्य आणि मनोहारित्व असेल, अशी कल्पना यापूर्वीं मला झाली नाहीं. येथील भूपृष्ठ पहा अथवा जलपृष्ठ पहा; दोन्ही ठिकाणीं सृष्टिदेवी सारखीच रमणीय असल्याचें दृष्टोत्पत्तीस येईल. जगांतील अनेक देश हिंडून आल्यानंतर माझ्या मातृभूमीची यात्रा मला घडली, हेंहि एकपरी बरेंच झालें, असें मला वाटतें. कारण, त्यामुळें येथील सृष्टिसौंदर्याची माधुरी मला अधिक रसिकतेनें चाखतां येईल. इतर देशांतील सृष्टिसौंदर्याची तुलना येथल्या सौंदर्याशीं मला आतां करितां यईल. आणि यामुळें माझा आनंदहि द्विगुणित होईल. अशा रीतीनें भटकत फिरत असतां, नाना धर्मांची आणि पंथांची माहिती मला झाली. यांत कांहीं अर्वाचीन पंथ पाश्चात्यानुगामीही आहेत. पाश्चात्यांचें ध्येय त्यांनीं आपलेंसें केलें आहे. मी दारोदार हिंडत असतां दुसरेहि कित्येक पंथ माझ्या पाहाण्यांत आले. पण त्यावेळीं आमच्या राष्ट्रीय धर्मांत आणि येथील सृष्टींत इतकें सौंदर्य भरलें असेल, अशी कल्पनाहि माझ्या चित्तांत शिरली नाहीं. साऱ्या जगांत मनुष्यजातीची पारलौकिक आकांक्षा तृप्त करणारा जर कोणता धर्म असेल, तर तो फक्त हिंदुधर्मच आहे. अशी माझ्या चित्ताची खात्री आज पुष्कळ वर्षांपासून झाली आहे. आणि यामुळेंच या अद्वितीय धर्मांचे अनुयायी स्वधर्माबद्दल इतके उदासीन आहेत, हें पाहून माझ्या अंतःकरणांत वारंवार खेद उत्पन्न होतो. ही उदासीनता देशाच्या एखाद्या भागपुरतीच नसून हा प्रकार मला सर्वत्र आढळून आला. आतां सांप्रतची परि-

स्थिति अत्यंत कष्टप्रद आहे आणि आपणांभोंवतीं जडवादाचा घेरा चोहों-कडून पडला आहे, हें खरें. तथापि अशा स्थितींतही स्वधर्माबद्दल इतकी उदासीनता असणें चांगलें नव्हे. आमच्या या मातृभूमींत युरोपीय पद्धतीचे आचारविचार सर्वत्र फैलावून आमचा सारा संसार त्यांनीं व्यापून टाकला आहे. अशा विपरीत अवस्थेंत आमचें सारें आयुष्य काढणें आम्हांस भाग झालें आहे. पण असें असतांहि स्वधर्माचा विचार आपण अगदींच सोडून द्यावा, हें रास्त नव्हे.

हिंदी राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाकरितां आपल्या धर्मांत सुधारणा करावी अथवा खरें म्हणावयाचें तर तो सगळाच उलथापालथा करावा, असें कित्येक सुधारकांस अलीकडे वाटूं लागलें आहे. यांत कित्येक खरे विचारवंत गृहस्थ आहेत हें खरें. तथापि, पुष्कळसे शुद्ध आंधळे आहेत, हेंहि खोटें नाहीं. स्वतः कांहीं विचार न करितां डोळे मिटून दुसऱ्याच्या मागें ते जात असतात. आपण काय करीत आहों, याचेंहि भान त्यांस नसतें. सुधारकांतील हा आंधळा वर्ग पाश्चात्यांच्या कल्पना आमच्या धर्मांत घुसविण्यास अत्यंत उत्सुक झाला आहे. मूर्तिपूजा हा शब्द त्यांनीं सध्या उराशीं धरला आहे. हिंदु धर्मांत मूर्तिपूजा असल्यामुळेंच तो धर्म खरा नाहीं, असें हे बरळत सुटतात. पण मूर्तिपूजा हें प्रकरण तरी काय आहे, हें शोधून काढण्याची खटपट ते कधींच करीत नाहींत. मूर्तिपूजा खरोखर वाईट कीं चांगली आहे, हेंहि त्यांस कळत नाहीं. पाश्चात्य लोक मूर्तिपूजा त्याज्य समजतात, म्हणून त्यांच्या तोंडचा हा एक शब्द उचलून हेहि हिंदु धर्म खोटा आहे, अशी ओरड सुरू करितात. आतां आणखीहि एक वर्ग आपल्या लोकांत उत्पन्न झाला आहे. हिंदुस्थानांतील प्रत्येक चालरीत व प्रत्येक आचारविचार शास्त्रदृष्ट्या समर्थ-नीय आहे, असें हे म्हणतात. विद्युच्छक्ति, आकर्षण, वातावरणाचे स्फंद आणि अशाच प्रकारचे दुसरे कांहीं शास्त्रीय शब्द उच्चारून कोणत्याही मूर्खपणाच्या चालीचें मंडन ते करितात. काय सांगावें ? परमेश्वर म्हणजे विद्युत्स्पंदांचा गोळा आहे, असेंहि उद्यां ते म्हणतील ! असो. परमेश्वर त्यांचेंहि कल्याण करो. नाना प्रकारच्या स्वभावविशेषांच्या द्वारें नाना युक्तींनीं आणि अनेक हस्तांनीं परमेश्वर आपला कार्यभाग करीत असतो. भले बुरे सारेच लोक त्याचे हस्तक होत.

आतां याहूनहि वेगळा असा आणखी एक तिसरा वर्ग फार प्राचीनकाळापासून आमच्या देशांत अस्तित्वांत आहे. 'मला हे वादविवाद समजत नाहींत, ते समजण्याची माझी इच्छाहि नाहीं, इतकी डोकेफोड करून बुद्धीचा कीस पाडण्याची माझी इच्छा नाहीं, मला आत्मलाभ हवा, ज्या ठिकाणीं या दृश्याचें वारें नाहीं, ज्या ठिकाणीं सुख आणि दुःख हीं दोन्ही नाहींत आणि ज्या ठिकाणीं केवळ आनंदरूप मात्र आहे, अशा ठिकाणीं मला जावयाचें आहे. गंगास्नान करून हें ठिकाण प्राप्त होईल, असें मी म्हणत नाहीं. शिवाची, रामाची अथवा विष्णूची पूजा करून हें ठिकाण मिळेल, असेंहि मला सांगवत नाहीं पण कोणाचीहि पूजा, तो एकच विश्वमूर्ति आहे, या एकनिष्ठभावनेनें केली, तर मोक्ष मिळेल, असें मला वाटतें.' हा वर्ग आमच्या देशांत फार प्राचीनकाळापासून आहे, आणि मी स्वतः याच वर्गापैकीं आहें, असें मी मोठ्या अभिमानानें म्हणतों. परमेश्वराची सेवा करावी, पण संसारहि सोडूं नये, असा उपदेश कांहीं लोक आम्हांस करीत असतात. पण हे लोक विचारवंत नसतात. आपण काय बोलतों, हें त्यांस कळत नाहीं. जी गोष्ट ते तोंडानें बोलत असतात, तिला त्याच्याच अंतःकरणाची ग्वाही नसते. ज्या ठिकाणीं राम आहे तेथें काम नाहीं, असें आपले जुने महात्मे म्हणत असत. राम आणि काम यांचा वास एकत्र असूं शकत नाहीं. जेथें काम आहे तेथें राम येणार नाहीं; आणि राम आल्यावर काम राहूं शकणार नाहीं. कामकांचनाचा पूर्ण त्याग केल्याशिवाय परमात्मलाभ होऊं शकणार नाहीं, असें आमच्या जुन्या सत्पुरुषांनीं तार स्वरानें ओरडून सांगितलें आहे. हा सारा संसार मिथ्या आहे. तो पाण्याच्या बुडबुड्यासारखा पोकळ आहे. त्याच्या आंत कांहीं सत्त्व शोधूं जाणें मूर्खपणाचें आहे. तो सोडून दिल्याशिवाय तुम्हीं कांहीं केलें, तरी आत्मलाभ तुम्हांस व्हावयाचा नाहीं. संसारावर लाथ मारण्याचें धैर्य तुमच्या अंगीं नसेल, तर तसें स्पष्ट सांगा आणि आपला दुबळेपणा कबूल करा. पण आपलें ध्येय उच्चासनावरून ढळवूं नका. सडक्या प्रेताला सोन्यामोत्यांच्या अलंकारांखालीं झांकून टाकण्यांत काय मतलब आहे ? तुम्हांला परमेश्वर हवा असेल, तर हा लपंडावीचा खेळ बंद केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. मी हें सोडणार नाहीं आणि तेंहि धरीन, असली तुमची असंभाव्य आकांक्षा कधींहि तृप्त व्हावयाची नाहीं. स्वतःच्याच

मनाशीं असला लपंडाव करणें, हा शुद्ध अप्रामाणिकपणा आहे. असें करण्यांत आपल्या अंतःकरणाच्या रत्नभांडारांत शिरून तुम्ही चोरी करितां, असें आपले महानुभाव पूर्वज आपणांस सांगतात.

या प्राचीन पंथापासून मला कोणत्या ज्ञानाची प्राप्ती झाली ? मी शिकलों तें हें. 'दुर्लभं त्रयमेवैतद्देवानुग्रहहेतुकं । मनुष्यत्वं मुमुक्षत्वं महापुरुषसंश्रयः ॥' मनुष्यजन्म, मुमुक्षा आणि सद्गुरूचा आश्रय या तीन वस्तु मिळण्यास अत्यंत दुर्लभ असून, त्या फक्त परमेश्वराच्या प्रसादाच्या द्वारेंच मिळतील. पहिली दुर्लभ गोष्ट मनुष्याचा जन्म प्राप्त होणें, ही होय. कारण, मुक्तिलाभ मनुष्यदेहाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि देहाच्या आश्रयानें होणें शक्य नाहीं. यानंतर दुसरी दुर्लभ वस्तु मुमुक्षत्वही आहे. अगोदर मुक्तीची इच्छा पाहिजे, ती असल्याशिवाय तिच्या साधनांचा विचारच कोणी करणार नाहीं. व्यक्तिपरत्वें मुक्तीचे मार्ग भिन्नभिन्न असूं शकतील. नानापंथ आपलाच मार्ग श्रेष्ठ, असेंहि कदाचित् म्हणतील. अशा रीतीनें येथें मतांतर दिसलें, तरी मुमुक्षा प्रथम असल्याशिवाय मुक्ति मिळणार नाहीं, हें म्हणणें कोणीहि नाकबूल करणार नाहीं. मुक्तीची अत्युत्कट इच्छा म्हणजे मुमुक्षा. लौकिक संसाराबद्दल ज्याच्या चित्ताला पूर्णविषाद उत्पन्न झाला असेल आणि सुखदुःखादि द्वंद्वांच्या बाहेर जाण्याची इच्छा ज्याच्या चित्तांत अत्यंत तीव्र झाली असेल, तो मुमुक्षु. इतकी उत्कट इच्छा जेव्हां तुमच्या चित्तांत उत्पन्न होईल आणि ऐहिक जगाचें वारेंहि तुम्हांस असह्य होऊं लागेल, तेव्हां आत्मलाभाच्या मार्गाला लागण्यास तुम्हांस अधिकार प्राप्त होईल.

यानंतर महापुरुषाचा आश्रय ही तिसरी महत्त्वाची बाब आहे. ज्यानें स्वतः परमात्मलाभ मिळविला आहे, अशा सद्गुरूची संगति घडल्याशिवाय मुक्तिलाभासाठीं काय करणें अवश्य आहे, हेंहि आपणांस समजावयाचें नाहीं. जगाबद्दल आपल्या चित्तांत कितीहि तिटकारा उत्पन्न झाला आणि मुक्तिलाभाची इच्छा कितीहि तीव्र झाली, तरी सत्संगाशिवाय ती इच्छा फलद्रूप व्हावयाची नाहीं. हें होण्यास गुरुकृपेचीच आवश्यकता आहे. अशी आवश्यकता कां असावी ? ती असण्याचें कारण हेंच कीं, अत्यंत प्राचीन काळापासून महाशक्तीशीं संयोग करून देण्याचें कार्य गुरुपरंपरेच्या द्वारेंच आजपर्यंत घडून आलें आहे. आणि या मूलशक्तीची भेट तुम्हांस घ्यावयाची

असेल, तर तिच्या द्वाररक्षकांच्या कृपेनेंच तुमचें कार्य होईल. गुरु म्हणजे आपलें सर्वस्व असें तुमच्या मनानें तुम्हांस सांगितलें पाहिजे. तोच उपदेष्टा, तत्त्ववेत्ता, मित्र आणि तोच आपला मार्गदर्शक असें तुम्हांस वाटलें पाहिजे. या मार्गांत तुम्हांस पुढें पाऊल टाकावयाचें असेल, तर गुरूशिवाय दुसरें गत्यंतरच नाहीं. हा गुरु कसा असावा याची व्याख्याहि आमच्या प्राचीन पंथानें करून ठेविली आहे ' श्रोत्रियोऽवृजिनोऽकामहतो यो ब्रह्मवित्तमः ' तो श्रोत्रिय श्रुतिविद्या पारंगत असावा, तो निष्पाप असावा, निरिच्छ असावा आणि आत्मानुभवीहि असावा. श्रोत्रिय म्हणजे पुष्कळ पठण केलेला इतकाच अर्थ समजूं नये. पुष्कळ शास्त्रांचें पठण एखाद्यानें केलें, तर तेवढयानेंच श्रोत्रिय ही संज्ञा त्याला प्राप्त होत नाहीं. ज्याच्या बुद्धीनें शास्त्रांच्या रहस्याचें आकलन केलें असेल, तो श्रोत्रिय. या रहस्यांचा प्रत्यक्ष व्यावहारिक अर्थ काय आहे, याचा अनुभव आपल्या जीवनचरितांत ज्यानें घेतला असेल, तो श्रोत्रिय. तोंडानें अनेक शास्त्रें म्हणणें पण त्यांचें रहस्य न जाणणें, ही पोपटविद्या झाली. अशाला पंडित म्हणतां येणार नाहीं. शास्त्रांतील एखादाहि शब्द जाणून ज्याच्या चित्तांत ईश्वरभक्तीचा कल्लोळ उठत असेल, तोच खरा पंडित. नुसते पुस्तकी पंडित तुमच्या उपयोगीं पडावयाचे नाहींत. अलीकडे गुरु फार स्वस्त झाले आहेत. उठला सुटला तो आपणांस गुरु म्हणविण्याची इच्छा करितो. अंगावर चिंध्या पांघरून कवडी कवडी मागत फिरणारा भिकारीहि लक्ष रुपयांचें गोप्रदान सोडण्याची इच्छा करितो. गुरु ही चीज इतकी सोपी नाहीं. गुरु निष्कलंक असला पाहिजे. तसेंच तो अकामहत म्हणजे कोणत्याहि इच्छेनें घायाळ न झालेला, असा असला पाहिजे: कोणाचेंहि बरें करावें याशिवाय दुसरी कोणतीहि इच्छा ज्याच्या चित्ताला शिवत नाहीं, तोच अकामहत. ज्याच्या ठिकाणीं दया सागरासारखी परिपूर्ण असते; आणि जिच्यांत कोणत्याहि कारणानें कधीं उणीव येत नाहीं, तो अकामहत. कीर्तीसाठीं, पैशासाठीं अथवा दुसऱ्या कोणत्याहि हेतूसाठीं आपल्या ज्ञानाचा विक्रय जो कधींहि करीत नाहीं, तो अकामहत. त्याचप्रमाणें गुरु ब्रह्मनिष्ठहि असला पाहिजे. ब्रह्मनिष्ठ म्हणजे आत्मानुभवी. करतलामलकवत् ज्याला आत्मानुभव झाला असेल, तोच ब्रह्मनिष्ठ. गुरूची व्याख्या श्रुतींनीं याप्रमाणें केली आहे. अशा गुरूचा आश्रय तुम्हांस झाला, तरच ईश्वराचें दर्शन तुम्हांस होईल. असा आश्रय मिळाला, म्हणजे तुमचा मुक्तिमार्ग सुलभ होईल.

ज्याला सत्याची भेट हवी असेल, त्याला अध्यासही आवश्यक आहे. गुरूप-दिष्ट मार्गानें जाण्याचा हव्यास त्याच्या चित्ताला असला पाहिजे. गुरूनें सांगितलेलें सत्य प्रत्यक्ष गोचर कसें होईल असा निदिध्यास त्याच्या चित्ताला असावा. अभ्यासाकडे चित्त सदोदित राहून संसारापासून तें परांङ्मुख कर-ण्याचा यत्न त्यानें सतत केला पाहिजे. ईश्वर दर्शनाची इच्छा कितीहि प्रबळ असली आणि भाग्यानें गुरूचीहि प्राप्ति झाली, तरी तुमच्या चित्ताला अध्यास नसेल आणि गुरुपदिष्ट मार्गाचा अभ्यास तुमच्याकडून दृढनिश्चयानें आणि सतत न होईल, तर तुह्मांस आत्मानुभवहि होणार नाहीं. हीं सारीं जेव्हां एकवटतील, तेव्हांच तुमचें साध्य सिद्ध होईल.

तुम्ही उज्वलयश आर्यांचे वंशज आहां. त्यांनीं काय केलें, हें तुम्ही विसरूं नका. आपल्या धर्मानें केवढें मोठें साध्य आपणापुढें ठेविलें आहे, हें ध्यानांत आणा. संसारातीत होणें हेंच प्रत्येक हिंदूचें ध्येय असलें पाहिजे. केवळ ऐहिकाचाच त्याग आपणांस करावयाचा नसून स्वर्गसुखाचीहि इच्छा आपण नाहींशी केली पाहिजे. केवळ दुर्गुणच त्याज्य नसून अखेरीस सद्गुणहि आपणास टाकावयाचे आहेत, हें विसरूं नका. अशा रीतीनें बरें आणि वाईट या दोहोंच्याहि पलीकडे आपणांस जावयाचें आहे. आपणांस दृश्यजगापली-कडे जावयाचें आहे. 'सच्चिदानंद ब्रह्म' हा आपला अखेरचा मुक्काम आहे.